


# दिशा संपादकीय

(भाग 1 - सामाजिक)

डॉ. विजय बेडेकर

# दिशा संपादकीय

(भाग 1 - सामाजिक)

डॉ. विजय बेडेकर

**दिशा संपादकीय**

**प्रकाशक**
**डॉ. विजय बेडेकर**
शिवशक्ती, महर्षी कर्वे पथ,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४४ २५२५

**मुद्रितशोधन**
**प्रदीप गुजर**
ठाणे

**मुद्रणस्थळ**
**विलास सांगुर्डेकर**
परफेक्ट प्रिण्टस्,
नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१ / २५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

**प्रथमावृत्ती** : २ ऑक्टोबर २०२२

# प्रस्तावना

जुलै १९९६ ला 'दिशा' चा पहिला अंक प्रकाशित झाला. या घटनेला आज सुमारे २५ वर्ष उलटून गेली. या कालावधीत अनेक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि वैज्ञानिक स्थित्यंतरे झाली. आपल्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण सध्या साजरा करत आहोत. साहजिकच गेल्या ७५ वर्षांतील या सर्व आघाड्यांवर होत असलेल्या स्थित्यंतराची चर्चा आणि विवेचन सर्वच आघाड्यांवर होत आहे. हा बदल इतका गतीमान आहे की, प्रत्येक तासाला किंवा क्षणाला जग बदलतय असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. या सगळ्याचे प्रतिबिंब आपल्या जीवनशैलीमधे प्रतीत होत असते. अर्थातच साहित्य हे याला अपवाद असू शकत नाही.

'दिशा' मासिक चालू करण्यामागील विचारप्रक्रियेचा ऊहापोह येथे करणे अप्रस्तुत होणार नाही. त्यावेळी घरी किर्लोस्कर, स्त्री, मनोहर प्रमाणेच साधना आणि पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक येत असे. 'साधना'मधे वैचारिक तर 'विद्यार्थी गृहाच्या' मासिकामधे संस्थेला मिळणाऱ्या मदतीची माहिती दिली जात होती. विद्या प्रसारक मंडळाच्या शाळा आणि महाविद्यालयांत अनेक घटना, कार्यक्रम होत असत. त्या घटनांची नोंद, तसेच वैचारिक लेखांमधून प्रबोधन या हेतुमधूनच 'दिशा'चा जन्म झाला. यावेळी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांमधे मोठे बदल होत होते. साहजिकच कुठल्याही आघाडीवरील परंपरा आणि आधुनिकता याचे प्रतिबिंबही वेगवेगळ्या लिखित माध्यमांमधून व्यक्त होत होते. यातील संघर्षाचे प्रतिबिंबही साहित्यामधून दिसत असते. सुरवातीपासूनच दिशामधेही हे प्रतिबिंबीत व्हावे असा प्रयत्न होता. सुदैवाने या वेगवेगळ्या आघाड्यांवर कार्यरत असलेल्या व्यक्तींकडून 'दिशा'करता लेख लिहिले गेले.

सुरवातीची काही वर्ष संस्कृतचे गाढे अभ्यासक डॉ. मो. दी. पराडकर हे संस्कृतमधील एखादे सुभाषित घेऊन त्यावर वैचारिक लेख लिहीत असत. डॉ. बाळ गांगल, श्री. प्रकाश वैद्य, डॉ. वसंत बेडेकर (बडोदा), श्री. यशवंत साने यांच्या वैचारिक लेखांप्रमाणेच वास्तुशास्त्राचे गाढे अभ्यासक श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी, परामानसशास्त्राचे भारतातील अग्रगण्य अभ्यासक प्रा. वसंत आकोलकर, ते श्रीमती दुर्गाबाई भागवतांपर्यंत अनेकांचे वैचारिक लेख 'दिशा'मधे छापून आले

आहेत. आजही अनेक अभ्यासकांचे लेख ‘दिशा’ मधे छापून येत आहेत. विद्या प्रसारक मंडळाच्या संकेत स्थळावरती अभ्यासकांकरता हे सर्व लेख आणि अंक उपलब्ध आहेत.

माझे १०० हून अधिक संपादकीय लेख पुस्तकरूपाने इथे सादर करीत आहे. त्याचा स्वीकार करावा, ही विनंती.

**– डॉ. विजय बेडेकर**

# अनुक्रमणिका

## सामाजिक


| | | |
|---|---|---|
| १ | 'लज्जा' आणि 'सभ्यते'च्या निधनाबद्दल शोकसभा | ५ |
| २ | भारतीय स्वातंत्र्य – सुराज्य की अराजक? | १० |
| ३ | ख्रिस्ताब्द की युगाब्द? | १६ |
| ४ | महात्मा गांधी – स्मरण आणि विस्मरण | २१ |
| ५ | मेंदू हरवतो तेव्हा | २४ |
| ६ | शपथ ग्रहण की शपथेला ग्रहण? | २७ |
| ७ | ऐ मेरे वतन के लोगो ... | ३१ |
| ८ | भारतीय लोकशाही – वयात आलेली, की वय झालेली? | ३६ |
| ९ | भारत – एक ठेंगू लोकांचा देश? | ३९ |
| १० | भारतीय स्वातंत्र्य आणि चर्चिल | ४३ |
| ११ | स्वातंत्र्य–कोणासाठी? कशासाठी? | ४७ |
| १२ | पुन्हा स्वातंत्र्यासाठी लढा... | ५० |
| १३ | मेरा भारत महान | ५२ |
| १४ | धर्मप्रसार | ५८ |
| १५ | संत साहित्यातील ज्ञानद्वीप | ६२ |
| १६ | क्रियेवीण वाचाळ माणसे | ६५ |
| १७ | 'महासत्ता' नावाचे मृगजळ | ६८ |
| १८ | मानवी जनावर | ७१ |
| १९ | संस्कृतीच्या दिशांची दुर्दशा | ७५ |

| | | |
|---|---|---|
| २० | आर्थिक मंदी व समाज | ७८ |
| २१ | सामूहिक विश्वासाला तडे | ८२ |
| २२ | बोधप्रद अहवाल | ८५ |
| २३ | स्वाइन फ्लू आणि सामाजिकतेचे भान | ८८ |
| २४ | जया अंगी मोठेपण... | ९१ |
| २५ | सावरकर - प्रेरणास्रोत | ९४ |
| २६ | 'ऑगस्ट'चा महिमा | ९८ |
| २७ | सणावारांचे सांस्कृतिक अधःपतन | १०१ |
| २८ | सोहळे, भाषा आणि गुलामी | १०४ |
| २९ | भ्रष्टाचार का? | ११० |
| ३० | लढ्यांची शोकांतिका | ११४ |
| ३१ | बेशिस्तीला मान्यता... | ११८ |
| ३२ | परिस्थिती गंभीर आहे | १२१ |
| ३३ | अण्णा हजारेंची चळवळ, गांधीवाद आणि लोकशाही | १२४ |
| ३४ | गर्तेत रुतत चालले जग | १३१ |
| ३५ | दरी रुंदावत आहे | १३४ |
| ३६ | भयावह प्रश्नांचे शतक | १३७ |
| ३७ | दैवतीकरण - नाजूक विषय | १४० |
| ३८ | संस्कृती भंजन की वर्धन? | १४३ |
| ३९ | जबाबदारी आणि अधिकारांची जाणीव | १४८ |

| | | |
|---|---|---|
| ४० | सांस्कृतिक बधिरता | १५१ |
| ४१ | सांस्कृतिक सजगता | १५६ |
| ४२ | पहाट कधी होणार ? | १६२ |
| ४३ | आधुनिक भारताचे एक महान नेते : गोपाळ कृष्ण गोखले | १६७ |
| ४४ | उत्सवांची संस्कृती | १७१ |
| ४५ | भारताचा कला-इतिहास आणि सांस्कृतिक वसाहतवाद | १७६ |
| ४६ | नवउद्योग (Start Ups) धोरण | १८३ |
| ४७ | 'व्यथा' राष्ट्रद्रोहाची | १८९ |
| ४८ | लोकशाहीतील ठोकशाही | १९६ |
| ४९ | उषःकाल होता होता... | २०० |
| ५० | डोनाल्ड ट्रम्प यांचा विजय : शोध आणि बोध | २०७ |
| ५१ | भारतीय राज्यघटना - समज आणि गैरसमज | २१४ |
| ५२ | ''प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई'' | २२० |
| ५३ | वसाहतवाद जुना आणि नवा | २२६ |
| ५४ | लूटमार, वसाहतवादी (स्वातंत्र्यपूर्व),<br>आणि लोकशाहीवादी (स्वातंत्र्यानंतर) | २३२ |
| ५५ | विविधतेतील एकता? | २४० |
| ५६ | लिओनॉर्दो आणि त्याच्या कलाकृती | २४७ |
| ५७ | वसाहतवाद - भौगोलिक आणि सांस्कृतिक | २५६ |
| ५८ | 'पण लक्षात कोण घेतो!' | २६३ |
| ५९ | बुद्धिदेवता-विवेकवादी की विनाशवादी ? | २६९ |

| | | |
|---|---|---|
| ६० | सामर्थ्य व्यवस्थेचे | २७५ |
| ६१ | वसाहतवाद (Colonization) आणि कालगणना | २८३ |
| ६२ | संस्कृत, जर्मनी आणि Oriental Renaissance | २८९ |
| ६३ | न्यू झीलंडचा नरसंहार - शोध आणि बोध | २९६ |
| ६४ | विल्यम जोन्स पूर्व भारतीय संस्कृतीचा अभ्यास | ३०३ |

# ‘लज्जा’ आणि ‘सभ्यते’च्या निधनाबद्दल शोकसभा

आपल्याला कळविण्यास मला अत्यंत दुःख होत आहे की, बऱ्याच प्रदीर्घ आजारानंतर ‘लाज’ आणि ‘सभ्यता’ या दोन सामाजिक मूल्यांचे निधन झाले! फार प्राचीनकाळापासून या दोघांनाही भारतीय समाजामध्ये प्रतिष्ठेचे स्थान होते. यांचा ‘जिवंतपणा’ हाच समाजाला रानटीपणापासून मुक्त करून, सुसंस्कृत या संज्ञेस पात्र ठरत होता. दुर्दैवाने आज या दोघांनाही फारसे हितचिंतक आणि स्वकीय शिल्लक राहिले नसल्यामुळे त्यांना जगविण्याकरिता पुरेसे उपचारही होऊ शकले नाहीत! काहीशा पोरकेपणातच त्यांचे निधन झाले. समाज-व्यवहाराच्या सर्वच घटकांमध्ये यांचे अस्तित्व बऱ्याच वर्षांपासून असल्यामुळे या निधनाची खात्री करून घेण्याकरता सर्वच समाज-अवयव तपासून पाहिले. एकेकाळी लज्जेच्या जिवंतपणामुळे मानव, विशेषतः स्त्रिया आपले अवयव झाकण्याकरता जास्तीत जास्त प्रयत्नशील होत्या. आज बऱ्याच मोठ्या प्रमाणावरती वस्त्रगळती होऊन नाजूक शरीर अवयवांच्या उत्तान प्रदर्शनाला (निर्लज्जपणाला) कलामान्यता व राज्यमान्यता प्राप्त

झाली आहे! 'शब्द' हे संपर्काचे साधन झाल्यावर ते आशयगर्भ होऊ लागले. सभ्यतेच्या जिवंतपणामुळे आणि नैतिक बंधनांमुळे प्रतिभा आवश्यक ठरू लागली. परंतु सभ्यतेचा जिवंतपणा पुरोगामित्वाला (स्वैराचाराला) अडचण ठरू लागला. त्यामुळे अत्यंत गलिच्छ, प्रतिभाहीन, ओंगळ लिखाण 'सखाराम' आणि 'घाशीराम' यांच्या तोंडून बाहेर पडू लागले. लवकरच त्याला सार्वत्रिकता प्राप्त होऊन आज दैनंदिन जीवनामध्येही 'तुकाराम' आणि 'रामदास'ही याच वाङ्मयाचा वापर करताना दिसू लागले आहेत.

समाजजीवनाच्या इतर अवयवांमध्ये तर 'लज्जा' आणि 'सभ्यतेचे' निधन होऊन बराच काळ लोटल्याचे दिसून आले. चारित्र्य, संयम, सहिष्णुता, त्याग, ज्ञानप्राप्ती यांचे अस्तित्व हे समाजातील सभ्यतेच्या जिवंतपणाचे लक्षण ठरवले जात होते. भोगवाद आणि चंगळवाद, जडवाद आणि नास्तिकता यांना यामुळेच समाजात फारसे स्थान मिळू शकत नव्हते. विशेषतः समाज नेतृत्व, समाजधुरीण, समाजाचे मार्गदर्शन करणारे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक नेते कसोशीने या मूल्यांचे पालन करताना दिसत असत. हळूहळू या गोष्टी नाहीशा होत आज त्या नुसत्याच दुर्मीळ झाल्या आहेत असे नाही; तर त्या 'अव्यवहार्य' आणि 'टाकाऊ' सिद्ध झाल्या. उक्ती आणि कृती यांमध्ये कमीत कमी अंतर हे 'सभ्यते'च्या जिवंतपणामुळे आणि 'लाजे'खातर एकेकाळी बघायला मिळत होते. आज समाजामध्ये चक्क धटिंगण, गुंड, चारित्र्यहीन, निर्बुद्ध, भ्रष्टाचारी आणि व्यसनाधीन व्यक्ती ह्या नेतृत्व आणि मार्गदर्शन करताना उघडपणे दिसत आहेत. या सर्व गोष्टींना आपण सामाजिक प्रतिष्ठाही प्राप्त करून दिली आहे. धर्म कशाशी खातात हे सुद्धा ज्यांना ठाऊक नाही असे वीर हे भ्रष्टाचार निर्मूलन आणि धर्मपालनाच्या वल्गना करीत आहेत!

नेता आणि अनुयायी यांच्यातील संबंध हे एकमेकांच्या आदरयुक्त भीतीने बांधलेले होते. ओंगळ स्तुतिपाठक आणि भाट यांना फारसे स्थान नसे. टीका, मतस्वातंत्र्य आणि मतभिन्नता हा आत्मसंशोधन आणि सहिष्णुतेने हाताळण्याचा विषय होता. हे 'सभ्य' नेतृत्व व अनुयायाचे लक्षण असे. परंतु 'सभ्यता' आणि 'लज्जे'च्या निधनानंतर आज या संबंधांचे चित्र पालटले आहे. भाटगिरी, लाचारी, स्तुतिपाठकता हे 'अनुयायां'च्या निष्ठेचे प्रमुख लक्षण बनले आहे. मतभिन्नता, असहमती किंवा नेतृत्वाला विरोध ही बेशिस्त वर्तणूक ठरू लागली आहे. असे वर्तन करणाऱ्या अनुयायाला मारणे हा नेतृत्वाचा 'पुरुषार्थ' ठरू लागला. अनुयायाच्या

लाचारीने तर इतकी परिसीमा गाठली की, अशा प्रकारचा दिलेला मार हा शाब्बासकी देण्याचा एक प्रकार आहे असे तो सांगू लागला व बघणाऱ्याचा हा दृष्टिकोन असल्यामुळे मार व शाब्बासकी यातील फरक त्याला कळत नाही, असे तो म्हणू लागला! या गोष्टी चव्हाट्यावर आणणाऱ्या वृत्तपत्र प्रतिनिधीस जीव मुठीत धरून जगण्याची पाळी आली. सुमारे साडे-तीनशे वर्षांपूर्वी शिवशाहीत जेव्हा 'सभ्यता' व 'लज्जा' मानाने वावरत होत्या त्यावेळी निःशस्त्र, दुर्बल, सर्वसामान्य, असहाय्य जनतेवर हात उगारणाऱ्या शक्तींना काबूत आणण्यासाठी मावळ्यांची मनगटे कार्यरत होती. समाजरक्षण, कायदा आणि सुव्यवस्थेच्या स्थापनेकरिता पोलिस यंत्रणा आहे अशी आपली भाबडी समजूत होती. परंतु या दलात सामील झालेल्या व्यक्तीच्या हातातील शस्त्रापेक्षा, प्रलोभनांना बळी न पडणारे तयार मन आणि 'सभ्यता' आणि 'लज्जे'च्या जिवंतपणामुळे त्यांच्या वर्तणुकीवर पडणारा अंकुश केव्हाच निघून गेला आहे असे दिसून येते. नुकतेच पुणे येथे चक्क तीन पोलिसांनी व्यापाऱ्यांना लुबाडले. मुंबई येथे पोलिसांनी प्रवाशांना लुटले हे आपण वाचले असेलच. खिल्लारी येथे झालेल्या दुर्घटनेनंतर प्रेतांवरील दागिने पोलिसांनी पळविले हेही आपण वाचले असेलच. काही शतकांपूर्वी या गोष्टींमुळे शरमेने मान खाली गेली असती आणि काही दशके ती वर करता आली नसती! परंतु या मानेला ताठ ठेवायला लागणारा पाठीचा कणाही आज राहिलेला दिसत नाही. गुंडशाहीवर नियंत्रण ठेवण्याकरता ठाणे येथील पोलिस यंत्रणेच्या वरिष्ठांनी योजलेल्या योजना व सूचना आपल्या कार्यक्षमतेची दिवाळखोरी सिद्ध करत असतानाही समारंभपूर्वक त्यांचे ढोल वाजवले जात आहेत. यातली एक सूचना म्हणजे, व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानांमध्ये सायरन बसवून घेणे; दुसरी, नुकतीच बँकांना केलेली सूचना तर मन सुन्न करणारी आहे. यापुढे बँकेमधून मोठी रक्कम घेऊन जाताना ठेवीदाराने अथवा कर्मचाऱ्याने शस्त्रधारी संरक्षकांच्या सहाय्याने या गोष्टी कराव्यात. तसे न केल्यास, तो त्या व्यक्तीचा वा बँकेचा हलगर्जीपणा धरण्यात येऊन, त्यामुळे झालेल्या अपहाराची संपूर्ण जबाबदारी ही त्या व्यक्तीवर व बँकेवर राहील. अर्थातच पोलिस आणि चोर या दोघांनाही या जबाबदारीतून ठाण्याच्या पोलिस खात्याने मुक्त केले आहे! सभ्यता आणि लाज या गोष्टी समाजात थोड्याजरी जिवंत असत्या तर अशा सूचनांना निर्लज्ज समजून जनतेमध्ये संतापाची लाट उसळली असती. आज सर्व काही शांत आहे. समाज सुस्त, निर्ढावलेला व षंढ झाला आहे. जिवंतपणाचे लक्षण कुठेच दिसत नाही, आणि म्हणूनच 'सभ्यता' आणि 'लाज' यांचे निधन झाल्याची जाणीव व्हायलासुद्धा बराच वेळ लागला. या

मूल्यांचे निधन झाल्याची कुणकुण लागल्यावर काही सक्षम अधिकाऱ्यांनी या मूल्यांना जगविण्याचा, समाजामध्ये थोडातरी जिवंतपणा आणण्याचा निष्फळ प्रयत्न केल्याचे दिसून आले. तांत्रिक चुकांना, तर्कवाद आणि युक्तिवादाच्या सहाय्याने, भल्याभल्या विचारवंतांनी (संपादकांनी) अशा व्यक्तींवरती लगाम घातला व 'असा प्रयत्न हा अतिसाहसी आणि व्यवसाय-नियमांच्या चौकटीत न बसणारा आहे', असे सांगितले. म्हणून ही शोकसभा सुद्धा थोड्याशा भीतीच्या वातावरणात घ्यावी लागत आहे! लज्जा आणि सभ्यतेच्या निधनामुळे निर्लज्ज आणि असभ्य झालेल्या समाजयंत्रणेवरती अर्थातच याचा फारसा परिणाम होईल असे नाही; परंतु इतिहासामध्ये अशी शोकसभा झाल्याची नोंद जरी झाली, तरी या दोन मूल्यांनी बजावलेल्या कामगिरीतून आपण थोडेतरी उतराई होऊ अशी आशा वाटते!

वरील निवेदन हे आपल्या राष्ट्रीय चारित्र्याचे वर्णन आहे की काय अशी शंका यावी अशी परिस्थिती आजही आपल्याला समाजात दिसते. बधिर आणि संवेदनाशून्य समाज चैतन्यहीन असतो. हजारोंच्या संख्येने नवीन पदवीधर निर्माण होत असताना समाजाच्या सर्वच घटकांमध्ये नीतिमूल्यांची एवढी घसरण का होत आहे हा निरुत्तर करणारा प्रश्न आहे. 'शिक्षण' या संकल्पनेमागील मूळ भूमिका आणि त्याचे सामाजिक संदर्भच आज आपण हरवून बसलो आहोत. शिक्षण आणि प्रत्यक्ष आचरण एकमेकांना पूरक होण्याऐवजी त्यामधील अंतर वाढलेले दिसते. उदाहरणार्थ, 'धूम्रपान हे आरोग्याला घातक आहे', हे सत्य वैद्यकीय शिक्षणात समजून सुद्धा अनेक वैद्यक धूम्रपान करताना दिसतात. त्यांना मिळालेले ज्ञान त्यांच्या आचरणावर प्रभाव पाडू शकत नाही. शैक्षणिकपात्रता ही नोकरी किंवा व्यवसायाकरता आवश्यक 'परवाना' (Licence) आहे असे स्वरूप आज शिक्षणाला आले आहे. आज अशिक्षित सुसंस्कृतांपेक्षा शिक्षित असंस्कृतांची संख्या 'शिक्षण' वाढवीत आहे. विद्यापीठे डॉक्टर व इंजिनीयर निर्माण करीत आहेत; पण 'चारित्र्यवान' माणसे घडविणारी 'विद्यापीठे' आज आपण नाहीशी केली आहेत. जीवनातील कृतकृत्यतेचा सर्वात मोठा निकष आर्थिक यश हा झाला आहे. विज्ञानवाद आणि प्रगतीच्या अशा भोंगळ कल्पनांमुळे संस्कृतिवर्धनाऐवजी संस्कृतिभंजनाचे काम आपण इमानेइतबारे करीत आहोत. आशावाद माणसाला जिवंत ठेवतो आणि 'दिशा'चा हा प्रयोग या आशावादाचेच अपत्य आहे. हा एक आत्मपरीक्षण आणि अंतर्मुखी चिंतनाचा प्रयत्न आहे. आपल्यातील सृजनशीलतेला हे एक आव्हान आहे. या अंकातील सर्व लेखक आपापल्या व्यवसायात यशस्वी आहेत; पण सर्वचजण आजचे शिक्षण

आणि सामाजिक परिस्थिती बघून बेचैन आहेत. आपण आपल्या कर्तव्यात कमी तर पडत नाहीना (?) अशी त्यांना खंत आहे. अशा सर्वच 'बेचैन' नागरिकांना 'दिशा' हे नवीन व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. विद्या प्रसारक मंडळाच्या आजपर्यंतच्या सर्वच प्रकल्पांना आपण जसे भरघोस सहकार्य दिले आहे तसेच सहकार्य याही प्रकल्पाला द्याल अशी आशा करून 'दिशा'चा हा प्रवास सुरू करत आहोत.

**– जुलै १९९६**

❖❖❖

# भारतीय स्वातंत्र्य - सुराज्य की अराजक?

'दिशा' चा हा दुसरा अंक आपल्या हातात देताना अतिशय आनंद होत आहे. ज्या आत्मीयतेने आणि उत्साहाने आपण या संकल्पनेचे व पहिल्या अंकाचे स्वागत केले त्यामुळे आमचा आत्मविश्वास निश्चितच वाढला.

ऑगस्ट महिन्याला आपल्या देशाच्या इतिहासात एक विशेष महत्त्व आहे. १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी भारत स्वतंत्र झाला. हा दिवस एक राष्ट्रीय सण म्हणून भारतीय नागरिक साजरा करतात. या वर्षी 'भारतीय स्वातंत्र्य' ५० व्या वर्षात पदार्पण करील. राष्ट्राच्या आयुष्याच्या मानाने हा कालावधी फार मोठा नसला, तरी मनुष्याच्या आयुष्याच्या मानाने तो खूप मोठा आहे. आजच्या आपल्या लोकसंख्येतील ५० टक्क्यांहून अधिक नागरिक हे स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेले आहेत. १९४७ पूर्वीचा काळ हा पारतंत्र्याचा होता, हे हा तरुण नागरिक केवळ इतिहासाच्या पुस्तकांतून वाचतो. इंग्रज हे परकीय होते आणि म्हणून या परकीय सत्तेकडून या देशाचा विकास होत नव्हता.

भारतीय नागरिकांच्या विकासाची सूत्रे आणि दिशा, भारताच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा ताबा हा इंग्रजांच्या आधिपत्याखाली होता. त्यांचा उपयोग भारतीयांच्या हितापेक्षा इंग्लंडच्या आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक गरजेनुसार केला जात होता. सुमारे १५० वर्षे अनेकांनी आपल्या जीवनाची आहुती देऊन देशाला या दास्यातून आणि गुलामगिरीतून मुक्त केले. आपले भविष्य घडविण्याची संधी ही स्वातंत्र्यप्राप्तीमुळे भारतीय नागरिकांना इंग्रजांनी मिळवून दिली. पण अर्धशतकाच्या या स्वातंत्र्याने आपल्याला काय दिले? आजची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थिती आपल्यासमोर कुठले चित्र उभे करते? स्वप्नपूर्तीचे की स्वप्नभंगाचे?...

परकीयांच्या गुलामगिरीपेक्षा स्वकीयांची गुलामगिरी अधिक त्रासदायक असते! ती अधिक अत्याचार व जुलूम करते. आपल्याला हे स्वातंत्र्य कशाकरता हवे होते? या स्वातंत्र्याने आमच्या पिढीला काय दिले? भ्रष्टाचार? नीतिहीन, सत्तालोलुप, विधिनिषेधशून्य पक्षशाही? सामाजिक आशय हरवलेली, केवळ संख्याबळावर प्रस्थापित होणारी लोकशाही नावाची राज्ययंत्रणा? की धटिंगण, गुंड, गुन्हेगारांच्या साम्राज्याला खतपाणी घालणारी, स्वतःच्या तुंबड्या भरणारी निर्बुद्ध नोकरशाही? देशाच्या आजच्या या परिस्थितीला कोण जबाबदार आहे? स्वातंत्र्यापूर्वीचे परकीय ब्रिटिश की स्वातंत्र्याचा दुरुपयोग करणारे स्वकीय? स्वातंत्र्याआधी भारतीय नागरिक गरीब होते पण दरिद्री नव्हते, अशिक्षित होते पण असंस्कृत नव्हते, ते आग्रही नसतील पण लाचार नव्हते, आक्रमक नसतील पण भेकड नव्हते. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पन्नास वर्षांनी मात्र समाजाचे चित्र हे भेसूर आणि मन खिन्न करणारे आहे. पारतंत्र्यकाळात त्यांचा कायदा पाळला नसेल म्हणून इंग्रजांनी भारतीय नागरिकांवर कठोर व कधीकधी अमानुष कारवाई केल्याची अनेक उदाहरणे दिसतील; पण उघड भ्रष्टाचार, समाजातील असभ्य आणि गुंड प्रवृत्तींशी हातमिळवणी करून सामान्य नागरिकांची गळचेपी आणि दहशत निर्माण केल्याची उदाहरणे मात्र मिळणार नाहीत. आज स्वातंत्र्योत्तर काळात मात्र कायदा आणि सुव्यवस्था यांचे रक्षण करणारी पोलिस-यंत्रणा किंवा तटस्थ आणि निर्भयपणे कार्य करण्याची अपेक्षा असणारी न्यायव्यवस्था, राज्ययंत्रणा, सामाजिक नेतृत्व हे आपल्या अधिकाराचा गैरवापर करून लोकांची फसवणूक, लुबाडणूक राजरोसपणे करताना दिसत आहेत. यामुळे 'स्वकीयांपेक्षा परकीय बरे' असे म्हणण्याची 'दुर्दैवी' पाळी आज समाजावर आली आहे!

स्वातंत्र्याचा खरा अर्थ काय? व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर निर्माण करण्याचे अपेक्षित ‘सुराज्य’ म्हणजे तरी काय? हे प्रश्न बहुधा स्वातंत्र्यलढ्यातील परिपक्व नेतृत्वाला या शतकाच्या सुरुवातीलाच भेडसावू लागले असावेत असे दिसते. ‘स्वराज्य आणि सुराज्य’ हा अग्रलेख लो. टिळकांनी १९०७ साली लिहून ठेवला आहे. त्यातील आशय आजही अर्थपूर्ण आहे. परकीयांचे सरकार अगदी शिस्त प्रस्थापित करणारे असले तरी ते नेहमीच लोकांना सुखावह असते असे नाही. टिळक लिहितात, ‘‘... कारण शिस्त आणि सुख हे दोन्ही नेहमी एकत्र राहतातच असे नाही. तुरुंगातील व्यवस्था पुष्कळ शिस्तवार असते. पण त्यामुळे कैद्यांना ती कधीही सुखकारक वाटत नाही.’’

आणीबाणीतील शिस्तीचे कौतुक करणाऱ्या यादगाऱ्यांनी तर हा अग्रलेख जरूर वाचावा. १२ ऑक्टोबर १९०६ च्या ‘काळ’ मधील शि. म. परांजपे यांचा ‘डोळ्यांत फेकायच्या धुळीचे कण’ हा अग्रलेख जरी ब्रिटिश सरकारला उद्देशून लिहिला असला, तरी आजच्या परिस्थितीला तो हुबेहूब लागू आहे. उपरोधाने भरलेला हा अग्रलेख आजच्याच सरकारचे वर्णन करतो आहे की काय इतके विलक्षण वास्तव त्यात भरलेले आहे. शि. म. परांजपे लिहितात, ‘‘... शिक्षणाच्या मिषाने लोकांना कमकुवत करणे, सुरक्षिततेच्या मिषाने लोकांना निःशस्त्र करणे आणि करांच्या मिषाने लोकांना निर्धन करणे, जातीजातीत फूट पाडणे, लोकांच्या अंगात पात्रता येण्याच्या आशेवर त्यांना अवलंबून ठेवणे...’’ अशी धुळीच्या कणांची स्पष्टोक्ती त्यांनी व्यक्त केली आहे.

वरकरणी ब्रिटिश सरकारची कारणे जरी लोकहिताची असली तरी त्यातील प्रत्यक्षात लोकांना गुलामांत जखडून ठेवण्याचा कुटील अंतस्थ हेतू उघड करून सांगण्याकरता परांजप्यांनी वरील उदाहरणे दिली आहेत. आजच्या स्वातंत्र्योत्तर सरकारचे वागणे, बोलणे आणि प्रत्यक्ष कृती, आणि ब्रिटिशांचे हेतू यात आज विलक्षण साम्य आढळते आहे. वास्तविक पाहता मानवाला सगळेच अधिकार जन्मजात व नैसर्गिकरित्या मिळालेले असतात. आपल्याच अधिकारांचा संकोच करून तो सरकार नावाची विश्वस्त संस्था निर्माण करीत असतो. तो आपल्या अधिकारांचा जेवढा अधिक संकोच करतो तेवढे सरकारचे अधिकार बलाढ्य होत जातात. एका व्यापक, सभ्य आणि सुसंस्कृत समाजाच्या निर्मितीकरता नागरिक आपल्या अधिकारांचा असा संकोच करीत असतो. पण या भावना आणि भूमिका, विश्वस्तपणाची संकल्पना सरकाररूपी यंत्रणेतून जेव्हा नाहीशी होते, स्वार्थी सत्तालोलुप

समाजघटक जेव्हा सरकारवर ताबा मिळवतात, तेव्हा हाच समाज सरकारकडून होणाऱ्या अन्यायाच्या अनिर्बंध फेऱ्यात सापडतो. हाच विचार शि. म. परांजपे यांनी या अग्रलेखात मांडला आहे तो असा –

''सरकार ही संस्था अस्तित्वात आल्यावर तिचे पहिले काम लोकांपासून त्यांचे नैसर्गिक हक्क लुबाडून घेण्याचे असते. लोकांपासून लुबाडलेल्या हक्कांवर आणि पैशांवर सरकार ही संस्था उभारली जाते. 'सरकार' ही संस्था कशा लबाड्या करते, हक्क देण्यापेक्षा घेण्याचे काम या संस्थेकडून कसे होते आणि ते काम बेमालूमपणे होण्यासाठी ही संस्था कशाकशा लुच्चेगिरीच्या युक्त्या उपयोगात आणीत असते याचा विचार केला असता, यावर लोकांच्या हातात काही तोड आहे की नाही हा प्रश्न साहजिकपणेच उत्पन्न होतो.''

या देशातल्या विद्वानांची (काही अपवाद वगळता) सैद्धांतिक गुलामगिरी भयावह आहे.

त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात पुरोगामित्वाचा टेंभा मिरवण्याकरता संस्कृती आणि इतिहास यांचा विपर्यास आणि अज्ञान यातून संस्कृतिभंजनपर विपुल लिखाण निर्माण केले. पाश्चात्त्य साहित्य आणि संशोधनपर निष्कर्ष हे भारतीय संदर्भांचा विचार न करता मांडले गेले. यामुळे नवीन पिढीच्या रसिकतेचे प्रबोधन होण्याऐवजी सांस्कृतिक परावलंबित्व वाढले. गेल्या ५० वर्षांत निर्माण झालेले वसाहतवादामागील तत्त्वज्ञान आणि ते राबवणाऱ्या यंत्रणेचे अंतिम हेतू यावर प्रकाश टाकेल असे विपुल संशोधनपर साहित्य आज उपलब्ध आहे. या देशावर राज्य करणारे अनेक इंग्रज अधिकारी हे हुशार, कर्तव्यदक्ष, धूर्त आणि मुत्सद्दी होते याबद्दल दुमत असण्याचे कारणच नाही. रूबर्ट क्लाइव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, विल्यम जोन्स्, विल्यम बेंटिक, मेकॉले, फर्ग्युसन, कनिंगहॅम, मॅक्समुल्लर यांनी अथक परिश्रम करून भारतीय संस्कृती, साहित्य आणि जीवनपद्धती यांवर लिखाण करून ठेवले आहे. त्यांची विद्वत्ता आणि परिश्रम वादातीत असले तरी त्यांचे अंतिम हेतू आणि निष्कर्ष हे सद्हेतू आणि तटस्थतेचे द्योतक आहेत असे दिसत नाहीत. वसाहतवादावर पूर्वी अनुपलब्ध असलेली अनेक शासकीय कागदपत्रे, या व्यक्तींची लिहिली गेलेली चरित्रे, आणि त्यांनी मित्र व आप्तेष्टांशी केलेला पत्रव्यवहार आज उपलब्ध आहे. हे लिखाण मुळात न वाचता दुय्यम आणि तिय्यम संदर्भांचा आधार घेऊन, या अधिकाऱ्यांनी अज्ञानावर आधारित केलेले भारतीयांच्या संस्कृतीबद्दलचे लिखाण आणि त्यांचे निष्कर्ष यांचे आंधळेपणाने कौतुक करणारे भारतीय

अभ्यासक आणि विचारवंत जेव्हा आपण बघतो तेव्हा त्यांची कीव करावीशी वाटते!

उदाहरण मेकॉलेचेच घेऊ, कारण तो इंग्रजांच्या शिक्षण आणि दंडविधान या दोन महत्त्वाच्या शासकीय धोरणांना जबाबदार आहे. हा बदल घडवण्याकरता त्याने दिलेली कारणमीमांसा इंग्रजांना त्यावेळी पटली असली, तरी स्वतंत्र भारतात तिची नव्याने चिकित्सा होणे आवश्यक आहे. भारतात येण्यापूर्वी मेकॉलेला भारतीय संस्कृती, साहित्य आणि भाषा यांचे सुतरामही ज्ञान नव्हते. परंतु याच काळात त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी यांचा अभ्यास करून संस्कृतमधील विविध ग्रंथ इंग्रजीत भाषांतरित केलेले होते. ते त्याला वाचनास उपलब्ध होते. इ.स. १८०० ते १८३० या कालावधीत उत्तर, पश्चिम आणि दक्षिण हिंदुस्थानात इंग्रजपूर्व अस्तित्वात असलेल्या शिक्षणपद्धतीचे अहवाल हे इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यावेळी तयार केले होते. त्यांचेही गांभीर्याने वाचन मेकॉलेने केलेले दिसत नाही. मेकॉलेचे शिक्षणविषयक 'मिनिट' हे पाश्चात्त्य संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचा अहंकार आणि भारतीय संस्कृतिविषयक ठार अज्ञान यांतून निर्माण झालेले आहे. 'भारतीय लोक हे निर्बुद्ध, अडाणी व असंस्कृत आहेत, त्यांचे साहित्य मूर्खपणाचे असून त्यांना शास्त्रांचे अजिबात ज्ञान नाही अशी त्याची ठाम समजूत होती. या अडाणी भारतीयांचा उद्धार पाश्चिमात्य संस्कृती आणि इंग्रजी माध्यमातून शिक्षण यांच्यायोगे करायला हवा', हा त्याचा निष्कर्ष होता. अनेक तत्कालीन इंग्रज अधिकारी व संशोधक यांना हे तेव्हाही मान्य नसले, तरी वसाहतवादाच्या शिस्तीत वाढलेल्या आजच्या अनेक भारतीय विचारवंतांना या निष्कर्षाची पुन्हा परीक्षा करावीशी वाटत नाही. मेकॉलेचे अंतस्थ हेतू त्याने आपल्या वडिलांना व बहिणीला लिहिलेल्या पत्रांतून स्पष्टपणे प्रतिबिंबीत झाले आहेत. मेकॉलेसारखे मुत्सद्दी, दूरदर्शी आणि स्वदेशप्रेमी अधिकारी इंग्रजांना लाभले म्हणूनच इंग्रज येथे दीडशे वर्षे राज्य करू शकले. मेकॉलेचे कौतुक करणारे भारतीय पुष्कळ आहेत, पण त्याची दूरदृष्टी आणि धूर्तपणा असणारे 'भारतीय मेकॉले' कधी निर्माण होणार? आजच्या या भयावह परिस्थितीस असे खुजे व अदूरदर्शी नेतृत्व मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहे.

ब्रिटिशांच्या काळात नव्हता एवढा बेशिस्त, आळशी आणि सवलतींना हपापलेला समाज आणि सत्तेच्या धुंदीने मस्त झालेले राजकीय नेतृत्व आज आपण अनुभवत आहोत. कुठलाही राजकीय पक्ष किंवा संघटना याला अपवाद नाही. गल्लीतल्या कारकुनापासून दिल्लीतल्या पंतप्रधानांपर्यंत भ्रष्टाचाराने बरबटलेली

नोकरशाही आणि आजची राजकीय एकाधिकारशाही आणि कुटुंबशाही बघितली की शरमेने मान खाली जाते. बेशरमपणा आणि लिंगपिसाटपणाचा कळस म्हणजे नयना साहनीबाबतची घटना. या स्त्रीची खांडोळी करून तंदूरमध्ये जाळणारे नराधम बघितले की जगातली क्रूरताही निःस्तब्ध होईल. अस्मिता हरवलेल्या समाजामध्ये भाट आणि स्तुतिपाठकांची चलती असते. जेवढा समाज बधिर, निस्तेज, लाचार आणि भित्रा तेवढी या भाटांची प्रजा अधिक! यातूनच जन्माला येते कुटुंबाची एकाधिकारशाही. गेल्या पन्नास वर्षांत केंद्रापासून राज्यापर्यंत असे एकाधिकारशहा व त्यांचे भाट आपण बघत आहोत. ही कुटुंबशाही सभ्य समाजाचे सर्व संकेत झुगारून देऊन निरपराध नागरिकांचे मुडदे पाडू लागते. अशी शोकांतिका आपल्या या 'स्वराज्य' म्हणणाऱ्या स्वराज्याची!

१५ ऑगस्टला या देशाचा नकाशा स्वतंत्र झाला, की नागरिक गुलामगिरीतून मुक्त झाला असा प्रश्न पडावा अशी ही परिस्थिती. खंडणी, बलात्कार आणि मानवहत्येचे आरोप असलेले नागरिक हे लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येतात; एवढेच नाही तर गृहमंत्री म्हणूनही त्यांची नेमणूक होते! आयुष्यभर तस्कर, करचुकवे, देशद्रोही, सामाजिक गुन्हेगार आणि गुंडांची वकिली करणारे विधिज्ञ हे कायदामंत्री होतात; ही स्वातंत्र्यातील लोकशाहीची केवढी मोठी शोकांतिका!

भारताचा सोमालिया किंवा रवांडा होऊ द्यायचा नसेल, टोळी आणि यादवी युद्धापासून त्याचा बचाव करायचा असेल, तर तरुण पिढीवर प्रचंड मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. निर्भय आणि चारित्र्यवान नेतृत्व निर्माण झाल्याशिवाय आजची परिस्थिती पालटणार नाही. एकवेळ परकीयांपासून स्वातंत्र्य मिळवता येते, पण स्वकीयांपासून त्याचे संरक्षण करण्याइतकी कठीण गोष्ट नाही. पन्नासाव्या स्वातंत्र्यदिनाची पहाट ही नव्या आशा पल्लवित करणारी असेल एवढीच आशा आता धरता येते. 'हे परमेश्वरा, स्वकीयांपासून माझे संरक्षण कर' असे म्हणण्याची पाळी आज भारतीय नागरिकांवर आली आहे एवढे मात्र खरे!

**– ऑगस्ट १९९६**

❖❖❖

# ख्रिस्ताब्द की युगाब्द?

सत्ता, संस्कृती आणि प्रगती यांचे आजपासून पंचवीस वर्षांनी स्वरूप कसे असेल याचे भाकीत करणारे एक पुस्तक इंग्लंडमध्ये नुकतेच प्रकाशित झाले आहे. लंडनच्या 'इंडिपेंडंट' या दैनिकाचे स्तंभलेखक हंमीश मंक्रे यांनी हे 'द वर्ल्ड इन २०२०' या नावाचे पुस्तक लिहिले आहे. रविवार २५ ऑगस्टच्या 'लोकसत्ते'त 'तारतम्य' या सदरात अरुण टिकेकर यांनी या पुस्तकाची नोंद घेऊन काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. 'उद्याच्या जगात तांत्रिक प्रगतीपेक्षा सांस्कृतिक शक्ती महत्त्वाची ठरणार आहे, व राष्ट्राचे यश हे नागरिकांच्या चांगल्या वर्तनावर अवलंबून असणार आहे,' असा विचार त्यांनी मांडला आहे.

आजपासून सुमारे चार वर्षांनी हे जग एकविसाव्या शतकात पदार्पण करणार आहे. या संधिकाळात साहजिकच गत शतकांचा आढावा व आगामी काळातील घटनांचा वेध घेण्याची स्पर्धाच आज जगात लागलेली दिसते. खरे पाहता मानवी प्रगतीचा कालपट हा काही लक्ष वर्षांचा आहे. २००० वर्षे या आकड्याचे महत्त्व प्रामुख्याने पश्चिमकेंद्रित

(Eurocentric) संशोधन-विश्लेषण करण्याच्या पगड्यामुळे आहे. ही कालगणना ख्रिस्ती धर्माचे प्रेषित येशू ख्रिस्त यांच्या जन्मापासून आहे. या गोष्टीला आक्षेप असण्याचे काहीच कारण नाही. परंतु या कालगणतेत एक धोका मात्र निश्चित आहे. ख्रिस्तपूर्व अस्तित्वात असलेल्या मानवी इतिहास व प्रगतीला यामुळे गौण व दुय्यम स्थान मिळते. पश्चिमकेंद्रित प्रगतीच्या विश्लेषणात 'प्रगती' ही श्रेणीयुक्त म्हणजे टप्प्याटप्प्याने, चढत्या क्रमाने वाटचाल करीत असल्याचे गृहीत धरले आहे (Linear, Sequential Progression). साहजिकच यामुळे प्राचीन, विशेषतः ख्रिस्तपूर्व संस्कृती ह्या बाल्यावस्थेत, शैशवावस्थेत असल्याचे भ्रामक चित्र उभे राहते.

शब्द हे अर्थवाही असतात. अर्थांमागे काही परंपरा, विचारप्रक्रिया, सांस्कृतिक छटा यांचे अस्तित्व असते. २१ व्या शतकाचे विवेचन करताना शब्द अतिशय काटेकोरपणे वापरायला हवेत. नवे/जुने, आधुनिक/मागासलेले हे शब्द आपल्या नित्य वापराचे आहेत. यांचा अर्थ समजून घेण्याकरता कोणी शब्दकोष पाहत नाही. हे शब्द उच्चारताच काही ठरावीक संकल्पना आणि अर्थ ध्वनित होतात. 'आधुनिक' किंवा 'नवीन' हे शब्दच आपण घेऊ. हे शब्द उच्चारल्याबरोबर उपयुक्त, प्रगतिशील, आकर्षक, प्रभावी, भविष्यकाळाशी जुळणाऱ्या अशा गोष्टींचे रूप उभे राहते. 'जुने' किंवा 'मागासलेले' म्हटल्यावर जीर्ण, क्षीण होत चाललेले, क्षमता हरवलेले, अश्मीभूत, अडगळ, प्रगतिरोधन असे चित्र उभे राहते. कालक्रमानुसार नवे / जुने किंवा आधुनिक / जीर्ण ठरवणे यात काहीच गैर नाही. पण चेतन किंवा अचेतन, उपयुक्त किंवा निरुपयोगी, प्रगत किंवा मागासलेले या अर्थच्छटा ज्यावेळी त्यातून ध्वनित होतात त्यावेळी वस्तुस्थितीचा विपर्यास होण्याची शक्यता असते. हे कसे ते आपण पाहू.

वसाहतवादाचा पगडा, त्यातून निर्माण झालेली मानसिक व वैचारिक गुलामगिरी यामुळे दिवसेंदिवस आपण आपला व्यवहार इंग्रजी भाषेतून करू लागलो आहोत. निर्मिती ही नेहमीच कठीण असते, उसनवारी सोपी असते. साहजिकच परिभाषा निर्माण करणे, अडचण वाटली तरी अशा शब्दांचा सराव व उपयोग करणे, यापेक्षा तर्क आणि युक्तिवादाच्या साह्याने 'सर्वच विज्ञान इंग्रजीत आधीच उपलब्ध असताना मातृभाषेत ते आणण्याची गरजच काय?' असा प्रश्न विचारणे सोपे जाते. परंपरेने बुद्धीची देण लाभलेल्यांना अडचण नसली तरी 'खालच्या पायरी' वरील समाजाच्या आकलन क्षमतेचा यात विचार केलेला नसतो. तेथे आपल्या आयुष्यापुरती तात्पुरती सोय बघितलेली असते. इंग्रजी भाषेचा विकास व तिची व्याकरणाची चौकट

चांगली व उपयुकत असली, तरी ती 'भाषा' म्हणून परिपूर्ण आहे असे भाषाशास्त्रज्ञांना वाटत नाही. इंग्रजी ही कालपटलावरील आधुनिक भाषा आहे, अधिक सरावाची व वापरली जाणारी भाषा आहे. साहजिकच या आधीच्या मानवी सभ्यता ह्या इंग्रजी, जर्मन किंवा फ्रेंच यापेक्षा तंत्रदृष्ट्या अधिक विकसित, नियमबद्ध भाषा निर्माण करू शकतील असे विसाव्या शतकातील अहंकारी माणसाला पटत नाही. संस्कृत ही कालगणनेत जुनी आणि आज व्यवहारात वापरात नसलेली, पण तंत्रगुणांमध्ये अधिक विकसित व आधुनिक भाषा आहे. निसर्गात आढळणारे धातू व खनिजे ही आज उपलब्ध झाली तरी ती नवीन नसतात, उलट त्यांची किंमत कालाच्या व्यस्त प्रमाणात ठरत असते. गणिती आकडे हे काही आधुनिक नाहीत. पण ते जुने असले तरी त्यांची उपयुक्तता कमी झालेली नाही आणि म्हणूनच नवीन किंवा आधुनिकता हा शब्द मानवी विकासाचा विचार करताना मोजमापाच्या सोयीकरता, कालगणनेच्या निर्देशाकरता अर्थ सूचित होईल इतक्याच सीमित मात्रेत वापरणे आवश्यक आहे. उपयुक्तता, गुण, दर्जा, प्रत यांचा निर्देशांक असा त्याचा अर्थ वापरणे सोयीचे असले तरी वस्तुस्थितीदर्शक ठरणार नाही. या शतकापुरता विचार केला तरी विमान, दूरध्वनी, संगणक इ. अनेक गोष्टी या शतकाच्या सुरुवातीला फारशा नव्हत्या. पण म्हणून मानवी शाश्वत मूल्ये ही त्यावेळी कमी होती व या उपकरणांच्या अस्तित्वामुळे आज त्या मूल्यांत वृद्धी झाली, मानवांच्या परस्परसंबंधात सुधारणा झाली असा कुठलाही शास्त्रीय पुरावा उपलब्ध नाही.

याउलट अनिर्बंध उपयुक्तता व भोगवादाच्या आहारी जाऊन नैसर्गिक साधनसंपत्ती आपण वेगाने नष्ट करीत आहोत, ते आता सर्वमान्य झाले आहे. कुटुंबसंस्था, स्त्रियांचे कुटुंबातील स्थान, गुरु-शिष्यनाते, कौटुंबिक व सामाजिक संबंध व या सर्वांतून निर्माण केलेल्या सामाजिक संस्था या हजारो वर्षे शाश्वत मानवी मूल्ये टिकवून आहेत. आजची तांत्रिक उपकरणे नव्हती तेव्हा मानवाची सृजनशीलता ही कमी होती असे दिसत नाही. परंतु या उपकरणांशिवाय 'प्रगती' किंवा 'वैज्ञानिक' दृष्टी असणे शक्यच नाही अशा अहंकारी पूर्वग्रहामुळे प्रगतीचे मूल्यमापन एकतर्फी आणि अन्यायकारक होत होते. आणि म्हणूनच साहित्य, कला, स्थापत्य शास्त्रे, विज्ञान यांचे अस्तित्व प्राचीन मानवी सभ्यतांमध्ये असल्याचे नाकारण्यात येते. याच कलुषित आणि एकांगी दृष्टिकोनामुळे, अडीच-तीन हजार वर्षांपूर्वी मांडले गेलेले ग्रहगणित, भूमिती, बीजगणित यांचा विकास हा एकतर मान्य केला जात नाही किंवा पश्चिमकेंद्री इतिहासात त्याला गौण स्थान मिळते. अनेक शास्त्रीय संकल्पना

या तर चक्क 'अंधश्रद्धा' म्हणून दुर्लक्षिल्या जातात. याउलट तथाकथित प्रगतीमुळे झालेली 'हानी' व होणारा 'संहार' यांकडे डोळेझाक केली जाते. तंत्रज्ञान आणि विज्ञान यांना सोयीची भोगवादी जीवनपद्धती पश्चिमी संस्कृतीने स्वीकारली. यामुळे माणसाच्या आरोग्याची प्रचंड हानी झाली आहे. हृद्रोग, कर्करोग यांचे प्रमाण बेसुमार वाढले असून त्याचा संबंध थेट आधुनिक जीवनपद्धतीशी आहे, हे शास्त्रीय दृष्ट्या सिद्ध झाले आहे. तरीही चित्र मात्र असे उभे केले जाते की, माणसाचं आयुर्मान वाढत आहे! वैद्यकशास्त्रातील प्रगतीमुळे अनेक रोगांवर विजय मिळवण्यात आला आहे. निरोगी आयुष्याची सुरुवात किंवा तसे आयुष्य जगण्याची तयारी जन्माआधीपासूनच सुरू करावी लागते. अति धूम्रपान, मद्यपान, गर्भनिरोधक गोळ्या यांमुळे काही काळ स्वैर जीवन जगता येते, पण पुढील आयुष्यात अनेक भयानक रोगांना तोंड द्यावे लागते. अशा स्वैर भोगवादी जीवनपद्धतीमुळे २१ व्या शतकामध्ये लाखो अमेरिकन स्त्रिया गर्भाशय आणि स्तनाच्या कर्करोगाला बळी पडणार असल्याची भीती अमेरिकेतील वैद्यकीय संशोधकांनी वर्तविली आहे. अशा जीवनपद्धतीचाच परिणाम म्हणून युरोपमधील, अतिप्रगत देशांमधील पुरुषांच्या वीर्याची जननक्षमता कमी होत असल्याची दखल शास्त्रज्ञांनी घेतली आहे. स्वैर लैंगिक जीवनपद्धतीमुळे 'एडस्' सारखा रोग मानवजातीला आव्हाने उभी करत आहे. या जीवनपद्धतीमुळे द्यावी लागणारी 'आर्थिक' आणि 'सामाजिक' किंमत अभ्यासकांच्या डोळ्यांसमोर काजवे चमकवू लागली आहे. दुर्दैवाने या पाश्चिमात्य सांस्कृतिक अतिक्रमणाला 'प्रगती' किंवा 'मुक्त' असे गोंडस नाव देऊन, आमच्यातले अनेक विद्वान आणि शास्त्रज्ञ घाईघाईने ही जीवनपद्धती, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून आमच्या,- विशेषतः स्त्रियांच्या बोकांडी उतरवीत आहेत.

जर गांभीर्याने भविष्याकडे पाहायचे असेल तर प्रगतीच्या विश्लेषणातीत हे 'पूर्वग्रह' व 'अहंकार', आणि विज्ञान व तंत्रज्ञानाची 'वकिली' सोडून द्यायला हवी. भारतीयांपुरता विचार केला तर उसनवारी व पाश्चिमात्यांचे अंधानुकरण आपल्याला अधिक परावलंबी, लाचार, आळशी आणि आत्मघातकी बनवेल. पाश्चिमात्य शास्त्रज्ञ, विद्वान आणि चिंतनशील नागरिक हे या संदर्भात अधिक तटस्थतेने विचार करताना दिसतात. याउलट पाश्चिमात्यांच्या खांद्यावर उभे राहिलेले भारतीय वैज्ञानिक हे आपण अधिक प्रगतिशील, पुरोगामी आणि आधुनिक आहोत असे दाखविण्याकरता विज्ञानाच्या उसन्या कुबड्या घेऊन आपली 'जीवनपद्धती' व 'परंपरा' यांवर चिखलफेक करताना दिसतात. सर्व 'जुने' ते 'सोने' हे जेवढे खरे नाही; तेवढेच सर्व 'नवे' ते

चांगले, प्रगतिशील आणि वैज्ञानिक हे सुद्धा खरे नाही. भारतीयांनी तरी मानवाच्या प्रगतीचा कालपटल हा दोन हजार वर्षांपुरता मर्यादित न ठेवता कमीतकमी पाच हजार वर्षे तरी (युगाब्दा प्रमाणे) धरायला हवा, नाहीतर आपण मात्र २१ व्या शतकात आणि वस्तुस्थितीचा स्वीकार करून पाश्चिमात्यांनी लिहिलेला 'मानवाचे ५२ व्या शतकात पदार्पण व त्याचे विश्लेषण' असा ग्रंथ आपल्याला वाचावा लागेल!

**– सप्टेंबर १९९६**

❖❖❖

# महात्मा गांधी – स्मरण आणि विस्मरण

२ ऑक्टोबरला सालाबादप्रमाणे यंदाही गांधी जयंती साजरी होईल. बहुसंख्य भारतीयांकरता केवळ एक सुटीचा दिवस यापलीकडे या अशा दिवसांचे काहीच महत्त्व राहिलेले दिसत नाही. तरुण पीढीची आणि गांधीजींची तर केव्हाच फारकत झाली आहे. दूरदर्शनवरील गांधीजींसंबंधीचे तेच तेच कार्यक्रम आणि नेतेमंडळींची नाटकी बकवास भाषणे यामुळे गांधीविचार आणि सामाजिक वस्तुस्थिती व जनता यातील दरी रुंदावतच चालली आहे. गांधीजींच्या राजकीय विचारांविषयी कितीही मतभेद असले तरी विसाव्या शतकातील इतिहासातील गांधीजींचे महत्त्वपूर्ण स्थान त्यांच्या विरोधकांनाही मान्य करावे लागेल. इंग्रजी सत्तेपासून देश स्वतंत्र करणे हा जरी त्यांच्या चळवळीचा महत्त्वाचा हेतू असला तरी मानवी जीवन हे काही मूल्यांवर आधारलेले असावे असा त्यांचा आग्रह होता. त्यासाठी शिक्षण, संस्कार व समाजसंस्था यांचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. गांधीजींच्या सर्व विचारांचा गाभा शुद्ध भारतीय होता, सनातन होता, परंपरेचे बोट धरून चालणारा होता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे

धर्मबंधन मानणारा होता. गांधीजींच्या चळवळीची सर्व परिभाषा, प्रतीके, चिन्हे, संकल्पना या निखळ स्वदेशी होत्या. अनिष्ट सामाजिक रूढी, प्रथा आणि धर्मबंधने यांचे निर्मूलन हा त्यांच्या चळवळीचा एक महत्त्वाचा पैलू होता. असे असले तरी त्यांची चळवळ संस्कृतिभंजनाची नव्हती. संयम, अनुशासन आणि नैतिक चौकटीवर आधारित व माणसाच्या सद्सद्विवेकबुद्धिला आवाहन करून व्यक्तिपरिवर्तन व त्यातून समाजपरिवर्तन घडवून आणण्यावर त्यांचा भर होता. सत्य, अहिंसा, सहिष्णुता या सर्व धर्मसंकल्पना त्यांनी आपल्या चळवळीत प्रभावीपणे वापरल्या. यापैकी कुठल्याही संकल्पनेचा शोध हा गांधीजींनी स्वतः लावलेला नव्हता व तसा दावाही त्यांनी कधी केला नाही. त्यांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळींमध्ये ग्रामसंस्थेला मध्यवर्ती स्थान होते. या चळवळीचा प्रमुख भर हा स्वदेशी, असहकार, सविनय कायदेभंग इ. वर होता. या संकल्पना देखील त्यांनी परंपरेतूनच उचलल्या होत्या. भौतिक जीवनपद्धतीचे त्यांना वावडे नसले तरी साधी जीवनपद्धती, निर्व्यसनीपणा आणि आध्यात्मिकता यावर त्यांचा विशेष भर होता.

पाश्चात्त्य जीवनपद्धती आणि जीवनमूल्ये, पराकोटीचे यांत्रिकीकरण, भांडवलशाही, तसेच समाजवाद याबाबतीत गांधीजींची मते स्पष्ट आहेत. आधुनिकता व प्रगती यांबद्दलही गांधीजींची मते आजच्या विचारांना धक्का देणारी आहेत.

गांधीजी आज संपूर्णतः पराजित आहेत. ही कर्तबगारी स्वातंत्र्यानंतरचे भारतीय राज्यकर्ते आणि राजकारण यांची आहे. आज सगळीकडे असत्याचाच विजय आहे. हिंसेला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. असहिष्णुता ही राजकारणाचा अविभाज्य घटक बनली आहे. आणि हे सर्व गांधीजींना स्मरून होत आहे! स्वावलंबन आणि श्रमप्रतिष्ठेला प्राधान्य देणारे गांधीविचारांचे आश्रम हे आज शासकीय आश्रित आणि निष्क्रिय निवृत्त बोलघेवड्यांचे चरितार्थ-साधन बनले आहेत.

गांधीजींना अभिप्रेत असलेली समाजकारण व राजकारण यातील विश्वस्त ही संकल्पना केव्हाच लयास गेली आहे. बहुतांशी राजकारण व राजकीय पक्ष चारित्र्यहीन, नीतीभ्रष्ट आणि गुंडांचे अड्डे बनले आहेत. उच्चपदस्थांच्या भ्रष्टाचाराचे स्वरूप बघून, भाषेत त्याकरता उपमेला शब्द सापडेनासे झाले आहेत! हेच ढोंगी, निर्लज्ज आणि बधिर राजकारणी गेली पन्नास वर्षे गांधी जयंतीला गांधीजींचे गोडवे गाताना आपण बघत आलो आहोत. मानवदेहाला मृत्यू हा अटळ आहे. पण शाश्वत विचार अमर राहू शकतात. गांधीजींच्या कृश शरीराची हत्या करणारा

फासावर लटकला. पण गेली पन्नास वर्षे गांधीविचारांची हत्या करणाऱ्या त्यांच्या अनुयायांनीच चारित्र्य आणि नीतीमत्तेला फासावर लटकावलेले आहे. ही शोकांतिका केवळ गांधीजींची नसून भारताची आहे. गांधीविचारांची हत्या करणाऱ्यांना शासन करण्यासाठी कटिबद्ध होणे व तसा निर्धार करणे म्हणजेच खरी गांधी जयंती साजरी करणे ठरेल.

**– ऑक्टोबर १९९६**

❖❖❖

# मेंदू हरवतो तेव्हा...

किणी नावाच्या व्यक्तिच्या दुसऱ्या शवविच्छेदनाच्या वेळी शवाचा मेंदू गहाळ असल्याचे निदर्शनास आले! या बातमीने खळबळ माजवून दिली. हा केवळ निष्काळजीपणा होता की गुन्ह्याचा महत्त्वाचा पुरावा नष्ट करण्याचा तो प्रयत्न होता हे काळच ठरवील. एकंदरीत शरीराच्या अवयवांत मेंदूला महत्त्वाचे स्थान आहे यात शंकाच नाही. फळांचा राजा जसा आंबा, तसा अवयवांचा राजा मेंदू. शरीराच्या जवळजवळ सर्वच ऐच्छिक व अनैच्छिक क्रियांचे नियंत्रण मेंदूकडून होत असल्यामुळेच, मेंदू म्हणजे शरीराचा सर्वात महत्त्वाचा अवयव असा समज झाला असण्याची शक्यता असावी. पण याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे मन, चेतना, बुद्धी या अमूर्त कल्पनासुद्धा मेंदूतच कुठेतरी रेंगाळत असाव्यात हा विश्वास. व्यवहारात भाषाशास्त्रानेही या विश्वासावर शिक्कामोर्तब केलेले दिसते. शहाणपणाचा बुद्धिचा निर्देशांक मेंदूच्या क्षमतेच्या भाषेत मोजला जातो. आपल्या भाषेत मेंदूला पर्याय म्हणून डोके हा शब्द आपण सर्रास वापरतो. 'तुझे डोके ठिकाणावर आहे ना? तो बिनडोक आहे, जरा डोकं चालव, डोकं का खोकं? ती डोकेबाज

आहे,' असे वाक्प्रचार व्यवहारातील बुद्धिचातुर्य किंवा मूर्खपणा दाखविण्यासाठी वापरण्यात येतात. थोडक्यात; माणसाची बुद्धी, स्मरणशक्ती, चातुर्य, सृजनशीलता या सर्वांचा उगम मेंदूतच असल्याचे आपण मानतो. मेंदूचे बुद्धिशी असलेले नाते सूर्याच्या प्रकाशाशी असलेल्या नात्याइतकेच स्पष्ट आहे. यामुळेच बुद्धिचे घटक मानले गेलेले तर्क, विश्लेषणक्षमता यांचा विकासही मेंदूतच होत असावा असा सिद्धांत आपण सहज मान्य करतो. या सगळ्यांचा परिपाक म्हणून माणसाच्या शहाणपणाचे मोजमापसुद्धा बुद्ध्यांकावरून (I.Q.) केले जाऊ लागले. याउलट वेडेपणा, खुळेपणा, असंबद्धता, निर्बुद्धता या सर्व संकल्पना ह्या व्यावहारिक अपात्रता आणि मेंदूच्या क्षमतेत किंवा कार्यात काही त्रुटी असल्याचे दर्शवितात. आचार्य अत्र्यांच्या 'अधू मेंदूचा मधू' हा अग्रलेखाचा मथळा, राजकीय अव्यवहार्यता किंवा मूर्खपणा प्रत्यक्ष अग्रलेखातील मांडणीपेक्षा अधिक प्रभावीपणे सांगून गेला. भारतीय विचारसरणीत मती, प्रज्ञा, मेधा या बुद्धिच्या विकसित अवस्थासुद्धा मेंदूशी संबंध दाखवितात. राग, लोभ, मत्सर यांचे नियंत्रण व संतुलन याकरिता वेगळा शरीरावयव कुठेच दिसत नाही, त्याअर्थी ते कार्यही मेंदूच करीत असला पाहिजे असे आपण मानतो. महत्त्वाच्या मनोव्यापारांचे नियंत्रण करणारा मेंदू हा शास्त्रज्ञांच्या कुतूहलाचा आणि अभ्यासाचा विषय झाला नाही तरच नवल. पण आश्चर्य असे की, वेडा किंवा शहाणा यांच्या मेंदूत सकृतदर्शनी तरी काही भेद दिसत नाही! आणि म्हणूनच मेंदूच्या रचनेशी निगडित विकार, ज्याच्या प्रत्यक्ष कार्यावर परिणाम दिसू शकतो त्याचा अभ्यास व उपचार करणाऱ्यांना मेंदूतज्ज्ञ (Neurologist) म्हणतात. तर वर्तणुकीतील बदल, की जे नित्याची जीवनपद्धती व व्यवहार यांत सर्वमान्य वागणुकीपेक्षा वेगळे वाटतात, त्यांच्यावर उपचार करणाऱ्यांना मानसोपचार तज्ज्ञ असे संबोधले जाते. मेंदू आणि मन असा येथे फरक केला गेला आहे. इथे मुख्य फरक हा आहे की, वागणुकीतील हा बदल मेंदूच्या रचनेत बहुतेक वेळा दाखवता येत नाही. वस्तुनिष्ठतेच्या आहारी गेलेले पाश्चात्त्य तत्त्वज्ञान व त्यावर आधारित विज्ञान, रचना आणि कार्य व त्यांच्यातील कार्यकारणभाव सिद्ध न करता आल्यामुळे मन आणि शरीर हे द्वैत ते मानतात. 'मनोव्यापार' हा वस्तू म्हणून दाखवता येत नसल्यामुळे मेंदूशी त्याचे नाते नाकारले गेले, ते विज्ञानकक्षेबाहेर गेले आणि अवैज्ञानिक समजले जाऊ लागले. याचीच परिणती म्हणून मन (Mind), आत्मा (Soul), चेतना (Consciousness) या संकल्पना नुसत्या नाकारल्याच गेल्या असे नाहीत, तर त्या अशास्त्रीय, अवैज्ञानिक ठरविल्या गेल्या. याउलट पौर्वात्य संस्कृतींमधून या संकल्पना नुसत्याच मानल्या गेल्या असे नाही, तर शरीर

आणि मन यांचे अतूट नातेही त्यांनी मान्य केले. साहजिकच यामुळे उद्‌भवणाऱ्या संकल्पना, विकार, व्यवहार यांच्याकडे बघण्याची दृष्टीही दोन्ही संस्कृतींमध्ये भिन्न दिसून येते. याचेच प्रतिबिंब संपूर्ण मानवी व्यवहार, मानव-परिसर संबंध व मानव-प्राणी संबंध यांवर पडलेले दिसते. उत्क्रांतीवादामध्ये (Theory of Evolution) एका पेशीपासून बहुपेशीय रचनेचा क्रम अभिप्रेत धरला गेला आहे. सर्व प्राणिमात्रांमध्ये मानवाला श्रेष्ठत्वाचे स्थान त्यांच्या मेंदूच्या आकारमानामुळे आहे. उत्क्रांतीमध्ये मानवाच्या एक किंवा दोन पावले मागे उभ्या असलेल्या माकड किंवा तत्सम प्राणिमात्रांचा विचार केला तर, मानव आपल्या वागणुकीने आणि संस्कृतीने का व कसा विकसित आहे हे आपल्याला सहज पटते. पण सहज पटणाऱ्या ह्या गोष्टी आजच्या भारतीयांच्या वागणूक आणि संस्कृतीबद्दल किती खऱ्या आहेत हे तपासूनच बघायला लागेल! अनुभवाने मनुष्य अधिक शहाणा होतो असे आपण मानतो. शिक्षणामुळे तो अधिक सहिष्णू, संयमशील आणि जबाबदार होतो असा आपला विश्वास आहे. मेंदूच्या रचनेत न दिसणारा, पण वर्तन किंवा वागणुकीमध्ये होणारा बदलही बहुतेक शास्त्रज्ञ उत्क्रांतीवादाची परिणती म्हणूनच मान्य करतात. मेंदूच्या विकसित अस्तित्वाचे ते लक्षण धरले जाते. ढोंग, निर्लज्जपणा, धटिंगणशाही, खोटारडेपणा, अहंमन्यपणा, लाचारी, लांगूलचालन इ. गोष्टी आजच्या जगातही असंस्कृत, असभ्य मानल्या जातात. परंतु आजचे सामाजिक आणि राजकीय नेतृत्व व साहित्य, नाट्य, चित्रकला इ. कलांमधील नीती आणि मूल्यांचा ऱ्हास पाहाता उत्क्रांतीमध्ये भारतीय मनुष्य मागे आहे की काय अशी शंका निर्माण करीत आहे. शवविच्छेदनात एखाद्याचा मेंदू हरवणे आणि एकंदरीतच संशयास्पद मृत्यूच्या चौकशीबाबत निर्लज्ज दडपेगिरी करणे हे भारताचे राजकीय आणि राष्ट्रीय चारित्र्य किती खालच्या दर्जाला पोहोचले आहे याचे जीवंत उदाहरण आहे. अशा प्रकरणाला जबाबदार असणाऱ्या मनोप्रवृत्ती व राजकीय व्यक्ती आणि त्यांना नियंत्रण करणारी शक्ती ही बधिर तरी असली पाहिजे किंवा या शक्तीचा अनुनय करणारी प्रजा तरी लाचार, निस्तेज आणि निर्बुद्ध असली पाहिजे. मृत माणसाचा मेंदू हाही मेलेलाच असतो. पण जीवंत माणसाचा मेंदू जेंव्हा असभ्य, असंस्कृत वागणुकीचे प्रदर्शन करू लागतो तेव्हां त्यांच्या मेंदूच्या अस्तित्वाबद्दलच शंका येऊ लागते! आणि म्हणूनच किणीचा मेंदू हरवण्यापेक्षा, या घटनेमुळे भारतीयांचाच मेंदू हरवला आहे की काय ही भीती मन खिन्न करते.

**– नोव्हेंबर १९९६**

❖❖❖

# शपथ ग्रहण की शपथेला ग्रहण?

''भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन. मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडिलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन. माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावलेले आहे.''

महाराष्ट्रातला प्रत्येक शालेय विद्यार्थी ही शपथ घेतो. शाळेच्या प्रत्येक इयत्तेत आणि सगळ्या विषयांच्या पुस्तकांमध्ये ही शपथ आहे. मग या शपथेमधील आशयाचा, 'आपला स्वतःचा विषय कुठला?' असा प्रश्न विद्यार्थ्यांना किंवा ही शपथ देणाऱ्या जबाबदार यंत्रणेला अजून पडलेला दिसत नाही. प्रत्येक विषयाची परीक्षा असते, पण शपथेच्या विषयाची परीक्षा नसते! कारण शपथेचा आशय हा सुसह्य आणि सुसंस्कृत जीवन जगण्याकरता लागणारी

मनोभूमिका आणि त्याला समांतर आचरण यांच्याशी निष्ठा सांगणारा आहे. 'मी काय घेऊ शकेन यापेक्षा मी काय देऊ शकेन', यावर भर देणारा आहे. अधिकारांपेक्षा कर्तव्याची जाणीव करून देणारा आहे, भोगापेक्षा त्यागाची भूमिका रुजवणारा आहे, स्वैराचारापेक्षा संयम अंगीकारणारा आहे, शाळेतील चार भिंतींपेक्षा या भिंतींबाहेरील प्रत्यक्ष जीवनातील अनुभवातून साकार होणारा आहे; आणि म्हणूनच हा विषय जीवनामधील कौटुंबिक आणि सामाजिक क्षेत्रांतील व्यक्तिंच्या प्रत्यक्ष आचरणाशी नाळ जोडणारा आहे. प्रत्यक्ष जीवन म्हणजेच त्यातील अनुभव हेच या शपथेच्या विषयाचे पुस्तक आहे. खरे बोलण्यापेक्षा खरे वागायला लागते, कर्तव्य सांगण्यापेक्षा कर्तव्याचे पालन करावे लागते. आज अनुकरण करता येतील अशा व्यक्ती घरात आणि समाजात विद्यार्थ्यांना दिसत नाहीत. म्हणूनच विद्यार्थी शपथ घेऊ शकतो, पण ती 'जगू' शकत नाही. ही शोकांतिका शपथेची नसून आजच्या भारतीय जीवनाची आहे. आपण त्याग, सदाचार, संयमित जीवन यांची नुसतीच अवहेलना आणि कुचेष्टा केली नसून, चुकूनमाकून असे जीवन जगणाऱ्याला आपण अव्यवहार्य ठरवले आहे. हा समाज नीतिहीन, चारित्र्यहीन व्यक्तिंना प्रतिष्ठा आणि पुरस्कार आग्रहाने देताना आज आपण प्रत्यक्ष बघत आहोत. राजकीय आणि सामाजिक जीवनामधली ही घसरण भयावह आहे. चारित्र्य घडवण्याचा अट्टाहास धरणाऱ्या संस्था ह्या आपल्याच अपत्यांनी सत्ता टिकवण्याकरिता केलेल्या चाळ्यांना पायबंद घालू शकत नाहीत हे आपण बघत आहोत. आपल्याला स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झाली. या स्वातंत्र्याचा इतिहास आपण शिकतो. हे स्वातंत्र्य अनेकांनी आपल्या जीवनाचे बलिदान देऊन मिळविले. आज पन्नास वर्षांनंतर या स्वातंत्र्याचे स्वरूप काय? 'लोकांनी निवडलेले लोकांचे राज्य म्हणजे लोकशाही' ही या देशात आज पन्नास वर्षे आहे. आज आपले लोकप्रतिनिधी कोण आहेत? आपले माजी पंतप्रधान आणि अनेक राज्यांचे मुख्यमंत्री यांनी सत्तेचा केलेला गैरवापर व आर्थिक भ्रष्टाचार बघून मन विषण्ण होते. पण याहीपेक्षा शरम आणि घृणा वाटते ती ही की, ते राजकीय पक्ष आणि त्यांच्या अनुयायांकडून आपल्या नेत्यांचा भ्रष्टाचार लपवण्याच्या चाललेल्या धडपडीची! चारित्र्य आणि संस्कृतीचा घोष करणाऱ्या या राजकारण्यांचा हा दांभिकपणा बघून उबग येतो. समाजाच्या खालच्यातखालच्या थरापर्यंत आज हा भ्रष्टाचार पोहोचला आहे. मुंबई, ठाण्याकडील महानगरपालिकेमधील लोकप्रतिनिधींमध्ये २५ ते ३०% लोकप्रतिनिधींवर या ना त्या प्रकारचे गुन्हेगारी स्वरूपाचे आरोप पोलिसांकडे दाखल आहेत. ही सर्व मंडळी लोकशाही पद्धतीने निवडून आली आहेत. एका राज्याचा

मुख्यमंत्री हा दारू आणि विवाहबाह्य संबंध ठेवल्याचे जाहीरपणे मान्य करतो आणि त्याचे उघडपणे समर्थनही करतो. आपल्या राज्यात खून केल्याचे आरोप असलेले किंवा जुगार खेळताना पकडले गेलेले नुसतेच लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येत नाहीत, तर ते मंत्रीपदही भूषविताना आपण बघतो! निमूटपणे या गोष्टी बघणाऱ्या समाजाच्या सहनशीलतेचे कौतुक करायचे, की त्याच्या षंढपणाची कीव करायची? लोकप्रतिनिधी हे लोकांचेच प्रतिबिंब असते. लोकप्रतिनिधी हा वेगळा जन्माला आलेला नसतो. सवलतग्रस्त, लाचार आणि बधिर समाजाकडून यापेक्षा वेगळे लोकप्रतिनिधी निवडून येऊ शकत नाहीत. एकाधिकारशाही आणि घराणेशाही यांच्यापुढे लोटांगण घालणारा हा समाज शतकानुशतके परकीयांच्या गुलामगिरीत का राहू शकला, याकरता वेगळे संशोधन करण्याची गरज नाही.

अस्मिता आणि चारित्र्य हरवलेला नागरिक आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करू शकत नाही. पोकळ संस्कृती आणि इतिहासाचे भावनिक अवडंबर हे भविष्य तर सोडाच, पण वर्तमानही घडवू शकत नाही. समाजातल्या सर्वात कमकुवत व्यक्तिच्या संशयाच्या बाबतीत सुद्धा, स्वतः फायदा न घेता श्रीरामांनी आपल्या सर्वात प्रिय व्यक्तिचा त्याग केला. केवळ आपल्या पतीला दृष्टी नाही म्हणून गांधारीने स्वतः आपल्या डोळ्यांवर पट्टी बांधून घेतली. या घटना किंवा कथांमधील नीतीसंकल्पना व सामाजिक आशयाचे आकलन चंगळवादाने लडबडलेल्या समाजाला होणे कठीण आहे. भ्रष्टाचाराचे उघड पुरावे मागणाऱ्या राजकारण्यांना श्रीरामाचे नाव घेण्याचा किंवा गांधारी जगलेल्या संस्कृतीचा व्यापार करण्याचा काडीचाही अधिकार नाही. श्रीराम आणि गांधारी ज्या समाजात अनुकरण करायला असतात त्या समाजातील संस्कारक्षम विद्यार्थ्यांनी घेतलेल्या शपथांना अर्थ असू शकतो. अन्यथा रावण आणि दुर्योधन विनासायास राज्य करू लागतात. लोकशाहीची ठोकशाही होते. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या शपथांची किंमत शपथ छापलेल्या कागदाच्या किंमती एवढीही राहात नाही. अपात्रांच्या लोकशाहीचे स्वरूप काय असू शकते हे महात्मा गांधींनी स्वातंत्र्यापूर्वी काही दशके सांगून ठेवले आहे. भ्रष्टाचार आणि ठोकशाहीच्या अमंगल युतीचे निर्लज्ज समर्थन करणाऱ्या राजकारण्यांनी गांधीजींचे हे विचार वाचावेत म्हणून ते खाली देत आहे.

"It is generally acknowledged that the members (of parliament) are hypocritical and selfish. Each thinks of his own little interest. It is fear that the guiding motive. Members vote for their party without a thought.

Their so called discipline binds them to it. If any member, by way of exception, gives an independent vote, he is considered a renegade."

"The Prime Minister is more concerned about his power than about the welfare of Parliament. His energy is concentrate upon securing the success of his party. His care is not always that Parliament should do right. If they are considered honest because they do not take what are generally known as bribes, let them be so considered, but they are open to subtier influences. In order to gain their ends, they certainly bribe people with honours. I do not hesitate to say that they have neither real honesty nor a living conscience."

**– जानेवारी १९९७**

❖❖❖

# ऐ मेरे वतन के लोगो ...

**ऐ मेरे वतनके लोगो, जरा आँखमें भर लो पानी।**
**जो शहीद हुए है उनकी, जरा याद करो कुरबानी।।**

सुप्रसिद्ध पार्श्वगायिका लता मंगेशकर यांनी गायलेले गीत भारतीय प्रजाजनांकरिता दूरदर्शनवरून हल्ली वारंवार ऐकविले जाते. आजच्या आपल्या स्वातंत्र्याची किंमत पूर्वीच्या पिढ्यांनी दिली आहे याची जाणीव अशा गीतामधून लोकांना दिली जाते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे...' हा लोकमान्य टिळकांचा संदेश भारतीयांना सुपरिचित आहे. स्वराज्याकरता स्वातंत्र्य हवे हा सिद्धांत ओघानेच येतो. आणि हे स्वातंत्र्य आणायचे म्हणजे नक्की काय करायचे याचा, स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षांत आपण निर्माण केलेल्या आजच्या परिस्थितीमुळे पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. आजच्या जगात 'मानवी स्वातंत्र्या'ला 'मानवी अधिकार' असा पर्यायी शब्दही प्रचलित होत आहे. उच्चारस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, जगायचे स्वातंत्र्य, मरायचे स्वातंत्र्य... सर्वच मानवी व्यवहार 'स्वातंत्र्या'च्या जन्मसिद्ध अधिकाराने व्यापले जात आहेत. या

स्वातंत्र्यविचाराने सर्व 'बुद्धिवंत', 'विचारवंत' झिंगून गेले आहेत. यामुळेच, स्वातंत्र्याची 'किंमत' द्यायला लागते याची जाणीव किंवा संवेदना बधिर होत आहे. स्वातंत्र्य, अधिकार यांच्या 'भोळसट' संकल्पना ह्या जबाबदारी आणि पात्रतेचा संकोच करतात. असे स्वातंत्र्य स्वैराचाराचे रूप घेते. अशा स्वैराचारी स्वातंत्र्यामुळे अभिरुचिहीन बेजबाबदार लिखाण, कला आणि मूल्ये निर्माण होतात. समाज अधिक स्वैराचारी, चंगळवादी, भोगवादी होऊ लागतो आणि शेवटी तो आपले स्वातंत्र्यच गमावून बसतो.

काही घटनांचे वास्तव बदलत नसले तरी त्यांचे संदर्भ फार लांबले तर कुठेतरी काहीतरी चुकत आहे एवढी जाणीव तरी समाजाला होणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य मिळवायला जशी किंमत द्यावी लागते तशीच ते टिकवायलाही द्यावी लागते. स्वतंत्र समाजाचे नेतृत्व सतर्क, दूरदर्शी आणि विवेकी नसेल तर त्या कमतरतेची किंमत लोकांना द्यावी लागते. स्वातंत्र्य मिळाल्यापासून अवघ्या १५ वर्षांत १९६२ मध्ये चीनने आपल्यावर आक्रमण केले. आपल्या सीमेचे रक्षण आपण करू शकलो नाही व फार मोठा भूभाग चीनने पादाक्रांत केला. आजपर्यंत आपला गेलेला भूभाग आपण परत मिळवू शकलेलो नाही. जनता ही दुबळ्यांची स्वप्ने जगण्यापेक्षा मर्दाचा जुलूमही सहन करते, अशी इतिहासाची साक्ष आहे! भारतावर चीनने आक्रमण केल्यावर आपले तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या एका जाहीर सभेत लताबाईंनी हे गाणे गायले होते. पं. नेहरूंच्या डोळ्यांत या गाण्यामुळे अश्रू उभे राहिले असे काव्यमय वर्णन तेव्हापासून आपण ऐकत आलो आहोत. खरे म्हणजे देशाच्या या नामुश्कीला जे अव्यवहार्य, स्वप्नाळू आणि अदूरदर्शी धोरण जबाबदार होते त्याचे शिल्पकार स्वतः पं. नेहरूच होते. गीतकाराने हे गाणे लोकांनी हळवे हतबल होऊन रडण्याकरता लिहिले नव्हते, तर काही घटनांचे संदर्भ देऊन, लोकांच्या डोळ्यांत अंजन घालून दृष्टी साफ करण्याचा तो एक प्रयत्न होता. 'मरगळ झटका, चुका ओळखा आणि राष्ट्रनिर्मितीच्या कामाला लागा' हा संदेश त्या गीतात होता. ३५ वर्षांनंतर आजही हेच गाणे जनतेला जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी ऐकवावे लागते, यासारखी दुर्दैवाची दुसरी गोष्ट नाही! सवलतग्रस्त, लाचार आणि निस्तेज समाज दुबळेपणाने रडतो. अशा समाजातून निर्माण झालेले नेतृत्वही ढोंगी आणि भ्रष्ट असते.

समाजाने त्याग आणि सेवा करायची आणि पुढाऱ्यांनी मात्र सत्तेची ऊब उपभोगून सवलतींचा मेवा खायचा! केंद्र आणि राज्य शासनातील अनेक

सत्ताधाऱ्यांच्या सत्तेच्या गैरवापरांचे नमुने आज लोकांसमोर येत आहेत ते याबाबत बोलके आहेत. जबाबदारीच्या जाणिवेशिवाय मिळालेले अधिकार जनतेच्या 'स्वातंत्र्या'ला किती किंमत द्यायला लावतात याचे या घटना म्हणजे उत्कृष्ट उदाहरण आहे. स्वातंत्र्यानंतर पन्नास वर्षांत भारताने काहीच मिळवले नाही असे समजायला नको. जगातल्या सर्वात भ्रष्ट देशांमध्ये भारताचा नववा क्रमांक लागला! दररोजच्या वर्तमानपत्रांतून राज्यकर्त्यांच्या भ्रष्टाचाराच्या कथा वाचल्या, की हा क्रमांक देण्यातही काही भ्रष्टाचार झाला आहे की काय अशी शंका येऊ लागते! 'भारतातील ५० टक्के जनता अशिक्षित आहे' असे एक कारण याकरता नेहमीच पुढे केले जाते. जणू काही देशातील अशिक्षित मंडळींनी देशाची ही परिस्थिती आज निर्माण केली आहे. वस्तुस्थिती याच्या बरोबर विरुद्ध आहे. पं. नेहरूंपासून देवेगौडांपर्यंत आणि डॉ. राजेंद्रप्रसादांपासून डॉ. शंकर दयाळ शर्मांपर्यंत झालेले भारताचे बहुतेक सर्व पंतप्रधान व राष्ट्राध्यक्ष उच्चशिक्षित होते आणि आहेत. हीच परिस्थिती राज्यपाल व मंत्र्यांच्या बाबतीत आहे. हे सर्व राष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्री आणि राज्यपाल हेच खरे भारताच्या आजच्या दुर्दशेचे शिल्पकार आहेत. आज सर्वोच्च आणि राज्यातील इतर न्यायालये ही या सत्ताधाऱ्यांनी केलेल्या सत्तेचा गैरवापर आणि इतर भ्रष्टाचाराबद्दलची वस्तुस्थिती जनतेसमोर उघड करीत आहेत. याबाबतीत न्यायसंस्थेला साह्य करण्याऐवजी कायद्यातील पळवाटा, तर्कवाद आणि युक्तिवाद यांचा आश्रय ज्या पद्धतीने ही मंडळी घेत आहेत ते उबग आणणारे आहे. निर्दोष माणसाला न्यायालयाचा आधार वाटला पाहिजे. गुन्हेगाराला मात्र कायद्याची भीती वाटते. त्यामुळे तो सर्व ताकदीनिशी कांगावा आणि भ्रमनिर्मितीने न्यायालय व लोक यांची दिशाभूल करीत असतो. पुन्हा 'स्वातंत्र्य' आणि 'मानवी अधिकाराचे' कवच गुन्हेगाराला मिळाले, की नागरिकांच्या हिताची व स्वातंत्र्याच्या संकोचाची किंमत समाजालाच द्यावी लागते. या सर्व पुढारी मंडळींनी हे गाणे ऐकणे आज जास्त उपयुक्त ठरणार आहे.

आय. ए. एस. सारख्या स्पर्धात्मक परीक्षांना अशिक्षित लोक बसत नाहीत. भारतामध्ये काही हजारांनी असे आय.ए.एस. नोकरशहा प्रत्यक्ष राज्यकारभार चालवीत आहेत. जिल्हाधिकारी व महापालिका-आयुक्त हे देखील या उच्चविद्याविभूषित गटातीलच असतात. सर्व बँका आणि अनेक महामंडळांचे पदाधिकारी शिक्षितच असतात. सत्ताधाऱ्यांबरोबर या नोकरशहांच्या 'भ्रष्टाचारां'चे नग्न स्वरूप लाजिरवाणे आहे. या सर्व शिक्षित नोकरशहांनी आपले 'स्वातंत्र्य'

आणि ‘अधिकार’ यांची मागितलेली ‘किंमत’ हाच आजच्या भ्रष्टाचाराचा पाया आहे. आपल्या कारकिर्दीत तोंडाला कुलूप लावलेले हे नोकरशहा निवृत्तीनंतर मात्र पोपटासारखे बोलू लागतात. यांच्यापैकी बरेचजण आजकाल आपली आत्मचरित्रे प्रसिद्ध करीत आहेत. ‘तो मी नव्हेच’च्या धर्तीवर मूळ मुद्यांना बगल देऊन अनेक सनसनाटी अर्धसत्ये अशा आत्मकथनांमधून आलेली आहेत. अर्थात याला काही सन्माननीय अपवाद आहेत. बहुसंख्य नोकरशहा हे आपल्या वरिष्ठांची मर्जी राखण्यातच अधिक समाधानी दिसून येतात. सत्ताधारी आणि नोकरशहा या सोयीची ‘किंमत’ एकमेकांना परस्पर देत असतातच. यामुळेच आपले विशेष शिक्षण, राजकीय प्रगल्भता, राष्ट्रीय हीत यावर आधारित धोरणरचना किंवा सल्ला देण्याऐवजी, या सर्व गोष्टी धाब्यावर बसवून सत्ताधाऱ्यांना सोयीस्कर असे सल्ले दिले जातात. याकरता, मिळालेल्या शिक्षणाचे सर्व कसब वापरण्यात येते. राष्ट्राच्या सुरक्षिततेचा प्रश्न असला तरी सुद्धा यामध्ये काहीही बदल दिसत नाही. बोफोर्स प्रकरणात जाहीर झालेला घटनाक्रम व व्यक्तिनामे बघितली तर मध्यमबुद्धिच्या माणसालाही जे उमगेल ते ‘सत्य’ विशेषबुद्धिचे नोकरशहा, राजकारणी आणि इतर हितसंबंधी यांना दिसत नाही ही गोष्ट आश्चर्यापेक्षा चीड आणणारी आहे. यातल्या प्रत्येक घटकाला आपल्या ‘स्वातंत्र्याची’ ‘किंमत’ मिळालेली दिसते! देशाला मोजावी लागणारी किंमत मात्र ‘न’ मोजता येणारी आहे.

घराणेशाही एकाधिकारशाहीमध्ये ‘पात्रता’ आणि ‘प्रामाणिक’पणाचा बळी दिला जातो. आपले पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांची मुलगी, नातवंडे, बहिणी, इतर नातेवाईक आणि नातेवाइकांचे नातेवाईक यांना या देशातील सर्व उच्च पदे विनासायास मिळाली. तत्कालीन भारतात त्यांच्या या नातेवाईकांपेक्षा अधिक बुद्धिमान आणि पात्र नागरिक या देशात नव्हते असे नाही, परंतु नेहरू घराण्यात जन्मण्याचा अपघात त्यांच्या बाबतीत घडला नव्हता. ‘राष्ट्रहिताला फाटा आणि कुटुंबहिताला वाटा’ हा न्याय आजतागायत चालू आहे. रावांची मुले खासदार, आमदार तर आहेतच; पण भ्रष्टाचारातही ती पुढे आहेत. देवेगौडांचा मुलगाही खासदार आहे व त्यांचे सर्व नातेवाईक परदेश दौऱ्यात त्यांच्या बरोबर असतातच. राज्यसभेवर राजकारणाव्यतिरिक्त इतर कला, साहित्य इ. मध्ये विशेष निपुण व्यक्तिंची नियुक्ती पंतप्रधानांच्या शिफारशीनुसार राष्ट्राध्यक्ष करतात. आपले सध्याचे पंतप्रधान देवेगौडा यांनी हे सर्व निकष धाब्यावर बसवून राजकीय तडजोडीचा एक भाग म्हणून सहा ‘राजकारण्यां’ची राज्यसभेसाठी राष्ट्राध्यक्षांकडे शिफारस केली

आहे. काही अपवाद वगळता; मंत्री, न्यायाधीश, महामंडळे व बँकांचे अध्यक्ष यांच्या नेमणुका त्यांच्या पात्रतेपेक्षा, मेहेरबानी, सिद्धांतवाद आणि राजकीय सोय हे निकष डोळ्यांसमोर ठेवूनच स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षांत झालेल्या आहेत. यातूनच मोठ्या प्रमाणावर 'अकार्यक्षम' नोकरशाही तयार झाली. ही अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार झाकण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांची सवलतकेंद्री धोरणे राबू लागली. थापा सोडून जगात 'फुकट' काहीच मिळत नाही. लोकांना 'मूर्ख' बनविण्याचा हा खेळ स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजपर्यंत अव्याहतपणे चालू आहे. फक्त त्याचे स्वरूप आधी व्यक्तिगत होते ते आज सार्वत्रिक झाले आहे. पात्रतेला जिथे दुय्यम स्थान असते तिथे अपात्र पहिल्या स्थानावर येऊन बसतात. पात्र व्यक्तिला नीती, संयम आणि चारित्र्य यांची बंधने असतात. अपात्र मात्र या बंधनांतून मुक्त असतो. साहजिकच चारित्र्यहीनता कशी वाढेल हेच अपात्र बघत असतो. ज्या राष्ट्रात शिक्षण हे 'असंस्कृत' शिक्षित निर्माण करते तेथे दूरदर्शनवरून 'ऐ मेरे वतन के लोगो' सारखी गाणी वारंवार ऐकवावी लागतात! भारत याला अपवाद ठरो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना!

**– फेब्रुवारी १९९७**

❖❖❖

# भारतीय लोकशाही – वयात आलेली, की वय झालेली?...

देशातील सध्याच्या राजकीय घटना बघून स्तंभित आणि दिङ्मूढ न झालेला असा नागरिक आज देशात नसेल. आपल्या स्वातंत्र्याला लवकरच ५० वर्षे पुरी होतील. या ५० वर्षांत आपण आज अराजकाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेलो आहोत. साम्राज्यवादाच्या विळख्यातून बाहेर पडून मोठ्या उमेदीने आपण स्वातंत्र्यकाळात लोकशाही पद्धत स्वीकारली. वसाहतवाद काय किंवा राजेशाही काय, अशा यंत्रणेमध्ये सत्ता ‘व्यक्ति’केंद्रित होते आणि निर्णय व्यक्तिसापेक्ष किंवा लहरीपणावर घेतले जातात. या यंत्रणा ‘घराणेशाही’ आणि ‘एकाधिकार’ निर्माण करतात. व्यक्तिमाहात्म्य प्रमाणाबाहेर वाढते आणि ‘भाट’ आणि ‘खुशमस्कऱ्यांना’ सत्तापदे बहाल करण्यात येतात. यातूनच जुलमी, अन्यायकारक राजवटी निर्माण होतात आणि जनतेला एकतर त्या निमूटपणे सहन कराव्या लागतात किंवा क्रांती करून उलथून पाडाव्या लागतात. स्वातंत्र्यानंतर मोठ्या उत्साहाने इतर सर्व यंत्रणा झुगारून देऊन आपण लोकशाही यंत्रणा स्वीकारली. राजेशाहीमुळे निर्माण होणारी घराणेशाही आणि

एकाधिकारशाही, खुशमस्करे आणि भाट लोकशाहीत निर्माणच होऊ शकणार नाहीत या भाबड्या कल्पनेत आपण ५० वर्षे जगलो! 'लोकशाही' यंत्रणेची आज 'दिवाळखोरी' जाहीर झाल्यातच जमा आहे. काहीजणांना ही लक्षणे म्हणजे लोकशाही वयात येत असल्याची निर्देशक वाटतात! निदान चुकले तर उपचारही चुकतात आणि रोगी दगावतो. संस्कारक्षम वयात मुलावरती चांगले संस्कार झाले नाहीत तर तो मुलगा उनाड, व्यसनाधीन आणि बदफैली बनतो. योग्यवेळी त्याला ताळ्यावर आणला नाही तर त्याची बेजबाबदार कृत्ये समाज बिघडवू शकतात. लोकशाहीच्या आजच्या स्वरूपातील धोके वेळेवर ओळखले नाहीत तर मग सुधारण्याची वेळ निघून गेलेली असेल.

दोषारोपापेक्षा आत्मपरीक्षणानेच यातून काही मार्ग निघू शकेल. स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षांपैकी पहिली सुमारे ३५ वर्षे तरी देशाची राज्ययंत्रणा लोकशाहीचा परवाना घेऊन एकाच घराण्याकडे होती. स्वातंत्र्यानंतरचा हाच काळ, या ५० वर्षांतील बाल्यावस्था म्हटली, तर तो या देशाने स्वीकारलेल्या लोकशाहीचा संस्कारक्षम काळ ठरतो. लोकशाहीच्या विकासापेक्षा घराणेशाही दृढ करण्यात लोकशाहीचा हा काळ निघून गेला. लोकशाहीकरिता आवश्यक असलेली पक्षबांधणी, स्वच्छ निवडणूक व्यवस्था ही हेतुपूर्वक दुर्लक्षिली गेली. पक्षांतर्गत लोकशाहीला तिलांजली मिळाली. साहजिकच खुशमस्करे, भाट आणि पैसा उभा करू शकणारे समाजकंटक गुंड हे लोकप्रतिनिधी झाले! लोकशाहीचा अंतिम हेतू येनकेनप्रकारेण सत्ता हस्तगत करणे एवढाच शिल्लक राहिला. सर्व लोकशाही पक्षांनी कमी-अधिक प्रमाणात सत्ता प्राप्त करण्याकरिता यशस्वी झालेला हाच मार्ग स्वीकारणे पसंत केले.

लोकशाही समाजाला टिकवू शकत नाही; तर जबाबदार, संयमी समाज लोकशाही टिकवतो. असंस्कृत समाजाच्या संस्थाही असंस्कृतच असतात. लोकशाही किंवा कुठलाही सभ्य समाज हा काही 'सदृश्य' संकल्पनांनी बांधलेला असतो. नीतीमूल्ये आणि त्याग या संकल्पना कायद्याने किंवा भीतीमुळे लादता येत नाहीत. चारित्र्य हे पुरस्कारांनी देता येत नाही, ते घडवावे लागते. भ्रष्टाचाराने सडलेल्या समाजाच्या शब्दकोशामधील शब्दांचे अर्थही बदलतात! स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार होऊ लागतो, सहिष्णुता भित्रेपणा होते, संयम षंढपणा होतो, तर ताकदीचा अर्थ जुलूम होतो, स्वाभिमान म्हणजे गर्व होतो, तर त्याग म्हणजे शरणागती होते. शब्दांचे व पर्यायाने समाजव्यवस्थेचे हे अनर्थ मात्र भित्रा आणि लाचार समाज निर्माण करतात.

आपली लोकशाही भ्रष्ट नाही, समाज भ्रष्ट आहे. क्रांतीचे डोहाळे लागलेल्या सिद्धान्तवाद्यांनी केवळ आपला इतिहासच विकृत केला नाही, तर सर्व समाजच संस्कृतिहीन करून टाकला. न झालेल्या जुलूमांचा आणि अन्यायांचा बागुलबुवा निर्माण केला. जाती नष्ट करण्याच्या नावाखाली जाती घट्ट केल्या. 'निधर्मा'च्या नांवाखाली 'अधर्मा'ची जोपासना केली. याच सिद्धान्तवाद्यांनी घराणेशाही आणि एकाधिकारशाहीला सुद्धा लोकशाहीच्या गोंडस नावाखाली पाठिंबा दिला. आजच्या लोकशाहीचे खरे मारेकरी हे अशा पद्धतींना प्रतिष्ठा प्राप्त करून देऊन, घराणेशाही निर्माण करणारे सिद्धान्तवादीच आहेत. असे सिद्धान्तवादी सर्व पक्षांत आहेत. आजचा बधिर, सवलतग्रस्त, आत्मकेंद्रित समाज ही यांचीच निर्मिती आहे. लेखक, कवी आणि धर्मपंडितही आज पारितोषिकांच्या ओझ्याखाली वाकलेले आहेत. आजच्या समाजासमोर खरोखरच उत्तुंग, चारित्र्यवान नेतृत्त्व नाही हीच त्याची खरी शोकांतिका आहे.

**– एप्रिल १९९७**

❖❖❖

# भारत - एक ठेंगू लोकांचा देश

मराठी भाषेमध्ये ठेंगूला बुटका किंवा खुजा असे पर्यायी शब्द आहेत. हे सर्व शब्द माणसाच्या उंचीशी निगडित आहेत. वस्तुतः माणसाची उंची आणि त्याची बौद्धिक क्षमता यांचा दूरान्वयानेही संबंध नाही. उंच मनुष्य निर्बुद्ध असू शकतो किंवा बुटका मनुष्य बुद्धिवान असू शकतो. पण मोजमापाच्या परिभाषा आणि परिमाणामध्ये उंची, लांबी, खोली हे विकास किंवा प्रगती दर्शवितात. व्यवहारामध्ये सुद्धा परीक्षेमध्ये अधिक गुण मिळणे हे चांगल्या बुद्धिचे लक्षण ठरले आहे. शाळा, महाविद्यालयांमधील प्रवेशाकरिता सुद्धा 'गुणवत्तेनुसार प्रवेश' असे जेव्हा सांगितले जाते, तेव्हा सर्वात अधिक गुण असलेल्या विद्यार्थ्यालाच प्रवेश, असा त्याचा अर्थ असतो. यांत्रिकी, गणिती, वस्तुनिष्ठ, शास्त्रीय तत्त्वज्ञानांत 'प्रगती' किंवा 'विकास' हा श्रेणीयुक्तच (linear) गृहीत धरला आहे. या विचारसरणीचाच एक भाग म्हणून २१ वे शतक म्हणजे जणूकाही प्रगतीचा परमोच्च बिंदूच, या दृष्टिकोनातूनच आज सर्व मानवी घटनांचा विचार केला जात आहे. या आधीची शतके ही माणसाच्या विकासातील 'बाल्या'वस्था आणि पुढील येणारे प्रत्येक शतक हे

प्रगतीचे पुढील पाऊलच, हा या विज्ञानसंस्कृतीचा एक गृहीत सिद्धान्त आहे. दर माणशी सल्फ्यूरिक ॲसिड, साबण किंवा मोटारींचा वापर हे या प्रगतीचे निर्देशांक आहेत. या सर्वच उपभोग्य वस्तूंचा वापर जेवढा अधिक तेवढा प्रगतीचा आलेख अधिक उंच. आलेख जेवढा ठेंगू तेवढा तो देश अप्रगत. प्रगतीचे हे मोजमाप आणि निर्देशांक नुसतेच चुकीचे किंवा एकांगी नसून माणसाच्या विकासाच्या वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे आहेत. सुसंस्कृत, सभ्य समाज निर्माण करण्याकरिता लागणारी महत्त्वाची नीतिमूल्ये, त्याग, संयम, अध्यात्म यांचा या मोजमापामध्ये कुठेच अंतर्भाव नाही. आत्मकेंद्रित, चंगळवादी, बेजबाबदार मानव अधिकार आणि भोगवाद म्हणजेच प्रगतीकरिता आवश्यक ठरणारा 'व्यवहार्य' 'विज्ञाननिष्ठ' दृष्टिकोन असा समज यामुळेच निर्माण करून देण्यात येत आहे. अर्थातच जगातल्या विचारवंतांचा या प्रगतीबद्दल भ्रमनिरास झाला असून 'प्रगती'चे हे आलेख मानवाच्या 'विकासा'पेक्षा 'भकासा'चे निर्देशांक असल्याचे त्यांना आता वाटू लागले आहे. कुटुंब, लग्न इ. सामाजिक संस्थांची यामुळे झालेली वाताहात आणि त्यामुळे निर्माण झालेला भावनाशून्य बधिर समाज, तसेच पर्यावरणातील बिघडलेल्या संतुलनामुळे निर्माण झालेले प्रश्न जगातल्या वैज्ञानिक, समाजशास्त्रज्ञ आणि विचारवंतांची झोप उडवू लागले आहेत. २१ व्या शतकात येणारा संगणक किंवा जैविक तंत्रज्ञान यांपेक्षा मानवाच्या नीतिमूल्यांचा होणारा ऱ्हास हीच विवंचना या शास्त्रज्ञांना अधिक भेडसावू लागलेली दिसते. सध्या अमेरिकेमध्ये चालू असलेल्या राष्ट्रसंघाच्या, पृथ्वीच्या पर्यावरणासंबंधात चालू असलेल्या अधिवेशनात हीच भीती व्यक्त होत आहे. पर्यावरणाच्या या बिघडलेल्या संतुलनाचा परिणाम अखिल मानवजातीला भोगावा लागणार आहे आणि त्याला प्रगत राष्ट्रांची जीवनशैलीच जबाबदार आहे हेही या संमेलनात मान्य झाले आहे. पण तरीही भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांची यामधून बोध घेण्याची तयारी दिसत नाही. पाश्चात्त्य देशांमध्ये माणसाच्या विकासाच्या समजुतीच्या संदर्भात दिसत असलेले हे बदल, या देशात पोहोचायला म्हणजेच सुरू व्हायला बहुधा आणखी अर्धशतक लागेल.

स्वातंत्र्यानंतरच्या अर्धशतकामध्ये, प्रगतीच्या नावाखाली केलेली पाश्चात्यांची ही भ्रष्ट नक्कल, ना आपल्याला भौतिक प्रगती देऊ शकली, ना आपण आपला सांस्कृतिक वारसा जपू शकलो. साम्य-समाजवादी डाव्या सिद्धान्तवाद्यांनी केलेल्या संस्कृतिभंजनाच्या कार्याला चांगलीच 'फळे' येऊन आजचा संस्कृतिहीन, भ्रष्ट भारत मोठ्या कष्टाने आपली राष्ट्रीय अखंडता टिकवण्याचे प्रयास करताना दिसत

आहे. भजनानंतर निर्मितीचा कोठलाही कार्यक्रम किंवा क्षमता यांच्याजवळ नाही. ज्यांच्या अर्थनीती, समाजसंस्था आणि संस्कृतीच्या सिद्धान्ताची ही मंडळी उसनवारी करत होते ते सर्व साम्यवादी देश एकतर मोडीत निघाले किंवा चक्क उघडपणे भांडवलदारी देशांचे मांडलिक बनले. धर्म ही अफूची गोळी असेल, तर मार्क्सवाद हा भिकेची झोळी आहे, हे सत्य मान्य करण्याची मानसिकता आजही या साम्य-समाजवादी सिद्धान्तवाद्यांजवळ नाही. दुसरीकडे, आयुष्यभर ज्यांनी गांधीजींच्या स्वदेशी अर्थनीतीची अवहेलना केली त्यांना अचानक स्वदेशीचा साक्षात्कार झाल्याचे दिसून येत आहे. स्वातंत्र्यानंतरची सर्वच राजकीय पक्षांची सत्तालोलुपता उबग आणणारी आहे. पक्षांतर्गत लोकशाहीचे नागडे स्वरूप आज आपल्यासमोर उभे आहे. लोकांना प्रामाणिकपणे कर भरायला सांगणारे हे सर्वच पक्ष आणि त्यांचे नेतृत्व, निवडणूक आयोगाला आपल्या पक्षाचे आर्थिक व्यवहार देताना मात्र जी टाळाटाळ करत आहेत ती केविलवाणी आहे. भ्रष्टाचाराने गाठलेली उंची आणि खोली मोजायला नुसती साधने नाहीत, तर भाषेमध्ये शब्दही अपुरे पडू लागले आहेत.

जगात लोकसंख्येमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असलेला हा देश आज अस्थिरतेच्या उंबरठ्यावर उभा आहे. गेल्या पन्नास वर्षांत विज्ञान असो, साहित्य असो किंवा इतर कुठलेही प्रगतीचे क्षेत्र असो, भारताचा त्याला लागलेला हातभार अत्यंत अल्प आहे. याउलट अव्यवस्था आणि भ्रष्टाचारामध्ये जगात भारताचा १०वा क्रमांक लागला. राष्ट्रसंघाच्या १९९७ साली प्रकाशित झालेल्या मानव विकास अहवालामध्ये १७५ देशांमध्ये भारताचा क्रमांक १३८ वा लागला. ठाणे जिल्ह्याएवढी आफ्रिकेतील काही अविकसित लहान राष्ट्रेही भारतापेक्षा या संदर्भात पुढे आहेत. वयाच्या ४० वर्षांपूर्वी अकाली मृत्यू, प्रौढ साक्षरता, स्वच्छ पाणी पुरवठा आणि ५ वर्षांखालील मुलांचे कुपोषण या घटकांवर आधारित केलेल्या मानवी गरिबीच्या आलेखमांडणीत ७८ विकसनशील देशांमध्ये भारताचा ४७ वा क्रमांक लागला. स्वातंत्र्यानंतर ८ पंचवार्षिक योजनांमधून गरिबी हटवण्याच्या घोषणेपोटी करदात्यांचे अब्जावधी रुपये खर्च करूनही १९९७ साली म्हणजे स्वातंत्र्यानंतर ५० वर्षांनंतरसुद्धा सुमारे ४०% जनता आज दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहे, हे सरकारच आपल्याला सांगत आहे. घोषणाबाजी आणि चक्क फसवणूक यांचे या इतके चांगले उदाहरण जगात कुठेही मिळणार नाही. प्रगती करता शिक्षणाची आवश्यकता सर्वमान्य आहे. पण समाजवादी, केंद्रीभूत धोरणामध्ये शिक्षणक्षेत्रामध्येही परवाना राज्याचे साम्राज्य

निर्माण झाले. शाळा काढण्यापासून अभ्यासक्रम, फी, शिक्षकांच्या नेमणुका, तुकडी वाढ या सगळ्यांकरिता परवाने पद्धत चालू आहे. शिक्षण किंवा सृजनशीलतेशी काडीचाही संबंध नसलेले नोकरशहा अक्षरशः या शिक्षणसंस्थांची वाताहात करीत आहेत. असल्या नियंत्रित, भ्रष्ट शिक्षण चौकटीतून गुणवत्ता आणि पात्र विद्यार्थी कसे निर्माण होणार?

'Asiaweek' या साप्ताहिकाने आशिया खंडातील केलेले पाहणीचे निष्कर्षही बोलके आहेत. पाहणी केलेल्या ५० विद्यापीठांमध्ये दिल्ली विद्यापीठाचा २९ वा, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचा ४७ व मुंबई विद्यापीठाचा ५० वा क्रमांक लागला. पहिल्या १० विद्यापीठांमध्ये, मुक्त अर्थव्यवस्था राबविणाऱ्या हाँगकाँग, सिंगापूर आणि जपानमधील ५ विद्यापीठे आहेत. चीनमधील पेकिंग विद्यापीठाचाही यामध्ये ७ वा क्रमांक आहे. भारतीयांना आपल्या भ्रष्ट राजकीय आणि सामाजिक नेतृत्वामुळे द्यावी लागणारी ही किंमत फार मोठी आहे. हवाला आणि घोटाळा प्रकरणांमध्ये या देशातील सर्व पक्षांच्या नीतिमत्तेचे वस्त्रहरण झालेले आहे. या भ्रष्ट लुटारूंनी जर भौतिक गोष्टींची लूट केली असती, तर ती केव्हातरी भरून काढता आली असती; पण स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैराचार माजवून नीतीमूल्ये, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक आघाड्यांवरही यांनी या देशाला गरीब करून टाकले. आजच्या सिनेमांतील गाणी, सिनेमासिकांमधील नग्न किंवा तत्सम उत्तेजक छपाई आणि सर्व चॅनेलवरील संगीत नृत्यांचे कार्यक्रम यांनी हिडीस आणि बीभत्सपणात नीचांक गाठला आहे. उच्च न्यायालयाने सदनिका वाटपातील दिल्लीमधील भ्रष्टाचार सप्रमाण सिद्ध केला. यातील जबाबदार व्यक्तिंना शिक्षा करण्याचे दूरच राहो, मावळते राष्ट्रपती अध्यादेश काढून हे प्रकरण संपुष्टात आणतात, तेव्हा या राष्ट्राच्या पहिल्या नागरिकाची सद्सद्विवेकबुद्धी पार नष्ट झाली आहे हे जाहीर होते. सर्वच राजकीय पक्षांना गोलमाल आणि बटीक राष्ट्रपती का हवा असतो याचा उलगडा या उदाहरणातून होतो. निर्भय, चारित्र्यवान, कुठल्याही दडपणाला बळी न पडणाऱ्या, मिंधा न होणाऱ्या नागरिकाला या देशाचा राष्ट्रपती होणे अशक्य आहे हे आता सिद्ध झाले आहे. पन्नास वर्षांनंतर उंची वाढवण्याची आलेली चांगली संधी आपण वाया घालवली आहे. बुटक्यांच्या संस्था आणि आयुधेही बुटकीच असतात!

**– जुलै १९९७**

❖❖❖

# भारतीय स्वातंत्र्य आणि चर्चिल

भारतीय स्वातंत्र्याचा ५० वा वाढदिवस आपण सध्या साजरा करीत आहोत. स्वातंत्र्य ५० वर्षे टिकले ही बाब जरी समाधानाची असली, तरी आजच्या आपल्या स्वातंत्र्याची परिस्थिती मात्र समाधानकारक नाही. या देशाचा सामान्य नागरिक नुसताच उदासीन, गोंधळलेला आणि भांबावलेला नसून, तो चिंतितही आहे. राजकीय पक्ष, लोकशाही, लोकप्रतिनिधी आणि नोकरशाहीचे आजचे भ्रष्ट स्वरूप बघून तो बेचैन आहे. दुबळ्याची बेचैनी त्याला अधिक लाचार बनवते. ही लाचारी त्याला अधिक सवलती मागायला उद्युक्त करते. येन केन प्रकारेण सत्ता टिकवणारे राजकारणी, लोकप्रतिनिधी आणि शासन हे सर्व अशा दुबळ्या लाचारांवर सवलतींचा पाऊस पाडतात. हा सगळाच व्यवहार अव्यवहार्य असल्यामुळे तो फार काळ टिकू शकत नाही. असले शासन आणि समाज हे आपले स्वातंत्र्यही फार काळ टिकवू शकत नाहीत या पार्श्वभूमीवर या देशात घडत असलेल्या आजच्या घटना ह्या आपले स्वातंत्र्य किती दुबळे झाले आहे हे दाखवणाऱ्या आहेत. १९४७ साली इंग्लंडच्या 'हाऊस ऑफ कॉमन्स' मध्ये ॲटली यांनी भारताला स्वातंत्र्य

बहाल करण्याचे बिल आणले. विन्स्टन चर्चिल यांनी या बिलाला कडाडून विरोध केला. आपला विरोध नोंदवताना, भारताला स्वातंत्र्य का देऊ नये याची त्यांनी केलेली कारणमीमांसा कटू असली तरी ती चर्चिल यांचा द्रष्टेपणा दाखवणारी आहे. चर्चिल म्हणाले होते, '' स्वातंत्र्य हा माणसाचा जन्मसिद्ध हक्क आहे. परंतु या बिकट समयी काँग्रेसच्या हाती शासनसूत्रे देणे म्हणजे कोट्यवधी भुकेकंगालांची नियती लुच्चे, लबाड व लुटारू यांच्या हाती देणेच होय. पाण्याची बाटली अथवा ब्रेडचा तुकडा देखील कर-आकारणीतून सुटणार नाही. हवा तेवढी करमुक्त राहील आणि कोट्यवधी भुकेकंगालांच्या हत्येचे पातक मात्र ॲटर्लीच्या माथी येईल. राजकीय कलागतीमध्ये हिंदुस्थान हरपून जाईल. राजकारणाच्या तात्त्विक अधिष्ठानाच्या परिघात यावयास या लोकांना हजार वर्षे लागतील. आज आपण शासनाची सूत्रे क्षुद्र लोकांच्या स्वाधीन करीत आहोत. काही वर्षांतच त्यांचा मागमूस आपल्याला लागणार नाही.'' केवढे मोठे सत्य चर्चिल ५० वर्षांपूर्वी सांगून गेले! चर्चिल कोणी ज्योतिषी नव्हते; ते उत्कृष्ट मुत्सद्दी आणि राजकारणपटू होते, कट्टर राष्ट्रवादी होते. चर्चिल यांनी आपले अचूक निदान कुठल्या अनुभव आणि कारणमीमांसेने केले हे जाणून घेणे हिताचे ठरेल. भारतीय प्रतिनिधी आणि राजकारणी यांचा ब्रिटिश प्रतिनिधींशी आलेला संबंध हा चर्चिल यांना तत्कालीन भारतीय नेतृत्वाची कुवत आणि ताकद समजावून घेण्यास उपयोगी पडला असणार. ज्या राष्ट्राला चर्चिलसारखे मुत्सद्दी द्रष्टे नेते मिळतात ते राष्ट इतिहास घडवू शकते आणि जे राष्ट्र इतिहासापासून धडे घेत नाही ते आपला भूगोल टिकवू शकत नाही. चर्चिलची भविष्यवाणी खरी करणारे आजचे आमचे राजकारणी व लोकप्रतिनिधी नुसतेच निर्लज्ज नाहीत, तर बेशरम आहेत. आजची भ्रष्टाचाराची प्रकरणे, घोटाळे आणि सत्तालोलुपता बघून उबग आणि किळस येते. या देशात आज असा एकही प्रांत राहिलेला नाही की जेथे भ्रष्टाचाराने थैमान घातलेले नाही. सर्वच राजकीय पक्षांची याबाबतीतील भूमिका दांभिकपणाची आहे. 'आपला तो बाळ्या, दुसऱ्यांचे ते कार्टे' असा या पक्षांचा व्यवहार आहे. प्रचंड लोकसंख्या असलेल्या या देशाला खंबीर नेतृत्व मिळू नये ही केवढी मोठी शोकांतिका आहे! फसव्या, भोंगळ आणि स्वप्नाळू घोषणा आणि सिद्धान्तवाद हे राष्ट्राचे स्वातंत्र्य टिकवू शकतील काय? स्वातंत्र्यानंतर कमीत कमी ४० वर्षे या देशात लोकशाहीच्या नावाखाली घराणेशाही नांदली. लालूप्रसाद यादव यांनी आपल्या पत्नी रबडीदेवी यांची मुख्यमंत्री म्हणून घोषणा केल्यावर त्यांच्यावर टीका करणारे हे सोनिया गांधींच्या बाबतीत मात्र, त्या राजीव गांधी यांच्या पत्नी आहेत यापलीकडे त्यांच्या नेतृत्वाचा स्वीकार करताना

कोणती कारणमीमांसा देऊ शकतात का? लालूप्रसाद यादव यांनी कोणतीही नवीन गोष्ट केलेली नाही. आपली सत्ता टिकवण्याकरिता याच तंत्रांचा अवलंब हा अगदी स्वातंत्र्याचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंपासून सर्वांनी केला आहे. टी. टी. कृष्णम्माचारी, कृष्णमेनन, स. का. पाटील, मावळणकर ही सर्व नेहरूंच्या काळातील नेते मंडळी आहेत. या सर्वांवर भ्रष्टाचाराचे आरोप होते. इतिहास हा वस्तुनिष्ठ असावा. कटू असले तरी त्यात सत्य सांगितले जावे इ. असे उपदेश देणारे बुद्धिवंत स्वतः जेव्हा आपल्या लाडक्या नेत्यांची चरित्रे लिहितात तेव्हा या सर्व तत्त्वांना हरताळ फासतात. असले लाळघोटे आणि मिंधे ज्या देशांत बुद्धिवान म्हणून मिरवतात तिथेच चर्चिलची भविष्यवाणी खरी ठरते. ज्या देशामध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचा, आमदारांचा आणि खासदारांचा 'दर' ठरतो तो देश लोकशाही किंवा प्रजासत्ताक आहे असे म्हणणे म्हणजे डोके फिरल्याची साक्ष देणे आहे. सहिष्णुता आणि मानवता ही उपदेश करायला चांगली तत्त्वे असली तरी या देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी आचरणात मात्र या तत्त्वांना फाटा मारल्याचे दिसून येते. २८ नोव्हेंबर १९६० रोजी इंडियन लॉ इन्स्टिटयूटच्या कोनशिला समारंभाच्या वेळी डॉ. राजेंद्र प्रसादांनी जे भाषण केले त्या भाषणात त्यांनी राष्ट्रपतीपदाबाबत मूलभूत शंका आणि समस्या मांडल्या होत्या. त्यामध्ये नेहरूंना न पटणारे विचार होते. पंडित नेहरूंनी ते भाषण दडपून टाकले. त्या व्याख्यानाच्या प्रती वार्ताहरांना त्या काळी मिळाल्या नाहीत, एवढेच नाही तर त्याची प्रत राष्ट्रीय दप्तर खात्यातही उपलब्ध नसल्याचे अनेक संशोधकांना आढळून आले! ब्रिटिश सरकारने १९३५ साली केलेल्या आपल्या देशाच्या घटनाकायद्यातून सुमारे २/३ भाग उचलून, आजची आपल्या देशाची घटना लिहिली गेली आहे. ब्रिटिशांच्या उष्ट्यावर जगून घटनेचा विचार न करता एकूण भारतीय संस्कृतीचा विचार करून त्याचे प्रतिबिंब घटनेत पडावे असा राजेंद्रबाबूंचा कटाक्ष होता. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी आपल्या एका भाषणात;- निवडून येणाऱ्या प्रतिनिधींच्या बाबतीत पात्रतेचा कुठलाच निकष न ठेवल्यामुळे घटना सदोष होण्याची भीती व्यक्त केली होती. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्याकरिता पात्रतेच्या अटी, पण कायदा निर्माण करणाऱ्या प्रतिनिधींच्या बाबतीत मात्र 'निवडून येणे' एवढीच फक्त पात्रता, ही फार मोठी विसंगती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी त्याचवेळेस दाखवून दिली होती. या ५० वर्षांत लोकशाहीचे तीनतेरा वाजवायला हीच विसंगती जबाबदार असल्याचे आज आपल्याला दिसत आहे. श्री. पी. कोटेश्वरराव हे त्या वेळचे आणखी एक घटनातज्ज्ञ. त्यांनी घटनेबद्दल व्यक्त केलेली मतेही बोलकी आहेत. ते लिहितात,

''आपली घटना भारतीय नाही, गांधीवादीही नाही. ती चऱ्हाट वळणारी, गोंधळ माजवणारी व आत्मविसंगत आहे; इथल्या मातीशी तिचा बिलकुल संबंध नाही, तिची मूलभूत तत्त्वे परकीयांपासून उसनी घेतली आहेत; आपल्या समाजाच्या आशा-आकांक्षा व गरजा तिच्यात प्रतिबिंबित होत नाहीत; आमचे कौतुक, शहाणपण व संस्कृती यांचा वैज्ञानिक दृष्टिकोनाशी आणि सामाजिक न्यायाच्या भूमिकेशी एकसंध सांधा साधून नवी घटना तयार केली पाहिजे. संख्याबळाच्या जुगाराने दुरुस्तीची घालमेल करीत बसण्यापेक्षा नवीन घटनासमिती नेमून विद्यमान घटनाही आमूलाग्र बदलली पाहिजे.

चर्चिल एवढेच राजेंद्रप्रसाद आणि कोटेश्वररावही द्रष्टे होते. ५० वर्षांपूर्वीच या देशाच्या संस्कृतीची नाळ तोडून ती एका भंपक सिद्धान्तवादाशी जोडण्यात आली. सिद्धान्तवादाच्या भाटांनी या देशाचा इतिहास विकृत केला. नसलेले अत्याचार, अन्याय झाल्याच्या कथा लिहिल्या. जुन्या समाज-संस्था उद्ध्वस्त करून, पाश्चात्त्य संस्कृतीशी नाळ जोडणाऱ्या नवीन संस्था उभारू पाहिल्या. जातीयवाद, ब्रिटिश वसाहतवाद आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांना जे २०० वर्षांत जमले नाही, ते स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ५० वर्षांत आमच्याकडे साम्य-समाजवाद हा उसना सिद्धान्तवाद आणू पाहणाऱ्या बुद्धिवाद्यांनी घडवून आणला. शरीराचा एखादा अवयव निकामी झाला तर त्याचे रोपण करून थोडेफार तरी ते कार्य परत आणता येते, पण सर्वच अवयव वेगवेगळे घेऊन शरीर निर्माण करता येत नाही. ते जन्मावेच लागते. आणि या राष्ट्राचा जन्म ५० वर्षांपूर्वी नाही तर कित्येक हजार वर्षांपूर्वी झाला आहे. चर्चिल यांची भविष्यवाणी खोटी ठरविण्याची संधी अजूनही गेलेली नाही. डॉक्टर सच्चिदानंद सिन्हा हे घटना समितीचे काही काळ अध्यक्ष होते. त्यांनी आपल्या उद्घाटनाच्या भाषणात जोसेफ स्टोरी या अभ्यासकाचे विचार सांगितले होते. ''गणराज्येही नागरिकांच्या सच्छिलतेने, समाजविषयक कळकळीने व कुशाग्र बुद्धीने उपलब्ध होतात; परंतु ती रसातळास जातात, जेव्हा प्रामाणिक सल्ला देण्याचे धैर्य असलेले शहाणे हद्दपार केले जातात तेव्हा आणि तेव्हाच जनतेचा विश्वासघात करण्याकरताच तिची हांजीहांजी करणाऱ्या बदमाशांना बक्षिसे दिली जातात.'' भविष्यात स्वातंत्र्य अबाधित राखण्याकरिता हे विचार मार्गदर्शक आहेत.

**– ऑगस्ट १९९७**

❖❖❖

## स्वातंत्र्य-कोणासाठी? कशासाठी?

भारतीय स्वातंत्र्याचे ५० वे वर्ष आपण साजरे करीत आहोत. याच वर्षी नुकत्याच लोकसभेच्या निवडणुकाही पार पडल्या. स्वतंत्र भारतापुढे त्याच्या जन्माबरोबर अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्या समर्थपणे सोडवण्याच्या बाबतीत आपली नालायकीच अधिक सिद्ध होत असून, या समस्या अधिक बिकट होताना आपल्याला दिसत आहेत. स्वातंत्र्य मिळवण्याचा धरलेला हट्ट हाच मुळी बरोबर होता का? असा मूलभूत प्रश्न पडावा अशी आजची परिस्थिती आहे. एखादा कैदी जेव्हा तुरुंगात डांबला जातो तेव्हा तो त्याचे स्वातंत्र्य हरवून बसतो. त्याच्या सर्व जीवनक्रमाचे नियंत्रण हे तुरुंगाच्या अधिकाऱ्याकडे असते. त्यांच्या जेवणाखाण्यापासूनच्या हालचाली व कपड्यालत्त्यांपर्यंतचे सर्व निर्णय हे तो स्वतः घेऊ शकत नसतो. दुसऱ्याने घालून दिलेल्या नियंत्रणाखाली ते चालू असते. कैद्याच्या शिक्षेचा कालावधी संपला की तो तुरुंगातून सुटतो, म्हणजे त्याच्या दैनंदिन जीवनाचे निर्णय तो स्वतः घेण्यास मोकळा होतो. नियंत्रित हालचालींपेक्षा आपल्या जीवनाचा क्रम आणि दिशा ठरवण्याचा जो अधिकार कैदी मिळवतो तो अधिकार म्हणजे त्याचे स्वातंत्र्य

असते. भारत पारतंत्र्यात होता म्हणजे भारतीय नागरिकाच्या हिताच्या, विकासाच्या, संस्कृती व नीतिमूल्याच्या संदर्भात, चांगले-वाईट ठरविण्याचे स्वातंत्र्य अ-भारतीय लोकांच्या हातात होते. या अ-भारतीय लोकांना इथली संस्कृती, जीवनपद्धती, धर्मसंकल्पना, कला, व्यापार यांच्या रक्षणापेक्षा आपली सत्ता आणि आर्थिक फायदा यांचे रक्षण कसे होईल याची विवंचना अधिक होती आणि म्हणून त्यांनी आपले हे हितसंबंध जपून राज्यकारभाराची पद्धत आखली. साहजिकच या पद्धतीमध्ये भारतीयांच्या आशा-आकांक्षांचा संकोच होत होता. त्यांना स्वतःच्या हिताचे काय आणि अहिताचे काय हे ठरविण्याचा अधिकार म्हणजे स्वातंत्र्य नव्हते. आपण स्वातंत्र्य मिळवले म्हणजे आपला हा अधिकार आपण परत मिळवला, या अधिकाराचा वापर पारतंत्र्यात करणे शक्य नव्हते असे आपल्याला वाटत होते. साहजिकच स्वातंत्र्य मिळाल्यावर आपण या अधिकारांचा योग्य तो वापर करू असा विश्वास स्वातंत्र्याचा आग्रह धरण्याच्या मागणीमध्ये होता.

आज ५० वर्षानंतर आपल्यासमोर काय चित्र उभे आहे? नुकत्याच पार पडलेल्या निवडणुका स्वातंत्र्याचे कुठले चित्र आपल्या समोर उभे करतात? आपले लोकप्रतिनिधी हे भारतीय आहेत का अ-भारतीय आहेत? आजच्या ह्या परिस्थितीला हे लोकप्रतिनिधी जबाबदार, की त्यांना निवडून देणारे नागरिक अधिक जबाबदार? गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या निवडणुकांमध्ये खून, मारामाऱ्या टोळीयुद्धाचे नेतृत्व करणारे अनेक धटिंगण आज आपले लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आले आहेत. ते निवडून आले आहेत असे म्हणण्यापेक्षा आपण त्यांना निवडून दिले आहे. सर्व राजकीय पक्षांची घोषणापत्रे आणि नेत्यांची भाषणेही भ्रष्टाचार गाडून टाकण्याच्या वल्गना करताना आपण ऐकतो. पण उक्ती आणि कृतीचा कुठेही संबंध दिसत नाही. आपल्या राजकीय सोयीकरिता सर्व नीतिनियम धाब्यावर बसवून गुंड, भ्रष्टाचारी मंडळींना घेऊन येनकेनप्रकारेण सत्ता टिकवणे हा आज एककलमी कार्यक्रम राबवण्यात सर्व राजकीय पक्ष मश्गूल झालेले दिसतात. उच्चार आणि लेखन स्वातंत्र्याचा अधिकार मिळवणे हाही स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याकरिता मांडलेला एक महत्त्वाचा मुद्दा होता. या ५० वर्षांमध्ये हा अधिकार मिळाल्यावर आपण काय लिहिले? आजच्या आपल्या साहित्याची काय 'दशा' आहे? 'वासूनाका' किंवा 'घाशीराम कोतवाल' लिहायला ब्रिटिशांच्या काळातही बंदी नव्हती. ढोंगी आणि दांभिक साहित्याला 'परिवर्तनवादी' साहित्य म्हणून मिरवण्याचे स्वातंत्र्य मात्र मिळाले आहे हे नक्की. आजच्या आपल्या सिनेमा किंवा त्यातल्या गाण्यांची काय परिस्थिती

आहे? कलेचे स्वातंत्र्य म्हणतात ते हेच का? साहित्य असो अगर कला असो, हिडीस लैंगिक आणि बीभत्स लिहिण्याचा अधिकार मिळवणे हाच स्वातंत्र्याचा अर्थ आहे का? भारतातले सर्वच घटक आज अमाप स्वातंत्र्य भोगत आहेत. स्वैराचाराला मुभा म्हणजेच 'स्वातंत्र्य' असा समजच या राजकीय आणि समाजशास्त्रज्ञांनी देशाच्या नागरिकांचा करून दिलेला दिसतो. माणसाचे जीवन इतके परस्परावलंबी आहे की, जर प्रत्येक घटक असा स्वैराचाराने वागू लागला तर नुसताच दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा संकोच होतो असे नाही, तर संपूर्ण सामाजिक गोंधळ माजतो. असा गोंधळलेला स्वार्थी समाज स्वतःच्या स्वातंत्र्याचे; मग ते धार्मिक असो, राजकीय असो, सांस्कृतिक असो, रक्षण करू शकत नाही. हा देश गेल्या हजारो वर्षांत जेवढा जातीय नव्हता तेवढा जातीय आज आहे. प्रत्येक समाज आपण मागासलेलो आहोत हे हिरिरीने सांगून आपल्या जातीला 'मागासलेला' दर्जा मिळवण्यात मश्गूल आहे. लोकशाहीचा मुख्य पाया हा 'राजकीय पक्ष' आहे. राजकीय पक्षांचा स्वतःचा ठोस 'सिद्धान्त' हवा, की ज्या आधारावर तो आपली सामाजिक, राजकीय, शैक्षणिक धोरणं आखू शकेल. हे 'सिद्धान्त' आणि या सिद्धांतामागील मीमांसा आणि तर्क हे पारदर्शक आणि सुसंगत हवेत. या देशातील बहुतांशी राजकीय पक्षांचा ढाचा हा भावनिक किंवा व्यक्तिगत बांधिलकीवर आधारित आहे. आज आपण शुद्ध लाचारी किंवा वकिली सफाईच्या आधारावर कुठलाही सिद्धान्त यशस्वी होताना बघत आहोत. यामुळे सत्ता मिळवणे किंवा घराणेशाही प्रस्थापित करणे या पलीकडे देशाचा किंवा समाजाचा काडीचाही फायदा होत नाही. अनेक वेळा दूरदर्शनवर निवडणुकीच्या वेळी दाखवल्या गेलेल्या चर्चा बघितल्या की, प्रत्येक पक्ष किंवा नेता (काही अपवाद वगळता) हा बघणारे लोक मूर्ख आहेत किंवा भारतीय जनता विसराळू आहे या ठाम विश्वासावर बेधडक विधाने करीत असतो. आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचे ते कार्टे या सिद्धांतावर सर्व चर्चा चालू असते. पक्षांतर्गत खरी लोकशाही आणि पात्र प्रतिनिधींची निवड जोपर्यंत या देशात निर्माण होत नाही तोपर्यंत या देशातील लोकशाही सूत्रे गुन्हेगार आणि भ्रष्टाचारी लोकांच्या हातातच राहणार. राजकारणी आणि आजचे आपले सामाजिक नेतृत्व नुसतेच 'ठेंगू' नाही, तर ते लोकांची फसवणूकही करत आहे. आजच्या भारताच्या परिस्थितीला कारणीभूत सर्वस्वी 'आपण' आहोत. रक्षण भारतीय स्वातंत्र्याचे करायचे, की या सडलेल्या, नासक्या, भ्रष्ट, स्वार्थी, राजकीय संस्थांचे, हे आपणच ठरवायचे आहे!

**– मार्च १९९८**

# पुन्हा स्वातंत्र्यासाठी लढा...

भारतीय स्वातंत्र्याला या वर्षी पन्नास वर्षे पुरी झाली. या निमित्ताने अनेक सोहळे, समारंभ यांचे आयोजन होत आहे. वैयक्तिक किंवा सामाजिक जीवनामध्ये वाढदिवसांना आज महोत्सवाचेच स्वरूप आले आहे. पन्नास वर्षांचे स्वातंत्र्य उपभोगल्यावर आजची भारतीय परिस्थिती बघता, महोत्सवापेक्षा थोडा वेळ थांबून आत्मपरीक्षण करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. भारताचा स्वातंत्र्याचा आग्रहा हा काही शाश्वत मूल्यांवर आधारित होता. पारतंत्र्यात अशा मूल्यांचा विकास होत नाही असाही त्याचा अर्थ होता. पण हा सिद्धांत फसवा आहे. स्वातंत्र्य म्हणजे जसा स्वैराचार नाही; तसेच स्वातंत्र्य म्हणजे सरकारी सवलतींचा आणि फुकटेगिरीचा पाऊसही नाही. स्वातंत्र्य म्हणजे भयाने निर्माण केलेली सुरक्षाही नाही किंवा 'अनियंत्रण'ही नाही. स्वातंत्र्य म्हणजे बेजबाबदार मानवी अधिकारही नाही. संन्यास किंवा एकांतवास हाही स्वातंत्र्याचा उपाय नाही. स्वातंत्र्य ही वस्तूही नाही किंवा स्वातंत्र्य हा जाहीरनामाही नाही. स्वातंत्र्य हे एक सांस्कृतिक मूल्य आहे. संस्कृतीला प्रवाही आणि अपरिवर्तनीय असे दोन्हीही पदर असतात.

चारित्र्यहीन, मूल्यहीन संस्कृती ही स्वार्थी, अप्पलपोटी स्वैराचारी समाज 'स्वातंत्र्या'च्या गोंडस नावाखाली निर्माण होते. अशा यंत्रणेतून फुकटा, सवलतग्रस्त, लाचार आणि मिंधा समाज तयार होतो. प्रज्ञा आणि विवेक हे स्वातंत्र्याचे मूळ खांब जाऊन त्यांची जागा बुद्धी आणि वासना यांनी घेतली जाते.

आजच्या 'स्वातंत्र्या'चा वाढदिवस हा खरा 'परकीय' सत्ता म्हणजे 'पारतंत्र्य' संपल्याचा वाढदिवस आहे. वर सांगितल्याप्रमाणे 'पारतंत्र्य' संपणे म्हणजे 'स्वातंत्र्य' मिळणे अशी जी फसवी समजूत होते तीच चुकीची आहे. आजच्या भारताच्या परिस्थितीने हेच दाखवून दिले आहे. संस्कृतिहीन किंवा उसन्या संस्कृतीवर जगणारा समाज, स्वतंत्र आणि सशक्त प्रजातंत्र निर्माण करू शकत नाही. केवळ संख्याबळ हेच आधार असलेली लोकशाही ही 'लोकसभाप्रधान' प्रजातंत्र निर्माण करू शकते, पण स्वातंत्र्य जपू शकत नाही. आज आपल्याला दिसत असलेली सर्व आघाड्यांवरील दिवाळखोरी ही संख्याबळ या एकच निकषावर उभ्या राहिलेल्या लोकशाहीचे अपत्य आहे. इथे पात्रतेपेक्षा अपात्रतेला मान आहे. नीतिपेक्षा अनीतिचा आदर आहे. त्यागापेक्षा भोगाला किंमत आहे आणि संयमापेक्षा बळाचा विजय आहे. सत्यापेक्षा ढोंगाला समाजप्रतिष्ठा आहे. सर्व राजकीय पक्षांचे या बाबतीत एकमत आहे. केंद्रापासून पंचायतीपर्यंतचे सर्व लोकप्रतिनिधी आज लोकशाही पद्धतीनेच निवडून आले आहेत. ते कोणी परकीय नाहीत तर स्वकीयच आहेत. भ्रष्टाचार, एकाधिकारशाही, भाटगिरी ही चढत्या भाजणीने आज स्वातंत्र्याच्या पन्नासाव्या वाढदिवशी पराकोटीला पोहोचली आहे. परकीयांपेक्षा स्वकीयांचाच जुलूम अधिक दाहक असतो. रावण आणि कौरव हे सुद्धा स्वकीयच होते. रशियामधला झार, फ्रान्समधील किंवा चीनमधील राजसत्ता हीसुद्धा स्वकीयांचीच होती आणि तेथे जेव्हा स्वकीयांचा जुलूम पराकोटीला पोहोचला तेव्हा क्रांती घडली. आणि म्हणूनच परकीयांची सत्ता जाणे म्हणजे स्वातंत्र्य मिळणे हा समज चुकीचा आहे. परकीयांपेक्षा स्वकीय तुम्हाला अधिक पारतंत्र्यात ठेवू शकतात. आजची भारताची परिस्थिती ही नुसतीच भयावह नाही तर भीषण आहे. सत्ता टिकवण्याकरिता चाललेला राजकारण्यांचा निर्लज्जपणा उबग आणणारा आहे. आज एका नवीन स्वातंत्र्यलढ्याला सुरुवात करण्याची गरज आहे आणि हा लढा परकीयांविरुद्ध नसून स्वकीयांविरुद्धच आहे. लाचार व्यक्ती सवलती मिळवितात तर माणसाची निरपेक्षता आणि त्याग त्याला स्वातंत्र्य मिळवून देतो.

**– ऑगस्ट १९९८**

# मेरा भारत महान

२५ सप्टेंबर १९९८ च्या (Vol.281, No.5385) सायन्स (Science) या विज्ञान संशोधन पत्रिकेत प्रकाशित झालेल्या एका लेखामुळे, भारताने मे १९९८ मध्ये केलेल्या अणुचाचण्यांच्या चर्चेचे ताबूत अजून थंड न झाल्याचे दिसून आले. भारतापाठोपाठ पाकिस्ताननेही अणुचाचण्या करून 'हम भी कुछ कम नही' असे प्रत्युत्तर भारताला दिले. या घटनांमुळे अमेरिका आणि इतर पश्चिमी राष्ट्रांनी भारताला शिक्षा म्हणून भारतावर आर्थिक निर्बंधही लादले. भारताने केलेल्या ५ चाचण्यांमध्ये एक चाचणी ही हायड्रोजन बॉम्बची होती. भारताने आपली पहिली चाचणी १९७४ मध्ये केली होती. १९७४ ते १९९८ या कालावधीत भारताने अणुचाचण्या केल्या नसल्या तरी उपग्रह आणि क्षेपणास्त्रे यांमध्ये बरीच प्रगती करून दाखवली होती. या सर्व प्रगतीचा मूलभूत पाया हा भौतिकी आणि गणिती विज्ञान हा आहे. भारतातील अणुक्षेत्रातील प्रगती ही बहुतांशी भारतीय वैज्ञानिकांनी आपल्या स्वतःच्या कुवतीवर केली आहे. याउलट पाकिस्तानची प्रगती ही बहुतांशी चीन, उत्तर कोरिया आणि इतर पाश्चिमात्य राष्ट्रांकडून उसनवारी किंवा

चोरी करून आणलेल्या तंत्रज्ञानावर आधारित आहे. अमेरिका इ. पाश्चिमात्य राष्ट्रांचा खरा पोटशूळ हा आहे की, स्वतंत्रपणे भारत एवढी वैज्ञानिक प्रगती करू शकतो? आणि भारत तशी करू शकला असेल तर या महासत्तांना ती त्यांच्या राजकीय आणि आर्थिक प्रभुत्वाला आव्हान देणारी वाटत आहे.

'सायन्स' मधील लेखांनी भारताने केलेल्या हायड्रोजन बॉम्बच्या चाचणीलाच आव्हान दिले आहे. अशा चाचण्या भूगर्भामध्ये धरणीकंप निर्माण करतात आणि अशा कंपांची नोंद जगातल्या अनेक, याकरिता बसवलेल्या यंत्रांवर होते. या भूगर्भशास्त्रज्ञांनी अशा कंपनांच्या नोंदींचा पुरावा देत भारतीय चाचणी ही हायड्रोजन बॉम्बच्या क्षमतेची नव्हती असा निष्कर्ष काढला आहे. अर्थातच हा निष्कर्ष काढताना त्यांनी कुठली पद्धती वापरली याचा खुलासा केलेला नाही. थोडक्यात, भारतीय शास्त्रज्ञ असा स्फोट करण्याकरिता लागणाऱ्या तंत्रज्ञानाला जे विज्ञान लागते ते विकसित करण्यास असमर्थ आहेत असाच संदेश यातून ध्वनित केला जातो. दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा यामध्ये आहे. तशी सीआयए (CIA) आणि तत्सम अमेरिकन संस्था अब्जावधी रुपये खर्च करून असे संशोधन आणि चाचणी होण्या अगोदरच त्यांची वाच्यता करून टाकतात. अमेरिकेची गुप्तहेर यंत्रणा किंवा उपग्रह यंत्रणा ही चाचणी होइस्तोवर तिचा शोध घेऊ शकली नाही ही वस्तुस्थिती आहे. याची चौकशीही अमेरिकेमध्ये चालू आहे. आपल्याला ही गोष्ट कळू शकली नाही हे दुःखही अमेरिकेतल्या शास्त्रज्ञांना आहेच. भारताकडे अशा प्रकारचे विज्ञान उपलब्ध नसेल तर भारतावर आर्थिक निर्बंध लादण्याची किंवा त्यांच्या शास्त्रज्ञांना प्रवासी परवाना नाकारण्याची गरजच काय? पण अमेरिकेतील आणि जगातील शास्त्रज्ञांना संपूर्ण कल्पना आहे की, भारतीयांनी हे तंत्रज्ञान आणि विज्ञान आत्मसात केले असून ते विकसितही होत आहे. भारतीयांनी आपल्या हायड्रोजन बॉम्बच्या चाचणीकरिता वापरलेले तंत्रज्ञान हाही त्यांच्या डोकेदुखीचा विषय आहे. या भारतीय तंत्रज्ञानामुळे भारत अस्त्र श्रेणीपेक्षा (weapons grade) भट्टी श्रेणीचं (reactor grade) प्लुटोनियम (Plutonium) आपल्या तंत्रज्ञानात वापरू शकेल. यामुळे ऊर्जा प्रकल्पातील वापरलेल्या इंधनाचा उपयोगही अण्वस्त्र निर्मितीकरिता भारत करू शकेल. अमेरिकन शास्त्रज्ञांच्या संघटनेने वायुउत्तेजित आरंभक (gas-boosted Primaries) या तंत्रज्ञानाचा वापर करून प्लुटोनियमच्या या श्रेणीच्या वापरातील अडचणी कशा दूर करता येतात हे सप्रमाण दाखवून दिले आहे. मेमध्ये भारताने केलेल्या हायड्रोजन बॉम्बच्या चाचणीमध्ये हेच तंत्र वापरले आहे.

हायड्रोजन बॉम्बचा पहिला स्फोट अमेरिकेकडून १ नोव्हेंबर १९५२ मध्ये केला गेला. अमेरिकेशिवाय सोविएत युनियन, ब्रिटन, फ्रान्स आणि चीन या राष्ट्रांनीही हायड्रोजन बॉम्बचे स्फोट केले आहेत. अर्थातच भारताने वापरलेले तंत्रज्ञान हे या देशांनी वापरलेल्या तंत्रज्ञानापेक्षा वेगळे आहे. ॲटमबॉम्ब आणि हायड्रोजन बॉम्ब यांच्या विध्वंसक क्षमतेमध्ये तर जमीन-अस्मानाचा फरक आहे. भूगर्भ शास्त्रज्ञांनी जरी भारतीय स्फोटांबद्दल साशंकता व्यक्त केली असली तरी जगातल्या कुठल्याही अणुवैज्ञानिकांनी त्यांच्याशी सहमती दाखवलेली नाही. १६ सप्टेंबर १९९८ च्या 'लॉसएंजिलीस टाइम्स' मध्ये टेक किडर (Take Kidder) या अण्वस्त्र शास्त्रज्ञांनी, 'भूकंपतज्ज्ञांना क्षेपणास्त्र निर्मितीची फारशी कल्पना नसते' हे स्पष्टपणे नमूद करून ठेवले आहे. अभ्यासकांच्या अंदाजाप्रमाणे ४०० अण्वस्त्रे बनवता येतील इतके पुनर्प्रक्रिया केलेले (reprocessed) प्लुटोनियम भारताकडे असून, सुमारे १२०० अण्वस्त्रे तयार करता येतील इतके प्लुटोनियम ऊर्जा प्रकल्पांतून लवकरच मिळू शकेल. काही संशोधकांच्या म्हणण्याप्रमाणे भारताच्या अणुचाचणी क्षमतेसाठी १९६५ सालापासूनच संशोधनाला सुरुवात झाली आहे. १९६८ साली प्रकाशित झालेल्या आपल्या 'India's Nuclear Dilemma' या पुस्तकात १९७० नंतर भारत दरवर्षी एक अणुबॉम्ब बनवू शकेल असे मिरचंदान यांनी लिहून ठेवले आहे. डेविड अल्ब्राइट (David Albright) आणि टिम झामोरा (Tim Zamora) या बुलेटिन ऑफ द ॲटोमिक सायंटिस्टस् (Bulletin of the Atomic Scientists) च्या वार्ताहराने १९८९ मध्येच लिहून ठेवले आहे की, पाकिस्तानने जर का ॲटमबॉम्बची चाचणी केली तर २ महिन्यांत भारत हायड्रोजन बॉम्बची चाचणी करू शकेल इतकी भारताची तयारी आहे. गेल्या २० वर्षांमध्ये न्यू यॉर्क टाइम्स, वॉशिंग्टन पोस्ट आणि जेन्स डिफेन्स विक्लीच्या प्रकाशनांमधून भारतामध्ये विकसित होत असलेल्या अणुविज्ञानाबद्दल भरपूर लिहून आले आहे. यामुळेच 'पृथ्वी', 'अग्नी' हे भारताचे क्षेपणास्त्र कार्यक्रम बंद करण्याकरिता पाश्चात्त्य राष्ट्रांकडून अनेक वेळा दडपणेही आली आहेत. अण्वस्त्र प्रसारबंदीच्या संदर्भात असलेल्या अनेक जागतिक संघटना आणि करार हे प्रामुख्याने अण्वस्त्र क्षमता असलेल्या पाच राष्ट्रांची सोय बघणारे आहेत. भारत त्यांच्या व्यूहरचनेमध्ये फारसा सापडला गेला नाही आणि अशा करारांवर सह्या करायलाही भारताने नकारच दिला आहे. यामुळेही भारताने या पाश्चात्त्य महासत्तांचा रोष ओढवून घेतला आहे. चीन आणि पाकिस्तान यांसारखी अण्वस्त्र सज्ज राष्ट्रे शेजारी असताना भारतापुढे दुसरा पर्याय नाही. भारतातले काही राजकीय पुढारी हे वैयक्तिक

महत्त्वाकांक्षेला बळी पडून जागतिक शांततेचे चऱ्हाट आणि गुऱ्हाळ नेहमी लावत असतात.

संगणक क्षेत्रामध्ये निवासी आणि अनिवासी भारतीयांनी आज नेत्रदीपक प्रगती केली आहे. भारतामध्ये राजकीय आणि आर्थिक दिशा ही स्वातंत्र्यानंतर योग्यरीतीने मिळाली असती तर भारतही जगातील एक महासत्तावान देश झाला असता. सडलेल्या निर्लज्ज राजकीय यंत्रणेने हा देश आज दिवाळखोर आणि फुकटखाऊ बनवून ठेवला आहे. सत्तेची सर्व सूत्रे आपल्याकडे रहावीत म्हणून त्यांनी परवाना राज्य निर्माण केले. प्रत्येक क्षेत्रामध्ये नियंत्रणे आणली. महापालिकेपासून केंद्रापर्यंत नागरिकांवर करांचे प्रचंड ओझे लादले आणि यामुळेच या देशाचा नागरिक काही स्वतंत्र विचार करू शकेल किंवा विज्ञानामध्ये प्रगती दाखवू शकेल हा विश्‍वास पाश्‍चात्यांना वाटत नाही. या सर्व अडथळ्यांच्या शर्यतीवर मात करूनही भारतीय वैज्ञानिक आणि व्यापारी यांनी जी प्रगती केली आहे ती नेत्रदीपकच आहे. भारतीय वैज्ञानिक प्रगतीला कमी लेखण्याचा प्रयत्न पाश्‍चिमात्य राष्ट्रे नेहमीच करतात.

या बाबतीत प्रा. अब्दुल कलाम यांनी जे सांगितले ते बोलके आहे -

One aspect, which is interesting, is how, whenever India achieves something that is commendable, the developed countries tend to trace it to some knowhow, equipment or man power that was provided by the West. For instance, in July 1980, when we launched our first SLV and put Rohini satellite into orbit, India became one of four nations to have a satellite launch facility. But within a week, a news item originated from USA saying that I had a few months training at NASA and that is where I picked up the technology that was used for the lauch. This was supported by the rest of the Western press. In Germany they claimed that the wind tunnel test was carred out in their facilities, and so they had indirectly enabled the launch.

When we heard the news about the reactions of the Western scientists, technologists and the press the general response of my team of scientists and technologists at VSSC, Trivandrum was one of great amusement. We knew thousands of scientists, engineers and staff had worked on the project from the drawing board to the development stage and right through till the launch. The technology was completely indigenous. The SLV used proportional control for its first stage control systems with a sharing logic software. This was a first in the world.

Similarly, we had made other innovaitons in comparison to any lauch vehicle at that point of time.

As for the scout, the American satellite launch vehicle from which our technology was alleged to have been lifted, only the fifth launch of the scout had proven successful. In comparison, our second, third and fourth launches were all successful. This is a pointer to the technological strength of our nation.

Again, when I was involved in the Guided Missile Programme and we successfully launched the Prithivi missille several times, the western press including some of our own analysts insisted that we were using Russian technology. In fact, Prithivi had a distinctive design, using a particular gyro system with a uniquely configured software, which nobody in the world had tried( when the flight is in progress, the dfrift can be monitored through the onboard computer. It had other Innovations too the type of thrust termination is so innovatively configured that for a multiple payload, multiple ranges can be achieved. Today, Prithivi is comparable to any world class missile system, and probably is the best of its class in payload capability.

Let's come now to a third, very important milestone, namely Agni. We lauched Agni in 1989 and it was successful, we have so far done three lauches. Surprisingly, again, there were two claimants who wanted to take credit for the success. Germany said that their guided system which was used for scientific experiments in India had gone into the making of Agni. And the USA claimed again that my NASA training was responsible for Agni. Actually, In Agni, there were innovations made in the guidance technology.

We can manoeuver the payload and complete re-entry hypersonic flow simulated in the computational Fluid Dynamics in one of the best computers that we ourselves have designed. The re-entry structure, in fact, has used a specially designed material to withstand the 3500 degree $^{o}$C heat generated upon re-entering the atmostphere, it is really amusing theat the Americans think that it is only with their technology that India can succeed.

Recently two departments, DAE and the DRDO, working in an excellent partnership, tested several nuclear dvices in Pokhran. Three tests were carried out simuiltaneously, there were two more tests subsequently. We had excellent results, well reported universally by 125 seismic stations. This indicates that India had reached the stage of nuclear weaponisation. We were extremely happy with our achievement.

But the next day we found the western press alleging that Israeli technology had gone into the triggering system of nuclear device. There was also the familliar accusation that the scientists who had visited the USA had helped India achieve this breakthrough. This was puzzling because nobody in the world has used the type of triggering mechanism we have developed. Multiple innovations have gone into the nuclear technology and nuclear device testing area.

In all four of these cases, I was fourtunate to be continously involved directly or indirectly in various terms of ISRO, DAE and DRDO. I find myself asking why in spite of innovative and excellent design capabilities in India, an impression is created by the West that no one other than the developed nations can achieve such technological excellence. Just as there has been a racial element in human history, it would appear that this element is entering into the technological arena too. Developed nations feel that only they are capable of developing certain types of aerospace, missile and nuclear technology. But we should ignore this and go ahead with technological development.

(Courtesy Vision 2020).

**– सप्टेंबर १९९८**

❖❖❖

# धर्मप्रसार

पश्चिमेकडील युरोपियन राष्ट्रांमध्ये १६व्या शतकामध्ये वैज्ञानिक क्रांतीला सुरुवात झाली. युरोपमध्ये १५व्या शतकापर्यंत सृष्टिरचनेची कल्पना आणि सामाजिक संस्थांची बांधणी, प्रामुख्याने बायबल आणि ऑरिस्टॉटलच्या सिद्धांतावर आधारित होती. या संकल्पनांना पहिला धक्का १६व्या शतकात लागला. तो धक्का कोपर्निकस यांनी सृष्टिरचनेच्या बाबतीत आपल्या सूर्यकेंद्रित सिद्धांताने दिला. यामुळे पृथ्वी हा सृष्टीचा मध्यबिंदू नसून, सूर्याभोवती फिरणाऱ्या अनेक ग्रहांपैकी तो एक ग्रह आहे हे मांडले गेले. मानवाच्या आणि सृष्टीच्या निर्मितीबाबतीत बायबलने मांडलेल्या अनेक कल्पनांना धक्का बसला. यामुळेच कोपर्निकसच्या सिद्धांताला ख्रिस्तीधर्म मार्तंडांचा विरोध होणे साहजिक होते. १५४३ साली कोपर्निकसचे निधन झाले. पुढे इटालीमध्ये गॅलिलिओने आपल्या दुर्बिणीने आकाशाचे निरिक्षण करून कोपर्निकसच्या सिद्धांतांना पुष्टी दिली. गॅलिलिओला यामुळे धर्मबाह्य करण्यात आले. पुढे बेकन, देकार्त, न्यूटन यांनी या नवीन वैज्ञानिक प्रगतीमध्ये भर घालून युरोपमधील औद्योगिक क्रांतीचा पाया घातला.

सर्वच आघाड्यांवर युरोपमध्ये यावेळी बदल घडत होते. अनेक साहसी आणि धाडशी व्यक्तींनी युरोपबाहेरील अनेक देशांना भेटी द्यायला सुरुवात केली. वास्को-द-गामाचा भारताचा प्रवास, कोलंबसचा अमेरिकेचा शोध ही या साहसी वृत्तीची बोलकी उदाहरणे आहेत. युरोपीय विज्ञान आणि ख्रिस्ती धर्म यांचा जगभर जो प्रसार झाला त्याला आणखी एका घटकाचे फार मोठे सहाय्य झाले. तो घटक म्हणजे ख्रिस्ती धर्म प्रसारकांचा. जगाच्या जवळ जवळ सर्व कानाकोपऱ्यांमध्ये हे धर्मप्रसारक पोहोचले. आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका हे सर्व खंड त्यांनी पादाक्रांत केले. त्या काळात प्रवास आजच्यासारखा सोपा नव्हता. भारतामध्ये पोहोचायला कित्येक महिने लागायचे. शेकडोंनी असे धर्मप्रसारक वाटेतच प्रतिकूल परिस्थितीला बळी पडून गतप्राण झाल्याची नोंद आहे. एवढ्या मोठ्या दिव्यातून पार पडल्यावर सुद्धा नवीन देशातील हवामान, अन्न, भाषा आणि चालीरीती हे सर्वच त्यांना नवीन व प्रतिकूल असे. तरिही अत्यंत मेहनतीने, चिकाटीने ते धर्मप्रसारक आपले धर्मप्रसाराचे कार्य करीत राहिले. नवीन जगातील समाजाच्या चालीरीती, वेशभूषा, भाषा, धर्मविषयक संकल्पना या सर्वांचाच त्यांनी अभ्यास चालू केला. ही गोष्ट दिसते किंवा वाटते तेवढी सोपी नाही. या करिता प्रचंड त्याग, मेहनत आणि चिकाटीची आवश्यकता लागते. हे धर्मप्रसारक नुसतेच भाषा शिकले असे नाही, तर त्यांनी चिकित्सकतेने त्या त्या भाषांचा अभ्यास केला. पुढे तर त्यांनी त्या त्या भाषांचे व्याकरण लिहिले. मराठी, कानडी, बंगाली, कोकणी आणि तमीळ या सर्व भाषांची पहिली व्याकरणं ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी लिहिली आहेत. भाषेबरोबरच चालीरीती, धर्मसंकल्पना यांचाही त्यांनी प्रचंड अभ्यास केला. अनेक संस्कृत ग्रंथ आणि साहित्य हे आज आपल्याला या धर्मप्रसारकांनी जपून ठेवले म्हणून उपलब्ध आहेत. संस्कृत भाषेचा तर त्यांनी केलेला अभ्यास आपल्या सर्वांना ठाऊकच आहे.

याचाच परिणाम म्हणून आपल्या भाषेपासून तत्त्वज्ञानातील गहन सिद्धांर्यंत सर्वच गोष्टींचा अभ्यास आज आपल्याला त्यांनी लिहून ठेवलेल्या साधनसामग्रीतून करावा लागतो.

यामुळे समाजामध्ये या धर्मप्रसारकांची अभ्यासू, मानवतावादी आणि मवाळ अशी प्रतिमा निर्माण झाली. या धर्मप्रसारकांना दुसऱ्यांच्या धर्मातील, चालीरीतीं मधील वैगुण्ये शोधण्यास त्यांच्या या अभ्यासाचा चांगलाच उपयोग झाला. याचा चांगलाच वापर हा धर्मपरिवर्तनाकरिता करण्यात आल्याची साक्ष इतिहास देतो.

लोकांचे अज्ञान, गरीबी याचा फायदा घेऊन पुढे या देशामध्ये मोठ्या प्रमाणावर धर्मपरिवर्तन करण्यात आले. अनेक क्रूर आणि असंस्कृत मार्ग या धर्मप्रसारकांनी वापरले. तरीही आज जनमानसामध्ये त्यांची प्रतिमा ही अभ्यासक म्हणूनच जीवंत आहे. धर्मप्रसारामधील एक मोठे युद्ध त्यांनी आपल्या या नीतीने जिंकले आहे. यांनी पैसा, प्रसारमाध्यमे आणि नियोजन यांचा अतिशय चांगला वापर करवून घेतला. धर्माच्या नावाखाली इतका मोठा 'अधर्म' शिताफीने वापरल्याची जगात कमी उदाहरणे आहेत.

फादर हेन्‌रिच रॉथ (Father Heinrich Roth 1620-1668) हा असाच एक धर्मप्रसारक. त्याचा जन्म डिलिंगन (Dillingen) येथे १८ डिसेंबर १६२० मध्ये झाला. त्याच्या वडिलांचा वकिलीचा व्यवसाय होता. डिलिंगनला १५५४ साली विद्यापीठ स्थापन झाले. कला, विज्ञान, साहित्य या सगळ्या विषयांचा अभ्यास तेथे होत असे. रॉथही याच विद्यापीठात शिकला. रॉथचा पिंडच सुरुवातीपासून वेगळा होता. त्यावेळी तेथे युद्ध नुकतेच संपुष्टात आले होते. लढाई आणि लष्कराचा रॉथला उबग आला होता. सुरुवातीला त्याला जरी स्विडनच्या सेनेमध्ये सामील व्हायला लागले तरी तेथून तो पळाला आणि इन्सब्रुकला स्थाईक झाला. तिथेच धर्मप्रसाराच्या कार्याकडे तो आकर्षित झाला. १६३९ साली तो जेझुईट पंथामध्ये सामील झाला. सुमारे १० वर्षांनंतर त्याला धर्मगुरुपद बहाल करण्यात आले आणि त्याने धर्मप्रसाराकरिता बाहेर पडण्याचा निश्चय केला. १६५० मध्ये आपल्या एका सहकाऱ्याबरोबर रॉथ ईथियोपियाला गेला. तेथे पोहोचल्यावर त्यांच्या लक्षात आले की, ईथियोपियामध्ये ख्रिस्तिधर्मप्रसारावर त्यावेळी बंदी होती. त्यामुळे रॉथने गोव्याला प्रयाण केले व १६५२ मध्ये गोव्याला पोहोचला. गोव्याला आल्या आल्या त्यानी तेथील भाषा आत्मसात करायला सुरुवात केली. त्यावेळी आग्र्याला जेजुईट पंथाचे एक शिक्षण केंद्र होते. रॉथ गोव्याहून आग्र्याला आला व त्या केंद्राचा प्रमुख बनला. आग्र्याच्या दरबारात त्याची डॉक्टर म्हणूनही नेमणूक झाली. आग्र्यालाच रॉथ पंडितांकडे संस्कृत शिकू लागला आणि लवकरच त्याने ती भाषा चांगल्याप्रकारे आत्मसात केली. रॉथ हा पहिला युरोपियन की ज्यानी संस्कृतवर प्रभुत्व मिळवले. संस्कृत सारखी प्रगत भाषा युरोपमधील पंडितांना समजावी म्हणून त्याने चक्क संस्कृतचे व्याकरण लिहायला सुरुवात केली आणि लवकरच त्याने पाणिनियन सूत्रांवर आधारित संस्कृतचे लॅटिनमध्ये व्याकरण लिहिले. अर्थातच तो संस्कृतचे युरोपियन भाषेमध्ये व्याकरण लिहिणारा पहिला युरोपियन ठरला. संस्कृत भाषा

अवगत झाल्यावर त्याने हिंदू तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाला सुरुवात केली. 'वेदांत सार' आणि वेणीदत्ताच्या 'पंचतत्त्व-प्रकाश' या ग्रंथांचेही त्याने हस्तलिखित तयार केले. १६६२ मध्ये आणखी दोन जेजुईस्ट धर्मप्रसारक चीनहून तिबेटमार्गे आग्र्याला पोहोचले. यातला एक धर्मप्रसारक प्रवासामुळे एवढा थकला की त्याचे आग्र्यालाच निधन झाले. दुसरा धर्मप्रसारक म्हणजे प्रसिद्ध अभ्यासक ग्रुबर (Grueber) हा होय. ग्रुबारने तिबेटवरती फार मोठे संशोधन करून ठेवले आहे. त्या काळात ग्रुबेरनी धर्मप्रसारासाठी ४०,००० किलोमीटरचा पायी प्रवास केला होता. ग्रुबर आणि रॉथ दोघेही आग्र्याहून पुन्हा रोमला आले. त्यांच्या प्रवासास सुमारे एक वर्ष लागले. पुन्हा दोघांनाही रोममधून धर्मप्रसाराकरिता भारतात पाठविण्यात आले. रॉथ १६६६ मध्ये आग्र्याला परत पोहोचला आणि दोन वर्षांनी तिथेच त्याचे निधन झाले. रॉथच्या संस्कृतच्या व्याकरणाचे युरोपमध्ये चांगले स्वागत झाले आणि अनेक अभ्यासकांनी ते प्रकाशित व्हावे अशी इच्छा व्यक्त केली. पण त्यावेळी ते प्रकाशित होऊ शकले नाही.नंतर सुमारे २०० वर्षे हे हस्तलिखित कुठे आहे याची माहितीच नव्हती. १९६० नंतर पाश्चात्त्य अभ्यासकांनी पुन्हा एकदा याचा शोध घ्यायला सुरुवात केली. अर्नल्फ कॅम्प्स (Arnulf Camps) या डच संशोधकाला १९६७ साली रोम येथील पोपच्या ग्रंथालयामध्ये ते सापडले. या अभ्यासकालाही त्याचे प्रकाशन करायला २० वर्षे थांबायला लागले. आणि १९८८ साली हॉलंड मधल्या इ.जे.ब्रिल (E.J. Brill) या कंपनीने ते इंग्रजीमध्ये प्रकाशित केले.

आजची आपली परिस्थिती पाहता आपण इतिहासापासून कोणतेच धडे घ्यायला तयार नाही असे दिसते. ख्रिस्ती धर्माच्या प्रसारावरून एक गोष्ट लक्षात येते की, धर्माचा प्रसार धर्मग्रंथ वाचून कधीच होत नसतो. पराकोटीचा त्याग, साहस, चिकाटी, निरीक्षण शक्ती हे गुण जर का धर्मप्रसारकांमध्ये नसतील तर तो कधीच यशस्वी होऊ शकत नाही. ख्रिस्ती धर्मप्रसारकांपासून हा धडा ज्या दिवशी आपण घेऊ तेव्हांच आपल्यामध्ये रॉथ आणि मॅक्सम्यूलर निर्माण होतील!

**– नोव्हेंबर १९९८**

❖❖❖

# संत साहित्यातील ज्ञानद्वीप

इ.स. २००८ हे वर्ष समर्थ रामदासांच्या जन्माचे चारशेवे वर्ष आहे. सतराव्या शतकामध्ये महाराष्ट्रात एकाचवेळी तीन चमत्कार नांदले. हे तीन चमत्कार म्हणजे शिवाजी महाराज, संत तुकाराम महाराज आणि स्वामी समर्थ रामदास हे होत.

सतराव्या शतकातील भारतीय समाज विलक्षण विस्कळीत होता. 'मतांमतांचा गलबला, कोणी ना पुसे कोणाला।' अशी अवस्था होती. आसेतुहिमाचल प्रवास करून समर्थांना समाजाचे जे दर्शन झाले त्या पार्श्वभूमीवर त्यांचे साहित्य समजावून घेतले तर त्यांचे वेगळेपण लक्षात येते. त्यांचे विचार काळाच्या पुढे धावणारे होते. म्हणूनच आज जे जे विषय मोठ्या प्रमाणात अभ्यासले जातात त्यांचे बीजरूप चिंतन हे समर्थांच्या साहित्यात आढळते.

समर्थांची शैली परखड, विचारप्रवृत्त आणि अंतर्मुख करणारी आहे. त्यांचे समाजावरील प्रेम ही 'आतून' आलेली भावना आहे. म्हणूनच ते समाज संघटनेचे विचार व्यक्त करतात ते अनुभवांच्या अधिष्ठानावर. प्रयत्न श्रेष्ठ की प्रारब्ध श्रेष्ठ या विषयावर

त्यांनी पूर्ण ओवी-शतक लिहिले; आणि 'प्रारब्ध ही आळशी माणसांची तोंड लपवण्याची जागा आहे' हे खणखणीतपणे सांगितले. एकदा असे तोंड लपविण्याची सवय लागली की आत्मपरीक्षण करणे माणूस टाळतो.

**अचूक यत्न करवेना। म्हणौनि केले ते सजेना**
**आपुला अवगुण जाणवेना। काही केल्या**

नियोजनपूर्वक कष्ट करणारा कधी अयशस्वी होत नाही, असे सांगताना समर्थ म्हणतात -

**'आधी कष्ट, मग फळ। कष्टचि नाही ते निर्फळ'**

समर्थांचे साहित्य ही अशी समर्थ संजीवनी आहे, कारण ते कर्मातून व्यक्त झाले आहे. विज्ञानात ज्याप्रमाणे प्रयोगशील मन असावे लागते त्याप्रमाणे कर्म करताना, धर्म विचारांचा पुरस्कार करणाऱ्या समर्थांच्या साहित्यात विवेक, वैराग्य, प्रयत्न, प्रत्यय आणि प्रबोध या पाच तत्त्वांचे अधिष्ठान आहे.

समर्थांनी ज्या विषयांवर चिंतन करून लेखन केले त्यांची यादी फार प्रदीर्घ आहे. मानसशास्त्र, व्यवस्थापन शास्त्र, देहबोली विज्ञान इ. अनेक आधुनिक मानण्यात येणाऱ्या विषयांबाबतचे मूलभूत चिंतन समर्थांनी केले होते. त्यांचे वैशिष्ट्य असे की, हे चिंतन त्यांच्याबरोबर संपले नाही; तर शब्दांच्या रूपात ते पुढीलांसाठी 'अक्षर' झाले. समर्थांचा अंतसमय आला, शिष्य शोकमग्न झाले; तेव्हा समर्थांनी सांगितले,-

**'माझी वाचा आणि वाणी**
**गेली म्हणाल अंतःकरणी**
**परी मी आहे जगत्‌जीवनी। निरंतर।।**

**आत्माराम दासबोध**
**माझे स्वरूप स्वतःसिद्ध**
**असता न करावा खेद। भक्तजनी'।।**

अशा आत्मविश्वासपूर्वक शब्दांत त्यांनी निरवानिरव केली.

समाजावर असणाऱ्या प्रेमापोटी त्यांनी हा साहित्य प्रपंच थाटला. अनेक मोठमोठी विद्वान माणसे आपले विचार शब्दांत लिहून ठेवत नाहीत, ते त्यांच्याबरोबर

संपतात. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी या अप्रकट विचारांना 'पराधीन सरस्वती' म्हटले होते. सरस्वती हे शब्दांचे मूळ आहे. सर्व ज्ञान हे शब्दांतून व्यक्त केले जाते व हे चिंतन व्यक्त झाले तरच समाजाला त्याचा उपयोग आहे हे रामदासांनी जाणले होते. या विचारांत समाज संघटनेच्या शक्यता आहेत हे त्यांना ठाऊक होते. निद्रिस्त समाजासाठी गुळगुळीत भाषा उपयोगाची नाही हेही त्यांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांच्या शब्दांना संजीवनी प्राप्त असे तेज लाभले.

'**सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जे करील तयाचे**' असे ते स्पष्टपणे सांगतात. 'आनंदभुवन' निर्माण करण्याची प्रेरणा ते शिवाजी महाराजांना देतात. त्यासाठी त्यांनी ५९ तेजस्वी ओव्या लिहिल्या.

समाज संघटन हे ध्येय असल्यानेच समर्थांनी मठ आणि मंदिरांचे कालसुसंगत माध्यम वापरले. त्यांच्या चारशेव्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांचे अनेक बाबतींतील वेगळेपण लक्षात घेतले जावयास हवे. कारण संत साहित्याच्या सागरातले हे बेट 'ज्ञानाचे बेट' होते!

**– एप्रिल २००८**

❖❖❖

# क्रियेवीण वाचाळ माणसे

आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक महत्त्व देऊन विषय मोठे करायचे आणि असे अवास्तव महत्त्व देत असताना मात्र महत्त्वाचे ठरतील, अग्रक्रमाने हाताळणे गरजेचे ठरतील असे विषय नजरेआड करायचे, उद्यावर ढकलत राहायचे हा खेळ आपल्या येथे अव्याहतपणे चालू आहे. या खेळाचे एक चांगले (!) फलित म्हणजे लोक नेहमी गोंधळलेले राहतात हे असते. हे फलित तापल्या तव्यावर पोळी भाजू पाहणारे जे लोक असतात त्यांना हवे असते! असे खेळिये अनेक मुखवटे घेऊन समाजात मिरवत असतात. दिल्ली मधले असोत की गल्लीमधले नेते, अशी तथाकथित राजकीय मंडळी, माध्यमातली माणसे, तर कधी चित्रपटवाले, खेळवाले असे अनेकजण हे समाजाची प्रगती (आणि गती देखील) रोखून ठेवत असतात.

यामुळे जीवनातले कोणतेही क्षेत्र घेतले तरी आम्ही पिछाडीवरच राहतो. देश म्हणून विकसित न होता विकसनशीलच राहतो; आणि यातच धन्यता मानतो. वर्तमान पत्र उघडून कोणतीही बातमी बघा; त्या केवळ वल्गना, घोषणा, आश्वासने किंवा पोकळ

गप्पांनी भरलेल्या असतात. विषय कोणताही असो, अगदी मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र असो की विमानतळ असो, महागाईची झळ असो की राजकीय नेत्यांना ठोठावण्यात आलेले दंड असो... वर्षानुवर्षे केवळ चर्चेची गुऱ्हाळे चालू राहतात. सर्व विषयांवर धोरण एकच, ''आज करे सो कल करे...'' कृती करायची वेळ आली की 'मांजराच्या गळ्यात' या गोष्टीसारखी गत होणारेच जास्त. त्यामुळे निर्णयच घेतले जात नाहीत, घेतले गेलेच तर फायलींचे ढीग बनतात, कार्यवाही होत नाही. कागदोपत्री व्यवहार जास्त!

एक साधी बाब आहे, शिक्षण संस्थांना स्वायत्तता! पण किती वर्षे फक्त विचारच चालू आहेत. ज्या महाराष्ट्रात चांगल्या शिक्षण संस्थांची परंपरा आहे, तेथील संस्थांना स्वायतत्ता दिली तर शिक्षणाची प्रगती होईल. पण, असे झाले तर संबंधितांचे काय? त्यामुळे सर्व लहानमोठ्या प्रशासकीय अडचणींवर मात करत जी स्वायतत्ता देता येऊ शकते तो विषय 'भिजत' ठेवायचा ही मानसिकता!

या सर्व प्रक्रियेमध्ये आजच्या पिढ्यांचे होणारे नुकसान ही बाब आज लक्षात येणारी नाही. पाच-पन्नास वर्षांनी झालेले नुकसान किती अपरिमित आहे ते कळेल तेव्हा पायाखालची जमीन सरकेल. पण, जगातला कोणताही श्रीमंत माणूस वा पैसा हा, 'गेलेला काळ विकत घेऊ शकत नाही' हे लक्षात येत असेल तर आज पायावर दगड मारून घेण्यापेक्षा क्रियाप्रवृत्त झाला तर देश फार पुढे जाईल.

थोडक्यात; समाजकारण असो, पर्यावरण असो की शिक्षण;- क्रियेवीण वाचळता हे आजच्या आपल्या जीवनाचे व्यवच्छेदक लक्षण बनत आहे. कोणीही कृती करायला धजत नाही, आणि धजलाच तर त्याची कृती भ्रष्टाचाराची जनक बनते किंवा ती तशीच बनेल याची 'काळजी' घेतली जाते! अशा खोट्या भ्रष्टाचाराला, त्याच्या खोट्या प्रकाराला नाहक बळी पडणाऱ्या संस्था, माणसे पावलोपावली भेटतात.

यासाठीच आजच्या समाजकारणाच्या आणि इतर क्षेत्रांच्याही सर्व दिशा, त्यांचे सर्व कोन बारकाईने तपासायला हवेत. पर्यावरणाबद्दल इतके भरमसाट बोलले जाताना दिसते, पण मात्र राजरोसपणे पैशाची ताकद वापरून जमिनी 'बिगर शेती' असल्याचे दाखवले जाते, काही शे वर्षे जुनी झाडे तोडली जातात आणि ''कार्यवाही करण्यात येणार असल्याचे...'' संबंधित फक्त बोलत राहतात. नुसतेच कागदी घोडे नाचवले की प्रशासन चालते असे समजणारे लोक सत्तेवर बसतात. शुभचिंतनाला

मग भिंतीवर टांगल्या जाणाऱ्या मृतप्राय सुविचारांचे स्वरूप प्राप्त होते. कोणत्याही शासकीय कार्यालयाच्या भिंती सुशोभित करण्यासाठी हे सुविचार वापरले जातात. कागदी घोड्यांच्या शर्यतीची अशी मैदाने महत्त्वाची की देशाच्या विकासातील गती?...

दक्षिणेकडील एका शाळेत आग लागल्याची व त्यात अनेक छोटी मुले आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याची घटना व त्या घटनेच्या बातम्या आम्हाला आठवतात. या दुर्घटनेनंतर महाराष्ट्रात सर्व शिक्षणसंस्थांमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा बसवण्यात येणार असल्याचे संबंधित खात्यांकडून सांगितले गेले. प्रत्यक्षात केवळ कागदी घोडे नाचवले गेले. निविदा मागवल्या जातात, रकमा मंजूर होतात, पण शिक्षणसंस्थांच्या क्षितिजावर सुधारणांचे सूर्य उगवतच नाहीत. हे एक उदाहरण आहे. शिक्षण ही शासनाची जबाबदारी असेल तर आगप्रतिबंधक यंत्रणा दूरच, किमान प्राथमिक सोयींची उपलब्धता तरी हवी! बोलले जाणे आणि कृती होणे यात प्रचंड अंतर आहे.

आजचा सूर्य मावळला की वर्तमानपत्रांची रद्दी होते. त्या रद्दीतच सर्व वक्तव्ये विरून जातात. राष्ट्र चालायचे तर ते दोषारोप करून, बोटे दाखवून चालत नाही. त्यासाठी सर्व इच्छाशक्तीनिशी काम करणारी माणसे लागतात. ही माणसे शंभर टक्के समर्पित आणि निःस्वार्थी असावी लागतात हे नव्याने सांगण्याची गरज आहे असे नाही. अशी माणसे मिळणे/असणे हे अजूनही स्वप्नच असावे हा दैव-दुर्विलास आहे. स्वातंत्र्य याचा अर्थ जबाबदारी असा असतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील पिढीला तो माहीत होता. ती पिढी अमरपट्टा घेऊन आलेली नव्हती; तशी कोणतीच पिढी नसते. पण आज ती पिढी असती तर स्वातंत्र्याचा अर्थ माहीत असणारी, काम करणारी माणसे दिसली असती. बोटावर मोजले जाणारे अपवाद हे अपवादच असतात. त्यामुळे 'क्रियेवीण वाचाळता' टाळायची असेल तर आपण जागे व्हायला हवे आहे!

**– मे २००८**

❖❖❖

# ‘महासत्ता’ नावाचे मृगजळ

गेली काही वर्षे ज्यांना समजते अशी माणसे व समजत नाही अशी माणसे देखील वारंवार ‘भारत हा महासत्ता बनणार आहे, महासत्ता होऊ पहात आहे’ याचा जप करत आहेत. ही माणसे या विषयावर सतत बोलतात, लिहितात. आकडेवारीच्या फसव्या गणितांमध्ये अडकून ही माणसे आपलेच म्हणणे कसे बरोबर आहे हे आपल्या अकलेनुसार (!) सिद्ध करत असतात. आपला देश महासत्ता बनलाच तर ते कोणाही देशप्रेम असणाऱ्या माणसाला आवडेलच. पण आज जे वास्तव देश जगतो आहे त्या वास्तवाच्या संदर्भात विचार करताना, हे शक्य आहे का, असा प्रश्न तर्कसंगत विचार करू शकण्याची क्षमता असलेल्या सूज्ञ माणसास पडेल. वास्तवाचे भान ठेवून भविष्याबद्दल विचार केला तर ‘भारत महासत्ता बनेल’ असे म्हणणे केवळ भाबडे स्वप्नरंजनच ठरेल हे स्पष्ट जाणवते.

अतिशय सवंग अशा लोकप्रियतेच्या हव्यासापायी, अनिर्बंध सत्तेची लालसा मनामध्ये बाळगत नेतृत्व करणारे नेते जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये आज पदोपदी भेटत आहेत. या दुर्बळ नेतृत्वाची जी

ठळक वैशिष्ट्ये आहेत त्यात स्वार्थपरायण संधीसाधू वृत्ती, स्वतःच्या लौकिकासाठी अनुनय करण्याची लाचारी आणि मुख्य म्हणजे देशभावनेचा सर्वस्वी अभाव या बाबींचा समावेश होतो. धार्मिक क्षेत्र बघा, सांस्कृतिक किंवा सामाजिक क्षेत्र बघा की राजकीय क्षेत्र बघा; असे दिशाहीन, विचारक्षमतेचा, अस्मितेचा अभाव असणारे नेतृत्व आपल्याला आढळल्याशिवाय राहात नाही. असे शबलित, दुर्बल नेतृत्व देशाला महासत्ता बनवेल असे म्हणणे म्हणजे 'सशाला शिंगे फुटणार आहेत' असे म्हणण्यासारखेच आहे! याउलट संवेदनक्षम वैचारिक कुवत धडधाकट आहे अशा कोणाही नागरिकाला देश दिवाळेखोरीच्या उंबरठ्याकडे चालला आहे किंवा काय असे वाटावे इतके भयाण वास्तव आहे.

खऱ्या अर्थाने ज्या देशांना आपण महासत्ता म्हणतो त्या देशांमध्ये स्वतःला महासत्ता म्हणवून घेण्याची क्षमता कशी निर्माण झाली, हे सामर्थ्य त्यांच्यात कसे आले, याचा आपण गांभीर्याने विचार करायला हवा. असा विचार केला तर, आपल्या देशातील दिवाळखोर नेतृत्वाकडून देश महासत्ता बनेल या अपेक्षेतील फोलपणा जाणवेल. जे देश महासत्ता बनले त्यांच्यात देशाला ग्रासणाऱ्या मूलभूत समस्यांना भिडण्याची सामूहिक ताकद प्रचंड होती व आहे. देश म्हणून स्वतःच्या अस्तित्वाचे असणारे प्रखर आत्मभान, प्रचंड मेहनत आणि स्वयंशिस्त अशा काही गुणांच्या जोरावर ते देश महासत्ता बनले आहेत. या देशांच्या परंपरा, यांचे इतिहास आपल्या देशाइतके उज्ज्वल नसतीलही; पण वर्तमानकाळामध्ये आज आपला देश आहे त्यापेक्षा तो चांगला, मोठा बनवण्याची त्यांच्यातील सामान्य नागरिकांमधील ऊर्मी अनन्यसाधारण आहे. 'देशाने माझ्यासाठी काय केले?' असे न विचारता या देशांतला नागरिक 'देशासाठी मी काय करतो' याबाबत विलक्षण जागरूक आहे. म्हणून हे देश महासत्ता बनू शकले.

'मुंबईचे शांघाय करू' अशा केवळ घोषणा देऊन; चिनी माणसामध्ये जशी असते तशी देश भावनेची वृत्ती निर्माण करता येत नाही. टाळ्या मिळवणाऱ्या अशा पोकळ नेतृत्वाला हे कदापि जमणारे नाही. कधीही, कोणत्याही क्षणी देश विकतील आणि पळून जातील असे हे नेते देशाला महासत्ता बनवतील असे कशाच्या जोरावर म्हणायचे? आजचे चित्र इतके विचित्र, व्यथित करणारे आहे की; महासत्ता बनणे दूरच, देश एकसंध राहिला तरी खूप, असे वाटावे. जातींची राजकारणे इतकी प्रचंड आहेत की, जातींच्या भिंती अधिकच भक्कम बनत चालल्या आहेत. प्रत्येक राज्यात, प्रांतात, प्रादेशिक अ-समतोलाची भावना धगधगताना दिसते आहे. या

प्रादेशिक अ-समतोलाच्या भावनेत ऐक्याची कसोटी लागण्याची वेळ आली आहे. 'विविधतेतून एकता' हे बोलायला छान आहे. कितीही योजना आखल्या, कितीही पैसे खर्च केले तरी समस्यांचे हिमालय उंचच उंच होत चालले आहेत, समस्यांचे मळभ वाढत चालले आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे असे आपण अजूनतरी म्हणतो. या कृषक समाजाने ऐक्य वेगळ्या पद्धतीने जपले होते, संस्कृती निर्माण केली होती, लोकजीवनाचा प्रवाह जिवंत ठेवला होता. आज या कृषक समाजाच्या पायाखालची जमीन सरकली आहे, दोरखंडाचे फास या कृषी संस्कृतीला लागले आहेत!

इतक्या टोकाच्या नकारात्मक चित्राला आपल्यापरीने आशेची चौकट बसवू पाहणारे मूठभर लोक नेहमी असतात, तसे ते आमच्या समाजातही आहेत. अशी माणसे, त्यांचे प्रयत्न ही वाळवंटातील हिरवळ असते. या मूठभरांनी जर नेतृत्वावर ताबा मिळवला, त्यांची गर्दी जर वाढली, तरच महासत्तेचे स्वप्न सत्यात उतरेल. अन्यथा, आपल्या लोकांना नशेत ठेवण्यासाठी व आपली पोळी भाजण्यासाठी चाणाक्ष नेतृत्व महासत्तेचा जप करीत राहील, त्याला काही अर्थ नाही.

**– जून २००८**

❖❖❖

# मानवी जनावर

मानव आणि इतर सजीव प्राणी यांच्या शरीररचना, पेशीरचना आणि कार्य यांच्यामध्ये गुणात्मकरीत्या काहीही बदल नाही हे विज्ञानाने नुकतेच सिद्ध केले. सजीवांमध्ये मानव आणि वानर सदृश प्राण्यांच्या जैव नकाशामध्ये ९८ ते ९९% साधर्म्य आहे. फरक इतका नगण्य आहे की, त्यामुळे मनुष्य हा कुठल्याच कसोटीवर वेगळा 'प्राणी' होऊ शकत नाही. अनेक मानवी भावना म्हणजे राग, लोभ, मत्सर यांचे अस्तित्वही इतर सजीव प्राण्यांमध्ये दिसून येते. थोडक्यात म्हणजे; 'जनावरे' आणि 'माणूस' यामध्ये पेशीकार्याच्या दृष्टीने काहीही फरक नाही. डार्विनच्या उत्क्रांतिवादामुळे वैज्ञानिकांना याची उकल करणे शक्य झाले.

पाश्चात्त्य जडवादाची मुळे ही प्रामुख्याने ख्रिस्तीधर्मामध्ये मानवाला दिलेल्या श्रेष्ठत्वाच्या स्थानामध्ये आहे. सर्व सजीव आणि निर्जीव सृष्टीचा उपभोग घेण्याचा अमर्याद अधिकार या संकल्पनेमुळे मानवाला मिळाला. म्हणूनच ख्रिस्ती धर्माचा विरोध हा डार्विनचा सिद्धांत आणि सजीवांच्या समानतेला

आहे. हिंदूसमाजाच्या सृष्टिनिर्मितीच्या संकल्पना या संपूर्णत: भिन्न आहेत. सजीव आणि निर्जीवांमध्ये तो समान दैवी अंश पहातो. आणि त्याच्या या भूमिकेमुळे निसर्गाच्या उपभोगाच्या बाबतीतही त्याच्या संकल्पना या पाश्चात्त्यांपेक्षा संपूर्णपणे भिन्न आहेत. पर्यावरणाच्या आजच्या ऱ्हासाला पाश्चात्त्यांची उपभोग आणि जडवादी वृत्ती कारणीभूत असल्याचे आज सर्वमान्य आहे. आणि यामध्ये बदल घडवायचा असेल तर आपल्या 'जीवनशैली'मध्ये बदल करायला हवा हेही आता सर्वमान्य झाले आहे.

'जीवनशैली'चा हा मुद्दा पर्यावरणापुरताच मर्यादित नसून; मानवी-अधिकार, स्त्री - पुरुष समानता, तंत्रज्ञानाचा विकास ते धर्म आणि विज्ञान या सगळ्यांना तो छेदून जातो. जीवनशैली म्हणजे दुसरं काहीही नसून आपण आपल्या वागण्याच्या पद्धती ज्या सिद्धान्तावर विकसित करतो त्याचा तो बाह्याविष्कार असतो. 'मानव हा श्रेष्ठ' हा सिद्धान्त मान्य केला की इतर सर्व प्राणिमात्र व निर्जीव वस्तुंना दुय्यम स्थान तर मिळतेच आणि यांच्या अनियंत्रित उपभोगाला मान्यताही मिळते. यांतून जे असंतुलन निर्माण होते ते सर्वच सृष्टीला विनाशाकडे नेते. म्हणजे अनियंत्रित, स्वैराचारी, आत्मकेंद्रित विचार आणि त्यावर आधारलेली जीवनशैली 'संतुलित' समाज निर्माण करू शकत नाही.

मानवाची 'जनावरां'पासून असलेली भिन्नता येथेच सुरू होते. शरीररचना आणि पेशीमध्ये जरी साम्य असले, तरी मनुष्य आपल्या सहज भावना किंवा प्रेरणांवरती नियंत्रण आणू शकतो, त्यांचा विकास करू शकतो. उत्क्रांतिवाद हा शरीररचना आणि पेशींच्या विकासाच्या क्रमाचा आलेख देतो, पण मानवाच्या भावना किंवा वैचारिक विकासक्षमतेची तो उकल करू शकत नाही. सर्वच सजीवांना भूक असते. बहुतेक सजीव भूक भागल्यावर जास्त खात नाहीत. मनुष्य मात्र पोट भरल्यावरही खाऊ शकतो हा भाग जरी वगळला तरी ते न खाण्याचा किंवा उपाशी रहाण्याचा निर्णय हाही मनुष्यच घेऊ शकतो. म्हणून शाकाहार ही संकल्पना उत्क्रांत समाजाचे लक्षण आहे.

लैंगिक प्रेरणा या कमीअधिक प्रमाणात सर्व सजीवांच्या सारख्याच असतात. पण त्यावर नियंत्रण आणि त्यांना दिशा देण्याचे काम फक्त मनुष्यच करू शकतो. त्यातूनच त्याची 'जीवनशैली' विकसित होते. म्हणजे स्वैराचारी प्रवृत्ती ही नैसर्गिक प्रेरणांच्या अनियंत्रित उपभोगाचा भाग झाली; तर ब्रह्मचर्य

हे या नैसर्गिक प्रेरणांवर मानवाने हेतुपुरस्सर किंवा स्वेच्छेने स्वीकारलेले नियंत्रण झाले.

व्यक्ती, तसेच व्यापक समूहाचे हित/ अहित लक्षात घेऊन समाजाला जी मार्गदर्शक सूत्रे दिली जातात त्यांनाच आपण 'धर्म' म्हणतो. या व्यवस्थेत 'जबाबदार' स्वातंत्र्य आणि 'नियंत्रण' निषिद्ध नसतात. शिवाय यामध्ये एका मानवी आयुष्याचा विचार न करता मोठ्या कालखंडातील अनुभवांच्या संचिताचा विचार केलेला असतो. एखादी व्यक्ती अनियंत्रित वागली तर फारसा फरक पडत नाही. पण संपूर्ण समाजच जर आत्मकेंद्रित होऊन स्वैराचारी झाला तर गोंधळ निर्माण होतो. समाज विनाशाकडे जातो. आपल्या दैनंदिन जीवनामध्येही अपघात होऊ नयेत म्हणून सोईकरता एकेरी वाहतूक आपण स्वीकारतो. त्या व्यवस्थेचा काहीजणांना तोटा होत असला तरी अशी नियंत्रणं ही घालावी लागतातच.

सामाजिक संस्थांची निर्मिती हे सुद्धा 'मानवा'चेच खास वैशिष्ट्य आहे. 'लग्न' ही संस्थासुद्धा मानवनिर्मितच आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या अतिरेकाचा एक भाग म्हणून पाश्चात्त्य देशांमध्ये लग्न ही संस्था मोडीत काढण्यात आली. कुमारी मातांचे प्रमाण बेसुमार वाढले. व्यक्तिस्वातंत्र्याच्या भ्रामक संकल्पनेपोटी बाटलीतून बाहेर काढलेला हा राक्षस पुन्हा बाटलीत घालणे आता शक्य दिसत नाही. भारतामधेही डावे, पुरोगामी व कुडमुडे सुधारक यांच्या प्रयत्नांना यश येऊन लग्न संस्था मोडीत निघण्याच्या मार्गावर आहे. 'हिंदू' धर्मामध्ये लग्न हा एक संस्कार आहे, सध्या कायद्याने तो करार आहे. घटस्फोटांच्या आजच्या वाढत्या प्रमाणावर उच्चतम कोर्टाच्या न्यायाधीशांनी केलेली टिप्पणी म्हणूनच महत्त्वाची आहे. (आजचा हिंदू लग्नासंबंधीचा कायदा हा घटस्फोट सुलभ करीत आहे.)

माणूस आणि इतर सजीव प्राण्यांमध्ये फरक आहे तो फक्त विवेकक्षमतेचा. ही विवेकक्षमताच माणसाला जबाबदारीची जाणीव देते. अशा जाणिवेतूनच तो संस्कृती निर्माण करतो. परंतु अशा जाणिवा जेव्हा ढिसूळ होतात, संवेदना जेव्हा बधिर होतात, तेव्हा 'विकृती' निर्माण होते. आई - वडील आपल्या मुलांचे पालनपोषण जबाबदारीच्या जाणिवेतून करतात. पुढे हीच मुले आपल्या आईवडिलांचे पालन पोषण करतात तेही एका जबाबदारीच्या जाणिवेतूनच. अशा जबाबदाऱ्या म्हणजे त्याग नाही आणि म्हणूनच अशा समाजाला पाळणाघर किंवा वृद्धाश्रमांची गरज लागत नाही. या जबाबदाऱ्या जेव्हा अदृश्य होतात

किंवा त्यांचे व्यापारी मूल्यमापन व्हायला लागते तेव्हा पाळणाघर आणि वृद्धाश्रम दृश्य व्हायला लागतात. कुमारी माता, वाढते घटस्फोट किंवा वृद्धाश्रमांची गरज ही माणसांनी स्वीकारलेल्या जीवनशैलीशी निगडित आहेत. नियंत्रित समाजाला अनियंत्रित करणे एक वेळ सोपे असते, पण अनियंत्रित समाजाला नियंत्रित करणे फारच कठीण असते. अनियंत्रित पेशींची वाढ कर्करोगाकडे जाते की जिचा अंत हा विनाशातच असतो.

वानर आणि मानव यांची शरीररचना समान असली तरी त्यांची संस्कृती भिन्न आहे. प्राणवायूच्या अणूंची रचना जरी सर्वत्र सारखी असली तरी विरळ प्राणवायू जीव कासावीस करतो. गरजा, क्षमता, अनुभव या सर्व स्तरावर प्रत्येक मानव भिन्न आहे. त्यांच्यावर सांस्कृतिक समानता लादणे म्हणजे सर्वांवर सारखा अन्याय करणे. पाश्चात्त्यांच्या जंगली भांडवलवाद आणि साम्यवादांनी निर्माण केलेली 'अधिकारां' ची आणि 'मुक्ती'ची भूते संतुलित समाज निर्माण करू शकत नाहीत.

पाश्चात्त्य जीवनशैलीचे अंधानुकरण करणाऱ्या भारतीय समाजाला जेव्हा याची जाणीव होईल तो सुदिनच म्हणावा लागेल. नाहीतर शतकानुशतकांच्या प्रयत्नांतून वेगळा केलेला 'मानव' पुन्हा 'जनावर' व्हायला वेळ लागणार नाही!

**– सप्टेंबर २००८**

❖❖❖

# संस्कृतीच्या दिशांची दुर्दशा

भारतीय संस्कृती, मराठमोळी संस्कृती या व अशा शब्दांमधील ‘संस्कृती’चा अर्थ आता सण व उत्सव साजरे करणे एवढ्यापुरताच मर्यादित व्हायला लागला आहे. संस्कृती या संकल्पनेची व्याख्या करणे अवघड असले तरी स्थूलमानाने संस्कृती म्हणजे, ‘मानवी समुदायाने आपले जीवन समृद्ध करण्यासाठी निर्माण केलेल्या मूर्त-अमूर्त साधनांचा, संकेतांचा समुच्चय होय’, असे म्हणता येते. संस्कृतीचे हस्तांतरण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होत असते. हा वारसा व्यक्तीच्या, व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमधील निर्णायक घटक असतो. या वारशामध्ये सामाजिक रूढी, परंपरा, धर्माचार, नैतिक मूल्ये व कल्पना इत्यादींचा समावेश असतो.

परंतु, गेल्या वीस-बावीस वर्षांत संस्कृती जोपासणे म्हणजे,- राजकारणी मंडळी, गुंड प्रवृत्ती यांच्या ताब्यात गेलेले सण आणि उत्सव, त्यानिमित्ताने केला जाणारा हैदोस, राजकीय पक्षांचे शक्तिप्रदर्शन आणि दहशत असा होऊ लागला आहे. राजकारणातील मोठ्या प्रमाणातील फायद्यांचे गणित मांडत अनेक तरुण मंडळी

राजकारणात प्रवेश करताना दिसत आहेत. या तरुणांसमोर कोणतेही प्रेरणादायी आदर्श नाहीत व संरचनात्मक, विकासाभिमुख तत्त्वज्ञानाची बैठक नाही. त्यामुळे देशासाठी बांधिलकी बाळगून काम करणे या वृत्तीऐवजी टोकाची घातक स्वार्थवृत्ती बळावत आहे. त्यामुळे जे काही दिशाहीन नेतृत्व आहे ते या तरुणांचा शक्तिप्रदर्शनासाठी वापर करत आहे. परिणामी, गावोगावच्या वर्षप्रतिपदेच्या स्वागतयात्रांपासून, होलिकोत्सवापर्यंतचे सर्व सण 'आम्हाला पहा आणि फुले वाहा' यासाठी 'साजरे' केले जाताना दिसत आहेत.

धार्मिक सण वा उत्सवांचा हा माध्यमासारखा होणारा गैरवापर इतक्या मोठ्या प्रमाणात आहे की, रस्त्याच्या कोणत्याही बाजूला स्वतःच्या अस्तित्वाला सलाम करून घेण्यासाठी फलक लावावे लागत आहेत. जनतेपर्यंत पोहोचणे आणि त्यातून जनजागृती करणे या उद्देशाने लोकमान्यांनी सुरू केलेल्या गणेशोत्सवाचे उदाहरण ही मंडळी देतात. काळाचा कोणताही संदर्भ न अभ्यासता सवंग लोकप्रियतेसाठी लोकमान्यांसारख्या नेत्याचे नाव घेण्याचे उदाहरण हे खालावत जाणाऱ्या पातळीचे निदर्शक आहे. गणपतीसारख्या देवतेचा 'अमक्या गल्लीतला राजा, तमक्या विभागाचा राजा' असा उल्लेख करण्याची प्रथा ही मंडळी अस्तित्वासाठी वापरत आहेत.

रस्त्यावर उतरायचे, सर्वसामान्यांमध्ये एकप्रकारची दहशत निर्माण करायची, कर्णकर्कश आवाजात देहाला झटके द्यायचे आणि सामाजिक संकेत धाब्यावर बसवत आपले नेतृत्व वाजवत व गाजवत राहायचे ही आज प्रथा पडत आहे. लोकोपयोगाचे कोणतेही रचनात्मक काम न करता पाच-पाच वर्षे प्रतिनिधी म्हणून केवळ हैदोस करायचा आणि वर, 'आम्ही संस्कृतीची जोपासना करतो आहोत' असा आव आणायचा हे आजच्या राजकीय मंडळींचे सूत्र आहे. अपवाद असतील, पण ते नियम सिद्ध करण्यापुरतेच आहेत. संस्कृतीवर ताबा मिळवायला निघालेली ही नेते मंडळी ''आम्ही संस्कृतीची जोपासना केली'' अशी इतिहासाची पुस्तके छापून उद्याच्या पाठ्यक्रमात शिरायला कमी करणार नाहीत!

या सण आणि उत्सवांच्या माध्यमांतून होणारे संस्कृतीचे विकृतीकरण इथवरच थांबत नाही. देशभरात अनेक ठिकाणी होणारे जातीय दंगे हे या विकृतीकरणाचेच फलित आहे. हे दंगे घडवण्यात सामान्य जनतेला कोणताही रस नसतो. पण त्यांचा वापर करून त्यांच्या भावनांना आव्हान करत हे जातीय दंग्यांचे लोण ही मंडळीच पसरवतात. स्वातंत्र्योत्तर भारताबद्दलची सर्व स्वप्ने धुळीला मिळवायला सिद्ध

असणाऱ्या या नेतृत्वाला फक्त स्वार्थ कळतो. सामान्य माणूस हा त्यांच्या दृष्टीने निवडणुकीसाठी 'एक मत' एवढाच महत्त्वाचा असतो. मग जातीय दंगे, उत्सवानंतरच्या मारामाऱ्या, पार्ट्या यांत किती का सामान्य माणसे मरेनात, यांना काही देणे-घेणे नसते.

दुर्दैवाने अशा दूरदृष्टी नसलेल्या दिशाहीन दहशतवादी मंडळींच्या हातात देश आहे. कोणताही विवेक नसणारी ही मंडळी जर संस्कृतीचे पोवाडे गाणार असतील आणि स्वतःवर फुले उधळून घेणार असतील, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर देश म्हणून आपले हसे होईल. नेतृत्व करायचे असेल, लोकांचे प्रतिनिधित्व करायचे असेल तर या मंडळींनी रचनात्मक कार्याच्या दिशा शोधायला हव्यात. त्यासाठी सक्षम नेतृत्वाची समाजाला गरज आहे. संस्कृतीच्या नावाने विकृत वागण्यापेक्षा आपल्या कामातून आदर्श कार्य-संस्कृती निर्माण केलेल्या नेत्यांचे कितीतरी आदर्श इतिहासात आहेत. त्यांचे नाव उच्चारण्याची लायकी आपल्याला यावी यासाठीतरी विधायक, सकारात्मक दृष्टीने यांनी वागावे. सामान्य माणसांची ही अपेक्षा चूक ठरू नये!

**- ऑक्टोबर २००८**

❖❖❖

# आर्थिक मंदी व समाज

समाजाचा विकास, सांस्कृतिक पुढारलेपण मोजण्याची पारंपरिक अशी काही परिमाणे आहेत. या परिमाणांमध्ये आर्थिक क्षमता हे एक महत्त्वाचे परिमाण मानले जाते. गेले दोन महिने संपूर्ण जग वित्तीय दहशतीच्या सावटाखाली आहे. या आर्थिक मंदीची विश्लेषणे जगभर चालू आहेत. आर्थिक क्षमता जास्त म्हणजे विकास चांगला असे मानले जाते. वास्तविक हे दिशाभूल करणारे ठरू शकते. एखाद्या गोष्टीच्या वास्तवरूपापेक्षा तिची भीती दाहक असू शकते. आर्थिक समृद्धी ही चांगलीच बाब आहे. फक्त ती साध्य करण्याचे मार्ग कोणते आहेत, कोणते असावेत हे अधिक महत्त्वाचे आहे.

गेल्या तीन – चारशे वर्षांत पाश्चात्त्य संस्कृतीची जडणघडण झाली. तिचा डोळसपणे विचार केला तर पंधराव्या शतकात आर्थिक क्षमतांच्या विचारांना ठळकपणे सुरुवात झाल्याचे दिसते. प्रबोधनाच्या या कालखंडात ख्रिस्ती धर्मपंथात असणारा धर्मांधपणा समाजाच्या प्रगतीच्या आड येऊ लागल्याचे आढळून येते. या जाणिवा वाढत गेल्या तसे ख्रिस्ती पंथ व

प्रबोधन यात द्वंद्व निर्माण होऊ लागले. सामाजिक शास्त्रे, विज्ञान, सर्व कला या क्षेत्रांत एक नवीन विचारप्रवाह येऊ लागला. परिणामी वैज्ञानिक क्रांती, औद्योगिक क्रांती यांना पूरक ठरेल अशी क्रांती अर्थ विचारांत झाली.

एकोणिसाव्या व विसाव्या शतकात या नवीन विचार प्रवाहात मार्क्सवाद व भांडवलवाद हे दोन अर्थप्रवाह सामील झाले. यांची निर्मिती औद्योगिक क्रांतीवर आधारित होती. विसावे शतक हे साम्यवाद व समाजवादाचा विकास होण्याचा काळ होता. त्याचवेळी भांडवलवादाचाही विकास झाला.

ज्या देशांनी समाजवाद वा साम्यवाद स्वीकारला त्यांचे आर्थिक दिवाळे निघाले. यातूनच पुढे संस्कृतीचा ऱ्हास झाला. सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याची गळचेपी झाली. परिणामी अशा राष्ट्रांची सृजनशीलता कमी होत गेली. रशिया व चीन ही त्याची उदाहरणे आपण जाणतोच. एकेकाळची कट्टर साम्यवादी असणारी ही राष्ट्रे होती. आज ती भांडवलशाही अर्थरचना राबवताना दिसतात; इतकेच नाही तर आपल्या सामाजिक चेहऱ्यातही त्यानुसार बदल घडवताना दिसत आहेत. भांडवलवाद स्वीकारलेल्या अमेरिका युरोपातील राष्ट्रांच्या आर्थिक समृद्धीसाठी पुराव्यांची गरज नाही. अर्थात या विकासाला सृजनशीलतेबरोबरच आर्थिक भांडवलाचा हातभार लागला. या राष्ट्रांतील जनतेला मुबलक स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे विज्ञानापासून कलेपर्यंतची सर्व क्षेत्रे या राष्ट्रांनी पादाक्रांत केली.

साहजिकच ही राष्ट्रे या सैद्धांतिक विचारसरणीची भलावण व विरोध यानुसार राजकीय गटबाजीत विभागली गेली.

दुर्दैवाने भारतही याला अपवाद नाही. भारताची अर्थव्यवस्था ना भांडवली ना समाजवादी. तिचे नामकरण 'मिश्र अर्थ व्यवस्था' अशा गोंडस शब्दांत केले गेले. दोन चांगल्या बाबींचे मिश्रण चांगलेच असते असा भाबडा आशावाद यात दिसतो. भारत हा प्राचीन, इतिहास समृद्ध देश आहे. अमानुष इस्लामी आक्रमणांच्या काळापर्यंत भारतात सर्वच क्षेत्रांत सुवर्णयुग होते. या विकासाची कारणे अभ्यासणे मार्गदर्शक ठरेल. आजच्या पोथिनिष्ठ साम्यवादी किंवा भांडवलशाही आर्थिक रचनेवर हा विकास नक्कीच आधारलेला नव्हता. एकंदरीतच त्याची सामाजिक वीण ही परस्परावलंबी होती. व्यवसायांचे विभाजन होते. समाजातील सर्व गटांच्या नैसर्गिक क्षमतांचे उपयोजन करून घेण्यात आले होते. सर्व व्यक्ती या बौद्धिक वा शारीरिक क्षमतांबाबत समान नाहीत हे वास्तव समाजरचनेत स्वीकारण्यात आले

होते. व्यक्ती व समाजाच्या आर्थिक विकासापेक्षा चारित्र्य आणि नीती समृद्ध करण्याकडे जास्त कल होता. बालवयापासून पाप-पुण्य, नीती-अनीती इ. संकल्पनांच्या माध्यमातून हेतुपुरस्सर संस्कार केले जात. म्हणूनच व्यक्तीच्या किंवा समाजाच्या समृद्धीमध्ये आर्थिक क्षमतांपेक्षा सामाजिक मूल्ये महत्त्वाची होती. नात्यांचा आदर महत्त्वाचा होता.

आजचा भारतीय समाज हे समजावून घेण्यास तयार नाही. त्याच्या दृष्टीने आर्थिक समृद्धीचे फक्त दोन मार्ग आहेत, ते म्हणजे भांडवलवाद व साम्यवाद. दुर्दैवाने या सर्व सिद्धांतात माणूस हा मूळ माध्यम आहे हेच विसरले जात आहे. मूळ विषयापेक्षा इतर बाबीच चर्चिल्या जात आहेत. सर्वकाही माणसासाठीच केले जात असले, तरी त्याच्या मूळ प्रकृतीचा विचार न करताच केले जात आहे. प्रत्येक माणूस षड्रिपूंनी ग्रस्त असतो. वय, संधी व परिस्थिती यांनुसार या षड्रिपूंचे संतुलन होणे आवश्यक असते. अशा संतुलित समाजनिर्मितीची धारणा हा भारतीयांचा धर्म आहे.

पैसा मिळाला की माणूस समृद्ध होतो ही संकल्पना भारतात नव्हती. उलट आर्थिक गरिबी असणाऱ्या माणसालाही सुसंस्कारित करण्याचा प्रयत्न केला गेला. आजच्या मंदीचे खरे कारण फसवणूक, स्वार्थ व अप्पलपोटेपणात आहे. त्यास अमेरिकन पतसंस्थांची मनमानी जबाबदार आहे. त्याची फळे ते भोगत आहेत.

यांतून जो धडा घ्यायचा तो महत्त्वाचा आहे. तो धडा 'समृद्धी म्हणजे काय?' हे समजावून घेण्याचा. भारताची आजची आर्थिक परिस्थिती कशीही असली तरी समाज हा भ्रष्टाचार, जातीय सवलतींच्या छत्राखाली धटिंगणांनी केलेल्या राजकीय खेळी यांनी सडला आहे. हे वास्तव नजरेआड करून समृद्धी येणे शक्य नाही. सरकार चालवणे म्हणजे जास्तीत जास्त नियंत्रणे लादणे असा आपल्या राजकारण्यांचा समज असतो. यातून भ्रष्ट नोकरशाही निर्माण होते. या वास्तवाचे आत्मपरीक्षण भारतातील नेतृत्वाने केले तरच काही मार्ग निघेल. आजचे भारतीय नेतृत्व दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभे असताना, मार्गदर्शन मिळेल असा आशेचा किरण कोठे दिसत नाही.

तरी आपण आशावादी असतो. यातूनच तरुणाईत असणाऱ्यांचे एक नवे, विधायक नेतृत्व निर्माण होईल अशी आशा धरण्याशिवाय मार्ग नसतो. नेतृत्व आकाशातून पडत नसते. ते समाजाने निर्माण करायचे असते. फक्त उपरोक्त

विश्लेषणाप्रमाणे त्याचा व्यक्ती-विकास हा शाश्वत मूल्यांवर झालेला असावा लागतो. असे मूल्याधिष्ठित नेतृत्व खऱ्या अर्थाने समाजाचे मार्गदर्शन करू शकते. आजचे नेतृत्व लोकानुयायी, भ्रष्ट व लाचार आहे. चांगल्या नेतृत्वात अ-प्रियता झेलण्याची क्षमता असते, योग्य कारणांसाठी कटू निर्णय घेण्याची शक्ती असते. असा नेता जेव्हां होईल तेव्हां तीच समृद्धीची खरी सुरुवात ठरेल.

– **डिसेंबर** २००८

❖❖❖

# सामूहिक विश्वासाला तडे

समाजाचा असा एक सामूहिक विश्वास असतो. या विश्वासाच्या आधारावर समाजाची धारणा, समाजाच्या वाटचालींची दिशा अवलंबून असते. मात्र या विश्वासाला तडे जायला लागतात तेव्हा समाजाला हादरे बसायला सुरुवात होते. गेली काही दशके जग हे वास्तव अगदी जवळून अनुभवत आहे. जागतिकीकरणाच्या लाटेमध्ये चलन, माणसे आणि वस्तू या सर्वांचेच देशांतरण सोपे होत गेले आहे. याचे काही फायदे असले तरी काही तोटेही आहेत. समता, बंधुत्व अशी मूल्ये असोत व कुटुंब संस्थेसारख्या पुरातन संस्थांचे अस्तित्व असो, यांना हादरे बसायला सुरुवात झाली, यंत्रांमुळे जे बदल घडून आले त्यांनी माणसाचे रूपांतर यंत्रांमध्ये केले. त्यामुळे माणूस यंत्राधीन झाला. भावभावना, माणुसकी यांचे अधिष्ठान असणारी जुनी मूल्ये कोलमडायला लागली.

याचा परिणाम दुर्जन माणसे सक्रिय बनण्यात झालेला दिसून यायला लागला. पैसा हे विनिमयाचे साधन आहे ही सर्वमान्य बाब आहे. पण आजच्या मूल्यव्यवस्थांच्या ऱ्हास काळात पैसा हे केवळ

विनिमयाचे साधन न राहता माणसे विकत घेण्याचे आणि शोषण करण्याचे अमर्याद सामर्थ्य देणारे साधन बनले आहे. दुर्दैवाने सक्रिय बनलेल्या दुर्जनांच्या हातात हे साधन आहे. याचा अपरिहार्य असा परिणाम कला संस्कृतीसह समाजकारण, राजकारण आदी सर्वच क्षेत्रांवर होत आहे. स्वातंत्र्योत्तर भारतातील निवडणुकांचा इतिहास हा पैशाच्या दुरुपयोगाचे वाढते प्रमाण याच्याशी संलग्न आहे. व्यवस्थापनशास्त्रात इंग्रजीतील 'पाच एम'चे महत्त्व (मॅन, मटेरियल, मशीन, मार्केट, मनी) हे आजच्या सामाजिक जीवनात तीन एम पुरते बदलून; मनी पॉवर, मसल पॉवर व माफिया पॉवर या तीन एम मध्ये सामावले आहे. पैशाबरोबरच दहशत व गुंडगिरी यांचे वाढत चाललेले प्रमाण पाहता हे सहज लक्षात येते.

यामध्ये प्रस्थापित असणारी व शोषण करणारी जी मंडळी असतात त्यांना परिवर्तन नकोच असते. आपले उपद्रवमूल्य टिकावे, वाढावे यात त्यांना रस असतो. यासाठी लहान-मोठ्या सणांचे वा पुण्यतिथ्या, जयंत्यांचे निमित्त शोधून ही माणसे स्वतःचे तथाकथित नेतृत्व प्रक्षेपित करत राहतात. अशा माणसांनी रूढ केलेले मापदंड हीच नव्या पिढीच्या दृष्टीने संस्कृती ठरायला लागली. अशा विकृत संस्कृतीचे प्रक्षेपण करण्यात माध्यमेही धन्यता मानतात; कारण त्यांना टिकायचे असते. प्रत्यक्ष डोळ्यांना दिसणारा दहशतवाद समाजाचे, देशाचे, देशाच्या समाजकारणाचे व राजकारणाचे नुकसान करतो हे तर खरेच आहे; पण हा न दिसणारा सांस्कृतिक दहशतवाद समाजाची अवस्था दिशाहीन करतो; मग सामूहिक विश्वासाला तडे जाऊ लागतात.

ज्या मूठभर संवेदनशील मनांना या वास्तवातील भय जाणवते ते त्याविरुद्ध आवाज उठवतात. पण कर्कश वाद्यांच्या आवाजात हा आवाज क्षीण ठरतो. लोककल्याणकारी शासन ही संकल्पना अस्तित्वात येण्याऐवजी सत्ताकारणात रस असणारे, सक्रिय झालेले समाजातील गुंड हे राज्यकारभाराचे सूत्रधार बनायला लागतात. १९४७ साली राजकीय स्वातंत्र्य मिळाले खरे; पण कोट्यवधी जनतेचे स्वराज्य मात्र दूर राहिले. हे मग वास्तव ठरायला लागले.

हे सर्व मांडण्याचे कारण, 'निवडणुकीत मत कोणाला द्यायचे' असा प्रश्न सामान्य माणसाला पडतो आहे या वस्तुस्थितीबद्दल त्याला अंतर्मुख करणे हे आहे. मतांचा जोगवा मागणारे मूठभर जे काही सज्जन लोक असतात तेही प्रवाहपतित होत जातात आणि त्यामुळे, 'कोणीही आले तरी आम्हांला काय फरक पडणार

आहे' असा प्रश्न नागरिक विचारू लागतो. समाजाचा निवडणूक प्रक्रियेवरील सामूहिक विश्वास डळमळीत व्हायला लागला आहे. मत देण्याचा अधिकार तर आहेच, पण ते नाकारण्याचाही अधिकार आहे असे सामान्य मतदाराला वाटावे हे दुर्दैव आहे.

सक्रिय असणाऱ्या पण वृत्तीने दुर्जन असणाऱ्या माणसाकडे पैसा आहे, मसल पॉवर आहे व गुंडगिरीलाच जीवनशैली मानणारा उद्दामपणा आहे; ही मोठी समस्या आहे. या जोरावर ते काहीही करू शकतात अशी सामूहिक भावना बनत चालली आहे.

जुने निकष वापरून, जुन्या चौकटींच्या संदर्भात हे प्रश्न सुटणार नाहीत. या अगतिक होत चाललेल्या सामाजिक वास्तवाच्या समस्या सोडवायला नवीन विचारांच्या चौकटींची गरज आहे. त्यासाठी समाजाचा सामूहिक विश्वास, मूल्यांवरील निष्ठा अविचल रहायला हवी आहे. परिवर्तनाचे संदर्भ पारखून घेतले गेले तर निवडणुका हा केवळ उपचार राहणार नाही, आज गोंगाटात विरून जाणारा आवाज आपले अस्तित्व सिद्ध करू शकेल, आजही आशेला जागा आहे. दुर्जन माणसे सक्रिय होणार नाहीत इतकी ताकद नव्या पिढीने निर्माण करावी. अर्थात लोकहितवादींनी म्हटल्याप्रमाणे ही ताकद येईल ती शिक्षणातून. सुशिक्षित किंवा शिक्षित समाजाच्या चिंतनशील कृतीची त्यासाठी गरज आहे!

**– एप्रिल २००९**

❖❖❖

# बोधप्रद अहवाल

गेली १०-१५ वर्षे ख्रिस्ती धर्मगुरुंनी केलेल्या बलात्कार व बालकांच्या लैंगिक शोषणाचे अनेक अहवाल अमेरिकेपासून इंग्लंडपर्यंत प्रकाशित झाले आहेत. या अहवालांचे खरोखरच स्वागत व्हायला हवे. कारण या पंथामध्येही असे नराधम असतात याची जाणीव या अहवालांनी करून दिली. असे अनुभव येत असले तरी त्याची शास्त्रशुद्ध तपासणी, विश्लेषण व निष्कर्ष प्रभावीपणे मांडण्याची मानसिकता दाखवणे ही गोष्ट महत्त्वाची आहे.

ज्यांनी समाजाचे रक्षण करायचे, समाजाला मार्गदर्शन करायचे, आदर्श घालून द्यायचे, त्यांनीच समाजाचे भक्षण करायला सुरुवात केली तर यातून सांस्कृतिक ऱ्हासापलीकडे काहीच होऊ शकत नाही. गेली काही शतके पाश्चात्त्य समाज हा विज्ञान व तंत्रज्ञानात घोडदौड करत आहे. त्याची फळे म्हणून या देशांना आर्थिक सुबत्ताही मिळाली. रस्ते, पाणी, वीज यांची उपलब्धता व त्यांचे नियोजनही सुंदर झालेले दिसते. थोडक्यात; भौतिक जीवनाच्या सर्व कक्षा आखीव, रेखीव, सुंदर झाल्या तरी मानवी मूल्ये व

संस्कृतीचा ऱ्हास झपाट्याने होताना दिसतो. सर्व प्रकारची गुन्हेगारी, व्यसनाधीनता, सर्व मानवी नात्यांना तिलांजली, पराकोटीची आत्मकेंद्रित वृत्ती व सर्वांत भयावह म्हणजे सामाजिक मूल्यांचे पोषण करणाऱ्या धर्मगुरुंचा झालेला ऱ्हास हा निर्देश केलेल्या अहवालातून दिसतो. म्हणूनच हे अहवाल बेचैन करणारे आहेत. या पार्श्वभूमीवर आपण दोन महत्त्वाचा गोष्टींचा ऊहापोह करू या.

माणसाच्या भौतिक व्यवहाराकरता मूलभूत सुविधा (जसे घर, पाणी, वीज, शिक्षण, रस्ते) व त्या सुविधांचा शिस्तबद्ध वापर जितका महत्त्वाचा असतो, तितकीच मानवी मूल्यांची संतुलित वाढही महत्त्वाची असते. आर्थिक समृद्धी माणसाला, समाजाला व राष्ट्राला एक प्रकारची सुरक्षिततेची व बेफिकिरीची भावना देते. यातूनच इतर समाजांकडे 'उपकार' करण्याच्या भावनेने बघितले जाते. यातून आत्मकेंद्रितपणा वाढत जातो. कला, साहित्य ही समाजावर संस्कार करणारी साधने आहेत. ही साधने जसे चांगले संस्कार करू शकतात तसेच ती घातक संस्कारही घडवू शकतात.

वर वर्णन केलेल्या 'समृद्ध' समाजात स्वातंत्र्याच्या अतिरेकी संकल्पना जन्म घेऊ लागतात. यातूनच पराकोटीच्या 'मानवी अधिकारां'ची संकल्पना निर्माण होते. जुन्या सामाजिक, आवश्यक नियमांच्या चौकटींच्या मोडतोडीला 'सुधारणे'च्या नावाखाली सुरुवात होते. सुरेल संगीत जाऊन कर्कश संगीत, वेडेवाकडे अश्लील हावभाव करणाऱ्या नाटकांना मान्यताच नाही तर विशेष पुरस्कार मिळू लागतात! केसापासून वेशापर्यंत सर्वच विचित्र करण्याकडे कलाकारांचा आग्रह दिसतो. अनेक वेळेला अशा कलाकारांना बघणे हा डोळ्यांवर जुलूम असतो.

'स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही' ही भूमिका येथे संपलेली असते. एवढेच नाही तर; बेताल, स्वैराचारी, विचित्र, एकांगी वागणे म्हणजे सर्जनशील, नावीन्यपूर्ण असे संकेत प्रस्थापित होऊ लागतात. खरे तर अशी बेताल वागणूक इतकी सोपी असते की, अशा गोष्टींचे पीक येते व वैशिष्ट्य सिद्ध करण्यासाठी आणखीन हीनता आणण्याचा प्रयत्न सुरू होतो. सर्व नीती-नियम, समाज-संस्था, सांस्कृतिक साज यांची मोडतोड केल्यावर काय शिल्लक राहते याचा विचार केल्यावर, ''आजची 'पाश्चिमात्य' जीवनशैली'' असे त्याचे उत्तर येते. धर्मगुरुंच्या बेताल वागण्याचे हे अहवाल व आजच्या आर्थिक मंदीला कारणीभूत झालेल्या अनियंत्रित, स्वार्थी, दिशाहीन आर्थिक संस्थांचे नेतृत्व ही या ऱ्हासाची अत्यंत महत्त्वाची व चांगली उदाहरणे आहेत.

याला अमेरिकेपासून युरोपपर्यंतच्या शाळांमधून खालावलेला शैक्षणिक दर्जा कारणीभूत आहे. याला शिक्षक व शैक्षणिक साधनसामग्री कारणीभूत नसून आत्मकेंद्रित, स्वैराचारी संस्कृती जबाबदार आहे. 'दिशा'च्या या आधीच्या संपादकीयात उल्लेख केल्यानुसार इंग्लंडमध्ये नुकत्याच प्रकाशित झालेल्या अहवालात हे निष्कर्ष स्पष्टपणे मांडण्यात आले आहेत.

यामुळे पाश्चात्त्यांच्या 'भौतिक' विकासाने दिपून न जाता त्यांच्यात झालेल्या 'मूल्य' ऱ्हासामुळे निर्माण झालेल्या समाजाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. 'नवीन' म्हणजे 'चांगले', 'पाश्चात्त्य' म्हणजे 'आधुनिक', 'जुन्या परंपरा' म्हणजे 'अडचण' ही मानसिकता आमूलाग्र बदलणे आवश्यक आहे. या पाश्चात्त्य देशांत मोठ्या प्रमाणात जो भारतीय समाज स्थलांतरित झाला आहे त्यांच्या पुढील पिढीने तेथील शिक्षण व इतर क्षेत्रांत मिळवलेले यश हे विचार करायला उद्युक्त करणारे आहे. अनेक अभ्यासकांनी याचे कारण, त्यांनी टिकवलेली कुटुंबसंस्था व पालकांचा मुलांचे भवितव्य घडवण्यातला सहभाग असल्याचे मान्य केले आहे. ही मूल्ये पाश्चात्त्य मूल्यांच्या विरूद्ध आहेत. म्हणूनच आजची बेजबाबदार, स्वैराचारी, समाजसंस्थांची मोडतोड करणाऱ्या पाश्चात्त्य मूल्यांची आयात करणाऱ्या भारतीयांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. भारतीय शिक्षण म्हणजे 'वाईट' हा एक उठता बसता घोकण्याचा विषय होऊन बसला आहे. या व्यवस्थेत परीक्षा पद्धती, घोकंपट्टी, गृहपाठ, अभ्यास, पालक-शिक्षक बंधन हे सर्व चांगल्या शिक्षणाकरता आवश्यकच आहे. बदल म्हणजे मोडतोड नाही; बदल म्हणजे असलेली व्यवस्था अधिक परिपक्व व संतुलित बनवणे होय. म्हणूनच भारतीयांनी कमीत कमी अशा अहवालांचा अभ्यास करणे महत्त्वाचेच नाही तर बोधप्रद आहे.

**– जून २००९**

❖❖❖

# स्वाइन फ्लू आणि सामाजिकतेचे भान

साथीचे रोग व या रोगांचा प्रसार हा स्वाइन फ्लूच्या निमित्ताने चर्चेत असणारा गंभीर विषय आहे. या विषयाबद्दलचे अज्ञान आणि याही विषयात गुंतलेले अनेकांचे हितसंबंध यामुळे साथीच्या रोगांपासून घ्यावयाचे धडे, आत्मपरीक्षण याकडे मात्र सार्वत्रिक दुर्लक्ष झालेले दिसते. मेक्सिकोत उगम पावलेला हा रोग अमेरिका खंड, युरोपभर व जगातील सर्वच देशांत प्रवाशांच्या मार्फत पसरला. या रोगाची लागण दुर्दैवाने तीव्रतेने होते. पुणे येथे प्रामुख्याने आणि मुंबई व त्यापाठोपाठ इतर शहरांतही हा रोग पसरत गेला आहे. साथीच्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यात स्वच्छतेचा अभाव हे प्रमुख कारण तर आहेच, पण सामाजिक दृष्टिकोनाचा अभाव, सत्तेची लालसा व इतर आनुषंगिक कारणेही बरीच आहेत. पुणे, मुंबई हे शहरी इलाखे आहेत. ही शहरे सुशिक्षित आहेत; तरी सुद्धा या इलाख्यांमध्ये या रोगाची झालेली हाताळणी भयावह आहे.

शिक्षण हे माणसाला सुसंस्कृत तर बनवतेच, पण निर्णय घेण्याची त्याची क्षमताही वाढवते. विशेषतः

संघर्षाचे प्रसंग, आपत्तींचे प्रसंग अशावेळी निर्णयक्षमता महत्त्वाची ठरते. ही निर्णयक्षमता शिक्षणातून विकसित होण्याची अपेक्षा असते.

परंतु विषयाची माहिती म्हणजे शिक्षण हा चुकीचा समज आपल्याकडे आहे. वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक अशा सर्व पातळ्यांवर जेव्हा या स्वरूपाचे अडचणींचे, संकटांचा सामना करण्याचे प्रसंग येतात तेव्हा कमीत कमी हानिकारक ठरतील असे उपचार करण्याची क्षमता हे सुशिक्षित समाजाचे लक्षण ठरते.

या पार्श्वभूमीवर पुण्या-मुंबईत स्वाइन फ्लू ज्या पद्धतीने हाताळला गेला ती पद्धत म्हणजे दिवाळखोरीची प्रवृत्ती होय! गोंधळलेला, गांगरलेला समाज केवळ दोषारोप करण्यास प्रवृत्त होतो हे यातून दिसून आले. अशा साथी ह्या विषाणूंच्या स्वतःतील जिवंत राहण्याच्या, टिकून राहण्याच्या सीमित क्षमतेमुळे काही काळापुरत्या नाहीशा होतात.

या सर्व गोंधळामध्ये सर्वांत जास्त दिवाळखोरी कोणी दाखवली असेल तर ती माध्यमे व राजकारणी लोकांनी. दडपशाही व गुंडगिरी करून ठाण्यामधील शाळा बंद पाडणारे, सार्वजनिक वाहतुकीचे रस्ते अडवून सण 'साजरे' करणारे हे धटिंगण ही आजच्या समाजाला लागलेली मोठी कीड आहे. वाढदिवसासारखा दिवस हा प्रेम, सद्भावनेने आपल्या कुटुंबात साजरा केला जावा अशी अपेक्षा असते. असा दिवस जबरदस्तीने कोणावर लादायचा नसतो; पण आजची तथाकथित नेते मंडळी आपल्या छब्या रस्तोरस्ती, गल्लोगल्ली लावतात. यातून ही धटिंगण मंडळी पूर्ण शहर विद्रूप करतात. त्यांच्या या बेकायदेशीर, बेलगाम अशा कृत्यांवर नागरी संस्था आणि पोलिसांनी नियंत्रण आणावे ही समाजाची अपेक्षा असते. पण आजमितीस या सर्व संस्था, पोलिस यंत्रणा इतक्या भ्रष्ट, लाचार व बधिर झालेल्या आहेत की, अशा मंडळींना वेसण घालण्याऐवजी त्या त्याकडे डोळेझाक करतात.

ठाणे शहराच्या इतिहासात सर्व नागरिकांना शरमेने मान खाली घालावी लागेल अशी घटना या संदर्भात अलीकडेच घडली. ठाणे महानगर पालिकेच्या सध्याच्या आयुक्तांनी जी अ-कार्यक्षमता शहराच्या विद्रुपीकरणासंदर्भात दाखवली त्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने कडक शब्दांत ताशेरे ओढले व त्यांना पाच हजार रुपयांचा दंड केला. आत्मसन्मानाची भावना जागृत असणाऱ्या कोणाही व्यक्तीने अशा प्रसंगी आपल्या पदाचा राजीनामा देऊन दूर राहणे पसंत केले असते. पण आमच्या या बधिर नोकरशहांना कसलेही सोयरसुतक नाही.

ठाणे शहरावर आज जी अवकळा पसरलेली दिसते ती या अशा निष्क्रिय, भ्रष्ट आणि बधिर नोकरशहांमुळेच. यांच्या अकार्यक्षमतेमुळेच दही हंडी, गणपती, नवरात्र आणि पुन्हा एकदा जोरात साजरा होणारा माघी गणेशोत्सव रस्ते अडवून, नागरिकांना वेठीला धरून 'साजरे' होतील. स्वाइन फ्लूचे राजकारण करत शाळा, व्यवसाय बंद पाडू पाहणारी ही मंडळी आपल्या शिमग्यासदृश सण-संस्कृतीवर नियंत्रण घालायला तयार नाहीत. यांना गर्दी जमा करणाऱ्या या सणांमधून 'मला पहा आणि फुले वहा' असे व्यक्तिस्तोम माजवणारे राजकारण करायचे असते. स्वाइन फ्लूचे निमित्त करून त्यांनी हेच चालू ठेवावे हे दुर्दैव आहे. ठाणे शहरातील नागरिकांनी निदान अशा सणांसाठी स्वेच्छेने वर्गणी देऊ नये. इतकेच नाही तर, सत्तेच्या अभिलाषेने गैरकृत्ये करणाऱ्या या राजकारण प्रेरित कार्यक्रमांत सहभागी होऊ नये.

स्वाइन फ्लू या रोगाच्या साथीपासून, या विषयावरील चर्चांमधून सामाजिकतेच्या संदर्भात आपण काही धडे घेतले तरच आपल्या सामूहिक, समाज म्हणून अस्तित्व असण्याला काही भविष्य उरेल. नाहीतर सण-समारंभ म्हणजे या समाजाचे विकृत दर्शन ठरेल. ती आपली ओळख ठरेल. आपल्यातील निर्णय क्षमता व सद्सद्विवेक बुद्धीला असणारे हे आव्हान आहे!

**– ऑगस्ट २००९**

❖❖❖

# जया अंगी मोठेपण...

१४ मार्च २०१० रोजी मराठीतील एका दिग्गज कवीचे निधन झाले. त्यांचे वय ९३ वर्षे होते. पार्श्वभूमीवर काही अघटित घडले असे म्हणता येणार नाही. विंदांसारख्या समाजमान्य व्यक्ती शरीररूपाने समाजातून जात असल्या तरी त्यांच्या शाश्वत चिंतनामुळे त्यांना एक प्रकारे अमरत्व प्राप्त झालेले असते. म्हणूनच विंदांसारख्या व्यक्तींच्या बाबतीत लिहिताना व्यक्ती म्हणून विंदा व कवी म्हणून विंदा सोयीचे असले तरी, वेगळे करणे हितावह नसते. कविता म्हणजे यमक जुळवलेले केवळ शाब्दिक बुडबुडे नसतात. अशा कविता मिनिटागणिक प्रसृत होतात. परंतु विंदांसारख्यांच्या कविता या त्यांतील आशयामुळे जास्त गांभीर्याने घेतल्या जातात.

सर्वसाधारणपणे असा आशयही प्रत्येक कवी आपल्या शैलीनुसार मांडत असतो आणि मानवी जीवनातील अतिशय महत्त्वाच्या कंगोऱ्यांना तो स्पर्श करतो. 'जीवन म्हणजे काय' यापासून ते, 'ते जगावे कसे' इथपर्यंतच्या सर्व विषयांना त्याने हात घातलेला असतो आणि म्हणूनच ''एक तुतारी द्या मज आणुनी।

फुंकीन जी मी स्वप्राणाने।।'' या कृष्णाजी केशव दामले ऊर्फ केवशसुतांपासून ''देणाराने देत जावे'' या विंदांच्या कवितेपर्यंत कोठे तरी एक परिवर्तन हे जीवनाचा अर्थ शोधण्याचा किंवा कविला अपेक्षित असल्याप्रमाणे देण्याचा प्रयत्न दिसून येतो.

परंतु एवढे काव्य प्रसृत होऊनही समाजाची आजची स्थिती ही, कालची बरी होती असे म्हणण्यासारखी होत आहे. नीतीनियम, सामाजिक बंधने या सर्वांना पायदळी तुडवून बेदरकार स्वच्छंदी, बेजबाबदार जीवन हाच सामाजिक नेतृत्वाचा मूलमंत्र झालेला दिसतो. 'उक्ती' व 'कृती' यांतील दरी क्षणोक्षणी वाढताना दिसते. येथे महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, इतक्या कविता आणि लेखन होऊनही समाज बदलत नाही. या अपयशालाही हे विचारवंतच जबाबदार आहेत का?

केशवसुत, विंदांसारख्या किंवा बापटांसारख्या कवींना त्यांच्या कवितेच्या माध्यमातून, आशयातून एक आदर्श नायक म्हणून मान्यता मिळते आणि खरी गोम येथेच येते. या सर्व आदरणीय व्यक्तींचा आदर राखून हे म्हणावेसे वाटसे की, समाजातील सामान्य माणसाला पडणारी प्रलोभने की ज्यामुळे त्याचे स्खलन होते त्या सर्व प्रलोभनांना या महान व्यक्तीही भुलतात. ''लोका सांगे ब्रह्मज्ञान। आपण कोरडे पाषाण।।'' अशी येथे परिस्थिती दिसून येते. संयम, सहिष्णुता, क्षमाशीलता ही मूल्ये कुठल्याही सामाजिक नेतृत्वाच्या अंगी असावीत अशी किमान अपेक्षा असते. विंदांच्या पत्नीची साक्ष देऊन हे म्हणता येईल की, विंदा स्वतः हेकेखोर, रागीट, हटवादी होते. १९८० च्या सुमारास त्यांनी, 'जगात आता नवीन उरले नाही' म्हणून जवळ जवळ लेखन संन्यास घेतल्याचे सांगितले जाते. जगात प्रत्येक क्षणाला बदल घडत असतो व तो टिपायला सृजनशीलता लागते. कदाचित विंदांमधील कवी थकला असेल; पण जगात काही नवीन घडत नाही असे म्हणणे म्हणजे आपल्या आटलेल्या प्रतिभेची दिलेली कबुली असते!

विंदाच काय, पण त्या पठडीतले सर्वच कवी आणि लेखक ''विज्ञानवादी'' असावे लागतात. बहुतेक वेळा हे विज्ञान म्हणजे जडवादाशी, म्हणजेच नास्तिकवादाशी सोयरीक असते. त्याचा विज्ञानाशी सुतराम संबंध नसतो. कारण मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवणारे न्यूटनपासून रामानुजनपर्यंत सर्व वैज्ञानिक हे ठार आस्तिक होते.

विंदा वैयक्तिक जीवनात शंकराचार्यांच्या स्तोत्रांपासून गायत्री मंत्रापर्यंत सर्व पठण आंघोळीच्या वेळी व नंतर करत असत. एवढेच नाही तर, आपल्या

नातवांकडूनही त्यांनी ते पाठ करवून घेतले होते. कदाचित जिभेला वळण लागण्यासाठी त्याचा उपयोग त्यांनी केला असेल, पण कोठेही समाजातील तळागाळातील पीडित व दलित बांधवांना मात्र, 'माझ्या कविता वाचा अगर वाचू नका, पण स्तोत्रे म्हणून आपली वाचा शुद्ध करा' असे सांगितल्याचे त्यांच्या लेखनात आढळत नाही. कदाचित आपल्यावर 'ब्राह्मणी' शिक्का बसेल किंवा 'परंपरा'वादी म्हणून शिक्का बसेल ही भीती त्यांना वाटली असावी!

चारित्र्य म्हणजे प्रतिभा नाही, ते सतीचे वाण असते व व्यक्ती जेव्हा समाजाच्या नेतृत्वपदापर्यंत पोहोचते तेव्हा तिने स्वतःवर अधिकच बंधने घालून चारित्र्याकरता किमान आवश्यक असलेल्या गोष्टींचे पालन करणे आवश्यक असते. दारूमुळे समाज भग्न उद्ध्वस्त कसा होतो हे सांगण्याची गरज नाही. अनेक लेखक व कलावंतांनी यामुळे स्वतःबरोबर कुटुंबाची धुळधाण केल्याचेही आपण जाणतो. म्हणूनच 'आदर्श' ही बिरुदावली मिळालेल्या सर्वच सामाजिक, साहित्यिक नेतृत्वाने या प्रलोभनांपासून मुक्त राहणे हे त्यांचे आदी कर्तव्य आहे. हे किती कठीण आहे हे त्यांना कळते तेव्हाच त्याची मांडणी प्रभावीपणे करता येते.

विंदा हे स्वतः मद्यपान करायचे आणि त्यांच्या पत्नीने मात्र, 'विंदानी घरात मद्यपान करायचे नाही' असे बंधन घातल्यामुळे घरात मद्यपान करणे बंद केल्याचे त्यांनी लिहून ठेवले आहे. 'प्रत्येक माणसाचे पाय मातीचे असतात', 'पुराणातील वांगी पुराणात' अशा म्हणी उगाच रूढ होत नाहीत. दुर्दैवाने आज निदान गेली काही दशके, शतके ज्ञानपीठापासून गावभूषणांपर्यंतच्या पदव्यांची पाखड होऊनही वर सांगितल्याप्रमाणे समाजाचे स्खलन चालूच आहे.

...आणि म्हणूनच दुर्दैवाने असे म्हणावेसे वाटते की, 'नव' समाजनिर्मिती करता प्रतिभेपेक्षा स्वतःवर 'अंकुश' ठेवणाऱ्या 'बोले तैसा चाले' हा मंत्र अंगिकारलेल्या व्यक्ती समाजाला हव्यात हे ज्या दिवशी समाजाला उमगेल त्यावेळी त्यास नवीन दिशा मिळेल. नाहीतर पुण्यतिथ्या, जयंत्यांच्या दिवशी प्रतिभावंतांची भाषणे देणे आणि छापणे हेच घडत राहील.

**– मार्च २०१०**

❖❖❖

# सावरकर - प्रेरणास्त्रोत

सावरकरांच्या जगप्रसिद्ध उडीला गुरुवार दि. ८ जुलै २०१० रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली. सावरकर हे नुसते क्रांतिकारकच नव्हते, तर ते द्रष्टेही होते. त्यांचा जन्म १८८३ सालचा. २६ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांनी आत्मसमर्पण केले. सुदैवाने त्यांना ८३ वर्षांचे दीर्घायुष्य लाभले व आपल्या हयातीत भारत स्वतंत्र झाल्याचे त्यांना पाहता आले. १९०२ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी फर्गसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. लोकमान्य टिळकांच्या झंझावाती नेतृत्वाचा व विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला नसता तरच नवल! ब्रिटिश सत्तेविरुद्ध टिळकांनी अंगीकारलेल्या अनेक चळवळींतील स्वदेशीची चळवळ ही एक होती. परदेशी मालाची होळी करण्याची त्यांनी जनतेला विनंती केली. ताबडतोब सावरकरांनी परदेशी कापडांची होळी केली.

सावरकरांनी १९०५ साली 'अभिनव भारत' या जहाल व गुप्त संघटनेची स्थापना केली. काँग्रेस पक्षाचे अनेक सभासद १९४७ पर्यंत या संघटनेचे सदस्य होते. दुर्दैवाने ही गोष्ट गैरसोयीची असल्याने लोकांपासून, लोकांना सांगण्यापासून टाळण्यात येते. १९०६ साली

टिळकांच्या शिफारशीवरून श्यामजी कृष्ण वर्मा यांनी जाहीर केलेली 'शिवाजी' शिष्यवृत्ती सावरकरांना प्राप्त झाली व ते लंडनला गेले. त्यावेळी ते अवघे २३ वर्षांचे होते. १९१० साली त्यांना पकडून त्यांच्यावर खटला चालवण्याकरता त्यांना भारतात परत पाठवण्यात आले. काही महिन्यांतच त्यांच्यावरील खटल्याचा निकाल लागून २४ डिसेंबर १९१० रोजी त्यांना दोन जन्मठेपांची शिक्षा जाहीर झाली. ही शिक्षा भोगावयास त्यांना अंदमानला पाठवण्यात आले. त्यांच्या बिल्ल्यावर छापण्यात आलेली सुटकेची तारीख होती २३ डिसेंबर १९६०!

१९२१ साली सावरकरांना अंदमानातून भारतातील तुरुंगात स्थलांतरित करण्यात आले. 'कोणत्याही राजकीय चळवळीत सहभाग घेणार नाही', या अटीवर १९२४ साली त्यांना रत्नागिरीला स्थानबद्ध अवस्थेत ठेवण्यात आले. स्वातंत्र्यापूर्वी केवळ दहा वर्षे आधी, म्हणजे १९३७ साली त्यांची सुटका केली गेली. सुमारे २७ वर्षे त्यांना समाजापासून दूर ठेवण्यात आले.

अंदमान असो वा रत्नागिरीची स्थानबद्धता, सावरकरांनी विपुल लेखन केले. लंडनच्या चार वर्षांच्या वास्तव्यात खऱ्या अर्थाने त्यांच्या चळवळी रुजवल्या गेल्या. १९०६ साली त्यांनी जोसेफ मॅझिनीचे चरित्र लिहिले. त्यांचे बंधू बाबाराव सावरकर यांनी जून १९०७ मध्ये ते प्रकाशित केले. वर्षभरात ब्रिटिश सरकारने त्यावर बंदी आणली. १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्य समरावर त्यांनी मूळ पुस्तक मराठीत लिहिले. ते युरोप व भारतात छापण्याचा अयशस्वी प्रयत्नही झाला. त्याचे इंग्रजी भाषांतर करून गुप्त रीतीने १९०९ साली ते हॉलंडमध्ये प्रकाशित झाले. हे भाषांतर जगभर उपलब्ध तर झालेच; शिवाय ते पुस्तक क्रांतिकारकांची गीता ठरले. साहजिकच ब्रिटिश सरकारने त्यावर जप्ती आणली. शीखांचा इतिहासही त्यांनी पॅरिसच्या वास्तव्यातच लिहिला. दुर्दैवाने आज तो उपलब्ध नाही. याकरिता सावरकरांनी शीखांचा पवित्र धर्मग्रंथ आदिग्रंथ (पंथ प्रकाश व विचित्र नाटक) यांचा सखोल अभ्यास केला. कुठलेही लिखाण ते सखोल अभ्यासाशिवाय करत नसत. १७ ऑक्टोबर १९०६ ते २६ नोव्हेंबर १९०९ या कालावधीत सावरकरांनी ४३ बातमीपत्रे भारतात पाठवली आणि मराठी वृत्तपत्र 'विहारी'त ती प्रकाशित झाली. शीखांनी ब्रिटिशांविरुद्धच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी व्हावे म्हणून त्यांनी लंडनच्या वास्तव्यात गुरुमुखीतून पुस्तिका प्रकाशित केली.

१८५७ च्या स्वातंत्र्य युद्धास १९०७ साली ५० वर्षे पूर्ण झाली. 'तुमचे

बलिदान व्यर्थ होणार नाही व भारताच्या स्वातंत्र्याकरिता सर्व शक्तिनिशी लढा देऊ', असे आश्वासन देणारी ''Oh, Martyrs!'' ही पुस्तिका त्यांनी तेथूनच प्रकाशित केली. भारतातील अनेक संस्थानिकांचे वास्तव्य त्यावेळी लंडन येथे असे. ब्रिटिशांविरूद्ध स्वातंत्र्य लढ्यात त्यांनीही सहभागी व्हावे म्हणून त्यांना आवाहन करणारी ''Choose, Oh Indian Princes'' ही पुस्तिका लिहिली.

सावरकर राहत होते ते भारतभवन (इंडिया हाऊस) म्हणजे या क्रांतिकारक लिखाणाचे व क्रांतिकारक घडवण्याचे मोठे केंद्रच ठरले. नंतर प्रसिद्धीस आलेल्या असंख्य भारतीयांचा येथे सावरकरांशी विचारांचे आदानप्रदान करण्यासाठी येणाऱ्यांमध्ये सहभाग होता.

भाई मतिदास यांनी इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला म्हणून १६७६ साली औरंगजेबाने त्यांची कातडी सोलून काढली होती. त्यांचेच वंशज भाई परमानंद हे सावरकरांचे येथेच सहकारी बनले. पुढे त्यांनाही अंदमानला जावे लागले. अमेरिकेतील 'गदर' चळवळीचे प्रवर्तक लाला हरदयाळ यांना क्रांतीचे धडे या भारत भवनातूनच मिळाले. सरोजिनी नायडू यांचे बंधू विरेंद्रनाथ चट्टोपाध्याय हेही भारतभवनच्या कुटुंबातलेच. रशियात स्टॅलिनने त्यांना गोळ्या घातल्या असे म्हटले जाते. सेनापती बापट, हेमचंद्र दास, होतीलाल वर्मा यांना रशियन क्रांतिकारकांपासून बाँब तयार करण्याचे शिक्षण घेण्याकरता पॅरिसला पाठवण्याचा निर्णय या भारत भवनातच घेण्यात आला.

बाँब बनवण्याची पुस्तिका होतीलाला वर्मा यांनी पुण्याला येऊन टिळकांच्या स्वाधीन केली. दादाभाई नौरोजी, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, डॉ. राजन, डॉ. के. पी. जयस्वाल, मादाम कामा, एमपीडी आचार्य, व्यंकट सुब्रमण्यम, व्यंकट वर्मा असे कित्येक क्रांतिकारक व राजकीय पुढारी भारतभवनमध्ये सावरकरांशी चर्चा करायला व त्यांच्या सभांमध्ये सहभागी व्हायला येत. याच दरम्यान सावरकरांची महात्मा गांधींशी दोनदा भेट झाली. एकदा भारत भवनमध्ये व दुसऱ्यांदा कॅक्सटन सभागृहात.

सावरकरांवर आज शेकडोंनी पुस्तके आहेत. तरी दुर्दैवाने आज सावरकर वाचणे व पचवणे जड आहे. त्यांच्या राजकीय मतांबरोबर त्यांची सामाजिक मतेही क्रांतिकारकच होती. ते कठोर विज्ञानवादी आणि तर्कनिष्ठ होते. त्यांचा क्रांतिकारक लढा हा ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्ध होता.

सावरकर लोकशाही व व्यक्तिस्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्ते होते आणि म्हणूनच सशस्त्र क्रांतीसाठी काढलेली 'अभिनव भारत' ही संस्था भारत स्वतंत्र झाल्यावर १९५२ साली त्यांनी विसर्जित केली. दुर्दैवाने सावरकरांची विभागणी ही सावरकरवादी व सावरकर विरोधी अशा दोन गटांत झाली. स्वातंत्र्याला ६० वर्षे पूर्ण झाल्यावर आज सावरकरांचे लेखन व विचार यांचा भावनेच्या पलीकडे जाऊन विचार होणे आवश्यक आहे. कधी नव्हती इतकी सावरकरांची भारताला आज खरोखर गरज आहे. आज सावरकर आपल्यात नसले तरी त्यांनी लिहिलेले साहित्य आज उपलब्ध आहे. त्याचा चिकित्सक अभ्यास पुढील पिढ्यांना मार्गदर्शकच ठरणार आहे.

या प्रक्रियेला उत्तेजन देण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाने त्यांच्या साहित्यावर निबंध लिहिण्याची एक स्पर्धा जाहीर केली आहे. पहिला क्रमांक मिळवणाऱ्या स्पर्धकाला तीन दिवसांची अंदमानची अभ्यास सहल मंडळ घडवून आणणार आहे. सावरकरांच्या लेखनाचा अभ्यास करण्याचे हे एक निमित्त आहे. सावरकरांची ४३ बातमीपत्रे पुनर्टंकलिखित करून मंडळाच्या '**ग्रंथालय.ओआरजी**' या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. वाचकांनी त्याचा लाभ अवश्य घ्यावा.

– जुलै २०१०

❖❖❖

# 'ऑगस्ट'चा महिमा

ऑगस्ट हा आपल्या दृष्टीने महत्त्वाचा महिना असतो. या महिन्यात दिनांक एक रोजी लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी असते, तर दिनांक पंधरा रोजी आपण देशाचा स्वातंत्र्यदिन साजरा करतो. त्याबरोबरच या महिन्यात श्रावण महिनाही सुरू होतो. या श्रावणातले अनेक सण आपण साजरे करतो. दोन महिन्यांमध्ये पडलेल्या पावसामुळे सगळीकडे हिरवेगार झालेले असते. निसर्ग प्रसन्न दिसत असतो व शेतकरी वर्ग आपल्या नवीन पिकांच्या आशेने उल्हसित झालेला असतो.

पण दुर्दैवाने उल्हसित होण्यासारखे चित्र मात्र आज आपल्या देशात नाही. ६० वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही 'पारतंत्र्य बरे होते' असे म्हणण्याची वेळ अनेकांवर येऊन ठेपली आहे. स्वातंत्र्यापेक्षा पारतंत्र्याचा काळ बरा वाटावा यापेक्षा आणखीन दुःखदायक घटना कोणती असेल? आपण पारतंत्र्यात होतो म्हणजे ब्रिटिशांच्या वसाहतवादाखाली होतो. पारतंत्र्याचा 'काळ चांगला होता' असे म्हटले जाते तेव्हा अशा नागरिकांच्या डोळ्यांसमोर त्यावेळची कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती असते.

स्वतंत्र भारताने स्वतःची घटना तयार केली आणि देशभरात अनेक न्यायालयांचे जाळे अस्तित्वात आले. ब्रिटिशांनी केले नसतील इतके कायदे स्वातंत्र्योत्तर कालखंडात आपण देशात बनवले. उच्चतम न्यायालयापासून कनिष्ठ न्यायालयांपर्यंत आजच्या घडीला प्रलंबित असणाऱ्या दाव्यांची संख्या इतकी आहे की, २४ तास न्यायालये चालू ठेवून, यापुढे नवीन दावे घ्यायचे बंद केले तरी, प्रलंबित दाव्यांचा पुढील ५० वर्षांत निचरा होणारा नाही. मानवी हक्क, बालहक्क, स्त्रियांचे हक्क, तृतीयपंथीयांचे हक्क ... या सर्वांमुळे एक इंचभरही सामाजिक क्षेत्र आपण शिल्लक ठेवले नाही.

याच्या जोडीला आरक्षण व सवलतींचा भरमसाठ पाऊस चालूच आहे. एवढे असूनही सेकंदागणिक नवीन गुन्हे घडणे चालूच आहे. सुसंस्कृत, सभ्य समाजातच घटना व कायदे यांचे उपयोजन व कार्यवाही प्रभावी ठरू शकते. खरे तर अशा सभ्य समाजावर खरे नियंत्रण असते ते व्यक्तिगत व सामाजिक नीतिमूल्यांचे. त्यामुळेच अशा सभ्य, सुसंस्कृत समाजात कमीत कमी कायदे असतात; त्यांची आरक्षणे व सवलतींची गरजही किमान असते. स्वातंत्र्यपूर्व भारत व स्वातंत्र्योत्तर कालखंडामधील भारत या दोहोंमध्ये सर्वांत मोठा फरक हा आहे की, स्वातंत्र्योत्तर भारतातील नागरिक अतिशय वेगाने नीतीहीन, चारित्र्यहीन झाला आहे. अशा स्थितीमुळेच सुधारणांच्या नावाखाली आपण सर्वच नियंत्रणे व बंधने झुगारून देण्यात धन्यता मानत आहोत.

स्वातंत्र्य, पुरोगामित्व यांसारख्या संकल्पना या किमान चारित्र्य ज्या समाजात शिल्लक आहे त्या समाजात सुसंगत असू शकतात. स्वैराचारी, अप्पलपोटी, स्वार्थी, लाचार अशा 'गुणांनी' लडबडलेला समाज प्रत्येक चांगल्या संकल्पनेची माती करू शकतो. आज आपल्या देशात हेच घडत आहे. दुर्दैवाने समाजाच्या राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक नेतृत्वाने उपरोक्त 'गुणांचा' उच्चांक गाठला आहे.

आजचे ध्वनिप्रदूषण, आपल्या पारंपरिक सणांचे विकृतपणे केले जाणारे राजकीयीकरण, पदपथ-रस्ते यांवरील अतिक्रमणे, बेकायदेशीर बांधकामे, अस्वच्छतेचा महापूर... ही यादी संपणारी नाही. थोडक्यात, गेल्या ६०-६२ वर्षांत अशा सर्वच आघाड्यांवर आपण दिवाळखोरीची परिसीमा गाठली आहे. या पार्श्वभूमीवर लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी आणि स्वातंत्र्यदिन या दोन केवळ घटना नसून, सुसंस्कृत समाजाच्या अस्तित्वासाठी प्रेरक ठरतील अशा प्रेरणादायी घटना आहेत. लोकमान्य टिळकांचे प्रसिद्ध उद्‌गार, ''स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध

हक्क आहे व तो मी मिळवणारच!'' हे मंत्राचे सामर्थ्य लाभलेले उद्‌गार होते. या स्वातंत्र्यात स्वैराचार अभिप्रेत नव्हता. लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ती रानडे, नामदार गोखले हे त्या काळातले नेतृत्व चारित्र्यवान, मूल्यांचे अधिष्ठान असणारे नेतृत्व होते. 'मी काय घेऊ शकेन' यापेक्षा 'मी देशासाठी काय देऊ शकेन' हा विचार या नेतृत्वामागे प्रबळ होता. आजचे व तेव्हाचे नेतृत्व या दोहोंतील फरक हाच समाज घडवणारा किंवा बिघडवणारा असतो. लज्जेला सुद्धा लाज वाटेल, ती ओशाळेल इतके चारित्र्यहीन, ओंगळ आणि भ्रष्ट नेतृत्व आज जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत आपल्याला लाभले आहे.

आई, वडील, शिक्षक, गुरू अशा सर्व नात्यांचे आज आपण स्वार्थप्रेरित व्यापारीकरण करून टाकले आहे. शिक्षण आणि संस्कार यांमुळे मनुष्य घडवला जातो. परंतु दूरदर्शनसह आपल्या सर्वच माध्यमांनी आज नग्नतेचा जो अंगीकार केला आहे त्यामुळे वेगळेच संस्कार घडू लागले आहेत. शिक्षणाचे झपाट्याने होत चाललेले सरकारीकरण अधिक गतिमान करून आम्ही ते नोकरशाहीच्या दावणीला बांधले आहे.

या पार्श्वभूमीवर या उद्वेगजनक चित्रात जर का बदल करावयाचा असेल तर त्याची सुरुवात स्वतःपासून करायला हवी; पण सर्वांनाच शिवाजी हा शेजारच्या घरात जन्माला यावा असे वाटते, हे दुःख आहे. चांगले संस्कार, नाती आणि त्याकरता आवश्यक असणारी कौटुंबिक नियंत्रणे ही मागासलेपणाची लक्षणे असतील तर आजच्या २१ व्या शतकातील या पुरोगामित्वापेक्षा १८/१९ व्या शतकांतील मागासलेपणा, प्रतिगामित्व हेच आजच्या रोगावर उपचार ठरणार आहेत!

निर्भीड, चारित्र्यवान, संयमी, विवेकी नागरिक बनणे हाच स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचा खरा आशय ठरेल आणि तीच युगपुरुष लोकमान्य टिळकांना वाहिलेली खरी श्रद्धांजली असेल.

**– ऑगस्ट २०१०**

❖❖❖

# सणावारांचे सांस्कृतिक अधःपतन

आजच्या आपल्या धार्मिक सणांना प्राप्त झालेले विकृत स्वरूप मन सुन्न करणारे आहे. 'दिशा'च्या आधीच्या संपादकीयांमधून याविषयी अनेकवार लिहिलेले आहे. एकतर परंपरांच्या नावाखाली या सणांचे व्यापारीकरण चालू आहे व या सर्व प्रक्रियेत राजकारण्यांनी त्याचा ताबा आपल्या हातात घेतला आहे. वास्तविक मानवाच्या ऐहिक व पारलौकिक आकांक्षांच्या भावनांचा उत्तम समन्वय साधणारी, सांस्कृतिक अनुबंध प्रकट करणारी आणि जीवनाच्या अंगोपांगांना स्पर्श करणारी भावना म्हणजे धर्म; पण या धार्मिक सणांच्या निमित्ताने चाललेले राजकारणाचे गुन्हेगारीकरण, सणांचे राजकीयीकरण यांनी उबग येईल इतकी खालची पातळी गाठली आहे. एरवी परिवर्तन, पुरोगामित्व, अंधश्रद्धा यांचा उठताबसता घोष करणारे महाराष्ट्रातील बुद्धिवादी या अधोगतीची दखल घेताना, त्यावर टीकाटिपण्णी करताना दिसत नाहीत.

'पळा, पळा कोण पुढे पळे तो' यात म्हटल्याप्रमाणे वृत्तपत्रे व दूरदर्शन ही माध्यमे व्यापारीकरणाच्या या वाहत्या (गटार) गंगेत डुंबत आहेत. 'तरुणाई थरारली',

‘तरुणाई जल्लोष’, ‘ पावले थिरकली’ असे शाब्दिक बुडबुडे फोडून अत्यंत घाण, गलिच्छ आणि हीन वर्तनाच्या धिंगाण्याला संस्कृतीचे कोंदण देऊन ही वृत्तपत्रे, वाहिन्या धन्यता मानताना दिसतात. लेखकाने लिहिलेले संवाद तोंडपाठ करून, त्यासाठी भरपूर बिदागी घेऊन ‘कलाकार’ म्हणून मिरवणारे नट-नट्या यांचाही या अधःपतनास ‘कलात्मक’ पाठिंबा असतो. ज्यांनी समाजाचे प्रबोधन करायचे तेच अंध लोकानुनय आणि सवंग लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ होण्याची केविलवाणी धडपड करतात हे पाहिल्यावर पराकोटीची विषण्णता वाटते. चंगळवादाचा पुरस्कार करणारी ही मंडळी स्वतःबरोबर समाजाचाही घात करतात.

आपल्या धर्मातील सणांची रचना ही अत्यंत खुबीदारपणे निसर्गातील बदलांवर आधारित अशी करण्यात आली आहे. बहुतेक सण स्त्रीप्रधान असले तरी घरातील सर्व लहान-मोठे सदस्य त्यांत सहभागी होऊ शकतील अशी त्यांची रचना आहे. मराठीतील निसर्गकवी म्हणून ओळखले जाणारे बालकवी श्रावणाचे वर्णन करताना म्हणतात,-

**‘‘श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे।**
**क्षणात येई सरसर शिरवे, क्षणांत फिरुनी ऊन पडे।।’’**

उदाहरण म्हणून श्रावणातील सण लक्षात घ्यावेत असे आहेत. नागपंचमी, मंगळागौरी, नारळीपौर्णिमा, गोकुळाष्टमी, पोळा या सर्व सणांच्या सादरीकरणाची पद्धत पाहा. स्त्रियांचा निसर्गाशी संवाद साधण्याचा प्रयत्न असतो. पिके परिपक्व झाल्यावर आश्विन कार्तिकातील विजयादशमी, दिवाळी हे सण अत्यंत मंगल असे पावित्र्य सांभाळत समाजाचे प्रबोधन करतात.

या ना त्या स्वरूपात नीतिमूल्ये, चारित्र्य यांचे संवर्धन सणांच्या माध्यमातून केले जाईल असा प्रयत्न असतो. या रचनेस, बांधणीस व संवर्धनास शेकडो वर्षे झाली. बाह्यरूपी विज्ञानाचे कवच या सर्वांस नसले तरी मानसिक व सामाजिक विज्ञानाची त्यात मोठी जाण होती. साहित्य व कला यांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या सृजनशीलतेला त्यात भरपूर वाव होता.

या पार्श्वभूमीवर, आपल्या सण साजरे करण्याच्या अधोगतीचे स्वरूप हे एकाप्रकारे समाजाने कवटाळलेल्या हीन अभिरुचीचे प्रतिबिंब आहे. सर्व सुबुद्ध संस्कृतीप्रेमी नागरिकांनी आपल्या सर्व शक्तीनुसार हा सांस्कृतिक ऱ्हास थांबवण्याचा

प्रयत्न केला नाही तर दिशाहीन समाज व त्याची पुढची पायरी म्हणजे गुलामी ही फार दूर नाही. लोकांना सुबुद्धी सुचो व या दुष्ट चक्रातून समाजाची सुटका होवो! सरकार, सरकारी नेते, पोलिस या सर्व घटकांना सांस्कृतिक संदर्भ समजोत ही परमेश्वराजवळ प्रार्थना!

**– सप्टेंबर २०१०**

❖❖❖

# सोहळे, भाषा आणि गुलामी

२६ ते २८ डिसेंबर २०१० रोजी ठाणे महानगरात ८४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरत आहे. ठाण्यात भरणारे हे तिसरे संमेलन आहे. पहिले संमेलन १९६० साली (अध्यक्ष - रा. श्री. जोग) तर दुसरे संमेलन १९८८ साली (अध्यक्ष - वसंत कानेटकर) झाले. ठाण्याच्या सांस्कृतिक संवर्धनाच्या दृष्टीने ही बाब उपयुक्त आणि महत्त्वाची आहे.

सध्या जगात भारतीय विवाह सोहळ्यांची बरीच चर्चा चालते. आपल्या संस्कृतीत विवाह हा ‘संस्कार’ आहे, करार नाही. पण आधुनिक ‘विवाह’ सोहळ्यात विवाह ‘गौण’ व सोहळा ‘प्रमुख’ अशी अवस्था झाली आहे. ही बाब वरकरणी साधी दिसणारी असली, तरी समाज घडणीच्या प्रक्रियेचे ते एक प्रतिबिंब आहे. मुक्त अर्थव्यवस्थेत प्रत्येक मालाला बाजारपेठ निर्माण करावी लागते. प्रत्येक वस्तूला एक सामाजिक दर्जा द्यावा लागतो. व्यक्ती आणि सामाजिक दर्जाचे समीकरण प्रसिद्धी माध्यमे ‘दृढ’ करत असतात. व्यक्ती आणि अशा वस्तूंचा वापर, प्रत्येकाचे समाजातील स्थान ठरवणारी सूची ठरू लागते. लग्न एकदाच होते,

पण वाढदिवस दरवर्षी येत असतो. म्हणून वाढदिवस, मुंज, गृहप्रवेश यांसारख्या गोष्टी सोहळ्यासारख्या व्हायला लागल्या. एका 'व्यापारी' यंत्रणेला सर्व समाज बळी पडतो व कालांतराने या सोहळ्यांची 'समर्थने' व्हायला लागतात! आताची दंतमंजने, साबण, घालायचे कपडे यांच्या जाहिराती हे याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. जाहिरात केली की माल विकला जातो हे सूत्र पुढे 'व्यक्ती' व 'संस्था'नाही लागू होते व व्यक्ती व संस्था 'छुप्या' आणि 'उघड' जाहिराती करू लागतात. साहजिकच 'दर्जा' व 'जाहिरात' यांचा संबंध बहुतांश 'व्यस्त' असतो. दर्जाहीन गोष्टींना प्रचाराच्या कुबड्या लावून उंच करावे लागते. अफूची गुंगी ही सुरुवातीला कमी मात्रा असली तरी लगेच मिळते. शरीराला त्या मात्रेची सवय झाली की तोच आनंद मिळवण्यासाठी मात्रेचे प्रमाण वाढवावे लागते. साध्या जाहिराती अंगवळणी पडल्या की विक्रीच्या संदर्भात त्या उपयोगी ठरेनाशा होतात. म्हणून मग अतिरेकी, सनसनाटी, कल्पित संघर्ष या सगळ्यांचा खुबीदार वापर करून जाहिराती अधिकाधिक चटकदार व्हायला लागतात. चांगली अभिरुची ही आकाशातून पडत नाही. तिची 'मशागत' करावी लागते. पण जाहिरातदारांना समाजाच्या अभिरुचीचे काहीही सोयरसुतक नसते. उलट 'अभिरुची' ही त्यांची अडचणच असते.

याचाही सराव होऊन त्यांची मात्रा कमी पडायला लागते तेव्हा अर्वाच्य भाषा, असभ्य वर्तने, सर्वांत महत्त्वाचे व शेवटचे अस्त्र म्हणजे 'लिंगपिसाटपणा' हा अशा जाहिरातींतून यायला लागतो. यावर वाद घडवण्यात येतात; त्याला व्यक्तिस्वातंत्र्य, उच्चारस्वातंत्र्य यांची फोडणी देऊन त्या अधिक 'सवंग' करण्यात येतात. या सर्व 'बाजारू' प्रक्रियेत उत्पादनांचा खप वाढविण्यापलीकडे 'संस्कृती' संवर्धनात याचे काहीही योगदान नसते. उलट 'हीन' अभिरुचीचा समाजच यातून निर्माण होत असतो.

आर्थिक दृष्ट्या व म्हणूनच सांस्कृतिक दृष्ट्या प्रगतीच्या श्रेष्ठत्वाचा टेंभा मिरवणाऱ्या अमेरिकेची संस्कृती हे या गोष्टीचे 'उत्तम' उदाहरण आहे. पराकोटीचा आत्मकेंद्रित, चंगळवादी समाज हा यातून निर्माण होतो. आर्थिक सुबत्तेत या सर्व गोष्टी एकवेळ चालून जातात; पण आर्थिक 'सूज' उतरली की असा समाज 'भ्रष्ट' व 'नष्ट' व्हायला वेळ लागत नाही. आर्थिक उदारीकरणाच्या नावाखाली आजचे भारतीयही या संस्कृतीची उसनवारी करताना दिसत आहेत आणि त्याची फळेही आपण आज भोगायला लागलो आहोत.

सौंदर्याचा काडीमात्र संबंध नसलेल्या जागतिक सौंदर्य स्पर्धा अमेरिका व युरोपमध्ये भरवल्या जात असत. अर्थातच 'सौंदर्याशी' निगडित वस्तूंची 'विक्री' वाढवण्याकरता योजण्यात आलेली प्रचाराची ती एक 'नवीन' शक्कल होती. साहजिकच त्यातील फोलपणा लवकरच उघडकीस आला आणि या सौंदर्य सोहळ्यांची निर्यात 'भारत' आणि इतर विकसनशील राष्ट्रांत करण्यात आली. त्यांतील अर्धनग्नता 'आंबट' शौकिनांना सुखावत तर होतीच; पण आम्हीही या स्पर्धांत मागे नाही हे दाखवण्याची संधी अनेक 'बुद्धिवंतांनी' साधली. या एका 'बाजारू' सोहळ्याचे आज एवढे प्राबल्य वाढले आहे की, शालेय कार्यक्रमांपासून ते कॅन्सरसारख्या असाध्य रोगाच्या रुग्णांना दिल्या जाणाऱ्या मदतीपर्यंत त्याचा मुक्तपणे वापर चालू झाला आहे. यांतील 'सौंदर्य' केव्हाच बाद झाले असून 'हिडीस' 'अंगे' मात्र 'व्यक्तिमत्त्व विकास' या नव्या अंगरख्यामागे लपून प्रसारित होत आहेत. आपल्या वाहिन्यांवरचे बहुतेक सर्व नाच-गाण्यांचे कार्यक्रम हे अमेरिकेतील दूरदर्शनच्या कार्यक्रमांची 'हुबेहूब' किंवा 'भ्रष्ट' नक्कल आहेत. ही 'चोरी' न सांगता नवीन 'आविष्कार' वगैरेची थापेबाजी चालू असते. अनेक मराठी 'प्रतिभावान' लेखकांनी चक्क इंग्रजी व फ्रेंच कथा-कादंबऱ्यांची उचलेगिरी केली आहे. अर्थात त्यांचा आव मात्र 'स्वतंत्र' प्रतिभेचा आहे.

हीच प्रक्रिया आज मराठी 'साहित्याच्या' नावाने होणाऱ्या प्रकाशनापासून ते साहित्य मेळाव्यापर्यंत पहायला मिळते. साहित्याचा दर्जा जितका 'निकृष्ट' तेवढा त्यातील सोहळ्याचा आलेख 'उंच'. सोहळा म्हटला की 'खर्च' आला व खर्च म्हटला की 'घोटाळे'ही आलेच. मराठी भाषेची ही अवस्था ही भाषेबरोबरच तिच्या संस्कृतीचीही आहे. भाषा ही संपर्क माध्यम व संस्कृतीची वाहक असते. प्रत्येक भाषा ही सुरुवातीला बोली असते व मग प्रमाणित होते. संस्कृती जेवढी स्खलित होते तेवढी भाषाही कमकुवत व्हायला लागते. संस्कृतीची 'सृजनशीलता' आटली की उसनवारीचा सोपा मार्ग 'राजमार्ग' बनतो. मराठी ही विज्ञानाची भाषा होणे हे महत्त्वाचे आहे. येथे विज्ञान म्हणजे पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र अशांपुरता 'मर्यादित' अर्थ नसून मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, साहित्यशास्त्र इत्यादी मानव्यातील अनेक शाखांचा अर्थ अपेक्षित आहे.

हे ज्ञान वाहण्याची क्षमता आपल्या भाषेत निर्माण करणे हे फक्त साहित्यिकांचे नाही, तर अभ्यासक व संशोधकांचेही ते काम असते. पण जणू काही साहित्यिक लिहितात तीच 'भाषा' असा आभास निर्माण केला जातो. आमच्या बहुतेक मराठी

नाटक, सिनेमा, दुकानांच्या पाट्यांपासून ते व्यापारी संस्थांपर्यंत बहुतेक सर्वांची शीर्षके मराठी नाहीत. एका 'न्यूनगंडाने' पछाडलेल्या संस्कृतीचे ते लक्षण आहे. हा प्रश्न 'अहंकाराचा' नसून 'स्वाभिमानाचा' आहे. दुर्दैवाने याकडे अभ्यासकांपेक्षा राजकारण्यांचे लक्ष गेले व भाषेचेही 'राजकारण' व्हायला लागले.

'आजच्या' मराठी भाषेचे वय फक्त २०० वर्षे आहे. मराठी भाषेचा इतिहास म्हणून आपण बघतो तो महानुभावांच्या ग्रंथांपासून (१२/१३ वे शतक). पण महानुभावच काय पण १७ व्या शतकातील शिवाजी महाराजांच्या काळापर्यंतची मराठी ही कुठल्याही 'प्रमाणित' चौकटीत नसल्याने ती समजणे आजही जड होऊन बसते. म्हणूनच, चिरकाळ टिकण्यासाठी भाषा 'प्रमाणित' करावी लागते. भारतातील अनेक प्राकृत भाषांपैकी मराठी ही एक असून ती संस्कृतोद्‌भव आहे. यादवकालीन मराठीवर 'कानडी', तर शिवकालीन मराठीवर 'मोगली' भाषेचा प्रभाव आहे. भाषेला स्वतःचा 'कणा' व 'प्रमाणित्व' नसले की राजव्यवहारापासून ते लोकव्यवहारापर्यंत उसनवारीचा वापर होऊ लागतो.

स्वातंत्र्यानंतर 'इंग्रज' गेले. पण दुर्दैवाने इंग्रजी एवढी प्रभावी झाली की, 'भाषा समृद्धी'च्या नावाखाली इंग्रजीची 'उसनवारी' हे आज 'प्रगतीचे' द्योतक ठरू लागले. काही अभ्यासक तर मराठीचा उगम कानडी, तमिळ या भाषांमध्ये बघतात; तर कदाचित चार-पाचशे वर्षांनंतर 'मराठी ही इंग्रजीतून उद्‌भवली' असा शोध चालू झाला तर त्याचे नवल वाटणार नाही!

आईचे दूध मुलाला अनेक रोगांपासून संरक्षण देते; पण ते मिळाले नाही तर गाईचे दूध भूक भागवते. संस्कृत आणि मराठीचा संबंध असाच आहे. तो संशोधनाने मान्य केला, पण आपण काहीतरी 'जास्त' सांगतो हे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न हा मराठीची संस्कृत पासून 'फारकत' करून काही अभ्यासक करतात. यात संस्कृतपेक्षा मराठीचीच 'हानी' जास्त होते व इंग्रजीची उसनवारी वाढते.

संस्कृतीची अनेक 'अंगे' व्यक्त करण्याची क्षमता संस्कृत भाषेत आहे. तिला अडीच-हजार वर्षांची परंपरा आहे. संस्कृत ही कुठल्याही राज्याची, पंथाची, वंशाची भाषा नसून हेतुपुरस्सर पाणिनी या वैज्ञानिकाने तयार केलेली ती 'कृत्रिम' भाषा आहे. वैदिक भाषेचा तिला वारसा आहे. जगात असे दुसरे उदाहरण नाही. या भाषेत अमाप साहित्य निर्माण झाले आहे. इंग्रजी जेव्हा विज्ञानासाठी वापरली जाते तेव्हा 'लॅटिन' आणि 'ग्रीक' शब्दच त्याकरता वापरले जातात. वैद्यकशास्त्राच्या

पुस्तकातील बरेच शब्द ‘लॅटिन’ व ‘ग्रीक’ आहेत. कारण या शब्दांची ‘अभिव्यक्ती’ क्षमता इंग्रजीत नाही. पण जगात हा वाद कधीही झाला नाही. दुर्दैवाने मराठीचे संशोधकच संस्कृत व मराठीत फारकत करून मराठीचे मारेकरी ठरत आहेत.

आजच्या ‘प्रगत’ विज्ञानात आम्ही मराठीची ‘हार’ केव्हाच ‘मान्य’ केली आहे. ही हार मराठीपेक्षा जास्त मराठी ‘संशोधन’ व ‘अभ्यासकां’ची आहे. आजचे धेडगुजरी मराठी वृत्तपत्र वाचण्यापेक्षा इंग्रजी वृत्तपत्र वाचणे बरे वाटते. संगणकावर कविता टाकणे म्हणजे संगणक व मराठीचा संबंध जोडणे नाही. संगणकाची भाषा मराठीत प्राप्त करून देण्यासाठी ज्या तांत्रिक गोष्टी करणे आवश्यक आहेत त्यांची आजही पूर्तता झालेली नाही. इंग्रजी, चिनी, जपानी, फ्रेंच, जर्मन या सर्व भाषांनी संगणकाच्या सार्वजनिक वापराकरता ‘विश्वसंकेती’ (युनिकोड) सूत्र मान्य केले आहे, आणि म्हणून त्यांचा संगणकावरील वापर त्या त्या देशांत सुलभतेने करण्यात येतो. मराठीला हे स्वरूप देण्यासाठी फ्रेंच आणि अमेरिकन अभ्यासकांनी प्रयत्न केले. ज्या मराठी अभ्यासकांनी असे प्रयत्न आयुष्यभर केले त्यांची मराठी विश्वाने दखल घेतली नाही. (येथे कै. र. कृ. जोशी यांचे योगदान अभिप्रेत आहे.) मराठीलाही ‘विश्वसंकेती’ सूत्र मिळाले असले तरी त्याच्या वापराकरता आपले सरकार व वाचक आग्रही नाहीत.

‘प्रमाणित’ भाषा ही लिंग, वय, पंथ, प्रांत यांना छेदून जाते. विदर्भापासून कोकणापर्यंत कुठलाही ‘मराठी’ माणूस त्यातून ‘व्यवहार’ करू शकतो. आज दुर्दैवाने ‘प्रमाण’ भाषेपेक्षा ‘बोली’ भाषांच्या सोहळ्यांना महोत्सवी स्वरूप देण्यात आपण धन्यता मानतो. शहरी, ग्रामीण, स्त्री, पुरुष, गरीब, श्रीमंत, दलित इ. अनेक ‘कल्पक’ सोहळे आयोजित केले जातात. यांतून गोंधळ वाढतो. ‘बोली’ भाषांचे जतन आणि संवर्धन करण्याइतकेच भाषेला ‘प्रमाणित’ करणेही महत्त्वाचे आहे. अभाव फक्त इच्छा-शक्तीचा आहे.

साहित्य संमेलनांमध्ये चावून चोथा झालेल्या स्त्री, ग्रामीण, दलित इ. विषयांवरील चर्चासत्रे चालू असतात. वर म्हटल्याप्रमाणे वस्तू विकण्यासाठी जाहिरातदारांना सतत ‘नवीन’ कल्पना कराव्या लागतात. तसेच ‘अन्याय’, ‘उपेक्षा’ इ. चा अशा चर्चासत्रांत वापर केला, की ही चर्चासत्रे अधिक यशस्वी होतात. ठाण्याचा साहित्य संमेलनाने यापेक्षा वेगळे मार्ग आखल्याचे ऐकिवात नाही. तोंडी लावण्यास संगणक आहे. पण संगणकाला लागणाऱ्या मराठीचा मात्र त्यात विचार नाही. तरीही हा

'सोहळा' यशस्वी तर नक्की होईलच आणि आपणही त्या दृष्टीने सहकार्य देणे योग्य ठरेल. पण मराठी भाषेच्या विकासासाठी त्याची किती मदत होईल या बाबत 'प्रश्नचिन्हच' आहे. आजची मराठी वृत्तपत्रे, करमणुकीचे आणि वाहिन्यांवरचे कार्यक्रम यांनी जास्तीत जास्त इंग्रजी शब्द वापरून मराठीच्या समृद्धीचा (!), विकासाचा (भकासाचा) विडा उचलला आहे. ३५० वर्षांपूर्वी 'राज्यव्यवहार' कोश तयार करून शिवाजी महाराजांनी संस्कृतप्रचुर मराठी राजव्यवहारात आणण्याचा प्रयत्न केला. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला वीर सावरकरांनी तोच प्रयत्न पुन्हा केला. पण समाजकारणाचे 'राजकारण' व मग त्याचे 'गुन्हेगारी'करण करणाऱ्या आणि शेवटी त्याच समाजाला 'जातीय' कुंपणात सडवणाऱ्या नेते मंडळींना त्याची काय पर्वा! 'फुकटेपणा', 'आरक्षण' आणि 'सवलतग्रस्त' झालेली प्रजाही याला तेवढीच जबाबदार आहे. भौगोलिक वसाहतवाद जरी संपला असला तरी सांस्कृतिक वसाहतवाद जोमाने पसरत आहे.

भविष्यात चौथे साहित्य संमेलन जेव्हा ठाण्यात भरेल तेव्हा त्याचे शीर्षक 'मराठी लिटररी मीट' असे असण्याची शक्यता दाट आहे. आजची मराठी शाळांची रोडावणारी संख्या बघता, अध्यक्षांचे भाषण हे मधे मधे मराठी शब्द वापरून इंग्रजीत असेल. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याबरोबरच अमेरिकेच्या अध्यक्षांनाही 'मदतीचे' पत्र आणि आग्रहाचे निमंत्रणही गेलेले असेलच. गुलामास एकवेळ 'स्वतंत्र' करता येते पण 'गुलामी मानसिकता' मात्र 'अस्मिता' आणि 'स्वातंत्र्यालाच' हद्दपार करते. कालांतराने गुलामाची संस्कृती आणि भाषा 'भ्रष्ट' व मग 'नष्ट' होते. 'सोहळे', 'अन्याय' आणि 'उपेक्षेच्या' कथा मात्र चालू राहतात.

कालाय तस्मै नम!

**– डिसेंबर २०१०**

❖❖❖

# भ्रष्टाचार का?

आजची वर्तमानपत्रे व दूरदर्शनच्या माध्यमांतून बाहेर येणारी भ्रष्टाचाराची प्रकरणे बघून मन सुन्न झाल्याशिवाय राहात नाही. आपल्या जीवनाचे असे एकही क्षेत्र राहिले नाही की ज्यात भ्रष्टाचार नाही, आणि म्हणूनच याचा विचार म्हणजे याची कारणमीमांसा अधिक गांभीर्याने व्हायला हवी.

मनुष्य कधीच एकटा जगत नसतो. घरापासून दारापर्यंतचे त्याचे जगणे सामूहिक असते. हे जगणे संतुलित व सुसह्य होण्याकरता किमान नियमांचे पालन करावे लागते. वैयक्तिक वा घरातील नात्यागोत्यांच्या संबंधांचे जीवन, अथवा समाजजीवनातील व्यवहारांचे जीवन जगताना अशा नियमांचे पालन हे अनिवार्य असते. आपण मानव जातीचा इतिहास बघितला तर सगळ्या मानव समूहांत अशा दोन स्तरांवर नियमांचे पालन अनेक शतके करण्यात येत आहे. यामधला मुख्य मुद्दा हा व्यक्तीच्या 'क्षमता' व 'स्वातंत्र्य' यांचाच असतो. या संकल्पना अधिकाधिक संतुलित व सुसह्य करण्याकरताच नीतिनियम, सामाजिक निर्बंध यांची योजना केली जाते.

भारत आणि विशेषतः हिंदू समाजाचे हे वैशिष्ट्य आहे की, त्याच्या सामाजिक रचना आणि व्यक्तीविकासाच्या संकल्पना जास्तीत जास्त व्यवहार्य आहेत. वर्णाश्रमापासून लग्न संस्थेपर्यंतचा विचार हा व्यक्तीगत वा सामाजिक जीवन सुसह्य व आनंदित करण्याकरताच आहे. यामध्ये एखाद्या व्यक्तीच्या तात्पुरत्या फायद्यातोट्याचा विचार न करता, दूरगामी, शाश्वत, स्थिर समाजाच्या निर्मितीकरता प्रयत्न केलेले दिसून येतात आणि म्हणूनच या नीतिनियमांची चौकट म्हणजे बंधने वा स्वातंत्र्याचा संकोच नसून, दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा केलेला तो आदर असतो. बहुतेक सर्व मानवाच्या क्षमता या कमी–अधिक प्रमाणात सारख्याच असतात. पण तरीही त्याचे वय, लिंग आणि त्यानुसार बदलणारी कर्तव्ये यांना समांतर अशी नियमांची व्यवस्था केलेली असते. क्षमतेपुरताच विचार केला तर कुठलाही पुरुष कुठल्याही स्त्रीबरोबर वा कुठलीही स्त्री ही कोणत्याही पुरुषाबरोबर पौगंडावस्थेनंतर शरीरसंबंध ठेवण्याच्या क्षमतेची असते. तरीही व्यापक समाजजीवन सुसह्य करण्याकरता 'लग्न' संस्थेची रचना करावी लागते. तो करारापेक्षा 'संस्कार' म्हणून रुजवावा लागतो. 'करार' हा तांत्रिक असतो, तर 'संस्कार' अनेक वर्षांच्या मशागतीतून निर्माण होतो.

दिल्लीच्या उच्च न्यायालयाने नुकताच दिलेला एक निर्णय असाच धक्कादायक आहे. (टाईम्स ऑफ इंडिया, बुधवार, १९ जाने. पृ. १५) १८ वर्षांवरील महिलांना विवाहित पुरुषाबरोबर संबंध ठेवण्याचे अधिकार कोर्टाने प्रदान केले आहेत. १८ वर्षांवरील स्त्रीला तिची जीवनशैली आणि जीवन जगण्याचा अधिकार आहे, असा युक्तिवाद या निर्णयाच्या समर्थनार्थ न्यायधीशांनी केला आहे. हा निर्णय लग्न संस्थेचे 'संपूर्ण' अवमूल्यन करणारा आहे. आपण काहीतरी क्रांतिकारक करत आहोत हे दाखवण्याचा हा 'केविलवाणा' प्रयत्न आहे. हा प्रश्न एखाद्या महिलेच्या वा पुरुषाच्या जीवनशैलीचा नसून व्यापक समाजहिताचा आहे. लग्नसंस्था उद्ध्वस्त झालेल्या पाश्चात्त्य देशांचे आज आपल्यासमोर उदाहरण आहे. 'अंगवस्त्रांना' अशीच न्यायसंस्थेने दिलेली सामाजिक प्रतिष्ठा आणि वरील निर्णय हे नुसतेच दुर्दैवी नाहीत तर स्वैराचारी, दिशाहीन समाजाच्या रचनेची ही सुरुवातच आहे.

संस्कार आणि नीतिनियमांच्या 'चौकटींचा' आदर करणारा समाजच 'भौतिक' वा 'आध्यात्मिक' जीवनाचा आनंद लुटू शकतो. 'जंगली' किंवा 'रानटी' समाज आणि 'सभ्य' समाज यांतील 'फरक' हा या यंत्रणेचाच असतो. दुर्दैवाने आजचा तथाकथित 'प्रगत' समाज हा मानवाच्या रानटी अवस्थेलाही लाज आणेल अशा

परिस्थितीत जगत आहे. आपल्या युग कल्पनेतील कलियुगीन समाजाचे वर्णन या समाजाला तंतोतंत लागू आहे. सर्व गुन्हे, अनैतिकता, मूल्यहीनता यांना सामाजिक दर्जा आणि नीतिनियम, संस्कृती यांना 'मागासलेल्या' समाजाचा दर्जा! ही खरी आजच्या समाजाची शोकांतिका आहे. धटिंगण, गुंड, हावरे, लाचखोर ही भाषेतील सर्व विशेषणेही कमी पडतील असे आपले आजचे ग्रामपंचायतींपासून दिल्लीपर्यंतचे लोकप्रतिनिधी आहेत. (अपवाद वगळता.) नैसर्गिक साधन संपत्ती व मानवी आयुष्य या दोन्ही गोष्टी सीमित आहेत, म्हणूनच मानवी 'लालसा' आणि 'हाव' यांना त्या बळी पडता कामा नयेत. पाच-दहा पिढ्यांच्या फायद्यातोट्यापेक्षा संपूर्ण भविष्यकाळाचा विचार होणे म्हणूनच आवश्यक असते. असा विचार जो समाज करू शकतो तोच 'परिपक्व' समाज म्हणून जगू शकतो. अपत्य निर्मिती आधी आईवडिलांची जीवनशैली, खाणेपिणे या सगळ्यांचा परिणाम हा होणाऱ्या अपत्यावर होत असतो हे आता विज्ञानाने सिद्ध केले आहे. म्हणूनच, आर्थिक क्षमता किंवा तरुणाईची क्षमता असली तरीही होऊ घातलेल्या आईवडिलांनी आपल्या क्षमतांच्या स्वातंत्र्याला 'आवर' घालून नियंत्रित जीवनशैली आचरावी लागते.

या विचारालाच 'आचारां'च्या चौकटीत 'बांधणे' म्हणजेच जीवन 'नीतिनियमां' मध्ये बंदिस्त करणे होय. ही व्यापक भूमिका समजावून न घेता अनिर्बंध 'उपभोग' किंवा 'स्वातंत्र्या'च्या प्रभावाखाली जेव्हा समाज जगतो तेव्हा ही नांदी भविष्य 'उद्ध्वस्त' करण्याची असते. शतकानुशतकांच्या प्रयत्नांतून निर्माण झालेल्या रचनेत बदल करणे आवश्यक असतेच, पण बदल म्हणजे मोडतोड नाही. आजच्या सुधारणेचा ढाचा हा विधायकतेपेक्षा सामाजिक विध्वंसाकडे जाणारा आहे. असल्या सुधारणा या तात्पुरत्या 'पुरोगामी' वाटल्या, तरी त्या 'प्रतिगामी' असतात. जुने घर पाडायच्या आधी नवीन घराची रचना करावी लागते आणि हे काम एखाद्या वास्तुरचनाकाराकडूनच करून घ्यावे लागते. 'मनु' निर्माण करणे महाकठीण असते. घटना म्हणजे करारांची 'अनुक्रमणिका' असलेले पुस्तक नाही. अंमलात येऊ न शकणाऱ्या घटनेइतके धोकादायक शस्त्र नाही. घटनेच्या लेखकापेक्षा तिचे महत्त्व ती किती शतके जगू शकते याला आहे. घटना माणसाला 'संस्कारित' करू शकत नाही, तर संस्कारित माणूस 'गृहीत' धरून घटना लिहावी लागते. कारण बधिर, संवेदनाशून्य समाजात कोणतीही घटना कधीही यशस्वी होऊ शकत नाही. घटना ही व्यवहार्य आणि वास्तव असावी लागते. ती थोडी व्यक्त व जास्त अव्यक्त असावी लागते.

आजच्या भ्रष्टाचाराचा उगम हा अवाजवी अवास्तव 'त्यागा'च्या कविकल्पना, आचरट 'प्रेम' आणि 'बेजबाबदार' स्वातंत्र्याच्या संकल्पनेत आहे हे जेव्हा उमगेल तेव्हाच समाज भ्रष्टाचार मुक्त निर्माण होईल.

**– जानेवारी २०११**

❖❖❖

# लढ्यांची शोकांतिका

मंगळवार दि. ५ एप्रिल २०११ रोजी समाजसुधारक अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचारा विरोधी चळवळीचा एक भाग म्हणून दिल्ली येथील जंतरमंतर मध्ये बेमुदत उपोषणाला सुरुवात केली. स्वतः अण्णा हजारे यांनी हा स्वातंत्र्याचा दुसरा लढा असल्याचे प्रतिपादन केले. वृत्तपत्रांपासून दूरदर्शनपर्यंतची सर्व माध्यमे आणि अशा कुठल्याही चळवळीमध्ये दिसणाऱ्या अग्निवेशांपासून मेधा पाटकरांपर्यंत नेहमीच्या 'यशस्वी कलाकारांनीही' या चळवळीला पाठिंबा दिला. आपण इतिहासापासून काही शिकत नाही हेच खरे!

सुमारे दीडशे वर्षे चाललेल्या व अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या स्वातंत्र्य लढ्याचे अवघ्या साठ वर्षांत आपण 'खोबरे' केले. जयप्रकाश नारायण यांनी ३०-३५ वर्षांपूर्वी 'संपूर्ण क्रांती' च्या दिलेल्या नाऱ्याचेही आपण गेल्या तीस वर्षांत 'वाटोळे' केले. इंदिरा गांधींची एकाधिकारशाही यातून संपुष्टात आली ही या चळवळीची जमेची बाजू, पण लगेचच गांधी नेहरू कुटुंबाची घराणेशाही, लोकशाहीच्या शिक्कामोर्तबानिशी आपण कायमची स्वीकारली.

प्रचंड सभा व त्यामध्ये दिलेली घणाघाती भाषणे, रस्त्यांवरील मोर्चे, पथनाट्ये, घोषणाबाजी ही चळवळीला 'उत्तेजित' करणारी साधने असली तरी ती 'शाश्वत' विचार अंगवळणी पडल्याचे 'मोजमाप' होऊ शकत नाहीत. सत्य, अहिंसा, सहिष्णुता, समानता या कुठल्याच संकल्पना नवीन नाहीत; पण त्यांचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक 'धंदा' मात्र नवीन आहे. 'जातीयवाद' हे याचे चांगले उदाहरण आहे. सर्व राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांनी निवडणुकीतील यशासाठी जातींचा निर्लज्जपणे केलेला वापर आपण बघतो आहोत. भारत हा एकच असा देश असेल की, जेथे 'मागासले'पण जाहीर करण्याकरता राजकीय नेत्यांमध्ये स्पर्धा चालू आहे. जातींच्या आधारावर आरक्षणांचा वर्षाव करणारे नेतृत्व 'पुरोगामी' कसे ठरते हे एक मोठे कोडे आहे!

राजकीय नेत्यांचा 'भ्रष्टाचार' चघळताना प्रत्येकाला एक विलक्षण 'आनंद' मिळत असतो. पण हा राजकीय नेता आपणच निवडून दिलेला असतो याचा प्रत्येक व्यक्तीला 'सोईस्कर' विसर पडतो. जे जातींचे आहे तेच राजकीय गुन्हेगारीचे आहे. लोकशाहीचे सर्वांत पवित्र स्थान म्हणजे लोकसभा. नुकत्याच केलेल्या पाहणीनुसार या लोकसभेत निवडून आलेले २५% सभासद हे गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याचे आढळून आले आहे. याहून अधिक कुठली मोठी लोकशाहीची थट्टा असेल? 'यथा प्रजा तथा राजा' अशी एक जुनी म्हण आहे. हे जर का खरे असेल, तर 'प्रजा' काही आत्मपरीक्षण करायला शिकणार आहे की नाही? भ्रष्टाचार हा रोग नाही, तर एका मूल्यहीन, चारित्र्यहीन, स्वार्थलोलुप, लाचार अशा सडलेल्या समाजाचे ते लक्षण आहे. सगळ्या पक्षांतील भ्रष्ट नेत्यांची संख्या काही हजारांत असेल, चिरीमिरी मागणाऱ्या कार्यालयांतील शिपायापासून मंत्रालयातील भ्रष्ट नोकरशहांची संख्या काही लाखांनी आहे, तर 'आर्थिक' किंवा 'मागासले'पणाची कुठलीही खरी 'पात्रता' नसताना याच आधारावर सवलती 'स्वाहा' करणाऱ्यांची संख्या काही कोटींनी आहे.

आपल्या सगळ्या 'धार्मिक' सणांचा आपण एकच सण करून टाकला आहे; तो म्हणजे 'शिमगा'. दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव या सगळ्या सणांचे आता राजकारण्यांनी अपहरण केले आहे. घसा बसेस्तोवर 'गरिबी'च्या नावाने कंठशोष करणारे हे नेते, लाखो रुपयांची उधळण अशा निरर्थक सोहळ्यांवर करतात. या सगळ्या सोहळ्यांत 'विदुषकी' नाच करण्यात हीच टीका करणारी प्रजा सामील असते. रस्त्यावरचे अतिक्रमण असो किंवा बेकायदा गिळंकृत केलेल्या

झोपडीपासून घरांपर्यंतचा प्रश्न असो, हेच राजकीय नेतृत्व त्याला निर्लज्जपणे पाठिंबा देत असते. नापासांना पास करा, वर्गात अपुरी उपस्थिती असली तरी परीक्षेला बसू द्या, परीक्षेत नक्कल करणाऱ्यांना (कॉपी करण्याऱ्यांना) छुपेपणाने सोडण्यासाठी मदत करा, रास्ता रोको, रेल रोको, तोंडाला काळे फासणे अशा तद्दन गुंडगिरीच्या पाठीशी हेच राजकीय नेतृत्व 'हिमालया'सारखे उभे असते. असल्या चळवळींपासून 'फायदा' करून घेणारी ही प्रजा, ही 'राजा' आणि 'कलमाडीं' एवढीच भ्रष्टाचारी आहे.

कोणता 'लोकपाल' याला आळा घालू शकणार आहे? कुणाची फसवणूक आपण करतो आहोत? सध्या 'लोकशाही'चा विजय म्हणजे 'संख्याबळा'चा विजय आहे. एखादवेळेस 'सुसंस्कृत' एकाधिकारशहा समाजाचे भले करू शकेल, पण 'असंस्कृत' नागरिकांची लोकशाही १००% 'अराजक'च निर्माण करू शकते. असे अराजक म्हणजे 'स्वातंत्र्या'चा विजय नसतो. मूल्यहीन, चारित्र्यहीन समाजाच्या 'स्वातंत्र्या'ची संकल्पना म्हणजे 'स्वैराचार'च असतो. साहित्य आणि कलेतील 'सृजनशील'ता जेव्हा आटते तेव्हा बीभत्सपणा व नग्नता यांची गरज निर्माण होते. आज गरज आहे ती चारित्र्याच्या संवर्धनाची. अशा चारित्र्यशील नागरिकांची संख्या जेव्हा वाढेल तेव्हाच खऱ्या अर्थाने 'परिवर्तना'स सुरुवात होईल. आपल्या 'धर्म' संकल्पनेत या चारित्र्य रक्षणाचे आग्रहाने प्रतिपादन केले आहे. 'पंचतंत्रा'तील कथा आणि भर्तृहरीची 'नीती शतके' याच धर्माचा भाग आहेत. चारित्र्य घडवायला सहस्रावधी वर्षे लागतात, तर बिघडवायला काहीच दशके पुरतात. 'धर्म' म्हटले की 'फेफरे' भरणाऱ्या या नेतृत्वाला हे कोण समजावून सांगणार?

'रामायण' व 'महाभारत' या महाकाव्यांची निर्मिती हीच मुळी अशा 'सुसंस्कृत' समाजाच्या निर्मितीकरता आहे. या कथाच मुळी धर्म आणि अधर्माच्या संघर्षाच्या आहेत. भारतीय साहित्य, कला आणि तत्त्वज्ञानाच्या मुळाशी ही महाकाव्ये बीजासारखी रुजली आहेत. रामायणातील 'रावण' हा दशग्रंथी ब्राह्मण, तर महाभारतातील 'कर्ण' हा दानशूर होता. पण या दोन्ही व्यक्तिरेखा त्यांच्या या गुणांमुळे अनुकरणीय ठरल्या नाहीत. त्याचे कारण म्हणजे त्यांनी केलेला 'अधर्मा'चा पाठपुरावा. पण आजच्या मराठी साहित्याला अचानक कर्णावरील 'अन्याया'चा साक्षात्कार होतो. कल्पनाविलास कोणीच रोखू शकत नाही. म्हणूनच कथा कादंबऱ्यात रंगवलेली व्यक्तिमत्त्वे आणि महाकाव्यातील ही 'व्यक्तिमत्त्वे' यांच्यामध्ये फारकत

आहे. येथेच भ्रष्टाचाराला खरी सुरुवात होते आणि ‘मूल्यहीन’ समाजाची ‘मशागत’ यामुळेच होत असते.

याचा परिणाम आज आपण पाहातच आहोत. म. गांधी, जयप्रकाशजी, हजारे यांच्याबद्दल संपूर्ण आदर बाळगूनही असे म्हणावेसे वाटते की, शाश्वत सामाजिक परिवर्तनाकरता हे नेतृत्व थिटे पडले आहे. आजचा लढा हा मूल्याधिष्ठित समाजनिर्मितीसाठी हवा, पण या लढ्याची सुरुवात झाल्याचे कुठेच दिसत नाही. बाकी सर्व ‘लढे’ हे म्हणूनच अल्पायुषी व समाजात ‘गुणात्मक’ बदल घडवण्यास निरुपयोगी ठरतात. हे आपल्याला उमगले तरीदेखील ती परिवर्तनाची एक सुरुवातच आहे असे म्हणावे लागेल.

**– एप्रिल २०११**

❖❖❖

# बेशिस्तीला मान्यता...

आर्थिक उदारीकरणाचे जे काही फायदे-तोटे झाले त्यांचे प्रतिबिंब आता समाजातील चांगल्या-वाईट प्रथांमधून उमटू लागले आहे. एकतर या आर्थिक उदारीकरणातून नवश्रीमंतांचा वर्ग समाजात मोठ्या प्रमाणात वाढला. शिक्षणाच्या संख्यात्मक प्रसारामुळे समाजाचा मोठा गट साक्षर झाला, पण शिक्षित झाला का हा प्रश्नच आहे! तरीही केवळ चार इयत्ता पार केल्या, महाविद्यालयात काही काळ घालवला, की स्वतःला 'सुशिक्षित' समजण्याची प्रथा निर्माण झाली. नवश्रीमंतीमुळे बऱ्याच जणांकडे आवश्यकतेपेक्षा व लायकीपेक्षा अधिक पैसा खुळखुळायला लागला. माणसाच्या गरजा व चैनीच्या वस्तू यांतील सीमारेषा पुसट होऊ लागल्या. मग या संपत्तीचे प्रदर्शन करण्याच्या संधी शोधल्या जाऊ लागल्या. सुटाबुटात, सफारी घालून मिरवले की, 'सामाजिक प्रतिष्ठा' वाढायला लागली. मद्यपानासारख्या घातक व्यसनांना सामाजिक प्रतिष्ठा मिळू लागली.

'कोणत्याही समाजात सार्वजनिक ठिकाणी केले जाणारे वर्तन हे त्या समाजाचे प्रतिबिंब असते' याचे भान न ठेवता बेशिस्तीलाच आपण जेव्हा मान्यता

देतो, तेव्हा आपण नेमके कुठे चाललो आहोत याचा शोध घेण्याची वेळ येते. या महिन्यातील लग्नसराईचा हंगाम व उपरोक्त नवश्रीमंतांची लग्ने याचा बारकाईने विचार करा; आपल्यालाही दिशाहीनतेची कल्पना येईल.

भारतीय संस्कृतीत आपण लग्न हा संस्कार मानतो. पावित्र्याच्या कोंदणात हा संस्कार आपण परंपरागतरित्या जपत आलो होतो. दोन व्यक्तीच नव्हे तर दोन कुटुंबांना कायमचे एकत्र आणणारा हा पवित्र संस्कार आहे. मात्र आज या संस्काराचे आपण काय केले आहे ते गांभीर्याने विचार करावे असे रूपांतरण आहे. आधुनिकता आणि फॅशनच्या नावाखाली आपण संस्कारांचा अर्थ हद्दपार करतो आहोत. आपल्या श्रीमंतीचा झगमगाट दाखवत प्रतिपक्षाला वेठीला धरणे, त्याची सोयरीक मोडेपर्यंत ओढाताण करणे हे तर आहेच; पण जेवणावळी, त्यात वाया जाणारे हजारो किलो अन्नधान्य, विवाहाच्या वराती, या वरातींच्या माध्यमातून समाजाला उपद्रव देण्याची मानसिकता, 'लग्नाचा मुहूर्त' ही संकल्पना हास्यास्पद ठरेल अशा रीतीने गायली (?) जाणारी मंगलाष्टके... प्रत्येक बाब आत्मपरीक्षण करून पाहावी अशी आहे.

लग्नाची वरात किंवा मिरवणूक हा तर गर्दीच्या ठिकाणी कटकटीचा ठरेल असा प्रकार आहे. एक तर विवाहासाठी असणारी (तथाकथित मंगल!) अस्वच्छ अशी कार्यालये गर्दीच्या ठिकाणी असतात. पैसा उडवण्याच्या एकमेव वेडाने झपाटलेली मंडळी आपापल्या मोटारगाड्या घेऊन येतात. पार्किंग (वाहन तळ) नसल्याने या विषयावरून वादावादी होते. ज्यांचा या 'शुभ कार्याशी' संबंध नसतो अशा नोकरदारांची कामावर जाण्याची वेळ असते. वाहतुकीचा खोळंबा होतो. अशावेळी मिरवणुकीत मिरवणारे लोक दर्जाहीन चित्रपट–गीतांवर अश्लील हावभाव करत मद्यपान करून नाचतात. 'लोकांची आपण गैरसोय करत आहोत' याचे त्यांना भानही नसते.

जेवणावळी म्हणजे खाद्य पदार्थांचे जणू प्रदर्शनच असते. येणाऱ्या आमंत्रितांत मग 'मी इतकं खाल्लं,' 'तू किती खाल्लं?' अशा वायफळ चर्चा होत राहतात. पंगत असो की उभ्याने जेवायचे असो, अन्नाची होणारी नासाडी हा तर अक्षम्य गुन्हा आहे!

'आयुष्यात एकदाच लग्नाचा प्रसंग येतो; मग केली थोडी हौसमौज तर बिघडले कुठे' असे विचारणारे लोक हे 'आपण किती बरोबर आहोत' याचा तोरा

मिरवतात. परंतु संयम ठेवणे ही आपली नैतिक व सामाजिक बांधिलकी आहे हे या 'सुशिक्षितांना' मान्य नसते; किंबहुना लाखो रुपयांचे फटाके वरातीत उडवणे, शोभेची दारू उडवणे, हजारो रुपयांचे मद्य प्राशन करणे हा आपला हक्कच आहे, कारण आपल्याकडे पैसा आहे हा माज त्यांना असतो.

ही समस्या अधिकाधिक व्यापक व गंभीर बनत चालली आहे. आपल्याकडील सामाजिक सुधारणांचा इतिहास पाहिला तर या सुधारणांचा प्रारंभ हा कौटुंबिक रीतीभाती, विचार करण्याच्या पद्धती, प्रथा परंपरा यांच्यामध्ये सुधारणा करूनच झाला आहे. हुंडापद्धतीला विरोध वा बालविवाह, विधवा विवाह यांतील सुधारणा ही अशी उदाहरणे आहेत. मात्र आज मानवी नातेसंबंध, कौटुंबिक नातेसंबंध, संस्कार या सर्व बाबी 'पैसा आणि श्रीमंतीचे प्रदर्शन' या केंद्राभोवती आपण आणून ठेवल्या आहेत. पैशाबाबत एक साधे तत्त्व इतिहाससिद्ध आहे ते म्हणजे,- माणसाला लायकीपेक्षा जास्त पैसा मिळाला तर तो त्याच्या नैतिक, सामाजिक अधःपतनास कारणीभूत ठरण्याची शक्यता अधिक असते.

आपल्या एकूणच जीवनाची सर्व अंगे, जीवनाचा सर्वांगीण स्तर आपल्याला सुधारायचा असेल, उंचवायचा असेल तर सण, समारंभ, वैयक्तिक जीवनातील उत्सव अशा अनेक बाबींचा आपल्याला गांभीर्याने विचार करावा लागेल. सण समारंभाचे बाजारीकरण करणाऱ्या मताभिमुख राजकारणात कितीही खालची पातळी गाठू शकणारे नेते हे या कामी उपयोगाचे नाहीत. सवंग लोकप्रियता व शालतुऱ्यांमध्ये उगवणारे, मावळणारे दिवस एवढेच त्यांचे ध्येय असते. त्यामुळे मांजराच्या गळ्यात घंटा ही सर्वसामान्यालाच बांधावी लागेल. प्रत्येक गोष्टीला कायद्याचे वेसण घालूनही ही अभिरुचीहीन घसरण थांबणार नाही. कारण कायदा केला की पळवाटा शोधणारे तयारच असतात. तेव्हा जनाची नाही, तर मनाची शरम बाळगत आपण जागे होणे ही गरज आहे. हे होत नाही हे या समाजाचे व देशाचे दुर्दैव आहे; आणि हे होत नाही तिथवर मूल्यांची हेळसांड चालूच राहणार आहे.

**– मे २०११**

❖❖❖

# परिस्थिती गंभीर आहे

भ्रष्टाचाराच्या विरोधात चळवळी करणारा एक गट व त्यांच्या चळवळींना कधी वास्तव तर कधी अवास्तव प्रसिद्धी देऊन स्वतःच्या अस्तित्वाचा धंदा करणाऱ्या माध्यमांचा एक गट सध्या वाजतो-गाजतो आहे. वास्तविक साठ-पासष्ट वर्षांनंतरही भ्रष्टाचारासारखी समस्या कायम आहे, हे आपले अपयश आहे.

भ्रष्टाचार म्हणजे आर्थिक गैरव्यवहार किंवा पैशांसंबधित आचरण असा अर्थ आपण घेतो. वास्तविक या संकल्पनेची कक्षा कितीतरी रुंद आहे. सर्वसामान्यांच्या जीवनातील कितीतरी घटना, प्रसंग या संकल्पनेने व्याप्त आहेत. हा एक भाग झाला. पण रूढ अर्थाने पैसा, जमिनींचे व्यवहार इ. बाबत जो अर्थ आपल्याला भ्रष्ट वाटतो तोही निंदनीय आणि चिंताजनकच आहे. भारताची परंपरा, इतिहास, भारतीयांचे तत्त्वज्ञान, नीतिअनीतीचा विचार या सर्व बाबी आज प्रश्नांच्या चक्रव्यूहात अडकल्या आहेत. देशाचे नेतृत्व करणाऱ्यांनी जाहीर केलेल्या मालमत्तांचे आकडे पाहिले, ज्यांना संतत्त्वाचे बिरुद दिले जाते

अशा प्रवचने करणाऱ्या बाबा महाराजांच्या मिळकतीचे आकडे पाहिले तर सामान्यांचे डोळे पांढरे होतात. ज्या संतांनी वैराग्यपूर्ण जीवनाचा आदर्श घालून दिला, संपत्तीचा हव्यास सोडा असे अखेरपर्यंत सांगितले त्यांच्या समाधिस्थळी, त्यांच्याच डोक्यावर सोन्याचांदीचे मुकुट चढवले जातात; हे पाहिले की व्यथित होण्यावाचून काही करता येत नाही.

कोट्यवधी रुपयांची माया जमवणारे तथाकथित नेते, आमदार, खासदार व ज्यांचे पायही मातीचेच आहेत अशी 'आध्यात्मिक' मंडळी या देशाचे सर्व अर्थांनी शोषण करत आहेत. त्यामुळे भ्रष्टाचार विरोधातील लढे हास्यास्पद ठरत चालले आहेत की काय असे चित्र आहे. तरीही समाजात अनेकजण, अनेक सर्वसामान्य माणसे त्यांना पाठिंबा देतात, याचे कारण जनतेच्या मनात भ्रष्टाचाराबाबत आणि राजकीय नेतृत्वाबाबत जी चीड आहे तिचे हे प्रतिबिंब आहे. ज्या लोकपालाविषयी इतके छापले, बोलले जात आहे ते लोकपाल व लोकायुक्तही राजकारण व राजकारणी यांच्याइतकेच भ्रष्ट होऊ शकतात ही भीतीही सामान्यांच्या मनात आहे. ज्या देशात सर्व चांगल्या संकल्पनांचे, विचार व आचारांचे झपाट्याने अवमूल्यन होत आहे त्याच्या भविष्याबद्दल मन साशंक होणे स्वाभाविक आहे.

उपोषण व सत्याग्रह ही अन्यायाविरुद्ध लढा देण्याची प्रभावी शस्त्रे आहेत. मात्र त्यांचा पुनःपुन्हा केला जाणारा वापर, राजकारणी मंडळींचा निगरगट्टपणा यामुळे ती बोथट व हास्यापद ठरतील की काय असे आजचे चित्र आहे. दुर्दैवाने याबाबत परखड विचार करणारी, विचार व्यक्त करणारी माणसे उपेक्षित आहेत. असे होण्यास कारण आपणच आहोत. कायद्याची अरण्ये आपण इतकी घनदाट वाढवली आहेत की, या संकल्पनांतील अर्थच लोप पावू लागला आहे. समाजासमोर आदर्श नाहीत. गैरमार्गाने जाण्याचे अमर्याद स्वातंत्र्य आहे, चांगले व वाईट यांतील सीमारेषांबद्दलचा विवेक उरलेला नाही असा आजचा समाज आहे. त्यामुळे या शस्त्रांचा प्रभाव किती टिकेल याबाबतही लोकांच्या मनात संभ्रम आहे.

१९४७ च्या स्वातंत्र्यानंतर हे असे सर्व घडत आहे याची अनेक कारणे देता येण्यासारखी आहेत. सत्य श्री साईबाबांची 'इस्टेट', खेळाडूंची पैशासाठी चाललेली राजकारणे आणि राजकारण्यांचे पैशासाठी चाललेले खेळ, गुन्हेगारीचा वाढता कॅन्सर या सर्वांच्या मुळाशी जात राहिलो तर उबग वाढतच जातो. स्वातंत्र्योत्तर काळात सर्वाधिक प्रयोग करण्यात आलेले क्षेत्र म्हणजे शिक्षण. या शिक्षणाचे

झालेले वाटोळे यास कारणीभूत आहे. विचारशक्ती बधिर होईल असे सामाजिक वास्तव पाहात, जगत आज विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्यावर संस्कार करण्याची जबाबदारी असणारे पालक, शिक्षक या सर्वांना समस्यांनी गांजून टाकले आहे. त्यामुळे शिक्षणावरच मळभ आले आहे. शिक्षणाचा, खऱ्या शिक्षणाचा अभाव हा देखील आजच्या परिस्थितीला कारणीभूत आहे.

या अराजकाची मुळे एका रात्रीत उखडून टाकता येणार नाहीत. हे बदलायचे असेल, बदलावे असे प्रामाणिकपणे वाटत असेल तर अपवाद न ठेवता देशातल्या प्रत्येक नागरिकाने स्वतःपासून सुरुवात करायला हवी. पैशाचा अति मोह ज्या असुरक्षिततेच्या जाणिवेतून निर्माण होतो ती भावनाच निर्माण होणार नाही यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. 'हम तुम्हारे साथ है' या घोषणा देत, टोप्या घालून व मेणबत्त्या पेटवून भविष्य बदलणार नाही; तर परखड आत्मपरीक्षण हवे.

दुर्दैवाने आजच्या अराजकसदृश वास्तवात सामान्य जनता असे आत्मपरीक्षण करताना दिसत नाही. कोणीतरी येईल आणि चित्र बदलेल या आशेवरच जनता जगते आहे. अशी आशा बाळगण्यात किती पिढ्या नष्ट होतील हे सांगता येणार नाही. पण स्वतःपासून सुरुवात केली नाही तर परिस्थिती अधिक गंभीर होईल!

**– जून २०११**

❖❖❖

# अण्णा हजारेंची चळवळ, गांधीवाद आणि लोकशाही

इंग्रजांचा वसाहतवाद संपल्याला नुकतीच ६४ वर्षे पूर्ण झाली. या अर्ध्याहून अधिक शतकात जगात अनेक परिवर्तने, स्थित्यंतरे झाली. अनेक नवीन देश निर्माण झाले, तर जुन्या महासत्तांचे विघटन झाले. या कालावधीतील दोन महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे शीत युद्धाची समाप्ती आणि साम्यवादाचे पतन. चंद्रावरील माणसाचे पहिले पाऊल, नलिका बालिकेचा जन्म व त्या तंत्रज्ञानाचा विकास, मानवी जनुकाच्या नकाशाची मांडणी, दूरसंपर्क माध्यमे व दळणवळणात झालेली क्रांती या सगळ्या जशा जमेच्या बाजू आहेत, त्याप्रमाणेच बदललेल्या जीवनशैलीमुळे निर्माण झालेले प्रश्न, म्हणजे उद्ध्वस्त कुटुंबसंस्था, त्याचाच एक परिणाम म्हणजे तरुण पिढीत आलेले नैराश्य, दिशाहीनता, त्यातून निर्माण झालेली व्यसनाधीनता यामुळे वैयक्तिक, सामाजिक स्वास्थ्य हे बेरजेपेक्षा वजाबाकीकडे झुकणारे आहे. जुने संसर्गजन्य रोग कमी झाले, काही नष्ट झाले, तर जीवन शैलीशी निगडित असलेल्या अनेक भयानक रोगांनी मानवाला ग्रस्त केले.

या सगळ्या पार्श्वभूमीवर एक अतिशय महत्त्वाचे सामाजिक स्थित्यंतरही होत होते व ते म्हणजे 'धर्म' संकल्पनेवरील लोकांचा कमी होत जाणारा विश्वास. विशेषतः पाश्चात्त्य जगतामध्ये ख्रिस्ती धर्माच्या अनुयायांचा आपल्या धर्मसंकल्पनेबाबत होणारा वाढता भ्रमनिरास. अर्थातच, गेल्या काही दशकांत इस्लामी मूलतत्त्ववादाचा झालेला स्फोट आणि हिंदू धर्माचे नाही, तर हिंदूंचे झालेले आध्यात्मिक आणि नैतिक अधःपतन या गोष्टी दृष्टिआड करता येणार नाहीत. राजकीय संस्थांचे म्हणाल तर, साम्यवादाच्या पतनानंतर पाश्चात्त्य वळणाच्या लोकशाहीचा प्रभाव वाढला. अलीकडे मध्य आशियातील व आफ्रिका खंडातील इस्लामी राष्ट्रांतील परिवर्तनाची दिशाही याच लोकशाही व्यवस्थेच्या आग्रहाकरता दिसून येते. यातूनच एक असा भाबडा समज करून दिला गेला की, प्रगती हवी असेल तर ही पाश्चात्त्य पद्धतीची लोकशाही हवी. लोकशाही म्हणजे लोकांनी लोकांकरता निर्माण केलेली व्यवस्था असाही एक अर्थ लावण्यात येतो. हे समज नुसते भाबडे आणि स्वप्नाळूच नाहीत तर ते अव्यवहार्य आणि फसवे आहेत. ते संख्याबळाची एकाधिकारशाही लादणारे आहेत. धुंद आणि बेताल भांडवलशाही शिवाय ही व्यवस्था अस्तित्वात राहूच शकत नाही. साम्यवादात एकाधिकारशाही लवकर येते; तर राजकीय, सामाजिक, आध्यात्मिक विषयात गाढा तर सोडाच, पण चांगला व्यासंग असण्याचाही त्यांचा इतिहास नाही. तरीही या पक्षाने पक्षांतर्गत लोकशाहीच्या माध्यमातून या शुद्ध घराणेशाहीवर वारंवार शिक्कामोर्तब केले आणि आजही त्यांचे समर्थन चालू आहे. मुद्दा आहे तो समर्थन करणाऱ्या विचारवंतांचा. ऐकणारे व वाचणारे बहुतेक महामूर्ख आहेत हे गृहीत धरूनच यांचा युक्तिवाद चालू असतो. शंभर कोटींच्या या देशात एकही पात्र व्यक्ती या पक्षाला मिळत नाही हीच या लोकशाहीची खरी शोकांतिका आहे. हरयाणा असो, ओरिसा असो, महाराष्ट्र असो किंवा तमिळनाडू असो, सर्व प्रांतीय पक्ष सुद्धा याच 'लोकशाही' मार्गाने घराणेशाही राबवत आहेत.

'लोकशाहीत जात, धर्म, पंथ, आर्थिक दर्जा वगैरेंचा विचार करायचा नसतो' हे घसा फुटेस्तोवर ही सर्वच मंडळी ओरडून सांगत असतात. पण या सगळ्या पक्षांनी दिलेले बहुसंख्य उमेदवार 'जात' या एकाच कसोटीवर तपासून पाहून दिलेले असतात. पंधरा ते वीस टक्के लोकसभेत निवडून दिलेले प्रतिनिधी हे गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. अर्थात लोकांनी त्यांना 'निवडून' दिलेले असल्यामुळे त्यांच्या बाकीच्या सर्व पार्श्वभूम्या आपण विसरून जायला हव्यात हाच यांचा आग्रह

असतो. प्रत्येक पक्षाने 'अशी' पार्श्वभूमी असलेल्यांना तिकीट दिलेल्यांची संख्या तर कितीतरी अधिक आहे. हे सर्व लोकशाहीच्या समर्थनार्थ चालू आहे. आदिवासी-शहरवासी, बहुजन-महाजन, गरीब-श्रीमंत, बहुसंख्य- अल्पसंख्य, शहरी-ग्रामीण अशा अनेक कप्प्यांमध्ये समाजाला विभागायचे, मग त्यांना सवलतग्रस्त लाचार बनवून ठेवायचे आणि हे सर्व लोकशाही 'सशक्त' करण्याकरता आहे अशा वल्गना करायच्या. आजच्या आपल्या लोकसभा आणि विधानसभेतील लक्षाधीश आणि कोट्यधिशांची संख्या बघितली की, या वाचाळ लोकशाही रक्षकांचा कोडगेपणा दिसून येतो.

आजच्या अण्णा हजारेंच्या चळवळीची पार्श्वभूमी ही आहे. भ्रष्टाचार आणि घराणेशाहीने सामान्य माणूस मेटाकुटीला आला आहे. ठाण्यापुरते म्हणाल तर, आमचे विधानसभेतील प्रतिनिधी विधानसभेतील अभ्यासपूर्ण भाषणांपेक्षा विधानसभेबाहेरील आरडाओरड्यात जास्त दिसतात. एकीकडे वाढती गरिबी. त्यांना घरे, अन्न, शिक्षण द्या असल्या सवंग घोषणा करतात, तर स्वतः मात्र लाखो नाही तर कोटींच्या दहीहंड्या जाहीर करण्यात मग्न असतात. केवढा हा दांभिकपणा आणि विसंगती! ज्या लोकप्रतिनिधींनी कटाक्षाने, आग्रहाने सामाजिक नियमांचे पालन करायचे, तेच आपला 'रुबाब' दाखवण्याकरता सर्व नियम पायदळी तुडवण्यात धन्यता मानतात. यांच्यावर टीका केली तर ती लोकशाहीवर टीका असल्याचे भासवायचे, कारण काय तर हे सर्व लोकप्रतिनिधी लोकशाही पद्धतीने निवडून आले आहेत म्हणून! लोकसत्तेतील उपरोक्त अग्रलेख, ''आता सारे जगच अण्णांना बदलायचे असल्यास गोष्ट वेगळी, पण तसे होत नाही तोपर्यंत तरी त्यांना या व्यवस्थेचे नियम पाळावेच लागतील'' असे अण्णांना बजावतो! 'व्यवस्था' बदलण्याचा आग्रह सर्वच नेतृत्वाचा असतो, तसाच तो माध्यमांचाही असतो. ज्या वृत्तपत्रीय नीतीमध्ये जाहिराती आणि बातम्या सारख्याचदराने विकल्या जातात त्यांनी हा प्रश्न अण्णांना विचारावा हा एक मोठा विनोदाचाच भाग आहे! येथे प्रश्न एका वृत्तपत्राचा वा अग्रलेखाचा नसून संपूर्ण वैचारिक नेतृत्वाचा आहे. उच्चार स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य अशा सीमारहीत स्वातंत्र्यांच्या भन्नाट संकल्पना मांडत या स्वातंत्र्यांचे आपण स्वैराचारात रूपांतर करत आहोत याचे भान या विचारवंतांनी कधी ठेवले आहे काय? गांधीजींच्या राजकीय मतांशी कोणी कितीही सहमत वा असहमत असो; पण ते शुद्ध चारित्र्याचे आग्रही होते याबाबत कोणाचेच दुमत होण्याचे कारण नाही. राहणीतला साधेपणा, निर्व्यसनीपणा, पराकोटीची

सहिष्णुता हे त्यांच्या विचारांचे आणखीन काही महत्त्वाचे पैलू आहेत. गेल्या अनेक पिढ्यांत 'या' मूल्यांशी काही संबंध आलेला नसावा असे वागणारे महाभाग 'आम्ही गांधीवादी आहोत' असे सांगतात तेव्हा हसण्याचेही त्राण शिल्लक राहात नाही. गांधीजींचा सत्याग्रह, उपोषण यांचा उठता बसता घोष करणारे हे वैचारिक नेतृत्व अण्णा हजारेंच्या उपोषणास मात्र ते 'कालबाह्य' आहे, 'अ-लोकशाहीवादी' आहे हे उच्चरवाने सांगताना दिसतात तेव्हा त्यांच्या या धैर्याकडे पाहून स्तंभित व्हायला होते.

लोकशाहीचा 'आधार' हा नागरिक आहे. तो संपूर्णतः 'उपभोक्तावादी', 'श्रद्धाहीन' आणि 'भोगवादी' बनवून त्याच्याकडून 'संतसदृश' विवेकी मतदानाची अपेक्षा धरणे म्हणजे दारूच्या गुत्त्यात जाऊन दुधाची मागणी केल्यासारखे आहे! या व्यवस्थेत बदल करणे आवश्यक आहे. याची साधने या समाजात हजारो वर्षे रुजू होती. पण, 'पुरोगामित्व' व 'आधुनिकते'च्या नावाखाली गांधीजींच्या सच्च्या अनुयायांनीही त्यांची अवहेलनाच केली. आजचे स्त्रीमुक्तीचे स्वरूप हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. 'स्वातंत्र्य,' 'हक्क' आणि 'मुक्ती' या सनातन संकल्पना आहेत. त्या जगवण्याकरता 'तशी' सामाजिक व्यवस्था असणे हे जास्त महत्त्वाचे आहे. कारण असा नागरिक जेव्हा 'बहुसंख्य' होईल तेव्हा लोकशाहीच काय, एकाधिकारशाहीही जास्त 'सामाजिक' न्याय देईल. अण्णा हजारे यांनी अशा बेगडी गांधीवादी, पण प्रत्यक्षात नक्षलवादासारख्या हिंसाचाराला पाठिंबा देणाऱ्या सहकाऱ्यांपासून दूर राहणे आवश्यक आहे. आणि म्हणूनच या चळवळीकडे अधिक सकारात्मक आणि व्यापक बदलाचे एक साधन म्हणून पाहणे आवश्यक आहे; तसेच पाश्चात्त्य संस्कृतीत ज्याची बीजे रुजली आहेत अशा साम्यवादी आणि संख्याबळावर आधारित लोकशाहीलाही पर्याय असू शकतो या विचाराला चर्चा किंवा अशा संवादांमध्ये स्थान देणेही महत्त्वाचे आहे. अर्थातच लोकसत्तेच्या अग्रलेखात उल्लेख केलेल्या मेणबत्ती संप्रदायाच्या विचारवंतांची तशी क्षमता आणि कुवत नाही.

अण्णांच्या या आंदोलनानी अनेक महत्त्वाचे प्रश्न निर्माण केले आहेत. त्यांचा खल होणे आवश्यक आहे. ते गैरसोईचे आहेत म्हणून नाकारणे म्हणजे याहीपेक्षा मोठ्या आंदोलनांना आमंत्रण देणे आहे. सिद्धांताकरता माणसं जगतात आणि जीवनत्यागही करतात. पण सिद्धांताचे परिवर्तन जेव्हा सिद्धांत मांडणाऱ्या व्यक्तीच्या 'व्यक्तीमहात्म्या'त होते तेव्हा असे सिद्धांत 'राजकीय' हत्यारं होतात आणि अशा सिद्धांतांशी सहमत नसलेल्या व्यक्ती आणि समाजाला नेस्तनाबूत करण्यात येते.

गांधीजींचे सर्व सिद्धांत अहिंसा, सत्याग्रह, अन्नत्याग, ग्रामस्वराज्य, औद्योगिकीकरण इ. चा पुनर्विचार होणे आज अपरिहार्य आहे. भारतीय इतिहास आणि संस्कृतीचा ज्यांचा थोडाफार परिचय आहे त्यांना हे माहीत आहे की, हे सर्व विचार गेले २५०० ते ३००० वर्षे भारतीय तत्त्वज्ञानात प्रवाही आहेत. रामायण आणि महाभारत हे ग्रंथ 'धर्म' आणि 'अधर्मा'च्या संघर्षाचा इतिहास आहेत. या तत्त्वज्ञानाच्या 'सांदर्भिक' आणि 'व्यवहार्य' सीमा दाखवणारे ते मार्गदर्शक ग्रंथ आहेत. उपनिषदे अनेक 'रूपके' देत जीवनातील अत्यंत 'कूट' सत्यांचे विवेचन करतात. सर्व दर्शने आणि आचार्यांची मते याच वैश्विक सत्याचा ऊहापोह करतात. ३००० वर्षांच्या या सिद्धांतामागचा दीर्घ इतिहास जेव्हां दृष्टीआड केला जातो तेव्हा हे सर्व सिद्धांत भांडवलशाहीवर आधारित लोकशाहीमध्ये ती थोड्या दीर्घ काळांनी येते एवढेच. एकदा आंधळेपणानी अशा लोकशाहीचे वकीलपत्र घेतले की, प्राचीन आणि ऐतिहासीक काळामध्ये तावून-सुलाखून निघालेल्या व्यवस्थेला 'खलनायक' बनवण्यात अक्कलवंतांचे रतीब चालू होतात. भारतामध्ये कमीत कमी २००० वर्षे 'वर्णाश्रम' व्यवस्था अस्तित्वात होती. पण लोकशाही चौकटीत ही व्यवस्था बसत नाही हे गृहीत मान्य केल्यावर अशा सर्व पर्यायी व्यवस्थांना 'मागासलेल्या' आणि 'विषमतेवर' आधारित सिद्ध करावे लागते.

मानवी अस्तित्व व संस्कृतीचा पट एवढा मोठा आहे की, कुठल्याही सामाजिक, धार्मिक, राजकीय संस्थेच्या यशापयशाचा विचार हा दशक किंवा शतकापेक्षा सहस्रावधी वर्षांच्या पार्श्वभूमीवर करावा लागतो. आज प्रगतीच्या शिखरावर असलेल्या अमेरिका व युरोपातील अर्थ-संकट आणि सांस्कृतिक पतन अतिशय बोलके आहे. कारण या पाश्चात्त्य लोकशाहीत समाजाची ऐहिक उन्नती व परिपक्वता ही अंगीभूत आहे असाही एक आभास निर्माण करून देण्यात येतो. शरीरामध्ये जशी एक रोगप्रतिकारकशक्ती अस्तित्वात असते, तशी प्रतिकारशक्ती या व्यवस्थेत आहे आणि त्यामुळे समाज कधीच अपरिपक्व, असंतुलित, अविवेकी वागणार नाही अशी खात्री देण्यात येते. दुर्दैवाने लंडनमध्ये नुकत्याच झालेल्या दंगली, विशेषत: त्यातील तरुणांचा सहभाग या घटना या सर्व विश्वासाला छेद देणाऱ्या आहेत. याउलट इजिप्तसारख्या एकछत्री, गरीब देशात झालेली निदर्शने ही अपेक्षेबाहेर संतुलित व शांत होती.

या पार्श्वभूमीवर अण्णा हजारेंचे आंदोलन बघावे लागेल. भारतात आज त्याच्या स्वातंत्र्यापासून म्हणजे ६४ वर्षे लोकशाही आहे. राजकीय पक्ष असोत वा

सामाजिक विचारवंत असोत, या वस्तुस्थितीचे आग्रहाने प्रतिपादन करतात. बुधवार, गुरुवार, शुक्रवार दि. १७, १८ आणि १९ ऑगस्टच्या लोकसत्तेतील अग्रलेख त्यामधील परखडपणाकरता अभिनंदनीय आहेत. अण्णा हजारेंचे आंदोलन व आग्रह हाच मुळी अ-लोकशाही आहे, हे मत अनेक विचारवंत आग्रहाने मांडताना दिसतात. आजच्या भारतातील प्रांत आणि केंद्रीय लोकशाहीचे स्वरूप हे 'खऱ्या' लोकशाहीचेच प्रतिबिंब आहे असाच अर्थ यातून निघतो आणि खरी मेख इथेच आहे!

राजेशाही, एकाधिकारशाही, घराणेशाही नको म्हणून लोकशाही पाहिजे. लोकशाहीचा मूळ घटक म्हणजे प्रत्येक नागरिक. या नागरिकाने आपला मतदानाचा अधिकार हा त्याच्या सदूसद्‌विवेक बुद्धी, म्हणजे उपलब्ध असलेल्या उमेदवाराचे चारित्र्य, वैचारिक जडणघडण आणि प्रत्यक्ष त्याच्या कार्याचा इतिहास या सर्वांचा संतुलित विचार करून मतदान करणे अपेक्षित असते. लोकशाही म्हटली म्हणजे पक्ष आले आणि लोकशाहीचा आधार असलेले हे पक्षच मुळी पक्षांतर्गत लोकशाही 'दिखाऊ' करतात आणि व्यक्ती, घराणेशाही आणि जातीय कसोट्यांवर ग्रामपंचायतीपासून दिल्ली पर्यंतच्या नेतृत्वाला मान्यता देतात.

भारतातला सर्वांत जुना व मोठा पक्ष म्हणजे काँग्रेस पक्ष. जवाहरलाल नेहरू सोडले तर त्यांच्या पुढील पिढी, अगदी त्यांच्या पतवंडांपर्यंत ही उच्च शिक्षित तर सोडाच, पण महाविद्यालयाची पदवीही चांगल्या श्रेणीत उत्तीर्ण झाल्याचा इतिहास नाही. कुठलेही मूलभूत संदर्भ हे 'संदर्भहीन' होउन जातात. परकीय सत्ता नेस्तनाबूत करण्याकरता 'राजकीय' हेतूंनी वापरले गेलेले हे गांधीवादी सिद्धांत जेव्हां स्वकीय सत्तेतीत मतभेद आणि संघर्ष संपवण्याकरता वापरले जातात तेव्हा ते अन्यायकारक, जुलमी आणि हास्यास्पद होतात. गांधी विचारांचा गेले ६० वर्षे राजकीय वापर करण्याऱ्या विचारवंतांची ही शोकांतिका आहे. देश विभाजनाच्यावेळी झालेली हत्याकांडे आणि ५५ कोटी पाकिस्तानाला देण्याकरता गांधींनी केलेला सत्याग्रह जेव्हां यशस्वी झाला, तेव्हांच खरं म्हणजे गांधीवादाचं 'थडगं' बांधलं गेलं. क्रांतीकारकांचा 'सशस्त्र' क्रांतीचा पुरस्कार हा 'परकीय' सत्ता संपुष्टात आणण्याकरता होता. या वस्तुस्थितीचा विपर्यास करून स्वकीयांवर हिंसा करणाऱ्या नक्षलवाद्यांचे समर्थन मात्र जेव्हां हे 'गांधीवादी' आणि तथाकथित 'बुद्धीवादी' करतात तेव्हा दांभिकता सहन करण्याची सहनशीलता संपलेली असते. स्वा. सावरकरांच्या कवितेतील ओळी पुसून टाकणारे हे पंचमस्तंभी, घराणेशाही पूजक जेव्हा 'अफझलगुरु'च्या

पुढे गुडघे टेकतात तेव्हा निर्लज्जपणाची हद्द झालेली असते. व्यक्तीवाद, एकाधिकारशाही आणि आणीबाणीच्या वेळी 'अनुशासन पर्व' म्हणून समर्थन करणारे गांधीवादी संत आणि घराणेशाहीच्या खांद्यावर उभे राहून मोठे होऊ पहाणारे बेगडी राजकारणी आणि विचारवंत हेच खरे गांधीवादाचे मारेकरी आहेत.

अण्णांबद्दल कितीही आदर बाळगला आणि हे 'जन'-आंदोलन आहे म्हणून कितीही आक्रोश केला; तरी रस्त्यावरच्या लोकांच्या संख्येने हे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करणे अयोग्य आहे. अण्णांच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरलेले अनेकजण ज्या सरकारी भ्रष्टाचाराचे आपण बळी आहोत म्हणून सांगतात, त्याच सरकारकडे अवास्तव सवलती मागण्यात आग्रहाने पुढे असतात. म्हणून शुद्ध संख्याबळावर लादलेली लोकशाही काय किंवा रस्त्यावरल्या संख्याबळांनी महत्त्वाचे प्रश्न सोडवण्याचा केलेला प्रयत्न काय, दोघांचेही यश हे 'धोकादायक' आणि भविष्यात अराजकतेला आमंत्रण देणारे आहे. बधिर सरकार, राजकारणी आणि रस्त्यावरील 'जन'-आंदोलनांचा शेवट हा 'जय' आणि 'पराजयात' नसतो; तर ती एका नवीन येऊ घातलेल्या 'अराजकतेची' सुरुवात असते.

अण्णांच्या नेतृत्वाचा खरा 'कस' हा या आंदोलनाच्या यशापयशानंतरच लागेल. नाहीतर जयप्रकाश नारायणांनंतर त्यांचे दायीत्व सांगणारे 'मुलायम' आणि 'लल्लूच'आपल्याला अधिक संख्येने सहन करावे लागतील! अण्णा हजारेंच्या चळवळींनी भ्रष्टाचाराव्यतिरिक्त अनेक मूलभूत सिद्धांतांना व्यापक चर्चेच्या परिघात आणले हेच या चळवळीचे सर्वात मोठे श्रेय आणि यश आहे.

**– ऑगस्ट २०११**

❖❖❖

# गर्तेत रुतत चालले जग

भारतापुढील प्रश्न आणि समस्या व त्याबरोबरच इतर देशांपुढील प्रश्न आणि समस्या यांचे प्रमाण इतके वेगाने वाढत आहे की, समस्येवर उत्तर मिळण्यापूर्वी व प्रश्नाचे गांभीर्य पूर्ण आकलन होण्यापूर्वीच दुसऱ्या समस्या व प्रश्न यांचे चक्रव्यूह गरगरवून टाकत आहेत. घडणाऱ्या प्रत्येक लहान-मोठ्या भीषण अपघातांना समाज-मन इतके सरावत चालले आहे की, संवेदनाही बोथट होणे विसरत चालल्या आहेत! 'हे जोवर आपल्यापर्यंत येत नाही, तोवर विचार का करा?' हा आपमतलबी प्रश्न व्यक्तिकेंद्रितता वाढवत चालला आहे.

प्रसारमाध्यमे आणि त्यांतून दाखवली जाणारी वास्तव व अवास्तव चित्रे, वाचायला मिळणारे लेख यांनी 'सामान्य माणूस' व त्याची संवेदना यांचा पार चोथा करून टाकला आहे. एक अलीकडचाच भूतकाळ असा होता की; अतिरेकी, बॉम्बहल्ला आणि रक्तपात, हत्या असे शब्द सामान्य माणूस उच्चारायलाही घाबरत असे. किंबहुना असे काही असते हेच त्याच्या दृष्टीने 'अशक्य वास्तव' होते. याउलट आज अतिरेकी

व त्यांचे हल्ले, प्रसारमाध्यमे सांगतात त्याप्रमाणे (मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे!) गृहीत धरण्यात येणारे मृत्यू सर्वच स्वस्त झाले आहे. अतिरेक्यांची प्रशिक्षण केंद्रे असतात ती कोठे आहेत हे माहीत असणाऱ्या शासन-यंत्रणा असतात, हल्ला झाला की हल्ल्याची जबाबदारी घेणारे पुढे येतात आणि तरीही पोलिस-तपासाचे निष्कर्ष गूढ राहतात. यामागील गणिते व रहस्य देवच जाणत असेल. या सर्व यंत्रणानी हे सर्व काही इतके स्वस्त केले आहे की, सामान्य माणूस असे हल्ले होणारच हे गृहीत धरूनच लहानाचा मोठा होतो. विशेष म्हणजे दहशतवादी, त्यांची उद्दीष्टे, त्यांचा इतिहास अशा संकल्पनांवर मोठमोठ्या परिषदा भरवल्या जातात. आंतरराष्ट्रीय राजकारणातील नवे प्रवाह म्हणून अभ्यासक्रमांतून हे शिकवले जाते व तरीही यावर कोणाचेच नियंत्रण प्रस्थापित होत नाही. 'मरण ना कधीही येईल; त्याला काय घाबरायचे' हा दृष्टिकोन समाजात रुतत चालला आहे; तो इतका की 'जगणे कवडीमोल' ठरत चालले आहे. सर्वच देशांत हा नवीन 'इझम' (वाद) इतक्या झपाट्याने पसरत चालला आहे की, कॅन्सरची पसरण्याची गती गोगलगाईची ठरावी!

यामागे गुंतागुंतीची असंख्य कारणे आहेत. नागरीकरणातून वाढलेले प्रश्न व त्यांचे स्वरूप हेही यामागे आहे. जीवनात जी गतिमानता आली आहे तिला कोणताही धरबंद उरला नाही. प्रचंड वेगाने फिरणारा भोवरा असावा व त्याच्या गतीत त्याने आजचे जीवन सामावून घ्यावे अशी आपली स्थिती झाली आहे. 'तंत्रज्ञान आपल्यासाठी की आपण तंत्रज्ञानासाठी' याचा विधिनिषेध न समजलेला आजचा माणूस हा त्यामुळेच क्षणोक्षणी हाव, लालसा वाढत जाणारे अगतिक जनावर बनत चालला आहे. आज मिळतंय ते ओरबाडून घ्या, जितके भरून घेता येईल तितके भरून घ्या ही जीवनशैली अगदी प्रत्येकच क्षेत्रात वाढत चालली आहे. गतिमानतेमुळे सुटलेली हाव पूर्ण करण्यासाठी नीती-अनिती, वैध-अवैध यांचे सर्व पारंपरिक मापदंड मोडून टाकणे यातूनच समाजाची वाटचाल 'बुडत्याचा पाय खोलात...' अशी अधोगामी बनत आहे.

वास्तविक गेल्या २० शतकांत नव्हत्या इतक्या सोयी सुविधा आज आहेत. ढोबळमानाने श्रीमंती व गरिबी यांचे पूर्वीचे संदर्भही बदलत चालले आहेत. पण हे सर्व सुखाचे ठरण्याऐवजी दुःखाचे कारण ठरत आहे. परिणामी, वैफल्यग्रस्तांची संख्या वाढत चालली आहे. याचा स्वाभाविक परिणाम जीवनाच्या सामाजिक,

राजकीय, सांस्कृतिक अंगोपांगांवर होऊन समाजाचा प्रवास उज्ज्वलतेकडे होण्याऐवजी ऱ्हासाकडे होत चालला आहे.

राजकीय क्षेत्रासह सर्वच क्षेत्रांतील नेतृत्व इतके भंपक, मूल्यहीन होत चालले आहे की, अशा नेतृत्व करणाऱ्यांना गेंड्याच्या कातडीचे म्हणणेही चूक ठरू लागले आहे. कारण या उपमेत वापरल्या जाण्याच्या गेंड्याचा हा अपमान ठरेल की काय अशी भीती वाटते. सण, उत्सव,परंपरा इ. सर्व काही भ्रष्ट करणाऱ्या आजच्या समाज-जीवनात कालांतराने असे शब्द माहीत करून घ्यायचे असतील तर शब्द-कोशाचाच आधार घ्यावा लागेल!

अंधानुकरण न करता आपल्या अभ्यास व चिंतनाच्या, व्यासंगाच्या दिशा त्यासाठी प्रत्येकाने बदलायला हव्यात. आम्ही नेहमी सांगतो त्याप्रमाणे अजूनही 'आशा' आणि 'दिशा' आहेत. प्रत्येक रात्रीनंतर सकाळ येणार असते यावर श्रद्धा ठेवून समाजातील मूठभर 'चांगल्या' लोकांनी प्रयत्न केले तर संस्कृती, संस्कार, परंपरा, इतिहास इ. संकल्पनांच्या संदर्भातले जुने दिवस परत येतील. अगदी आदिवासी अवस्था नको हे कोणालाही समजेल. पण नीती, अनिती, संस्कृती, कला इ. संकल्पनांचे १८-१९ व्या शतकापर्यंत असणारे संदर्भ तरी जपता येतील!

या गुंतागुंतीच्या प्रश्नांचे गुंते हे आपली विचारक्षमता ही संवेदनक्षमतेप्रमाणेच बधिर करत चालले आहेत व कधीही न भेदता येणाऱ्या चक्रव्यूहातील वाटचाल वेगाने चालू आहे हे दुर्दैव!

**- सप्टेंबर २०११**

❖❖❖

# दरी रुंदावत आहे

प्रत्येक क्षेत्रामधील नेतृत्वाच्या सर्व बाजूंचा विचार करता ठळकपणाने जाणवणारी एक गोष्ट म्हणजे, या नेतृत्वाचे झपाट्याने स्खलन होत चालले आहे. या निरीक्षणाला असणारा अपवाद हा हे निरीक्षण सिद्ध करणारा, हाताच्या बोटांवर मोजता येईल इतपतच आहे. या स्खलनाचा, अवमूल्यनाचा परिणाम तितक्याच गतीने समाजातील शांतता, मानवी जीवनातील नाते-संबंध, सामाजिक जाणिवा यांच्यावर होत आहे. १९७० नंतरच्या काळात दिशाहीनतेकडे चाललेल्या या प्रवासाचा वेग अफाट वाढला आहे.

गेल्या शतकात झालेल्या दोन महायुद्धांनी आणि युद्धांतून होणाऱ्या सर्व प्रकारच्या परिणामांनी ही दिशाहीनता अधिकच वाढत चाललेली आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या आगे-मागे जगातील अनेक राष्ट्रांना राजकीय स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या संकल्पना, सीमारेषा बदलल्या. राजकारण हा पूर्णवेळ 'व्यवसाय' करून सत्तेसाठी झटायचे अथवा विरोधी पक्ष म्हणून प्रगतीच्या गतीत वा अधोगतीत आपला खारीचा वाटा उचलायचा याची जणूकाही स्पर्धाच चालू आहे. यामुळे सार्वजनिक

जीवनातील सर्वच क्षेत्रांतील प्रत्येक कृती ही राजकारणाने प्रेरित झाली आहे. शिवाय ती भ्रष्टाचाराचे मूळ ठरू लागली आहे.

यामधून राजकीय क्षेत्रातील नेतृत्व हे सर्वव्यापी बनत गेले आणि राजकारण म्हणजे स्वार्थीपणा, स्वतःच्या सात पिढ्यांचा उद्धार करणे अशी भावना वेगाने वाढत गेली. यामुळे कोणतीही निवडणूक लढवणारा व ज्याचे उत्पन्न शेकड्यात हजारांच्या घरात जाई तेच उत्पन्न कोटींच्या घरात, अब्जावधींच्या घरात जायला लागले. याचा स्वाभाविक परिणाम स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय नेतृत्वात असणारी शुचिता, चारित्र्य यांची जागा भ्रष्टाचार व कुटील डावपेच यांनी घेतली. याच्या परिणामी शासनकर्ते (नोकरशहा नव्हे तर राज्यकर्ते), निवडणूक प्रक्रियेतून निवडून येणारे व लोकांचे प्रतिनिधीत्व करण्याचा दावा करणारे राजकीय लोक आणि सामान्य जनता यांच्यात प्रचंड मोठी दरी निर्माण झाली. ज्यांचे प्रतिनिधीत्व करायचे त्यांच्या प्रश्नांचा अभ्यास असणे, त्यांची उकल करण्याचा विचार केलेला असणे, आपल्या संबंधित मतदार संघातील मतदारांना भेटणे हे सर्व मागे पडून भलत्याच व भ्रष्टाचार मूलक पद्धतीचे पायंडे पडायला लागले.

जे राजकारणाच्या क्षेत्रात चालू आहे तेच आणि तसेच सांस्कृतिक, सामाजिक आर्थिक, साहित्यिक इ. क्षेत्रांमध्ये चालू झाले असून त्यातून 'आतले व बाहेरचे' असे दोन वर्ग निर्माण झाले. सकारात्मक विधायक राजकारणाचे तीन-तेरा वाजले आणि प्रत्येकच 'आतला' हा बाहेरच्या सर्वसामान्य जीवनातील व्यक्तीला 'बनचुका' वाटायला लागला. जनतेला तसे अनुभव मोठ्या प्रमाणात यायला लागले. भ्रष्टाचाराला विरोध करण्यासाठीही भ्रष्टाचाऱ्यांचाच वापर व्हायला लागला आणि एका शून्य गोंधळलेल्या दिशेने लोकशाहीची वाट वळायला लागली.

हे जगभरच चालू झाले. यात विलक्षण गती आली याचे कारण विज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्सच्या क्षेत्रातील प्रगतीमुळे जीवनाच्या दिशा अंधकारमय झाल्या आहेत. ही स्थिती २०११ हे वर्ष संपत आलेले असतानाची आहे. चांगले-वाईट, सत्-असत, खरे-खोटे यांच्यामधील सीमारेषा अस्पष्ट आणि सापेक्ष व्हायला लागल्या आहेत.

इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे व एकूणच जीवनशैली यांनाच फक्त दोष देणे योग्य ठरणार नाही. याचा वापर माणूस कसा करतो यावर आहे. हे न समजण्याइतके आपण खुळे राहिलेलो नाही. घटना, मूलभूत हक्क, कायदे, कायद्यांची अंमलबजावणी इत्यादी कोणत्याही बाबीत गोंधळाचे चित्र आहे.

यातून सर्वसामान्य जनतेच्या मनात (सर्वसामान्य या शब्दाचा अर्थ ज्यांचे पोट हातावर आहे, दोन वेळेला खायला मिळण्याची भ्रांत आहे असा नागरिक होय!) महागाईला कारणीभूत ठरलेली राजकीय मंडळी स्वतः विमानाने परदेशवाऱ्या करतात पण त्यांना रस्त्यातले खड्डे दिसत नाहीत असा राजकीय वर्ग आता जनता शत्रू मानू लागली आहे. जनतेला या देशातील सार्वजनिक जीवनाबद्दल शाश्वती वाटेनाशी झाली आहे. किंबहुना भ्रष्टाचार विरोधी म्हणून तथाकथित सृष्टांसह सर्वांबद्दलच जनतेच्या मनात संशयाची भावना आहे. गेली पाच-दहा वर्षे ही भावना वाढत चालली आहे. परदेशांतील सत्तेचे गुलाम असोत, की आपल्या देशातील सत्तेचे गुलाम असोत; हे आपले काही भले करणार नाहीत अशी जनतेची खात्री बनत चालली आहे.

त्यातूनच मतदानावर बहिष्कार, काळ्या फिती लावून निषेध इथपासून ते राजकीय सत्ताधाऱ्यांना चप्पल बूट फेकून मारण्यापर्यंत घटना घडतात. कोणतीही भावना जास्त काळ दाबून ठेवली की ती उफाळून वर येते. त्याचप्रमाणे जनतेच्या मनातील हा असंतोष उफाळून बाहेर पडताना दिसतो. हे वैध की अवैध, योग्य की अयोग्य यावर हवी तेवढी चर्चा करता येईल; पण कालपर्यंत आपल्यासारख्या असणाऱ्या माणसाची राजकीय लालसा पूर्ण होताच त्याची मिळकत काही कोटी रुपयांच्या घरात जाते, त्याच्या नावावर काही बंगले-काही जमिनी जमा होतात (अधिकृतपणे जाहीर होणारे आकडे लक्षात घेता.) तेव्हा घाम गाळणाऱ्या माणसांच्या मनात संशयाची वलये निर्माण होणारच.

सार्वजनिक जीवनात पाळावयाची किमान शुचिर्भूतता, बांधिलकी, एकूणच जागतिक इतिहासाचे किमान ज्ञान, नीतीमूल्यांची समज हे सर्व एका रात्रीत वाढेल असे नाही; पण जनता व जनतेच्या दृष्टीने सगळे सारखेच आहेत. या वर्गात असणारी राजकीय मंडळी व जनता यांच्यातील दरी कमी होणे गरजेचे आहे. त्यासाठी शालेयवयापासून या 'आचार संहितेचे' संस्कार व्हायला हवेत. आम्हांला हे बदलायचेच नसेल तर प्रश्नच येत नाही; पण मग स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय व सामाजिक क्षेत्रांतील नेत्यांची नावे उच्चारण्याचा 'किमान नैतिक अधिकारही' आम्हांला उरणार नाही.

**– नोव्हेंबर २०११**

❖❖❖

# भयावह प्रश्नांचे शतक

नागरीकरणाचे अनियंत्रित केंद्रीकरण चालू असलेल्या आपल्या देशात मोठमोठाली मानण्यात येणारी शहरे व गावे या सर्वांसह टोकाला असणाऱ्या मानवी वस्त्यादेखील विचित्रपणाने एकरूप होत चालल्या आहेत. पूर्वी मुंबई, मुंबईची खेडेवजा असणारी उपनगरे, पुणे, पिंपरी, चिंचवड अशी स्वतःची नावापुरती का होईना ओळख जपणारी गावे नकाशात दाखवता येत. आज यांच्या सीमा इतक्या वेगाने एकमेकींमध्ये अडकत चालल्या आहेत की या शहरांची, गावांची ओळख नावापुरतीच वेगळी उरत चालली आहे. जग जवळ येत आहे, इंटरनेटने व संगणकाने क्रांती केली असे म्हणता म्हणता जागतिक खेड्यांच्या सर्वच सीमा अशा एकमेकींमध्ये हरवून चालल्या आहेत.

या सर्वांचा परिणाम अनेक प्रश्न निर्माण होण्यात होत चालला आहे. किंबहुना २१ वे शतक हे भयावह प्रश्नांचे शतक ठरणार की काय असे समाजशास्त्रज्ञांना वाटू लागले आहे. लोकवस्ती व लोकसंख्या हे प्रश्न या सर्वांच्या मुळाशी तर आहेतच; पण न संपणारी हाव आणि सुखाच्या विकृत होत जाणाऱ्या संकल्पना

यांनी फक्त वाटोळे होण्याचे शिल्लक आहे. प्रदूषणाच्या सर्व प्रकारांनी टोक गाठले आहे. कचऱ्याचा प्रश्न हा 'आदर्श' असल्याचा पुरस्कार स्वीकारणाऱ्या नगरपालिका महानगरपालिकाही सोडवू शकत नाहीत. आवाजाचा इतका कल्लोळ कानाकोपऱ्यात आहे की, माणसाचे कान आणि त्यांची श्रवणशक्ती टिकून आहे हेच नवल! जलप्रदूषणाबद्दल न बोललेले बरे! दारूच्या कंपन्या पाण्याच्या बाटल्यांच्या बेछूट जाहिराती करतात, त्याचवेळी अशाच एका बाटलीत पाल निघाल्याची बातमी हातातील वृत्तपत्रातून आपल्याला खुणावत असते. गांधीवादाचा आणि गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा उठल्याबसल्या जप करणाऱ्या आजच्या राज्यकर्त्यांनी कोणतीही नीती पाळायची नाही अशी शपथच घेतली आहे. सत्ता स्पर्धेतील चौफेर उधळलेले हे घोडे जी शर्यत जिंकू पाहात आहेत ती शर्यत सामान्य माणसाचे जगणे उधळून लावत आहे. भ्रष्टाचार हा राष्ट्रीय स्तरावर चर्चिला जावा एवढ्या वेगाने वाढत चालला आहे.

नीती, आचार धर्म, धर्म संकल्पना या सर्वांच्या स्खलनामुळे 'वैध' आणि 'अवैध' या संकल्पनाच संपत चालल्या आहेत.

ध्वनी प्रदूषण हा एकच विषय घेतला तर आंतरराष्ट्रीय संघटनेने ध्वनीची घालून दिलेली मर्यादा कोणी लक्षातही घेण्याच्या मनःस्थितीत नाही. शाळा, महाविद्यालये, इस्पितळे ही सर्व शांतता क्षेत्रात असावीत असा कोपरा आजच्या समाजरचनेत शिल्लक नाही. शिवाजी पार्क सारखे मैदान, तेथील शक्ती-प्रदर्शन करणारी भाषणे, भर चौकात चाललेल्या दांडिया कृष्णाष्टमी यांसारख्या उत्सवांमध्ये जी उत्सवप्रियता बघायला मिळते तिने थरकाप उडतो. विकृत उत्सवप्रियतेतून स्वतःची पाठ थोपटत रहाणारे तथाकथित नेते व त्यांचे कार्यकर्ते, स्वतःलाच ओवाळून घेणारे 'वाढदिवस वीर' हे वातावरण आणखीनच गढूळ करत आहेत.

झपाट्याने जवळ आलेल्या या जगामध्ये प्रत्येकाचे हेतू आणि वास्तव बदलले आहे. त्यामुळे माणसे जवळ आली पण मने दुरावली अशी भयानक स्थिती निर्माण व्हायला लागली आहे. या सर्वांवर कोणीही नियंत्रण ठेवू शकत नाही ही आणखी एक शोकांतिका. आजच्या या अराजक सदृश परिस्थितीत उद्या काही नवे निर्माण होईल याची शक्यता नाही. कारण रचनात्मक कार्यापासून आम्ही दूर चाललो आहोत. कोणताही आध्यात्मिक गुरू, उपोषण करणारे कोणतेही 'जनतेचे नेते' जादूची काडी फिरवून हा देश सुधारून दाखवू शकणार नाहीत. असे असले

तरी मानवी मनातील आशेचा तंतू हा अखेरपर्यंत जिवंत असतो. शिक्षण घेतलेले काही तरुण जर एकत्र आले आणि त्यांनी काही सकारात्मक घडवून दाखवले तरच परिस्थिती बदलू शकेल. पण त्यासाठी जबरदस्त इच्छाशक्ती हवी आणि सामाजिक शिस्त हवी.

**– जानेवारी २०१२**

❖❖❖

# दैवतीकरण – नाजूक विषय

महाराष्ट्रातील ताज्या घटना आणि गेल्या काही दशकांध्ये विशेषतः राजकीय पुढाऱ्यांचे झालेले आणि चालू असलेले दैवतीकरण ही एक गंभीर बाब आहे. अशा दैवतीकरणाला साहित्यिक आणि विचारवंतांचा लागलेला हातभार हा तर अधिक गंभीर आहे. दैवतीकरण हे कमी–अधिक प्रमाणात सर्वच सभ्यतां–मध्ये आढळून येत असले तरी विसाव्या शतकातील उदाहरणे ही चिकित्सक समाज आणि त्याच्या दिवाळखोर नेतृत्वाचा इतिहास आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून ते दुसऱ्या महायुद्धापर्यंत सर्व हुकूमशाही, एकाधिकारशाही देशांमध्ये योजनाबद्ध असे त्यांच्या नेतृत्वाचे दैवतीकरण केले गेले. लेनिन, स्टॅलिन, हिटलर, माओ, चाऊसेस्को, सद्दाम हुसेन, गडाफी ते फिडेल कॅस्ट्रोपर्यंतचा इतिहास ताजा आहे. या सर्व नेतृत्वाने आपल्याच हजारो, लाखो बांधवांना मारून टाकले, अमाप संपत्ती हडप केली आणि त्या त्या राष्ट्रातील नागरिकांना संवदेनाशून्य, बधिर करून टाकले. इतका जुलूम करूनही या दैवतांचा प्रभाव त्यांच्या पश्चात दोन–चार दशकापलीकडे जाऊ शकला नाही. एवढेच नाही तर, यातील काही दैवतांना समाजाने

ठेचून मारले. भारत हे लोकशाही राष्ट्र असले तरीही आपल्या लाडक्या नेत्यांचे दैवतीकरण करण्याची मानसिकता मात्र हुकूमशाही समाजासारखीच दिसून येते. स्वातंत्र्यानंतर सुरुवातींच्या नेत्यांचे दैवतीकरण किंवा त्याचा अतिरेक हा त्यांच्या अनुयायांनी केलेला दिसतो. आपल्या लाडक्या नेत्याच्या क्षमतेला कुठलेच मानवी नियम लागू होऊ शकत नाहीत हाच अट्टाहास दैवतीकरणाची पुटे चढवण्यामध्ये दिसून येतो. या शिखरावर गांधी, नेहरू, फुले आणि आंबेडकर हे असले तरी सावरकर, विवेकानंद, सुभाषचंद्र बोस यांचे अनुयायीही यामध्ये काकणभरही कमी नाहीत. या सर्व महान नेत्यांनी मांडलेले विचार त्यांच्या अनुयायांनी केव्हाच इतिहासजमा करून टाकले आणि आपल्या नेत्याच्या शिकवणीच्या 'व्यस्त' भूमिका आणि 'जीवनशैली' हे अनुयायी जगू लागले. ही दरीच अनुयायांपेक्षाही त्यांच्या नेतृत्वाला कालबाह्य आणि हास्यास्पद ठरवू लागली. नक्षलवादी भूमिकेचे समर्थन करणारे विचारवंत जेव्हा नक्षलवादी हे गांधीवादाचे पुरस्कर्ते आहेत हे गंभीरपणे सांगू लागतात तेव्हा विनोदही पोरका झालेला असतो. स्वातंत्र्यानंतरच्या राजकीय पुढाऱ्यांनी गांधी, नेहरू, फुले, आंबेडकर यांचे केलेले दैवतीकरण हे चिकित्सक बुद्धिवादाकडे पाठ तर सोडूनच द्या, पण आजचे त्याचे स्वरूप हे दांभिक, लाचार आणि विवेकशून्यतेची परिसीमा गाठणारे आहे. नाटकात जशी नांदी असते तसे स्मशानात केलेल्या भाषणांमधूनही अशा दैवतांच्या नावांचा उच्चार अपरिहार्य बनू लागला. याचीच पुढची पायरी म्हणजे असहिष्णुता आणि धटिंगणशाही. ज्या गांधी नेहरूंची शिकवण अहिंसा आणि सहिष्णुता असल्याचे सांगितले जाते, त्यांच्या अनुयायांकडून मात्र या नेत्यांचा विचार आणि धोरणांची वस्तुनिष्ठ चिकित्सा सहन केली जात नाही. या गोष्टी येथेच न थांबता अशा चिकित्सकाला मूर्ख, मागासलेला आणि देशद्रोही समजण्यात येते. त्याही पलीकडचा कडेलोट म्हणजे नाटक, सिनेमा, कला, उच्चार स्वातंत्र्याचा पाठपुरावा करणारे विचारवंत हे गांधी, नेहरू, शिवाजी, आंबेडकर, फुले यांच्या विचारांशी असहमती दर्शवलेल्या लिखाणाच्या बाबतीत मात्र कमालीचे हळवे झालेले दिसतात. दैवत्व मिळवलेल्या नेत्याच्या कुटुंबालाही लौकरच बुद्धी आणि नेतृत्वाचे विशेष अधिकार प्राप्त होतात. अशी कुटुंबे आणि अनुयायी यांच्यामध्ये 'एकमेका सहाय्य करू, उद्धार करू' असे नाते निर्माण होते. अनुयायीही 'मालामाल' होतात. राजेशाही, सरंजामशाही, घराणेशाही यांचा घसा फुटेस्तोवर विरोध करणाऱ्या सिद्धांतवाद्यांनाही अशा कुटुंबामध्ये समाजवादी, निधर्मी आणि लोकशाहीचे अंकुर दिसू लागतात. स्वकर्तृत्वावर शिपायाची नोकरीही

मिळण्याची क्षमता नसलेले हे कुटुंबीय नुसतेच धनवान नाही तर अनुयायांकरवी त्यांचेही देव्हारे बांधण्यात मग्न झालेले असतात.

दैवतीकरण हे अनुयायांच्या राजकारणातील यशाकरता जेव्हा जादूचा ताईत ठरू लागते तेव्हा तर असे दैवतीकरण किळसवाणे स्वरूप धारण करते.

तमिळनाडूपासून उत्तरप्रदेश, बिहारपर्यंत गेल्या एक-दोन दशकांतील राजकीय नेतृत्वाचे दैवतीकरण याच साचातले आहे. पुतळे, स्मारके, रस्त्यांपासून सार्वजनिक संस्थांना अशा दैवतांची दिलेली नावे आणि त्यासाठीचा आग्रह उबग आणणारा आहे. पुतळे किंवा स्मारके कमी पडू लागतात म्हणून की काय, आता रस्ते आणि इतरत्र लावलेले वाढदिवसांपासून जयंत्या, पुण्यतिथ्यांचे फलक सार्वजनिक जागाही विद्रूप करत आहेत. गंभीर किंवा क्रांतिकारक विचार मांडणे हे कल्पकता आणि साहित्यावरील प्रभुत्वातून निर्माण होऊ शकतात, पण 'बोले तैसा चाले' आणि चारित्र्यसंपन्न अनुयायी निर्माण करणे मात्र सहस्रकातील एखाद्याच नेत्याला जमते. चांगल्या नेतृत्वाला प्रसिद्धी लागत नसते; पण सिनेमा चालवायला किंवा एखादी वस्तू विकायला मात्र प्रचंड प्रसिद्धी करावी लागते. व्यापारातील यशाचे हे गमक आजचे नेतृत्व आणि त्यांच्या अनुयायांनी पक्के ओळखले आहे. आजच्या प्रसिद्धी माध्यमांनाही काहीतरी नवीन हवे असते आणि म्हणूनच नावीन्याचा शोध लावून प्रसिद्धी माध्यमे असल्या दैवतीकरणाला प्रोत्साहनच देत असतात. सत्य हे वास्तवापेक्षा भयानक असते. आजचा भयानक भ्रष्टाचार हे मूल्यहीन, चारित्र्यहीन समाजाचे अपत्य आहे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण हे त्याच अपत्याला झालेले पुढचं मूल आहे. साहजिकच या सर्वांचे कूळ वैचारिक दांभिकता हे आहे. 'यथा प्रजा तथा राजा' हे जेवढे सत्य आहे तेवढेच 'यथा राजा तथा प्रजा' हेही सत्य आहे. अफूची नशा ही अफूचे प्रमाण वाढवत नेऊन मिळवावी लागते. आजच्या दैवतीकरणाचा प्रवास हा आता महात्मा, महर्षी, महामानवापासून जननायकापर्यंत येऊन पोहोचला आहे. प्रत्यक्षात मात्र सत्य, आत्मसन्मान आणि विवेक यांची निष्क्रिय स्मारके होऊन राहिली आहेत. दैवतांची हीच खरी शोकान्तिका आहे.

**- डिसेंबर २०१२**

❖❖❖

# संस्कृती भंजन की वर्धन?

दिल्लीपासून गल्लीपर्यंत सध्या गाजत असलेल्या बलात्काराच्या घटना काय किंवा लोकप्रतिनिधींच्या अधिकारांच्या गैरवापराच्या कथा काय या सगळ्या गोष्टींचा केंद्रबिंदू हा 'माणूस'च आहे. बाराव्या शतकापासून युरोपमध्ये प्रबोधनाचे वारे वाहू लागले. पाचव्या-सहाव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत इराण आणि इराकमध्ये मोठ्या प्रमाणवरती विज्ञान आणि मानव्य शास्त्रांच्या ज्ञानशाखांमध्ये वाढ झाली. ही समृद्धता प्रामुख्याने ग्रीक आणि भारतीय तत्त्वज्ञानाच्या मिश्रणातून आली होती. पाचव्या शतकात इराणमधील गुंडिशापूरला असे ज्ञानपीठ प्रस्थापित झाले. भारतातील अनेक वैद्यकीय, ग्रहगणित आणि इतर वैज्ञानिक शास्त्रांचे ग्रंथ तेथे पेहलवी भाषेत भाषांतरित होऊ लागले. पंचतंत्रातील कथांपासून चतुरंग (बुद्धिबळ) हा खेळ याच काळात तेथे संक्रमित झाला. ॲरिस्टॉटल, प्लेटो आणि इतर अनेक ग्रीक तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांचीही येथे भाषांतरे होऊ लागली. दोन-तीनशे वर्षांत हेच ज्ञानकेंद्र ८ व्या ९ व्या शतकात बगदाद येथे स्थलांतरित झाले. तेथेही भारतीय तत्त्वज्ञान, गणित व विज्ञानाच्या अनेक ग्रंथांची भाषांतरे सुरू झाली. मध्यपूर्व देशांतील

अभ्यासकांनी यात मौलिक भर टाकून या विज्ञानशाखा विकसित केल्या. याचवेळी युरोपमध्ये ख्रिस्ती आणि इस्लामी धर्मयुद्धे होत होती. इस्लाममध्ये धर्मांधतेचा प्रसार वाढत होता; तर ख्रिस्ती प्रदेशांतून ज्ञानलालसा वाढत होती.

वर उल्लेख केलेल्या बाराव्या शतकापासून पर्शियन व अरेबिक भाषांतील हे ज्ञानभांडार लॅटिन भाषेत भाषांतरित होऊ लागले आणि त्याचा पुढचा टप्पा म्हणून १५-१६ व्या शतकात विशेषतः पश्चिम युरोपमध्ये प्रबोधन युगाला सुरुवात झाली. यामुळेच चर्च, तसेच ख्रिस्ती धर्म संकल्पनेच्या आंधळ्या प्रभावाला धक्के बसू लागले. चर्च व राजसत्ता यांतही संघर्ष वाढू लागले. या प्रबोधन युगाचे पुढचे पाऊल म्हणजेच युरोपमधील औद्योगिक क्रांती.

या औद्योगिक क्रांतीने मात्र व्यक्ती आणि समाज यांची सगळी समीकरणे बदलून टाकली. या औद्योगिकीकरणाचा व्यापारी आणि आर्थिक पूरकत्वाचा फायदा अमेरिका या नवीन उदयाला येणाऱ्या देशाने सर्वाधिक घेतला. युरोपमधील इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, बेल्जियम, स्पेन, पोर्तुगाल यांच्या सोळा-सतराव्या शतकात चालू झालेल्या वसाहतवादालाही या घटना पोषकच ठरल्या. ख्रिस्ती धर्मप्रसारक आणि औद्योगिक क्रांतीचे फायदे ही दोन शस्त्रे घेऊन आशिया, आफ्रिका आणि द. अमेरिका खंड युरोपियन संस्कृतीने पादाक्रांत केले. आधुनिकता, प्रगती आणि विज्ञान, म्हणजेच पाश्चिमात्य जीवनशैली आणि संस्कृती हे समीकरण मांडले जाऊ लागले व आज ते दृढ झालेलेही आपल्याला दिसते. पौर्वात्य संस्कृती म्हणजे परंपरावादी, असंस्कृत, मागासलेले, अंधश्रद्धाळू हेही समीकरण यामुळेच पक्के झाले.

भारत देश आणि भारतीय संस्कृती यांच्या विकासाचा काळ हा कमीत कमी पाच हजार वर्षे तरी अभ्यासकांना आज मान्य आहे. भारतीय संस्कृतीच्या निर्मितीमध्ये- मग तो धर्म, कला, विज्ञान वा तत्त्वज्ञान असो या हजारो वर्षांचे संचित साठलेले आहे. यातूनच भारतीय जीवनशैली विकसित झाली. यात अनेक चढ-उतार, यश-अपयश, चांगल्या-वाईट गोष्टींचे अनुभव समाविष्ट आहेत आणि यामुळेच कदाचित भारतीयांमधील अनेक विभिन्न धर्म समजुती, आचारविचारांमधील वैविध्य यांचा उगम आहे. याचे आकलन पाश्चात्त्य धर्मप्रसारक आणि अभ्यासकांना होऊ शकले नाही. एक देव, एक पुस्तक आणि एकच विचारसरणी हा गाभा असलेल्या ख्रिस्ती आणि इस्लामी प्रभावाखालील पाश्चात्त्य लोक हे हिंदूंचा एकच ग्रंथ नाही, किंवा अनेक देव आणि अनेक पंथ ही संकल्पना पचवू शकले नाहीत. हजारो वर्षे भारतीय

संस्कृती या विविधतेतूनच विकसित झाली. त्यांनी आपले अध्यात्म आणि विज्ञान यांची निर्मिती केली आणि कधी धर्मग्रंथ तर कधी सांस्कृतिक बंधने, नीती-अनीती व पाप-पुण्य, चांगल्याला प्रोत्साहन, पुरस्कार; तर अविवेकी वर्तणुकीला लगाम आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळू न देणे यांतूनच व्यक्तीविकास, समाजविकास आणि त्यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न केला. याकरता त्यांना केव्हाच फक्त एका देवाची, एका पुस्तकाची, एका नेत्याची किंवा फक्त एका विचाराची बांधीलकी किंवा गुलामगिरी स्वीकारावी लागली नाही. आर्यभट, ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य यांच्या गणिती मांडणीतही त्यामुळेच विविधता दिसते, मतभेद दिसतात आणि यामुळेच नृत्याच्या मणिपुरीपासून भरतनाट्यम्, कथकलीपर्यंत भिन्न नृत्यशैली विकसित होतात. शंकराचार्यांपासून मध्वाचार्यांपर्यंत सर्व आचार्य संपूर्णतः भिन्न तत्त्वज्ञानाचा विचार मांडू शकतात. या कोणालाच काय, पण वात्सायनालाही कुठलाही धर्मगुरु धर्मबाह्य करू शकला नाही. १९ व्या शतकात इंग्रजीत वात्सायनाचे भाषांतर करणाऱ्या लेखकांना मात्र भीतीपोटी आपल्या संपूर्ण नावाची फक्त आद्याक्षरे लिहावी लागली.

इतिहासातील वरील घटनांचा मागोवा घेतल्यावरच आजच्या पाश्चात्त्य संस्कृती आणि जीवनशैलीचे स्रोत आपल्या लक्षात येतात. यंत्रयुगाने त्यांचे राहणीमान, माणसामाणसांमधील आणि निसर्गामधील संबंध यांमध्ये आमूलाग्र बदल केला. यंत्र निर्मितीची साधने, त्यातून निर्माण होणारे उत्पादन आणि वितरण यांनी एका वेगळ्या अर्थकारणाला जन्म दिला. सभ्यतांच्या विकासाचे परिमाण हे परडोई साबण, मोटारी आणि इतर उपभोग्य वस्तूंशी निगडित केले गेले. वस्तूंची विक्री जेवढी जास्त तेवढे उत्पादन जास्त आणि उद्योगधंद्यांची समृद्धीही जास्त. विज्ञान दररोज क्रांतिकारी गोष्टींची उपलब्धता करून देते. यातूनच उद्योगधंद्याच्या गुणात्मक आणि संख्यात्मक वाढीकरता जीवघेण्या स्पर्धेचा जन्म झाला. उद्योगापासून खेळापर्यंत 'यश' हे एकच यशस्वितेचे मोजमाप बनले. यामुळेच सर्व नीती-नियम, सामाजिक व सांस्कृतिक बंधने नुसती खिळखिळीच नाही, तर त्यांची मोडतोड चालू झाली. आजच्या क्रिकेटचे शुद्ध व्यापारी स्वरूप काय किंवा यशाकरता खेळाडूंचे मादक पदार्थांचे सेवन काय याचा उगमही याचे अर्थकारण आणि स्पर्धा यातच आहे. दुर्दैवाने पाश्चात्त्य जगतात प्रबोधन आणि यंत्रयुगातून आलेली स्वच्छता, वक्तशीरपणा, कायद्याचा आणि ज्ञानाचा आदर आणि याकरता लागणारी साधने म्हणजे अद्ययावत ग्रंथालये, संग्रहालये आणि विद्यापीठे मात्र आम्ही निर्माण करू शकलो नाही.

सोळावे शतक म्हणजे वसाहतवादाच्या सुरुवातीच्या काळापर्यंत तत्त्वज्ञान, विज्ञान, जीवनोपयोगी उत्पादने, संगीत आणि कला या सर्व क्षेत्रांमध्ये भारत हा पाश्चात्त्य देशांच्या पुढे होता. यांच्या निर्मितीकरता लागणारी समाजरचना ही स्पर्धेपेक्षा सामंजस्य, सद्सद्विवेक बुद्धी आणि सर्वमान्य नीती-अनीती आणि सामाजिक मूल्यांचा आदर करून जिवंत राहिली. चारित्र्यनिर्मिती आणि जीवनात यश निर्मिती करता लागणाऱ्या साधनांची सांगड होती. येनकेन प्रकाराने यश मिळवणे समाजमान्य नव्हते.

यामुळेच पाश्चात्त्य आणि भारतीय जीवनशैली आणि सांस्कृतिक मूल्ये यांचा स्रोत आणि अंतिम ध्येय ही संपूर्णतः भिन्न आहेत. यामुळेच पाश्चात्त्य आणि भारतीय संस्कृतीतील 'स्वातंत्र्य' आणि 'अधिकारा'च्या संकल्पना 'व्यस्त' आहेत. पाश्चात्त्य संस्कृतीत त्या 'व्यक्ती आत्मकेंद्रित' आहेत, तर भारतीय संस्कृतीमध्ये त्या व्यक्तीबरोबर 'समाजकेंद्री' आणि समाजमान्य 'चारित्र्य' चौकटीचे पालन करणाऱ्या आहेत. वसाहतवादाच्या यशाकरता यंत्र-संस्कृतीबरोबरच पाश्चात्त्य नीतिमूल्यांचे रोपणही अपरिहार्य झाले. भ्रष्टाचारापासून सामाजिक बेजबाबदारपणाचे आजचे स्वरूप या विषम संस्कृतींच्या संकराचे फळ आहे. शिक्षण मग ते शालेय असो वा लैंगिक, ते अगदी प्रसार माध्यमांच्या कार्यक्रमाच्या आजच्या स्वरूपापर्यंत सर्व पाश्चात्त्य संस्कृतीची भ्रष्ट नक्कल करूनच मार्गक्रमण करीत आहे.

आज आपण एकच ग्रंथ म्हणजे आपली घटना आपल्या सगळ्या जीवनाला नियंत्रित करण्यासाठी मान्य केली, 'समाजवाद' नावाच्या एका 'वैचारिक' बांडगुळाचा स्वीकार केला; स्त्री-पुरुष विषमता, जातधर्म हे आम्ही मानत नाही याचा उठता बसता घोष चालू केला, 'सर्व मानव समान' हे १००% अनैसर्गिक तत्त्व स्वीकारले, अशा या सर्व एकसुरी समाजाच्या निर्मितीकरता आपण मनुस्मृती जाळली, धर्मसंकल्पनेला अंधश्रद्धा ठरवले, हजारो वर्षांच्या संचितातून निर्माण केलेल्या लग्नापासून सर्व सामाजिक संस्था उदध्वस्त केल्या; आणि मिळवले काय? तर शुद्ध जातीवर आधारित शिक्षणापासून व्यवसायापर्यंत आरक्षणाचा दागिना! या देशातील प्रत्येक समाज 'आम्ही किती मागासलेले आहोत' हे सांगण्यात धन्यता मानत आहे. गरीबाला गरीब राहण्यातच फायदे होत आहेत.

आजच्या आपल्या या भयावह सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अधःपाताची मुळे आपण स्वतःच करून घेतलेल्या या संस्कृतिभंजनात आहेत.

मोडतोड म्हणजेच सुधारणा आणि दिवाळखोरीत निघालेल्या साम्य/समाजवादी व्यवस्थेची स्वतःच्या घरात, दारात आणि पक्षात अंमलबजावणी करू न शकणारे 'सुधारक' आणि सिद्धांताला बांधलेले साहित्यिक, नाटककार यांच्याकडेच या भंजनाचा सिंहाचा वाटा जातो. शब्दकोशातील मूर्ख, लाचार, कांगावाखोर, खोटारडा, गुंड, धटिंगण या सगळ्यांचे अर्थ पुढील आवृत्त्यांतून आपल्याला वेगळे दिसणार आहेत! बळी तो कान पिळी, चोर तो शिरजोर, आयत्या बिळावर नागोबा अशा म्हणींचे संदर्भ बदलून राजकीय आणि सामाजिक यशाची ती मार्गदर्शक तत्त्वे ठरणार आहेत! सिनेमात केलेल्या तथाकथित गांधीगिरी करता संजय दत्तला माफी द्या असे सांगणारे आमचे महान निवृत्त न्यायाधीश, सिनेमातून गुन्हेगारीचे काम करणाऱ्या प्राण या नटाला फाशी द्यायला तर सांगतीलच, पण त्याच्या प्रेतालाही अनेकदा फाशी द्या असला सल्लाही त्यांनी दिला तरी नवल वाटायला नको! विधानसभा परिसरात केलेल्या धटिंगणशाहीच्या संदर्भात संपूर्ण मतैक्याने विधानसभा तहकूब करणाऱ्या आजच्या लोकप्रतिनिधींमध्ये सावरकरांचे नाव एखाद्या रस्त्याला द्यायचे असेल तेव्हा मात्र अशी एकजूट झालेली दिसत नाही! एरवी आक्रमक वाघासारखी भूमिका घेऊन मुलाखत घेणारे आमचे आर्णव गोस्वामी आणि थापर हे अत्यंत शालिनतेने विणलेल्या शब्दांतूनच नाही, तर देहबोलीतूनही आदर व्यक्त करून संजय दत्तची मुलाखत घेताना जेव्हा दिसतात तेव्हा वाहिन्यांवरील पेव फुटलेल्या असल्या मुलाखतींचे 'अर्थ'कारणही लक्षात येते. त्यांचा मुलाखत घेतानाचा आविर्भाव असा की, ते जणू आइनस्टाईनतुल्य एखाद्या शास्त्रज्ञाची किंवा कारगील युद्धात पराक्रम गाजवणाऱ्या योध्याचीच मुलाखत घेत आहेत! मनोरंजनाच्या माध्यमातून आणि मुलाखतीतून प्रसारित केला जाणारा हा स-माजवादच आजच्या आपल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अधःपतनाला कारणीभूत आहे.

म्हणूनच परिस्थितीत बदल करायचा असेल तर या गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना किंवा मारझोडीचे उघडपणे समर्थन करणाऱ्या पक्षांना भरघोसपणे निवडून देणाऱ्या किंवा त्यांच्या सभांना गर्दी करणाऱ्या सामान्य माणसांनी अंतर्मुख होऊन याचा विचार करायला हवा.

**– एप्रिल २०१३**

❖❖❖

# जबाबदारी आणि अधिकारांची जाणीव

स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षांत आपण काय मिळवले असा प्रश्न जर का केला तर, ''अधिकारांचे' प्रचंड पीक'' हे उत्तर खात्रीलायकरित्या देता येईल. मानवी अधिकारांपासून ते अलीकडेच प्राप्त झालेल्या शिक्षणाच्या अधिकारांपर्यंत ही यादी खूपच मोठी आहे. मनुष्य जेव्हा जन्माला येतो तेव्हाच त्याला जगण्याकरता हव्या असणाऱ्या सर्व अधिकारांचा 'अधिकार' मिळालेला असतो. कुठलेही सरकार किंवा व्यक्ती ते काढून घेऊ शकत नाही. वास्तविक जन्मजात मिळालेल्या अधिकारांची अंमलबजावणी मात्र क्रमाक्रमाने, अनुभवांतून आणि त्यातून मिळणाऱ्या जाणिवेतून होऊ लागते. जेव्हा जबाबदारीची जाणीव प्राप्त होते तेव्हाच 'अधिकारांचे' अस्तित्व टिकून राहू शकते. हे अधिकार व त्यांची दुसरी बाजू असणाऱ्या जबाबदाऱ्या यांतील महत्त्वाची 'जाणीव' म्हणजे स्वतः-इतकेच दुसऱ्यालाही जन्मजात अधिकार प्राप्त झाले आहेत ही जाणीव! अधिकाराबरोबर जबाबदारीच्या जाणिवा संस्कारांतूनही समजावून द्याव्या लागतात. यांतूनच लक्षात येते की, कुठलाही मानवी अधिकार

‘अनिर्बंध’ नसतो, त्याची सांगड समाजातल्या प्रत्येक घटकाशी असते. म्हणूनच अधिकारांना जेव्हा जबाबदारीचे कोंदण मिळते तेव्हांच कोंदणातील ‘अधिकार’ अर्थपूर्ण, पूरक आणि मानवी जगण्याला सहाय्यक बनू शकतात. जबाबदारीशिवाय असणारा अधिकार हा स्वैराचार किंवा बळजबरी असतो.

‘जाणीव’ ही एक अत्यंत महत्त्वाची संकल्पना, ती एक अनुभव देत असते. काही जाणिवा नैसर्गिक असतात, तर काही सांस्कृतिक, सामाजिक असतात. गरोदरपणी आईला आपल्या पोटातील मुलाच्या हालचालींची होणारी पहिली जाणीव ही वर्णनातीत असते. त्या जाणिवेने नुसत्या कविताच झाल्या असे नाही, तर संपूर्ण संस्कृती त्यावर उभी राहते. या जाणिवेतच आपले सर्व ‘अधिकार’ आणि ‘जबाबदाऱ्या’ यांची ‘जाणीव’ होत असते. यातूनच पुढच्या काळामध्ये बाळाचा आपल्या आईशी व आईचा बाळाशी संवाद चालू असतो. प्रत्येक स्त्रीला आणि पुरुषाला पौगंडावस्थेत आपण ‘स्त्री’ अथवा ‘पुरुष’ असण्याची जाणीव होते. त्याचवेळी त्यांच्यात शारीरिक व मानसशास्त्रीय बदल होत असतात. हे बदल हेच त्या स्त्री अथवा पुरुष यांच्या अधिकारांची आणि जबाबदाऱ्यांची नव्याने सुरुवात असते. म्हणूनच या जाणिवांना संस्कारांचे कोंदण घालावे लागते; तेव्हाच या अधिकारांना ‘सृजन’क्षमतेचा अर्थ प्राप्त होतो. पुरुषत्वाच्या आणि स्त्रीत्वाच्या अधिकारांचे हे प्रकटीकरण लैंगिक अवयवांतून होत असले तरी त्यांच्या जबाबदाऱ्यांची बैठक मात्र सांस्कृतिकच असावी लागते. म्हणूनच हे अधिकार आणि जबाबदाऱ्या म्हणजे लैंगिक शिक्षण नाही. जेव्हा फक्त अधिकारांचा वा फक्त लैंगिक शिक्षणाचा विचार होतो तेव्हा आजच्यासारखी परिस्थिती निर्माण होते.

आजच्या सामाजिक आणि राजकीय गोंधळाला हीच बेजबाबदार ‘अधिकार’ संकल्पना कारणीभूत आहे. सिद्धान्तवाद आणि पुरोगामित्वाची बाशिंगे गुडघ्याला बांधून समाजसुधारणा करायला निघालेल्या स्त्री, पुरुष मुक्तिवाद्यांचा यात सिंहाचा वाटा आहे. अपात्री दान जेवढे धोकादायक, त्याहीपेक्षा अपात्री अधिकार भयावह! शुद्ध आकडेवारीवर आधारलेल्या लोकशाहीतून ‘अधिकार’ प्राप्त करून घेणारे लोकप्रतिनिधी व त्यांतूनच निवडून येणारे मंत्री, संत्री यांच्या राक्षसी कारकिर्दीला यातूनच सुरुवात होते. असले जाणीवशून्य आणि बधिर नेतृत्व हे ‘अधिकार’ आणि ‘फुकटे’पणाची खैरात करत असते. यातून फुकटेपणाला चटावलेल्या, लाचार व तेवढ्याच बधिर स्तुतिपाठकांचा वर्ग तयार होत असतो. अशा या नेता- अनुयायी परस्परावलंबी युतीतूनच आपली गेल्या ६०-६५ वर्षांतील लोकशाही विकसित

होत गेली. भ्रष्टाचार आणि सामाजिक गोंधळ व त्यातून निर्माण होणारा अन्याय, ही सगळी या अभद्र युतीची अपत्ये आहेत. म्हणूनच आज गरज आहे ती अधिकारांबरोबर जबाबदारीच्या जाणिवेची. जबाबदारीशून्य अधिकारांना यातूनच पायबंद बसू शकेल.

**– मे २०१३**

❖❖❖

# सांस्कृतिक बधिरता

धरणीकंप, त्सुनामी, वादळे, ज्वालामुखी, अतिवृष्टी इत्यादी नैसर्गिक प्रकोपांमुळे मानवाचे आणि त्यानेच निर्माण केलेल्या भौतिक जगाचे प्रचंड नुकसान होत असते. यामध्ये मानव आणि संस्कृतीचा प्रचंड विध्वंस होतो. ही प्रक्रिया सृष्टीच्या निर्मितीपासूनच चालू आहे. सिंधू संस्कृतीपासून अनेक अतिप्राचीन संस्कृती या अशाच नैसर्गिक प्रकोपांमुळे नष्ट झाल्या असाव्यात असा अभ्यासकांचा कयास आहे. आधुनिक माणसाच्या जीवनशैलीमुळे पर्यावरणामध्ये येणारे असंतुलनही हवामानामध्ये अनपेक्षित बदल करीत असते. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ, यांमुळेही सार्वजनिक मालमत्ता आणि पर्यायाने संस्कृतीचा विध्वंस होतच असतो. या नैसर्गिक घटनांचे वैज्ञानिक विश्लेषण कदाचित त्याचे कारण दाखवू शकेल, पण त्यामुळे होणारी हानी मात्र टाळता येणे अशक्य असते.

सांस्कृतिक विध्वंसाचे दुसरे महत्त्वाचे कारण मात्र मानवनिर्मित आहे, आणि ते म्हणजे लढाया. अलेक्झांडरच्या आक्रमणापासून ते अगदी सध्या सीरियामध्ये चालू असलेल्या युद्धामुळे संस्कृतीची प्रचंड

हानी झालेली दिसते. या लढायांना जर का धर्माचे अधिष्ठान असेल तर हा सांस्कृतिक विध्वंस अधिकच तीव्र असतो. इजिप्तमधील ॲलेक्झांड्रियाचे ग्रंथालय काय किंवा नालंदाचे ग्रंथालय काय, मूलतत्त्ववाद्यांच्या कारवायांमुळे अनेक महिने जळत होते. आपल्याकडील काशीविश्वेश्वराचे मंदिर, गुजरातमधील सोमनाथ मंदिर, काश्मीर आणि उत्तर भारतातील शेकडो मंदिरे, ही इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी जमीनदोस्त केल्याचे स्वतःच लिहून ठेवले आहे. बाराव्या ते चौदाव्या शतकांमध्ये इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मयुद्धांमुळे अशीच प्रचंड सांस्कृतिक हानी ही सीरिया, स्पेन आणि पोर्तुगालमध्ये केली गेली. हा सगळा इतिहास झाला.

चौदाव्या शतकात युरोपमध्ये प्रबोधनाचे युग चालू झाले. कलेपासून विज्ञानापर्यंतच्या विकासाला एक नवीन दिशा मिळाली. युरोपमधील वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांती त्यामुळेच शक्य झाली. विसंवादापेक्षा संवाद आणि सहिष्णुतेकडे विचारवंतांचा कल झुकू लागला. यामागची पार्श्वभूमी ही ख्रिस्ती आणि इस्लाममधील धर्मयुद्धाचीच होती. युरोपमध्ये स्पेन, पोर्तुगाल ही राष्ट्रे आलटून पालटून धर्म आणि त्यामुळे सांस्कृतिक बदल अनुभवत होती. बाराव्या शतकामध्ये स्पेन पुन्हा ख्रिश्चनांनी जिंकले आणि टोलिडो येथील ग्रंथालयाचा विध्वंस करण्याऐवजी तेथील पर्शियन व अरेबिक तत्त्वज्ञान आणि विज्ञानाच्या ग्रंथांच्या भाषांतराचे एक नवीन युग निर्माण झाले. युरोपमधील प्रबोधनाची ती पार्श्वभूमी होती. युरोपमधील वैज्ञानिक क्रांतीची बहुतेक सर्व मूलतत्त्वे ही अरेबिक, परशियनमधून लॅटिनमध्ये झालेल्या विज्ञान विचारांमुळे होती. सांस्कृतिक विध्वंसापेक्षा त्याचे संवर्धन मानवाला अधिक हितकारक असते याचे हे एक उत्कृष्ट उदाहरण होते.

सातव्या शतकात भारतीय गणित आणि वैद्यक ग्रंथांची भाषांतरे पूर्व आणि मध्यपूर्व आशियामध्ये व्हायला लागली. वास्तविक इराणमधील गुंडिशापूर येथील ज्ञानकेंद्रामध्ये भारतीय आणि ग्रीक ज्ञानग्रंथांचे भाषांतर या आधीच चालू झाले होते. 'बूज्र्झा' या अभ्यासकाने भारतभर भ्रमण करून 'पंचतंत्र' हा ग्रंथ गुंडिशापूर येथे नेऊन तेथे त्याचे पहलवी भाषेत भाषांतर केले. यानंतर पंचतंत्राचे जगातील सर्व प्रमुख भाषांमध्ये भाषांतर झाले, आणि पंचतंत्राच्या गाभ्यातूनच युरोपमधील अनेक नीतिकथा उदयास आल्या. आठव्या, नवव्या शतकामध्ये गुंडिशापूर येथील हे ज्ञानकेंद्र इराकमधील बगदाद येथे स्थलांतरित झाले. पुन्हा एकदा भारतीयांची गणितावरील पुस्तके तेथे भाषांतरित झाली. जगाला 'शून्य' आणि आकड्यांची ओळख या भाषांतरांतूनच मिळाली.

जो प्रकार मध्यपूर्व आशियात घडत होता तोच प्रकार हिमालयाच्या उत्तरेकडील मध्य अशियामधील देशांमध्ये होत होता. बौद्ध धर्माच्या प्रसाराबरोबरच अनेक भारतीय वैज्ञानिक ग्रंथांचेही भाषांतर या मध्य आशियातील देशांमध्ये व्हायला लागले. चीनमध्ये तर हा सांस्कृतिक वारसा आधीच पोहोचला होता. रशियाचे अफगाणिस्तानावरील आक्रमण आणि मध्य आशियामधील देशांवरचा त्याचा ताबा या घडामोडींमधून खरोष्ठी, ब्राह्मी लिपीमधून लिहिलेली अनेक हस्तलिखिते स्कॅंडिनेव्हियन देशांमध्ये पोहोचली असून त्यांचा अभ्यास तेथे सुरू आहे. सांस्कृतिक सहिष्णूता आणि संस्कृती जपण्याच्या संवेदनेतून या घटना घडू शकतात.

दुर्दैवानी अफगणिस्तानापासून बगदादपर्यंत जेथे संस्कृतीच्या आदानप्रदानामुळे मानवी विचारांना नवीन दिशा मिळाली, तेथेच युद्धामुळे या संस्कृतींचा विनाशही आपल्याला पाहावा लागत आहे. अफगाणिस्तानमधील बामियान येथील चौथ्या/पाचव्या शतकातील बुद्धाच्या प्रचंड मूर्तींचा इस्लामिक मूलतत्त्ववाद्यांनी केलेला विध्वंस आणि याच धर्मांध शक्तींनी काबूल येथील संग्रहालयातील वस्तूंची केलेली नासधूस या घटना मानवतेला काळिमा फासणाऱ्या आहेत. अफगाणिस्तानमध्ये तालिबानच्या झालेल्या पाडावा नंतर मुंबईच्या म्हाळगी प्रबोधिनीतर्फे डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय अभ्यासकांचा पहिला गट अफगाणिस्तानला गेला होता. या गटामध्ये सामील होण्याचे भाग्य मला मिळाले होते. यामुळे बामियान आणि काबूलमधील हा विध्वंस प्रत्यक्ष बघता आला. जगातील सर्वांत जुनी म्हणजे सहाव्या शतकातील गणपतीची मूर्ती काबूलमधील एका मंदिरात लपवून ठेवलेली पाहता आली. तालिबान्यांनी सबंध अफगाणिस्तानमध्ये विध्वंस केलेल्या हिंदू, बौद्ध मूर्तीही तेथील नव्या सरकारने एका गोदामामध्ये भरून ठेवलेल्या बघता आल्या. २००१ साली जे अफगाणिस्तानमध्ये घडले त्यापेक्षाही वाईट अमेरिकेने इराकमध्ये सुरू केलेल्या युद्धामुळे २००३ साली बगदाद आणि मोसूलमध्ये घडले. बगदाद आणि मोसूल येथील राष्ट्रीय संग्रहालयांमधून पाच ते सात हजार वर्षांपूर्वीच्या मेसोपोटेमियन संस्कृतीचे अवशेष जतन करण्यात आले होते. अमेरिकेने चालू केलेल्या या युद्धामुळे या संग्रहालयातील वस्तू संपूर्णपणे लुटल्या गेल्या. अनेक प्राचीन तसेच ऐतिहासिक स्थळांचा विध्वंस झाला. श्रेष्ठत्वाचा टेंभा मिरविणाऱ्या या देशांनी आपल्या देशातील ग्रंथालये जरी चांगल्या प्रकारे सांभाळली असली तरी त्यांच्यामुळेच संस्कृतीचा झालेला हा विध्वंस अक्षम्य आहे. हाच सांस्कृतिक विध्वंस पहिल्या आणि दुसऱ्या जागतिक युद्धांत युरोपमध्येही झाला होता.

अर्थातच या विध्वंसाचे तिसरे कारण म्हणजे सांस्कृतिक बधिरता. भारत स्वतंत्र झाल्यानंतर गेल्या साठ वर्षांत या देशामधील ऐतिहासिक वस्तू, मूर्ती आणि हस्तलिखितांचे आपण जे अनास्थेने नुकसान केले आहे त्याला जगात तोड नाही. संस्कृती आणि भाषेबद्दल आक्रस्ताळेपणाने बोलणारे राजकीय पक्ष तर या सांस्कृतिक बधिरतेमध्ये आघाडीवर आहेत. आजच्या भारतीय संस्कृतीची सर्व चिन्हे, वस्तू, हस्तलिखिते आणि ऐतिहासिक स्थळे यांची जास्तीत जास्त निगा, स्वातंत्र्यपूर्व वसाहतवादी राज्यकर्त्यांनी राखलेली दिसून येते. यापेक्षा दैवदुर्विलास तो काय असावा?

१९८४ साली ठाण्यामध्ये 'प्राच्यविद्या अभ्यास संस्था' स्थापन झाली. गेल्या तीस वर्षांत संस्थेने अनेक मूर्ती आणि वस्तू कष्टाने मिळविल्या आणि जतन केल्या. याच कालावधीमध्ये सुमारे ४०,००० दुर्मीळ पुस्तके आणि ३००० हस्तलिखितेही संस्थेने मिळविली. गोविंद स्वरूप या ठाणे महानगरपालिकेच्या स्थापनेनंतरच्या दुसऱ्या आयुक्तांच्या संस्कृतिप्रेमामुळे नौपाडा येथील शाहू मंडईमध्ये संस्था शांतपणे गेली २५ वर्षे संशोधनकार्य करीत होती. अर्थातच यामुळे चौरस फुटांच्या हिशोबांमध्ये गणित करणाऱ्या महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना यात काहीच फायदा दिसत नव्हता. सुमारे तीन वर्षांपूर्वी श्री. राजीव या आयुक्तांनी निवडणुकांचे कारण देऊन संस्थेला तेथून उखडून टाकले, आणि सर्व सोयीसुविधा देतो असे सांगून हाजुरी येथील इमारतीमध्ये हलविले. गेल्या तीन वर्षांत संस्थेला कमीत कमी सुविधा प्राप्त करून द्याव्यात आणि पावसामुळे होणारी तेथील गळती थांबवावी म्हणून अनेक पत्रे तत्कालीन आणि सध्याचे आयुक्त असीम गुप्ता यांना लिहिण्यात आली, पण संवेदनाशून्य व बधिर अशा महापालिकेच्या यंत्रणेवर त्याचा काडीचाही परिणाम झाला नाही. आजही पावसाने गळणाऱ्या छताखाली हा दुर्मीळ संग्रह जपण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न संस्था करीत आहे. नोकरशहांइतकीच बधिरता ठाण्याच्या लोकप्रतिनिधींनी दाखविली आहे. कोट्यवधी रुपये खर्चाच्या कधी 'थीम' पार्कच्या तर कधी येऊर येथे पर्यटनक्षेत्र बनविण्याच्या योजना मात्र अव्याहतपणे मांडल्या जात आहेत.

लोकशाहीमध्ये सभ्य नागरिकाला अर्जविनंत्या एवढाच मार्ग उपलब्ध असतो. अर्थातच सुशिक्षित सुसंस्कृत समाजामध्येच अशा प्रयत्नांचा आदर केला जातो. माणसाचा जन्म आणि मृत्यू त्याच्या हातात नसतो; परंतु जेव्हा एका असंस्कृत, बधिर राजकीय आणि सरकारी नेतृत्वाखाली नागरिकाला जगावे लागते तेव्हा सर्व

आशा-आकांक्षा आणि सर्जनशीलतेचा कोंडमारा झालेला असतो. एक वेळ युद्धातून सुटका करून घेता येईल; पण भ्रष्ट, लाचार, संवेदनाशून्य आणि बधिर राजकीय यंत्रणेतून मुक्तता ही फक्त क्रांतीतूनच मिळू शकते.

– जुलै २०१४

❖❖❖

# सांस्कृतिक सजगता

सांस्कृतिक बधिरता व्यक्ती आणि समाजाला संवेदनहीन बनविते, तर संवेदनशील समाज हा संस्कृतीच्या बाबतीत सजग असतो. असा सांस्कृतिक सजग समाज हा अभिरुची वृद्धिंगत करतो आणि सर्जनाला पोषक पार्श्वभूमी तयार करतो. संस्कृतिबधिर समाज हा सण, उत्सवांना विकृत स्वरूप देतो, तर अभिरुची समृद्ध समाज हा या सणांची गेयता वाढवून समाजाला तणावमुक्त करतो. आजच्या आपल्या सणांना आलेले विकृत स्वरूप, त्यातील बाजारूपण आणि थिल्लरपणा हा बहुतांशी आपणच स्वेच्छेने निवडून दिलेल्या राजकीय नेतृत्वामुळे आहे. त्यांची अरेरावी, उद्दामपणा, संस्कृती आणि पुरोगामित्वाचे दिवाळखोरीच्या वेशीवर उभे असलेले युक्तिवाद यांचा आता कंटाळाच नाही, तर उबगही आला आहे. सांस्कृतिक सजगता जपणे आणि वाढवणे हेच या रोगाचे औषध आहे. याची अनेक उदाहरणे आपल्याला जगभर दिसतात.

हिंदू आणि बौद्ध संस्कृतीचा प्रभाव दक्षिण-पूर्व आशिया खंडातील देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. अनेक अभ्यासकांच्या मते याची सुरुवात ख्रिस्तोत्तर

काही शतकांमध्ये झाली असली, तरी त्याचा प्रभाव मात्र विशेषकरून आठव्या–नवव्या शतकांतच दिसून येतो. संस्कृत भाषेपासून कलेच्या सर्व अंगांवर हा प्रभाव दिसून येतो. म्हणूनच थायलंडमध्ये 'अयोध्या' दिसते आणि इंडोनेशियाच्या विमान कंपनीचे नाव 'गरुड' आहे. व्हिएतनाम आणि कंबोडिया हे असेच हिंदू–बौद्ध धर्माच्या प्रभावाखाली असलेले दोन देश. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात या दोन्ही देशांना साम्य आणि भांडवलवादाच्या सिद्धान्तवाद्यांनी यादवी युद्धाच्या उंबरठ्यावर आणून ठेवले. दुर्दैवाने हा सर्व प्रदेश शीतयुद्धाचा भाग बनल्यामुळे या देशांची प्रचंड सांस्कृतिक आणि वित्तहानी झाली. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर मात्र हे दोन्ही देश पुन्हा एकदा आपल्या राष्ट्रबांधणीला लागले.

व्हिएतनाम ही फ्रेंचांची वसाहत होती. भारताप्रमाणेच व्हिएतनाममध्येही शेकड्यांनी संस्कृत शिलालेख फ्रेंच सरकारला आढळून आले. फ्रेंच संस्कृततज्ज्ञांनी त्यांचा अभ्यास सुरू करून त्यांना संग्रहालयामधून जपून ठेवले. अशा प्रकारे सुमारे शंभर संस्कृत कोरीव लेखांचे भाषांतर फ्रेंचमध्ये करून ते त्यांनी अभ्यासकांना उपलब्ध करून दिले आहे. तत्कालीन व्हिएतनामी समाजाच्या धार्मिक, आध्यात्मिक, वैज्ञानिक, सामाजिक सर्व जडणघडणीचे त्यामध्ये प्रतिबिंब दिसून येते. आजही जगात यावर मोठ्या प्रमाणावर अभ्यास चालू आहे. आपल्या देशातील हस्तलिखिते आणि ताम्रपटांची आपण केलेली वाताहात बघता, व्हिएतनाममधील संस्कृत कोरीवलेखांची जपणूक हे फ्रेंच सांस्कृतिक सजगतेचे जिवंत उदाहरण आहे.

कंबोडिया हा व्हिएतनामचा शेजारी देश. दहाव्या शतकामध्ये ख्मेर राजांचे तेथे साम्राज्य होते. त्यांनी हिंदू धर्म आणि संस्कृतीचा स्वीकार केला होता. अंकोरवट हा जगातील भव्य मंदिरसमूह याच राजांनी बांधला. हिंदू स्थापत्यशास्त्र ग्रंथांवर आधारलेले हे मंदिर म्हणजे शिल्पकलेचा एक अद्‌भुत नमुना आहे. या मंदिराच्या स्थापत्यशैलीचे महत्त्व लक्षात घेऊन आणि भारतीय पुरातत्त्ववेत्त्यांच्या मदतीने युनेस्कोने हे मंदिर पुन्हा उभे केले आहे. यामुळेच कंबोडियाच्या पर्यटनक्षेत्राला मोठी चालना मिळाली.

कंबोडियातील ख्मेर राजांच्या आपापसातील भांडणातून चौथा जयवर्मन वेगळा होऊन त्याने अंकोरवटपासून पन्नास मैल दूर 'कोह कर' (Koh ker) येथे आपली राजधानी वसविली. या राजाने तेथे एवढी मंदिरे बांधली की त्याचे नावच मुळी 'लिंगपुवा' म्हणजे लिंगाचे शहर असे पडले. या राजाने तेथे अंकोरवटसारखेच एक

प्रचंड मंदिर बांधले ज्याला आज 'प्रासाद चेन' (Prasat Chen) असे म्हणतात. वास्तविक हे मंदिर अंकोरवटपेक्षा मोठे असून अंकोरवटच्या आधी बांधले आहे. दुर्दैवाने यादवी युद्धामुळे झालेल्या पडझडीतून अजूनही या मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण झालेला नाही.

व्हिएतनाम आणि कंबोडियामधील या युद्धामुळे सर्वांत जास्त फायदा झाला तो प्राचीन वस्तूंची तस्करी करणाऱ्या टोळ्यांचा. युरोप-अमेरिकेतील अनेक संग्रहालयांमध्ये आजही या मंदिरांचे अवशेष पाहायला मिळतात.

१९७२ साली प्रासाद चेन या मंदिरातील दुर्योधन आणि भीम यांच्या युद्धाचे शिल्प चोरीला गेले. १९७५ साली त्यातील दुर्योधनाचे शिल्प लंडनमधील लिलावामध्ये विकले गेले. अर्थातच नंतर ते कुठे आणि कोठल्या संग्रहकाकडे आहे याचा थांगपत्ता नव्हता. २०११ साली सोदबी (Sotheby) या लिलावसंस्थेने न्यू यॉर्कमध्ये पुन्हा ते दुर्योधनाचे शिल्प विक्रीला आणले. कंबोडियन सरकारच्या निदर्शनास ही गोष्ट आल्यावर त्यांनी युनेस्कोच्या मदतीने हे शिल्प आपल्याला परत मिळावे, कारण तो आमचा सांस्कृतिक वारसा आहे, असे सांगून न्यू यॉर्कच्या कोर्टामध्ये या विक्रीकरिता स्थगिती मागितली. अर्थातच लिलाव करणारी संस्था याला फारशी तयार नव्हती. परंतु अमेरिकेचे विभागीय ॲटर्नी जनरल असणारे भारतीय वंशाचे प्रीत भरारा यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे हे शिल्प कंबोडियाला परत देण्याचे मान्य करण्यात आले. जून २०१४ मध्ये समारंभपूर्वक हा दुर्योधन कंबोडियाला परत देण्यात आला. कंबोडियन सरकारच्या सांस्कृतिक सजगतेचेच हे उदाहरण नाही का!

दुर्योधनाबरोबरचा भीम मात्र अजून अमेरिकेतच आहे! १९७६ साली कॅलिफोर्नियामधील एका संग्रहालयाने तो लिलावात विकत घेतला. भीमही लवकरच कंबोडियात परत जाणार आहे. भारतात मात्र शेकड्यांनी अशा कृष्णापासून बुद्धापर्यंतच्या मूर्ती सांस्कृतिक बधिरतेमुळे उद्धाराच्या प्रतीक्षेत उभ्या आहेत!

१९४६ साली आंतरराष्ट्रीय संग्रहालय संस्था (International Council of Museums ICOM) स्थापन झाली. सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन तसेच चोरी आणि निष्काळजीपणामुळे होणाऱ्या नुकसानीपासून त्याचे रक्षण करण्याकरता ही संस्था स्थापन झाली. युनेस्को आणि ही संस्था मिळून जगातील सर्व सांस्कृतिक वारशांचे रक्षण करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या या प्रयत्नामुळे

भारतही काही चोरल्या गेलेल्या मूर्ती परत मिळवू शकला, परंतु ती संख्या फारच नगण्य आहे. २००२ ते २०११ या कालावधीत इजिप्तने मात्र अशा ५००० पेक्षा जास्त चोरल्या गेलेल्या मूर्ती आणि वस्तू परत मिळविल्या.

भारताचा दुसरा शेजारील देश म्हणजे नेपाळ. तेथेही काही लाखोंनी संस्कृत हस्तलिखिते उपलब्ध आहेत. दुर्दैवाने भारताला मात्र त्या सांस्कृतिक संचिताचा उद्धार करावा असे फारसे वाटले नाही. अनेक व्याकरण, काव्य, गणित, ज्योतिष, तंत्रविद्या, स्थापत्य यांची संस्कृत हस्तलिखिते नेपाळमध्ये उपलब्ध आहेत. संस्कृतच्या जर्मन अभ्यासकांना मात्र त्याचे महत्त्व लक्षात आले आणि १९७० साली नेपाळ-जर्मनी हस्तलिखितांच्या जतनाचा कार्यक्रम अस्तित्वात आला. या सर्व हस्तलिखितांच्या लाखो पानांची छायाचित्रे लाखो डॉलर्स खर्च करून काढण्यात आली. २००२ साली याचा पुढचा टप्पा म्हणून या सर्व हस्तलिखितांची विषयवार सूची करण्याचे काम चालू झाले आणि आजही ते चालू आहे. जर्मनीच्या सांस्कृतिक सजगतेचेच हे उदाहरण आहे.

सिल्करोड (Silk Road) हा चीन आणि मध्य आशियामधील संस्कृतींचा व्यापाराचा मार्ग. या दळणवळणाच्या मार्गातूनच चिनी संस्कृती आणि हस्तकला युरोपमध्ये पोहोचली. या व्यापारी मार्गावरच डूनहाँग (Dunhaung) येथील स्तूप आणि गुहांमध्ये हजारोंनी चिनी, खरोष्टी, ब्राह्मी लिपीतील बुद्ध संस्कृतीवरील हस्तलिखिते १९०० साली काही अभ्यासकांच्या निदर्शनास आली. दुर्दैवाने हा संग्रह बीजिंग, लंडन, पॅरिस, बर्लिन येथील संग्रहालयांमधून विखुरला गेला. गेली काही वर्षे या संग्रहाला एकत्रित करण्याचा प्रयत्न केला गेला. या प्रयत्नाला यश येऊन संस्कृतमधील काही वैद्यक आणि बौद्ध संस्कृतीच्या साहित्यावरील हस्तलिखितांची सूची आता प्रकाशित झाली आहे. हा सर्व संग्रह सुमारे १५०० ते २००० वर्षांपूर्वीचा असल्याने भारताच्या सांस्कृतिक आणि सामाजिक विकासाच्या अभ्यासाचे ते एक मोठे साधन आहे.

वर उल्लेख केलेल्या सर्वच प्रकल्पांची संकेतस्थळे आज उपलब्ध आहेत. प्रगत देशांच्या सांस्कृतिक सजगतेचाच हा एक उत्कृष्ट नमुना आहे. ऑक्सफर्ड, केंब्रिज, बीजिंग, वॉशिंग्टन येथे उपलब्ध असलेल्या संस्कृत आणि तिबेटियन हस्तलिखितांचा संग्रहही आता उपलब्ध होत आहे तो त्या त्या राष्ट्रांच्या सांस्कृतिक सजगतेमुळेच.

संस्कृतप्रमाणेच मराठीचीही हजारोंनी हस्तलिखिते आज सांस्कृतिक अनास्थेमुळे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. मराठी भाषा आणि संस्कृतीचे एरवी भोकाड पसरून भांडवल करणाऱ्या राजकीय पक्षांना याचे काहीच सोयरसुतक नाही. एका अमेरिकन विद्यापीठाच्या आर्थिक मदतीतून पुण्याच्या भांडारकर प्राच्य विद्या संस्थेचे निवृत्त ग्रंथपाल श्री. मंजूळ यांच्या प्रयत्नांनी पुण्याला या हस्तलिखितांच्या संवर्धनाचे काम चालू झाले आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात पुण्याच्याच डेक्कन कॉलेज, आनंदाश्रम आणि वाईची प्राज्ञ पाठशाळा यांच्या सुमारे ९०० मराठी हस्तलिखितांचे छायाचित्रीकरण पुरे झाले आहे. मराठीच्या अमेरिकेतील प्रसिद्ध अभ्यासक श्रीमती ॲना फेल्डहाउस (Anne Feldhaus) यांच्या मदतीने प्रसिद्ध ब्रिटिश लायब्ररीच्या संकेतस्थळावर ही सर्व हस्तलिखिते वाचकांना आता निःशुल्क उपलब्ध झाली आहेत. वैदिक संहितांचे पठण हे अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने करावे लागते. वेदांच्या अनेक शाखाही आज लुप्त झाल्या आहेत; तरीही भारतामध्ये काही ठिकाणी अशा वैदिक शाखांचे पठण परंपरेने चालू आहे. या पुढील पिढ्यांमध्ये ते संक्रमित होणे फार कठीण आहे. या वारशाचे सांस्कृतिक महत्त्व ओळखून डेन्मार्कमधील एका संस्कृतच्या अभ्यासक विदुषींनी त्यांचे संपूर्ण ध्वनिमुद्रण जतन करून ठेवले आहे. पाश्चात्त्य अभ्यासकांना असलेल्या सांस्कृतिक सजगतेमुळेच या गोष्टी आज शक्य आहेत.

सोमवार, दिनांक ११ ऑगस्टच्या मुंबई उच्च न्यायालयाने दहिहंडीबद्दल दिलेल्या निर्णयामुळे, आपल्या सणांना आलेले सवंग आणि बाजारी स्वरूप काही प्रमाणात तरी आटोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शुद्ध राजकीय हेतूंनी प्रेरित होऊन परंपरेच्या नावाखाली या सणांना आलेले बीभत्स स्वरूप क्लेशकारक आहे. यामध्ये संस्कृती आणि परंपरा जपण्याचा वारंवार केलेला दावा किती फोल आहे हे नव्याने सांगण्याची गरजच नाही. सणांचा 'खेळ'खंडोबा तर यांनी केलाच, पण परंपरागत मल्लखांब किंवा मातीवरील कुस्ती अशा साहसी खेळांकडे मात्र यांना अजिबात लक्ष द्यावेसे वाटत नाही. कारण स्पष्ट आहे की, या खेळांमध्ये धांगडधिंगा फारसा करता येणार नाही आणि खेळाडूंना कमीतकमी प्रशिक्षण घ्यावे लागेल. अमरावतीच्या हनुमान व्यायामशाळेने मात्र या परंपरागत खेळांचे केलेले जतन आणि संवर्धन हे कौस्तुकास्पद आणि अभिनंदनीय आहे. मराठी संस्कृती आणि इतिहासाचा वारसा असलेल्या आपल्या गड आणि किल्ल्यांची आपण केलेली दुर्दशाही अशीच क्लेशकारक आहे.

सांस्कृतिक बधिरता आलेला समाज अभिरुचिहीन होऊन आपल्या सणांचे आणि परंपरांचे व्यापारीकरण आणि विकृतिकरण करायला लागतो, तर सांस्कृतिक सजगता सामाजिक अभिरुची वाढवते आणि सगळ्याच सांस्कृतिक वारशांचे जतन करू लागते. म्हणूनच ग्रंथालये आणि संग्रहालये ही निर्माण करावी लागतात. दरडोई गाड्यांचा वापर किंवा सल्फ्युरिक ॲसिडची निर्मिती ही देशाच्या उन्नती किंवा संस्कृतीचे मोजमाप न होता, दर माणशी त्या देशामध्ये पुस्तकांची संख्या आणि संग्रहालये किती आहेत हाच संस्कृतीच्या प्रगतीचा निकष ठरला पाहिजे. परंपरांची खरी जपणूक यामुळेच होणार आहे.

पूर्वी बऱ्याच हस्तलिखितांच्या शेवटी खालील श्लोक लिहिलेला असे.

**जलाद्रक्षेत्तैलाद्रक्षेद्रक्षेच्छिथिलबन्धन।**
**मूर्खहस्ते न मां दद्यादिति वदति पुस्तकम्॥**

त्याचा अर्थ आहे, ''माझे पाणी, तैलपदार्थ आणि सैल बांधणीपासून रक्षण कर. तसेच मला मूर्खांच्या स्वाधीन करू नकोस.'' आमची परंपरा, सण आणि संस्कृतीला आता मूर्खांच्या हातात पडू देऊ नका असेच म्हणण्याची पाळी आता सामान्य नागरिकांवर आली आहे.

**- ऑगस्ट २०१४**

❖❖❖

# पहाट कधी होणार ?

भारतामध्ये सध्या जे काही घडत आहे ते बघून डोक्याला मुंग्या आल्याशिवाय राहात नाहीत. खून, बलात्कार, अपहरण, पैशाला पासरीभर झालेले संत आणि साध्वी, आणि त्यांची आचरट वक्तव्ये, ही कुठल्याही संस्कृतीला शरमेने मान खाली घालायला लावतील अशीच आहेत. विज्ञान, अध्यात्म किंवा जडवाद या विचारसरणीमध्ये कुठेही तर्कसंगती किंवा तारतम्य ठेवणाऱ्या या घटना नाहीत. ऊर बडवून आपण एका महान संस्कृतीचे वारसदार आहोत हे सांगणारे, या घटनांची जी चिकित्सा करतात तीही तेवढीच भयानक आहे.

जीवनाच्या सगळ्याच क्षेत्रांमध्ये आज हा तारतम्यभाव हरवलेला दिसतो. आपला पक्ष, पंथ, नेतृत्व यांचे येनकेनप्रकारे समर्थन करणे एवढे एकच काम हे त्या त्या गटाच्या अनुयायांना राहिलेले दिसते. राजकारणामध्ये वैचारिक सिद्धान्तवाद आता पोरका झाला आहे. सर्वच पक्षांमध्ये घराणेशाही आणि जातीयवाद यांचे उघडपणे समर्थन चालू आहे. आपला समाज किंवा जात ही सर्वांत मागासलेली कशी आहे हे सिद्ध करण्याची स्पर्धा आणि आग्रह हा सगळे

तर्कशास्त्र बधिर करणारा आहे. येनकेन मार्गांनी फक्त सत्ता मिळवणे हा एक-कलमी कार्यक्रम असलेल्या सर्वच राजकीय पक्षांची याला असलेली सहमती मती गुंग करणारी आहे. दूरदर्शनवर पक्षप्रतिनिधींचा आपल्या पक्षनेत्यांच्या धोरणांचे हास्यापद, पोरकट आणि आक्रस्ताळेपणे चालू असलेल्या समर्थनाचा आता उबग आला आहे. गेल्या काही महिन्यांत महाराष्ट्रात घडत असलेले राजकीय नाट्य हे याची साक्ष आहे.

शब्दकोशांमध्ये शब्दांचा अर्थ देताना, त्याला परंपरा आणि संस्कृतीचे एक कोंदण असते. नदीचा अर्थ डोंगर होऊ शकत नाही किंवा विमानाचे माकड होऊ शकत नाही. आज मात्र अस्मिता, सत्य, समाजवाद, धर्मनिरपेक्षता या शब्दांचा राजकारण्यांनी लावलेला अर्थ आणि शब्दकोशांतील अर्थाचा काडीचाही संबंध राहिलेला नाही. नुकत्याच झालेल्या निवडणुकांमधील उमेदवारांनी जाहीर केलेल्या संपत्तीचे आकडे चक्रावून टाकणारे आहेत. बांधकामाव्यतिरिक्त कुठलाही ज्ञात व्यवसाय नसलेला आपला प्रतिनिधी कोटीकोटींची उड्डाणे कशी घेतो हे अनाकलनीय आहे. कुठल्याही पक्षाला बहुसंख्येने गुन्हेगारी आरोप असलेले उमेदवार मिळू शकतात, परंतु साधी पदवी असलेले पदवीधर मिळू शकत नाहीत हेही एक मोठे गौडबंगालच आहे. चोर, गुन्हेगार, बदमाश हे तुपाशी; तर प्रामाणिक, नेमस्त उपाशी हाच या युगाचा न्याय दिसतो. तर्क, सुसंगती आणि तारतम्य यांना शंभर टक्के सोडचिठ्ठी दिल्याशिवाय अशा समाजाची निर्मिती होऊच शकत नाही. जगात सगळीकडे कमी-जास्त प्रमाणात ही परिस्थिती असली तरी तेथे थोडेतरी तारतम्य दिसून येते.




**वॅटसन (Watson)**

१९५३ साली श्री. वॅटसन (Watson) या शास्त्रज्ञांनी फ्रान्सिस क्रिक (Francis Crick) आणि मॉरिस विल्किन्स (Maurice Wilkins) यांच्या सहयोगाने डीएनए (DNA) च्या रचनेची उकल केली. वॅटसन आणि त्यांच्या सहकाऱ्यांना याकरता १९६२ साली नोबेल पारितोषिक मिळाले. साहजिकच वॅटसन हे जगातल्या अनेक महत्त्वाच्या कंपन्यांवर संचालक झाले आणि अनेक विद्यापीठांतून त्यांना मानाची पदे मिळाली. संशोधन किंवा विज्ञानाला मिळणारे यथोचित असेच ते सन्मान होते. २००७ सालच्या 'संडे टाइम्स'मध्ये त्यांची एक मुलाखत छापली गेली. त्या मुलाखतीमध्ये आफ्रिकन वंशाचे लोक जन्मजात बुद्ध्यांकाने कमी असतात असे एक विधान त्यांनी केले. वॅटसन स्वतः वंशवादी नाहीत. त्यांना एवढेच सांगायचे होते की, सर्वांच्या क्षमता जन्मजात सारख्या नसतात आणि हे जर आपण लक्षात घेतले नाही, तर कमी क्षमतेच्या लोकांवर तो फार मोठा अन्याय असतो. अर्थातच त्यांची ही भूमिका नाकारून त्यांच्यावर 'वंश'वादाचा शिक्का बसला. त्यामुळे त्यांना सर्व पदांवरून पदच्युत करण्यात आलेच, पण तेव्हापासून आजपर्यंत विज्ञान जगतानेही त्यांच्यावर बहिष्कारच टाकला. वॅटसन हे संवेदनशील शास्त्रज्ञ आहेत. या एकाकीपणामुळे ते खचून गेले. याचाच एक परिणाम म्हणून त्यांनी आपले नोबेल पारितोषिकाचे मानचिन्ह जागतिक बाजारपेठेत विक्रीला काढले! पस्तीस लाख डॉलर्सपर्यंत त्याला किंमत येईल अशी अपेक्षा होती. या मिळणाऱ्या पैशाचा विनियोग, ज्या विद्यापीठांनी त्यांना संशोधनाकरता साहाय्य केले अशा संस्थांसाठी, आणि उरलेले पैसे त्यांच्या आवडीच्या कलाकृती विकत घेण्यासाठी करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला!



**नोबेल पारितोषिकाचे मानचिन्ह**

श्री. वॅटसन हे पहिलेच नोबेल पारितोषिकाचे जिवंत मानकरी असतील की, ज्यांनी आपले मानचिन्ह विक्रीला काढले आहे. त्यांचे सहकारी क्रिक यांचे

मानचिन्ह विकले गेले, पण ते त्यांच्या मृत्यूनंतर नऊ वर्षांनी! श्री. वॅटसन यांनी लिहिलेले 'द डबल हेलिक्स' (The Double Helix) हे पुस्तक विज्ञान क्षेत्रामध्ये एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. लंडनच्या फायनानशियल टाइम्स या वृत्तपत्रात दिलेल्या मुलाखतीत (२९, ३० नोव्हेंबर २०१४), त्यांच्याजवळ असलेल्या या पुस्तकाच्या हस्तलिखिताची विक्री त्यांच्या वारसदारांनी भविष्यात करावी असे त्यांनी सांगून ठेवले आहे.



**आलीशर अस्मानौ (Alisher Usmanov)**

यापुढील घटना जास्त आश्चर्यकारक आणि प्रेरणादायी आहेत. रशियातील एक धनाढ्य व्यापारी आलीशर अस्मानौ (Alisher Usmanov) यांनी नुकतेच हे पदक चाळीस लाख डॉलरला लिलावात विकत घेतले आणि त्या पैशांबरोबरच ते पदकही त्यांनी वॅटसन यांना परत केले! लोकप्रतिनिधी किंवा मंत्री म्हणून मिळणारे बंगले हे मंत्रिपद गेल्यावरही राजकीय प्रतिनिधी वर्षानुवर्षे सोडत नाहीत. उलट त्यावर आपला मालकी हक्क असल्याचाच दावा ते करतात. आपल्या संपत्तीचे, अंगावर सोने वाहून किंवा आपल्या नातलगांच्या लग्नसमारंभाच्या निमित्ताने संपत्तीचे किळसवाणे प्रदर्शन करणारे लोकप्रतिनिधी कमी नाहीत. साहित्य संमेलनापासून, शपथविधीपर्यंत शाही दिमाखाने साजरे होणारे समारंभ दुसरे काय दर्शवितात? ''सत्ता किंवा विद्या विनयेन शोभते'' हे फक्त भिंतीवर टांगायचे वचन असल्याचा यांचा दृढ विश्वास दिसतो. राजकारणातील या 'नवश्रीमंती'ने भ्रष्टाचाराला ''शिष्टाचार'' करून टाकले आहे. या पार्श्वभूमीवर रशियन पुंजीपतीचे वागणे हे नुसतेच अभिनंदनीय नाही तर अनुकरणीयही आहे.

हेतुपुरस्सरपणे तर सोडाच, पण अकल्पितपणे केलेल्या अशा विधानांमुळे होरपळलेले असे वैज्ञानिक, राजकीय नेते, कलाकार हे जगात आजही दिसतात.

या पार्श्वभूमीवर, गल्लीबोळापासून प्रथमदर्शनी भ्रष्टाचार सिद्ध झालेल्या लालूप्रसाद आणि श्रीमती जयललिता पर्यंतच्या सर्वांची त्यांच्या अनुयायांनी चालविलेली भलावण बघता अति दुःख होते. बॉम्ब खटल्यात शस्त्र बाळगल्याबद्दल शिक्षा झालेल्या संजय दत्तला राजकीय नेतृत्वाने दिलेली निरपराधपणाची पावती काय, किंवा सिनेजगातातील त्याच्या सहकाऱ्यांनी त्याचे माजविलेले अवडंबर काय, हे सगळेच अनाकलनीय आहे. अशी उदाहरणे आज या देशामध्ये इतकी आहेत की, ती लिहायची म्हटल्यास शाई संपेल. या देशात न्यायदेवताही आंधळी आहे, हे ललितनारायण मिश्रा यांच्या खुनाचा प्राथमिक निकाल ३९ वर्षांनंतर लागतो यातून सिद्ध होते! या भयावह अंधकारात आशेचा किरण दिसतो तो, कुठल्याही बक्षिसाची अपेक्षा न बाळगणारे 'मंगळयान' यशस्वी करणारे वैज्ञानिक, आणि आपल्या प्राणाची आहुती देऊन देशाचे रक्षण करणारे काश्मीरपासूनच्या सर्वच सीमांवरील सैनिक यांच्यात!

**– डिसेंबर २०१४**

❖❖❖

# आधुनिक भारताचे एक महान नेते : गोपाळ कृष्ण गोखले

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी ज्यांना आपले राजकीय गुरू मानले व ज्यांच्या ''सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी'' या संस्थेची पताका आजही भारतीयांच्या हृदयात फडकते अशा नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या जयंतीला नुकतीच १५० वर्षे पूर्ण झाली. गोपाळ कृष्ण गोखले व लोकमान्य टिळक हे समकालीन भारतातील अत्यंत चिकित्सक असे भाष्यकार होते.

९ मे १८६६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यात एका सामान्य कुटुंबात जन्मलेले गोपाळ कृष्ण गोखले आधुनिक भारताचे एक महान व नेमस्त विचारसरणीचे नेते मानले जातात. १८ व्या वर्षी पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी सरकारी नोकरीचा मार्ग न स्वीकारता स्वार्थत्यागपूर्वक देशसेवा करण्याचे व्रत घेतले. २०व्या वर्षी ते फर्गसन महाविद्यालयात प्राध्यापक झाले आणि त्यांनी सुधारक पत्राचे सहसंपादक म्हणून काम सुरू केले.

गोपाळ कृष्ण गोखले व लोकमान्य टिळक यांचे

सार्वजनिक जीवन एकाच वेळी सुरू झाले; पण या दोघांचा मार्ग आणि विचारसरणी थोडीशी भिन्न होती. टिळक जहाल विचारसरणीचे तर गोखले नेमस्त होते. ब्रिटिशांशी मुद्देसूद चर्चा करून शिताफीने विषय गळी उतरविण्यात गोखले वाकबगार होते; तर आपल्या ओजस्वी वाणीने सरकारचे डोके ठिकाणावर आणत स्वराज्याच्या जन्मसिद्ध हक्कासाठी लोकमान्य टिळक लढत होते. 'जहाल व मवाळ' अशी काँग्रेसमध्ये पडलेली उभी फूट टिळक व गोखले या दोन एकाच ध्येयासाठी लढणाऱ्या दोन तलवारींनी परजत होती. मात्र गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या ठायी असलेली देशनिष्ठा, विद्वत्ता व संततुल्य व्यक्तिमत्त्वाने महात्मा गांधीदेखील प्रभावित झालेले दिसून येते. गोखले यांनी लोकशिक्षणाद्वारे समाजजागृती करण्याचा व राजकीय सुधारणांसाठी सतत प्रयत्न करून ज्या सवलती मिळतील त्या राबविण्याचा मार्ग स्वीकारला. न्यायमूर्ती रानडे यांचे शिष्यत्व पत्करून अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादींचा सखोल अभ्यास केला. अभ्यासपूर्ण विवेचन कसे करावे याचे मूर्तिमंत रूप म्हणजे नामदार गोखले.

गोपाळ कृष्ण गोखले हे आधुनिक भारताच्या उभारणीतील अग्रदूत होते. कर्तव्यासाठी कोणताही काळ अकाल नसतो या तत्त्वनिष्ठ वृत्तीने गोखल्यांनी देशाच्या जडणघडणीत सिंहाचा वाटा उचलला. लहानपणी शेक्सपियरची नाटके, जॉन मिल्टनचे 'पॅराडाइज लॉस्ट', एडमंड बर्कची भाषणे यांतील कितीतरी इंग्रजी उतारे गोखले बिनचूक तोंडपाठ म्हणून दाखवीत. इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व हे इतके विलक्षण होते की, जन्माने इंग्रज माणूससुद्धा त्यांच्या भाषेवर लुब्ध होत असे. गांधी गोखल्यांबद्दल म्हणाले होते, 'Gokhale was as pure as crystal, gentle as lamb, brave as a lion and chivalrous to fault and the most Perfect man in the Political field.' 'सनदशीर मार्गाने लढा' हा गोखले यांच्या विचाराचा गाभा होता. किंबहुना एतद्देशीय उदारमतवादाचा आदर्श वस्तुपाठ म्हणून गोखले यांचे यथार्थ वर्णन करता येईल. आजची काँग्रेस म्हणजे त्या वेळच्या राष्ट्रीय सभेला दिग्दर्शन करणाऱ्या नेत्यांत त्यांची गणना होते.

सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा या दोनही आघाड्यांवर काम करताना त्यांची भूमिका मवाळ राहिली, त्यामुळे टिळक व त्यांच्या अनुयायांच्या कठोर टीकेचा त्यांना सामना करावा लागला. पण तत्कालीन सामाजिक आणि राजकीय स्थितीचे आकलन व अभ्यास यांबाबत गोखले समकालीन नेत्यांच्या फार पुढे होते. म्हणूनच त्यांनी गांधीजींना एक वर्षभर डोळे व कान उघडे ठेवून भारतभर फिरण्याची सूचना केली होती!

‘‘टिळक हिमालयाप्रमाणे, फिरोजशहा महासागराप्रमाणे, तर गोखले गंगेप्रमाणे वाटले’’ असे गांधीजींनी म्हटले आहे ते अर्थपूर्ण आहे. प्रस्थापित यंत्रणेतील दोष कसे दूर करता येतील व शक्य ते साध्य कसे करून घेता येईल याचा विचार करून त्या दिशेने प्रयत्न करण्याची गोखले यांची वृत्ती होती. सनदशीर राजकारणावर भिस्त ठेवणाऱ्या त्यांच्या विचारसरणीमुळे जहालमतवाद्यांकडून त्यांची अतिशय निर्भर्त्सना झाली. पण गोखले यांचे कर्तृत्व, देशसेवा, स्वार्थत्याग, अभ्यास यांबद्दल सरकारप्रमाणेच लोकपक्षाचे नेतेही आदर बाळगीत. लोकमान्यांनी गोखल्यांवरील मृत्युलेखात त्यांच्या या गुणांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. लोकपक्ष व सरकार या दोघांकडून मान्यता मिळणारा असा पुरुष विरळाच सापडतो.

गोखले १९०२ मध्ये मध्यवर्ती कायदेमंडळावर निवडून गेल्यावर त्यांनी अर्थसंकल्पावर जे भाषण केले त्यामुळे त्यांचे कर्तृत्व व नेतृत्व देशमान्य झाले. त्यांनी अर्थसंकल्पावर केलेल्या भाषणात तत्कालीन भारताच्या राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, भारताची शेती-शेतकऱ्यांच्या अडचणी, आयात-निर्यात, कारभार, उद्योग, रुपयाचे पौंडाशी नाते, लष्करावरील खर्च इत्यादी विषय व्यासंगपूर्ण व मुद्देसूदपणे मांडलेले दिसून येतात. १९०६ सालच्या अर्थसंकल्पावरील गोखले यांचे भाषण ऐकल्यावर, ‘असे भाषण इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये क्वचितच ऐकावयास मिळते’ असा अभिप्राय व्हायसरॉय लॉर्ड मिंटो यांनी दिला. महात्मा गांधी यांच्यासोबतच बॅरिस्टर जीनासुद्धा गोखले यांच्या विद्वत्तेने प्रभावित झाले होते. अशा या महान नेत्याच्या १५० व्या जयंतीची योग्य ती दखल शासनाने व विविध माध्यमांनी घेतलेली दिसून येत नाही. भारताला स्वातंत्र्य मिळून ६९ वर्षे होत आहेत. भारतातील सध्याच्या राजकारणात गोखल्यांसारखी अभ्यासपूर्ण विषयमांडणी करणारे नेते क्वचितच आढळतात. गोखल्यांच्या चरित्र-अभ्यासातून सध्याच्या राजकारण्यांना निश्चितच मार्गदर्शन मिळू शकते. अल्पस्वल्प कामाच्या आधारावर पुतळे आणि स्मारके उभारण्याच्या या जमान्यात गोखले यांचे त्यांच्या कार्यकर्तृत्वाला शोभेल असे स्मारक निश्चितच सर्वांना प्रेरणादायी ठरेल. गोखले यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेऊन पुणे येथे भारतातील अर्थशास्त्रविषयक संशोधन करणाऱ्या संस्थेला त्यांचे नाव देण्यात आले आहे (गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स). १९३० मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेत अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांत संशोधन करणे, विविध प्रकारच्या आर्थिक व्यवहारांची तपशीलवार व शास्त्रीय पद्धतीने माहिती संकलित करणे व त्यासाठी कार्यकर्ते तयार करणे हे काम

चालते. असे असले तरी आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे योगदान पाहता अशा प्रकारची आणखी अभ्यासकेंद्रे (स्मारके) उभारणे ही काळाची गरज आहे. हीच खरी नामदार गोखले यांना मानवंदना ठरेल.

**– मे २०१५**

❖❖❖

# उत्सवांची संस्कृती

दर वर्षी १ ऑगस्टला आपण लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी साजरी करतो. सध्या मुंबई महापालिकेपासून स्वयंघोषित 'भारतीय संस्कृती' रक्षकांना लोकमान्य टिळकांची आठवण होते, ती मात्र त्यांनी चालू केलेल्या सार्वजनिक गणेश उत्सवामुळे. गणेश उत्सव काय किंवा शिवजयंती काय, हे उत्सव चालू करण्यामागील मूळ हेतू 'प्रबोधन' हाच होता. शिवाय तत्कालीन पारतंत्र्याची पार्श्वभूमीसुद्धा या उत्सवांमागील एक प्रेरणा होती. इंग्रजांचे धोरण हे भारतीयांच्या धर्मभावनेमध्ये हस्तक्षेप न करण्याकडे झुकणारे होते. १८५७ च्या लढाईचा अनुभव त्यांच्या गाठीशी होता. राजकीय स्वातंत्र्य आधी का सामाजिक प्रबोधन आधी; या संदर्भातील लोकमान्य टिळक आणि त्यांचे समकालीन श्री. आगरकर यांची मतेही राजकीय पारतंत्र्याच्या पार्श्वभूमीवरच बघावी लागतात.

आजच्या गणेश उत्सवाचा सांस्कृतिक किंवा सामाजिक प्रबोधनाशी सुतराम संबंध राहिलेला नाही. उत्सवाचे संपूर्ण 'राजकीयीकरण' आता पुरे झाले आहे. तो आता एक शुद्ध करमणूकप्रधान उत्सव म्हणून राहिला आहे. यामध्ये मूर्तीची उंची आणि भव्यतेपासून

त्यावरील खर्चाच्या स्पर्धेने बालिश स्वरूप धारण केले आहे. एखाद्या लहान मुलाला जसे सगळे मोठे आणि रंगीबेरंगी हवे असते, तसेच या उत्सवांच्या मंडपांचे झाले आहे.

गेल्या १०० वर्षांमध्ये आपल्या शहरांची लोकसंख्या बेसुमार वाढली. यामुळे त्यांच्या मूलभूत गरजा म्हणजे रस्ते, पाणी, वीज यांचे नियोजन व्हायला हवे होते. दुर्दैवाने भ्रष्टाचाराने बरबटलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी या गरजांचाच व्यापार करून शहरांना बकाल करून टाकले. मुंबई-ठाण्यामध्ये तरी या तथाकथित संस्कृतिरक्षक राजकीय पक्षांचेच पाव शतकाहून अधिक साम्राज्य आहे. आज रस्ते म्हणजे वाहनतळ झाले, तर पदपथ हे फेरीवाल्यांच्या व्यवसायाचे अड्डे झाले. या सर्व गोंधळाचा फटका हा सामान्य नागरिकाला पावलोपावली भोगावा लागतो. त्यातच या उत्सवांनी रस्ते अडवायला सुरुवात केली. माध्यमांनी ज्या वेळी या उत्सवांची रसभरित वर्णने चालू केली, तेव्हा राजकारण्यांनी या उत्सवांचा ताबा घेतला. मुळातच 'सुविचारां'चे वावडे असल्यामुळे या उत्सवांना 'सवंग' स्वरूप प्राप्त झाले. प्रत्येक राजकीय पक्ष यामध्ये मक्तेदारी मिळवण्याकरता प्रयत्नशील झाला. आजच्या या उत्सवांच्या स्वरूप आणि सादरीकरणाला म्हणूनच पायबंद घालणे आवश्यक होते. यामुळेच कोर्टामध्ये जावे लागले, आणि कोर्टालाही व्यापक जनहिताकरता या उत्सवांच्या सादरीकरणावर नियंत्रणे घालावी लागली. पण 'हम करे सो कायदा' किंवा 'कायदा हा आमच्याकरता नाहीच' या मानसिकतेतून अशा नियंत्रणांचे स्वागत व्हायच्या ऐवजी त्याला विरोधच होताना दिसतो. लोकमान्य टिळकांचा गणेशोत्सव चालू करण्यामागील प्रबोधनाचा हेतू काय किंवा आगरकरांचा सामाजिक विवेक वा बांधीलकीचा विचार काय, यांपासून हे सर्व उत्सव आज मैलोगणती दूर गेले आहेत. यांमध्ये आमूलाग्र बदल होणे आवश्यकच नाही तर ती काळाची गरजही आहे.

लोकमान्य टिळक आणि आगरकर यांचे विचार हे महाराष्ट्राला नवीन नाहीत. स्वतंत्र भारताची निर्मिती, आणि त्यानंतरच्या राजकीय व सामाजिक संस्थांच्या निर्मितीमध्ये त्यांच्या विचारांचा मोठा प्रभाव आहे. आजच्या गणेशोत्सवाच्या स्वरूपामध्ये बदल करायचे असतील तर या दोघांच्याही 'संपूर्ण' विचारांचा ऊहापोह होणे आवश्यक आहे. समाजाला सांस्कृतिक अधोगतीपासून वाचवण्याकरता आजही त्यांचे विचार हे तेवढेच 'आधुनिक', 'आक्रमक' आणि 'सनातन' आहेत. आजचे गणेशोत्सव, दहीहंडी आणि नवरात्रोत्सव यांचे स्वरूप टिकवणे म्हणजेच भारतीय

संस्कृती आणि आपल्या धर्माचे रक्षण आहे, असा राजकीय पुढाऱ्यांनी केलेला दावा हा 'संस्कृती' आणि 'धर्म' दोघांनाही धोकादायक आहे. सर्व स्तरांवर त्याला विरोध करणे आवश्यक आहे.

या उत्सवांच्या माध्यमांतून भारतीय संस्कृतीचे रक्षण करण्याचा दावा करणाऱ्या या 'राजकीय प्रतिनिधींची' पार्श्वभूमी काय आहे हे बघणे आवश्यक आहे.

५४५ सभासद असलेल्या आपल्या लोकसभेमध्ये १८६ म्हणजे १/३ सभासद हे गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे आहेत. त्यांनीच निवडणूक आयोगात दिलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये हे नमूद आहे! महाराष्ट्राच्या सध्याच्या विधानसभेमध्ये ५०% हून अधिक सभासदांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. अर्थातच भारतीय संस्कृती आणि हिंदू धर्माच्या रक्षणाचा दावा करणाऱ्या राजकीय पक्षांच्या सभासदांची गुन्हेगारी पार्श्वभूमीची संख्या मोठी आहे (६४% भाजप तर ७६% शिवसेना, ३६% काँग्रेस तर ४६% राष्ट्रवादी काँग्रेस). कमीअधिक प्रमाणात हीच टक्केवारी स्थानिक स्वराज्य संस्थांमधेही दिसून येते. यातील राजकीय गुन्हे जरी काढून टाकले तरीही हे प्रमाण जास्त आहे. खून, खुनाचा प्रयत्न, अपहरण, बलात्कार इ. आरोपांचा यामध्ये समावेश आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला एकसुद्धा सभासद या 'पवित्र' सभागृहात असणे नागरिकाला लाजिरवाणे आहे. लोकसभेमध्ये ५४५ पैकी १०० हून अधिक सभासद पदवीधर नाहीत, तर महाराष्ट्राच्या विधानसभेच्या २८८ सभासदांपैकी १०० हून अधिक १२ वी किंवा त्यापेक्षा कमी शिक्षित आहेत. नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेमधील बेताच्या शिक्षितांचे हे प्रमाण खूपच जास्त आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेतील ८८% सभासद हे करोडपती आहेत. कुठलेही फारसे शिक्षण नसणाऱ्या आणि देखाव्यापुरता व्यवसाय असणाऱ्या या सभासदांचे आर्थिक उन्नतीचे हे 'कौशल्य' आश्चर्यकारक आहे. 'राजकारणाचे गुन्हेगारीकरण' आणि 'उत्सवांचे राजकारणीकरण' का; याचे उत्तर दुसरीकडे कुठेच शोधण्याची गरज नाही.

स्वातंत्र्यलढ्यातील आणखी दोन महत्त्वाच्या व्यक्ती म्हणजे महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ टागोर. भारतीय संस्कृतीच्या संदर्भात सामान्य नागरिकाला मार्गदर्शन करण्याकरता या दोघांनीही विपुल लिखाण करून ठेवले आहे. समाजप्रबोधनाच्या या प्रक्रियेमध्ये त्यांच्यामधील वैचारिक द्वंद्वही आजच्या परिस्थितीला मार्गदर्शक आहे.

१५ जानेवारी १९३४ ला बिहारमध्ये प्रचंड भूकंप झाला आणि त्यामध्ये हजारो लोक मारले गेले. गांधीजी त्या वेळी दक्षिण भारतामध्ये होते. गांधीजी हे

जरी हिंदूसंस्कृती आणि तत्त्वज्ञानाचे कट्टर पुरस्कर्ते असले, तरी अस्पृश्यतेसारख्या प्रथेला त्यांचा कडाडून विरोध होता. व्यापक हिंदूहिताकरता या रूढींचे संपूर्ण उच्चाटन करण्याचा त्यांचा आग्रहच नाही तर अट्टाहास होता. बिहारमधील भूकंपानंतर २४ जानेवारी १९३४ ला म्हणजे फक्त ९ दिवसांनंतर दक्षिणेकडील तिरुनेलवेली (Tirunelveli) येथील सभेमध्ये गांधीजींनी खालील विचार मांडले -

We who have faith in God must cherish the belief that even in this indescribable calamity there is a divine purpose that works for the good of humanity. You may call me supersititious if you like; but a man like me cannot but believe that this earthquake is a divine chastisement sent by God for our sins ...

पुढे ते म्हणतात -

For me there is a vital connection between the Bihar calamity and the untouchability campaign. The Bihar calamity is a sudden and accidental reminder of what we are and what God is; but untouchability is a calamity handed down to us from century to century. It is a curse brought upon ourselves by our own neglect of a portion of Hindu humanity. Whilst this calamity in Bihar damages the body, the calamity brought about by untouchability corrodes the very soul. Therefore, let this Bihar calamity be a reminder to us that, whilst we have still a few more breaths left, we should purify ourselves of the taint of untouchability and approach our Maker with clean hearts.

बिहार भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तींचा संबंध हा आपण करत असलेल्या अस्पृश्यतेसारख्या पापांना ईश्वराने दिलेली शिक्षा आहे असे मानणे, हे नक्कीच 'वैज्ञानिक' विचाराला छेद देणारे होते. गांधीजींसारख्यांच्या तोंडून असे ईश्वरी कोपाचे विषय येणे हे सर्वसामान्य बुद्धिमत्तेच्या लोकांमध्ये अंधश्रद्धा वाढण्यास कारणीभूत होऊ शकणारे होते. भारतीय तत्त्वज्ञानातील 'कर्मसिद्धान्त' किंवा व्यवहारातील 'नैतिकते'शी ताडूनच गांधीजींच्या या विधानांचा विचार करावा लागतो. गांधीजींचे वरील भाषण हे तत्कालीन ''हिंदू'' आणि ''हिंदुस्थान टाइम्स'' या वृत्तपत्रांतून प्रकाशित झाले होते.

गांधीजी आणि टागोर यांना एकमेकांबद्दल प्रचंड आदर होता. तरीही रवींद्रनाथ टागोरांनी गांधीजींच्या या भाषणाबद्दल जाहीर नापसंती दर्शविली. गांधीजींची ही विधाने अवैज्ञानिकच नाहीत, तर ती अंधश्रद्धाही पसरवू शकतात हे रवींद्रनाथ टागोरांनी ठामपणे मांडले.

It is all the more unfortunate, because this kind of unscientific view is readily accepted by large sections of our countrymen. I keenly feel the inquity of it, when I am compelled to utter a truism in asserting that physical catastrophes have their inevitable and exclusive origin in certain combinations of physical facts. Unless we believe in the inexomableness of the universal law in the working of which God himself never interferes, we find it impossible to justify his ways on occasions like the one which has sorely stricken us in an overwhelming manner and scale.

श्रद्धा, अंधश्रद्धा, विज्ञान, तत्त्वज्ञान या सर्व गोष्टी अतिशय गुंतागुंतीच्या असून गांधीजी आणि टागोरांच्या या विधानांवर अभ्यासकांनी भरपूर लिखाण केले आहे. ते मुळातूनच वाचणे हे अधिक हिताचे आणि उपयुक्त ठरेल. या विषयाच्या संदर्भात काही मतभेद असूनही त्यांनी कधीही सवंग लोकानुनयाचा सोपा मार्ग अवलंबला नाही. अप्रियतेला ते कधीच घाबरले नाहीत.

लोकमान्य टिळक, आगरकर, गांधी आणि टागोर या सगळ्यांना भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञानाची चांगलीच जाण होती. त्यांच्या राजकीय विचारांचा तो गाभाच होता. भारतीय संस्कृतीचे कट्टर समर्थक असूनही अस्पृश्यता, बालविवाह आणि तत्सम रूढींना या सर्वांनी कडाडून विरोध केला होता. सवंग लोकप्रियता मिळवण्याकरता यांनी कधीही आपल्या मूलभूत विचारांशी प्रतारणा केली नाही. भारतीय लोकशाही आणि राजकीय बैठक घडवण्यात या सगळ्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. यांच्या खांद्यावर उभे राहून आपली उंची वाढवणारे आजचे राजकीय नेतृत्व मात्र आपल्या संस्कृतीला आणि धर्माला दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर नेऊन बसवत आहेत. यांच्याकडून संस्कृतीचे धडे घेणे म्हणजे कसायाकडून गायीच्या निगेची अपेक्षा बाळगण्यासारखे आहे!

भारतीय संस्कृतीवर आजपर्यंत अनेक हल्ले झाले. पण सत्तेच्या राजकीय स्वार्थाकरता जेव्हा स्वकीयच संस्कृती विकृत करू लागतात, तेव्हा तो धोका परकीय आक्रमणापेक्षाही मोठा असतो. याकरताच समाजाने या असल्या ‘बाजारू’ उत्सवांना पाठिंबा तर देऊ नयेच, पण त्यांचे समर्थन करणाऱ्यांनाही थारा देऊ नये. भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञानाच्या रक्षणाकरता अशा ‘बेजबाबदार’ आणि ‘धटिंगण’ प्रवृत्तीशी चिकाटी आणि संयमाने लढणे हा एकच उपाय आज आपल्याजवळ शिल्लक आहे.

**– जुलै २०१५**

❖❖❖

# भारताचा कला-इतिहास आणि सांस्कृतिक वसाहतवाद

सन १८५१ मध्ये लंडनच्या हाईड पार्कमध्ये एक प्रचंड औद्योगिक प्रदर्शन भरवण्यात आले होते (१ मे ते ११ ऑक्टोबर १८५१). इंग्लंडची प्रसिद्ध राणी व्हिक्टोरिया हिचे पती राजे अल्बर्ट यांच्या पुढाकाराने हे प्रदर्शन भरले होते. इंग्लंडमध्ये औद्योगिकीकरणाने बराच मोठा वेग घेतला होता आणि रेल्वे, छपाईपासून अनेक शास्त्रीय उपकरणांची निर्मिती इंग्लंडमध्ये याचसुमारास चालू झाली होती. मोठ्या प्रमाणावर मध्यमवर्गही याचवेळी इंग्लंडमध्ये निर्माण होत होता. ईस्ट इंडिया कंपनीने भारतामध्ये आपली सत्ताही चांगलीच बळकट केली होती. इंग्लंडच्या या औद्योगिक प्रगतीचे प्रदर्शन करणे हाच या प्रदर्शनाचा मूळ हेतू होता. भारतासारख्या वसाहती आणि अमेरिका आणि युरोपमधील सुमारे ४४ राज्यांनी या प्रदर्शनात भाग घेतला होता. औद्योगिक उपकरणांबरोबरच या प्रदर्शनामध्ये मोठ्या प्रमाणावरती कलात्मक वस्तूही ठेवल्या होत्या. यामध्ये भारताच्या 'कोहिनूर' हिऱ्याचाही समावेश होता. १८५० च्या लाहोर करारामुळे हा हिरा इंग्लंडच्या राजघराण्यात हस्तांतरित झाला होता.

चार्ल्स डिकन्स (Charles Dickens), लेविस कॅरॉल (Lewis Caroll), जॉर्ज ईलिऑट (George Eliot), अल्फ्रेड टेनिसन (Alfred Tennyson) आणि चार्ल्स डार्विन (Charles Darwin) सारख्या शास्त्रज्ञ, विचारवंत आणि लेखकांनी या प्रदर्शनाला भेट दिल्याच्या नोंदी आहेत. कार्ल मार्क्स (Karl Marx) यांनी मात्र या प्रदर्शनाला विरोध केला होता. या प्रदर्शनाची वास्तू आणि त्याची अंतर्गत सजावट हे ब्रिटिश स्थापत्य-कलेचेही एक मोठे प्रदर्शन होते. या प्रदर्शनामुळे सरकारला लाखो पौंडांचा फायदा झाला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या पैशांतून कुठलाही नवीन उद्योगधंदा न उभारता, व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट, विज्ञान (Science) आणि नॅचरल हिस्टरी म्युझियम अशी आजची जगप्रसिद्ध कला आणि विज्ञान प्रदर्शित करणारी संग्रहालये (Museums) यातून निर्माण केली गेली.

व्यापार, उद्योग आणि साहित्यापासून चित्रकलेपर्यंतच्या सर्व कलांच्या निर्मितीमध्ये फ्रान्स आणि इंग्लंड या युरोपमधील दोन देशांमध्ये स्पर्धा होती. १८४४ मध्ये फ्रान्समध्येही अशाच औद्योगिक वस्तूंच्या निर्मितीला प्रसिद्धी देण्याकरता एक मोठे प्रदर्शन भरले होते. इंग्लंडमध्ये भरवले गेलेले प्रदर्शन हे त्या स्पर्धेचाच एक भाग होता.

'कला' हा कुठल्याही संस्कृतीचा किंवा सभ्यतेचा आत्मा असतो. साहित्य, स्थापत्य, शिल्प, नाट्य, नृत्य, संगीत ते अगदी चित्रकलेपर्यंत वेगवेगळ्या माध्यमांतून त्या त्या संस्कृतीची 'सृजनता' ही कलेमधून व्यक्त होत असते. यातून जे निर्माण होते त्यालाच आपण 'संस्कृती' म्हणतो. जगातल्या सगळ्या प्राचीन सभ्यतांनी आपापली संस्कृती निर्माण केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या सगळ्या सभ्यतांच्या कला या आपली एक वेगळी 'शैली' घेऊनच प्रदर्शित होतात. पाश्चात्त्य जगताकरता 'ग्रीक' आणि 'रोमन' कलांनी त्यांना स्फूर्ती दिली आहे. म्हणूनच या कलांच्या निर्मितीमध्ये, त्यांच्या चालीरीती, वेशभूषा, भौतिक-आधिभौतिक तत्त्वज्ञानाच्या समजुती यांचे प्रतिबिंब दिसते. आफ्रिकन किंवा दक्षिण अमेरिकेतील इन्का (Inca) किंवा मायन (Mayan) कलांमध्येही त्या त्या संस्कृतींचेच प्रतिबिंब दिसते. भारतीय कलाही याला अपवाद होऊ शकत नाहीत. सभ्यता जशी विकसित होत जाते, तसे या कलांचे 'शास्त्र' बनायला लागते, आणि त्यातूनच पुढे त्याच्या साहित्याची निर्मिती होते.

भारत हा एक 'अती प्राचीन' देश आहे. साहजिकच एवढ्या मोठ्या कालखंडामध्ये अनेक अंगांनी आणि अनेक स्तरांवर भारतीय कलांचा विकास

झाला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, अगदी आपले भौगोलिक वैशिष्ट्य जपूनसुद्धा, अफगाणिस्तानपासून केरळपर्यंत या कलांच्या निर्मितीचा गाभा मात्र आपल्या भौतिक आणि आधिभौतिक तत्त्वज्ञानाशी सुसंगत राहिला आहे. चीनपासून मध्य आणि पूर्व आशिया खंडातील सर्वच देशांच्या कलांवरती भारताचा प्रभाव दिसून येतो. तरीही दुर्दैवाने भारतीय कलांचा जेव्हा पाश्चात्त्य कलेशी तुलनात्मक अभ्यास होतो, तेव्हा भारतीय कलांना ग्रीक आणि रोमन कलांपुढे दुय्यम स्थान मिळते. १८५१ च्या लंडनमधील प्रदर्शनामुळे पुन्हा एकदा अशा चर्चांना सुरुवात झाली.

भारतीय कलांचा 'स्रोत' आणि 'उगम' हा किती भारतीय आहे आणि त्याच्या 'शैली'मध्ये किती उसनवारी आहे याच्या अभ्यासाकरता पाश्चात्त्यांनी या कलांच्या मूळ ग्रंथाच्या शोधाला सुरुवात केली. बहुतेक सर्व मूळ ग्रंथ हे संस्कृतमध्ये आहेत. सुदैवाने याचवेळी पाश्चात्त्यांच्या संस्कृतच्या अभ्यासानेही गती घेतली होती. तरीही 'ग्रीक' किंवा 'रोमन' संस्कृती इतक्या तुल्यबळ संस्कृती जगात अस्तित्वात असू शकतात ही कल्पना तेव्हा आणि आजही गंभीर अभ्यासकांच्याही पचनी पडायला जड जाताना दिसते. याचवेळी भारतामध्ये इंग्रजी शिक्षणाचा प्रसार होऊ लागला होता. यातूनच युरोपमधील 'वैज्ञानिक' आणि 'औद्योगिक' क्रांतीची जाणीव भारतीयांमध्येही पाझरू लागली होती. हीच 'सांस्कृतिक वसाहतवादाची'ही सुरुवात होती. ख्रिस्ती धर्मप्रसारक हिंदू धर्मातील वैगुण्ये हिरिरीने मांडत होते. सुधारणेच्या नावाखाली भाषा, वेश ते व्यवहारातील सांस्कृतिक नीतिमूल्यांवरही पाश्चात्त्य संस्कृतीचे 'रोपण' व्हायला लागले. यात सर्वात मोठा बळी हा स्थापत्य, संगीत, नृत्य आणि इतर कलांचा दिला गेला.

चांगल्याचा स्वीकार करण्याकरता कुठलीच आडकाठी येऊ नये. युरोपमध्ये झालेल्या प्रबोधनामुळे (Renaissance) तेथील कलांना चर्चच्या जोखडातून मुक्ती मिळाली. पण हे 'प्रबोधन' म्हणजे 'आत्मवंचना' नव्हती; तर हे प्रबोधन म्हणजे मूळ 'स्रोत', म्हणजेच 'ग्रीक' आणि 'रोमन' विचार आणि तत्त्वज्ञानाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न होता. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्येही महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर ते विवेकानंद आणि अरविंदांचा प्रयत्नही सुधारणांमध्ये 'भारतीयत्व' जपण्याकडे होता. भारतीय कलांच्या बाबतीत कला-इतिहासकार आनंद कुमारस्वामी यांचे प्रयत्न हे विशेष उल्लेखनीय आहेत. तत्कालीन इंग्रजी शिक्षित भारतीयांच्या बाबतीतले त्यांचे निरीक्षण बोलके आहे.

"Speak to the ordinary graduate of an Indian University, or a student from Ceylon, of the ideas of the Mahabharata-he will hasten to display his knowledge of Shakespeare; talk to him of religious philosophy-you find that he is an atheist of the crude type common in Europe a generation ago, and that not only has he no religion, but is as lacking in philosophy as the average Englishman; talk to him of Indian music-he will produce a gramophone or a harmonium and inflict upon you one or both; talk to him of Indian dress or jewellery-he will tell you that they are uncivillised and barbaric; talk to him of Indian art-it is news to him that such a thing exist; ask him to translate for you a letter written in his own mother-tongue-he does not know it. He is indeed a stranger in his own land." (Modern Review, Calcutta, Vol.4. Oct. 1908 p.338)

अलीकडे पार्थ मित्तर (Parth Mitter) यांनी आपल्या Much maligned Monster - A History of European Reactions to Indian Art या १९७७ साली प्रकाशित केलेल्या पुस्तकामध्ये या मानसिकतेचा विस्तार आणि ऊहापोह केला आहे. या पुस्तकाच्या पहिल्या पाठातच ते म्हणतात,-

"Why did Hindu art, and the treatment of Hindu figure sculpture and iconography in particular, present such problems of assimilation? In order to seek the answer to his question it is necessary to go beyond the eighteenth and nineteenth centuries and back to the end of Middle Ages, because in essence that was when attitudes were formed and the germs of later reactions firmly planted. The period from the middle of the thirteenth to the end of the seventeenth century may be regarded as the formative phase in the reception of Indian art."

आपल्या सगळ्याच कलांवरती आज काही शेकड्यांनी हस्तलिखिते उपलब्ध झाली आहेत. भरताचे 'नाट्यशास्त्र' हे तर सगळ्यांनाच ज्ञात आहे. स्थापत्यावर मत्स्यपुराणामध्ये १८ संहिता असल्याचे नोंदवले आहे. त्यातल्या बहुतेक संहिता आज जरी उपलब्ध नसल्या तरी कश्यप, भृगु, मय व विश्वकर्म या संहिता आजही उपलब्ध आहेत. शिल्पकार या साहित्याचा वापर करून वेगवेगळ्या शैलींनी अगदी पेशवाईपर्यंत मंदिरं बांधत होते. कृष्णाजी विनायक वझे यांनी आपल्या ''हिंदी शिल्पशास्त्र'' या पुस्तकामध्ये नाशिकच्या मंदिरांचे उदाहरण देऊन ही गोष्ट स्पष्ट केली आहे. ते म्हणतात, -

''राजे बहादूर नारोशंकर यांनी बांधलेले महादेवाचे देऊळ कश्यप संहितेप्रमाणे आहे. चंद्रचूड यांनी बांधलेले सुंदरनारायणाचे देऊळ भृगुसंहितेप्रमाणे आहे, व ओढेकर यांनी बांधलेले काळ्या रामाचे देऊळ मयसंहितेप्रमाणे आहे.''

आज भारतभर प्राचीन मंदिरं किंवा गुंफा विखुरलेल्या आहेत. तत्कालीन जीवनशैलीचेच ते प्रतिबिंब आहे. केशभूषा, वेशभूषा ते दैनंदिन वापरातील अनेक गोष्टींचे प्रतिबिंब त्यामधून उमटले आहे. पण मंदिर बघावे कसे? हे आपल्या शालेय शिक्षणाचा एक लहानसा भागही होऊ शकत नाही हे मोठे दुर्दैव आहे.

चित्रकलेला मार्गदर्शक 'चित्रसुत्रां'वरती विष्णुधर्मोत्तर पुराण, बृहद्संहिता, समरांगण सूत्रधार ते सोमेश्वराच्या १२ व्या शतकातील मानसोल्लासामध्ये विस्ताराने चर्चा आहे. पण हे साहित्य कला शिक्षणामध्ये फारसे अंतर्भूत नाही. चित्रकलेचा अगदी सर्वात प्राचीन ग्रंथ म्हणजे नागनाजीत यांचे 'चित्रलक्षण'. हा मूळ संस्कृत ग्रंथ सध्या उपलब्ध नाही. याचे तिबेटी भाषेतील भाषांतर मात्र आज उपलब्ध आहे. बर्थहोल्ड लॉफर (Berthold Laufer) या पाश्चात्त्य अभ्यासकाने तिबेटियन हस्तलिखिताचे संपादन करून त्याचे जर्मन भाषेमध्ये भाषांतर केले. त्याच्या इंग्रजी भाषांतराकरता मात्र अभ्यासकांना १९७६ पर्यंत थांबावे लागले.

आज संस्कृतभाषेचे शब्दकोश उपलब्ध आहेत. पण 'कला' किंवा 'शास्त्रां'च्या साहित्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या संस्कृत शब्दांचा, त्या संदर्भातील अर्थ सांगणारे शब्दकोश आज उपलब्ध नाहीत. Indira Gandhi National Centre for the Arts या संस्थेने अलीकडे 'कलामूलशास्त्र' (Root texts on the Arts) हा खंडात्मक ग्रंथ प्रकाशित करायला सुरुवात केली आहे. या प्रकल्पावरती विचार मांडताना Bettina Sharada Baumer यांचे निरीक्षणही फार महत्त्वाचे आहे.

"The question is, how do we understand and interpret these art-forms? Shall it be in terms of Western Categories and terminologies as has been the case for long with art history? Indian culture as expresseed in its Sanskrit literature is perhaps the richest in the world by way of theoretical reflection on any aspect of art, not to mention other disciplines. It is therefore high time to interpret the various manifestations and cultural expressions in terms of their own tradition. Therefore a thorough presentation of the main sources for understanding the Arts is essential."

'याचना' करून स्वातंत्र्य मिळत नसते, तसेच 'विनंती' करून न्यायही मिळत नसतो. याबाबतीत चीनचे उदाहरण घेण्यासारखे आहे.

२००९ मध्ये Yves Saint Laurent (YSL) या जगप्रसिद्ध फॅशन डिझायनरनी जमवलेल्या प्राचीन वस्तूंचा फ्रान्समध्ये लिलाव झाला. त्यामध्ये १८६०च्या सुमाराला फ्रेंच सैनिकांनी लुटलेल्या दोन वस्तूंचा समावेश बेजिंगच्या समरपॅलेसमध्ये होता. या

वस्तू चीनच्या 'कला' आणि 'सांस्कृतिक' वारसा असल्यामुळे त्या वस्तूंचा लिलाव न करता त्या चीनला परत द्याव्यात अशी चिनी सरकारने विनंती केली. अर्थातच ती फेटाळण्यात आली. या लिलावामध्ये एका चिनी व्यापाऱ्याने ४ कोटी डॉलर्सची बोली त्या वस्तूंकरता लावली आणि त्या वस्तूंचा लिलाव त्याच्या बाजूने झाला. हा लिलाव हाच चिनी संस्कृती आणि कलेचा अवमान असल्यामुळे, आपली आर्थिक क्षमता दाखवून दिल्यावर ते पैसे देण्याचे मात्र त्याने नाकारले. पुढे या वस्तूंचा पुन्हा लिलाव झाला आणि फ्रान्समधीलच फॅशन डिझाईनमध्ये काम करणाऱ्या पिनॉल्ट (Pinault) कुटुंबीयांनी त्या वस्तू विकत घेतल्या. सध्या सधन चिनी लोकांचा जगामधील 'चंगळवादी' वस्तू विकत घेण्याकडे बराच मोठा कल आहे. अशा सगळ्या व्यापाऱ्यांनी चीनमध्ये दुकाने थाटली असून तिथे ते कोट्यवधी रुपयांचा व्यापारही करतात. पिनॉल्ट यांच्या कंपनीलाही चिनी ग्राहक वर्ग मोठा आहे. याच व्यापाराकडे दृष्टी ठेवून पिनॉल्ट यांनी या दोन चिनी वस्तू चिनी सरकारला परत केल्या, आणि सध्या त्या चीनच्या राष्ट्रीय संग्रहालयात ठेवल्या गेल्या आहेत. ही झाली 'महासत्ते'ची खरी ताकद.

कलांच्या बाबतीत तरी भारत हा एक 'महासत्ता' होता. जीवनाचे असे एकही अंग नाही की, ज्यामध्ये भारतीयांनी कलेचा विचार केला नाही. त्यामध्ये मंदिरांच्या भिंती काय, किंवा अजंठा-वेरुळची चित्रे काय, वेशभूषा, केशभूषा, अलंकारांपासून सर्वत्र कला-'प्रतिभा' ओसंडून वाहताना दिसते. एका 'संपन्न' आणि 'उन्नत' समाजाचेच ते प्रतिबिंब आहे. तत्कालीन साहित्य आणि शिल्पांमध्येही त्याचे चित्रण स्पष्टपणे दिसून येते. भारतीय संस्कृतीची ही कायम स्वरूपी 'प्रदर्शने' आहेत.

सुधारणा, प्रगती किंवा आधुनिकीकरण म्हणजे पाश्चात्त्यीकरण असा एक दृढ समज झाला आहे. 'सोय' आणि 'व्यापारीकरणा'ला या प्रक्रियेत कलेपेक्षा वरचे स्थान असते. 'विचित्रपणा' अगदी केसापासून वेशापर्यंत म्हणजे 'नावीन्य' या कल्पनेमुळे कलेमधील प्रतिभेचे सपाटीकरण झाले आहे. कपड्यांचे 'जीन'करण आणि संगीतातील 'फ्युजन'ने प्रतिभेप्रमाणेच अभिरुचीचेही तीन-तेरा वाजवले आहेत. 'प्लेबॉय' मधील रुचीहीन नागडेपणा, आणि सिनेमापासून रस्त्यावर दिसणाऱ्या 'दीर्घ' चुंबनांनी शृंगार-कला ही किती नासवून टाकली आहे हे समजावून घ्यायचे असेल तर वात्सायनाचे 'कामसूत्र' वाचणे आवश्यक आहे. अतिरेकी लिंग पिसाटगिरीपेक्षा 'शृंगार' हा सुद्धा रसिकतेने आस्वादायची कला आहे, हे त्याशिवाय कळणार नाही.

ज्या भारतीय संस्कृतीने जीवनाच्या प्रत्येक अंगाला छेदून जाणाऱ्या १४ विद्या आणि ६४ कलांची निर्मिती केली त्यांच्यातील ‘दृष्टी’ आणि ‘विचारांची’ मशागत करणारे सामाजिक ‘संदर्भ’ यांची आणि ‘संस्थां’ची सुधारणा किंवा प्रगतीच्या नावाखाली मोडतोड करणे म्हणजे ‘सृजन’ आणि ‘कलाप्रतिभेला’ सोडचिठ्ठी देण्यासारखेच आहे. कलेचा रसास्वाद घेण्याकरता चोखंदळ अभिरुचीचा ‘रसिक’ निर्माण करण्याचा प्रयत्न आपल्या देऊळांपासून सणांपर्यंत केला जात होता. म्हणूनच राजकारण्यांनी आपल्या सणांचे आज केलेले विकृतीकरण क्लेशकारक आहे.

कलानिर्मितीची क्षमता ही राष्ट्राची खरी ताकद असते. स्वातंत्र्याला ६८ वर्षे होऊनही आज भारतामध्ये हस्तलिखितं, पुस्तकं आणि प्राचीन देऊळे आणि वस्तूंची मोठी हेळसांड होत आहे. शिक्षणामध्ये यांच्या अभ्यासाला अजिबात स्थान नाही. अशा प्रकारची ग्रंथालये किंवा संग्रहालयांचा होऊ घातलेल्या स्मार्ट सिटीमध्ये विचारसुद्धा नाही. हीच आपली खरी शोकांतिका आणि मोठे दुर्दैव आहे. भौगोलिक वसाहतवाद संपला असला तरी कला आणि सांस्कृतिक वसाहतवाद अनिर्बंधपणे चालू आहे. अर्थातच याला जबाबदार आपण सगळेच आहोत.

– **डिसेंबर २०१५**

❖❖❖

# नवउद्योग (Start Ups) धोरण

भारताच्या ६९ व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यामध्ये दिल्लीच्या लाल किल्ल्यावरून भाषण करताना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सध्या चर्चेत असलेल्या नव उद्योजक (Startups) चळवळीला प्रोत्साहित करणारे धोरण लवकरच जाहीर करणार असल्याचे घोषित केले होते. अवघ्या ५ महिन्यांच्या अवधीत शनिवार १६ जानेवारी २०१६ ला दिल्लीच्या विज्ञानभवनामध्ये पंतप्रधानांनी या योजनेचा कृती आराखडा (Action Plan) जाहीर केला. अर्थातच याचे समाजाच्या सर्व क्षेत्रांतून स्वागत करण्यात आले.

एकंदरीतच उद्योगांच्या निर्मितीला आणि उत्कर्षाला पोषक वातावरण सध्या देशामध्ये नाही हे नाकारता न येणारे वास्तव आहे. याकरताच या सरकारने सुलभ व्यवसायनीतीची घोषणा केली. व्यवसाय नोंदणी, जाचक कामगार विषयक कायदे, असंख्य परवान्यांचे अडथळे (Licences), गुंतागुंतीची करप्रणाली, आणि यातूनच निर्माण होणाऱ्या भ्रष्ट नोकरशाहीमुळे नवीन तर सोडाच, पण अस्तित्वात असलेले उद्योगधंदे चालवणेही गेले कित्येक वर्षे कठीण होऊन बसले आहे. व्यवसाय सुलभ धोरणांच्या

बाबतीमध्ये सिंगापूर हे जगातले १ ल्या क्रमांकाचे राष्ट्र आहे. आपला प्रतिस्पर्धी देश चीनचा क्रमांक ५ वा आहे, तर भारताचा प्रमांक १३० वा आहे. सरकार आणि व्यापारामधील भ्रष्टाचाराचा अभ्यास करणाऱ्या Transperency International संस्थेने केलेल्या १७५ देशांच्या पहाणीमध्ये भारत ८५ व्या स्थानावरती आहे.

सर्जनाला गरज असते ती स्वातंत्र्याची, मग ते साहित्य असो किंवा उद्योगधंदे.

कुठल्याही उद्योगधंद्याला ऊर्जितावस्था ही त्याच्या निर्मितीतील 'दर्जा', 'नावीन्य' किंवा परवान्यांवर आधारित 'मक्तेदारी' यामुळेच येऊ शकते. स्वातंत्र्यानंतर साम्यवाद आणि समाजवादाकडे झुकणारी अर्थनीती भारताने स्वीकारली. रशियामधील उद्योगधोरणं ही भारताकरता आदर्श राहिली. वसाहतवाद्यांनी आपल्या अस्तित्वाकरता निर्माण केलेली घट्ट नोकरशाही, आणि डाव्या अर्थनीतीला पोषक परवाना केंद्रित औद्योगिक धोरणांमुळे दर्जा किंवा नावीन्यापेक्षा उद्योगधंद्यांचा विकास हा 'मक्तेदारीवर'च अवलंबून राहिला. यातच सरकारही या क्षेत्रामध्ये उतरल्यामुळे स्पर्धा संपुष्टातच आली. १९९१च्या आधी गाडी विकत घेण्याकरता किंवा साधा दूरध्वनी मिळवण्याकरता भारताच्या नागरिकाला १५-२० वर्षे थांबायला लागत होते. या सगळ्याचा परिणाम म्हणजे १९९१ साली भारत आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा राहिला.

तत्कालीन अर्थमंत्री मनमोहनसिंग यांनी याचवेळी काही क्रांतीकारक आर्थिक धोरणांची घोषणा केली. धोरणांचे उदारीकरण आणि जागतिकीकरण हा या धोरणाचा गाभा होता. मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असलेले 'परवानाराज' संपुष्टात आणण्याकरता यामुळे पाऊले पडू लागली. या धोरण बदलाला काही सबळ जागतिक कारणेही होती. साम्यवादी अर्थनीतीचा पोथीनिष्ठ स्वीकार केलेली चीन आणि रशिया यांची आर्थिक परिस्थिती दिवाळखोरीच्या उंबरठ्यावरच होती. याविरुद्ध लोकशाही आणि भांडवलदारीवर धोरणं आखणारी जपान, सिंगापूर, तैवान, कोरिया ही लहान राष्ट्रे औद्योगिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये प्रचंड प्रगती करत होती. या कुठल्याच राष्ट्रांकडे स्वतःचे नवीन तंत्रज्ञान नव्हते. त्यांचे बहुतेक सर्व उद्योगधंदे हे फक्त नक्कलच करीत होते. पण प्रचंड मेहनत, उदार आर्थिक आणि कामगार धोरणं आणि कमीतकमी सरकारी हस्तक्षेप यामुळे या देशांनी प्रगत देशांमधील उद्योगधंद्यांशी स्पर्धा चालू केली. यातूनच पुढे 'दर्जा' आणि 'नावीन्या'वर भर दिल्यामुळे आज आशिया खंडातील ही सर्व राष्ट्रे अमेरिका आणि युरोपमधील उद्योगधंद्यापुढे आव्हान देऊन उभी आहेत. गेल्या ३० वर्षांत चीनने हाच कित्ता

गिरवून उद्योग आणि अर्थकारणामध्ये जगात दुसरा क्रमांक मिळवला. आज चीनमधील उद्योग आणि विकासदरामध्ये थोडा जरी फरक पडला तरी त्याचे हादरे अमेरिकेपासून जगातल्या सगळ्याच उद्योगधंदे, व्यापार आणि अर्थकारणाला भोगावे लागत आहेत.

नव उद्योगांच्या संदर्भात या सरकारने जाहीर केलेल्या धोरणांची चर्चा या पार्श्वभूमीवरच करायला लागेल.

वर उल्लेख केलेली आशिया खंडातील चीन किंवा इतर लहान राष्ट्रे काय किंवा अमेरिका आणि युरोपमधील प्रगत देश काय, उद्योगधंद्यांच्या निर्मिती आणि विकासाकरता लागणाऱ्या रस्ते, वीज आणि पाणी या पायाभूत सुविधा त्यांनी आधी पुरवल्या. आजही या संदर्भात वाजतगाजत केलेल्या धोरणांच्या घोषणांपलीकडे प्रत्यक्षात काही विशेष घडताना दिसत नाही. बहुतेक सर्व सरकारी धोरणं ही चांगलीच असतात. प्रश्न असतो तो अंमलबजावणीचा. ऑस्ट्रेलियामधील नुकत्याच एका कार्यक्रमात रिझर्व बँकेचे गव्हर्नर रघुराम राजन यांनी हेच विचार प्रकट केले.

Implementation remains the major challenge for India's economy and if it can deliver on its promises, the country will be "the place to be" RBI Governer Raghuram Rajan had said.

When asked to nominate the three things that most need to change to make a difference to the Indian economy Rajan said, "Implementation, implementation and implementation."

घोषणा आणि अंमलबजावणीमध्ये दरी निर्माण होण्याची अनेक कारणे आहेत. घोषणे नंतर अत्यंत 'क्लिष्ट' आणि 'गुंतागुंतीचा' असा अंमलबजावणी आराखडा तयार करण्यात येतो. या धोरणाचा प्रत्येक 'उपभोक्ता' हा त्याचा दूर उपयोग करणार आहे हे गृहीत धरूनच हा कृती आराखडा तयार होतो. या बाबतीत आपल्याइतकी 'कल्पक' नोकरशाही जगात कुठेही नसेल. यामुळे सुलभीकरणापेक्षा अडथळेच निर्माण होतात. हे अडथळे म्हणजे व्यक्त किंवा अव्यक्त, उघड किंवा छुपेपणे विणलेले 'परवान्यां'चे स्तर असतात. या प्रत्येक स्तराकरता एक अधिकारी असतो. इथेच राजकारणी आणि अधिकाऱ्यांची सोय केलेली असते. यातूनच भ्रष्टाचाराचा राक्षस उभा राहतो. यातच जुन्या-नव्या कायद्यांची भर पडते. दलाल किंवा वकिलांच्या मध्यस्ती शिवाय यातली कुठलीच पायरी चढता येत नाही. यातून एखादा उद्योजक बाहेर आलाच तर त्याची ईर्षा संपलेली असते, आणि एका वेगळ्या मानसिकतेतूनच तो व्यापाराकडे बघायला लागतो.

आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यावर येतांना less government and more governance हे त्यांचे धोरण राहील अशी ग्वाही दिली होती. शिवाय 'कालबाह्य' कायदेही टप्प्याटप्प्याने रद्द करण्याचे आश्वासन दिले होते. गेल्या ६८ वर्षांत आपण भारतामध्ये कायद्यांचे जंगल तयार केले आहे. आजही त्यामध्ये नव्याने भर पडतेच आहे. 'कालबाह्य'चा एक अर्थ म्हणजे जुने की जे आता संपूर्णपणे संदर्भहीन आहेत. पण याहीपेक्षा 'कालबाह्य' म्हणजे अगदी अलीकडे केलेले, पण बदलते तंत्रज्ञान आणि जीवनशैली यांच्याशी विसंगत असणारे कायदे. अशा कायद्यांचे जंजाळ आज आपल्याकडे जास्त आहे. वास्तव आणि तर्काशी फारकत घेतलेले हे कायदे फक्त भ्रष्टाचार वाढवतात. या कायद्याच्या अस्तित्वाच्या समर्थनार्थ नोकरशाही भक्कमपणे उभी असते. पूर्वलक्षी करप्रणाली काय किंवा जमीन अधिग्रहण कायदा काय, अगदी अलीकडे केलेले हे कायदे उद्योगधंद्यांच्या विकासाला मारक आहेत हे समजल्यावरही त्यात अपेक्षित बदल होऊ शकत नाही. गाजावाजा झालेली ही फक्त दोन उदाहरणे आहेत. पण उद्योगधंद्याच्या वाटेवर असे अनेक नवीन, जुने कायदे आहेत. या अडथळ्यांचा 'राजकीय' फायदा उमजल्यावर त्यामध्ये बदल तर सोडाच; पण त्यावर अनेक नवीन वेष्टणेही चढवली जातात.

उद्योग आणि अर्थधोरण विश्लेषक मोहनदास पै यांनी या नव-उद्योग धोरणाचे स्वागतच केले आहे. या संदर्भात लिहिलेल्या एक लेखामध्ये या नव-उद्योग धंद्यांच्या आजच्या स्वरूपाबद्दल त्यांनी केलेली टिपणी मात्र बोलकी आहे.

Six out of eight Indian Unicorns had re-domiciled outside India. Ten of the top B2B Start-ups had gone, 54 per cent of the top start-ups had gone in 2014 and 75 per cent in 2015. Our policies and tax laws were forcing the best and the brightest to register outside India. Global investors wanted a more benign enviorment with tax certainly as they were investing long-term, not the tax nightmare we have had in India. Our forex regulations were not in tune with investor needs, mergers and acquisitions could become difficult and long-drawn-out and structuring was convoluted.

(Tuesday, 19 January 2016, Business Standard, p.10)

Flipkart या बराच गाजावाजा झालेल्या आघाडीच्या नव-उद्योगाची नोंदणी ही सिंगापूरमध्ये झालेली आहे.

अमेरिकेतील Sillicon Valley मध्ये संगणकावर आधारित अनेक नवउद्योग (startups) निर्माण झाले. तेथे गुगल, फेसबुक पासून अशा अनेक कंपन्यांची

निर्मिती झाली. या Sillicon Valley मध्ये अनेक भारतीयही कार्यरत आहेत. Sillicon Valley च्या यशाला अमेरिकन सरकारचे कुठलेही विशेष धोरण कारणीभूत नाही. Sillicon Valley च्या यशाला कारणीभूत आहे ती फक्त 'गुणवत्तेला' दिलेली मान्यता. शून्य सरकारी हस्तक्षेप आणि १००% स्वातंत्र्य. भारतामध्येही हे तंत्रज्ञान किंवा त्यावर आधारित उद्योगधंद्यांचा विकास होऊ शकला याचे कारणसुद्धा त्यामध्ये 'न' झालेला सरकारी हस्तक्षेप हेच आहे. या नव-उद्योगांमध्ये अपयशही मोठ्या प्रमाणावर असते. पण ते पचवण्याची आणि नाउमेद न होता पुढे पाऊल टाकण्याची ईर्षा महत्त्वाची असते.

कुठल्याही तंत्रज्ञानाच्या विकासाकरता व्यापक, एकमेकांना पूरक अशा वातावरणाची (Ecosystem) गरज असते. 'शिक्षण' हा या वातावरणाचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. दुर्दैवानी आज 'दर्जेदार' शैक्षणिक निर्मितीलाही सरकारी नियंत्रणांच्या बेड्यांमध्ये जखडून ठेवण्यात आले आहे. 'स्वातंत्र्य' आणि 'स्वायत्तता' म्हणजे काय याची व्याख्याही सरकारनेच करायची !! 'राजकीय' सोयीकरता आरक्षण, नियंत्रण आणि फुकटेपणाची खैरात यामुळे सरकारला हवी असलेली साक्षरांची आकडेवारी कदाचित निर्माण होईल, पण त्यामध्ये दर्जाचा मागमूसही नसेल! नव-उद्योजक निर्मितीकरता सरकारने 'नव-उद्योग' म्हणजे काय हे ठरवण्यापेक्षा उद्योग धोरणांमध्ये खरे सुलभीकरण आणणे हे अधिक महत्त्वाचे आहे. पंतप्रधानांनी सादर केलेल्या या कृती आराखड्यामध्ये १९ मुद्दे दिले आहेत. नव-उद्योग म्हणजे काय? आणि त्याची पात्रताही सरकारच ठरवणार आहे!! अडथळ्यांची सुरुवात धोरणांच्या तळटीपांमध्ये आहे. लघु आणि मध्यम दर्जाच्या उद्योगधंद्यांची परिस्थिती ही सध्या चांगली नाही. गेल्या ६८ वर्षांत त्यांच्या विकासाकरताही अनेक योजना जाहीर झाल्या आहेत. प्रश्न आहे तो त्यांच्या अंमलबजावणीचा.

युरोपमध्ये 'प्रबोधन' युगामुळे वैज्ञानिक क्रांतीबरोबरच औद्योगिक क्रांतीही जोर धरू लागली. उद्योगधंद्यांना लागणाऱ्या सर्व गरजांची निर्मिती यातूनच व्हायला लागली. वसाहतवादही यातूनच जन्माला आला. या उद्योगधंद्यांच्या विकासामधील सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे तेथील विद्यापीठांचा विकास. विद्यापीठांच्या या विकासामध्ये 'गुणवत्ते'चा आदर आणि 'गुणवत्ते'ला प्रोत्साहन हा एकच घटक महत्त्वाचा होता आणि आजही आहे. यातूनच 'नावीन्या'चा उदय होत गेला, आणि हेच नावीन्य तंत्रज्ञानाच्या प्रगतीकरता 'वरदान' ठरले. अशी दर्जेदार विद्यापीठे

हीच तिथल्या उद्योगधंद्यांचा पाया आहेत, सरकारी मदत नाही. दुर्दैवाने भारतामधील परिस्थिती याच्या बरोबर विरुद्ध आहे. राजकारण्यांनी 'गरिबी', 'मागासलेपणा' आणि 'जातीयवाद' यांना अलंकारांचं स्वरूप दिलं आहे. सरंजामशाहीच्या मानसिकतेतून, 'आपणच या घटकांचे तारणकर्ते आहोत' अशी भूमिका घेत, 'आरक्षण' आणि 'सवलती' हाच कुठल्याही सरकारी धोरणाचा पाया झाला. याला शिक्षण-धोरणही अपवाद नाही. आजच्या नव-उद्योग धोरणाचा कृती-आराखडाही याला अपवाद नाही. यामध्ये नावीन्याचा उल्लेख आहे, पण त्याच्या व्याख्येपासून पात्रतेपर्यंतचे सगळे 'निकष' हे सरकारच ठरवणार आहे. आजच्या मूठभर नव-उद्योजकांच्या यशामध्ये सरकार नसल्याचा फार मोठा वाटा आहे. 'स्वतंत्र' आणि 'स्वायत्त' शिक्षण हीच या उद्योगधंद्यांची खरी संजीवनी आहे. यामुळे निर्माण होणारे 'नावीन्य' हे त्यांचे खरे 'भांडवल' आहे. या व्यतिरिक्त जे काही आहे ते सर्व सरकारी 'गोंगाट' आहे. मागचा धोरण-गोंधळ वाढवीत पुढचा गोंधळ चालू, एवढेच त्याचे स्वरूप आहे!

**– जानेवारी २०१६**

❖❖❖

# 'व्यथा' राष्ट्रद्रोहाची

जानेवारी २०१६ मध्ये रोहित वेमुला या हैद्राबाद विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी केलेली आत्महत्या, ९ फेब्रुवारी २०१६ ला कन्हैयाकुमार या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या (JNU) विद्यार्थी संघटनेच्या नेत्याने केलेले भाषण, यामुळे 'देशप्रेमा'पासून ते 'राष्ट्रद्रोहा' पर्यंतच्या विचारांच्या चर्चेला देशामध्ये सध्या प्रचंड चालना मिळाली आहे.

आता त्याची लागण पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयातही झालेली दिसते. शिक्षण परिसरांत घुसलेल्या या राजकीय धिंगाण्याची दखल घेणे म्हणूनच क्रमप्राप्त आहे.

कन्हैयाकुमारच्या या भाषणाकरता त्याच्यावर देशद्रोहाचा खटला भरण्यात आला. पुढे कोर्टामध्ये तो न टिकल्यामुळे त्याला जामीन मिळाला. नेहरू विद्यापीठाबाहेर फारसा माहीत नसलेला हा विद्यार्थी, अल्पावधीत एका मोठ्या राष्ट्रीय चळवळीचा पुढारी बनून गेला.

कन्हैयाकुमार हा 'साम्यवादी' विचारांनी प्रभावित झालेला विद्यार्थी नेता आहे. साहजिकच संघ आणि

त्याच्याशी निगडित असलेल्या विद्यार्थी संघटना या जातीयवादी, भांडवलदार धार्जिण्या, मनुवादी आणि म्हणूनच देशविघातक आहेत, हे त्याचे ठाम मत आहे. हा वाद नवीन नसून, भारताच्या राजकीय जडणघडणीतील दोन प्रमुख प्रवाह त्यामध्ये उघड आहेत. काँग्रेस आणि इतरही अनेक प्रांतीय पक्षांचेही मत कमी-अधिक प्रमाणांत असेच आहे. लोकशाही एकदा मान्य केल्यावर ही मतभिन्नता अपरिहार्यच नाही, तर तिचा आदर करणे आवश्यकच आहे.

काँग्रेसच्या ६० वर्षांच्या कारकीर्दीत 'साम्यवादी' विचारांना, विशेषतः 'समाजवाद', 'निधर्मीवादी' इ. संकल्पनांना सरकारी धोरणं आणि नियोजनामध्ये केंद्रीय स्थान होते. लोकशाही म्हटली की तिथे सगळ्याच विचारांना आपले मत मांडण्याचा अधिकार असतो. काँग्रेसप्रमाणेच भारतीय जनता पक्ष (भाजप) हाही भारतीय राजकारणातला एक प्रमुख पक्ष म्हणून उदयाला आला. २०१४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत त्याला सर्वात जास्त जागा मिळून तो प्रमुख 'सत्तापक्ष' म्हणून काम करू लागला. 'समाजवाद', 'निधर्मीवाद' इ. सर्व सिद्धान्तांचा स्वीकारच नाही, तर त्याचा पाठपुरावा करण्याची ग्वाही भारतीय जनता पक्षही देतो.

भारतीय जनता पक्षाचा विजय आणि त्यामुळे त्यांचे सत्तेत येणं हे भारतीय घटनेला अनुसरूनच झालेली घटना आहे. हे होत असताना डाव्या 'साम्यवादी' पक्षांचा पराभव आणि ६० वर्षे सत्तेत असलेल्या काँग्रेस पार्टीला मिळालेल्या फक्त ४५ जागा हे या बदललेल्या राजकीय परिस्थितीचे 'वास्तव' चित्र आहे. एवढी वर्षे सत्तेत राहूनही त्यांना दारूण पराभवाला सामोरे का जावे लागले या करता केवळ पराभूतच नाही, तर सत्ताधारी पक्षांनीही आत्मपरिक्षण केले तर याची उत्तरे त्यांना मिळू शकतील. लोकशाहीमध्ये निवडणुकीतील विजय हा सत्तेच्या अमरत्वाचा परवाना नसतो याची पुरेशी जाणीव आपल्या राजकीय पक्षांना अजून झालेली दिसत नाही. प्रबोधन आणि धोरणांच्या शास्त्रीय विश्लेषणापेक्षा, सवंग लोकप्रियता केंद्रस्थानी ठेवून, सवलती, आरक्षणं यांची वेष्टनं चढवून, पुतळे आणि स्मारकांचे टेकू देतच राजकीय धोरणं बेतलेली दिसतात. अंतिम हेतू एकच, एनकेन प्रकारे सत्ता हस्तगत करणे!

मार्क्सचा साम्यवाद, त्याच्याच जवळचा समाजवाद, आणि ॲडॅम स्मिथचा भांडवलवाद, या दोन प्रमुख अर्थकारणांवर जगातल्या सगळ्या राजकीय प्रणाल्या उभ्या आहेत. २० व्या शतकाच्या सुरुवातीला झालेले पहिले महायुद्ध आणि मध्यावर झालेले दुसरे महायुद्ध, यामुळे जगाचा भूगोल बदलला. दुसऱ्या महायुद्धानंतर

वसाहतवादही संपायला लागला आणि आशिया आणि आफ्रिकन खंडांतील अनेक देशही स्वतंत्र झाले. २० व्या शतकाच्या शेवटच्या दशकांमध्ये शीतयुद्धही संपले. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे कामगार, शेतकरी, दलीत यांच्या उद्धाराकरता कटीबद्ध असलेल्या, मार्क्सच्या साम्यवादी धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या दोन प्रयोगशाळा म्हणजे रशिया आणि चीन हे देश आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभे राहिले. त्यांनी साम्यवादी अर्थरचनेचा त्याग करून, बाजारप्रभावी मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. या उलट औद्योगिकीकरण आणि भांडवलशाही स्वीकारलेल्या अमेरिका आणि युरोपमधील देशांमध्ये नुसती आर्थिक सुबत्ताच नाही, तर त्यांच्या नागरिकांना साम्यवादी देशांत अपेक्षित असलेले अनेक सामाजिक योजनांचे फायदेही मिळू लागले. याचा अर्थ या देशांमध्ये किंवा या देशांच्या आंतरराष्ट्रीय धोरणांमध्ये 'समानता' किंवा 'एकवाक्यता' होती का, तर याचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल.

यामध्ये महत्त्वाचा प्रश्न भारताकरता एवढाच आहे की, ज्या 'गरीब', 'दलित', 'कामगार' आणि 'शेतकरी' वर्गाच्या भल्याकरता सर्वच राजकीय पक्ष जी 'समाजवादी' 'निधर्मीवादा'वर आधारित धोरणं आणि योजना राबविल्याच्या घोषणा आणि वल्गना करतात, यामध्ये 'दांभिकता' जास्त आणि 'वास्तव' कमी आहे. यामध्ये स्पर्धा आहे ती या 'बेगडी' घोषणाबाजींमध्ये 'मी पुढे, का तू पुढे?' याची! गेल्या ६० वर्षांत १२ पंचवार्षिक योजना आणि त्यामधून या सर्व घटकांकरता अब्जावधी रुपये खर्च झाल्यावर या घटकांच्या 'आर्थिक', 'सामाजिक' परिस्थितीत काहीच फरक पडला नाही असे म्हणणे कदाचित राजकीय दृष्ट्या सोईचे असले, तरी वास्तविकता म्हणून त्याचा स्वीकार करणे अनाकलनीय आहे.

लोकशाहीचा उठता-बसता मंत्र म्हणणाऱ्या या पक्षांनी 'विधानसभा' आणि 'लोकसभे'चा आज 'पोरखेळ' करून टाकला आहे. लोकशाही पद्धतीनी निवडून आलेल्या पक्षाला राज्यकारभार करू न देणे हेच विरोधी पक्षाचं काम आहे, हे चित्र या आधी आणि सध्याही लोकसभेत दिसत आहे. या वितंडवादामध्ये जेव्हा 'देशप्रेम' आणि 'राष्ट्रद्रोह' शिरतो तेव्हा राजकारण किती किळसवाणे स्वरूप धारण करते याची ही वरील दोन जिवंत उदाहरणे आहेत.

महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये ''भारत माता की जय'' यावरून झालेला गोंधळ हा सुद्धा याच राजकारणाचे अपत्य आहे.

जगामध्ये आज, विशेषतः इस्राईल-पॅलेस्टाईन आणि सीरियामध्ये जी युद्धे चालू आहेत त्याचा अर्थकारणाशी काडीचाही संबंध नसून, ही युद्धे धर्माच्या आधारावरच चालू आहेत. अमेरिका आणि युरोपमधील देशांना, त्यांनीच आधी अवलंबिलेल्या 'दांभिक' आणि 'मतलबी' परराष्ट्र धोरणाचे परिणाम आज त्यांना भोगावे लागत आहेत.

२००१ मधील अमेरिकेतील हल्ला काय, किंवा नुकतेच घडलेले फ्रान्स आणि बेल्जियममधील आत्मघातकी हल्ले काय, यामुळे या सगळ्याच देशांनी आपल्या 'राष्ट्रीय' हिताकरता, 'अंतर्गत' सुरक्षिततेच्या नावाखाली 'राष्ट्रहीत' हे एकच ध्येय समोर ठेवून नवीन कायदे केले. हीच राष्ट्रे जगाला उच्चार, व्यक्तिस्वातंत्र्य, मुक्त अर्थव्यवस्था, अल्पसंख्याकांना विशेष अधिकार, प्रवासाकरता मुक्त परवाना इ. धोरणांच्या अंमलबजावणीचा आग्रह धरत होते. एवढेच नाही तर, त्यांच्या परराष्ट्रीय धोरणाचा तो एक मोठा सिद्धान्त होता. या सगळ्या धोरणांना या नवीन कायद्यात बासनात बांधून ठेवण्यात आले आहे.

अमेरिकेला तर जगातल्या सगळ्या देशांतील लोकांच्या 'स्वातंत्र्या'ची काळजी वाटते. अमेरिकन अध्यक्षांनी नुकतीच क्युबा आणि अर्जेंटिनाला भेट दिली. याच अमेरिकेने क्युबाचे नेते फिडेल कॅस्ट्रो यांच्या हत्येकरता CIA ला कायदेशीर परवाना दिला होता. अर्जेंटिनामधील सैनिकी शासनानी नागरिकांवरती प्रचंड अत्याचार केले. त्या सैनिकी प्रशासनाला अमेरिकेचा पाठिंबा होता. बहुतेक सगळ्या लॅटीन अमेरिकन देशांमध्ये CIA नी आपल्या हस्तकांतर्फे नेत्यांच्या हत्या आणि क्रांती घडवण्याचे अनेक प्रयत्न केले. पाकिस्तानमधील आणि ईजिप्त मधील लष्करी सत्तांना अमेरिकेचा पाठिंबा होता. अफगाणिस्तान, इराक यांचा अमेरिकेला धोका आहे म्हणून त्या राष्ट्रांमधील जनतेला 'स्वातंत्र्य' देण्याचा दावा करत अमेरिकेने त्यांच्यावर हल्ला केला. यामुळे त्या देशांची तर वाताहात झालीच, पण सगळ्या जगालाच आज त्याचे भयंकर परिणाम भोगावे लागत आहेत.

कन्हैया ज्या 'साम्यवादी' राजकीय सिद्धान्ताशी जोडलेला आहे त्यांच्या जागतिक संघटना, नेते आणि राष्ट्रांनी केलेले जुलूम निंदनीयच नाहीत तर 'मानवते'ला ते एक 'लांछन' आहेत. रशियामध्ये लेनिन आणि स्टॅलीन, चिनमध्ये माओ, कंबोडियामध्ये पोल पॉट यांनी हजारोच नाही तर आपल्या लाखो देशबांधवांचे शीरकांड केले. पूर्व युरोपमधील आणि सगळ्याच साम्यवादी देशांमध्ये 'आझादी'

किंवा स्वातंत्र्य तर सोडाच, पण नागरिकांना 'जिवंत' राहाण्याचा अधिकार सुद्धा साम्यवादी शासनकर्त्यांच्या दयेमुळे मिळत होता. या सगळ्या देशांमध्ये 'दलित', 'कामगार', 'शेतकरी' आणि 'स्त्रिया'च राहात होत्या. भारतापुरते बोलायचे तर, माओवादी आणि नक्षलवाद्यांनी केलेल्या क्रूर हत्या आणि पश्चिम बंगालमध्ये साम्यवादी सरकार असताना विरोधकांची झालेली मुस्कटदाबी, आणि इंदिरा गांधींच्या हत्येनंतर शीखांची दिल्लीमध्ये झालेली क्रूर हत्या, ही ''आझादी''च्या कुठल्या व्याख्येत बसते हे फक्त कन्हैया आणि त्याचे राजकीय समर्थकच सांगू शकतील!

माझा तो बाब्या आणि दुसऱ्याचे ते कार्टे या एकाच न्यायाने २००१ नंतर 'व्यक्तिस्वातंत्र्य' आणि 'व्यक्तिसन्मान' यांना बासनात बांधून अमेरिकेच्या 'अंतर्गत' सुरक्षिततेकरता तेथे Patriot Act, Internal Security Act, Homeland Security Act हे आपल्याकडील टाडापेक्षा भयानक कायदे लागू केले. हे सर्व अमेरिकन राष्ट्राच्या हिताकरता. फ्रान्सनेही त्यांच्याकडे झालेल्या बॉंब हल्ल्यानंतर आणीबाणी जाहीर केली. व्यक्तिस्वातंत्र्याला यामध्ये संपूर्णपणे मूठमाती देण्यात आली आहे. अमेरिकेत आणि आता फ्रान्समध्येही या कायद्यांमुळे तिथल्या मुसलमानांना आणि त्यांच्या धर्मस्थळांना प्रचंड तपासण्यांना सामोरे जावे लागत आहे. याकरता त्यांचा 'धर्म' हाच त्यांचा 'गुन्हा' या आधारावर, त्या राष्ट्राच्या सुरक्षिततेच्या नावाखाली त्यांची धरपकड आणि शिक्षा देणे चालू आहे. मानवतेच्या इतक्या मोठ्या पायमल्लीमुळे होणाऱ्या परिणामांना सगळ्या जगालाच सामोर जावे लागणार आहे.

भारतामध्येही पाकिस्तानच्या मदतीने अनेक आत्मघातकी हल्ले झाले. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असतानाही तेथील विघटनवादी शक्तींना पाकिस्तानमध्ये घातपाताचे शिक्षण देण्यात येते. खुद्द पाकिस्तानमध्ये 'शीया' मुसलमानांवर आज प्रचंड अत्याचार चालू आहेत. तरीही या पाकिस्तानला अमेरिकेची अब्जावधी रुपयांची मदत चालूच आहे.

जी धोरणं अमेरिका किंवा फ्रान्स आपल्या देशाच्या सुरक्षिततेकरता लागू करते तो अधिकार भारत किंवा इतर देशांना मात्र ही राष्ट्रे देत नाहीत. आपल्या सुरक्षिततेकरता या राष्ट्रांच्या या 'पाखंडी' आणि 'दुटप्पी' धोरणांना केराची टोपली दाखवणे हेच खरे 'राष्ट्रहीत' आहे. आझादी किंवा व्यक्तिस्वातंत्र्याशी त्याचा दूरान्वयानेही संबंध नाही.

वास्तविक 'राष्ट्रप्रेम' ही कोणाचीच मक्तेदारी असू शकत नाही. 'आझादी' म्हणजे 'स्वैराचार' नाही.

'भारत माता की जय' किंवा 'वंदे मातरम्' ही एक घोषणा झाली. या घोषणेबरोबरच प्रत्येक नागरिकावर त्या मातेच्या 'संरक्षणाची'ही जबाबदारी येऊन पडते. लोकशाहीमध्ये विरोध प्रकट करण्याकरता सभा, मिरवणुका घेणे हा एक 'वैध' मार्ग म्हणून स्वीकारला जातो. महाराष्ट्राच्या विधान सभेमध्ये राष्ट्रप्रेमावरती राणा भीमदेवी थाटामध्ये भाषण करणाऱ्या काही जणांवरती मालमत्तेची नासाडी, जाळपोळ, खंडणी इ. गुन्हे दाखल आहेत. लोकांच्या तोंडाला काळं फासणं, टोल नाक्यावर टोल मागितला म्हणून मारामारी करणे आणि 'आमच्या पद्धतीनी आम्ही धडे शिकवू' असल्या धमक्या देणं, यामध्ये या 'भारतमातेचा' कुठला आदर राखला जातो? आपल्या मताशी सहमत नसणाऱ्या या देशाच्या नागरिकांनाच अशा धटींगणशाहीची वागणूक देणे कायद्याच्या कुठल्या कलमामध्ये बसते?

आज सगळ्या देशातच आंदोलन म्हणजे 'जाळपोळ' आणि 'दंगली' असा संकेत होऊन गेला आहे. आंध्र तेलंगणामधील वाद असो किंवा जाट आरक्षणावरून झालेले आंदोलन असो, मालमत्तेची 'जाळपोळ' आणि निरपराध लोकांची 'हत्या' हा एक नित्य नियम होऊन बसला आहे. कुठला ना कुठलातरी राष्ट्रीय किंवा प्रांतीय राजकीय पक्ष या आंदोलनांच्या मागे असतोच. यामधून कुठले 'राष्ट्रप्रेम' व्यक्त होते?

संजय दत्तला विनापरवाना शस्त्रं बाळगल्याबद्दल शिक्षा देण्यात आली. मुंबई हल्ल्याकरता जी शस्त्रं तस्करीच्या मार्गाने आली होती त्यातलेच ते एक शस्त्र होते. या स्फोटामध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मदत केलेल्या व्यक्तिंशीही त्याचा संपर्क होता. तरीही तो 'निर्दोष' आहे असे जाहीर करणाऱ्या राजकीय नेतृत्वाबद्दल काय बोलावे? त्याच्या वाढदिवसाकरिता तुरुंगात 'केक' घेऊन जाणारे राजकीय नेतृत्व आणि त्यांचे पक्ष हे कुठला 'राष्ट्रभक्ती'चा संदेश देतात? कायद्यातील पळवाटा शोधून संजय दत्तला कमीत कमी शिक्षा देणारी न्यायालयं काय, किंवा त्याची तुरुंगातून सुटका झाल्यानंतर एका विजयविरासारखी त्याची काढलेली मिरवणूक काय, देशाच्या कुठल्या 'राष्ट्रसेवे'मध्ये हे बसते?

आजच्या आपल्या सगळ्या पवित्र सणांचे 'राजकीयीकरण' झाले आहे. सगळे कायदे धाब्यावर बसवून, रस्ते अडवून, खंडणीच्या स्वरूपांत वर्गणी जमा

करणाऱ्या आणि याच राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी विधानसभेमध्ये घसा फुटेस्तोवर ‘राष्ट्रवाद’ आणि ‘लोकशाही’वर भाषणे करणे याच्या इतकी भारतमातेची घोर ‘विटंबना’ दुसरी कुठली असू शकते? सत्तेवर आल्यावर प्रत्येक राजकीय पक्षाला या ‘सांस्कृतिक धिंगाण्या’मध्ये लोकप्रियतेची ‘संधी’ दिसू लागते. सणांचे ‘खेळ’ होतात. या ‘राष्ट्रभक्ती’ पुढे न्यायालयेही हतबल आणि निष्प्रभ झाल्याचे आपण बघतच आहोत.

‘राष्ट्र’ म्हणजे नुसता जमिनीचा एक तुकडा नसतो. राष्ट्रामध्ये राहाणारे नागरिक ज्या ‘सामाजिक’ संस्था निर्माण करतात, व्यापार आणि उद्योगाकरता ज्याप्रकारची साधने निर्माण करतात, न्यायाच्या कुठल्या संकल्पना विकसित करतात, साहित्य आणि कलेच्या माध्यमांतून त्यांची व्यक्त होणारी सर्जनशीलता, या सगळ्या व्यवस्थेला आपण ‘संस्कृती’ म्हणतो. या संस्कृतीलाच पूरक ‘नागरिकशास्त्र’, ‘समाजशास्त्र’ आणि सामाजिक ‘जाणिवा’ आणि ‘संवेदना’ निर्माण होतात. यातूनच प्रत्येक राष्ट्राचे एक ‘व्यक्तिमत्त्व’ आणि ‘चारित्र्य’ निर्माण होते. या सगळ्यांचा जेथे ‘आदर’ होतो ती ‘राष्ट्रभक्ती’ असते, राष्ट्रमातेचा सन्मान असतो.

घोषणांच्या कवचकुंडलांमागे लपून सर्व ‘नागरी’ संकल्पनांची पायमल्ली करणारे, आपल्या राजकीय स्वार्थाकरता राष्ट्रीय साधन सामुग्रीचा नाश करणाऱ्यांना ‘राष्ट्रभक्ती’ किंवा ‘राष्ट्रप्रेम’ मोजण्याचा अधिकार कोणी दिला? कन्हैयापेक्षा मोठा धोका या देशाला या राजकीय धुळवड आणि दिवाळखोरीचा आहे.

हाच संदेश या घटनांमधून घेणे आवश्यक आहे.

**– मार्च २०१६**

❖❖❖

# लोकशाहीतील ठोकशाही

भोपाळ येथील नॅशनल ज्युडिशिअल ॲकॅडमी (National Judicial Academy India) येथे नुकत्याच केलेल्या एका भाषणात (सकाळ, रविवार १७ एप्रिल २०१६, पृष्ठ २) राष्ट्रपती प्रणब मुखर्जी यांनी न्यायालयाच्या सक्रियतेवर (Judicial activism) सडकून टीका केली आहे. न्यायालयांच्या सक्रीयतेमुळे विकेंद्रीकरणामध्ये अडथळा निर्माण होतो असेही त्यांनी सांगितले.

अर्थातच त्यांचा रोख न्यायालयांच्या कुठल्या निकालांवर होता याचा थांगपत्ता त्यांनी आपल्या भाषणात लागू दिला नाही. राज्यघटना हीच सर्वोच्च असल्याचेही सांगायला ते आपल्या भाषणात विसरले नाहीत.

भारताची राज्यघटना ही जगातली सर्वात मोठी राज्यघटना आहे. जगातल्या अनेक देशांच्या घटनांची उसनवारी करत ही राज्यघटना बनली आहे. मुळात ही इंग्रजीमध्ये लिहिली आहे. आपली सगळीच न्यायव्यवथा आणि तिचा व्यवहार हा इंग्रजीमध्येच चालतो. आपली घटनासुद्धा प्रामुख्यानी इंग्लंडमधील

लोकशाही पाळत असलेले ‘संकेत’ आणि ‘रुढी’ आणि अमेरिकन लिखित राज्यघटनेवर आधारित आहे. साहजिकच भारताची सांस्कृतिक मानसिकता आणि आपली राज्यघटना यामध्ये प्रचंड दरी आहे. घटना वाचून कुणीही नागरिक न्यायसंस्थेकडे आपली बाजू म्हणूनच मांडू शकत नाही. वकील हा मधला दलाल आणि त्याची योग्य ती किंमत दिल्याशिवाय सामान्य मनुष्य न्यायसंस्थेच्या कुठल्याच पायरीवर उभा राहू शकत नाही. ही आपल्या न्यायव्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका आहे.

भारताच्या ९०% लोकांनी ही घटना वाचलेली तर सोडाच, पण त्यामध्ये व्यक्त केलेल्या तत्त्वज्ञानाचा आधारही समजून घेतलेला दिसत नाही. ‘स्वातंत्र्य’ हा एक परवलीचा शब्द असून तो भारतीय घटनेनी आपल्याला मिळालाय असा एक गैरसमज सर्वचजण करून घेतात, आणि देतात. प्रत्येक मनुष्य त्याचं स्वातंत्र्य घेऊनच जन्माला आलेला असतो, पण ‘स्वातंत्र्य’ म्हणजे ‘स्वैराचार’ नसतो. स्वातंत्र्यापेक्षा ‘स्वैराचार’ म्हणजे काय याचे शिक्षण संस्कृतीमधून मिळत असते. म्हणूनच भारताच्या सर्व धर्मसंकल्पनांमध्ये ‘सहिष्णु’तेचा अंतर्भाव केला आहे, आणि हे सर्व ‘धर्म’ आणि ‘पंथ’ हे आपली घटनाच काय पण इंग्लंड आणि अमेरिकेच्या घटनांपेक्षाही प्राचीन आहेत. ‘स्वातंत्र्य’ संकल्पनेवरती लिहिताना संथानम् हे विधिज्ञ सांगतात –

For civilised man, there can be no absolute liberty and therefore the precise determination of minimum unavoidable limitations, the manner in which such limitations have to be determined and the safeguards for ensuring that such limitations are not exceeded are of fundamental importance. This is true particularly in a democracy, as in a dictatorship, there can be no real curb on the arbitary will of the dictator except violent revolt. It is wrong to think that even in a democracy, liberty is automaticaly ensured because the legislatures are elected by the people party majorities in a democracy can be as subversive of liberty as dictatorships.

संस्थानम् म्हणतात त्याप्रमाणेच ‘स्वातंत्र्य’ किंवा ‘आझादी’ला हुकूमशहांप्रमाणेच लोकशाहीकडूनही तेवढाच धोका असतो. लोकशाहीच्या माध्यमातूनच इंदिरा गांधीनी आणलेली ‘आणीबाणी’ हे याचे बोलके उदाहरण आहे. घटनेमध्ये ‘घराणेशाही’ किंवा ‘व्यक्ती।स्तोमाला’ स्थान नाही. दुर्दैवाने आज आपल्या सगळ्याच ‘राष्ट्रीय’ आणि ‘प्रांतीय’ पक्षांमधील घराणेशाही आणि व्यक्ती–स्तोमानी नीचांक गाठल्याचे आपण अनुभवत आहोत. लोकशाहीचा आधार म्हणजे राजकीय पक्ष. तमिळनाडूमध्ये

लवकरच विधानसभेच्या निवडणुका अपेक्षित आहेत. डी. एम. के. (D.M.K.) नी प्रसृत केलेला निवडणूक जाहीरनामा म्हणजे फुकटेपणाची खैरात आहे. शाश्वत आर्थिक, किंवा सामाजिक धोरणं तर दूरच राहिली, पण सवंग लोकप्रियता, आरक्षणं, स्मारकं आणि पुतळे यावर करदात्यांचे कोट्यवधी रुपये खर्च करीत, सध्या सर्वच पक्षांची लोकशाहीची सेवा चालू आहे!

प्रणब मुखर्जी यांचा रोख न्यायालयांच्या कुठल्या सक्रियतेकडे आहे हे आपल्याला उलगडत नसले, तरी न्यायालयाच्या सक्रियतेमुळेच सामान्य माणसाचे 'स्वातंत्र्य' थोडेतरी शाबूत आहे हेही तेवढेच वास्तव आहे. ललीत मोदी, मल्लया किंवा सहारा उद्योग समुहाचे सुब्रेतो यासर्वांनी आपल्याला घटना आणि लोकशाहीचा खरा अर्थ समजावून दिलाच आहे! आपली लोकसभा किंवा विधानसभेतील ५०% सभासदांवर कुठले ना कुठले तरी गुन्हे दाखल आहेतच. ही शोकांतिकाच नाही, तर आपल्या सगळ्यांसाठी ही एक शरमेची बाब आहे. हे सर्व सभासद लोकशाही मार्गानी म्हणजे तुम्ही-आम्ही निवडून दिलेले आहेत. दररोज वर्तमानपत्र उघडल्यावर गाड्या पळवण्यापासून खून, मारामाऱ्यांपर्यंत लोकप्रतिनिधींची बातमी येणे हे आता नेहमीचेच झाले आहे. सुदैवाने अजून न्यायाधीशांच्या नेमणुका या लोकशाही पद्धतीने होत नाहीत हे आपले नशीबच आहे.

न्यायालयाचे सगळे निर्णय मान्य होणारे जरी नसले, तरी न्यायालयांच्या सक्रीयतेमुळेच आज तुमचे-आमचे 'स्वातंत्र्य' आणि लोकशाही सदृश व्यवस्था आपल्या देशांत काही प्रमाणात तरी अस्तित्वात आहे. न्यायालये सक्रिय आहेत म्हणून लोकप्रतिनिधींच्या धटिंगणशाहीपासून नागरिकांच्या मूलभूत स्वातंत्र्याचे अल्पस्वल्प तरी रक्षण होत आहे. आपल्या सणांचे तर राजकियीकरण झालेच आहे, पण आता लग्नासारख्या पवित्र संस्कारामध्येही राजकीय पक्षांची लुडबूड चालू झाली आहे. प्रत्यक्ष व्यवहारामध्ये लोकशाही, स्वातंत्र्य, घटना या सगळ्या संकल्पनांना आज लोकप्रतिनिधींनी बासनात बांधून ठेवले आहे. ज्येष्ठ विधिज्ञ विश्वनाथ अय्यर यांनी २ फेब्रुवारी १९७४ च्या स्वराज्यमध्ये तत्कालीन परिस्थितीचे केलेले वर्णन आणि आजची परिस्थिती यामध्ये फारसा फरक पडलेला नाही. ते म्हणतात,-

It is sad, however, to contemplate the present situation in our country. Violence, discontent and unrest have become the order of the day. Liberty does not mean selfishness, licence, violence, injury to men and property,

discruption and dislocation of work and service, corrupt practices and indiscripline, high-handed and unsocial behaviour. Society cannot be held to ransom causing untold misery and loss, affecting peace and prosperity, production and prices, movement of men and goods.

लोकशाहीचा ‘गाभा’ राजकीय पक्ष आणि ‘निवडणुका’ आहे. ‘पक्षांतर्गत’ लोकशाही आज जवळजवळ अस्तित्वात नाही. लोकप्रतिनिधींच्या निवडीकरता चारित्र्य किंवा कमीतकमी शिक्षणाची कुठलीही आवश्यकता नाही. आपल्या घटनेतही तशी तरतूद नाही. न्यायालये मात्र घटनेच्या कलमांना सुसंगत अशीच न्यायप्रक्रिया राबवतात. न्यायालयीन सक्रियताही आज ध्वनी प्रदूषण किंवा रस्त्यावरील फलकबाजी पुढे हतबल झालेली दिसते. हीच आजची खरी शोकांतिका आहे. ठोकशाही आणि धटिंगणशाहीचा तो विजय आहे.

घटनेची ताकद ही तिच्या पृष्ठसंख्येमध्ये नसून, ज्या समाजाकरता ती लिहिलेली असते त्या समाजाच्या सांस्कृतिक जडणघडणीचे प्रतिबिंब तिच्या पृष्ठांमध्ये आहे का यावर अवलंबून असते. घटना ही जशी ‘व्यक्ती माहात्म्य’ असू शकत नाही, तशी ती कवी-कल्पनाही असू शकत नाही. न्यायालये घटनेच्या कलमांचीच अंमलबजावणी करतात. भारतीय घटना आणि न्यायसंस्थेचे अभ्यासक मार्क गॅलेंटर (Marc Galanter) यांचे यावरील विचार म्हणूनच अंतर्मुख करायला लावणारे आहेत.-

Contemporary Indian Law is, for the most part, propably foreign in origin on inspiration and it is notoriously incongruent with the attitudes and concerns of much of the population which lives under it. However, the present legal system is firmly established and the likelihood of its replacement by a revived 'indigenous' system is extremely small. The modern Indian legal system, then presents an instance of the apparent displacement of a major intellectual and institutional complex within a highly developed civilization by one largely of foreign inspiration. (Law and Society in Modern India, 1989 P.15)

**- एप्रिल २०१६**

❖❖❖

# उषःकाल होता होता...

'चातक' आणि 'शेतकऱ्यां'इतकीच पावसाची वाट सामान्य मनुष्यही आतुरतेने बघत असतो. पहिल्या पावसानंतर येणारा मातीचा सुगंध आणि धुतली गेलेली झाडे आणि घरे बघून मन प्रसन्न होत नाही असा माणूस सापडणार नाही. लेखक आणि कवींची प्रतिभाही या पावसामुळे फुलू लागते. बालकवी लिहितात –

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे।
क्षणांत येते सरसर शिरवे, क्षणांत फिरुनि ऊन पडे।।

वरती बघता इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे।
मंगल तोरण काय बांधिले, नभोमंडपी कुणी भासे।।

पी. सावळाराम म्हणतात,–

'रिमझिम पाऊस पडे सारखा, यमुनेलाही पूर चढे,
पाणीच पाणी चहूकडे ग बाई, गेला मोहन कुणीकडे ।।धृ।।

तरुवर भिजली भिजल्या वेली, ओलीचिंब राधा झाली,
चमकुन लवता, धरती भिजली,
दचकून माझा ऊर उडे ग बाई, गेला मोहन कुणीकडे ।।१।।

तर आरती प्रभू लिहितात –

ये रे घना, ये रे घना, न्हाऊ घाल माझ्या मना ।।धृ।।

फुले माझी अळुमाळू, वारा बघे चुरगळू
नको नको म्हणताना, गंध गेला रानावना ।।१।।

गेली कित्येक दशकं मराठी माणूस सगळ्या ऋतुंमध्ये पावसाच्या या गीतांचा आस्वाद घेत आला.

आता मात्र काळ बदलला आहे.

मधुर भावगीतांची जागा आता 'बेंजो' आणि 'कर्कश्श' ढोलताशांनी घेतली आहे 'धबधब्यांना बंदीचे कुंपण' या शीर्षकाखाली, मंगळवार, दिनांक १९ जुलै २०१६ च्या 'महाराष्ट्र टाइम्स' मधील बातमी बोलकी आहे.

> ''पावसाळ्यांतील पर्यटनाच्या बहुतांश ठिकाणांवर निसर्गाचा आनंद लुटण्याऐवजी दारू पार्ट्याच रंगताना दिसतात. तरुणांची टोळकी अक्षरशः धिंगाणा घालत असल्याने कुटुंबासह या पर्यटनस्थळी जायची फारशी कुणाची हिंमतही होत नाही एवढी परिस्थिती खालावली आहे...''

गुहागरपासून जुहूपर्यंतच्या चौपाट्यांवर 'धोक्याच्या' पाट्या लिहूनही अनेक मुलेमुली दरवर्षी दगावतात. बेजबाबदार 'धिंगाणा' आणि 'साहस' यामधला फरक हा फक्त 'अभिरुची'चा असतो. जी गोष्ट धबधब्यांची आणि चौपाटीची, तीच गोष्ट गडकिल्ल्यांची. २० जुलै २०१६ च्या बुधवारच्या 'सकाळ' वृत्तपत्रामधील कोकण रेल्वेची बातमी म्हणते,-

''... गोव्याहून पर्यटन करून परतणाऱ्या मद्यपी प्रवाशांच्या उद्धट वागणुकीचा त्रास इतर प्रवाशांना सहन करावा लागतो...''

नवश्रीमंतीमुळे सध्या 'दोनचाकी' आणि 'चारचाकी' वाहनांमध्येही बेसुमार वाढ झाली आहे. 'सरस्वती'ला बाहेर हुसकावूनच 'लक्ष्मी' ही बहुतेक घरांत प्रवेश करते. मुक्त महामार्ग काय किंवा शहरातील रस्ते काय, 'सुसाट' आणि 'आचरट' वेगामुळे होणारे अपघात, आणि निरपराध्यांचा जाणारा बळी यांच्या बातम्या जमवायच्या म्हटल्या तर एका नव्या ग्रंथालयाचीच निर्मिती करायला लागेल! अशा अपघातांना किंवा धिंगाण्याला जबाबदार व्यक्ती या कुणी गरीब 'बिचाऱ्या' किंवा 'अशिक्षित' नसतात.

समाजाचे हे चित्र कुठली 'प्रगती' दाखवते?

'समाज' आणि 'मानव' वंशशास्त्रज्ञांचा एक आवडता 'छंद' आहे तो म्हणजे 'अट्टल गुन्हेगार', 'बलात्कारी', 'खुनी' यांच्या 'मनो-सामाजिक' पार्श्वभूमीचा अभ्यास करणे. या छंदाचे निष्कर्षही ठरलेलेच असतात. 'गरीबी', 'बेरोजगारी' आणि याला आणखीन खमंग फोडणी हवी असेल तर 'जातीयवाद' यांच्या माथी या सगळ्या कुकर्मांचे खापर फोडण्यात येते. वास्तविक या असल्या 'खुळचट', 'आचरट' आणि 'ठोकळेबाज' सामाजिक विश्लेषणामुळेच अनेक वर्षे या मूळ विकृतीला सातत्याने 'खतपाणी' घातले गेले.

Justice delayed is Justice denied असं म्हणतात. 'प्रामाणिक' आणि 'नेमस्त'पणे वागणाऱ्या नागरिकापेक्षा धटींगण गुन्हेगारीला आपल्या घटनेनी अधिक संरक्षण दिले आहे, असे आजचे लाखोंनी न्यायालयातील प्रलंबित खटले बघून वाटले तर त्यात गैर काहीच नाही. इथेच ही कथा थांबत नाही. तर हे 'धटींगण' आणि 'गुन्हेगार' विनाप्रयास राजकीय क्षेत्राकरता 'पात्र' उमेदवार ठरतात. बुधवार, २० जुलै २०१६ च्या 'लोकसत्ते'च्या 'सडके पौरुष' या संपादकीयाने या गोष्टीवर नेमके बोट ठेवले आहे.

> ''हे असे आपल्याकडे वारंवार होते याचे कारण आपल्यासारख्या व्यवस्थाशून्य समाजात कायदा मोडणे हे पुरुषार्थाचे लक्षण मानले जाते. मग तो गावातला टिनपाट पुढारी असो, राष्ट्रीय नेता असो की उद्योगपती. जेवढा मोठा कायदेभंग तेवढी मोठेपणाची प्रभावळ मोठी. खंत ही की अशा व्यवस्थाशून्य समाजात या कायदेतोड्यांना समाजही नायकत्व देतो. परिणामी नियमाने चालणारे हे नामर्द ठरू लागतात आणि मिळेल ते ओरबाडून घेणे हे न्याय मानले जाते... गर्हणीय गुन्हा करणारे जेवढे त्यास जबाबदार आहेत तेवढाच अशा गुन्हेगारांना जोपासणारा समाजही जबाबदार आहे...''

आपल्याला स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे झाली. सत्ता बदल झाले. पण 'सत्ता' मिळवण्याकरता लागणाऱ्या 'व्याकरणा'मध्ये मात्र काडीचाही बदल झालेला नाही. सत्ताधारी विरोधक झाल्यावर किंवा विरोधक सत्ताधारी झाल्यावर, आपली 'गुन्हेगारी' किंवा 'भ्रष्टाचारा'वर घोषित धोरणं किंवा भूमिकांच्या बाबतीत सर्वच राजकीय पक्षांनी घेतलेल्या कोलांट्या उड्या बघून मेंदूला मुंग्या आल्याशिवाय राहात नाहीत. दुर्दैवाने राजकारणातील गुन्हेगारीला पायबंद बसेल असे आपल्या घटनेमध्ये काहीच

नाही. २००५ मध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना मंत्रिमंडळात सामावून घेऊ नये म्हणून दाखल केलेल्या जनहित याचिके (PIL) वरती उच्चतम न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने आपल्या १२३ पानांच्या निर्णयामध्ये आपली ही असहाय्यता खालील शब्दांत व्यक्त केली आहे.-

> "We are of the convinced opinion that when there is no disqualification for a person against whom charges have been framed in respect of heinous or serious offences or offences relating to corruption to contest the election by interpretative process, it is difficult to read the prohibition into Article 75(I) to the powers of the Prime Minister or the Chief Minister in such a manner."

प्रत्येक नागरिकांनी हे निकालपत्र (Judgement) वाचणे गरजेचे आहे. आपली असहाय्यता त्यांनी दर्शवली असली, तरी त्यांच्या निर्वाचित सरकारकडून असलेल्या अपेक्षाही त्यांनी व्यक्त केल्या आहेत.-

> "A democratic republic policy hopes and aspires to be governed by a Government which is run by the elected representatives who do not have any involvement in serious criminal offences or offences relating to corruption, casteism, societal problems, affecting the soveriegnity of the nation and many other offences corruption has the potentiality to destroy many progressive aspect and it has acted as the formidable enemy of the nation."

सध्या तर खून, बलात्कार, अपहरण अशा गुन्हेगारीची पार्श्वभूमी असलेल्या धटींगणांना 'राष्ट्रीय' आणि 'प्रांतीय' राजकीय पक्षांनी दिलेल्या उमेदवारीची आकडेवारी छाती दडपून टाकणारी आहे. लोकांनीही अशा उमेदवारांना निवडून दिलेल्यांची संख्या आणखीच दुःखकारक आहे. सध्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळात ७८ मंत्री आहेत. यातल्या ३१% (२४) मंत्र्यांना गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. १८% (१४) मंत्र्यांवर 'गंभीर' गुन्हेगारी आरोप आहेत.

उठता बसता 'गरिबी' आणि 'तळागाळा'तल्या लोकांच्या उद्धाराचा 'मंत्र' जपणाऱ्या या मंत्रिमंडळातील ९२% (७२) मंत्री 'कोट्यधीश' आहेत. या मंत्रिमंडळातील १८% (१४) मंत्री फक्त १२ वीपर्यंत शिकलेले आहेत. विद्यावाचस्पती (Doctorate) दर्जा प्राप्त फक्त ४ मंत्र्यांना आहे. अगदी गल्लीबोळातील राजकारण्यांमधील गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि त्यांचे कोट्यधीश असणे या नातेसंबंधाची उकल करायला आइनस्टाईनची गरज नाही.

मुंबई, ठाण्यामध्ये एका महिला पोलिसाशी हातघाई करणाऱ्या राजकीय पुढाऱ्याच्या वाढदिवसाच्या शुभेच्छांचे बोर्ड झळकतात, किंवा एखाद्या राजकीय पक्षाची स्त्री प्रतिनिधी कुंटणखाना चालवते हे कशाचे द्योतक आहे? लोकप्रतिनिधी हे शेवटी लोकांचेच प्रतिबिंब असते. अशा लोकांनाच आपण निवडून देणार असू तर 'दुटप्पी'पणा आणि 'दांभिक'पणाचे एवढे चांगले उदाहरण जगात दुसरे सापडणार नाही.

सिनेमा असो, जाहिराती असोत किंवा इतर प्रसिद्धी माध्यमं असोत, 'गुन्हेगारी' आणि 'लिंग'पिसाटपणाला त्यामधून मिळणारे प्रोत्साहन समाजाला दुसरे कुठले 'मार्गदर्शन' करणार? दहीहंडी, गणपती उत्सव किंवा नवरात्रीच्या सणांचे झालेले गुन्हेगारीकरण, राजकीयीकरण आणि व्यापारीकरण हे कशाचे द्योतक आहे? आगमनापासून ते विसर्जनापर्यंतच्या मिरवणुकीतील धिंगाणा, रस्ते अडवून घातलेले मांडव, बेंजो, ढोलताशांनी केलेले ध्वनीप्रदूषण, आणि या सगळ्याचे अत्यंत काव्यात्मक पद्धतीने 'तरुणाई थिरकली' सारखी माध्यमांनी केलेली वर्णने ही या राजकीय धटींगणशाहीला प्रोत्साहनच देत नाहीत का? सणांच्या सादरीकरण करण्याच्या संदर्भात न्यायालयानी दिलेल्या आदेशांचे पालन करतानाही राजकीय नेतृत्वानी दाखवलेली टाळाटाळ 'चिंता' वाढवणारी आहे. उघडपणे किंवा छुपेपणे कायद्याचा अवमान आणि धटींगणशाहीला हे प्रोत्साहनच नाही का? अप्रियता तर दूर राहिली, पण बाळबोध 'प्रबोधना'चा मार्गही या संदर्भात राजकीय नेतृत्व स्वीकारायला तयार नाही!!

चित्रपट आणि दूरदर्शनवरील मालिकांबद्दल तर काय लिहावे?

राजकारणातील गुन्हेगारीच्या संदर्भात भारतीय घटना जेवढी 'कमकुवत' आणि 'असहाय्य' आहे तिच गोष्ट 'व्यक्ती स्वातंत्र्य' आणि 'उच्चार स्वातंत्र्याच्या' बाबतीत आहे. राजकपूर, देवानंदच्या काळामध्ये झाडाच्या पुढे-मागे लपंडाव खेळून तरुणपिढी 'प्रेम' व्यक्त करीत होती. गीतरचना आणि संगीत हे यांचे 'आत्मा' होते. तरीही खानदान किंवा आईवडील हे यामध्ये खलनायक असायचेच. आता या फिल्मी प्रेमानी वयाच्या बाबतीत नवीन दिशा घेतली आहे. 'प्रेम' आता आणखीन 'तरुण' व्हायला लागले आहे. हातधुण्यापासून पाण्यापर्यंतच्या जाहिरातींमध्ये आजकाल मुलांना प्राधान्य दिले जाते. मराठी सिनेमांनी याबाबतीत आता क्रांतीची नवी 'शिखरं' गाठली आहेत. सिनेमातील प्रभावीपणे दाखवल्या

गेलेल्या शालेय मुलांतील प्रेमाच्या ‘अंकुरा’चा आता वृक्ष होऊन त्याला कोटीकोटींची फळं लागली आहेत. कालांतराने मराठी सिनेमाला शालेय वयही मोठे वाटायला लागेल आणि आणखीन एक ‘प्रौढ’ क्रांती होईल. प्रसुतीगृहातील पाळण्यातील मुलंमुली आपल्या प्रेमाचा पाझर, हातपाय झाडून आणि शि–शू करून, या क्रांतीकारक सिनेमामधून व्यक्त करताना बघायला मिळाली तर त्यात नवल वाटायला नको. प्रश्न आहे तो फक्त, ही मुलं माध्यमांमधून प्रसिद्धी करता आपल्या मुलाखती कशा देतील याचा!!

हा दांभिकपणा इथेच थांबत नाही. ‘दारू’, ‘सिगरेट’, ‘गुटका’ यांचे दुष्परिणाम विज्ञानाने ‘सिद्ध’ केले आहेत. भारतामध्ये सगळ्या दारूच्या कंपन्यांनी सोड्याच्या बाटल्या काढल्या आहेत. सोडा हा ‘रंगत’, ‘धुंद’, ‘मस्त’ असतो हा शोध म्हणजे भारताने जगाला दिलेली एक मोठी भेट आहे. दारूची जाहिरात करता येत नाही म्हणून जाहिरात सोड्याची!! वास्तविक अशा छुप्या जाहिरातींवर कायद्याने बंदी आहे.

सिगरेट कंपन्यांनाही उघडपणे जाहिरात करता येत नाही. प्रसिद्ध नट स्वप्नील जोशी आणि नटी सई ताम्हणकर हे तरुणांकरता असलेल्या एका सिनेमामध्ये मानसिक ‘ताण’ कमी करण्याकरता ‘धूम्रपान’ करतात. या सिनेमातील एका गाण्यात तर चक्क, तरुणाई म्हणजे धूम्रपान आवश्यकच, हे खुबीदारपणे दाखवले आहे. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात त्यांनी कसे वागावे हा त्यांचा प्रश्न आहे, पण सिनेमा सारख्या परिणामकारक माध्यमातून धूम्रपानास प्रोत्साहन देणे हा सामाजिक गुन्हा आहे. धूम्रपान आणि गुटक्यामुळे कर्करोग झालेल्या रुग्णांची या दोघांनीही एकदा तरी टाटा रुग्णालयात जाऊन भेट घ्यावी. या रुग्णांबरोबरच त्यांच्या कुटुंबाचीही झालेली वाताहात त्यांना तिथे बघायला मिळेल. ‘पैसा’, ‘प्रसिद्धी’ आणि ‘धंद्या’करता ‘सामाजिक’ जाणिवा आणि साधनशुचितेला बासनात बांधून ठेवलेल्या अशा ‘बधिर’ महाभागांना यामुळे ‘उपरती’ होईल याची सुतराम शक्यता नाही. माध्यमांमध्ये हेच ‘नट’ आणि ‘नट्या’ जेव्हा सामाजिक परिवर्तनाच्या गप्पा मारतात तेव्हा मात्र ते ‘नाटक’ बघून फक्त ‘क्लेश’ होतात.

‘भारतरत्न’ मिळालेल्या व्यक्तींनी तरी आपले मित्र कोण असावेत, आपण कोणाची शिफारस करावी, याचे काहीतरी सामाजिक भान ठेवणे गरजेचे आहे, पण भारतीय संविधानाने क्रिकेटपटूंना त्यामध्ये बहुतेक सुटका दिली असावी.

बलात्काराकरता सध्या कायद्यामध्ये बदल करून देहदंडाची शिक्षाही मिळू शकते. पण गेल्या दोन वर्षांमध्ये बलात्कारांचे वाढते प्रमाण, त्यातले क्रौर्य आणि बलात्कारीत स्त्रीचे कमी वय बघून, फक्त कायद्यांनी या गोष्टी बदलतील असे दिसत नाही. 'पैसा' आणि 'प्रसिद्धी' करता 'सिनेमा', 'माध्यम' आणि 'जाहिरातीं'मधून वाढत जाणाऱ्या गुन्हेगारी आणि लिंगपिसाटपणाचे समर्थन जोपर्यंत हा समाज थांबवायला तयार नाही, तोपर्यंत 'समाज'-संवेदना जास्तीत-जास्त बधिरच होत जातील. 'सैराटी'करणाकडून 'सुसंस्कृत'पणाकडचा हा प्रवास कठीण आहे पण अशक्य नक्कीच नाही, आणि मग आठवण होते ती सुरेश भटांच्या कवितेची -

''उषःकाल होता होता काळ रात्र झाली
अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली...''

**- जुलै २०१६**

❖❖❖

# डोनाल्ड ट्रम्प यांचा विजय : शोध आणि बोध

८ नोव्हेबर २०१६ ला अमेरिकेत आणि भारतात दोन धक्कादायक आणि अविश्वसनीय घटना घडल्या. यामुळे भारत आणि सर्व जगच ढवळून निघाले. अमेरिकेमध्ये ८ नोव्हेंबरला डोनाल्ड ट्रम्प यांची अध्यक्षीय निवडणुकीत विजयी झाल्याची घोषणा झाली, तर भारतामध्ये नरेंद्र मोदी यांनी पाचशे आणि हजाराच्या नोटा चलनातून रद्द केल्या. डोनाल्ड ट्रम्प यांची निवड ही अनपेक्षित होती, तर चलनातून नोटा रद्द करण्याच्या संदर्भात बाळगली गेलेली गोपनीयताही तेवढीच आश्चर्यकारक होती.

अमेरिकेतील अध्यक्षपदाची ही निवडणूक, सर्वात 'असभ्य' आणि 'असंस्कृत' झाल्याचा निर्वाळा अनेकांनी दिला आहे. अर्थातच ट्रम्प यांची बेछूट वक्तव्यच याला जबाबदार आहेत. न्यू यॉर्क टाइम्सपासून अनेक नामांकित वृत्तपत्रे, अमेरिकेतील विद्वतजन आणि रिपब्लिकन पक्षातील अनेक सभासद यांनी ट्रम्प यांच्या वक्तव्याबद्दल जाहीर नाराजी व्यक्त केली होती. प्रसारमाध्यमांचे धुरंधर आणि निवडणूक विश्लेषक या

सगळ्यांनीच ट्रम्प यांच्या पराभवाचे भाकीत केले होते. या घटनेचे राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात दूरगामी परिणाम होणार आहेत. या सगळ्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांच्या विजयाचा तटस्थपणे अभ्यास होणे आवश्यक आहे.

अमेरिका हे सैनिकी, आर्थिक आणि बहुतेक सर्वच आघाड्यांवर जगातील एक बलाढ्य राष्ट्र आहे. तंत्रज्ञान, वैज्ञानिक क्षेत्रातील नवीन नवीन शोध आणि औद्योगिक क्षेत्रातील प्रगती यामुळे जगातील सगळीच राष्ट्रे अमेरिकेचे अनुकरण आणि तुलना करण्यात मग्न असतात. म्हणूनच अमेरिकन अध्यक्षपद आणि त्याची निवडणूक याकडे सगळ्या जगाचे लक्ष लागून राहते.

अमेरिका हा एक मोठा खंडप्राय देश आहे. नैसर्गिक साधन संपत्ती आणि खनिज पदार्थांची तेथे मुबलकता आहे. अमेरिका राष्ट्रसुद्धा इंग्लंडची वसाहत होती. तरीही Commonwealth मध्ये अमेरिकेचा समावेश नाही. Commonwealth ही इंग्रजांच्या आधिपत्याखाली 'वसाहत' म्हणून असलेल्या देशांची संघटना आहे. ५२ राष्ट्रांचा त्यात समावेश असून, इंग्लंडची राणी त्याची अध्यक्षा आहे. अमेरिका मात्र हा शिक्का आपल्या डोक्यावर मारून घ्यायला तयार नाही. आपली स्वतंत्र 'अस्मिता' अमेरिका किती जपते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. 'महासत्ता' होण्याकरिता अशा अस्मितेची बहुधा गरज असते!! १७७५ च्या आतबाहेर अमेरिकेच्या इंग्लंड विरुद्धच्या स्वातंत्र्य युद्धाला सुरुवात झाली आणि १७८३ ला ते संपले. आजचे अमेरिका हे राष्ट्र सुमारे सव्वा दोनशे वर्षांचे आहे.

अमेरिका खंडामध्ये मूळ रहिवाशी शतकानुशतके राहात असले तरी इंग्लंड, फ्रान्स आणि युरोपमधील इतर राष्ट्रांतील नागरिकांच्या स्थलांतरानंतरच अमेरिकेच्या आधुनिक इतिहासाला सुरुवात झाली असे मानावे लागते. इंग्लंड प्रमाणेच अमेरिकेत फ्रेंच्यांची वसाहत सुद्धा होती. स्थलांतरितांचे अमेरिकेच्या विकासाला दिलेल्या योगदानाचे महत्त्व त्यांच्या निर्मितीपासून आजतागायत आहे हे डोळ्यांआड करता येणार नाही. १७८३ नंतर मात्र अमेरिका एक संघराज्य झाले. भारतामध्ये याचवेळी इंग्लंडचे वसाहतवादी प्रशासन हातपाय पसरू लागले. १७८४ मध्ये सर विल्यम जोन्स (१७४६-१७९४) यांनी कलकत्त्याला एशियाटिक सोसायटीची स्थापना करून; संस्कृत तसेच भारतीय संस्कृतीचा अभ्यास आणि त्याबाबतच्या संशोधनाला सुरुवात केली.

१७८७ मध्ये जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या (१७३२-१७९९) अध्यक्षतेखाली अमेरिकेने आपली पहिली घटना लिहिली आणि स्वीकारली. केंद्र आणि राज्य या द्विस्तरावरील अधिकारांची ती गोफण आहे. नागरिक स्वातंत्र्याला त्यामध्ये प्राधान्य देण्यात आले. याच अमेरिकेमध्ये मोठ्या प्रमाणावर गुलामगिरीही होती. संघराज्य झाल्यावर या गुलामगिरीचाही अस्त झाला. उच्चार, लेखन, संचारापासून ते कला-अभिव्यक्ती पर्यंत प्रत्येक नागरिकाला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले. अमेरिकेमध्ये युरोपमधून स्थलांतरीत झालेल्या लोकांचा मुख्य व्यवसाय हा व्यापार होता. साहजिकच त्यांच्या नव्या घटनेमध्ये व्यापार, भांडवल, स्थावर मालमत्ता या संदर्भात अत्यंत उदार आणि व्यापाराला प्रोत्साहित अशी रचना करण्यात आली.

१६ व्या, १७ व्या शतकामध्ये युरोपमध्ये वैज्ञानिक क्रांतीला सुरुवात झाली होती. याच पायावर १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंड मध्ये औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली. साहजिकच नवीन उदयाला आलेल्या अमेरिका या देशामध्येही औद्योगिक क्रांतीचा परिणाम झाला. अमेरिका आणि युरोपमधील व्यापारी संबंधांमुळे या नवीन विचारांचे अमेरिकेत स्वागतच केले गेले. नवराष्ट्राच्या निर्मित्तीच्या उत्साहामुळे उद्योगधंद्यांची निर्मिती, त्याकरता लागणाऱ्या पायाभूत सुविधा आणि व्यापारासाठी लागणाऱ्या भांडवलाला प्रोत्साहन हे आग्रहाने मिळत गेले.

२० व्या शतकाच्या सुरुवातीला आणि मध्यावर युरोपमध्ये दोन मोठी युद्धे झाली (पहिले १९१४ ते १९१८ आणि दुसरे १९३९ ते १९४१). यामुळे युरोपचा भूगोल बदलला. या युद्धात सर्वात मोठा फटका बसला तो युरोपमधल्या ज्यू समाजाला. साहजिकच हा समाज मोठ्या प्रमाणावर अमेरिकेत स्थलांतरीत झाला. ज्यू समाज हा मूळतः अत्यंत हुशार, कष्टाळू आणि व्यापारी वृत्तीचा समाज. साहजिकच अमेरिकेत स्थलांतरीत झाल्यानंतर या समाजाने विज्ञानापासून व्यापारापर्यंत सगळ्या क्षेत्रांमध्ये प्रभुत्व मिळवले, की जे आजपर्यंत चालू आहे. हा समाज जरी मूठभर असला तरी अमेरिकेच्या परराष्ट्रनीती पासून, औद्योगिक धोरणांपर्यंतच्या निर्णयांवर या समाजाचाच प्रभाव असतो.

युरोप मधील महायुद्धे संपली तरी त्यांनी शीतयुद्धाला जन्म दिला (१९४७-१९९१), आणि सगळ्या जगातील बहुतेक राष्ट्रे ही 'अमेरिका' आणि 'रशिया' यांच्या मित्र राष्ट्रांमध्ये विभागली गेली. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात शीतयुद्धही संपुष्टात आले. चीन, रशिया सकट सगळ्या साम्यवादी देशांनी उघड किंवा छुपेपणे व्यापारकेंद्रित अर्थकारणाचा स्वीकार केला.

आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रातील प्रचंड प्रगतीमुळे जगाचे नेतृत्व जवळजवळ अमेरिकेच्या आधिपत्याखाली गेले. यामुळे भौगोलिक नसला तरी ‘सांस्कृतिक’ वसाहतवाद अनिर्बंधपणे फोफावला. ‘स्वातंत्र्य’ आणि ‘स्वैराचारा’ च्या सीमा अस्पष्ट झाल्या आणि त्या जास्त स्वैराचाराकडे झुकू लागल्या. पराकोटीच्या सुबत्तेमुळे यातून मोठ्या प्रमाणावरती दिशाहीन तरुण पिढी निर्माण झाली. यातूनच २० व्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकेत हिप्पी संस्कृतीचा जन्म झाला.

पराकोटीची सुबत्ता, वैज्ञानिक, औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रामध्ये निर्विवाद प्रभुत्व यांचे विपरीत परिणामही अमेरिकन साम्राज्याच्या मानसिकतेमध्ये दिसू लागले. जगामध्ये असा एकही देश नसेल की जेथे अमेरिकन परराष्ट्रनीतीने हस्तक्षेप केला नाही. यातूनच भौगोलिकदृष्ट्या हजारो मैल दूर असलेल्या देशांमध्येही अमेरिकेने सैनिकी तळ निर्माण केले. आफ्रिकेपासून लॅटिन अमेरिकेपर्यंत सगळ्या देशांमधील अनेक गटांना अमेरिकेने शस्त्र पुरवठा केला आणि त्यांना भांडत ठेवले. त्या अस्थिरतेचा फायदा घेत, त्या देशातील नैसर्गिक साधन संपत्तीच्या लुटी पासून, त्यांना शस्त्रास्त्र पुरवठा करून आपल्या देशातील संरक्षण उद्योगांना व्यापारपेठ मिळवून देण्याचे प्रयत्न चालू झाले. ‘स्वातंत्र्य’, ‘अधिकार’ आणि नंतर त्याच्या जोडीला ‘पर्यावरण’ ही सुद्धा हत्यारे बनली, आणि या आधारावर अनेक राष्ट्रांमध्ये चळवळी आणि अस्थिरता निर्माण केली गेली आणि ती आजही केली जात आहे. अशा देशांमधील फुटीरतावादींना धोरणात्मक आणि आर्थिक मदत, गैरसरकारी संस्थांच्या माध्यमातून (NGO) करण्याचा अमेरिकन डावपेच आता सर्व परिचित आहे. भारतातही अशा संस्था मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत.

अमेरिकेचे वर्चस्व मानणाऱ्या एकाधिकारशाही आणि जुलूमशहांना पाठिंबा आणि जीवदान देण्यात आले. ही एकाधिकारशाही जे मान्य करत नाहीत त्यांना केवळ या कारणाकरिता शत्रू ठरविण्यात आले. गडाफी, सद्दाम हुसेन पासून लादेन पर्यंत सर्व एककाळ अमेरिकेचे मित्र होते. त्यांचा अमेरिकेशी संघर्ष झाल्यावर मात्र ते सर्व ‘खलनायक’ झाले. आपल्या शेजारील पाकिस्तान हा ‘धर्म’ आणि भारतद्वेशावर जगणारा देश. लादेन सारख्या अनेक दहशतवादी, धर्मांध संघटनांची निर्मिती या पाकिस्तानमध्ये झाली. तरी या पाकिस्तानला अमेरिकेची अब्जावधी डॉलर्सची मदत!! जगातल्या कुठल्याही राष्ट्राला ‘आर्थिक’ दृष्ट्या प्रबळ आणि ‘स्थैर्य’ मिळू द्यायचे नाही हा अमेरिकी परराष्ट्रनीतीचा एक महत्त्वाचा पैलू आहे.

पर्यावरणापासून मानवी अधिकारापर्यंत सगळ्या संकल्पनांचा वापर करून भारतामध्ये अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न अमेरिका सातत्याने करताना दिसते. CIA ह्या अमेरिकी हेर संघटनेचे जाळे भारतामध्येही प्रभावी आहे. आशिया खंडातील भारत आणि चीन हे दोन देश लोकसंख्येप्रमाणेच आर्थिक, आणि औद्योगिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रगती करत आहेत. आर्थिक उदारीकरण आणि जागतिक बाजारपेठेचा दोघांनीही स्वीकार केला आहे. याचाच परिणाम म्हणून अमेरिकेची मोठी बाजारपेठ चीनने बळकावली आहे.

स्वप्नाळू समाजवादी अर्थव्यवस्था आणि आरक्षणाच्या अतिरेकी धोरणांमुळे, भारतामधील मोठा बुद्धीजीवी समाज अमेरिकेत स्थलांतरित झाला. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये भारतीय उद्योगधंद्यांनी अमेरिकेमध्ये आपले मोठे जाळे निर्माण केले. त्यामध्ये नोकऱ्यांकरिता साहजिकच मोठ्या प्रमाणावर भारतीय तेथे स्थलांतरित झाले. आपली कष्टाळू वृत्ती आणि असुरक्षिततेची भावना यामुळे भारतीय समाज हा आर्थिकदृष्ट्या सबळ तर झालाच, पण त्यांची पुढची पिढीही शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रभुत्व गाजवू लागली.

प्रचंड सुबत्ता आणि स्वैराचाराकडे झुकलेल्या श्वेतअमेरिकन समाजामध्ये यामुळेच चीन व भारतीय समाजाविरुद्ध मोठ्या प्रमाणावर असूया निर्माण होत गेली. भारतासारखी नसली तरी राजकारणामध्ये बुश, क्लिंटन यांची घराणेशाहीच निर्माण होत होती. स्वातंत्र्याच्या भन्नाट संकल्पनांमुळे अमेरिकन चित्रपट उद्योगानेही 'गुन्हेगारी' आणि 'लिंग' पिसाटपणावर आधारित मोठ्या प्रमाणावर चित्रपटांची निर्मिती केली. नट-नट्या, खेळाडू यांना अव्वाच्या सव्वा पैसे देऊन जाहिरातबाजीची एक नवीन संकल्पनाच अमेरिकेने जगाला दिली. काहीही करून प्रसिद्धीत राहणे हा त्यांचा मूलमंत्र होता. याचाच परिपाक म्हणजे या कलाकार आणि खेळाडूंची विक्षिप्त आणि स्वैराचारी जीवनशैली. याचा व्हायचा तो परिणाम श्वेतअमेरिकन कुटुंबावरती होत गेला. भारतीय चित्रपट आणि कलासृष्टीतही याची भ्रष्ट नक्कल आपल्याला पहायला मिळते.

अमेरिकेच्या वैज्ञानिक आणि औद्योगिक प्रगतीमुळे अनेकांचा असा एक गैरसमज आहे की, 'धर्म' या संकल्पनेला अमेरिकेत फारसा वाव नाही. अर्थातच हा मोठा गैरसमज आहे. मध्यअमेरिकेतील अनेक राज्ये ही कट्टर ख्रिस्ती धर्मपंथी आहेत. खूप वेळा याचा उल्लेख 'Bible Belt' असा करण्यात येतो. हा समाज वर्ण श्रेष्ठत्वाच्या बाबतीतही अतिशय आग्रही आहे.

अमेरिकेतील दुसरे महत्वाचे मुद्दे म्हणजे भ्रूणहत्या (abortion) आणि पिस्तुल बाळगण्याची परवानगी. संपूर्ण अमेरिका या संदर्भात ५०-५० टक्के विभागली गेली आहे. माथेफिरूंनी पिस्तुल घेऊन शाळा आणि बाजारपेठांमधून गोळीबार करून अनेकांना मारल्याच्या घटना अमेरिकेमध्ये घडत असतात.

Bible Belt, भ्रूणहत्येला विरोध आणि पिस्तुल बाळगण्याच्या परवानगीचा आग्रह धरणारे, स्थलांतरित आणि निर्वासितांच्या विरुद्ध असणारे बहुतेक सर्वजण हे ट्रम्प यांचे समर्थक होते.

कुटुंबव्यवस्था खिळखिळीत झाल्यामुळे समाज मोठ्या प्रमाणावर आत्मकेंद्रित झाला. कृष्णवर्णीयांची गुलामगिरी संपली असली तरी समाजाच्या मूळ प्रवाहामध्ये ते कधीच सामील होऊ शकले नव्हते. साहजिकच अंमली पदार्थांचे सेवन, गुन्हेगारी यामध्ये श्वेतवर्णीयांप्रमाणे कृष्णवर्णीय समाजही मोठ्या प्रमाणावरती भरडला जात होता. अलीकडे कृष्णवर्णीय आणि अमेरिकन पोलिस यांच्या मधील अतिरेकी द्वंद्वाची हीच पार्श्वभूमी आहे. अतिरंजित स्त्रीमुक्ती आणि समलिंगी समाज यामुळे अमेरिकन समाज अधिकाधिक आत्मकेंद्रित तर बनलाच, आणि त्याची सांस्कृतिक घडी 'विकृती'कडे झुकू लागली. मध्यमवर्गीय श्वेत अमेरिकनांमधील ही खंत उदारमतवादी बुद्धीजीवी ओळखू शकले नाहीत.

ट्रम्प यांचा विजय समजण्याकरिता हा इतिहास आणि अमेरिकेच्या सांस्कृतिक जडणघडणीची प्रक्रिया समजावून घेणे आवश्यक आहे. अमेरिकेइतके शत्रूदेश जगातील इतर कुठल्याही राष्ट्राला नसतील. ९/११/२००० ला अमेरिकेवर झालेल्या हल्ल्यामुळे, संरक्षण आणि सुरक्षिततेच्या संदर्भातील 'अभेद्य' ही अमेरिकेची स्वतः बद्दलची असलेली संकल्पना मोडीत निघाली. यानंतर अंतर्गत सुरक्षिततेकरिता अमेरिकन समाजाच्या हालचालींवर अनेक निर्बंध लादण्यात आले. अमेरिकेबाहेरही अमेरिकन नागरिक असुरक्षित झाले.

ट्रम्प यांच्या ''अमेरिकेला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देऊ या'' या घोषणेमागची पार्श्वभूमी हीच आहे.

अमेरिका आजही शस्त्रास्त्र आणि आर्थिक आघाड्यांवर बलाढ्य असला तरी श्वेत अमेरिकनांमधील नोकऱ्यांपासून सगळ्याच क्षेत्रांमधील असुरक्षितता प्रचंड प्रमाणावर वाढली आहे. ट्रम्प यांचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, अजूनपर्यंत

त्यांचा राजकारणाशी काडीचाही संबंध नव्हता. यामुळे प्रचंड गुंतागुंतीची राजकीय व्यवस्था डोनाल्ड ट्रम्प कितपत सांभाळू शकतील याबद्दलही अनेक राजकीय विश्लेषक साशंक आहेत. अमेरिकन नागरिक राजकारणी आणि नोकरशहांना किती विटले होते हेही यामधून दिसून येते.

म्हणूनच ट्रम्प यांचा विजय हा अमेरिकेपुरताच मर्यादित नसून, सर्वच राष्ट्रांना विशेषतः अमेरिकन संस्कृतीचा आंधळेपणे स्वीकारणाऱ्या भारत आणि चीन या देशांकरिता महत्त्वाचा संदेश देणारा आहे. भारतामध्येही मोठ्या प्रमाणावरती दिशाहीन नवश्रीमंतांचा वर्ग निर्माण होत आहे. तो अमेरिकन स्वैराचारी संस्कृतीचा आंधळेपणे पाठपुरावा करताना दिसतो. नीतिहीन किंवा मूल्यहीन 'सुबत्ता' ही व्यक्ती किंवा देशाला सुरक्षितता देऊ शकत नाही हा धडा तरी अमेरिकेच्या आजच्या परिस्थितीवरून घ्यायला काहीच हरकत नाही.

ट्रम्प यांचा विजय हा श्वेत अमेरिकनांमधल्या असुरक्षिततेच्या उद्रेकाचे प्रतिबिंब आहे, हे आपण वर बघितलेच आहे. यामुळे निवडणुकीच्या प्रचारात स्त्रियांपासून उद्योगधंदे आणि स्थलांतरितांच्या संदर्भात ट्रम्प यांनी व्यक्त केलेल्या विचारांचा पाठपुरावा नवीन अमेरिकन धोरणांमध्ये होणार असेल, तर ती एका नव्या जागतिक 'अशांतते'ची सुरुवातच म्हणावी लागेल.

भारत 'राष्ट्र' म्हणून यातून योग्य तो संदेश घेईल एवढीच आशा सध्या बाळगता येते.

**– नोव्हेंबर २०१६**

❖❖❖

# भारतीय राज्यघटना - समज आणि गैरसमज

२६ जानेवारी हा दिवस आपण 'गणतंत्रदिवस' किंवा 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा करतो. २६ जानेवारी १९५०ला स्वतंत्र भारताची घटना तयार झाली. १५ ऑगस्ट १९४८ला आपल्याला भौगोलिक स्वातंत्र्य मिळाले आणि २६ जाने. १९५०ला भारत प्रजासत्ताक झाला.

स्वातंत्र्याकरता आपल्याला प्रदीर्घ लढा द्यावा लागला. इ.स. १६०० मध्ये व्यापाराच्या निमित्ताने ईस्ट इंडिया कंपनीचा भारतामध्ये प्रवेश झाला. हळूहळू या व्यापारी कंपनीकडे 'प्रशासकीय' आणि 'महसुली' जबाबदाऱ्याही सुपूर्त केल्या गेल्या. अर्थातच तत्कालीन भारतीयांचा नाकर्तेपणाच याला जबाबदार होता.

१८५७ ला आपले १ ले स्वातंत्र्ययुद्ध इंग्रजांविरुद्ध लढले गेले. त्यातून इंग्रज सावध झाले आणि भारताची सत्ता ही ब्रिटिश पार्लमेंट आणि राणीच्या ताब्यात सुपूर्त झाली. याचवेळी इंग्रजी शिक्षणपद्धत भारतात स्थिरावली होती, एवढेच नाही तर अनेक भारतीय त्या व्यवस्थेमध्ये शिकून तयारही झाले. यामुळेच पुढचा

भारतीय स्वातंत्र्याचा लढा हा, 'नुसतेच 'स्वातंत्र्य' नाही तर 'प्रबोधनही' हवे' अशा विचारांनी लढला जाऊ लागला. याचाच पुढचा टप्पा म्हणजे प्रादेशिक भाषांचा विकास व्हायला लागला. अर्थातच भाषेच्या विकासाकरता लागणारे व्याकरण, शब्दकोश आणि इतर कोशांची निर्मिती प्रथम साहेबांनीच चालू केली. याला छपाईचीही साथ मिळाली. म्हणूनच संपूर्ण स्वातंत्र्याकरता लागणाऱ्या प्रबोधन साहित्याची निर्मितीही याच काळात व्हायला लागली. विष्णुशास्त्री चिपळूणकरांची ''निबंधमाला'' (इ.स. १८५० ते १८८२) हे याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. लोकमान्य टिळक, आगरकरांपासून इतिहासाचार्य राजवाड्यांपर्यंत अनेकांनी या निबंधमालेतून स्फूर्ती घेतली होती.

भारतीय घटनेच्या निर्मितीमध्ये या आधीच्या अनेक घटनांचे पडसाद आहेत म्हणून काही मोजक्या घटनांच्या इतिहासाचा मागोवा घेणे उपयुक्त ठरेल.

१९ व्या शतकाच्या स्वातंत्र्य लढ्याच्या पार्श्वभूमीवर २० वे शतक उगवले. 'स्वदेशी'पासून ''स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे'' ही घोषणा करणाऱ्या लोकमान्य टिळकांचा या लढ्यावर प्रचंड प्रभाव होता. १९२० ला लोकमान्य टिळकांचे देहावसान झाले आणि त्याच सुमारास महात्मा गांधींच्या नेतृत्वाने संपूर्ण भारतावर आपली पकड बसवायला सुरुवात केली.

औद्योगिक क्रांती आणि विज्ञानाच्या प्रसारामुळेही पाश्चात्त्य जगाच्या मानसिकतेमध्येही फरक पडत होता. याच सुमाराला १ ले महायुद्ध झाले (१९१४ ते १९१८). भारतीयांच्या त्यामधील सहभागामुळे इंग्लंडमध्येही उदारमतवादी मंडळींचा भारताच्या स्वातंत्र्याविषयीचा आग्रह वाढू लागला होता. Montague-Chelmsford यांनी सुचवलेल्या सुधारणांची पार्श्वभूमी समजण्याकरता इंग्लंडमधील सुधारणा आणि उदारमतवादी विचारांचा प्रभाव समजून घेणे म्हणूनच महत्त्वाचे आहे. Government of India Act 1919 च्या निर्मितीवर या घटना आणि बदलांचा प्रभाव होता. परोपकारी (?) 'जुलमी साम्राज्यवादी रचनेकडून' (Benevolent Despotism) 'स्वतंत्र जबाबदार सरकार' (Responsible Government) निर्मितीची ती सुरुवात होती.

१९०६ पासून स्वातंत्र्यवीर सावरकरांपासून विरेंद्रनाथ चट्टोपाध्यायांपर्यंत अनेक भारतीय इंग्लंड प्रमाणेच युरोप, अमेरिकेतही कार्यरत होते. इंग्लंडमध्ये 'साम्राज्यवादा'च्या विरुद्ध असणारे बरेच इंग्रज नागरिक छुपेपणे किंवा उघडपणे या

स्वातंत्र्य सैनिकांना मदत करत होते. Hilda Howsin ही यातलीच एक उदारमतवादी स्त्री. विरेंद्रनाथ चट्टोपाध्याय यांच्याशी तिचे घनिष्ट संबंध होते. भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्याचा तिने पुरस्कार केला होता. तिने १९०९ साली The significance of Indian Nationalism हे पुस्तक प्रकाशित केले. Dr. V. H. Rutherford या दुसऱ्या उदारमतवाद्याने या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली होती. या प्रस्तावनेत ते म्हणतात,

"Without further circumlocution, Great Britain, the boasted home of freedom, is face to face with a national and patriotic demand for Freedom on the part of India, and the awful question arises. Will the British people exhibit sufficient moral courage to decide for Freedom, or, driven by a cowardly and selfish Imperialism, Plunge deeper into the Dead sea of Despotism?"

Hilda Howsin यांना पहिल्या महायुद्धाच्या वेळी इंग्रज सरकारने सुमारे ४ वर्षे नजरकैदेत ठेवले होते. १९१९ साली त्यांची सुटका झाल्यावर त्यांनी पहिली भेट घेतली ती, तेंव्हा इंग्लंडमध्ये कामाकरता आलेल्या लोकमान्य टिळक यांची. '१९०९ सालच्या त्यांच्या पुस्तकाचे तात्काळ पुनर्मुद्रण करा' असा सल्ला लोकमान्यांनी त्यांना दिला. आपल्या पुस्तकाच्या १९२२ साली दुसऱ्यांदा प्रकाशित केलेल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत या गोष्टीचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला आहे. भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला अनेक सुधारणावादी इंग्रज नागरिकांचा सक्रिय पाठिंबा होता. अशा अनेक अज्ञात गोष्टींमधीलच ही एक कथा.

Montagu हे ब्रिटिश मंत्रीमंडळात शिरकाव करणारे दुसरे ज्यू. Zionism ला त्यांचा कडवा विरोध होता. त्यांनी १९१९ साली झालेल्या Paris Peace Conference च्या भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व केले होते. १९१९ सालच्या Government of India Act ची पार्श्वभूमी समजण्याकरता अशा घटनांची नोंद घेणे महत्त्वाचे ठरते. सुधारणेच्या वेष्टनाखाली आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या दबावामुळे, काही क्षेत्रांपुरते सीमित स्वातंत्र्य या कायद्या नंतर भारतीयांना देण्यात आले. 'प्रांतीय' आणि 'केंद्रीय' अशा दोन स्तरांवरती त्यांची विभागणी झाली होती. अर्थातच अंतिम अधिकार हा ब्रिटिश सरकारकडेच होता. १९१९ च्या कायद्याच्या संहितेला एक कारणमीमांसा किंवा भूमिका (Preamble) जोडली होती. तत्कालीन Secretary of State for India, Edwin Montagu यांनी ती २० ऑगस्ट १९१७ House of commons मध्ये मांडली होती.

".... the gradual development of self-governing institutions, with a view to the progressive realisation fo responsible government in India as an integral part of the British Empire."

सर्वसाधारणपणे British Parliament मध्ये पारीत केलेल्या कायद्यांना अशा पूर्वविवेचनाची जोड नसते. यावरच आधारलेल्या १९३५ च्या Govt. of India Act. ला अशा प्रकारच्या भूमिकेची कुठलीही पुस्ती जोडलेली नाही.

भारतीयांच्या स्वातंत्र्य लढ्याच्या पुढच्या टप्प्यामध्ये, अधिकाधिक प्रशासकीय आणि महसुली स्वातंत्र्याची मागणी वाढू लागली. शिवाय या कायद्यामध्ये अंतिम निर्णय बदलण्याचा सगळा अधिकार हा ब्रिटिश सरकारकडेच होता. यालाही भारतीय नेतृत्वाचा आक्षेपच होता. पुन्हा एकदा ब्रिटनच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीपुढे विस्ताराने चर्चा होऊन Govt. of India कायदा तयार करण्यात आला आणि तोच ऑगस्ट १९३५ ला Government of India Act 1935 म्हणून पारीत करण्यात आला.

१९३५ च्या या कायद्यामुळे भारतातील कोणाचेच समाधान झाले नव्हते. भारताच्या 'संपूर्ण' स्वातंत्र्याकरता लढा चालूच राहिला. १९४२ ला महात्मा गांधींनी ''चले जाव'' ची चळवळ चालू केली. मध्यंतरीच्या काळात २ रे महायुद्धही चालू झाले होते (१९३९ ते १९४५). या सगळ्याचाच परीपाक म्हणजे भारत १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र झाला. Indian Independence Act 1947 ब्रिटिश पार्लमेंटमध्ये पारीत होऊन, ''ब्रिटिश इंडियाचे'' 'भारत' आणि 'पाकिस्तान' अशा दोन देशांमध्ये विभाजन झाले. त्यावेळी भारताची स्वतंत्र घटना अस्तित्वात नव्हती. तात्पुरती योजना म्हणून १९३५ सालच्या कायद्याप्रमाणेच कारभार चालू होता. स्वतंत्र भारताचे १ ले गव्हर्नर जनरल म्हणून Earl Mountbatten यांची नेमणूक झाली.

भारताची स्वतंत्र घटना लिहिण्याकरता २८ ऑगस्ट १९४७ ला मसुदा समिती (Drafting Committee) ची नेमणूक करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची त्याच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली. भारतीय घटनेचा मसुदा हा १९३५ सालच्या मसुद्यावर आधारित तर आहेच, पण अमेरिका आणि जगातल्या इतर घटनांचेही त्याला बरेच ठिगळ लागले आहे. भारतातल्या सगळ्या समुदाय आणि विचारांना प्रतिनिधीत्व दिल्यामुळे घटना समितीच्या सदस्यांची संख्या ३०८ होती. या सगळ्यांनी प्रस्तावित घटनेच्या सर्व कलमांवर प्रदीर्घ चर्चा केली. ही

चर्चा २ वर्ष ११ महिने १८ दिवस चालू होती. सगळे मिळून १६६ दिवस विचारांचे आदान-प्रदान चालू होते. या सभांना सर्वसामान्य नागरिकांनाही हजर राहायला परवानगी होती. या प्रदीर्घ चर्चेनंतर जो अंतिम मसुदा ठरला त्याची प्रत्येकी एक इंग्लिश आणि हिंदीमध्ये हस्तलिखित प्रत तयार करण्यात आली. यावर सभासदांच्या सह्याही घेण्यात आल्या. भारतीय संस्कृतीचे काही महत्त्वाचे टप्पे म्हणून त्यामध्ये रामायण, महाभारत इ. ची चित्रेही सामील करण्यात आली आहेत.

ब्रिटिश सरकारने भारताला Dominion Status देऊ केले होते. तत्कालीन काँग्रेस पक्षानी ते नाकारून २६ जाने. १९३० ला संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली होती. म्हणून २६ जानेवारी हा दिवस स्वतंत्र भारताच्या घटनेचा स्वीकार करून, 'गणतंत्र दिवस' म्हणून आपण साजरा करतो.

भारतीय घटना ही कोणाही एका व्यक्तीने एकटाकी लिहिलेली नाही. घटना समितीत झालेल्या चर्चेचे ६ खंड उपलब्ध आहेत. भारताची घटना ही सर्वात प्रदीर्घ आणि गुंतागुंतीची आहे. सर्वसामान्य माणसाला तर सोडाच, पण एखाद्या विधिज्ञालाही ती समजणे कठीण आहे. साहजिकच गेल्या ६६ वर्षांत आपल्या घटनेमध्ये १०० पेक्षा जास्त वेळेला बदल केले गेले. भारताच्या न्यायव्यवस्थेचा आज पूर्ण बोजवारा वाजला असून, कुठल्याही नागरिकाला त्याच्या हयातीत न्याय मिळणे जवळजवळ दुरापास्त आहे. संबंध देशात आज २ कोटींहून अधिक खटले प्रलंबित आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या सुरुवातीला घटनेच्या निर्मितीमागील 'भूमिके'ची प्रस्तावना जोडली आहे (Preamble). भूमिका आपल्याला सांगते की -

"We the people of India, having solemnly resolved to constitute India into a Sovereign Socialist Secular Democratic Republic and to secure to all its citizens : Justice, social, economic and political; Liberty of thought, expression, belief, faith and worship; Equality of status and of opportunity; and to promote among them all Fraternity assuring the dignity of the individual and the unity and integrity of the Nation."

समता, बंधुत्व, जातीविरहीत समाज या सगळ्या शब्दांना आज आपण 'हास्यास्पद' करून टाकले आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींमधील गुन्हेगारांची संख्या बघून, राजकारण्यांचे छुपेपणे किंवा उघडपणे त्याचे चाललेले समर्थन हे चिंताजनकच नाही तर भयावह आहे. अनुयायांनी आपल्या नेत्यांना जातींमध्ये

विभागून ठेंगू करून टाकले आहे. राजकारण्यांच्या समोर आज ‘पुतळे’ ‘उभारणे’ आणि ‘तोडणे’ हाच एककलमी कार्यक्रम दिसतो. शुद्ध मतपेटीवर डोळा ठेवून केलेल्या ‘सवलती’ आणि ‘आरक्षणां’च्या उधळणीमुळे आपण आज सगळीच ‘सामाजिक मूल्ये’ हरवून बसलो आहोत. जातीयवाद निर्मूलनाखाली जातींची कुंपणं आपण भक्कम करीत आहोत. भारतातला प्रत्येक समाज हा आज स्वतःला मागासलेपणाचे बिरूद लावून घेण्यात धन्य मानत आहे!

हा पराभव घटनेच्या ‘भूमिके’ मध्ये मांडल्या गेलेल्या प्रत्येक विचाराचा आहे.

आजच्या न्यायप्रक्रियेतील विलंब, भ्रष्टाचारांनी पोखरलेली नोकरशाही आणि राजकारण यामुळे आज सामान्य माणसाला, ‘साम्राज्यशाही बरी होती’ असे म्हणण्याची पाळी दुर्दैवाने आली आहे. या पार्श्वभूमीवर सामान्य नागरिक आणि आजचे राजकीय पक्ष जेव्हा आत्मपरिक्षण करायला लागतील, तीच घटनेच्या ‘भूमिके’शी सुसंगत अशा सशक्त राष्ट्र निर्मितीची खरी सुरुवात असेल. स्वतंत्र भारताच्या घटनेचा अन्वयार्थ समजण्याकरता मांडलेल्या ‘भूमिके’चा आणि पर्यायाने घटनेचा तोच खरा सन्मान असेल.

**– जानेवारी २०१७**

❖❖❖

# ''प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई''

साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक वाचून किंवा माधव ज्युलीयन यांची 'प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई' ही लताबाईंनी गायलेली कविता ऐकून गहिवरत नाही असा मराठी मनुष्य सापडणार नाही! वारकरी आपल्या दैवतांना 'माउली' म्हणून संबोधतात. म्हणूनच विनोबा भावे यांनी आपल्या गीतेच्या मराठीतील रुपांतराला 'गीताई' संबोधिले आहे.

आपल्या संस्कृतीमध्ये अनादीकालापासून आईला एक अनन्यसाधारण महत्त्व आहे.

जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती ही आईच्या गर्भात ८ ते ९ महिने वाढत असते. गर्भधारणेला वडिलांची गरज असली, तरी गर्भधारणा झालेल्या क्षणापासून जन्मापर्यंत आपण सगळे आईशी जोडलेले असतो. आपली प्रत्येक पेशी आणि अवयवांच्या रचनेपासून ते त्यांच्या कार्यापर्यंतच्या विकासावरच्या प्रत्येक टप्प्यावर आईवडिलांची छाप असते. साहजिकच, जन्माच्या आधीपासून ते जीवनात पुरेशी समज येईपर्यंतचा आपला हा प्रवास आईचे बोट धरूनच होत असतो.

हे नाते जेवढे तांत्रिक आहे तेवढेच भावनिकही आहे.

बहुसंख्य स्त्रिया या केंव्हातरी 'आई' होतात. पण 'बाई' ची 'आई' होणं ही प्रक्रिया जेवढी साधी वाटते तेवढीच ती गुंतागुंतीचीही आहे. गर्भधारणे नंतर स्त्रीमध्ये होणारा बाह्यबदल हा दृश्य असल्यामुळे मान्य करणे किंवा स्वीकारणे सोपे जाते. स्त्रीच्या भावनाविश्वातील बदलही तिच्या वागण्यामध्ये प्रतिबिंबीत होत असतो.

विज्ञानाला हे सगळे मान्य असले, तरी 'मातृत्वा'च्या भावना उत्तेजित करणारा बदल स्त्रीच्या शरीर रचनेमध्ये कुठे होतो याचा अभ्यास फारच नगण्य झाला आहे.

मेंदू हा माणसाच्या शारीरिक आणि भावनिक चलनवलनाचे नियंत्रण करतो हेही शास्त्रसिद्ध आहे. तरीही मेंदू मधल्या कुठल्या भागांमधील रचनांमध्ये मातृत्वामुळे बदल होतो याचा ठाव अजूनपर्यंत घेता येत नव्हता. पौंगडावस्था (Puberty), गर्भधारणा ते रजोनिवृत्ती ही सगळी स्त्रीमधील स्थित्यंतरं काही संप्रेरकांमुळे (Hormones) होतात हेही विज्ञानाला ठाऊक आहे. तरीही 'मातृत्वा'मुळे मेंदूमधील होणाऱ्या रचनेतील फरकाची ही क्रांतिकारक माहिती मात्र नुकत्याच प्रकाशित झालेल्या एका शोधनिबंधामुळे वैज्ञानिकांना समजली.

'मस्तिष्क' विज्ञानामध्ये संशोधन करणाऱ्या बार्सोलेना, स्पेन आणि लेडन विद्यापीठ, नेदरलँड येथील संशोधकांनी फेब्रुवारी २०१७ च्या (Vol. 20, No.2) NATURE NEUROSCIENCE या शोधपत्रिकेमध्ये Pregnancy leads to long-lasting changes in human brain Structure हा निबंध लिहून विज्ञान जगतामध्ये खळबळ उडवून दिली. या निबंधाच्या सारांशामध्ये ते लिहितात,-

"Pregnancy involves radical hormone surges and biological adaptions. However, the effects of pregnancy on the human brain are virtually unknown. Here we show, using a prospective (Pre-Post pregnancy) study involving first-time mothers and fathers and nulliporous control groups, that pregnancy renders substantial changes in brain structure, primarily reductions in gray matter (GM) volume in regions subserving social cognition. The changes were seletive for the mothers and highly consistent, correctly classfying all women as having undergone pregnancy or not in between sessions. Interestingly, the volume reductions showed a substantial overlap with brain regions responding to the women's babies postpartum. Furthermore, the GM volume changes of pregnancy predicted measures of postpartum material attachment

suggestive of an adaptive process serving the transition into motherhood. Another followup session showed that the GM reductions endured for at least 2 years post-pregnancy. Our data provide the first evidence that pregnancy confers long-lasting changes in a woman's brain."

या निष्कर्षाप्रत येण्याकरता संशोधकांनी, प्रथमच गर्भधारणा झालेल्या अनेक स्त्रिया, त्यांचे जोडीदार, त्याच वयोगटातील इतर पुरुष, आणि कधीही गर्भधारणा न झालेल्या स्त्रिया यांच्या मेंदूचा तुलनात्मक अभ्यास केला. सर्व कसोट्या किंवा निकषावर यशस्वी झालेल्या २५ प्रथमच गर्भधारणा झालेल्या या स्त्रियांच्या मेंदूमधील बदलाचा सतत २ वर्षे अभ्यास करण्यात आला. प्रथम गर्भधारणा झालेल्या या स्त्रियांमधील बदल हा २ वर्षांच्या कालावधी पर्यंत तरी तसाच होता. प्रत्यक्ष प्रसुती आणि बाळाच्या संगोपनाची पहिली दोन वर्षे आईच्या दृष्टींनी फारच महत्त्वाची असतात. बाळाचे संगोपन करताना आपल्या दैनंदिन वागण्याच्या पद्धती आणि वेळापत्रकामध्ये आईला बरेच बदल करायला लागतात. हे बदल व्यावहारिक, सामाजिक आणि भावनिक या सगळ्या स्तरांवर असतात. यातूनच तिच्या मातृत्वाचा विकास होत असतो.

या संशोधनांनी हे दाखवून दिले की, प्रसूतीनंतर आईच्या मेंदूमधील gray matter (GM) च्या आकारमानामध्ये काही प्रमाणात घट होते. मेंदूच्या Cortex मधील 'सामाजिक बोधाचे' (social cognition) जे क्षेत्र असते त्यामध्ये हा बदल प्रामुख्याने दिसून येतो. हे निरीक्षण आणि त्यामधून  निघणारे निष्कर्ष हे 'मातृत्व' या संकल्पनेच्या पारंपरिक समजुतीला पुष्टी देणारे आहेत.

परंपरेनुसार गर्भधारणा अपेक्षित असलेल्या स्त्रीच्या मानसिकतेपासून, खाण्यापिण्याच्या सवयींची कसोशीने काळजी घेतली जाते. गर्भधारणेकरता आई आणि वडील दोघेही जबाबदार असतात. गर्भधारणा झाल्यावर मात्र गर्भाची वाढ ही आईच्या शरीरातच होत असते. वडील तसेच आईच्या मद्यपान किंवा धूम्रपानाचा गर्भाच्या वाढीवर किती दुष्परिणाम होतात हे विज्ञानाने नुकतेच सप्रमाण दाखवून दिले आहे (Epigentics). आपल्याला आयुष्यात पुढे होणाऱ्या मधुमेह, हृदयरोगापासून कर्करोगाची मुहूर्तमेढ गर्भातच झालेली असते हेही विज्ञानाने आता सप्रमाण सिद्ध केले आहे. साहजिकच आईवडिलांच्या जनुकांपासून गर्भ वाढीच्या वेळी आईचे खाणे-पिणे, ते तिला सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या पर्यावरणापर्यंत यांचा संबंध आहे. सुज्ञ आई या सगळ्याची काळजी घेतच असते. गर्भधारणेच्या

कालावधीतील आईच्या मनावरील ताबा आणि भावनांच्या कल्लोळांचाही यामध्ये समावेश आहे.

वर निर्देश केलेल्या संशोधनात गर्भधारणा झालेल्या स्त्रीच्या मेंदूमध्ये 'सामाजिक बोधाच्या' (social cognition) क्षेत्रातील दाखवलेले बदल म्हणूनच महत्त्वाचे आहेत,-

On the basis of our results, we may speculate that the female brain undergoes a further maturation or specialization of the neural network subserving social cognition during pregnancy. Very few studies have investigated the effects of pregnancy on measures of social congnition, but there are preliminary indications of facilitated processing of social information in pregnant woman, including enhanced emotion and face recognation.

आई आणि बाळाचे हे नाते इतके दृढ असते की, आईची आपल्या मुलांसंबंधात असलेली विशेष 'ओढ' आणि 'ममत्व' याची प्रचीती आपल्या सगळ्यांना केव्हांना केव्हातरी आलेलीच असते. प्राण्यांमध्येही ती आढळून येते.

या प्रयोगांमध्ये आईला आपल्या मुलाचे आणि दुसऱ्या मुलाचे फोटो दाखवण्यात आले. आई जेव्हा आपल्या मुलाचा फोटो बघते तेव्हा Gray Matter कमी झालेल्या मेंदूच्या क्षेत्रामध्ये बदल दिसून येतो. दुसऱ्याच्या मुलाचा फोटो बघताना हा बदल दिसून येत नाही. Science संशोधन पत्रिकेत या प्रयोगाचे वर्णन खालील प्रमाणे दिले आहे.

The scientist also used MRI (Magnetic Resonance Imaging) scans to watch the women's brains work in real time, as then looked at photos of their own infants and of other babies. Several of brain areas that had lost gray matter during pregnancy responded with the strongest neural activity to their own babies as opposed to the photos of other infants.

महत्त्वाचे संशोधन निबंध हे संशोधनपत्रिकांच्या संकेत स्थळावरती छापण्यापूर्वी बऱ्याच आधी प्रकाशित होतात. आपण चर्चा करत असलेला शोध-निबंध Nature Neuroscience च्या संकेत स्थळावर १९ डिसेंबर २०१६लाच प्रकाशित झाला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे BBC, CNN, New York Times, Guardian, Scientific American या सगळ्या दैनिक आणि नियतकालिकांच्या संकेत स्थळांवरती या क्रांतिकारक संशोधनावर टिप्पण्या लिहून त्याची नोंद घेण्यात आली. गुन्हेगारी,

बलात्कार आणि राजकीय बकवास याचा २४ तास मारा करणाऱ्या आपल्या माध्यमांनी मात्र या संशोधनाची अजूनही दखल घेतलेली दिसत नाही. अर्थातच The Hindu हे दैनिक याला अपवाद आहे.

आईचे तिच्या अपत्याशी असलेले भावनिक नाते हे जन्माआधी गर्भाशयातच प्रस्थापित झालेले असते. ६ व्या, ७ व्या महिन्यापर्यंत गर्भाच्या बहुतेक सर्व अवयवांची वाढ झालेली असते. या सुमारास पोटातील गर्भ हा पापण्यांची जलदगतीने उघडझाप करतो, जांभई देतो, हसतो, एवढेच काय पण आईचा आवाजही तो ओळखतो आणि त्याला प्रतिसाद द्यायला लागतो! कोलंबिया विद्यापीठातील संशोधकांनी या संदर्भातील केलेले संशोधन बोलके आहे :

"Around the seventh and eighth month, a fetus's heart rate slows down slightly whenever his mother is speaking, indicating that mom's voice has a calming effect.

By the time they're born, babies can actually recognize their mother's voice. In one study, doctors gave every day old infants pacifiers that were connected to tape recorders. Depending on the babies sucking patterns, the pacifiers either turned on a tape of their mother's voice or that of an unfamiliar woman's voice. The amazing result : "Within 10 to 20 minutes, the babies learned to adjust their sucking rate on the pacifier to turn on their own mother's voice."

परंपरेमध्ये गर्भधारणेच्या संधिकाळापासून डोहाळ जेवणापर्यंत स्त्रीकरता केल्या गेलेल्या काव्यांचा उद्देश आणि परिणाम हाच असणार.

माधव ज्युलीयन, साने गुरुजी किंवा विनोबा भावे हे कुणीही वैज्ञानिक नव्हते. स्त्री संबंधातील त्यांचे विचार उदारमतवादी होते. जीवनातील वास्तव आणि अनुभव स्वीकारताना त्यांच्या संवेदना बधीर झाल्या नव्हत्या. म्हणूनच चिरकाल टिकणारे सृजनशील साहित्य आणि काव्य ते निर्माण करू शकले. जगामध्ये सगळेच पुरुष किंवा सगळ्याच स्त्रिया असत्या तर जगाची निर्मितीच थांबली असती. मानव जातीच्या अस्तित्वाकरता 'पुरुष' आणि 'स्त्री' हे दोन्हीही घटक तेवढेच महत्त्वाचे आहेत. त्यांची आपापली स्वतंत्र व्यक्तिमत्त्वे व वैशिष्ट्ये आहेत. हीच वैशिष्ट्ये त्यांच्यामध्ये भिन्नताही निर्माण करतात. 'स्वातंत्र्य' आणि 'मुक्ती'च्या बहकलेल्या संकल्पनांनी या वैशिष्ट्यांचे सपाटीकरण चालू केले.

औद्योगिक क्रांतीनंतर 'कारखानदारी' आणि 'उत्पादन' या प्रगती मोजण्याच्या फुटपट्ट्या होऊन गेल्या. उत्पादित वस्तूंची विक्री आणि त्यात सतत वाढ हाच व्यक्ती, समाज आणि देशाच्या यशाचा महत्त्वाचा भाग झाला. अर्थातच या वाढीकरता मनुष्यबळाचा वापर अपरिहार्य होता. पुरुषाप्रमाणेच स्त्रीलाही या पुरवठ्यात सामील करून औद्योगिक क्रांतीची ही गरज आज आपण मोठ्या प्रमाणावर भागवली आहे.

स्त्रीच्या कौटुंबिक आणि सामाजिक व्यवस्थेच्या परिवर्तनाला येथेच सुरुवात झाली. केसापासून वेषापर्यंत स्त्रीला 'पुरुषा'र्थी करण्याची चळवळ येथूनच चालू झाली. 'आधुनिक', 'पुरोगामी', 'व्यवसाय सुलभ' अशा अनेक 'मुक्त' वेष्टनाखाली स्त्रीमधील 'स्त्रीत्व'च 'लुप्त' करण्यात आज आपण बरीच प्रगती केली आहे!

औद्योगिक क्षेत्रांमध्ये क्रांती करणाऱ्या पाश्चात्त्य संस्कृत्यांमध्ये कुटुंबसंस्था आणि त्यातून निर्माण होणाऱ्या नातेसंबंधांची मोडतोड झाली. एवढेच नाही तर, त्या सगळ्या संस्थाच मोडीत निघाल्या. अशा समाजनिर्मिती करता पुरुष आणि स्त्रियांच्या खाण्यापिण्यापासून सांस्कृतिक जीवनशैलीमध्ये बदल घडत गेले. यात सर्वांत मोठा आघात झाला तो स्त्रियांच्या सृजनक्षमतेमध्ये. समाज जास्तीतजास्त आत्मकेंद्रित व्हायला लागला. आईच्या मातृत्वाशी निगडित संवेदनांना बधिर करून आईलाच 'रिटायर्ड' करायला आपण सुरुवात केली. नाटक, सिनेमा, कला, साहित्य ही सगळी माध्यमं आज याकरता सक्रिय आहेत. स्त्रीला 'चूल' आणि 'मूल' यापासून मुक्त करणे म्हणजेच 'स्वातंत्र्य' अशा संकल्पनांचा उगम या जीवनशैलीमधूनच झाला. याही पुढे जाऊन पुरुषानेच स्त्रीच्या पायात अडकवलेल्या या 'बेड्या' आहेत असले जावई शोधही लावले गेले.

स्त्रीला खरंच तिच्या मुलापासून मुक्त करता येईल का? स्त्रीच्या नैसर्गिक सृजनक्षमतेच्या वैशिष्ट्याचा आदर हाच तिच्या स्वातंत्र्याचा खरा सन्मान नाही का?

आजचे आपले विज्ञान याशिवाय वेगळे काय सांगते?

**– मार्च २०१७**

❖❖❖

# वसाहतवाद जुना आणि नवा

१६ व्या शतकापासून सुरू झालेला वसाहतवाद आणि २० व्या शतकातील दोन महायुद्धे यांनी जगाच्या इतिहास आणि भूगोलामध्ये आमूलाग्र बदल केले. या घटनांचे केंद्रबिंदू युरोपमध्ये म्हणजे ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनी या राष्ट्रांमध्ये होते. १२ व्या शतकात सुरू झालेल्या प्रबोधन युगाची (Renaissance) पार्श्वभूमी या घटनांच्या मागे होती. १५ व्या १६ व्या शतकाच्या आत-बाहेर झालेली वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांती हे या प्रबोधन युगाचेच फलीत होते. या बदलांचा सर्वात मोठा परिणाम हा युरोपमधील धर्मसंकल्पनेपासून समाज संस्थांवरती मोठ्या प्रमाणात झाला.

निसर्गरचना, व्यक्ती आणि समाज रचनांना विज्ञानामधील प्रगतीमुळे नवीन उत्तरे मिळू लागली, औद्योगिक क्रांतीमुळे माणसांच्या गरजा बदलू लागल्या, एवढेच नाही तर त्यांच्या पूर्तीकरता बाजार आणि नवीन अर्थकारणही निर्माण झाले. युरोपमधील या सगळ्या बदलांचे संचित घेऊन १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपपासून वेगळा, पण त्या नवीन संस्कृतीची पाठराखण करणारा 'अमेरिका' हा खंडप्राय देश उदयाला

आला. विज्ञान, तंत्रज्ञान, आणि अर्थकारणामध्ये आज हा देश जगामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. प्रचंड कष्ट, ज्ञान, कौशल्य, दर्जाचा आग्रह आणि आदर, तसेच नागरिकशास्त्राच्या नियमांचे काटेकोर पालन हे त्यांच्या यशाचे गमक आहे. त्यांच्या या गुणांकडे कटाक्षाने दुर्लक्ष करून त्यांच्या चंगळवादी, स्वैराचारी संस्कृतीचा स्वीकार मात्र आपण आंधळेपणाने करत आहोत. सांस्कृतिक वसाहतवादाचे इतके चांगले उदाहरण दुसरे मिळणार नाही.

वैज्ञानिक क्रांतीमुळे लागणारे नवीन नवीन शोध, त्यावर आधारित औद्योगिकीकरण आणि नवीन बाजारपेठांची निर्मिती यामुळे परंपरागत अर्थव्यवहाराची जागा नवीन अर्थव्यवहारांनी घेतली. यातूनच 'साम्यवाद', त्याचेच भावंड 'समाजवाद' आणि 'पुंजीवाद' निर्माण झाले. 'राजेशाही'ला पर्याय म्हणून 'लोकशाही'चा उदय झाला. वसाहतवादाला पोषक वातावरणही याचवेळी निर्माण व्हायला लागले.

भारतापासून आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेमध्ये युरोपियन वसाहतवाद पोहोचला आणि त्याचबरोबर त्यांची संस्कृती, समाजव्यवस्था, अर्थकारण, राजकारण आणि त्याला पूरक अशा सगळ्या संस्थांचे संक्रमण या वसाहतींमध्ये झालं.

युरोपमध्ये मध्ययुगात, म्हणजे ५ व्या ते १५ व्या शतकापर्यंत सांस्कृतिक अंधारयुग होते असे समजले जाते. याच काळामध्ये भारत, चीन आणि पश्चिम आशियातील सिरिया, इराक आणि इराणमध्ये विज्ञान, साहित्य, संस्कृती, स्थापत्य, कला, व्यापार यांचा भरभराटीचा काळ होता. पश्चिम आशियातील राष्ट्रांमधील वैद्यक, ग्रहगणित आणि गणिताच्या अनेक फारशी आणि अरेबियन भाषांमधील ग्रंथांचे १२ व्या १३ व्या शतकात लॅटीनमध्ये भाषांतर होऊन युरोपमधील प्रबोधनयुगाला सुरुवात झाली होती. दुर्दैवानं वसाहतवाद्यांनी लिहिलेल्या विज्ञानाच्या इतिहासामध्ये या संदर्भाचा पुरेसा उल्लेख केलेला नसतो/नाही.

भारतापुरते बोलायचे तर बौद्धिक आणि सांस्कृतिक संपदेच्या विकासाची सुरुवात ख्रिस्तपूर्व ५ व्या शतकात झालेल्या पाणिनीपासून करायला लागते. त्यापुढे झालेल्या कौटिल्याचे अर्थशास्त्र, छंदावरील पिंगलांचा ग्रंथ, चरक, शुश्रुतांचे वैद्यकशास्त्रावरील ग्रंथ, वात्सायनाचे कामशास्त्र, १२ व्या शतकातील भास्कराचार्य ते १५ व्या शतकातील गणेश दैवज्ञांपर्यंत साहित्य, संस्कृती, स्थापत्याच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रचंड प्रगती झालेली दिसून येते. वैद्यक आणि गणिताचे अनेक संस्कृत ग्रंथ ५ व्या ते १२ व्या शतकापर्यंत पर्शियन आणि अरेबियन भाषांमध्ये भाषांतरीत

झाले. 'शून्य' आणि अंकांची ओळख भारताने जगाला करून दिली हे आज सर्वमान्य आहे. सर्जनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये भारताने आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान या काळातच निर्माण केले होते.

भारताची समाजरचना ही त्याच्या भौतिक व आधिभौतिक समजुती आणि तत्त्वज्ञानाच्या विकासाच्या पार्श्वभूमीवर रचली गेली होती. समाजातल्या प्रत्येक समाज घटकाला आणि त्याच्या कौशल्याला या रचनेमध्ये महत्त्वाचे स्थान होते. भारतीय संस्कृतीमधील 'राजन' ही संकल्पना आणि युरोपमधील 'राजा' ही संकल्पना संपूर्णतः भिन्न आहेत. ख्रिस्तपूर्व ३ ऱ्या शतकातील कौटिल्याचे अर्थशास्त्र हा 'राजन' या व्यक्तीची नाही, तर त्या संस्थेच्या जबाबदाऱ्यांची व्यवस्था मांडणारा ग्रंथ आहे. यामध्ये कुठल्याही प्रकारची एकाधिकारशाही अपेक्षित नाही. पूर्वानुभवावर आधारित आणि त्यांचा आदर करीत, भारताच्या सामाजिक नीतीमूल्यांची निर्मिती झाली. 'स्वातंत्र्य' आणि 'जबाबदाऱ्या' याची सुंदर गुंफण यामध्ये दिसून येते.

युरोप आणि भारतीयांचा सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहास समजावून घेतल्याशिवाय आजच्या आपल्या 'सामाजिक' आणि 'राजकीय' प्रश्नांची उकल होणे कठीण आहे.

ब्रिटिश वसाहतवादी जेंव्हा भारतात आले तेव्हा त्यांना भाषेपासून सामाजिक, सांस्कृतिक व्यवस्थेतील वेगळेपणाचा साक्षात्कार झाला. यातून त्यांनी या सगळ्या संस्थांचा, रचनांचा अभ्यास चालू केला. या अभ्यासामध्ये अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांबरोबर धर्मप्रसारकांचाही समावेश होता. कितीही तटस्थता आणण्याचा प्रयत्न केला, तरी श्रेष्ठत्वाच्या भावनेतूनच हा अभ्यास आणि तो इतिहास लिहिला गेला. १९७८ साली एडवर्ड सैद (Edward Sait) यांनी Orientalism हा ग्रंथ लिहून या इतिहासातील उणिवा आणि धोके विस्ताराने दाखवून दिले आहेत.

१६ व्या शतकात होणाऱ्या औद्योगिकीकरणामुळे कुशल कारागिरीची जागा यांत्रिकीकरणाने घेतली. १६ व्या शतकापर्यंत भारत हा अनेक वस्तूंची निर्यात करत होता. भारतीय अर्थव्यवस्था त्यामुळे सशक्त होती. १६ व्या शतकात सुरू झालेल्या वसाहतवादामुळे १९ व्या शतकापर्यंत खेड्यांचे कुटीर उद्योग आणि त्यावर आधारलेली अर्थव्यवस्था मोडीत निघाली. शतकानुशतके नैपुण्यांनी मिळवलेला व्यवसाय नष्ट झाला. आधुनिक औद्योगिकीकरणावर आधारित नवीन शहरीकरण चालू झाले. आधुनिकीकरणाच्या नावाखाली १९ व्या शतकामध्ये महसुलापासून शिक्षणापर्यंत

नवीन व्यवस्थांचे रोपण भारतामध्ये करण्यात आले. युरोपमधला विकास हा 'अंधारयुगा'कडून 'विज्ञानयुगा'कडे होता. तर १६ व्या शतकानंतर भारताचा प्रवास 'विज्ञानयुगा'कडून 'अंधारयुगा'कडे चालू झाला. सर्जनाचे मूळ स्रोत बंद झाले. साहजिकच यामुळे निर्माण झालेली पोकळी ही विज्ञानच नाही तर पाश्चात्त्य सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांनी घेतली.

प्रत्येक समाज हा बदलतच असतो, हा बदल जेव्हा त्याच्या परंपरेतून येतो तेव्हा तो त्या परंपरेचाच एक भाग असतो. पण हा बदल जेव्हा बाहेरून लादलेला असतो तेव्हा तो मूळ परंपरेला संदर्भहीन करतो. साहजिकच बदलाचे समर्थन करण्याकरता परंपरेला दूषणे देणे अपरिहार्य होते. भारतीय सांस्कृतिक आणि सामाजिक बदल हे याचे अत्यंत चांगले उदाहरण आहे. भौगोलिक वसाहतवाद १९४७ साली संपला असला तरी सांस्कृतिक वसाहतवाद हा आजही फोफावत आहे. प्रत्येक व्यवस्थेमध्ये कालांतराने अनेक दुर्व्यवस्था येत असतात. त्या दुर्व्यवस्था समजावून घेऊन त्यांना दूर करणे हे सुधारकाचे काम असते. कपाळावर एखादं गळू आले तर त्याच्या पेशी आणि रक्तप्रवाह या कपाळातूनच निर्माण झालेल्या असतात. प्लास्टिक सर्जन हा गळू कपाळाला इजा होऊ न देता ते कापून काढतो. कपाळाला इजा न करणे हे त्या शस्त्रक्रियेच्या कौशल्यावर अवलंबून असते. सुधारणा म्हणजे मोडतोड नसते. आपल्याकडच्या अनेक सुधारकांनी परंपरेचा मूळ विचारच उद्ध्वस्त केला.

आपल्या परंपरेमध्ये 'स्वातंत्र्या'पासून 'पर्यावरणा'पर्यंत सगळ्या गोष्टींचा आदर केला गेला आहे. 'स्वातंत्र्य' आणि 'स्वैराचार' यातील सीमारेषा ही अस्पष्ट असते. सरकारी व्यवस्था असो किंवा कुटुंब असो; 'अनिर्बंध', बेजबाबदार स्वातंत्र्य हे अशा संस्थांचे अस्तित्वच धोक्यात आणते. नुकतीच सर्वोच्च न्यायालयाने 'खाजगीपणाचा अधिकार निरकुंश नाही' (Right to privacy can never be an absolute entitlement) ही केलेली टिप्पणी म्हणूनच स्वागतार्ह आहे. भारतामध्ये मंदिरं, शिल्प असो किंवा वात्सायनाचे कामशास्त्र असो, यांना केव्हांही विरोध झाला नाही. 'श्रृंगार' आणि बिभत्सपणा' यातला फरक आपली परंपरा चांगली जाणून होती.

'स्वातंत्र्य', 'अधिकार' आणि 'लोकशाही' हे आज परवलीचे शब्द झाले आहेत. आजकालची युद्धे ही परंपरागत शस्त्रांपेक्षा अशा आधुनिक शस्त्रांनी

लढली जाऊ लागलेली दिसतात. 'प्रबुद्धां'ची लोकशाही ही निरपेक्ष नेतृत्व निर्माण करून, लोकानुनयाची धोरणे न राबवता व्यापक सामाजिक हित आणि न्यायावर आधारित विश्वासार्ह व्यवस्था आणू शकते. फक्त आकडेशास्त्रावर आधारित लोकशाही लाचार, गुंड आणि पुंडांची एकाधिकारशाही निर्माण करते. भारतामधील आजची लोकशाही आकडेशास्त्रावर आधारित आहे. या लोकशाहीने एका नवीन राजकीय संस्कृतीला जन्म दिला आहे. अखिल भारतीय असोत किंवा प्रादेशिक; सर्वच राजकीय पक्षांमध्ये याकरता एकवाक्यता आहे. एनकेनप्रकारे सत्ता मिळविणे एवढंच त्यांचे ध्येय आहे.

लोकसभेपासून ग्रामपंचायतीपर्यंत आपणच मोठ्या प्रमाणावर गुन्हेगार निवडून दिले आहेत. प्रत्येक राज्यात 'लालू' आणि 'जयललिता' आहेत. प्रचंड बहुमतांनी ही मंडळी निवडून आली आहेत. अशा राजकारण्यांच्या आता 'वसाहती' झाल्या आहेत. वाढत जाणारे बलात्कार, लूटमार आणि अपघात यांच्या बातम्या देण्याकरता वृत्तपत्रांना आता दर तासाला आवृत्ती काढायला लागली तर नवल वाटायला नको. या लोकशाही देशात नागरिक किती सुरक्षित आहेत हे यामुळे वेगळे सांगायला नको. तरीही अनेक गुन्हे दाखल असलेले आमचे हे 'नेते', पुढे व मागे गाड्यांची आणि पोलिसांची फौज घेऊन संचार करत असतात. वर सांगितलेल्या सर्व नव आयुधांची मदत घेण्याकरता निष्णात वकिलांचे ताफेही यांच्या सेवेत हजर असतात. चुकूनमाकून यांना तुरुंगात जायला लागले, तर आपण निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींचा तुरुंगवास कसा असतो हे सुद्धा आपण बघत आहोतच. उर्मट, अरेरावी, विवेकशून्य राजकीय नेतृत्त्वाच्या High Decibel गोंगाटापुढे आकडेशास्त्रावर आधारित लोकशाहीने लोटांगण घातलेले दिसते. आपला धर्म, संस्कृती म्हणजे काय, एवढंच नाही तर आपल्या सणांच्या (आवाजी) परंपरा काय आहेत? हेही यांनीच आपल्याला सांगायचे आणि कोर्टाचे नाही तर यांचे आपण निमूटपणे, आदरपूर्वक ऐकायचे!!

विमानतळ आणि टोलनाक्यावरील लोकप्रतिनिधींची अरेरावी बघायला लागणे, एवढेच नाहीतर त्यांचे हास्यास्पद समर्थनही ऐकायला लागणे ही लोकशाहीची 'क्रूर' थट्टा आहे. जागतिक स्तरावरील दर्जांच्या निर्देशांकांमध्ये भारतीय विद्यापीठे ही तळापासून १ - २ बोटेच वर-खाली आहेत. साहजिकच, म्हणूनच देशामध्ये मार्कांचा महापूर आणि निकालांचा 'निकाल' लागलेला आपण बघतो. विद्यापीठ कायद्यांमध्ये क्रांतीकारक बदल आपण केला, तो म्हणजे विद्यापीठामध्ये पुन्हा निवडणुका आणल्या!! शालेय शिक्षणात जातीवर आधारित २५% आरक्षण आणि

८ वी पर्यंत नापास न करण्याच्या धोरणाची कटू फळे पुढील अनेक पिढ्यांना भोगायला लागणार आहेत.

शिक्षणाचा मूळस्रोत हा ग्रंथालय आणि संग्रहालय असतो. आज त्यांची आपण केलेली दुर्दशा बोलकी आहे. वसाहतवाद्यांनी आपले प्राचीन ग्रंथ आणि वास्तूंची जोपासना करण्याकरता जेवढी ग्रंथालयं आणि संग्रहालयं काढली, त्याच्या निम्यानीही आपण स्वातंत्र्यानंतरच्या ७० वर्षांत निर्माण केली नाहीत. आज त्यांची आपण केलेली दुर्दशा बोलकी आहे. आपली वाटचाल आहे ती हजारो कोटींची उधळण करून उंच उंच पुतळे आणि स्मारके उभारण्यामधे आणि इतिहासाची पाने फाडण्यात. पुतळ्यासारखा ‘निस्तेज’ आणि ‘निःस्तब्ध’ झालेला समाजच फक्त हे सहन करू शकतो. बुटक्यांना उंच चबुतऱ्यावर उभे केले म्हणजे त्यांची उंची वाढत नाही!

१९४७ च्या आधीच्या वसाहतवाद्यांनीही आपल्या परंपरेचे जितके बाभाडे काढले नसतील इतके आज आपण आपल्या लोकशाहीमध्ये काढत आहोत. फरक एवढाच आहे की, पूर्वीचे वसाहतवादी बाहेरून आले होते. त्यांना प्रबोधन युगाची परंपरातरी होती. आजचे वसाहतवादी हे आपलेच सगेसोयरे आहेत. मतांच्या राजकारणात झिंगून आंधळे झालेले आणि प्रबोधनापासून शेकडो मैल दूर.

‘यथा प्रजा तथा राजा’ अशी एक जुनी म्हण आहे. घराणेशाही जगवणे किंवा गुन्हेगाराला निवडून देणे, हा लोकशाहीत जोपर्यंत गुन्हा ठरत नाही तोपर्यंत हा ‘देशी’ वसाहतवाद संपुष्टात येणे शक्य नाही.

आरशात दिसते ती आपलीच प्रतिमा असते. दोष आरशाला कसा देता येईल?

**– जुलै २०१७**

❖❖❖

# लूटमार, वसाहतवादी (स्वातंत्र्यपूर्व), आणि लोकशाहीवादी (स्वातंत्र्यानंतर)

जुलै २०१५ ला शशी थरूर यांनी ऑक्सफर्डमधील ऑक्सफर्ड युनियन सोसायटीच्या एका चर्चासत्रामध्ये केलेल्या भाषणाने सगळी माध्यमं ढवळून निघाली. देशातील आणि परदेशातील सगळ्या वृत्तपत्रांनीही त्यांच्या भाषणाची दखल घेतली. ब्रिटिश साम्राज्यवादाचे फायदे आणि तोटे याविषयाशी निगडित असलेल्या या चर्चासत्रामध्ये शशी थरूर यांनी भारताचे उदाहरण घेऊन या साम्राज्यवादाचे वाभाडे काढले.

आपल्या १६ मिनिटांच्या भाषणामध्ये त्यांनी अनेक उदाहरणे देऊन साम्राज्यवादामुळे भारताच्या झालेल्या दुर्दशेचे चित्र उभे केले. १६०० साली व्यापाराकरता म्हणून 'इस्ट इंडिया कंपनी' भारतात आली. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. १६०० साली जागतिक व्यापार आणि त्याच्या अनुषंगाने असलेल्या अर्थव्यवहारामध्ये भारताचा हिस्सा २३% होता. १९४७ साली जेंव्हा इंग्रज आपला देश सोडून गेले त्यावेळी भारताचा हिस्सा ४% हून खाली आला. या उदाहरणांनी शशी थरूर यांनी आपल्या भाषणाला

सुरुवात केली होती. भारतामधील भरभराटीच्या कापड उद्योगाला आलेली अधोगती, आणि दुष्काळांची उदाहरणे देऊन, याकरता ब्रिटिशांची धोरणे कशी जबाबदार होती हेही त्यांनी दाखवून दिले.

८ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंत भारत हा मोगलांच्या साम्राज्यवादाविरुद्ध लढतच होता. या आक्रमकांच्या जुलूम आणि लुटारूपणामुळे कला, उत्पादकता आणि व्यापार-व्यवस्था विस्कळीत होत गेली. भारताची वैशिष्ट्यपूर्ण समाजव्यवस्था अस्थिर होऊन, सर्व क्षेत्रांमधील नेतृत्व कमकुवत व्हायला लागले. शुद्ध अस्तित्वाकरता लढाया चालू झाल्या. तत्त्वतः इंग्रजांनी भारताची सत्ता ही मोगलांकडूनच घेतली. सत्ता याचा अर्थ नुसती सैनिकी हुकूमशाही इतकाच मर्यादित नसतो. समाजाचे अर्थकारण हे त्या समाजाच्या स्थैर्याशी निगडित असते. असा स्थीर समाजच नुसत्या वस्तुंचेच उत्पादन आणि व्यापार नाही, तर साहित्यापासून कलेपर्यंत सगळ्याच क्षेत्रांमध्ये विकास पावत असतो.

अखंड भारतामध्ये ९ व्या, १०व्या शतकापासून मध्यआशिया मधील टोळीवाल्यांचे हल्ले चालू झाले. तेथूनच भारताच्या समाजव्यवस्थेला आणि व्यापाराला उतरती कळा लागू लागली.

८६ वर्षांपूर्वी इंग्लंडमध्येच ऑक्टोबर १९३१ ला लंडनच्या चॅथम हाऊसमध्ये (Chatham House) महात्मा गांधी यांनी एक भाषण दिले होते. या भाषणामध्ये गांधीजींनी, 'ब्रिटिशांच्या धोरणांमुळे भारताची परंपरागत शिक्षणपद्धती उद्ध्वस्त झाली', असे विधान केले. ते भाषण हे, 'ब्रिटिशांमुळे भारत सुशिक्षित झाला, सुसंस्कृत झाला' या धर्मप्रसारक आणि ब्रिटिश सरकारच्या प्रचाराला छेद देणारे होते. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर,-

"I say without fear of my figures being challenged successfully, that today India is more illiterate than it was fifty or a hundred years ago, and so in Burma, because the British administators, when they came to India, instead of taking hold of things as they were, began to root them out. They scratched the soil and began to look at the root, and left the root like that, and the beautiful tree perished."

गांधीजींच्या या भाषणाला इंग्लंडमधील बरेच उच्चभ्रू हजर होते. इंग्रजांच्या भारतातील कारभारामुळे, भारतासारख्या एका प्राचीन संस्कृती असलेल्या देशाचे दिवाळे वाजत असल्याची माहिती, इंग्लंडमधील काही उदारमतवादी आणि भारतात

काम केलेले काही अधिकारी लिहित होते. शिक्षणाच्या संदर्भातील गांधीजींच्या या विधानांनी चांगलीच खळबळ माजवून दिली. एकेकाळचे डाक्का विद्यापीठाचे उपकुलगुरू सर फिलिप्स हारटॉग (Sir Philip Hartog) हे या भाषणाला उपस्थित होते. मॅकॉलेच्या शिक्षणपद्धतीचे ते पुरस्कर्तेच होते. त्यांनी गांधीजींना त्यांच्या या विधानाबद्दल, 'एकतर साधार पटवून द्या, नाहीतर माघार घेऊन माफी मागा', असे आव्हान दिले. गांधीजींचा सगळा वेळ हा स्वातंत्र्य चळवळीत जात असल्यामुळे त्यांनी त्यांचे सहकारी दौलतराम गुप्ता आणि के. टी. शहा यांच्यावर हे काम सोपवले. मॅकॉलेपूर्व भारतातील शिक्षणपद्धतीचा अभ्यास अनेक धर्मप्रसारक आणि सरकारी अधिकाऱ्यांनी तपशीलवार लिहून ठेवला होता. या माहितीवर आधारित या दोघांनीही अनेक लेख लिहून गांधीजींच्या विधानाला असलेले आधार सादर केले. अर्थातच हारटॉग यांचे समाधान होणे शक्य नव्हते. लंडन विद्यापीठाच्या Institute of Education मध्ये इंग्रजांची बाजू तीन भाषणे देऊन त्यांनी मांडली. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसनी (OUP) १९३९ साली 'Some Aspects of Indian Education Past and Present' या शीर्षकाखाली ती प्रकाशित केली. दुर्दैवानी, 'भारत हा साक्षरच नाही तर सुसंस्कृत होता, खेड्यापाड्यांमधून जनतेला शिक्षण मिळत होते', या विषयी पुरेशी जागृती आजही आपल्या समाजामध्ये नाही. १९८३ साली श्री. धरपाल यांनी इंग्रजानीच लिहिलेल्या सगळ्या तपशीलांचे संकलन करून 'The Beautiful Tree' हे पुस्तक लिहिले आहे. इतिहास किंवा संस्कृतीच्या अभ्यासकांनीच नाही, तर प्रत्येक भारतीयांनी हे पुस्तक वाचणे आज आवश्यक आहे.

बरोबर १५० वर्षांपूर्वी म्हणजे २ मे १८६७ ला दादाभाई नौरोजींनी लंडन येथील East Indian Association यांनी आयोजित केलेल्या सभेमध्ये England's Duties to Indian या शीर्षकाखाली एक भाषण केले. आपल्या भाषणात दादाभाई म्हणतात,–

"More than 20 year earlier a small band of Hindu Students and thoughtful gentlemen used to meet secretly to discuss the effects of British rule upon India. The home charges and the transfer of capital from India to England in various shapes, and the exclusion of the children of the country from any share or voice in the administration of their own country, formed the chief burden of their complaint."

दादाभाईंच्या प्रसिद्ध 'आर्थिक शोषण' (Drain Theory) या सिद्धान्ताची बीजं या भाषणात सापडतात. १८७६ साली त्यांनी आपल्या या सिद्धान्तावर

विस्तृत भाष्य करणारे पुस्तक 'Poverty and Un-British Rule in India' प्रकाशित केले.

साम्राज्यवादापासून भारताला मुक्त करायचे असेल तर भारत 'स्वतंत्र' होणे आवश्यक आहे, या विचारातून संपूर्ण भारतीय स्वातंत्र्याची चळवळ ही १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात उभी राहिली. दादाभाईंचे पुस्तक हे त्या चळवळीचे एक स्फूर्तीस्थान होते. २००२ साली बिपिनचंद्र यांनी आपल्या "Essays on Indian Nationalism" या पुस्तकामध्ये याचा तपशीलवार आढावा घेतला आहे.

१६०० ला इस्ट इंडिया कंपनी भारतात व्यापाराकरता आली. त्यांनी भारतभर वखारी स्थापन केल्या. हळूहळू स्थानिक व्यवस्थेपासून महसुलापर्यंत या कंपनीचे अधिकार प्रस्थापित व्हायला लागले. १७५७ साली प्लासीची लढाई झाली आणि बंगाल प्रांताची बहुतेक सूत्रं इस्ट इंडिया कंपनीच्या हातात गेली. याचवेळी युरोपमध्ये प्रबोधन आणि औद्योगिक क्रांती होत होती. १६०० साली असलेल्या व्यापाराचे स्वरूप संपूर्णतः बदलले होते. त्यावेळी कंपनी बोटी भरभरून भारतातले पदार्थ इंग्लंडमध्ये नेत होती. भारताला देण्यासारखे त्यावेळी इंग्लंडकडे काहीच नव्हते. भारताची आयातीपेक्षा निर्यात जास्त होती. कंपनीला त्याकरता भारतामध्ये चांदी, सोनं या स्वरूपात देणी द्यावी लागत होती. १७७२ साली लॉर्ड क्लाइव्ह यांनी House of Commons मध्ये केलेल्या भाषणांत सांगितले,-

"Silver of the West and the gold of the East have for many years been pouring into that country (Bengali) and goods only have been sent out in return".

१८५७ सालच्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धानंतर इस्ट इंडिया कंपनीचे राज्य संपून इंग्लंडच्या राणीचे राज्य चालू झाले. इस्ट इंडिया कंपनीच्या वाढत्या व्यापारामुळे आणि महसूलातील हस्तक्षेपामुळे भारताची शेती, ग्रामव्यवस्था, त्यावर आधारलेले उत्पादनाचे स्रोत आणि अर्थातच अर्थव्यवस्था विस्कळीतच नाही, तर दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर येऊन उभी राहिली. यातून निर्माण झालेली पोकळी ही इंग्रजी वस्तू आणि व्यापारातून भरून निघत होती. दादाभाईंनी हेच आर्थिक शोषण सप्रमाण दाखवून दिले होते.

Alexander Dow हा इस्ट इंडिया कंपनीत एक सैनिकी अधिकारी होता. त्याने भारतावर बरेच लिखाण करून ठेवले आहे. १७७९ साली त्याचे भारतातच

देहावसान झाले. त्यांनी या व्यापारातील आर्थिक शोषणाबद्दल लिहून ठेवले आहे. १७९० सालच्या लॉर्ड कॉर्नवॉलिस (Lord Cornwallis) यानी आपल्या टिप्पणीमध्येही आर्थिक शोषणाचे उल्लेख करून ठेवले आहेत. एडमंड बर्क (Edmund Borke) यानी १७८३ साली हाऊस ऑफ कॉमन्सला सादर केलेल्या टिपणीमध्ये नोंद केली आहे की,-

"the country has suffered what is tantamout to an annual plunder of its manufactures and its produce to the value of twelve hundred thousand pounds".

थोडक्यात; अलेक्झांडर डोव (Alexander Dow), फिलीप्स फ्रॅन्सीस (Philips Francis), जॉन शोअर (John Shore), लॉर्ड कॉर्नवॉलीस (Lord Cornwallis), पासून एडमंड बर्कपर्यंत (Edmund Burke) सगळ्यांनी १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात, इंग्रजांनी केलेल्या या आर्थिक लुटीचे तपशीलवार वर्णन हे आपले अहवाल आणि हाऊस ऑफ कॉमन्सला सादर केलेल्या टिप्पण्यांमधून सविस्तरपणे मांडले आहे. १८३८ साली आर. एम. मार्टीन (R. M. Martin) यांनी लिहिलेल्या 'The History, Antiquities, Topography and Statistics of Eastern India' या पुस्तकातही पुन्हा या लुटीचे विश्लेषणात्मक वर्णन केले आहे.

प्लासीच्या युद्धानंतर इंग्रजांचा अंमल हा बंगालमध्ये चालू झाल्याचे आपण बघितलेले आहे. इंग्रजी शिक्षण, छपाईमुळे उपलब्ध होणारी पुस्तके आणि इंग्लंडमधील हाऊस ऑफ कॉमन्समधील चर्चांची टिपणे अर्थातच कोलकोत्यामध्ये उपलब्ध होऊ लागली होती. 'संवाद प्रभाकर' या वृत्तपत्राचे संपादक ईश्वरचंद्र गुप्ता, 'सोमप्रकाश' या साप्ताहिकाचे संपादक द्वारकानाथ विद्याभूषण, बंकिमचंद्र चट्टोपाध्याय, भूदेव मुखोपाध्याय, सखाराम गणेश देऊसकर आणि खुद्द रवींद्रनाथ टागोर या बंगालमधल्या विचारवंतांनी त्यावेळी ब्रिटिशांनी केलेल्या या आर्थिक लुटीचा भरपूर समाचार आपल्या लिखाणातून घेतला आहे. १९०१ च्या सुमाराला लिहिलेले, The Economic History of India Under Early British Rule (from the rise of the British Power in 1757 to the accession of Queen Victoria in 1837) हे रमेश दत्त यांनी लिहिलेले पुस्तक हे औद्योगिकीकरण, इंग्रजांची आर्थिक धोरणं यामुळे भारताच्या झालेल्या आर्थिक शोषणावरती लिहिले गेलेले असामान्य पुस्तक आहे. १८७६ साली लिहिलेल्या दादाभाई नौरोजींनंतर, रमेश दत्त यांनी लिहिलेल्या पुस्तकामुळे भारताला स्वातंत्र्य का हवे? या विचाराला सप्रमाण पुष्टी मिळाली होती.

कोलकोत्याप्रमाणेच मुंबई-पुण्यामध्येही नवीन इंग्रजी शिक्षितांची पिढी १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात तयार होत होती. इंग्लंडमधील उदारमतवाल्यांचं लिखाण व ख्रिस्तिधर्मप्रसारकांनी हिंदूधर्मातील दाखवलेली वैगुण्यं ही प्रमाण धरून, मराठीतील या विचारवंतांची पिढी वाटचाल करत होती.

''हिंदुस्थानची प्राचीन वा सांप्रतची स्थिती वा पुढे त्याचा काय परिणाम होणार या विषयी विचार,'' असा लांबलचक शीर्षक असलेला मराठीमधील पहिला अर्थशास्त्रावरचा ग्रंथ रामकृष्ण विश्वनाथ यांनी १८४३ साली लिहिला. लोकहितवादी म्हणजे गोपाळ हरी देशमुख यांनी 'लक्ष्मीज्ञान' हा ग्रंथ १८४९ साली लिहिला. विल्यम क्लिफ्ट (William Clift) यांच्या इंग्रजी ग्रंथाचे हे भाषांतर आहे. हरी केशवजी, आणि विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी श्रीमती मर्सेट (Mrs. Mercet) यांच्या 'Conversations on Political Economy' या इंग्रजी ग्रंथाचे भाषांतर १८५४ साली 'देशव्यवहार व्यवस्था या शास्त्राची मूलतत्त्वे' या शीर्षकाखाली प्रकाशित केले. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीही जॉन स्टुअर्ट मिल (John Stuart Mill) याच्याच ग्रंथाचे भाषांतर 'अर्थशास्त्र परिभाषा' या शीर्षकाखाली केले. या सगळ्या ग्रंथांमधून इंग्रजी अंमलामुळे झालेल्या आर्थिक शोषणाची थोडीफार माहिती असली तरी, प्रामुख्याने रामकृष्ण विश्वनाथ यांचा अपवाद वगळता, ती भाषांतरीत आणि सामाजिक वैगुण्यांचा ऊहापोह आणि त्यामधून करायच्या सुधारणा यांचा ऊहापोह करणारी आहे.

डी. के. बेडेकर यांनी १९६६ मध्ये पुण्याच्या गोखले अर्थशास्त्रीय संस्थेमधून, 'चार जुने अर्थशास्त्रीय ग्रंथ' या शीर्षकाखाली हे सर्व लिखाण आपल्या टिप्पणीसकट प्रकाशित केले आहे. इंग्रजी अंमलामुळे भारतीय समाजव्यवस्थेचे झालेले नुकसान आणि आर्थिक शोषण या संदर्भातील बंगाली विचारवंतांचे लेखन जास्त भेदक आणि वस्तुस्थितीदर्शक आहे. आज या सगळ्याच विषयांवर वेगळे ग्रंथालय काढावे लागेल एवढे संशोधन साहित्य उपलब्ध आहे.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणारे गोपाळ कृष्ण गोखले, महादेव गोविंद रानडे, विष्णूशास्त्री चिपळूणकर, बाळ गंगाधर टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांच्या अर्थविषयक समाजसुधारणा आणि संपूर्ण स्वातंत्र्याच्या विचारांची बैठक ही या पूर्वसुरींच्या लिखाणांनी प्रभावित झाली होती.

आज स्वातंत्र्य मिळून आपल्याला ७० वर्षे होऊन गेली. इंग्रजांच्या वसाहतवादानी, आपल्या इंग्रज नोकरांना आवाच्यासवा  पगार, त्यांचे रहाणीमान आणि जीवनशैलीवरती बेसुमार खर्च, पोलाद, यंत्रसामुग्री आणि तंत्रज्ञानाची भरमसाठ किंमती देऊन भारतात केलेली आयात इ. माध्यमातून ही लूटमार केली होती. भारतीय रेल्वेच्या निर्मितीकरता एक किलोमीटरच्या मार्गाला इंग्लंड किंवा कॅनडामध्ये जेवढा खर्च येईल त्याच्या दुप्पट किंवा तिप्पट खर्च करून तो पैसा इंग्लंडला पाठवण्यात येत होता. भारतातील रेल्वे ही इंग्लंडमध्ये खाजगी भांडवल उभे करून बांधली गेली होती.

इंग्लंडच्या सरकारप्रमाणेच, भारतीय पगार आणि व्यापारावर गब्बर झालेले इंग्रज, इंग्लडमध्ये विलासी आणि ऐषारामाचे जीवन जगत होते. भारतामधील राजांच्या अशाच विलासी जीवनाचा त्यांच्यासमोर आदर्श होता. इंग्लंडमध्ये अशा विलासी जीवन जगणाऱ्या व्यक्तिंना 'नवाब' म्हणून संबोधण्यात येई. 'लूट' आणि 'नवाब' हे दोन शब्द इंग्रजी भाषेने भारताकडून घेतले. अर्थातच शब्दांबरोबरच त्यामागील अर्थाचेही त्यांनी तंतोतंत पालन केले.

ही 'लूट' आणि 'नवाबी'करणातून सुटका मिळवण्याकरता आपल्याला 'स्वातंत्र्य' पाहिजे होते. अर्थातच या गोष्टींच्या पुनरावृत्तीची स्वातंत्र्यानंतर अपेक्षा नव्हती. १९४७ ला आपण स्वतंत्र झालो आणि १९५० ला आपल्या घटनेच्या माध्यमातून लोकशाही प्रस्थापित झाली. आता आपला राज्यकारभार आपण आपल्या लोकप्रतिनिधींतर्फे चालवतो. सर्वात मोठी क्लेशकारक गोष्ट ही आहे की, वसाहतवाद्यांनी आर्थिक लुटमारीकरता जे स्रोत वापरले तेच स्रोत वापरून आज आपले लोकप्रतिनिधी स्वतंत्र भारतातील नागरिकांची लूट करत आहेत. निवडून आल्यावर काही वर्षांतच त्यांनी केलेली 'माया' बघून स्तंभीत व्हायला होते. ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत ही 'लूट', परंपरा अव्याहतपणे चालू आहे. यावर आधारित एक नवीन राजकीय संस्कृती निर्माण झाली आहे.

इंग्रजांना माहीत नव्हते असे अनेक नवीन 'स्रोत' स्वतंत्र भारतातील राजकीय संस्कृतीने निर्माण केले आहेत. दिल्लीपासून गल्लीपर्यंत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींमध्ये २०% ते ३०% लोकप्रतिनिधींवर अपहरण, मारामाऱ्या ते बलात्कारापर्यंत गुन्हे दाखल आहेत. यांच्याकडून आयकरापासून ते सभ्यसमाजावर असलेल्या निर्बंधांचे पालन होताना दिसत नाही. वसाहतवाद्यांना लाजवतील असे

व्यवहार यांच्याकडून होताना आज आपण अनुभवत आहोत. भारतातल्या राजकारणाची दिशा आणि दशा आज भयावह आहे. घराणेशाही आणि व्यक्ती महात्म्यानीं ती आज बरबटलेली आहे. वसाहतवाद्यांनी केलेली लूट 'ढेंगू' वाटावी असे 'नवाब' ७० वर्षांत आपण स्वतंत्र भारतात निर्माण केले आहेत.

साहजिकच स्वातंत्र्यानंतर आज ७० वर्षांनंतरही जागतिक व्यापार, अर्थव्यवहार आणि संशोधनामध्ये भारताचे योगदान अत्यल्पच आहे. बाबांची भोंदूगिरी, उत्सवांचे बकालीकरण आणि ढोल-ताशांच्या गोंगाटाच्या बाबतीत मात्र जगातला कुठलाच देश आपली बरोबरी करू शकणार नाही. चीड आणणारी गोष्ट म्हणजे या सगळ्याला असलेला राजकारण्यांचा पाठिंबा!!!

इंग्रज आज भारतातून निघून गेले असले तरी 'वसाहतवादी' मानसिकता, आणि त्यातून निर्माण होणारी 'लूट' यातून आपली सुटका अजून झालेली नाही. या लुटीपासून स्वातंत्र्य मिळवण्याकरता, आता एका नव्या स्वातंत्र्य लढ्याची उभारणी करण्याची गरज अपरिहार्य होऊन बसली आहे यात आता शंका नाही.

**– सप्टेंबर २०१७**

❖❖❖

# विविधतेतील एकता?

मुंबईच्या एल्फिन्स्टन पुलावरील दुर्घटना, नदीजोड प्रकल्पातील बोगद्यातील दुर्घटना, रस्त्यावर टँकर उलटून होणारी वायूगळती, विद्यापीठातील प्रश्नपत्रिका फुटणे, रेल्वेचे वाढत जाणारे अपघात या सगळ्या अपघातांमुळे मालमत्तेची तर हानी होतच असते, पण मोठ्या प्रमाणावर निरपराध नागरिकांचाही त्यामध्ये बळी जात असतो. आपल्या कर्तव्यांचे आपण जबाबदारीपूर्वक पालन केले तर असले अपघात टाळता येऊ शकतात. अशा अनेक अपघाती गोष्टींची यादी आपण दररोज वाचत असतो. या गोष्टी वेगवेगळ्या ठिकाणी घडत असल्या तरीही त्या सगळ्यांमध्ये कुठे तरी 'मानवी' घटक जबाबदार आहेत. हा मानवी घटक म्हणजे जबाबदारीच्या 'जाणिवे'चा अभाव. आपल्या प्रत्येक कृतीतून जशी स्वतःकरता एक व्यवस्था निर्माण होत असते, तशीच आपण ज्या समाजाचे घटक असतो त्या समाजव्यवस्थेतही त्याचे तरंग उमटत असतात. स्वतःपुरते होणारे बदल आपण वैयक्तिक फायद्या-तोट्याच्या भाषेत मोजतो व ते आपल्या तत्काळ लक्षात येतात, पण आपल्या कृतीमुळे समाजव्यवस्थेवर

होणारे बदल हे अनेक वेळा 'दृश्य' नसतात, किंवा त्यांची तिव्रता काही काळानंतर लक्षात येते.

'व्यक्ती तितक्या प्रकृती' असं आपण नेहमीच म्हणतो, किंवा टाळ्या मिळवायच्या असतील तर 'विविधतेतून एकता' असेही म्हणतो. 'विविधतेतून एकता' याचा संदर्भ बहुतांशी राजकीय समीकरणांशीच जोडलेला असतो. 'विविधतेतून एकते' प्रमाणेच 'वसुधैव कुटुंबकम्' हेही असेच एक वचन राजकारण्यांनी बोथट करून टाकले आहे. प्रत्येक व्यक्ती जर का 'भिन्न' आहे तर या भिन्नतेतून 'एकता' आणायची म्हणजे काय? भिन्नता व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य घटक जर का धरला, तर एकता ही जवळजवळ अशक्य आहे. व्यक्तिच्या या 'भिन्नतेला' नाकारणं म्हणजे 'एकता' स्वीकारणं नाही. व्यक्ती म्हणजे प्रत्येक मानव असं गृहीत धरलं, तरी मानवामध्ये 'स्त्री' व 'पुरुष' असे भेद असतात. त्यांच्यामधील या मूलभूत नैसर्गिक फरकामुळे त्यांच्या विचारशैली ते कार्यशैलीपर्यंत फरक असू शकतो. त्याचप्रमाणे प्रत्येक मनुष्य हा जन्मापासून मृत्यूपर्यंत वेगवेगळ्या टप्प्यावर उभा असतो. आपल्या या कालखंडातील त्याच्या अनुभवामुळे त्याच्या संवेदना विकसित झालेल्या असतात. या संवेदना व अनुभवावरती, स्वतःकडे व जीवनाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोनही भिन्न असू शकतो. जीवनातील वरकरणी दिसणारा एखादा अनुभवसुद्धा दोन व्यक्तींसाठी वेगवेगळे संदेश देतो. या सगळ्या संवेदना या शेवटी वैयक्तिक जीवनाप्रमाणे सामाजिक जीवनाशी जोडलेल्या असतात. यातूनच आचार-विचारांची विविधता निर्माण होत असते. तिचा आदर करायलाच हवा. ही विविधता एकमेकांच्या विरोधात असते असे मानण्याची गरज नाही.

मनुष्य जेव्हा सुसंस्कृत व्हायला लागला तेंव्हा त्याच्या जगण्याकरता तो वेगवेगळ्या सामाजिक व्यवस्था निर्माण करू लागला. 'कुटुंब', 'लग्न' हा अशा व्यवस्थांचाच एक भाग आहे. यातूनच नातीगोती निर्माण व्हायला लागतात. थोडक्यात, एखादं बालक जन्माला येतं तेंव्हा ते शिशु असतं, वयात येतं तेंव्हा ते तरुण होतं व लग्नानंतर गृहस्थी होते. म्हणजे आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावरती 'सामाजिक' व 'सांस्कृतिक' व्यवस्थेनुसार जबाबदाऱ्या बदलतात व त्यातून या भिन्नतेत वाढ होते. प्रत्येक समाजव्यवस्थेत या विविधतेतून सुसूत्र, संतुलित व जास्तीत जास्त व्यक्तीगत व सामाजिक फायदा मिळवण्याकरता एक व्यवस्था निर्माण केलेली असते. याच व्यवस्थेला पुढे अभ्यासक 'सभ्यता' किंवा 'संस्कृती' असे म्हणतात.

दुर्दैवाने असा एक सार्वत्रिक गैरसमज आहे की, मानवी इतिहासाच्या कालक्रमणामध्ये आधीच्या सभ्यता ह्या 'बाल्या'वस्थेत होत्या. मानवी आयुष्याच्या (Anthropomorphic) कालखंडाच्या संकल्पनांचं रोपण हे सभ्यतांच्या कालखंडांवरती करण्यात येते. मानवाच्या आयुष्यातील बाल्यावस्था, तारुण्य आणि वृद्धत्व या नैसर्गिक अवस्था आहेत. प्रत्येक अवस्थेतून मार्गक्रमण करताना त्याच्या अनुभवांच्या संचितामुळे तो निर्णय घेण्याकरता सक्षम होत असतो. बाल्यावस्थेतील 'तर्क', 'विवेक' आणि तारुण्यातील 'तर्क' व 'विवेक' वेगळा असतो. साहजिकच विस्तवाला मुलाचा जेव्हा प्रत्यक्ष हात लागतो तेव्हा त्याला कळतं की विस्तवाला हात लावायचा नसतो. थोडक्यात; बालकाची तर्क व विवेकक्षमता, निर्णयक्षमता कमी दर्जाची असते. याच विचाराचे रोपण जेव्हा सभ्यतांचं वर्गीकरण करताना 'बाल्या'वस्था म्हणून केली जाते तेव्हा त्या सभ्यता सर्वार्थाने अविकसित व मागासलेल्या होत्या असा निष्कर्ष निघतो. असे सोपे निष्कर्ष त्या सभ्यतांमधील जाणिवा, त्यांच्या सामाजिक व्यवस्था, आणि संस्कृतीचा अभ्यास करण्याकरता लागणाऱ्या तटस्थतेला सुरुंग लावतात. पाश्चात्त्य संशोधन व्यवस्थेच्या गृहितांचा आंधळा अनुनय आपण चालू ठेवला आहे.

सामाजिक किंवा सांस्कृतिक संशोधनाचा त्यांचा संदर्भ हा 'पाश्चात्त्य' संस्कृतीचा होता. त्यांचा समाजविकास किंवा सांस्कृतिक मूल्यांची निर्मिती ही संपूर्णतः भिन्न होती. त्याला औद्योगिक क्रांतीचीही पार्श्वभूमी होती. अनेक पाश्चात्त्य अभ्यासकांना याची जाणीव झालेली दिसते. आपल्याकडचे संशोधक, कथा व कादंबरीकार मात्र अजून न झालेल्या अन्यायाच्या नवीन नवीन कल्पना शोधून त्याच चिवडण्यात मग्न आहेत. यातच भाषा आणि अस्मितेची फोडणी मिळाली की, 'एकता' आणि 'विविधता' दोघांचाही विदूषक होतो. शिल्लक राहते ती फक्त राजकीय घोषणा– 'विविधतेतून एकता'.

हाच गोंधळ 'अधिकार' आणि 'स्वातंत्र्य' या संकल्पनांचा. जबाबदारीशून्य अधिकार किंवा स्वातंत्र्य म्हणजे अराजकता. राजकारण्यांनी अधिकाराचे परिवर्तन 'सत्ता', आणि स्वातंत्र्याचे 'स्वैराचारा'त केले. वर्णाश्रम धर्मातील अधिकार म्हणजे 'वर्गकलह', आणि जबाबदारीशून्य लोकशाहीतील 'अधिकार' किंवा 'स्वातंत्र्य' म्हणजे पुरोगामीपणा!! दांभिकता आणि वैचारिक दिवाळखोरीचे इतके चांगले उदाहरण दुसरे सापडणार नाही.

आजच्या 'विज्ञानाच्या' व्याख्येमध्ये प्रामुख्याने 'गणित', 'रसायन', 'पदार्थविज्ञान' व 'तंत्रज्ञान' यांचाच समावेश असतो. 'साहित्य', 'कला', 'संगीत', 'भाषा' यांचा अंतर्भाव आजच्या विज्ञान या संकल्पनेत होतच नाही.

साहजिकच आजच्या विज्ञान शाखांचा विकास हाच 'राष्ट्र' किंवा 'सभ्यतां'च्या विकासाच्या मोजमापाचं परिमाण होऊन जाते. या सगळ्या दृष्टीने अमेरिका व यूरोपियन राष्ट्रं ही शिखरावरती आहेत. अमेरिका ही या विकासाचा अत्युच्च बिंदू धरला, तर आज कुणीही व्यक्ती उठते व पाचपन्नास लोकांना मारून टाकते, व्यसनाधीनतेचे प्रमाण किंवा नैसर्गिक साधनसंपत्तीचा वारेमाप अविवेकी वापर व त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे, बळजबरीने जगातल्या सर्व राष्ट्रांमध्ये त्यांनी कुठली राजकीय प्रणाली निवडायची हे ठरवण्याचा अधिकार ही विकसित, प्रगल्भ समाजाची लक्षणं आहेत का? यामध्ये मानवी नीतिमूल्य किंवा नात्यागोत्यांतून निर्माण झालेली समाजव्यवस्था याला किंमत शून्य आहे. म्हणजेच 'वस्तुस्थिती' आणि 'सामाजिक', 'सांस्कृतिक' उंची व खोलीचे मोजमाप करण्याची 'परिमाणं' यामध्ये कुठेतरी विरोधाभास निर्माण झालाय.

भारत हा एक प्राचीन देश आहे. साहजिकच त्याचा सांस्कृतिक व सामाजिक इतिहासाचा कालपटही खूप मोठा आहे. भारतीय सभ्यतेचा आधीचा काळ ही 'बाल्यावस्था' होती. या कोशातून बाहेर आलो तरच त्यातल्या काही सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थांचा संदर्भ आपल्याला समजू शकतो. अशोकाचे शिलालेख असोत किंवा विजयनगर, छत्रपती शिवाजी महाराजांचा कार्यकाळ असो, तसेच त्या काळातील संतांची शिकवण असो, यामध्ये भौगोलिक आणि कालक्रमणांची विविधता असली तरी जीवन जगण्याची आणि ते जगवण्याकरता लागणाऱ्या नीतिमूल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात एकवाक्यता होती. 'सर्व मानव एक आहेत' ही 'भोळसट' संकल्पना त्यांना नक्कीच मान्य दिसत नाही. स्त्री पुरुषांमध्येच नाही, तर प्रत्येक वयोगट व नात्यांप्रमाणे सुसंगतता आणण्याकरिता 'भिन्नता' मान्य करून समाजव्यवस्थेची वीण तेव्हा बांधलेली दिसते. यालाच आपण 'वर्णाश्रम व्यवस्था' म्हणतो.

यामध्ये ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम हे प्रत्येक व्यक्तिच्या आयुष्यामध्ये येणारे कालखंड आजही नाकारता येणार नाहीत. त्याचप्रमाणे समाजाच्या दैनंदिन गरजांप्रमाणेही त्यांचं वर्गीकरण केलेले आपण पाहतो. याच व्यवस्थेला आपण

व्यापकतेने ‘वर्ण’व्यवस्था म्हणतो. प्रत्येक पिढी आपल्या पुढच्या पिढीला वर्ण ‘कौशल्य’ अधिक विकसित करून संक्रमित करत होती. यातूनच त्यांच्या ‘जाणिवा’ आणि ‘जबाबदाऱ्या’ विकसित होत होत्या. आजच्या ‘शाळा’ ह्या या संकल्पनेच्या बाहेरील हे ‘कौशल्य’ शिक्षण होत. त्यामध्ये विविधता होती.

कुठलीही व्यवस्था १००% परिपूर्ण असूच शकत नाही. वेगवेगळ्या स्तरावरच्या ‘विविधता’ मान्य केल्यावर त्यामध्ये काही प्रमाणात ‘वैगुण्य’ आणि ‘असमानता’ ही येणारच. तशी ‘सर्व सुखी’ अशी व्यवस्था आधी केव्हाही नव्हती आणि भविष्यातही येण्याची शक्यता नाही. या सगळ्या व्यवस्थेमध्ये व्यापकतेने ‘विविधता’ आणि ‘एकता’ या दोहोंचेही संतुलन असेल तरच तो समाज विकसित होतो. त्या समाजाचे विज्ञान, साहित्य, स्थापत्य, कला, भाषा ही सगळी अंगे विकसित होतात. या सगळ्या शाखांचा भारतातील विकास म्हणजेच त्याची संस्कृती ही आज साहित्य, कला, स्थापत्य इ. अनेक अंगानी आपल्या समोर संदर्भाकरता उभी आहे.

हा समाज मागासलेला, अविकसित होता का? समाजातील सर्व घटक एकमेकांच्या उरावरती बसले आहेत व वर्गकलहाने पछाडलेले आहेत असा निष्कर्ष यातून निघतो का? आज सगळ्या भारतीयांना एकच ‘घटना’ आहे. या पार्श्वभूमीवरती वर उल्लेख केलेले वाढते अपघात आणि सगळ्या भारतीय समाजाची ‘आम्ही मागासलेले आहोत’ असे जाहीर करून घेण्याची तीव्र इच्छा हे काय दर्शवते? उठता बसता ‘एकता’ आणि ‘जाती’निर्मूलनाच्या घोषणा, पण जन्मापासून जातीच्या प्रमाणपत्राचा आग्रह!! जातीनिर्मूलनाचा इतका ‘दांभिक’ आणि ‘हास्यास्पद’ कार्यक्रम जगाच्या पाठीवर कुठेही अस्तित्वात नाही.

आपण जेव्हा आईच्या गर्भात असतो तेव्हापासून आपल्या ‘जाणिवा’ विकसीत व्हायला लागतात. आईच्या गर्भातील या जाणिवा या सुद्धा तो गर्भ आपल्या अनुभवांतूनच शिकत असतो. प्रत्यक्ष जन्माला आल्यानंतर आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर या जाणिवांची मशागत करायला लागते. जाणिवांची मशागत करण्यासाठी निर्मिलेली व्यवस्था म्हणजेच ‘कुटुंब’व्यवस्था. यातूनच निर्माण होतात ‘कौटुंबिक’ व ‘सामाजिक’ नातीगोती. या जाणिवांचंच रूपांतर पुढे जबाबदाऱ्यांमध्ये होतं आणि या जबाबदाऱ्याच शेवटी माणसाच्या वैयक्तिक व सामाजिक विकासाशी निगडित असतात.

आजची चार भिंतींमधील शिक्षणव्यवस्था ही माहितीच्या प्रसारणापुरती मर्यादित आहे. यातून 'संवेदनशील' जाणिवा निर्माण होतील याची खात्री नाही. जो प्रकार आजच्या शिक्षणव्यवस्थेचा आहे तोच 'भ्रम' व 'भाबडी' समजूत आज 'घटना', 'सरकार' किंवा 'पोलिस' या व्यवस्थांबद्दलही आहे. या समाजयंत्राचा सर्वात महत्त्वाचा घटक हा 'मानव' आहे, व तोच जेव्हा 'संवदेनाशून्य', 'जाणिवशून्य' होतो त्यावेळी सरकार, घटना व पोलिस-यंत्रणा कुचकामी असते.

समानता (equality) व एकता (unity) हे समानार्थी शब्द नाहीत. आजची लोकशाही ही 'आकडेशाही' आहे. याच्यामध्ये 'जाणिवा' किंवा 'प्रगल्भते'चे कुठेही प्रतिबिंब नाही. आपले २०% हून अधिक लोकप्रतिनिधी गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. बहुतेकांचा स्वतःचा काहीही व्यवसाय नाही, असला तरी तो नावापुरताच. राजकारण हाच यांचा व्यवसाय. या व्यवसायातून त्यांनी निर्माण केलेली 'माया' बघून डोळे दिपून जातात. कुठल्याही प्रामाणिक व्यावसायिकाला करता येणार नाही अशी ही 'माया' असते. 'घराणेशाही' किंवा 'व्यक्तीस्तोम' या दोनच निकषांवर आजचे राजकारण चालते. हीच आपल्या आजच्या लोकशाहीची मोठी आणि खरी शोकांतिका आहे.

आजच्या बहुतेक सगळ्या अपघातांमागे नागरिकाचा 'बेजबाबदारपणा' कारणीभूत आहे. कायदा, घटना, आरक्षण किंवा मागासलेपणाची जाहिरात ही व्यक्तींमध्ये जबाबदारीची जाणीव आणू शकत नाही. त्याची मशागत जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर करायला लागते. आज 'विविधतेतील एकता' आणि 'अधिकारां'च्या जंगलामध्ये या 'जाणिवा' व 'जबाबदाऱ्या' इतिहासजमा झाल्या आहेत. आजचे आपले अपघात हे त्याचे दृष्यस्वरूप आहे. आपले सण आणि समारंभांचे जसे आपण राजकीयीकरण केलं आहे, तसेच 'विविधतेत एकता' किंवा 'वसुधैव कुटुंबकम्' या घोषवाक्यांना आपण 'संदर्भहीन' आणि 'हास्यास्पद' करून टाकलंय. यामुळे 'विविधता' आणि 'एकता' या दोघांवरही आपण सारखाच अन्याय करतो आहोत. मतपेटीवर डोळा ठेवून समाजातील प्रथांचा किंवा परंपरांचा केलेला अनुनय म्हणजे विविधतेचा आदर नाही. 'भाषा', 'धर्म', 'प्रांतीय' अस्मिता यांचा या करता केलेला वापर हा 'विविधते'ची जपणूक नाही, तर ते 'विघटने'ला दिलेलं निमंत्रणच असते. आपल्या स्वातंत्र्यापासूनच आजपर्यंत असल्या राजकीय खेळखंडोब्याची अनेक उदाहरणे आपल्या समोर आहेत.

आपल्या संस्कृतीला 'विविधता' आणि 'एकता' नवीन नाहीत. सामाजिक व्यवस्थेतच त्यांचा अंतर्भाव होता. राजकारणाची त्यावर चढवलेली पुटे दूर करा, तेव्हाच दिसेल शतकानुशतकं टिकवलेली 'विविधतेतील एकता'.

''**भीतरी ज्ञान होवावे। मग बाहेर लाभेल स्वभावे।**'' (ज्ञानेश्वरी)

**– नोव्हेंबर २०१७**

❖❖❖

# लिओनॉर्दो आणि त्याच्या कलाकृती

१५ नोव्हेंबर २०१७ ला कलाकृतींचा लिलाव करणाऱ्या ख्रिस्ती (Christie) या उद्योगसमूहाने न्यू यॉर्कला एक विक्रम प्रस्थापित केला. लिओनार्डो दा विंची (Leonardo da Vinci) यांची सॅलवॅतॉर मुंडी (Salvator Mundi) ही कलाकृती ४० कोटीला लिलावात विकली गेली. अजूनपर्यंतच्या इतिहासामध्ये कलावस्तूंना मिळणाऱ्या किंमतीमध्ये ही सर्वात जास्त किंमत आहे. साहजिकच या विक्रीची नोंद न्यू यॉर्क टाइम्सपासून, फायनानशिअल टाइम्सपर्यंत सगळ्या वृत्तपत्रांनी नुसती बातमीच नाही, तर विशेष लेख लिहून घेतली. या किंमतीवर बरेच कलाचिकित्सक नाराज आहेत, कारण कलाकृतींच्या 'खऱ्या' मूल्यांवर त्याचा विपरित परिणाम होईल अशी त्यांना भीती आहे.

पाश्चिमात्य देशांमध्ये कलाकृतींना एक विशेष महत्त्व आहे. मानवी सृजनाचं ते एक अंग म्हणून बघितलं जातं. आधुनिक विज्ञानाचा जेवढा अभ्यास होतो त्याच विश्लेषणात्मक दृष्टींनी कलाकृतींचाही



**सॅलवॅटॉर मुंडी** (Salvator Mundi)

अभ्यास होतो. कलेबरोबरच कला इतिहास, कला चिकित्सा आणि कलेच्या 'सामाजिक' आणि 'सांस्कृतिक' अंगांचाही ऊहापोह होतो. यामुळेच त्यांची संग्रहालयं आणि ग्रंथालयं ही या विषयांवरील कलाकृती आणि पुस्तकांनी खच्चून भरलेली असतात. या विषयाला वाहिलेली अनेक पाक्षिकं, मासिकं आणि नियतकालिकं तेथून प्रकाशित केली जातात.

याचं दुसरं एक वैशिष्ट्य म्हणजे, कुठल्याही व्यक्तिला अशा कलाकृती बाळगता तर येतातच, पण त्या विकताही येतात. असं समजलं जातं की, जेवढ्या कलाकृती संग्रहालयामध्ये प्रदर्शित आहेत त्याहून कितीतरी जास्त त्या वैयक्तिक संग्रहांमधून आहेत. कलेला मिळणाऱ्या या 'सांस्कृतिक' आणि 'सामाजिक' महत्त्वामुळे त्याची देखभाल आणि नोंदणी ही काळजीपूर्वक केली जाते.

म्हणूनच लिओनार्दोच्या या चित्राला मिळालेली ही विक्रमी किंमत त्याच्या 'अर्थ'कारणाच्या पलीकडे जाऊन बघावी लागते. अशाप्रकारच्या कलाकृती हे गर्भश्रीमंत लोक जसे विकत घेत असतात, तसेच अनेक उद्योगसमूह आणि संग्रहालयेही अशा वस्तू विकत घेतात. कुठल्या कलाकारांनी या वस्तू निर्माण केल्या आहेत याप्रमाणेच त्यातील कलाविष्कार आणि तत्कालीन सामाजिक आशय यालाही महत्त्व दिले जाते. लिलावांमधून या वस्तू जेव्हा एवढी मोठी किंमत

देऊन विकत घेतल्या जातात तेव्हा ती वस्तू विकत घेणाऱ्या व्यक्ती किंवा समूहाचं नाव सहसा जाहीर केलं जात नाही. या चित्राच्या लिलावानंतरही हे चित्र कोणी विकत घेतले असेल या संदर्भात उलटसुलट चर्चा चालू झाल्या. वॉल स्ट्रिट जर्नल आणि इतर समाजमाध्यमांमधून लवकरच ते नाव जाहीर झाले आणि सगळ्यांनाच आणखीन एक मोठा धक्का बसला. सौदिच्या राजानी आपल्या सांस्कृतिक आणि पर्यटन विभागाकरिता ती कलाकृती विकत घेतल्याचे जाहीर केले. एवढेच नाही तर, ती कलाकृती आबुधाबी येथे फ्रान्सच्या लूर (Louvre) संग्रहालयाच्या मदतीने नुकत्याच उघडलेल्या संग्रहालयात कायम स्वरूपात ठेवण्यात येणार आहे असेही त्यांनी जाहीर केले.

श्रीमंत अरबदेशांची अजूनपर्यंतची प्रतिमा ही इस्लामीक कट्टरवाद्यांना मदत करणारी यंत्रणा अशी होती. शिवाय कला किंवा मूर्तींकडे बघण्याचा इस्लामचा दृष्टीकोनही मूर्तीभंजक असाच होता. हे चित्र तर चक्क ख्रिस्तीधर्माचा संस्थापक येशूख्रिस्त याचे आहे. अरब जगतामध्ये होऊ घातलेल्या एका मोठ्या 'सामाजिक' आणि 'सांस्कृतिक' क्रांतीची ही नांदीच म्हणायला लागेल.

या चित्राला मिळालेल्या या प्रचंड किंमतीमागे अर्थातच या चित्राचा विषय, आणि त्याचा निर्माता लिओनार्दो हे दोघेही तेवढेच जबाबदार आहेत. तसेच या चित्राचा गेल्या ५०० वर्षांतील प्रवासही मोठा रंजक आहे.

'सॅलवॅटॉर मुंडी' हे चित्र लिओनार्दोनी इ. स. १५०० च्या आतबाहेर काढले आहे. ते सध्या विकले जाण्याच्या आधीचा त्याचा मालक रशियन अब्जाधीश Dmitry Rybolovlev हा होता. 'ख्रिस्ति'नी हे चित्र विकायच्या आधी त्याला बरीच प्रसिद्धी देऊन जगभर त्याची प्रदर्शने भरवली. हजारोंच्या संख्येने लोकांनी रांगा लावून ते चित्र बघितले. इ.स.१५०० नंतर काही डझनांनी त्याच्या प्रतिकृती कलाकारांनी बनवल्या आणि त्या आज जगातल्या संग्रहालयांमध्ये बघायला मिळतात. पण हे मूळ चित्र मात्र बरेच वर्ष गायब होते. लिओनार्दोने हे चित्र तत्कालीन फ्रेंच राजाच्या विनंतीवरून काढले होते. इ.स.१६२५ मध्ये Henrietta Maria या फ्रेंच युवतीचे इंग्लंडच्या Charles I बरोबर लग्न झाले आणि तिच्याबरोबर हे चित्र इंग्लंडच्या राजघराण्यात आले. १६४९ मध्ये इंग्लंडच्या पार्लमेंटने राजघराण्यातील कलाकृती आणि वस्तूंची एक यादी प्रकाशित केली; त्यामध्ये या कलाकृतींचा उल्लेख आढळतो. राजाला झालेल्या कर्जाची फेड करण्याकरिता

इ.स. १६५१ मध्ये John Stone या स्थापत्यकाराकडे ते हस्तांतरीत झाले. इ.स.१६६० ला Charles II गादीवर आला आणि हे चित्र त्या स्थापत्यकाराकडून पुन्हा राजघराण्याकडे आले. सुमारे इ.स.१८०० पर्यंत ते राजघराण्यातच असावे असा अभ्यासकांचा अंदाज आहे. इ.स.१९०० मध्ये आणखीन एक कला-संग्राहक Cook याच्याकडे ते लिओनार्दोच्या सहकाऱ्याची कलाकृती म्हणून आले. इ.स.१९५८ साली Cook यांच्या संग्रहाचा लिलाव झाला आणि फक्त ४५ पौंडाला ते विकले गेले. अजूनपर्यंतच्या या चित्राच्या प्रवासामुळे त्याची बरीच दुर्दशा झाली होती. डागडुजीच्या नावाखाली त्यावर काही रंगांची पुटंही चढविण्यात आली होती. पुन्हा ५० वर्ष ते चित्र गायब झाले. इ.स. २००५ साली अमेरिकेमधल्या एका लिलावामध्ये नगण्य किंमतीला ते पुन्हा विकले गेले. तेथूनच या चित्राच्या पुनरुद्धाराला सुरुवात झाली.

सर्व आधुनिक तंत्रज्ञान वापरून ते चित्र पहिल्यासारखे करण्याचा प्रयत्न या नवीन मालकाने चालू केला. न्यू यॉर्क विद्यापीठाच्या कलाविभागाचे प्रमुख Dianne




**फ्लोरेन्स इटाली येथील लिओनार्दो दा विंची यांचा पुतळा**

Dwyer Modestini यांनी आपले सर्वस्व पणाला लावून या चित्राच्या साफसफाई, जतन आणि त्याला मूळ स्वरूपाकडे आणण्याचा प्रयत्न चालू केला. लिओनार्दोच्या इतर चित्रांचा अभ्यास आणि तज्ज्ञांशी सल्लामसलत करून हे चित्र लिओनॉर्दोचेच आहे हे त्यांनी प्रस्थापित केले. अमेरिकेतील जगप्रसिद्ध मेट्रोपॉलिटीयन म्युझियमच्या कला अभ्यासकांनीही हे आव्हान स्वीकारून त्याचा कसून अभ्यास केला. 'The Virgin of the Rocks' हे लिओनॉर्दोचे समकालीन चित्र लंडनच्या प्रसिद्ध नॅशनल गॅलरीमध्ये आहे. जगातले सगळे कला-अभ्यासक पुन्हा एकदा या चित्राच्या तुलनात्मक अभ्यासाला लागले आणि त्या सगळ्यांनी हे चित्र लिओनॉर्दोचेच आहे हे तर सिद्ध केलेच, आणि नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ते त्याच्या मूळ स्थितीवर आणून ठेवले. ही एक अत्यंत नाजूक, गुंतागुंतीची आणि खर्चिक पद्धत आहे.

इ.स. २०११ मध्ये लंडनच्या नॅशनल गॅलरीमध्ये लिओनॉर्दोच्या उपलब्ध कलाकृतींचे प्रदर्शन भरले होते. त्यामध्ये या चित्राचाही समावेश करण्यात आला. मध्यंतरीच्या काळामध्ये हे चित्र आपण वर उल्लेख केलेल्या रशियन अब्जाधीशांनी १२७ मिलियन डॉलरना विकत घेतले होते आणि शेवटी 'ख्रिस्ति'नी ते लिलावात सौदीच्या राजघराण्याला ४०० मिलीयन डॉलरला विकले. गेली काही दशकं चीननेही अशा कलाकृती विकत घेण्याचा सपाटा लावला आहे. शांघाय, बेजिंग येथे भव्य कला-दालनं आणि ग्रंथालयं याकरताच उभारली जात आहेत. आबूधाबी आणि इतर अरब शहरांमधूनही भव्य कला-संग्रहालयं उभी रहात आहेत. अभिरुची आणि कला आस्वादाच्या राजधान्या आता नक्कीच बदलत आहेत. आपली शहरं मात्र भ्रष्ट राजकारण्यांच्या वाढदिवसाचे फ्लेक्स लावून विद्रूप केली जात आहेत.

एका राजघराण्यातून दुसऱ्या राजघराण्यातील या चित्राचा हा प्रवास बरीच 'सांस्कृतिक' स्थित्यंतरं दाखविणारा आहे.

लिओनॉर्दो हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. अनेक अभ्यासक त्याला 'प्रबोधन पुरुष' म्हणून संबोधतात आणि ते योग्यही वाटते. युरोपमधील विज्ञानक्रांती, औद्योगिक क्रांती आणि त्याबरोबरच सामाजिक आणि कलाक्षेत्रामधील बदल हे १५ व्या शतकात म्हणजे 'प्रबोधन' युगामध्येच चालू झाले. लिओनॉर्दो हा आपल्या वडिलांचा अनौरस पुत्र. त्याच्या वडिलांनी ४ लग्ने केली होती आणि लिओनॉर्दोला १२ भावंडे होती. लिओनॉर्दोचे बरेचसे आयुष्य फ्लॉरेन्स या गावी गेले. फ्लॉरेन्स प्रमाणेच मिलान, वॅटिकन आणि फ्रान्समध्येही त्याचे वास्तव्य झाले.

लिओनॉर्दो चित्रकार म्हणून जरी प्रसिद्ध असला तरी गणित, अभियांत्रिकी, स्थापत्य, शरीररचनाशास्त्र, वनस्पतिशास्त्र या सगळ्या विषयांमध्ये त्याची गती चांगलीच होती. 'विमान', 'रणगाडा' अशा अनेक कल्पना त्याने त्यावेळेला रेखाटून ठेवल्या आहेत! त्या प्रत्यक्षात यायला पुढे ३००-४०० वर्षे जायला लागली.



**व्हिट्रुवियन मॅन (Vitruvian Man)**

लिओनॉर्दोची सुमारे २० चित्रे आज अभ्यासकांना उपलब्ध आहेत. 'मोनालिसा' आणि 'द लास्ट सपर' ही त्याची प्रचंड गाजलेली चित्रे. त्याचप्रमाणे शरीराच्या वेगवेगळ्या भागांचे तौलनिक मोजमाप देणारे 'व्हिट्रुवियन मॅन' (Vitruvian Man) हे रेखाचित्रही त्याचेच आहे. लिओनॉर्दोच्या चित्रांप्रमाणेच त्याची टिपणं आणि रेखाचित्रांची संख्या सुमारे १३,००० आहे. याचे विषयही अनेक आहेत. त्याच्या मृत्यूनंतर दुर्दैवाने त्याच्या नातेवाईक हितचिंतकांमध्ये ते वाटले गेले. अभ्यासकांनी प्रचंड मेहनत घेऊन ती शोधून काढली आणि युरोपमधल्या वेगवेगळ्या ग्रंथालयं आणि संग्रहालयांमध्ये ती आज उपलब्ध आहेत. Codex Leicester हे विज्ञानाशी निगडित असलेले एक बाड, सध्या मायक्रोसॉफ्टचे मालक Bill Gates त्यांच्या संग्रहामध्ये आहे.

रॅफेल (Raphael) आणि मायकेलऐंजेलो (Michelangelo) हे दोन मोठे चित्रकारही लिओनॉर्दोचेच समकालीन.



**मोनालिसा (Monalisa)**

विज्ञान काय किंवा कला काय, दोघांच्याही अभ्यासाला किंवा संशोधनाला सृजनशील मन लागते. लिओनॉर्दो हे त्याचे सर्वात चांगले उदाहरण आहे. लिओनॉर्दोची चित्रं आणि इतर लेखन यावर आज अनेक संशोधनपर ग्रंथ उपलब्ध आहेत. Giorgio Vasari यांनी १५६८ साली तत्कालीन कलाकारांची माहिती देणारे Lives of the Artists हे पुस्तक लिहिले. त्या पुस्तकामध्ये लिओनॉर्दोवरतीही एक लेख आहे आणि आजही त्याचा संदर्भ घेऊनच लिओनॉर्दोवरती पुढील संशोधन करावे लागते.



**लिओनार्दोच्या टीपण वहीतील एक पान**

लिओनॉर्दोच्या चित्रांना मिळणारी किंमत ही फक्त त्याच्या आर्थिक मूल्यापुरती सीमित नाही. त्याचे सर्व लिखाण किंवा चित्रे ही तत्कालीन युरोपमधील प्रबोधन युगामध्ये होणाऱ्या 'सामाजिक' आणि 'सांस्कृतिक' बदलाचे प्रतिबिंब आहेत. त्यांचा अभ्यास हा ग्रंथालयं किंवा कला-इतिहासकारांकडून तर होतोच, पण विद्यापीठीय अभ्यास आणि संशोधनाचाही तो एक मोठा भाग आहे. कला आणि विज्ञान या दोन्हीही शाखा एकमेकांमध्ये किती गुंतलेल्या आहेत याचे लिओनॉर्दो हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. गॅलिलिओ, न्यूटन आणि विज्ञानाच्या तत्कालीन अनेक संशोधकांना लिओनॉर्दो, मायकेलऍंजेलो इ. कडून स्फूर्ती मिळाली होती. युरोपमधील 'प्रबोधन' युगाचे हेच मोठे वैशिष्ट्य आहे की, त्यांच्या 'विज्ञान' आणि 'कलांचा' विकास हा परस्परावलंबी होता. नवनिर्मिती करता लागणारी सर्जनशीलता दोघांनाही सारखीच लागते. आपल्याकडचे त्याचे चांगले उदाहरण म्हणजे होमी भाभा यांचे आहे. ते जसे चांगले वैज्ञानिक होते तेवढेच चांगले चित्रकारही होते.

रोमन साम्राज्याचा अस्त म्हणजे ५ व्या शतकापासून प्रबोधन युगाची सुरुवात म्हणजे १५ व्या शतकापर्यंतचा काळ हा युरोपच्या इतिहासामध्ये 'मध्ययुगीन' काळ धरला जातो. या काळामध्ये तेथे फारशी प्रगती होत नव्हती. १५ व्या शतकात चालू झालेले 'प्रबोधन' युग हे म्हणूनच महत्त्वाचे आहे. युरोपमधील अभ्यासक याचवेळी आपल्या ग्रीक आणि रोमन तत्त्वज्ञान आणि कलाकृतींकडे बघायला लागले, त्यातून स्फूर्ती घ्यायला लागले. ग्रीक आणि लॅटीन भाषांचा सखोल अभ्यास आणि त्यांच्या मूळ ग्रंथांच्या शोधाला प्राधान्याने सुरुवात झाली. युरोपमध्ये याआधी ही माहिती ग्रीक आणि लॅटीन ग्रंथांच्या अरेबिक भाषांतरातून मिळत होती. यातूनच त्यांच्या 'मानवी पुनरुत्थानवादाला' (Renaissance Humanism) सुरुवात झाली.

आपल्या संस्कृतीमध्येही 'प्राचीन' आणि 'अर्वाचीन' काळामध्ये असे अनेक 'प्रबोधन पुरुष' विज्ञान आणि कलाक्षेत्रांत होऊन गेले. २० व्या शतकामधल्या अनेक 'पाश्चिमात्य' वैज्ञानिक आणि कलाकारांनी त्यांच्या लिखाणातून स्फूर्ती घेतली. त्यांची हस्तलिखितं आणि कलाकृती तेथील ग्रंथालयं आणि संग्रहालयांमध्ये सुस्थितीत सांभाळली. आपल्याकडे मात्र यांचे प्रचंड पुतळे उभारण्यामध्येच हजारो, करोडो रुपयांचा अपव्यय चालू आहे. आपल्या सण आणि उत्सवांमध्ये आलेली विकृती आणि त्याचे राजकीयीकरण हे त्या अधोगतीचे पुढचे पाऊल आहे. विज्ञान, कला, संगीत किंवा नृत्यांचे अनुकरण कितीही चांगले असले तरी ती नक्कलच

असते. उसनवारीचा व्यवहार फार काळ टिकू शकत नाही. नावीन्याला तर तो मारक असतोच, पण गुलामगिरी किंवा नव-वसाहतवादाला ते निमंत्रणच असते. लिओनॉर्दो किंवा तत्कालीन कलाकारांची 'खरी' किंमत जेव्हा आपल्याला कळेल तेव्हाच भारतामध्ये पुन्हा प्रबोधनयुगाची सुरुवात होईल आणि प्राचीन संस्कृत आणि प्राकृत वाङ्मयाच्या संशोधन आणि चिकित्सक अभ्यासाची देखील सुरुवात असेल.

तोपर्यंत पुतळ्यांच्या खाली सावलीत बसून राहण्यापलीकडे आपल्याकडे काहीच पर्याय नाही!

**– डिसेंबर २०१७**

❖❖❖

# वसाहतवाद - भौगोलिक आणि सांस्कृतिक

इंग्रजांचा भारतातील वसाहतवाद किंवा साम्राज्यवादावर इतके लिहिले गेले आहे की, यावर नव्याने काही लिहिता येईल की नाही (?) अशी शंका नेहमीच वाटते. तरीही या विषयाचा ऊहापोह करणारी आणि संशोधन करून नवीन माहिती देणारी अनेक पुस्तके बाजारात येतच आहेत. 'दिशा'चे जुलै (वसाहतवाद जुना आणि नवा), आणि सप्टेंबर २०१७ [(लुटमार, वसाहतवादी (स्वातंत्र्यपूर्व) आणि लोकशाहीवादी (स्वातंत्र्यानंतर)] चे अग्रलेखही या विषयाशी निगडित आहेत. शशी थरूर यांच्या An Era of Darkness: The British Empire in India या पुस्तकाने पुन्हा एकदा या विषयाला उजाळा मिळाला आहे. व्यापार, परंपरागत उद्योगधंदे ते अर्थकारणापर्यंत ब्रिटिशांच्या वसाहतवादामुळे भारताची कशी वाताहात झाली हे त्यांनी पुन्हा एकदा सप्रमाण दाखवून दिले आहे.

सामान्य माणसाशी निगडित असलेले ग्रामोद्योग आणि कुटिरोद्योग नष्ट झाल्यामुळे शतकानुशतके

परस्परावलंबी असणारे व्यवसाय आणि त्यावर अवलंबून असणारे ग्रामीण अर्थकारण कोलमडून पडले.

स्वातंत्र्य मिळून आज आपल्याला ७० वर्षे झाली असली, तरी आजही भारतामध्ये काही बुद्धिजीवींना असे वाटते की, वसाहतवादामुळे भारताचा फायदा झाला. शुक्रवार ८ जुलै २००५ ला आपले माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना ऑक्सफर्ड विद्यापीठाने सन्माननीय डॉक्टरेट समारंभपूर्वक बहाल केली. उत्तरादाखल केलेल्या भाषणामध्ये डॉ. मनमोहन सिंग म्हणतात,–

"Our notions of the rule of law, of a constitutional government of a free press of a professional civil service of modern universities and research laboratories have all fashioned in the crucible where an age-old civilization met the dominant Empire of the day. There are all elements which we still value and cherish. Our judiciary, our legal system, our bureacracy and our police are all great institution, derived from British - Indian administration and they have served the country well".

१६०० मध्ये इंग्रज भारतात आले. १६०७ मध्ये ते अमेरिका खंडामध्ये पोचले. इंग्रज आणि युरोपियन लोकांनी तिथे घरे केली, शेती आणि व्यवसाय चालू केले. १७७५ मध्ये अमेरिकेतील १३ राज्यांनी इंग्रजांच्या वसाहतवादाविरुद्ध युद्ध चालू केले आणि १७८३ ला इंग्रजांच्या वसाहतवादातून मुक्ती मिळवली. अमेरिकेतील हे बहुतांशी लोक संस्कृती आणि भाषेने इंग्रजच होते. तरीही इंग्रजांचा वसाहतवाद त्यांनी स्वीकारला नाही. अमेरिकेतल्या कुठल्याही राष्ट्राध्यक्षांनी अजूनपर्यंत, 'इंग्रजांकडून आम्ही स्वातंत्र्य, लोकशाही, नोकरशाही किंवा घटना घेतली' असे केव्हाही सांगितले नाही. एवढेच नाही तर, वजनापासून मोजमापापर्यंत आपली वेगळी परिमाणे निर्माण केली. अमेरिका एकेकाळी इंग्रजांची वसाहत असली तरीही, अमेरिका कॉमनवेल्थ संघटनेची सभासद नाही. राणीच्या आधिपत्याला त्यांनी केव्हाही मान्यता दिली नाही. १९४९ साली आयर्लंड प्रजासत्ताक झाले आणि त्यांनीही कॉमनवेल्थ संघटनेचे सभासदत्व सोडून दिले. १९४७ साली आम्हांला स्वातंत्र्य मिळाले पण श्री. मेकॉलेच्या शिक्षण व्यवस्थेच्या अपेक्षेप्रमाणे, संस्कृती आणि विचारांनी आजही आपण इंग्रजांचा सांस्कृतिक वसाहतवाद घट्ट कवटाळून ठेवला आहे.

आपल्याला भौगोलिक स्वातंत्र्य मिळालं असलं तरी, न्यायव्यवस्था आणि न्यायालयं, नोकरशाही ते लोकशाही यांच्या व्यवस्थेमधील वसाहतवादाला

'पोषक'मूल्य न ओळखता, त्यामध्ये काडीचाही बदल न करता, ती उसनवारी आपण तशीच चालू ठेवली; याचा हा कबुली जबाबच श्री. मनमोहन सिंग यांनी दिला. एवढेच कशाला; शशी थरूर यांची करण थापर यांनी २०१६ मध्ये त्यांच्याच पुस्तकावर एक मुलाखत घेतली. मनमोहन सिंग यांचाच दाखला देऊन, 'कायद्याचे राज्य ही ब्रिटिशांकडून आपल्याला मिळालेली देणगी नाही का?' असा प्रश्न त्यांना विचारला.

दुर्दैवाने स्वातंत्र्यपूर्व काळातही अनेक बुद्धिजीवींना इंग्रजांचे राज्य हे ईश्वरी वरदानच वाटत होते. महादेव गोविंद रानडे यांनी तर तसे म्हटलेच आहे. पण १८५० च्या सुमाराला लोकहितवादींनीही आपल्या 'शतपत्रांत'ही या नव्या राजवटीचे आणि बदलाचे उत्साहाने आणि मनःपूर्वक स्वागत केले आहे.

ब्रिटिशांचे राज्य म्हणजे त्यांचा वसाहतवाद याचे खरे स्वरूप काय होते आणि आपल्या संस्कृती आणि परंपरागत व्यवसायांवर त्याचा काय परिणाम झाला, याकरता इंग्रजांनीच लिहून ठेवलेले लिखाण पुरेसे बोलके आहे. थॉमस मन्रो हे तत्कालीन मद्रास प्रांताचे राज्यपाल होते. १८१३ साली 'हाऊस ऑफ कॉमन्स'च्या एका समितीसमोर भारतीय व्यवस्थेबद्दल त्यांनी खालील विचार मांडले.

"If a good system of agriculture, unrivalled manufacturing skill, a capacity to produce whatever contribute to convenience or luxury: schools established in every village for teaching reading, writing and arithmatic : the general practise of hospitality and charity among each other and above all a treatment of the female sex, full of confidence, respect and delicacy, are among the signs which denote a civilized people, then the Hindus are not inferior to the nations of Europe; and if civilization is to become an article of trade between the two countries, I am convinced that this country (England) will gain by the important cargo".

संस्कृतीच्या सगळ्या अंगांवरती मन्रोनी आपली निरिक्षणे नोंदवून तत्कालीन समाजाचे चित्रच उभे केले आहे. १८१८ साली पेशवाई खालसा झाली आणि सर्व भारत हा इंग्रजांच्या वसाहतवादाखाली आला. १८५३ साली जॉन डिकीन्सन यांनी 'Government in India Under a Bureaucracy' हे प्रसिद्ध पुस्तक लिहिलं. अवघ्या ५० वर्षांत ब्रिटिशांची नोकरशाही आणि 'कायद्याच्या राज्या'नी काय परिस्थिती केली याचे वर्णन त्यांनी केले आहे.

"Since India has come under British rule her cup of grief has been filled to the brim, aye, it has been full and running over. The unfortunate

Indian people have had their rights of property confiscated: their claims on justice and humanity trampled under foot: their manufacturers, towns and agriculturists beggared: their excellent municipals institutions broken up: their judicial security taken away: their morality corrupted: and even their religious customs violated by what are conventionally called the blessings of British rule!... parliament cases its conscience, regarding these tyrannies and wrongs in India by exhorting those that govern there to govern 'paternally', just as Isaac Walton exhorts his angler, in hooking a worm, to handle him as if he loved him".

इंग्रज हे दुधखुळे किंवा मूर्ख नव्हते. त्यांना साम्राज्य चालवायचे होते. राज्य चालवणे आणि धर्मादाय संस्था चालवणे यातला फरक त्यांना चांगला समजत होता. १९१९ ला मॉन्टेग्यू साहेबांनी भारतावर उदार होऊन काही उदारमतांचा वर्षाव केला अशी आजही काही इतिहासकारांची समजूत आहे. १९४१ सालच्या 'वाङ्मयशोभा' या मासिकात साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी 'प्रवाही राजकारण' हा लेख लिहिला आहे. चर्चिल महाशयांच्या भाषणग्रंथाच्या प्रस्तावनेतील त्यांनी केलेला मराठी अनुवाद हा इंग्रजांचा मुत्सद्दीपणा आणि कुटिल राजकारणावर बरेच काही सांगून जातो.

''१९१९ साली इंग्लंडात सनदशीर प्रधानमंडळ नव्हते. फक्त युद्धमंडळ होते. त्याचे मन वळवून मॉन्टेग्यू साहेबांनी हिंदुस्थान विषयक उदारमतवादी घोषणा केली. त्याला नाइलाज म्हणून आम्ही संमती दिली. शिवाय मॉन्टेग्यू झाले तरी खाजगी भाषणांत आम्हांला सांगत असत की, ''अहो! तुम्ही खुळे लोक हो, या घोषणेने भिता बिचकता का? ती घोषणा, १९१९ च्या कायद्याची प्रस्तावना आणि त्यातील ४१ वे कलम ही सर्व एकत्र विचारात घ्या, म्हणजे कळून येईल की, आम्ही हिंदुस्थानाला खरे दिले असे काहीच नाही! फक्त आम्ही एक प्रयोग करण्याचा बहाणा करीत आहो. तो वाटेल तेव्हा बंद करू किंवा दिलेले हक्कही परत घेऊ. द्यायला जितका वेळ तितकाच काढून घेण्याला. दिल्लीत नवे विधीमंडळ निर्माण करीत आहो, पण त्याला एखाद्या डिबेटिंग सोसायटीपलीकडे काय अधिकार आहेत? साम्राज्य सरकारला विरोधी ठरेल असा सत्तेचा एक अंशही आम्ही दिलेला नाही.''

इंग्रजांच्या काळातील कायदा, सुव्यवस्था आणि न्याय यांच्याबाबतीतही असाच भ्रम आहे. इंग्रजांच्या न्यायव्यवस्थेवर ३० ऑक्टोबर १९१५ च्या The New York Times मध्ये अर्थतज्ज्ञ Mr. S. R. Wagel यांची टिपणी बोलकी आहे. ते लिहितात,–

"The Courts of justice in India are reasonably good so long as the dispute is between Indian and Indian. But when it is a political case, or when it is a dispute between an Indian and an Englishman, there is no justice at all in nine cases of ten."

१९२३ साली म्हणजे, इंग्रजांनी पेशव्यांचा पराभव केल्यानंतर सुमारे १०० वर्षांनी घडलेली ही घटना आहे. एक इंग्रज सैनिक पुण्याजवळील लोहगांव परिसरात शिकारीकरता गेला. तेथील गावकऱ्यांबरोबर त्याचे भांडण झाले आणि त्याने चक्क गोळी घालून एका गावकऱ्याला ठार केले. युरोपियन ज्युरी आणि न्यायाधीश असलेल्या तत्कालीन कोर्टाने त्या सैनिकाची निर्दोष सुटका केली. साहित्य-सम्राट न. चिं. केळकर हे त्यावेळी पुणे नगरपरिषदेचे अध्यक्ष आणि केसरीचे संपादक होते. आपल्या संपादकीयात त्यांनी या घटनेची घेतलेली नोंद बरेच काही सांगून जाते.

"Such farces of trials of Europeans accused of crimes against Indians are not new among us. They date back to the times of Waren Hastings. The thing to be most regretted is that with such things taking place before their very eyes there are persons who keep singing the praise of British Justice. By good rights a pillar ought to be erected at Lohagoan having engraved on it the full details of this case, as a memorial showing what value is attached to the lives of Indians under British rule."

ब्राह्मण पेशव्यांना हरवून कनवाळू इंग्रजांनी अशा कितीजणांना गोळ्या घालून ठार मारले असेल याची गणती नाही. इंग्रजांच्या साम्राज्यवादाच्या कालावधीमध्ये त्यांच्या धोरणांमुळे भारतात दुष्काळ पडून काही कोटी लोक मृत्युमुखी पडले. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळेस या साम्राज्यवादी धोरणांमुळेच भारतात अनेक ठिकाणी अन्न तुटवडा होऊन दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झाली आणि लोक मृत्युमुखी पडायला लागले. चर्चिल यांची त्यावेळची प्रतिक्रिया होती, ''गांधीजी तर अजून जिवंत आहेत ना!''

अशा 'दयाळू' इंग्रज साम्राज्यवाद्यांच्या विजयाचे महोत्सव साजरे व्हायलाच हवेत ना!! समता, बंधूता, सहिष्णूता आणि विशेष म्हणजे जाती-निर्मूलन या आपल्या घटनेतीत विचारांचेच, हे इंग्रजांच्या विजयाचे स्तंभ नाहीत का? त्यावर पुष्पवृष्टीही व्हायलाच हवी.

जगातले कुठलेही युद्ध केवळ शौर्यामुळे जिंकले जात नाही. फंदफितुरी, दारूगोळ्याचा पुरवठा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्यूहरचना करणारे नेतृत्व युद्ध

जिंकून देते किंवा हरायला कारणीभूत ठरते. इंग्रजांनी नेपोलियनला हरवले, पण म्हणून तो कमी शूर नव्हता.

जगातला प्रत्येक सैनिक हा शौर्यानेच लढत असतो. त्याचे जातीय राजकारण फक्त भारतातच होऊ शकते.

१६०० साली इंग्रज जेव्हा भारतात आले तेव्हा भारत एक सधन, सुसंस्कृत राष्ट्र होते. जागतिक व्यापारामध्ये भारताचे योगदान २३% होतं, तर इंग्लंडचे फक्त १.८% होतं. १९४७ साली भारत जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा भारताची जागतिक व्यापारातील टक्केवारी ३% होती. तर इंग्लंडची १०% होती. इंग्रजांनी फक्त पेशव्यांचा पराभव केला नव्हता, त्यांनी जवळजवळ संपूर्ण भारतावरती आपले साम्राज्य प्रस्थापित केले होते. हा विजय नुसता भौगोलिक नव्हता, तर पुढील १५० वर्षांत त्यांनी भारतावर सांस्कृतिक विजय मिळवला. महसूल, न्यायदानापासून शिक्षणापर्यंत सर्व परंपरागत व्यवस्थांना मूठमाती देऊन वसाहतवादाला पोषक व्यवस्था उभ्या केल्या. एवढेच नाही तर, त्याचे गोडवेही आपण गाऊ अशी व्यवस्था इतिहास लेखनाच्या माध्यमातून करून ठेवली.

जातीयवादाच्या माध्यमातून 'तोडाफोडा' राजनीतीचा हा विजय होता आणि आहे. सगळ्या जगानी २०१८ मध्ये प्रवेश केला. भारत मात्र १८१८ मध्ये रेंगाळला आणि ब्रिटिशांच्या शौर्याचे समारंभ साजरे करत राहिला.

धन्य ते ब्रिटिश, त्यांची मुत्सद्देगिरी आणि दूरदृष्टी.

डॉ. राधाकृष्णन् यांनी १९२७ साली दिलेल्या एका भाषणात, शिक्षणाचा उद्देश काय असावा हे विशद केले होते, (The Modern Review, Culcutta, May 1927).

"The aim of true education should be to keep alive the spark of national pride and self-respect. If we lose our wealth and resources we may recover them tomorrow, if not today; but if we lose our national conciousness, there is no hope for us."

मॅकॉलेचेही म्हणणे हेच होते. फक्त त्याच्या समोरील राष्ट्र हे इंग्लंड होते. मॅकॉलेचा मेहुणा Sir Charles E. Trevelyan यानी १८५३ साली इंग्लंडच्या पार्लमेंट कमिटीला भारताच्या शिक्षण पद्धतीवरती एक टिपणी सादर केली होती. त्यामध्ये ते लिहितात,

"The Romans at once civilized the nations of Europe, and attached them to their rule by Romanising them, or, in other words by educating them in the Roman literature and arts and teaching them to emulate their conquerors instead of opposing them. Acquisitions made by superiority in war, were consolidted by superiority in the arts of peace; and the remembrance of the original violence was lost in that of the benefits which resulted from it."

ज्या राष्ट्राला असे द्रष्टे नेते लाभतात त्यांचा सांस्कृतिक वसाहतवाद कधीच संपत नसतो. लढाईतील विजय हा तत्कालीन असतो. सांस्कृतिक विजय हा चिरकाल टिकतो आणि त्याला शौर्यापेक्षा जास्त गरज असते ती मुत्सद्देगिरीची. म्हणूनच भिमा-कोरेगांव येथील स्मारक हे लढाईतील विजयाचे स्मारक नसून, वसाहतवादी मुत्सद्देगिरीचे स्मारक आहे. स्वतंत्र भारतातील राजकारण्यांच्या वैचारिक दिवाळखोरीचेही ते तेवढेच स्मारक आहे!

**– जानेवारी २०१८**

❖❖❖

# ‘पण लक्षात कोण घेतो!’

नीरव मोदी आणि विक्रम कोठारी यांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या कथा सध्या गाजत आहेत. याबरोबरच कुटुंबाने सामूहिक आत्महत्या केल्याच्या अनेक बातम्याही प्रस्तृत होत असतात. त्याचप्रमाणे बेजबाबदारपणे वाहने चालवून होणाऱ्या अपघातांमुळे दगावणाऱ्या लोकांची संख्याही बेसुमार वाढताना दिसते. एका सुसंस्कृत चांगल्या समाजाचे हे खचितच चांगले चित्र नाही, म्हणूनच याचा गांभीर्याने विचार करायला हवा.

पूर्वी निरक्षरता आणि त्यामुळे येणाऱ्या अशिक्षिततेवरच याचे खापर फोडले जाई. आज तंत्रज्ञान आणि दळणवळणांच्या साधनांमुळे देशाच्या भौगोलिक सीमा आकुंचित झाल्या आहेत आणि सगळं जगच पराकोटीचे परस्परावलंबी झाले आहे.

पाश्चात्त्य देशात विज्ञानाच्या शोधांमुळे दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या वस्तूंचा प्रसार आपल्याकडे होण्यास काही दशके लागायची. हीच गोष्ट आज काही आठवड्यांवर येऊन ठेपली आहे. आंतरजालामुळे (इंटरनेट) माहितीच्या साधनांचे लोकशाहीकरण झाले

आहे. शिक्षणाचेही आता चांगलेच सार्वत्रिकरण झाले आहे. भारताची साक्षरता ९० टक्क्यांच्या वरती असून पटसंख्येअभावी शाळा बंद होण्याची वेळ आली आहे. या सर्वच गोष्टी परंपरागत कारणमीमांसेला छेद देऊन वास्तवाचे एक वेगळे चित्र उभे करतात. हे वास्तव म्हणजे नीरव मोदी पासून काही लाखांच्या वाहनांमधून प्रवास करून अपघात होणारे कुणीही 'अशिक्षित', 'मागासलेले' किंवा 'गरीब' नाहीत.

विसाव्या शतकामधील जग हे दोन (आर्थिक) सिद्धांतांवर विभागले गेले होते. भांडवल आणि साम्य-समाजवादी सिद्धांताचा उगम हा युरोपमधील १५ व्या १६व्या शतकातील 'वैज्ञानिक' आणि 'औद्योगिक' क्रांतींमध्ये आहे. या क्रांतींचा उगम हा युरोपमधील प्रबोधन युगात आहे. १९ व्या व २० व्या शतकातील युरोपची जीवनशैली आणि जीवनमूल्ये ही या क्रांतींवर आधारित आहेत.

सर्वसाधारणपणे रोमन साम्राज्याचे पतन (५ वे शतक) ते १५ व्या शतकातील प्रबोधन युग, म्हणजे इतिहास कालक्रमातील मध्ययुग, हा युरोपचा अंधारयुगाचा काळ धरला जातो. याच अंधारयुगामध्ये ख्रिस्ती धर्माचा प्रचंड प्रभाव युरोपवर होता. यामुळेच बायबल मधील वचन आणि त्यांचे समर्थन या भोवतीच त्यांचे तत्त्वज्ञान आणि समाजसंस्कृती फिरत होती. बायबल शिक्षणाचा केंद्रबिंदू हा चर्च होता, आणि त्याचे वहन करणारे माध्यम हा त्यांचे धर्मगुरू म्हणजे 'प्रिस्ट' होते. या परिघाबाहेर विचार करणारे हे 'धर्मबाह्य' किंवा 'समाजबाह्य' ठरत होते. प्रत्यक्ष जीवनाचे वास्तव आणि आग्रही धर्मसंकल्पना यामध्ये मोठी दरी निर्माण झाली होती. यातूनच 'प्रबोधन' युगाची सुरुवात झाली. युरोपचे ख्रिस्तपूर्व तत्त्वज्ञान हे ग्रीक संस्कृती आणि विचारावर आधारित होते. ग्रीक संस्कृतीमधील काव्य, साहित्य, कला, शिल्प याची त्यांना चांगली माहिती होती. म्हणूनच प्रबोधन युग म्हणजे, 'पुन्हा त्या (ग्रीक) संस्कृतीकडे जाऊ या' असा तो विचार होता. त्यातूनच १५ व्या शतकाच्या आत-बाहेर युरोपातील सुरेख स्थापत्य, शिल्प, कला, साहित्य आणि तत्त्वज्ञानाची निर्मिती झाली.

१६ व्या शतकात वसाहतवादाला सुरुवात झाली. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात सगळा देश इंग्रजांच्या ताब्यात गेला आणि वसाहतवाद्यांची भाषा, संस्कृती आणि जीवनशैलीने आपला प्रभाव आणि वर्चस्वाने प्रस्थापित करायला सुरुवात केली. ख्रिस्ती धर्म आणि ग्रीक संस्कृतींपेक्षा आणखीन दुसरी कोणतीही संस्कृती

असू शकते हे त्यांच्या पचनी पडू शकले नाही. यामुळेच भारतीय समाज आणि त्यांच्या प्रेरणांचे आकलन त्यांच्या अभ्यासकांना झाले नाही. संस्कृत साहित्य, कला, शिल्प, स्थापत्य बघून ते स्तंभीत झाले; पण ग्रीक आणि रोमन संस्कृतींशी त्यांची तुलना करून भारतीय सृजनाच्या प्रेरणा ते ग्रीक साहित्य आणि संस्कृतीत बघू लागले.

युरोपमधील 'अंधारयुग' म्हणजे ५ वे ते १५ वे शतक हे भारतामधले अंधारयुग नव्हते. आर्यभट्ट (५वे शतक), ब्रह्मगुप्त, १२ व्या शतकातील भास्कराचार्यांपासून १५ व्या शतकातील गणेश दैवज्ञांपर्यंत महान गणिती याच काळात होऊन गेले. भारतातील बहुतेक सगळी मंदिरशिल्पे आणि लेणी ही देखील याच कालखंडातील आहे. पोलाद निर्मितीपासून वस्त्रोद्योगापर्यंतची भरभराट आणि कलाकौशल्यांचा विकास हा याच कालखंडातील आहेत. नौकानयन, जागतिक व्यापार आणि त्याची भरभराट ही याच कालखंडातील आहे. लग्नापासून ते कुटुंबव्यवस्था, कौशल्यावर आधारित समाजव्यवस्था यांचे स्फूर्तीस्थान आणि या सर्व समाजव्यवस्था एकसंघ ठेवण्याची प्रेरणा ही शुद्ध भारतीय तत्त्वज्ञानांच्या मूल्यावर आधारित होती. राजांपासून रंकापर्यंत सर्वांना ती मान्य होती. याचा अर्थ समाजात 'अनिष्ट' 'अशिष्ट' होत नव्हते असे नाही. राग, लोभ, मत्सर, त्याग या सर्व मानवी स्वभावातील गुणधर्मांचे प्रदर्शन त्याही काळात होत होते. पण 'असंस्कृतपणा'ला सामाजिक प्रतिष्ठा देण्याची व्यवस्था त्या काळात नक्कीच नव्हती. नीतिनियमांची वीण ही काही विशिष्ट मूल्यांवर आधारित होती आणि सगळ्या शिक्षणाचा गाभा हे ते 'नीती' आणि 'मूल्यशिक्षण' होते.

१६ व्या शतकात व्यापाराकरिता आलेल्या या मंडळींनी पुढे महसुलापासून शिक्षणापर्यंत ताबा घेतला; एवढेच नाही तर, पाश्चात्त्य जीवनमूल्यांप्रमाणे त्यांची रचना आणि अंमलबजावणीही करायला सुरुवात केली. ती सुरुवात भारताच्या दृष्टीने भारतीय संस्कृती, विचारधारा आणि जीवनपद्धती लोप पावण्याची होती. शिक्षणाच्या सरकारीकरणाची सुरुवात येथेच झाली. ''हाडामासाचे भारतीय, पण विचार-आचारांनी पाश्चात्त्य संस्कृतीचे वहन करणारे'', या मेकॉलेच्या संकल्पनेतील शिक्षणपद्धतीची ती सुरुवात होती. लोकांची अशी दृढ समजूत आहे की, हा बदल म्हणजे फक्त शिक्षणाच्या माध्यमांचा होता. प्रत्यक्षात एका प्राचीन संस्कृतीचे तत्त्वज्ञान, व्यवहार, चिंतन आणि जीवनशैलीच्या परिवर्तनाची ती सुरुवात होती. अर्थातच याला नवीन येऊ घातलेल्या औद्योगिकीकरणामुळे समर्थन आणि चालना मिळाली होती.

कौशल्यावर अवलंबिलेला एकसंध समाज यामुळे विस्कळीत व्हायला लागला. नवीन औद्योगिकीकरणामुळे त्याचे कौशल्य संदर्भहीन होऊन त्याच्या चरितार्थाचे साधन नष्ट व्हायला लागले. खेडी उद्‌ध्वस्त होऊन नवीन शहरांचा विकास व्हायला लागला. जीवनमूल्याबरोबर जीवनशैलीच्या प्रेरणाही बदलल्या.

निदान १५ व्या शतकापर्यंत तरी भारतीय शिक्षणपद्धती ही सर्वथा भिन्न होती. बहुसंख्य समाज हा कुठल्यातरी कौशल्यावर आपले चरितार्थ चालवत असे. कालांतराने याला आपण 'बलुतेदार' म्हणू लागलो. या प्रत्येक व्यवसायाचे 'कौशल्य' हे परंपरेने चालत असे. सगळा समाज हा या कौशल्यांवर परस्परावलंबी होता. हे 'कौशल्य' आणि त्यावर आधारित 'व्यापार' याकरता प्रत्येक खेडे किंवा ज्याला आपण आज 'ग्रामव्यवस्था' म्हणतो, त्याचे पोषण करायला पुरेसे होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या कौशल्याच्या शिक्षणाचे केंद्र हे घरच होते. प्रत्येक नवीन पिढीचा 'गुरू' हे त्याचे आईवडील किंवा आप्त असत. थोडक्यात; प्रत्येक घर हेच एक 'गुरुकुल' होते. दुर्दैवाने पाश्चात्त्य शिक्षित भल्या भल्या शिक्षण आणि समाज तज्ज्ञांनासुद्धा हे शिक्षण होते असे वाटले नाही. तत्त्वज्ञान, दर्शनांचा अभ्यास आणि अनेकवेळा वैज्ञाानिक आणि कलाक्षेत्रामधील विकसित अभ्यास हा मोठ्या गुरुकुलांमधून चालायचा. त्यांचे माध्यम हे संस्कृत भाषा होती. म्हणूनच भाषेच्या सखोल अभ्यासापासून ते तत्त्वज्ञानाच्या कूट प्रश्नांपर्यंत एकच अधिकारी व्यक्ती म्हणजे 'गुरू' हे त्यांचे केंद्रबिंदू असे. त्यालाच आज आपण 'गुरुकुल शिक्षणपद्धती' म्हणतो. त्याकाळी इंग्लंडमध्येही सर्व शिक्षणाची भाषा ही लॅटीन होती. म्हणून इंग्रजांची अशी समजूत झाली की, भारतातील शिक्षण हे फक्त अशा गुरुकुल पद्धतीतून होत असते. त्यांना याची कल्पना नव्हती की, बाकीच्या कौशल्यांकरता संस्कृतची गरज नव्हती आणि अशी कौशल्ये ही परंपरेतूनच आकार घेऊ शकतात, म्हणून त्यांचा विकासही प्रत्येक घरातून होत होता आणि तीही शिक्षणाचीच केंद्रे होती.

तत्त्वज्ञान किंवा साहित्याला अक्षर किंवा भाषेच्या शिक्षणाची गरज होती. कौशल्य शिक्षणाची मुळाक्षरे आणि पुस्तके ही प्रत्यक्ष कार्यानुभवावरून विकसित होत होती. कुंभार, लोहार, सुतार यांचे शिक्षण म्हणजे त्यांचे पुस्तक हे प्रत्यक्ष कार्यानुभवच होते. बाकी त्यांच्या मानसिक आणि सामाजिक अंगांचा विकास हा सामाजिक सण, रूढी, कीर्तन, भजन यांच्या माध्यमातून होत होता. संस्कृतचे प्रसिद्ध अभ्यासक मॅक्सम्युलर यांनी याचे अतिशय समर्पक वर्णन करून ठेवले आहे.

"There is such a thing as social education and education outside of books and this education is distinctly higher in India than in any part of Christendom. Through recitation of ancient stories and legends, through religious songs and passion plays, shows and pageants, through ceremonials and sacraments, through fairs and pilgrimages, the Hindu masses all over India receive a general culture and ecucation which are in no way lower, but positively higher than general level of culture and education received through schools and newspapers or even through the ministration of the churches in western christian lands. It is an education not in the so called three R's but in humanity".

यात मॅक्सम्युलर यांनी भारतीय शिक्षण व्यवस्थेचा गाभाच व्यक्त केला आहे.

कुठलाही समाज हा चालीरीती, रूढी, श्रद्धा, नातीगोती, सण यांच्या गुंफणीतूनच जगत असतो. मानवामानवातील संबंधांचे शिक्षण त्याला तेथेच मिळत असते. धर्मनिरपेक्षतेच्या भ्रामक संकल्पनेत आपण जगण्याचा आणि शिक्षणाचा मूळ विचारच हरवला.

चार भिंतींमधील आजचे 'धर्मनिरपेक्ष' शिक्षण हे शुद्ध माहितीच्या प्रसारणाचे केंद्र झाले आहे. आज येऊ घातलेली कृत्रिम बुद्धीमत्ता, संगणकाचा वाढत जाणारा वेग आणि संचय-क्षमता, कदाचित माणसाला या सगळ्याच व्यवहारातून हद्दपार करून टाकील. चालकाशिवायची विमाने, मोटारगाड्या आता येऊ घातल्या आहेतच. माहितीचा पुरवठा केल्यावर निदान देणारे संगणकही आता आले आहेत. परंतु माणसाला सुसंस्कृतपणे जगायचं असेल तर 'माणूस' म्हणून लागणारी 'मूल्ये'ही दुर्दैवाने निव्वळ माहिती त्याला देऊ शकत नाही. आजचा 'वैद्यक' किंवा 'विधिज्ञ' माहितीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेला असतो, पण या माहितीचा वापर तो सर्वमान्य नैतिकतेच्या चौकटीत करेल याची काहीही शाश्वती नसते. आजच्या शिक्षणाचा हा फार मोठा पराभवच नाही का?

माहिती मिळवणे हे कितीही महत्त्वाचे असले तरी माणसाला खरे शिक्षण हे चार भिंतींच्या बाहेरच मिळते. त्याचे पहिले केंद्र हे 'कुटुंब' असते आणि नंतर मग त्याचा 'समाज'. आजकाल 'मी खरं बोलीन' अशा शपथा घेऊन तो बेमालूम खोटं बोलतो. एवढेच नाही तर, असे खोटे बोलल्यामुळे झालेले फायदे आणि प्रतिष्ठाही तो अनुभवत असतो. त्याचाच प्रभाव त्याच्या संपूर्ण आयुष्यावर पडतो.

आपल्या 'चरित्रा'मधून आपले 'चारित्र्य' घडत असते. चांगल्या संस्कारांचे आणि मूल्यांचे संक्रमण लहानपणीच व्हावे लागते. घरापासून दारापर्यंत असे 'आदर्शा'चे स्रोत आज आपण हरवले आहेत. समाजकारणापासून राजकारणापर्यंत मूल्यहीन पण प्रचंड यशस्वितांच्या गर्दीमध्ये आदर्श शोधणे हे जवळ जवळ अशक्यप्राय झाले आहे.

नीरव मोदी काय, भ्रष्ट नोकरशहा काय, पतन झालेले न्यायाधीश काय, आणि सर्व विधिनिषेध बासनात बांधून ठेवणारे राजकारणी काय, ही या रोगाची 'लक्षणं' आहेत. मूळ 'रोग' हा मूल्य हरवलेले शिक्षण आणि त्यामुळे सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रांमध्ये आलेली नेतृत्वाची दिवाळखोरी आहे. ही सगळी मंडळी शिक्षित किंवा उच्चशिक्षित आहेत. अशिक्षितपणा किंवा गरीबी हे त्यांच्या पतनाचे कारण नाही. याचा सर्वात वाईट परिणाम हा बहुसंख्य समाजावर होतो, तो वैफल्यग्रस्त होतो आणि या वैफल्यातूनच आत्महत्या, गुन्हेगारी आणि अपघात वाढत असतात. जोपर्यंत आपण हा सामाजिक रोग ओळखून 'चारित्र्य' घडवणारे शिक्षण देणार नाही, तोपर्यंत असे नीरव मोदी वरचेवर निर्माण होत राहतील.

पण लक्षात कोण घेतो!...

**– फेब्रुवारी २०१८**

❖❖❖

# बुद्धिदेवता-विवेकवादी की विनाशवादी ?

सप्टेंबर २०१८ मध्ये डब्लीन, आयर्लंड आणि महाराष्ट्रात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या.

डब्लीन, आयर्लंडमध्ये बुद्धिला चालना देणारी व्याख्यानमाला आयोजित केली गेली, तर महाराष्ट्रामध्ये सालाबादप्रमाणे बुद्धिदेवतेची विटंबना होईल असा गणेशोत्सव साजरा केला गेला. दोन्हीही घटना राजकीय इच्छाशक्ती काय करू शकते याची जीवंत उदाहरणे आहेत.

एर्विन श्रोडिंगर (Erwin Schrodinger 1879-1955) यांनी १९४३ साली What is Life? या शीर्षकाखाली डब्लीन, आयर्लंड येथे तीन व्याख्यानं दिली होती. लगेचच म्हणजे १९४४ साली याच शीर्षकाखाली त्यांची ही व्याख्यानं छापली गेली. त्यांच्या या व्याख्यानांमुळे पदार्थ-विज्ञानाप्रमाणेच जीवशास्त्रालाही एक नवीन दृष्टी मिळाली होती. जैवशास्त्रामध्ये पुढे झालेल्या क्रांतीची बीजे या भाषणात होती असे म्हटले तर गैर ठरणार नाही. याच घटनेला ७५ वर्षे पुरी झाली म्हणून डब्लीनमधील प्रसिद्ध The

National Concent Hall मध्ये बुधवार ५ सप्टेंबर आणि गुरुवार ६ सप्टेंबर २०१८ ला वैज्ञानिकांची एक मोठी परिषद भरवली गेली. जगातील नवभौतिकीपासून नवजीवशास्त्रामध्ये कार्यरत असलेल्या सुमारे २४ अव्वल दर्जाचे वैज्ञानिक यात सामील झाले होते.

विज्ञान हे नेहमी प्रवाहीच असते. जनुकशास्त्र (Genetics), मानवी चेतनेशी निगडित असलेले विज्ञान (consciousness studies), आणि बोधनिक विज्ञान (congnitive science), यामध्ये काम करणारे हे बहुसंख्य वैज्ञानिक होते. १९४३ साली श्रोडिंगर यांच्या भाषणामुळे जैव विज्ञानाला जशी एक नवीन दिशा मिळाली तशीच दिशा आणि स्फूर्ती वैज्ञानिकांच्या या चिंतनामधून मिळणार असल्याचे वैज्ञानिकांचे मत आहे.

श्रोडिंगर यांनी १९४३ साली आपण एका गहन आणि कठीण विषयावर बोलणार असल्याचे लोकांना सांगितले होते. १९३३ सालीच त्यांना पदार्थ विज्ञानामधे नोबेल पारितोषिक मिळाले होते. कठीण विषय मांडणार हे सांगूनही सुमारे ४०० जणांनी त्यांच्या या भाषणाला हजेरी लावली होती. ७५ वर्षांनंतरही डब्लीनमध्ये झालेल्या अलीकडच्या भाषणालाही इतका प्रचंड प्रतिसाद होता की, त्याच्या नोंदणी आणि प्रतिक्षा यादी दोन्हीही बऱ्याच आधी थांबवाव्या लागल्या.

एका सुसंस्कृत समाजाचे हे लक्षण नाही का?

आयर्लंड हा तसा लहान देश. उत्तर आयर्लंड हा इंग्लंडमधे समाविष्ट असून दक्षिण आयर्लंड हा स्वतंत्र देश आहे. भारतासारखेच आयर्लंडलाही ब्रिटिशांच्या वसाहतवादा विरुद्ध लढा द्यावा लागला. म्हणूनच असेल कदाचित, भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला आयरिश जनतेचा नेहमीच पाठिंबा होता. १८४५ मध्ये आयर्लंडमध्ये प्रचंड दुष्काळ पडला. यांत लाखोंनी आयरिश लोक मृत्युमुखी पडले आणि अनेक आयरिश इतर राष्ट्रांमधे स्थलांतरीत झाले. यावेळी अमेरिकेत स्थलांतरीत झालेल्या आयरिश लोकांची संख्या मोठी होती.

Eamon de Valera (1882 - 1975) हे २० व्या शतकातील आयर्लंड मधील एक मोठे राजकीय व्यक्तिमत्त्व. १९५९ साली आयर्लंडचे अध्यक्ष म्हणून ते निवडून आले. आयर्लंडला स्वतंत्र घटना मिळवून देण्यामध्ये त्यांच्या मोठा वाटा होता. १९१६ मध्ये ब्रिटिश साम्राज्यवाद्यांविरुद्ध दिलेल्या लढ्याचे ते एक नेते होते.

याकरता त्यांना मृत्युदंडाची शिक्षा दिली गेली. अर्थातच पुढे त्याचे रूपांतर फक्त तुरुंगवासामध्ये झाले.

आयर्लंड हा एक कट्टर कॅथॉलिकपंथी देश. राष्ट्रनिर्मिती म्हणजे नव्या चर्चेसची बांधणी नाही, हे डी वॅलेरा या द्रष्ट्या नेत्याला पक्के ठाऊक होते. अमेरिकेत स्थलांतरीत झालेल्या आयरिश नागरिकांचा तेथील विज्ञान क्रांतीमधील सहभाग त्यांच्या डोळ्यांसमोर होता. अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठातील विज्ञानाच्या प्रगत अध्ययनासाठी असलेल्या केंद्रासारखी एखादी संस्था त्यांना डब्लीन मध्ये काढायची होती. प्रिन्स्टन मधील या संस्थेचे प्रमुखपद एकेकाळी आइन्स्टाईन यांनी भूषविले होते. अशाच तोडीच्या वैज्ञानिकाचा शोध वॅलेरा यांनी चालू केला आणि त्यात त्यांना यशही आले. एर्विन श्रोडिंगर यांना त्यांनी आपल्या या नवीन संस्थेचे पद देऊ केले आणि श्रोडिंगर यांनी ते स्वीकारलेही.

डब्लीन मधील School for Theoretical Physics या डि वॅलेरानी स्थापन केलेल्या संस्थेचे प्रमुखपद त्यांनी १७ वर्षे भुषविले. श्रोडिंगर यांचा जन्म ऑस्ट्रियामधील व्हिएन्ना या प्रसिद्ध शहरात झाला होता. ते नाझीवादा विरुद्ध होते. साहजिकच जर्मनीनी ऑस्ट्रियावर स्वारी केल्यावर त्यांना तिथून पलायन करावे लागले. ते इटालीमध्ये असताना वॅलेरा यांनी त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना आयर्लंडला बोलावून घेतले.

श्रोडिंगर ही कोणी विज्ञानातील साधी आसामी नव्हती. १७ व्या शतकापासून प्रचलित असलेल्या, परंपरागत न्यूटन भौतिकीला २० व्या शतकाच्या सुरवातीला भौतिकशास्त्रातील नवीन दृष्टीकोनांनी धक्के द्यायला सुरवात केली. १९०० साली मॅक्स प्लँक (Max Plank, 1858-1947) यांचा पुंजवाद (quantum theory), १९०५ आणि १९१५ मध्ये मांडलेला आइन्स्टाईन (Albert Einstein 1879-1955) यांचा सापेक्षतावाद, आणि या सिद्धान्तानाच पुष्टी देऊन नील्स बार (Niels Bohr 1885-1962), हायजेनबर्ग (Werner Heisenberg 1901-1976), रॉबर्ट ऑपेनहायमर (J. Robert Oppenheirmer 1904-1967) यांनी विशेष संशोधन करून या नवभौतिकाचा पाया रचला.

श्रोडिंगर यांचे यातले योगदान हे फार महत्त्वाचे आहे. क्वान्टम् सिद्धान्ताचे मूलभूत समीकरण श्रोडिंगर यांनी सूत्रबद्ध केले. ही पार्श्वभूमी असलेल्या श्रोडिंगर यांना डी वॅलेरा यांनी आयर्लंडला बोलवून नवभौतिकी मधील संशोधनाला प्रचंड

ऊर्जा दिली. डी वॅलेरा हे स्वतः एक गणिती होते. साहजिकच त्यांच्या राजकीय दृष्टीकोनावरती सुद्धा त्याचा प्रभाव पडलेला दिसतो. डब्लीन येथे राहून श्रोडिंगर यांनी नवभौतिकीच्या संशोधनाला पोषक असे अनेक सिद्धान्त मांडले. म्हणूनच त्यांनी १९४३ साली दिलेल्या What is Life? या व्याख्यानांना विज्ञानामध्ये एक अनन्यसाधारण महत्त्व आहे.

जनुकांच्या रचनेचा आराखडा १९५३ साली जेम्स वॅटसन् (James Watson 1928, Alive) आणि फ्रॉन्सिस क्रीक (Francis Crick 1916-2004) यांनी मांडला. वॅटसन यांनी श्रोडिंगर यांचे What is Life? हे पुस्तक वाचले होते. DNA च्या रचनेची मांडणी करताना वॅटसन आणि क्रीक यांना श्रोडिंगर यांनी मांडलेल्या सिद्धान्ताचा फायदा झाला. श्रोडिंगर यांच्यावरती उपनिषद आणि वेदांतातील तत्त्वज्ञानाचा मोठा प्रभाव होता. म्हणून तरी त्यांच्या व्याख्यानाचे १९४४ साली प्रकाशित झालेले पुस्तक What is Life? हे प्रत्येक भारतीयांनी वाचण्यासारखे आहे. धर्म आणि तत्त्वज्ञानाची इतकी चांगली सांगड क्वचितच बघायला मिळते.

या पार्श्वभूमीवर बुद्धीदेवता गणपतीचा महाराष्ट्रात सप्टेंबरमध्ये साजरा होणारा सण आणि राजकारण्यांनी त्याला दिलेले बकाल आणि हिडीस स्वरूप बघायला लागते. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यलढ्यामध्ये इंग्रजांच्या विरुद्ध लोकमत तयार करण्याकरता प्रबोधनाचे एक माध्यम म्हणून हा सण सार्वजनिक केला. आज राजकारण्यांनी त्याचे व्यावसायिकीकरण करून ते आपल्या प्रसिद्धीचे एक माध्यम बनवले आहे. व्याख्यान आणि आरत्यांची जागा हळूहळू टुकार गाणी आणि अंगविक्षेपी नाचाने घेतली. गणपतीच्या आगमनाच्या आणि विसर्जनाच्या मिरवणुकीमध्ये होणारे ध्वनी प्रदूषण, किळसवाणे नाच आणि गाणी निमूटपणे बहुसंख्य जनतेला सहन करावी लागतात.

रस्त्यावर बेकायदा टाकलेले मंडप आणि ध्वनीप्रदूषण टाळण्याकरता न्यायालयाने अनेक निर्बंध घातले. डी. जे. वरील बंदी हा असाच एक निर्णय, पण दुर्दैवानी सगळ्या राजकीय पक्षांच्या स्थानिक नेतृत्वानी, 'अशी बंदी आम्ही जुमानत नाही' असे सांगून विसर्जनाच्या मिरवणुकांमधून डी. जे. वाजवला. अशा धटींगणशाहीला बळ मिळते ते फक्त सरकार आणि पोलिसांच्या नाकर्तेपणामुळे. गेल्यावर्षी ठाण्यामध्ये दहिहंडीच्या थरांची मर्यादा ओलांडून आम्ही थर लावणार असे फलक आणि जाहिराती देण्यात आल्या. गेल्या वर्षीच्या या कायदेभंगाची यावर्षीही जाहिरात

करण्यात आली. यावर्षी या मंडळाला पहिली भेट देतात ते ठाण्याचे पोलिस महानिरिक्षक!

अरे मनाची नाही तरी जनांची तरी थोडी लाज ठेवाल की नाही?

डी. जे. परवडला पण ढोल नको अशी सध्याची परिस्थिती आहे. वृत्तपत्रापासून दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या हे पावणारे गणपती, मिरवणुकांतील ढोल वादन यांचे रसभरीत वर्णन करून या कायदेभंगाला अप्रत्यक्षरीत्या हातभारच लावत असतात. दहीहंडी पासून नवरात्रीपर्यंतच्या सर्व सणांचा आपण एकच 'सण' करून टाकलाय, तो म्हणजे 'शिमगा'!

आर्थिक मागासलेपणाकरता सवलती मिळाव्यात म्हणून लाखांचे मोर्चे काढले जातात. अनेक सार्वजनिक गणपतींच्या सजावटी आणि मिरवणुकांचे खर्चाचे अंदाजपत्रक ५० लाखांच्या घरात असते. अशी शेकडोंनी मंडळे मुंबई, पुणे आणि उर्वरित महाराष्ट्रात आहेत. काही हजारो कोटींचा खर्च यावेळी केला जातो. तोच प्रकार दहीहंडीच्या बक्षिसांचा. तरीही यात सहभागी होणारा 'बहुसंख्य' समाज 'आम्ही मागासलेले आहोत' म्हणून मोर्चे काढतात!!!

लाखो रुपये खर्चून साजरे केलेले हे सण, हे आर्थिक मागासलेपणाचे लक्षण आहे की घसरलेल्या अभिरुचीचे? दांभिकतेला तरी काही सीमा?

प्रज्ञा परीक्षेपासून तशा सगळ्याच क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राची होणारी पिछेहाट आणि राजकीय वरदहस्ताखाली वाढत जाणारा सणांचा उन्माद याचा आपण कधीतरी गांभीर्यानं विचार करणार आहोत का?

Global Technology Index मध्ये भारताचा क्रमांक ४२ वा आहे, तर चीनचा ३० वा. Economic Sunvry of India प्रमाणे दर १० लाख भारतीयांमागे १५६ शास्त्रज्ञ आहेत, चीनमध्ये १,११३, तर इस्राइलमध्ये ८,२५५. बुद्धिची उपासना कुठे जास्त चालू आहे?

डी वॅलेरासारखे विवेकी राजकीय नेतृत्व निसर्गातील कूटप्रश्न सोडवण्याकरता विज्ञानाचा स्वीकार करते, तर सणांना ध्वनी प्रदूषण आणि उन्मादी करणारे अविवेकी राजकीय नेतृत्व परंपरा, संस्कृती आणि अभिरुची सगळ्यांनाच रसातळाला घेऊन जाते.

‘‘विवेक’’ हा सुद्धा जसा तुमच्या बुद्धीत असतो तसाच ‘अविवेक’ हा सुद्धा तुमच्या बुद्धीतच असतो. तुमच्या बुद्धिची देवता तुम्हीच आहात. तुम्हाला ‘विवेक’ हवा की ‘अविवेक’? हे तुमचे तुम्हीच ठरवायचं आहे, न्यायालय किंवा सरकारनी नाही.



Erwin Schrodinger (second right front row) with Éamon de Valera at a meeting of the Dublin Institute of Advanced Studies in 1942



**आवाजी विसर्जन**

**– सप्टेंबर २०१८**

●●●

# सामर्थ्य व्यवस्थेचे

मानवाच्या इतिहासाचा अभ्यास म्हणजे त्यांनी निर्माण केलेल्या ‘व्यवस्थां’चा (Systems) अभ्यास. जन्मापासून मृत्यूपर्यंत तो त्यांनीच निर्माण केलेल्या व्यवस्थांमध्ये जगण्याकरता धडपडत असतो. मानवाच्या सर्जनाची सर्वात मोठी कलाकृती म्हणजे त्यांनी निर्माण केलेल्या व्यवस्था. या व्यवस्थेचा प्रभाव जेव्हा कमी होतो, किंवा त्या जेव्हा कोलमडतात तेव्हा ती संस्कृती लयाला गेलेली असते.

नुकताच कल्याणचा पत्रीपूल इतिहासजमा झाल्याची बातमी सर्वच वृत्तपत्रांनी दिली आहे. (महाराष्ट्र टाईम्स, सोमवार १९ नोव्हेंबर पृष्ठ १). यातली सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे नियोजित वेळेआधी एक तास हे अवाढव्य काम पूर्ण करण्यात रेल्वे यंत्रणा यशस्वी झाली होती. आपला सर्वसाधारण अनुभव लक्षात घेता; अशा गोष्टी फार क्वचित घडतात. याचं प्रमुख कारण म्हणजे या गोष्टींच्या नियोजनापासून, त्यातील सर्व घटकांमध्ये सुसुत्रता आणणे इत्यादी गोष्टी कुठेतरी ढेपाळतात. कुठलातरी घटक आपलं विहित काम अपेक्षेप्रमाणे करत नाही, किंवा हे नियोजन करणाऱ्या व्यवस्थापकांना कामाच्या आवाक्याची पुरेशी कल्पना आलेली नसते.

थोडक्यात, अशा कामांच्या यशस्वीतेकरता, त्याची 'व्यवस्था' म्हणजे सर्व घटकांमध्ये सुसुत्रता आणण्याची क्षमता आणि दृष्टी त्या नियोजकांमध्ये असावी लागते. मुंबई विद्यापीठाचा सध्याचा परीक्षांचा गोंधळ काय, किंवा आपल्या रस्त्यावरील वाहनांची अंदाधुंद वर्दळ काय, या सगळ्या घटना ह्या 'अ-व्यवस्थेची' उदाहरणे आहेत. सुभाषितकाराने म्हणूनच म्हणून ठेवले आहे की, 'अव्यवस्थित चित्तानां प्रसादोऽपि भयंकरः।'.

जे व्यक्तीच्या बाबतीत खरे आहे तेच समाजाच्या बाबतीतही लागू होतं.

मानववंशशास्त्रीय किंवा शरीररचनाशास्त्राप्रमाणे सगळ्या प्राणीमात्रांची उत्क्रांतीच मुळी एका पेशीपासून वाढत बहुपेशीय प्राण्यांमध्ये झाली. त्यांची अवयवांची उत्क्रांती देखील गरजांप्रमाणे होऊ लागली. तसेच, गरज नसलेले अवयव गळूनही पडायला लागले. पण मानवाचा विकास म्हणजे केवळ शरीर-शास्त्रीय रचनांमधील उत्क्रांती नाही, तर त्यांनी निर्माण केलेल्या व्यवस्थांचा विकासही तेवढाच महत्त्वाचा आहे.

मानव जसा समूह करून राहू लागला तसा तो परस्परावलंबी होऊ लागला. व्यष्टी आणि समष्टी या सगळ्यांचाच विचार त्याला करणे अपरिहार्य झाले. त्याच्या आवडीनिवडी, स्वतःचे व समुहाचे संरक्षण, या सगळ्यांमधूनच त्याच्या संस्कृतीचा विकास व्हायला लागला आणि 'समाजव्यवस्था' या निर्माण व्हायला लागल्या.

अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा. त्यांची निर्मिती आणि उपयुक्तता या सगळ्यांमध्ये एक 'व्यवस्था' निर्माण व्हायला लागली. वस्तुंचा वापर, विनिमय, उपयुक्तता यांच्या सुलभ वापराकरता व्यापार, चलन व दळणवळणाकरता ह्या व्यवस्था निर्माण झाल्या.

भारत हा एक प्राचीन देश आहे. त्याचे साहित्य, स्थापत्य, कला यांच्या निर्मिती आणि वहना करताही अशा व्यवस्था निर्माण झाल्या. इतर प्राणी आणि मुनष्य यातला सर्वात महत्त्वाचा फरक म्हणजे त्याची भाषेची क्षमता. पुढे ज्यावेळी लेखनकला उदयास आली तेव्हा या व्यवस्थेचे 'संहिती'करण व्हायला लागले. आपण भारतामध्ये तर धर्म, अर्थ, काम आणि मोक्षादी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणाऱ्या व्यवस्था व त्यांचे संहितीकरण केले आहे. ऐहीक आणि पारमार्थिक जीवन सुसह्य आणि सुखकारक करण्याकरता भारतीय संस्कृतीने लग्न, कुटुंब, संस्कार इ. वैशिष्ट्यपूर्ण व्यवस्था निर्माण केल्या.

यातली सर्वात महत्त्वाची 'व्यवस्था' म्हणजे 'वर्णाश्रम' व्यवस्था.

भारताप्रमाणेच ग्रीक आणि रोमन संस्कृत्या देखील होत्या. त्यांच्याही 'व्यवस्था' होत्या. आजचा पाश्चात्त्य समाज आपल्या संस्कृतीची मूळं या ग्रीक आणि रोमन संस्कृती, अर्थात 'व्यवस्थां' मध्ये शोधतो. रोमन साम्राज्य इसवीसनाच्या ५ व्या शतकात लयाला गेले. तेव्हापासून, ते १५ व्या शतकापर्यंतचा (मध्ययुगीन) काळ हा पाश्चात्त्य संस्कृतीचे 'अंधारयुग' होते. याचे मूळ कारण त्यांच्या व्यवस्थेचे स्रोत नष्ट झाले होते व नवीन व्यवस्था आणण्याची व टिकवण्याची क्षमता त्यांच्यात नव्हती. 'प्रबोधन' युगाचे प्रयोजनच मुळी आपल्या मूळ व्यवस्था, म्हणजे ग्रीक किंवा रोमन व्यवस्थेकडे जाण्याचे होते. ख्रिस्ती धर्मामध्ये आलेल्या भ्रष्टाचारामुळे सर्वसामान्य मुनष्य नाडला होता. प्रबोधन युगातूनच पुढे विज्ञानयुग व यंत्रयुग सुरू झाले. याचा परिणाम त्यांच्या संपूर्ण जीवनशैलीवर झाला आणि यातूनच आधुनिक पाश्चात्त्य जीवनशैलीची नवीन व्यवस्था निर्माण झाली.

मध्ययुगीन काळ हा भारताचे अंधकार युग नव्हते. ५ व्या ६व्या शतकात भारतात कालिदास, आर्यभट निर्माण झाले. भारतातल्या 'अव्यवस्थेला' सुरुवात ८-९ व्या शतकातील सिंध मधील इस्लामी आक्रमणांनी झाली. १२ व्या शतकात ही आक्रमणं दिल्लीपर्यंत येऊन पोहोचली व पुढचा मुघल इतिहास आपल्याला परिचित आहेच.

या सात-आठशे वर्षांच्या आक्रमणाच्या इतिहासामध्ये भारतीय 'समाजव्यवस्था' संपूर्णपणे विस्कळीत झाली. अशी अंदाधुंद आक्रमणे व बलात्कारांच्या पार्श्वभूमीवर नवीन विचार तर सोडूनच द्या, पण स्थिरावलेल्या व्यवस्थेलाही टिकवणे कठीण होऊन बसले. भारतातल्या समाजव्यवस्थांची नाळ ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जोडली गेली होती. इस्लामी आक्रमक व नंतरच्या वसाहतवाद्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्था आणि त्यांचे एकमेकांवरील परस्परावलंबित्व जवळजवळ नष्ट केले. पाश्चिमात्य संस्कृती आणि नवविज्ञानाला सुलभ अशा व्यवस्था निर्माण व्हायला लागल्या.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (१७०७) मुघल सत्ताही संपली होती. तत्कालीन सरदारांनी आपापल्या भौगोलिक क्षेत्रामध्ये स्वतःच्या स्वायत्त 'व्यवस्था' निर्माण केल्या. अर्थात त्या व्यवस्थाही व्यापक 'अ'व्यवस्थेचाच भाग होत्या.

१६०० मध्ये राणीचा जाहीरनामा घेऊन इस्ट इंडिया कंपनीचे व्यापारी भारतात आले. अर्थातच ते व्यापार करण्याकरता आले होते, राज्य करण्याकरता नव्हे. सुरत, कलकत्ता, मद्रास, मुंबई इथे त्यांच्या वखारी निर्माण झाल्या. तत्कालीन भारताच्या 'अव्यवस्थेचा' त्यांनी पुरेपूर फायदा उठवायला सुरुवात केली. १७५७ मधील प्लासीची लढाई आणि १८५७ मधील पहिले भारतीय स्वातंत्र्ययुद्ध या काळामध्ये व्यापारी ईस्ट इंडिया कंपनी हळूहळू राज्यकर्ती व्हायला लागली. १७६५ मधील अलाहाबादच्या करारामुळे तत्कालीन मुघल सत्ताधीशांनी बंगालमधील करवसुलीचे अधिकार म्हणजे 'दिवाणी' ईस्ट इंडिया कंपनीकडे सोपवले.

इंग्रजी 'व्यवस्थेच्या' उत्कर्षाची आणि भारतीय व्यवस्थेच्या अधोगतीची ती सुरुवात होती.

१८५७ चे युद्ध इंग्रज जिंकले व भारतावर राणीचे राज्य सुरू झाले. आधीच्या १०० वर्षांमध्ये महसूल व्यवस्थेपासून शिक्षणव्यवस्थेपर्यंतच्या सर्व 'भारतीय' व्यवस्थांचे संक्रमण 'इंग्रजी' व्यवस्थेच्या अनुरूप होऊ लागले. १८३५ च्या मेकॉलेच्या शैक्षणिक व्यवस्थेने या नवव्यवस्थेला फार मोठे बळ दिले.

संबंध भारताकरता त्यावेळी बनारस (काशी) हे शिक्षण व धर्म व्यवस्थेचं एक मोठं केंद्र होतं. १७९१ साली तिथे 'बनारस संस्कृत विद्यालयाची' स्थापना झाली. याचा मूळ उद्देश हा संस्कृत पाठशाळेला 'पर्यायी' व्यवस्था निर्माण करण्याचा होता. म्हणून तिथे मूळ शिक्षण हे संस्कृतकेंद्री होते. लौकरच पंडितांना इंग्रजी शिक्षण द्यायला सुरुवात झाली. एका 'परिवर्तनाची' ती सुरुवात होती. हा बदल फक्त भाषेतला नव्हता, तर जीवनशैलीपासून ते सांस्कृतिक व्यवस्थेपर्यंतचा होता.

भारतीय व्यवस्थांच्या 'पाश्चिमात्यी' करणाची ती सुनियोजित सुरुवात होती. हळूहळू अनेक पंडित, त्यांचे प्राथमिक शिक्षण जरी पाठशाळेत झाले असले तरी पुढील शिक्षणाकरता ते बनारस संस्कृत विद्यालयात येऊ लागले. तिथे इंग्रजीबरोबर त्यांना पाश्चात्त्य विज्ञान शिकवायला सुरुवात झाली. सुरुवातीला बेकनपासून न्यूटनपर्यंतच्या ग्रंथांची भाषांतरे संस्कृतमध्ये व्हायला लागली. याचबरोबर भारतीय संस्कृतीचा मागासलेपणा व पाश्चात्त्य संस्कृती व विज्ञानाच्या पुढारलेपणाची मात्रा देखील पंडितांना मिळू लागली.

१८५३ साली या महाविद्यालयाचे रूपांतर एका मोठ्या विद्यापीठात करण्यात आले. याची नवीन बांधलेली इमारत ही नव गोथीक स्थापत्यरचनेनुसार बांधली

गेली. यात शिरणारा प्रत्येक पंडित हा या स्थापत्य शैलीप्रमाणे, पाश्चात्त्य सांस्कृतिक व्यवस्थेने भारावून जाऊ लागला. आज तिथे 'संपूर्णानंद विश्वविद्यालय' आहे.

इंग्रजांनी शैक्षणिक व्यवस्थेमधील बदलाचे हे प्रारूप (बनारस मॉडेल) मुंबई व दक्षिणेकडेही कमी अधिक प्रमाणात राबवले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतातल्या बहुतेक विचारवंतांची पीढी ही या इंग्रजी शिक्षणाच्या व्यवस्थेतून बाहेर पडलेली होती. मेकॉलेच्या स्वप्नाप्रमाणेच ते हाडामासाने 'भारतीय' तर आचारविचार व संस्कृतीनी 'पाश्चात्त्य' संस्कृतीचा भाग होऊ लागले होते.

परंपरागत पाठशाळा, त्यातील व्याकरण, मीमांसेपासून ग्रहगणितापर्यंतचे शिक्षण, एका अत्यंत तरल, विश्लेक्षण क्षमता असलेल्या पंडितांची निर्मिती करत होत्या. ती व्यवस्था हळूहळू इतिहासजमा व्हायला लागली आणि या पाठशाळांचे रूपांतर 'पाठांतर' शाळेत झाले, की जे आजही चालू आहे. पाठशाळा या फक्त पंडितांकरता होत्या. बहुसंख्य समाजाच्या शिक्षण व्यवस्था या त्यांच्या परंपरागत व्यवसायाच्या कौशल्य-विकासातून होत होत्या. मेकॉलेच्या इंग्रजी शिक्षण व्यवस्थेनंतर या सगळ्या परंपरागत शिक्षण व्यवस्था मोडीत निघाल्या. त्याचा भयंकर परिणाम त्यांच्या समाजव्यवस्थांवर झाला.

मुघल व इंग्रजी आक्रमकांमध्ये एक फार मोठा फरक होता. इंग्रजांना नुकत्याच युरोपमध्ये होत असलेल्या प्रबोधन युगाची पार्श्वभूमी होती. ग्रीक, लॅटिन भाषेप्रमाणेच त्यांच्या व्यवस्थांचेही संस्कार त्यांच्यावर होते. इंग्रजांप्रमाणेच फ्रेंच, पोर्तुगीज व स्पॅनिश वसाहतवादालाही याचवेळी सुरवात झाली.

अमेरिका व आफ्रिका खंडामध्ये त्यांच्या वसाहती स्थापन झाल्या. पण या सगळ्या देशांमध्ये त्यांना विकसित संस्कृती कुठेही आढळली नाही. भारताची परिस्थिती वेगळी होती. मुघली आक्रमणांमुळे भारतीय व्यवस्था विस्कळीत झाली असली तरीही संस्कृतसारखी भाषा, स्थापत्य आणि तत्कालीन समाजव्यवस्था या त्यांच्या अपेक्षांपेक्षा कितीतरी विकसित होत्या. यातूनच या व्यवस्थांचा अभ्यास करण्याची त्यांची इच्छा निर्माण झाली. पश्चिमात्य संस्कृतीपेक्षा प्राचीन आणि विकसित अशा भारतीय संस्कृतीचे वास्तव त्यांना, विशेषतः धर्म प्रसारकांना मान्य करणे कठीण होऊन बसले. भारतीय समाज व्यवस्थेची वीण एवढी प्रभावी होती की, त्यांचे पाश्चिमात्यीकरण होत असले तरी धर्मांतर होत नव्हते. यातच सुधारणेच्या नावाखाली या व्यवस्थांना सुरुंग लावायला सुरवात झाली.

कालक्रमणामध्ये प्रत्येक व्यवस्थेवर जळमटे बसतात. त्यामध्ये सुधारणाही आवश्यक असतात, पण सुधारणा म्हणजे 'मोडतोड' नाही. व्यवस्थेचा मूळ आशय समजून त्यात बदल किंवा सुधारणा करायच्या असतात. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात आलेल्या मार्क्सच्या सिद्धांतानी भारतीय व्यवस्थांच्या या मोडतोडीत मोठा हातभार लावला. मार्क्सवाद आज जवळजवळ मोडीत निघाला असला तरी त्यानी भारतीय व्यवस्थांचे केलेले नुकसान भरून काढणे कठीण काम आहे.

वॉरन हेस्टिंग हा भारताचा पहिला गव्हर्नर जनरल. महसुलाप्रमाणेच इतरही व्यवस्थापन आणि न्यायादानाची जबाबदारीही त्यांच्यावर येऊ लागली. वॉरन हेस्टिंग हा दूरदृष्टी व धोरणी मनुष्य होता. १७५० मध्ये एक लिपिक म्हणून ईस्ट इंडिया कंपनीत तो रुजू झाला होता. पुढच्या ३० वर्षांमध्ये इंग्रज-भारतीयांमध्ये झालेल्या अनेक युद्धांमध्ये त्याचा सहभाग होता. भारतीय समाज व संस्कृतीची त्याला चांगली ओळख झाली होती. यांच्यावर राज्य करायचे तर ते त्यांच्याच सांस्कृतिक व्यवस्थेनुसार करायला हवे हे त्याने ओळखले होते. यातूनच त्यांनी पंडितांना एक नवीन 'स्मृती' तयार करण्याची विनंती केली आणि तशी ती त्याने करवून घेतली.



L E T T E R

FROM

WARREN HASTINGS, Eſq.

Governor-General of *Fort-William*, in *Bengal*,

TO THE

COURT OF DIRECTORS

OF THE

United Company of Merchants of *England*, Trading to the

EAST-INDIES.

HONOURABLE SIRS,

I HAVE now the Satiſfaction to tranſmit to you a complete and corrected Copy of a TRANSLATION of the GENTOO CODE, executed with great Ability, Diligence and Fidelity, by Mr. *Halhed*, from a Perſian Verſion of the original Shanſcrit, which was undertaken under the immediate Inſpection of the Pundits or Compilers of this Work.

I HAVE

**वॉरन हेस्टिंग्ज यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांना लिहिलेले पत्र**



A

CODE

OF

GENTOO LAWS,

OR,

ORDINATIONS

OF THE

*PUNDITS*,

FROM A

PERSIAN TRANSLATION,

MADE FROM THE

ORIGINAL,

WRITTEN IN THE

SHANSCRIT LANGUAGE.

*LONDON*:

Printed in the Year M DCC LXXVI.

**विवादार्णवसेतूचे १७७६ साली प्रकाशित झालेले इंग्रजी भाषांतर**

'विवादार्णवसेतू' हे त्या नव-स्मृतीचे नाव. आधीच्या अनेक स्मृतींमधले दाखले घेऊन तयार केलेले हे अपत्य असल्यामुळे त्याला अपेक्षित अधिकार प्राप्त होऊ शकला नाही. त्याचे पहिले भाषांतर पर्शियनमध्ये झाले. पर्शियनमधून त्याचे भाषांतर, नथॅनियल हॉलहेड (Nathaniel Halhed) यांनी "A" Code of Gentoo Laws" या शीर्षकाखाली इंग्रजीत केले. हॉलहेड यांनी याला एक प्रदीर्घ प्रस्तावनाही लिहिली आणि १७७६ साली ते प्रकाशित झाले. यामध्ये इंग्रजांची 'नवीन' व्यवस्था निर्माण करण्याकरता केलेले प्रयत्न, धडपड व काळजी लक्षात येते.

व्यवस्थाबदल ही कधीही सोपी प्रक्रिया नसते. या बाबतीत इंग्रजांनी बाळगलेला संयम आणि मुत्सद्दीपणा याला जगात तोड नाही.

आपल्याला स्वातंत्र्य मिळून आज ७० वर्षे झाली. आपणही एक नवीन व्यवस्था म्हणजे 'घटना' लिहिली. दुर्दैवाने त्याची पाळेमुळे ही भारतीय संस्कृतीमध्ये नव्हती. ती जगातली सर्वात मोठी घटना आहे. जगातल्या तत्कालीन अशा अनेक घटनांमधील व्यवस्था एकत्र करून बांधलेली ती एक गोधडीच आहे. आजही ती भारतीय सांस्कृतिक व्यवस्थेशी एकरूप होऊ शकलेली नाही. ७० वर्षांत १०० वेळा त्यामध्ये बदल करायला लागले.

वॉरन हेस्टिंग्जनी लिहून घेतलेली 'विवादार्णवसेतू' काय किंवा आपली सध्याची घटना काय, या उसनेगिरी करून लिहिलेल्या व्यवस्था असल्यामुळे केव्हाच प्रभावी होऊ शकत नाहीत. अस्सल आणि नक्कल यातला हा फरक आहे.

या बाबतीत ब्रिटिशांकडून आपण काहीच शिकलो नाही. भारतावरती ते १५० वर्षे राज्य का करू शकले याचे उत्तर, ब्रिटिशांनी भारतीय व्यवस्थेच्या केलेल्या अभ्यासामध्ये आहे. ख्रिस्ती धर्मप्रसारकांचा हेतू हा या व्यवस्थेला सुरुंग लावण्याचा होता. फार मोठ्या प्रमाणावर ते यामध्ये यशस्वीही झाले.

नियोजित वेळेच्या आधी पुरा झालेल्या पत्रीपुलाच्या (कामाच्या) यशाचे गमक हे या सर्व घटकांमध्ये आलेल्या सुसुत्र 'व्यवस्थेला' आहे. प्रत्येक घटक जेव्हा आपल्या जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडतो तेव्हाच कुठलीही व्यवस्था यशस्वी होऊ शकते; मग ती राजकीय असो, सामाजिक असो, वा शैक्षणिक असो.

दुर्दैवाने भारत हा फार मोठ्या 'अव्यवस्थेकडे' मार्गक्रमण करताना दिसतोय. याचे मुख्य कारण म्हणजे तो आज कुठलीच 'व्यवस्था' प्रामाणिकपणे पाळायला तयार नाही. कायदे, नियम हे पाळण्यापेक्षा ते मोडण्यामध्ये तो अधिक धन्यता मानतो! विद्यादेवतेचे (गणपतीचे) उत्सव रस्त्यावर वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा करत साजरा करणे, किंवा इतर अशा उत्सवांना राजकीय हेतूने 'आवाजी' करणे आणि त्याला संस्कृती रक्षण म्हणणे, या सारखा दुसरा मोठा विनोद नाही. उत्सवांचे राजकारण्यांनी केलेले बकालीकरण ही खरं म्हणजे फार मोठी सांस्कृतिक शोकांतिका आहे.

लग्न असो, कुटुंब किंवा वाहतूक असो, या सगळ्या व्यवस्थांना एक लक्ष्मणरेषा असते. तिचा आदर केला तरच या व्यवस्था यशस्वी होऊ शकतात. तात्पुरत्या वैयक्तिक स्वार्थाकरता तिचा अनादर हे गोंधळाला निमंत्रण असते. आजचे भारतीय राजकारण आणि राजकारणी हे व्यक्तीगत किंवा समूह स्वार्थाकरता 'व्यवस्थां'ना सुरुंग लावण्यात मग्न आहेत. अशा अव्यवस्थेमधून फक्त अराजकच निर्माण होऊ शकते.

म्हणूनच या अराजकतेपासून देशाला वाचवायचे असेल तर अग्रक्रमाने परंपरागत (सु)व्यवस्थांचे सामर्थ्य लक्षात घेऊन त्यांचा आदर करणे अपरिहार्य आहे. आधुनिक शिक्षणामध्येच परंपरागत समाजव्यवस्थांमागील मूल्यांची तोंडओळखही हे काम करू शकेल. भाषेला समृद्ध करणारी पाणिनीची 'व्याकरण' व्यवस्था आणि गणिताचा आत्मा असलेली 'शून्य' आणि 'अंक' ही व्यवस्था भारताची देण आहे हे यावेळी विसरून कसं चालेल?

**– नोव्हेंबर २०१८**

❖❖❖

# वसाहतवाद (Colonization) आणि कालगणना

१ जानेवारी हा आधुनिक दिनदर्शिकेचा (कॅलेंडर) पहिला दिवस. जानेवारी ते डिसेंबर अशा १२ महिन्यांमध्ये ही दिनदर्शिका विभागली गेली आहे. आपले सर्व व्यवहार या दिनदर्शिकेप्रमाणे होतात. या दिनदर्शिकेला फारसा वैज्ञानिक आधार नाही. पोप ग्रेगरी १३ वे यांनी या आधीच्या दिनदर्शिकेमध्ये सुसूत्रता आणण्याकरता विद्वानांना पाचारण केले आणि त्यात सुधारणा करून आजची दिनदर्शिका अस्तित्वात आली. १५ ऑक्टोबर १५८२ मध्ये या सुधारित दिनदर्शिकेचा स्वीकार केला गेला.

पाश्चात्त्य संस्कृती, त्यांच्या संस्कृतीचा उगम हा रोमन व ग्रीक संस्कृतीत असल्याचे मानते. अर्थातच २००० वर्षांपूर्वी रोमन संस्कृतीची जी दिनदर्शिका होती त्यामध्येही वास्तव परिस्थिती आणि दिनदर्शिका यामध्ये तफावत यायला लागली. म्हणून जूलीयस सिझर यांनी ख्रिस्तपूर्व ४६ साली त्यामध्ये सुधारणा केली. म्हणून त्याला 'ज्यूलीयन' दिनदर्शिका (कॅलेंडर) म्हणून संबोधले जाते. हाच प्रकार १६ व्या शतकात

घडल्यानंतर पोप ग्रेगरी यांनी त्या कालमापनामध्ये सुसूत्रता आणली व त्यामुळे त्याला 'ग्रेगरी' दिनदर्शिका म्हटले जाते.

पोप ग्रेगरी यांच्या सुधारणेनंतरही सर्व ख्रिस्ती जगताने त्याचा अवलंब केला नव्हता. ग्रेगेरियन दिनदर्शिकेमध्ये ज्यूलियन दिनदर्शिकेमधील ११ दिवस काढून टाकण्यात आले होते. आजही रशियामधील ऑर्थोडॉक्स चर्च ज्यूलीयन दिनदर्शिका वापरते. अफगाणिस्तान व इराणमध्ये सौर हिजरी दिनदर्शिका वापरतात. इथोपियाची दिनदर्शिका वेगळी आहे. नेपाळमध्ये विक्रम संवत् आजही वापरले जाते. तरीही जवळजवळ ९९% जग हे 'ग्रेगेरियन' दिनदर्शिकेचाच वापर करते.

दिनदर्शिकेचा वापर हा प्रामुख्याने धार्मिक विधी, सण यांच्याकरता केला जायचा. साहजिकच जुलीयन काय किंवा ग्रेगेरियन काय, या दिनदर्शिकेच्या रचनेमध्ये ख्रिस्ती धर्मीय सण आणि उत्सव यांचा प्रभाव आहे. कालमापनामध्येही आपण AD, किंवा BC यांचा जो वापर करतो त्याचा संबंधही ख्रिस्तजन्माशी आहे. BC म्हणजे ख्रिस्तपूर्व, अर्थात Before chirst हे इंग्रजीमध्येही म्हटले जाते. तथापि AD म्हणजे Anno Domini अशा लॅटीन शब्दांनी उच्चारले जाते. Anno Domini म्हणजे (The year Jesus wars born) ख्रिस्तजन्माचे वर्ष. यातल्या ख्रिस्ती संदर्भाला बगल देण्याकरता आजकाल AD च्या जागी CE म्हणजे Common Era आणि BCE म्हणजे Before Common Era म्हणून संबोधले जाते. अर्थातच यामुळे आधुनिक दिनदर्शिकेचा ख्रिस्तीधर्माशी असलेल्या संबंधामध्ये फारसा फरक पडत नाही.

या दिनदर्शिकेच्या महिन्यांची नावेही बहुतांशी रोमन व ग्रीक देवतांशी निगडित आहेत. रोमन देवता 'जानस्' (Janus) यावरून जानेवारी महिन्याचं नाव पडलं. रोमन उत्सव 'Februa' वरून फेब्रुवारी महिना आला. रोमन युद्धदेवता 'मार्स' यावरून मार्च महिना आला. ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर मात्र पूर्वीच्या रोमन दिनदर्शिकेतील ८, ९, १० व्या या अर्थाच्या लॅटीन शब्दांवरून आले आहेत.

स्वातंत्र्यानंतर भारतामध्येही वेगवेगळे प्रांत व पंथांची मिळून जवळजवळ २५ ते ३० पंचांग/ दिनदर्शिका होत्या. त्यामध्ये सुसूत्रता आणण्याकरता मेघनाद साह यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासकांची एक समिती नेमण्यात आली. त्यांनी या सर्व दिनदर्शिकांचा व आधुनिक वस्तुस्थितीचा सांगोपांग अभ्यास करून, परंपरेचाही आदर राखून 'शालिवाहन शके' दिनदर्शिका तयार केली. सरकारी राजपत्रानी त्यावर

आपली मोहर उमटवली. आकाशवाणीने तशी बातमीही प्रसृत केली. चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८७९ म्हणजे आधुनिक दिनदर्शिकेप्रमाणे २२ मार्च १९५७ साली या सुधारीत भारतीय दिनदर्शिकेला सुरुवात झाली. यामध्ये परंपरागत कालगणना आणि ग्रेगेरियन दिनदर्शिकेचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दुर्दैवाने आजही काही सरकारी अध्यादेश सोडले तर त्याचा वापर कुठेच दिसत नाही. तसा प्रामाणिक प्रयत्नही कुठल्याच स्तरावर होताना दिसत नाही.

कुठल्याही संस्कृतीमध्ये कालगणना ही असावीच लागते. बाबीलोनियन, ग्रीक, रोमन या सगळ्या सभ्यतांमध्ये कालमापनाची पद्धती होती. त्या बहुतांश दिनदर्शिकांचा संबंध हा आकाशस्थ ग्रहतारे, नक्षत्रांशी होता. वर सांगितल्याप्रमाणे या सगळ्याचा वापर हा त्या त्या सभ्यतांचे धार्मिक उत्सव आणि सण साजरे करण्याकरता प्रामुख्याने होत असे. काही शतकांमध्ये आकाशस्थ ग्रहांची परिस्थिती बदलते, आणि प्रत्यक्ष नक्षत्र किंवा ग्रहस्थिती व वास्तवातील सण किंवा उत्सव यामध्ये तफावत यायला लागते. जुलीयनपासून ग्रेगेरियनपर्यंत आणि भारतामधील अनेक पंचांगांच्या निर्मितीमध्ये झालेले बदल हे वास्तव आणि आकाशस्थ ग्रहांची परिस्थिती या मधील तफावतीत सुधारणा करण्याकरता केले गेले आहेत.

यातूनच भारतामध्ये ग्रहगणिताचा उगम झाला. यांच्या इतिहासावर आज अनेक ग्रंथ तर उपलब्ध आहेतच, पण त्यावर दरवर्षी काही शेकड्यांनी शोधनिबंधही लिहिले जातात. गार्गसंहिता ही अशीच १-२ ऱ्या शतकातील ज्योतिष / ग्रहगणितावरची महत्त्वाची पोथी. डॉ. यानो यांच्या मार्गदर्शनाखाली जपानच्या क्योटो विद्यापीठात डॉ. बिल मॅक हे त्यावर संशोधन करत आहेत. अशा अनेक संहिता आज संशोधनाच्या प्रतिक्षेत आहेत. शं. बा. दीक्षित या अभ्यासकांनी या विषयावर आणि भारतीय ग्रहगणिताच्या अभ्यासकांवर १८९६ साली 'भारतीय ज्योतिषाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास' हा संशोधनपर ग्रंथ लिहिला आहे. प्रत्येकाने वाचावा असा या शास्त्राच्या इतिहासाचा हा प्रमाणग्रंथ आहे. त्याचे महत्त्व लक्षात घेऊन भारत सरकारने त्याचे हिंदी व इंग्रजीमध्ये भाषांतर करून घेतले आहे.

दीक्षितांकडून स्फूर्ती घेऊन २० व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये सुधाकर द्विवेदी, आणि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये डेव्हीड प्रींग्री (David Pingree) यांनी भारतीय ग्रहगणिती व त्याच्या इतिहासावरती पाच खंडांमध्ये Census of the exact sciences in Sanskrut हा ग्रंथ लिहिला.

भारताने कालमापन क्षेत्रामध्ये प्रचंड प्रगती केली होती. भारतीय महिन्यांची नावे ही नक्षत्रांवरून घेतली आहेत. सर्व भारतीय सण आणि उत्सव हे निसर्गाच्या कुठल्यातरी बदलांशी जोडले गेले आहेत. यावर आधारितच भारतीय ऋतुंची आखणी दिसून येते. ऋतुंना भारतीय कालगणनेमध्ये महत्त्वाचे स्थान आहे.

लोकमान्य टिळक हे राजकारणी म्हणून आपल्याला माहिती असले तरी ते थोर गणिती होते. 'ऋतू' आणि 'कालमापन' यांचा परस्पर संबंध त्यांना चांगला समजला होता. भगवद्‌गीतेतील दहाव्या अध्यायातील ३५ व्या श्लोकात, 'मासामां मार्गशीर्षोऽहं ऋतुणां कुसुमाकरः' असे म्हटले आहे (१०.३५). या श्लोकामधील 'वसंत' ऋतू व 'मार्गशीर्ष' महिन्याच्या संदर्भावर लोकमान्य टिळक थबकले. 'महिन्यांमध्ये मार्गशीर्ष मी', व 'ऋतुंमध्ये वसंतऋतू मी' अशी विभूती भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात. सद्यपरिस्थितीप्रमाणे नवीन वर्षाची सुरुवात ही 'चैत्र' महिन्यात व 'वसंत'ऋतुने होते. मग श्रीकृष्णाने महिन्यामध्ये 'मार्गशीर्ष' हे नाव का घेतले असावे असा प्रश्न टिळकांना पडला. या प्रश्नाचे उत्तर ते शोधू लागले. यातूनच त्यांनी वसंतऋतू हा मार्गशीर्ष महिन्यात केव्हा असू शकतो याचे गणित मांडायला सुरुवात केली. अभ्यासकांनी याकरता त्यांचा 'ओरायन' हा ग्रंथ वाचायला हवा. आपले कालमापन किती शास्त्रशुद्ध आहे याकरता दुसऱ्या पुराव्याची गरज नाही.

इंग्रज १६ व्या शतकात भारतात आले असले तरी त्यांच्या वसाहतवादाची सुरुवात ही १९ व्या शतकात झाली. सर्वसामान्य समाजाला नियंत्रित करणारी न्यायव्यवस्था, महसूल, शिक्षण याची सर्व सूत्रे याच काळामध्ये इंग्रजांच्या हातात गेली. साहजिकच इंग्रजांच्या कालगणनेपासून इतर सगळ्या त्यांच्या व्यवस्था या पाश्चिमात्य संस्कृती व मानसिकतेशी मिळत्याजुळत्या होत्या. याचवेळी युरोपमध्ये वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांतीही प्रस्थापित झाली होती.

मसाल्याच्या पदार्थांच्या निर्यातीसाठी भारतात आलेले इंग्रज हे १९ व्या शतकात औद्योगिकीकरणातून निर्माण झालेल्या वस्तू भारतात आयात करू लागले. 'खेडे'केंद्री असलेली भारतीय अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था यामुळे संपूर्णतः खिळखिळी झाली. त्यामुळे त्यात काही अपप्रवृत्तीही निर्माण झाल्या. अर्थातच या उणिवांवरती बोट ठेवीत सुधारणांना सुरुवात झाली. उणिवा दूर होण्याबरोबरच मूळ भारतीय संकल्पनाच उद्‌ध्वस्त व्हायला लागल्या. परंपरा म्हणजे मागासलेपणा आणि पाश्चिमात्य विचार आणि शिक्षण म्हणजे प्रगती आणि आधुनिकता हे

समीकरण याचवेळी प्रस्थापित व्हायला सुरुवात झाली. विस्कळीत झालेले उद्योगधंदे, त्यावर आधारित कोलमडणारी अर्थव्यवस्था यामुळे या मानसिकतेवर शिक्कामोर्तब व्हायला लागले. मेकॉलेप्रणीत नवीन शिक्षण प्रणालीने या बदलाला प्रचंड सहाय्य केले. ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी याचा सर्वात जास्त फायदा घेतला. 'परंपरांची मोडतोड म्हणजेच सुधारणा' या मंत्राचा आधार घेत इंग्रजांनी आपल्या सांस्कृतिक वसाहतवादाची मुहूर्तमेढ रचायला सुरुवात केली.

याचवेळी हेच इंग्रज भारतीय साहित्य, जीवनशैली आणि गणितादी विज्ञानाचा अभ्यास करू लागले. त्याकरता ते संस्कृत शिकले. याच्या अभ्यासाकरता त्यांनी संशोधन संस्था काढल्या. भारतीय संस्कृती 'सृजना'मध्ये कुठेही कमी नव्हती हेही त्यांनी मान्य केले. तरीही सुधारणांच्या नावाखाली सर्वच भारतीय संस्कृती, सामाजिक आणि वैज्ञानिक विचार हा पुराणकथांमध्ये समाविष्ट झाला.

प्राचीनकाळामध्ये भारतामध्येही अनेक बदल होत होते. वैदिक भारतामध्ये बौद्ध, जैन असे मत/विचार प्रवाहही निर्माण झाले. पण त्या सगळ्यांच्या मुळाशी भारतीय तत्त्वज्ञान म्हणजे दर्शनशास्त्रे होती. त्यांच्या भाषेमध्ये, वेषामध्ये परिवर्तन होत होते; पण तो भारतीय संस्कृतीच्या विकासाचा टप्पा होता. १९ व्या शतकात वसाहतवाद जे करत होते ते संपूर्णतः वेगळे होते. भारतीय विचार त्यामधून लोप होत होता. त्यावर पाश्चिमात्य विचारसरणीला सोयिस्कर व्यवस्थांचे रोपण होत होते.

भौगोलिक वसाहतवाद संपवता येतो पण सांस्कृतिक वसाहतवाद खोलवर रुजलेला असतो. तो मूळ संस्कृतीलाच संपवतो.

भाषा, वेष, विज्ञान हे सगळे संस्कृतीचेच कंगोरे असतात. त्यामध्ये संस्कृतीला सुसंगत बदलही होत असतात. 'वसाहतवाद' नुसता बदल करत नाही, तर संपूर्ण व्यवस्थेचे तो परिवर्तन करतो. आपण स्वीकारलेले आजचे पाश्चिमात्य कालमापन आणि भारतामध्ये हजारो वर्षांच्या परंपरेने निर्माण झालेले कालमापन (पंचांग), हे 'वसाहतवाद' काय करू शकतो याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

भारतीय पंचांग हे ग्रहगणितावर आधारित आहे. निसर्ग, परिसर आणि संस्कृतीचे त्यात प्रतिबिंब आहे. आपण वसाहतवादाच्या प्रभावाखाली स्वीकारलेल्या पाश्चिमात्य कालगणनेपेक्षा ते काकणभरही कमी वैज्ञानिक नाही. फक्त 'दिनांक' आणि 'वारा' पलीकडे दैनंदिन जीवनाला लागणारी बरीच माहिती आपले पंचांग देते.

भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञानाचा प्रभाव मध्यपूर्व व दक्षिणपूर्व आशिया खंडामध्ये मोठ्याप्रमाणावर दिसून येतो. त्यांच्या भाषांमधून अनेक संस्कृत शब्द आढळतात. त्यांचे सण आणि उत्सव रामायण, महाभारतादी कथांवर आधारित आहेत. त्यांचे कालमापन देखील हिंदू परंपरेनुसार आहे. बाली, इंडोनेशियामध्ये आजही या कालगणनेचा प्रभाव दिसून येतो. तरीही त्याला भारतीय वसाहतवाद म्हणून संबोधले जात नाही. याचे मुख्य कारण म्हणजे भारताने तिथल्या परंपरांवरती कुठेही अतिक्रमण केले नाही. त्यांच्या विकासाकरता त्यांना अधिक प्रगत अशा भारतीय परंपरा घ्यायला लागल्या.

'इंग्रजी वसाहतवाद' हा त्यापेक्षा वेगळा आहे. भारताला एक विकसित परंपरा होती. समजा भारतात वसाहतवाद आला नसता तर भारतानेही आधुनिक व्यवस्थांचा स्वीकार भारतीय व्यवस्थेमध्ये करून घेतला असता. 'वसाहतवाद' मूळ विचार संपवतो आणि संपूर्णतः भिन्न संस्कृतीचे त्यावर रोपण करतो. त्यामुळे पाश्चिमात्यांचे अनुकरण व स्वतःच्या संस्कृतीबद्दल कायम हीनपणा यातून 'खेचर' संस्कृती निर्माण होते. अशा खेचर संस्कृतीतून 'सृजनशीलता' कधीच निर्माण होऊ शकत नाही; शिल्लक राहते ते फक्त अनुकरण. भारतीय कालमापनाला आपण दिलेली सोडचिठ्ठी हे याचे चांगले उदाहरण आहे!

**– जानेवारी २०१९**

❖❖❖

# संस्कृत, जर्मनी आणि Oriental Renaissance

१८१८ साल भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे वर्ष ठरले. १८१८ लाच पेशवाई खालसा झाली आणि इंग्रजांच्या वसाहतवादाने बहुतेक सर्व भारताचा ताबा घेतला. १८१८ साली जरी भौगोलिक ताबा इंग्रजांना मिळाला असला तरी प्रत्यक्ष राज्य करण्याकरता लागणाऱ्या न्याय, महसुलापासून प्रशासनाच्या व्यवस्था त्यांच्या ताब्यात आल्या नव्हत्या. ८-९ व्या शतकात सिंधमध्ये सुरू झालेलं इस्लामी आक्रमण १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात थोपवलं असलं तरी या १००० वर्षांत, कायम युद्ध सदृश परिस्थितीमुळे या व्यवस्था कमकुवत झाल्या होत्या. साहजिकच बाबरापासून औरंगजेबापर्यंत मुघल राज्यकर्त्यांनी त्यांच्या मूळ संस्कृतीला सोइस्कर असे अनेक पदरही या व्यवस्थांमधून आणले होते. यामुळेच आपल्या प्राकृत भाषांमध्ये, दैनिक प्रशासकीय व्यवहारात अनेक पर्शियन शब्दांचा प्रादुर्भाव झाला होता.

स्वराज्य हे भौगोलिक जेवढे असते, तेवढेच सांस्कृतिक देखील असते हे शिवाजी महाराजांना चांगलेच समजले होते.

जिवंत रहायला जसे 'अन्न' लागते, तसेच सामाजिक सोय व संतुलनाकरता अनेक 'व्यवस्था' लागतात. त्या व्यवस्थांचा उगम हा परंपरागत संस्कृतीमध्येच असतो. त्यातूनच त्याच्या वहनाकरता भाषेमध्ये शब्द तयार होतात. त्यांचा अर्थ समजायला कुठल्याही शाळेत कधीच जायला लागत नाही. सांस्कृतिक व्यवहार हीच ती शाळा असते. संस्कृत भाषा ही अशा अर्थपूर्ण सांस्कृतिक शब्दांची खाण आहे. सर्व प्राकृत भाषांनी याचा यथेच्छ उपयोग करून घेतला आहे.

आपण वर उल्लेख केल्याप्रमाणे शिवाजी महाराजांच्या काळात असे अनेक भिन्न सांस्कृतिक छटांचे शब्द प्रशासकीय व्यवहारात आल्यामुळे, संतुलनापेक्षा गोंधळच जास्त निर्माण होत होता. म्हणूनच शिवाजी महाराजांना रघुनाथ पंडिताकडून राज्यव्यवहार कोश लिहून घ्यायला लागला. या कोशामध्ये फारसी शब्दाला अनेक संस्कृत पर्यायी शब्द आहेत.

दैनंदिन व्यवहाराकरता आपल्या समाजाचे नाते हे नैसर्गिक निसर्गक्रमाशी जोडलेले असते. याकरता पंचांग म्हणजे दिनदर्शिका तयार होत असे. आकाशस्थ ग्रहांची परिस्थिती शतकाशतकामध्ये बदलत असते. त्यामुळे पंचांगांमध्येही बदल करावे लागतात. पंचांग म्हणजेही एक सांस्कृतिक व्याकरण असते. शिवाजी महाराजांच्या काळामध्ये प्रत्यक्ष ग्रह परिस्थिती व त्यावर बेतलेले दैनंदिन व्यवहार यामध्येही तफावत आली होती. शिवाजी महाराजांनी कृष्णदैवज्ञ या ग्रहगणित तज्ज्ञाकडून त्यामध्ये सुधारणा करवून आणल्या व 'करणकौस्तुभ' हा ग्रंथ सिद्ध केला. हे सांगण्याचा मूळ उद्देश हाच आहे की, राज्य चालवण्याकरता व्यवस्थांची निर्मिती करायला लागते किंवा अस्तित्वात असलेल्या व्यवस्थांमध्ये योग्य तो बदल करावा लागतो.

मुघल गेले आणि इंग्रज आले. साहजिकच इंग्रजी संस्कृतीला साजेसा बदल इंग्रजांनी करायला सुरुवात केली आणि म्हणूनच १९ वे शतक त्या दृष्टीनी अतिशय महत्त्वाचे शतक आहे. यातला सर्वात मोठा बदल हा शिक्षण व्यवस्थेचा होता. भारतामधील शिक्षणव्यवस्था ही सर्वथा भिन्न होती. भारताच्या सांस्कृतिक व्यवहारांशी त्याची नाळ जोडली होती. समाज हा कौशल्याधारित व्यवसायांवरती विभागला गेला होता आणि या कौशल्याचा विकास हा पिढ्यान्‌पिढ्या केला जात होता. याचे सर्वात चांगले उदाहरण म्हणजे मंदिरांचे (स्थपती) शिल्पी. प्रत्येक मंदिर हे नेटकं, सुबक आणि सौंदर्यपूर्ण होतं यांचं कारण म्हणजे त्यातील प्रत्येक मूर्ती ही

एका गणिती सूत्राने तयार केलेली असते. हे शिल्पकार कुठल्याही शाळेत जाऊन गणित शिकत नव्हते, तर त्यातली प्रमाणं ते आपले आईवडील व प्रत्यक्ष कृतीतून शिकत होते. प्रत्यक्ष मंदिर हेच त्यांचे पुस्तक वा कार्यशाळा असे. परंतु आजच्या शिक्षण व्यवस्थेतील आपल्यावरील पगड्यामुळे पर्यायी शिक्षण व्यवस्था असते हे आपण मान्यच करायला तयार नाही. याचा सर्वात मोठा फटका हा आपल्याच व्यवस्थांच्या 'क्षमता' आणि 'उपयुक्तते'वरती झाला.

१८३५ सालच्या मेकॉलेच्या शिक्षण सुधारणांमुळे पंडिती शिक्षण काही प्रमाणात चालू राहिले तरी, त्यातील परंपरागत स्रोत संपूर्णतः लुप्त होउन त्याचे पाश्चिमात्यीकरण झाले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील सुधारकांची पिढीही याच शिक्षणातून निर्माण झाली होती. व्यवसायीक कौशल्यावर आधारित शिक्षण या नवीन पद्धतीमधून संपूर्णतः हद्दपार झाले.

जी गोष्ट दैनंदिन व्यवहारातील भौतिकशास्त्राची आहे तीच गोष्ट तत्त्वज्ञानासारख्या गहन विषयाचीही आहे. हा विषय गहन एवढ्याकरताच म्हणायचा की, त्याचेही शिक्षण हे एका वेगळ्या मनो-सामाजिक यंत्रणेतून दिले जात असे. आपल्या या व्यवस्थेमधील याचा सर्वात परमोच्च बिंदू म्हणजे 'उपनिषदं' आणि 'षड्दर्शनं', आणि त्यांच्या प्रभावाखाली तयार झालेली सांस्कृतिक आणि सामाजिक नीतिमूल्ये.

आपला या विषयातील प्रगतीचा इतिहास हा कमीत कमी ५००० वर्षांचा आहे. अडीच हजार वर्षांपूर्वीचा पाणिनी असो, किंवा १५ व्या शतकातील गणेश दैवज्ञ असो, आपल्या विशेष लिखाणाकरता त्यांना आपल्या तत्त्वज्ञानापासून फारकत घ्यावी लागली नाही. विषय व्याकरणाचा असो किंवा गणिताचा, त्यातील वैचारिक प्रगल्भतेकरता, विश्लेषणात्मक मांडणी करता, कमी-अधिक प्रमाणात का असेना, त्यांना उपनिषद, दर्शनांचा आधार घ्यावाच लागत होता. उपनिषदं किंवा दर्शनांतील विचार आणि कर्मकांड हे सर्वथा वेगळे प्रांत आहेत. कर्मकांडातील व्यवहारांवर उपनिषदीक वा दार्शनिक विचारांचा पगडा असू शकेल, पण उपनिषद किंवा दर्शनांच्या उकलनाकरता कर्मकांडाची गरज नसते. कदाचित याचमुळे ॲलेक्झांडरपासून ते १९ व्या शतकातील जर्मन तत्त्वज्ञ शोपेनहर (Schopenhauer) पर्यंत सर्वांना मोहिनी घातली होती ती उपनिषदातील तत्त्वचिंतनाने. शोपेनहरनी एका ठिकाणी लिहून ठेवलंय :

"It is the most profitable and the most elevating reading. It has been the consolation of my life and will be the consolation of my death" (Life & Writings of Schopenhauer, W. Wallace p.106)

१५-१६ व्या शतकामध्ये युरोपमध्ये प्रबोधनयुग (Renaissance) अवतरले. त्यांना आपल्या मूळ ग्रीक व रोमन तत्त्वज्ञान व संस्कृतीमध्ये यशस्वी जगण्याची सूत्रं मिळू लागली. ख्रिस्ती धर्मग्रंथावरील त्यांचा पगडा कमी होऊन जीवनाच्या वास्तवाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन बदलायला लागला. यातूनच पुढील वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांती घडली. नवीन शोधांमुळे उपलब्ध होणाऱ्या अनेक उपकरणांच्या माध्यमातून व्यवस्थांची गती आणि सुलभता दोन्ही मिळू लागल्या. यातूनच एक नवीन अर्थवाद आणि जीवनशैली विकसित झाली. कुठल्याही गोष्टीचा यथेच्छ उपभोग हे त्यामागील एक सूत्र होते. उद्योगनिर्मिती, त्याच्याशी जोडलेला कामगार किंवा श्रमवाद, व त्यातूनच निर्माण झालेल्या वस्तुंचा उपभोग घेण्याची लालसा यातून 'चंगळवाद' जन्माला आला. या अनियंत्रित उपभोगवादामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडायला लागले आणि त्यातून पुन्हा एकदा निसर्गाकडे बघण्याचा दृष्टीकोन मूळपदावर यायला लागला. युरोपमधील जीवनशैली ही १९ व्या शतकामध्ये मोठ्या प्रमाणात भौतिकतावादाकडे झुकली होती. यातून मानसिक संतुलनाप्रमाणेच अनेक नव्या शारीरिक व्याधींनाही निमंत्रण दिले गेले. यातूनच पर्यायी व्यवस्थांचा शोध सुरू झाला.

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात विल्यम जोन्स यांनी संस्कृत भाषा व त्यामधील साहित्याची खिडकी १७८९ साली 'शाकुंतल'चे इंग्रजी भाषांतर करून उघडली होती. एका वर्षातच १७९० मध्ये त्याचे जर्मनमध्ये भाषांतर झाले व पुढे इतरही युरोपीय भाषांमध्ये भाषांतरं व्हायला लागली. १९ व्या शतकात कोपर्निकसपासून न्यूटनपर्यंतच्या वैज्ञानिक लिखाणाची भाषांतरे भारतात होऊ लागली. त्याच वेळेला भारतामधील उपनिषदांची भाषांतरे लॅटीनमध्ये व इतर सर्व युरोपिय भाषांमध्ये व्हायला लागली. भारतामध्ये पाश्चात्त्य आधुनिक विज्ञान ज्या गतीने येत होते त्याच गतीने भारतातील मध्ययुगीन व प्राचीन साहित्य, संस्कृत भाषेचे व्याकरण आणि योग यांची निर्यात युरोपमध्ये व्हायला लागली. भारताचे पाश्चिमात्यीकरण व युरोपचे पौर्वात्तीकरण अशीच ही प्रक्रिया होती.

Peter Sloterdijk या आधुनिक जर्मन तत्त्ववेत्याने या प्रक्रियेचे वर्णन फार सुंदर केले आहे.

The Western hemisphere has begun a post-christian era, which can no longer find the necessary concepts in the holy scriptures of the Judaeo-Christian traditions for a competent understanding of our time. The young conservative Otto Petras - following in the footsteps of the Left Hegelian Bruno Bauer - formulated this situation in 1935 in the still-striking intent "to demonstrate that christianity, uptill now the most powerful historical movement of our planet, has exhausted its constitutive force and that we live post-christium in a sense that is deeper than that of the Calender"

नवभौतिकीला जन्म देणारे नील्स बॉर (Niels Bohr), हायजेनबर्ग (Heisenberg), एर्विन श्रोडिंगर (Erwin Schrodinger) ते जे रॉबर्ट ऑपेनहायमर (J. Robert Oppenheimer) या सर्व विसाव्या शतकातील वैज्ञानिकांनी कुठल्या ना कुठल्या प्रकारे त्यांच्या वैचारिक प्रगल्भतेला किंवा संशोधनाला उपनिषदीक विचारांकडून स्फूर्ती मिळाली आहे हे त्यांनी प्रामाणिकपणे लिहून ठेवले आहे. प्रश्न आहे तो त्यांना ही उपनिषदे वाचायला कुठे व कधी मिळाली हा!

शहाजहानचा पुत्र दाराशिकोह (१६१५-१६५९) यानं सगळ्या जगावर मोठे उपकार करून ठेवले आहेत. उपनिषदांचे सिर-ए-अकबर (Sir-i-Akbar) या शीर्षकाखाली त्याने पर्शियन भाषेत भाषांतर केले. १९६२ साली इराणच्या सरकारनेही ते पुन्हा प्रकाशित केले आहे. अँक्वेतिल द्युपेराँ (Anquetil Dupperron) यांचा जन्म १७३१ साली पॅरिसमध्ये झाला. पॅरिसमधील जगप्रसिद्ध ग्रंथालय बिब्लियोथेक नाश्योनालमध्ये अभ्यास करताना तेथील संस्कृत हस्तलिखितांशी त्यांचा संबंध आला. यातूनच त्यांचे हिंदू तत्त्वज्ञानाबद्दल कुतूहल वाढले. यामुळे तो भारतात येण्यास उद्युक्त झाला. १७५५ मध्ये फ्रेंच इस्ट इंडिया कंपनीच्या एका जहाजावरून तो भारतात आला. साहजिकच फ्रेंचांची भारतातील वसाहत पाँडीचेरी येथे तो सुरुवातीला पोहोचला. तिथे तो संस्कृत व पर्शियन हस्तलिखिते विकत घ्यायला लागला. भारतामध्ये बऱ्याच ठिकाणी फिरल्यानंतर तो सूरतला पोहोचला व तिथेच त्याला 'आवेस्ता' हा ग्रंथ मिळाला. भारतामधील आपल्या भ्रमंतीमध्ये अनेक संस्कृत व पर्शियन ग्रंथ, नाणीही त्याने जमा केली. सहा वर्षांच्या भारतातील वास्तव्यानंतर १७६१ मध्ये तो इंग्लंडला परतला. इंग्लिश व फ्रेंच लोकांचे संबंध त्यावेळी चांगले नसल्यामुळे इंग्रजांनी त्याला तुरुंगात डांबले. ३ महिन्यांनंतर त्याची सुटका झाली. १७६२ साली तो पॅरिसला परतला. आपल्याबरोबरची सर्व संस्कृत हस्तलिखिते त्याने पॅरिसच्या ग्रंथालयास सुपुर्द केली. १७७१ मध्ये त्यांनी झेंद-अवेस्ताचे फ्रेंचमधील भाषांतर प्रकाशित केले.

द्युपेराँचे सर्वात मोठे योगदान म्हणजे दाराशिकोहच्या पर्शियन उपनिषदांचे त्यांनी लॅटिन व फ्रेंचमध्ये केलेले भाषांतर. त्यांचे फ्रेंच भाषांतर अप्रकाशित राहिले. मात्र लॅटीन भाषांतर १८०१-०२ मध्ये दोन खंडात प्रकाशित झाले. उपनिषदांच्या त्यांच्या या लॅटीन भाषांतराने मात्र युरोपमध्ये एक नवीन वैचारिक क्रांती केली. पुढे युरोपमधील सर्व भाषांत त्याची भाषांतरे झाली असली तरी त्याचा सर्वात मोठा प्रभाव हा जर्मनीमध्ये पडला. यातूनच अनेक जर्मन अभ्यासकांनी संस्कृतभाषा, तिचे व्याकरण आणि वैदिक साहित्य याचा प्रचंड अभ्यास सुरू केला. August Wilhem Schlegal (1767-1845) आणि Freedrich Schlegel (1772-1829) या दोन जर्मन भावांनीही संस्कृतचा अभ्यास करून रामायण, महाभारत, भगवद्गीता यांची लॅटीन व जर्मनमध्ये भाषांतरे केली. पुढील सर्व जर्मन संस्कृत अभ्यासकांवरती श्लेगल बंधुंच्या संशोधनाचा पगडा होता. ऑगस्ट श्लेगला यांनी पहिले देवनागरी खिळे बनवून घेऊन ते बॉन, जर्मनीला आणले व तिथे त्यांनी देवनागरीतून भगवद्गीता प्रथमच छापली. युरोपमध्ये छापले गेलेले हे पहिले संस्कृत पुस्तक.

१८१८ साली पेशवाई जशी खालसा झाली व ब्रिटिशांच्या वसाहतवादाला सुरुवात झाली, तेव्हाच जर्मनीतील बॉन विद्यापीठामध्ये संस्कृत शिकवायला सुरुवात झाली. युरोपमधील भारताच्या सांस्कृतिक प्रभावाला चालना देणारी ती एक मोठी घटना होती. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जर्मनीमधील विद्यापीठामधून संस्कृत शिकणाऱ्या प्राध्यापकांची संख्या ही संपूर्ण युरोपात संस्कृत शिकणाऱ्या प्राध्यापकांपेक्षा जास्त होती. १९०३ मध्ये संस्कृत व भारतशास्त्राचा (Indology) अभ्यास करणारे ४७ प्राध्यापक जर्मनीमध्ये होते. इंग्लंडमध्ये मात्र फक्त ४ विद्यापीठांमध्ये संस्कृतचे अध्ययन चालू होते. या पार्श्वभूमीवर मॅक्समूलर यांचे इंग्लंडमध्ये शिकणाऱ्या संस्कृत प्राध्यापकांबद्दलचे मत नक्कीच विचार करायला लावणारे आहे-

"Why should a study of Greek and Latin.... seem congenial to us, why should it excite even a certain enthusiasm and command general respect, while a study of Sanskrit and of the ancient Poetry, the Philosophy, the Laws, and the Art of India is looked upon, in the best case, as curious, but is considered by most people useless, tedious, if not absurd... and strange to say, this feeling exists in England more than in any other country. In France, Germany and Italy, even in Denmark, Sweden and Russia there is a vague charm... A scholar who studies Sanskrit in Germany is supposed to be initiated in the deep and dark mysteries of ancient wisdom... In England a student of Sanskrit is generally considered a bore."

अनेक इंग्रज नोकरशहा आणि धर्मप्रसारकांनीही संस्कृतचा चांगलाच अभ्यास केला होता. फरक एवढाच होता की, भारत ही इंग्रजांची वसाहत होती. सांस्कृतिक वर्चस्वाचे भूत त्यांच्या मानगुटीवर होते. म्हणूनच मॅक्यमूलरचे निरीक्षण महत्त्वाचे आहे. जर्मन संशोधकांचा भारत किंवा संस्कृत अभ्यासाचा संबंध हा संधोशन केंद्रित होता. आर्यवंशाच्या श्रेष्ठत्त्वाच्या जर्मन विचारालाही या संशोधनामुळे चालना मिळाली ही दुर्दैवी घटनाच म्हणायला हवी.

आजही उपनिषद आणि संस्कृतच्या व्याकरणाचे संशोधन पाश्चिमात्य जगात चालूच आहे. १५ व्या शतकात ग्रीक आणि लॅटिन भाषांच्या अभ्यासांनी युरोपमध्ये प्रबोधन युग (Renaissance) अवतरले. त्यामुळेच वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांती झाली. १९ व्या शतकात संस्कृतच्या अभ्यासामुळे जर्मनी आणि सर्वच युरोपमध्ये आणखीन एक वैचारिक क्रांती झाली. अभ्यासक त्याला Oriental Renaissance म्हणून संबोधतात. १५ व्या शतकातील प्रबोधना एवढाच १९ व्या शतकातील या प्रबोधनामुळे युरोपला एक नवीन वैचारिक प्रगल्भता मिळाली असा अनेक अभ्यासकांचा निष्कर्ष आहे. आधुनिक अभ्यासक Doyglas J. McGetchin यांच्या शब्दात सांगायचे तर,

"Finally, Schegel's book made a call for an "Oriental renaissance" that he comparad favorably to the Italian Renaissance several centuries earlier, hoping it would prove no less grand and universal in its operation, and have no less influence on the spheric of European intelligence". (On the paths of Enlightenment, the Myth of India in Western Culture 1808-2017, p.42)

**फेब्रुवारी २०१९**

❖❖❖

# न्यू झीलंडचा नरसंहार - शोध आणि बोध

शुक्रवार, १५ मार्च २०१९ रोजी ख्राइस्टचर्च या न्यू झीलंड येथील दोन मशिदींमध्ये ब्रेंटन टॅरेंटे (Brenton Tarrant) या श्वेतवंशवादानी (White Supremacy) झपाटलेल्या तरुणाने अंदाधुंद गोळीबार केला. त्यावेळी या मशिदीत प्रार्थनेकरता जमलेले ५० मुसलमान मृत्युमुखी पडले आणि तेवढेच जखमी झाले. या हल्ल्यात बळी पडलेले नागरिक हे मुसलमान असले, तरी हा हल्ला फक्त मुसलमानांवर होता असे दिसत नाही.

गेली अनेक वर्षे इराक, सिरिया, अफगाणिस्थान आणि काही प्रमाणात भारततही अनेक दहशतवादी हल्ले होत आहेत. ख्राइस्टचर्च (Christchurch) येथे झालेला हल्ला हा दहशतवादी होताच, पण त्याहीपेक्षा तो अधिक श्वेतवंशवादी होता. इस्लामिक कट्टरपंथीयांच्या संस्था व त्यांच्या कारवाया या पाश्चिमात्य माध्यमांचे आवडते विषय आहेत. पण याचबरोबर श्वेतवंशवाद व दहशतवादसुद्धा तेवढ्याच तीव्रतेने अमेरिकन व युरोपियन राष्ट्रांमध्ये आहे हे मात्र फार हळू आवाजात सांगितले जाते. जणू काही या

घटना अत्यंत दुर्मीळ व अपघाती असतात. वास्तव यापेक्षा भिन्न आहे. म्हणून ख्राइस्टचर्चमध्ये झालेल्या हल्ल्याचे विश्लेषण होणे आपल्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे.

गेल्या १००-२०० वर्षांत औद्योगिकीकरण व वैज्ञानिक प्रगतीमुळे जग खूप सुधारलं आहे अशी एक भाबडी समजूत अनेक विचारवंत करून देत असतात. शहरांमधील मॉलची संख्या किंवा विमानाचा सहज होणारा प्रवास हीच जर का सुधारणांची लक्षणं असतील तर ते काही प्रमाणात खरेही आहे. साहजिकच या दृष्टीने अग्रभागी असलेली अमेरिका व इतर राष्ट्रे की जी सुबत्तेच्या शिखरावर आहेत, सांपत्तिक दृष्ट्या सधन आहेत, तिथे 'वंशवाद' किंवा 'दहशतवाद' अस्तित्वात असायलाच नको. भारत आणि इतर विकसनशील देशांना घसा फुटेस्तोवर मानवतेचे शिक्षण देणाऱ्या या राष्ट्रांमध्ये मात्र वंशवाद नव्हताच असे नाही, तर आजही तेवढ्याच तीव्रतेने तो तेथे शिल्लक आहे.

माध्यमांना तो का दिसत नाही हाच मोठा यक्ष प्रश्न आहे. तो दिसत नाही, की बघायचा नाही; हा त्याहीपेक्षा मोठा यक्ष प्रश्न आहे!

न्यू झीलंड हे राष्ट्र जगातल्या समाधान प्रिय राष्ट्रांच्या यादीमध्ये वरच्या क्रमांकावरती आहे. या देशाला कुणीही शत्रू नाहीत. म्हणून शांतताप्रिय राष्ट्रांच्या यादीत याचा क्रमांक वरचा आहे. तरीही या देशामध्ये ख्राइस्टचर्चसारख्या घटना, की ज्या श्वेतवंशवादानी प्रेरित होऊन होतात, याचे पुरेसे विश्लेषण होताना मात्र दिसत नाही. कारण विकसित आणि वैज्ञानिक प्रगतीमध्ये अग्रभागी असलेल्या या देशांमध्ये अशा घटना अपघातानेच होत असतील अशी भाबडी समजूत. दुर्दैवाने इतिहासाची साक्ष मात्र काही वेगळंच सांगून जाते.

श्वेतवंशवादाचा 'प्रेरणास्रोत' व 'प्रभाव' हा जगातले सर्वात श्रीमंत राष्ट्र म्हणजे अमेरिकेत सर्वात अधिक आहे. अब्राहम लिंकन यांचा १५ एप्रिल १८६५ ला खून झाला. आजच्या अमेरिका राष्ट्राच्या निर्मितीचे ते एक जनक आहेत. हा खूनही वर्ण वर्चस्ववादानीच भारलेल्या तरुणाने केला होता. मार्टिन ल्यूथर किंग हे अमेरिकेतील मानवी हक्काच्या प्रमुख चळवळीचे शिल्पकार. ते कृष्णवर्णीय होते. अमेरिकेमधील कृष्णवर्णीयांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचारांविरुद्ध ते लढत होते. १९६३ साली त्यांनी दिलेल्या एका गाजलेल्या भाषणामध्ये ते सांगतात;-

"I have a dream that my four little children will one day live in a nation where they will not be judged by the colour of their skin but by the content of their character."

१९६५ साली त्यांना शांततेचे नोबेल पारितोषिक प्रदान करण्यात आले होते. ४ एप्रिल १९६८ ला त्यांचा खून झाला. तोही एका वंशवादानी झपाटलेल्या युवकाकडून. या घटना इथेच थांबत नाहीत. स्वातंत्र्याच्या 'भन्नाट' कल्पनांमुळे अमेरिकेतील नागरिकाला स्वसंरक्षणाकरता आधुनिक बंदूक बाळगण्याचा अधिकार आहे. त्यांच्या मानवी अधिकारांचा तो एक भाग धरला जातो. शेकडोंनी नोबेल पारितोषिकं मिळवलेल्या जगातील सर्वात श्रीमंत राष्ट्राचा नागरिक हा धीरोदात्त, विचारशील आणि विवेकशीलच असणार! भारत, अफगाणिस्थान, इराक या देशांमधील जनता गरीब, अविकसित, साहजिकच त्यांच्यामध्ये हे मानवी गुण कुठून येणार? प्रश्न सोडवण्याची किती साधी सुटसुटीत आणि वैज्ञानिक पद्धती ही!

इतक्या समृद्ध देशातला नागरिक हा स्वतःला एवढा असुरक्षित का समजतो हे सुद्धा एक मोठं कोडंच आहे! याच अमेरिकेमध्ये वैयक्तिक राग, लोभ, भांडणं, तंटा या वादातून बंदुकीच्या गोळीबारांमुळे दरवर्षी काही शेकडो नागरिक बळी पडतात. त्याहीपेक्षा जास्त बळी हे वंशवादानी प्रेरीत होऊन अंदाधुंद गोळीबार केल्यामुळे होतात. यामध्ये शाळेमधील निरापराध मुलं किंवा कृष्णवर्णिय अमेरिकन नागरिकांची संख्या काही शेकडोंनी आहे.

जगामधील दहशतवाद आणि मानवतावादाच्या भंगाच्या / उल्लंघनाच्या घटनांची जंत्री ही अमेरिकेतील अनेक स्वयंसेवी संघटना एक पवित्र कर्तव्य म्हणून दरवर्षी करत असतात. अर्थातच यामध्ये भारत, चीन, अफगाणिस्तान इत्यादी राष्ट्रांचा प्रामुख्याने संबंध असतो. बीबीसी, सीएनएनपासून न्यू यॉर्क टाइम्स, वॉशिंग्टन पोस्टपर्यंतची सर्व माध्यमे रकानेच्या रकाने भरून त्यावर लिहीत असतात. आमच्याकडचे विशाल मानवतावादीही त्यांचीच री ओढत असतात.

अमेरिकेत शुद्ध वंशवादामुळे बळी पडलेल्या, अर्थातच संख्येने जास्त कृष्णवर्णीय अमेरिकनांच्याबद्दल यांना का बरं कधीच कणव येत नाही? ते बहुतांशी कृष्णवर्णीय आहेत म्हणून, की त्यांचे मारेकरी हे श्वेतवंशवादाने झपाटलेले आहेत म्हणून? अमेरिकेतून स्फूर्ती घेऊन सधन युरोपीय राष्ट्रामध्येही याच घटना गेली कित्येक वर्षे अशाच घडत आहेत. वाद घालायचा तो त्यांना 'दहशतवादी' म्हणायचं की 'माथेफिरू' म्हणायचं यावर!

अमेरिकेमधील अनेक राज्ये आजही श्वेतवंशवादानी प्रभावित झालेली आहेत.




**अमेरिकेतील न्यू ऑर्लीएन्स, लूयीसियाना राज्यातील १८९१ साली उभारलेला श्वेतवर्ण वर्चस्वाच्या विजयाचा स्तंभ. बऱ्याच विरोधा नंतर २०१७ साली त्याला हलवण्यात आले.**

'Battle of Liberty Place' हे स्मारक, लूयीसियाना (Louisiana) या अमेरिकेतील राज्यामध्ये १८९१ साली उभारले गेले. १९३२ साली त्यामध्ये पुढील ओळींची भर टाकण्यात आली, "Recognised white Supremacy in the South and gave our state". अलीकडेच म्हणजे २०१७ साली बरीच आंदोलनं केल्यावर या स्मारकाला तिथून हलवण्यात आले.

रुडयार्ड किप्लिंग (Rudyard Kipling, 1865-1936) यांना साहित्याचं नोबेल पारितोषिक १९०७ साली मिळालं. त्यांचा जन्म मुंबईतील. ते इंग्रजी साहित्यातील महत्त्वाचे लेखक म्हणून प्रसिद्ध होते. वसाहतवादाचे आणि श्वेतवंशवादाचे ते कट्टर समर्थक होते. १८८९ साली त्यांनी 'The Ballad of East and West" ही कविता लिहिली. त्यातील –

"Oh, East is East, and West is West, and never the twain shall meet." या ओळी त्यांची साम्राज्यवादी मानसिकता दर्शवणाऱ्या आहेत. त्यांची सर्वात प्रसिद्ध कविता म्हणजे 'The White Man's Burden'. भारतातील काय किंवा

अमेरिकेच्या फिलीपाइन्समधील काय, साम्राज्यवाद्यांच्या समर्थनाकरता वापरली गेलेली प्रेरणा म्हणजे ही कविता. व्हिक्टोरिया राणीच्या कारकिर्दीच्या हीरक महोत्सवानिमित्त किप्लींग साहेबांनी दि. २२ जून १८९७ रोजी राणीला ती अर्पण केली. यातला प्रत्येक शब्द हा श्वेतवंशवादाचे समर्थन करणारा आहे.

विकिपिडियाच्या White Man's Burden वरील टिपणीमध्ये या संदर्भातील नोंद बोलकी आहे.

'The imperialist interpretation of 'The White Man's Burden' (1899) proposes that the 'white race' is morally obliged to rule the 'non-white' people of planet Earth, and to encourage their progress (economic, social and cultural) through settler colonialism, which is based upon the Roman Catholic and Protestant Missionaries displacing the natives' religion: The Implication of coure, was that the Empire existed not for the benefit - economic or strategic or otherwise of Briton, itself, but in order that primitive peoples incapable of Self-Government, could with British guidance, eventually become civilized (and Christianised)

किप्लींग यांची ही कविता लंडनच्या The Times ने ४ फेबुवारी १८९९ ला व अमेरिकेतील प्रथितयश वृत्तपत्रांनी प्रकाशित केली होती. फिलीपाइन बेटांच्या अमेरिकन साम्राज्यवादाचे समर्थन करण्याकरता देखील १८९९ ला या कवितेमधील काही ओळींचे अमेरिकेच्या सिनेटमध्ये वाचन करण्यात आले. अर्थातच प्रसिद्ध अमेरिकन साहित्यिक मार्क ट्वेन यांनी किप्लींगच्या साम्राज्यवादी विचारांना विरोध केला. एवढेच नाही तर, त्यांनी या कवितेवर उपहासात्मक 'To the person sitting in darkness' (1901) हा लेख लिहिला.

इ.एम. फार्स्टर हे दुसरे महत्त्वाचे इंग्रजी कादंबरीकार. त्यांची A Passage to India (1924) ही कादंबरी वरकरणी वसाहतवादाला विरोध करणारी वाटली तरी, आधुनिक टीकाकारांनी त्यामधील वसाहतवादाचे केलेले समर्थन दाखवून दिले आहे.

१८९० सालच्या प्रसिद्ध पिअर्स सोपच्या जाहिरातीमध्ये 'The White Man's Burden' चा वापर करण्यात आला आहे. थोडक्यात; श्वेतवंशवादाचा हा इतिहास ही एखादी अपघाती घटना नसून, अमेरिका व इतर युरोपीय राष्ट्रांमध्ये तेव्हा आणि आजही ती तेवढ्याच तीव्रतेने अस्तित्वात आहे. भारतासारख्या देशाला शांतता किंवा मानवतावाद शिकवण्याचा काकणभर ही अधिकार या देशांना नाही. ती मानवतावादी विचारांची क्रूर चेष्टा आहे.




**प्रसिद्ध पिअर्स साबणाची १८९० मधील जाहिरात**

कृष्णवर्णीय किंवा स्थलांतरित लोकांवर बेछूट गोळीबार करणारे आपला जाहीरनामाही (Manifesto) प्रकाशित करत असतात. आर्यवंशाच्या श्रेष्ठत्वाने पछाडून लाखो ज्यूंची हत्या करणाऱ्या अडॉल्फ हिटलर यांनी १९२५ साली आपला जाहीरनामा प्रकाशित केला होता.

न्यू झीलंड येथे ५० जणांची हत्या करणाराही श्वेतवंशवादानी भारला तर होताच, पण त्यानीही हत्येआधी ७४ पानी आपला जाहीरनामा प्रकाशित केला होता! या आधी अशा प्रकाशित झालेल्या जाहीरनाम्यांच्या आणि या जाहीरनाम्यांतील प्रेरणा या सारख्याच आहेत. जाहीरनाम्याच्या सुरुवातीलाच हत्याकांडाचे समर्थन करताना तो म्हणतो :

"to show the invaders that our lands will never be their lands, our homelands are our own and that, as long as a white man still lives, they will never conquer our lands."

याआधी अशी हत्या केलेल्या अनेकांचे उल्लेख करून, ते आपले आदर्श कसे आहेत याचीही तो वर्णने करतो. थोडक्यात; श्वेतवंशवादाची ही कीड अमेरिका आणि युरोपमधील अनेक राष्ट्रांमध्ये आज धगधगती आहे. युरोपमधील

राजकीय वाऱ्यांची आजची दिशा आपण बघितली तर ती स्थलांतरितांच्या विरुद्ध आणि श्वेतवंशवादानी पछाडलेली आहे.

अमेरिकेपासून युरोपमधल्या अनेक अशा सधन देशांचा इतिहास हा फक्त ५०० ते १।।-२ हजार वर्षांचा आहे. भारताला कमीत कमी ५००० वर्षांची परंपरा आहे. त्यांची समाजव्यवस्था ही प्रबोधनयुगापर्यंत तरी ॲरिस्टॉटल, टोलेमी आणि बायबल केंद्रित होती. पुढे वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांतीनी यामध्ये बदल नक्की केला. १९ व्या - २० व्या शतकांत धर्मविचारापासून कला-आविष्कारापर्यंत 'स्वातंत्र्याचे' वारे वाहू लागले. लग्नापासून अनेक सामाजिक संस्था या कालबाह्य होऊन, एका आत्मकेंद्रित समाजाची निर्मिती झाली. लेखन स्वातंत्र्य, उच्चार स्वातंत्र्य, व्यक्ती-स्वातंत्र्य यांचा इतका अतिरेक झाला की, ते 'स्वैराचारा'च्या सीमेवर येऊन उभे राहिले. आत्मकेंद्रित व्यवस्थेमध्ये तात्पुरता फायदा असला तरी त्यामुळे लवकरच 'वैफल्य' येते. अशा सधन पण वैफल्यग्रस्त समाजामधूनच २०व्या शतकाच्या उत्तरार्धात हिप्पी पंथ निर्माण झाला. आम्ली औषधांच्या सेवनाचे प्रमाण वाढले. ऐहिक क्षेत्रात प्रचंड वैज्ञानिक प्रगती होत असली तरी मनुष्य अधिक असमाधानी आणि वैफल्यग्रस्त होत होता. न्यू झीलंड सारख्या हत्या आणि त्यांचे वाढते प्रभाव हे या वैफल्याचेच प्रतिबिंब आहे.

पाश्चिमात्य संस्कृती, कला आणि समाजसंस्थांचे अंधानुकरण करत आपणही स्वातंत्र्याच्या सीमांना स्वैराचारापर्यंत नेऊन ठेवलं आहे. भारतीय संस्कृती ही हजारो वर्षांची आहे. अगदी १६ व्या शतकापर्यंत विज्ञान, कला आणि भाषेच्या सृजनशिलतेमध्ये ती आपली सांस्कृतिक, सामाजिक वैशिष्ट्ये जपून होती. अनेक मतमतांतरे असली तरी ती असहिष्णू नक्कीच नव्हती. उलट पारशी, ज्यू स्थलांतरितांना तिने सहज सामावून घेतले. भारतीय समाजव्यवस्था ही सर्वथा वेगळी होती. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मानवी क्षमतांचा विचार करत तिची उभारणी केली होती. कुटुंब हा तिचा केंद्रबिंदू होता.

प्रश्न एवढाच आहे की, आर्थिक सुबत्तेच्या शिखरावर असलेली अमेरिका आणि त्याची युरोपियन भावंडं, त्यातील वर्णद्वेश, त्यातून येणारी वैफल्यग्रस्तता, आणि त्याचा परिपाक म्हणून न्यू झीलंडसारखे होणारे प्रकार, यातून आपण काही शिकणार आहोत का? सध्या आपली परिस्थिती 'न घरका न घाटका' अशी झाली आहे.

**- मार्च २०१९**

❖❖❖

# विल्यम जोन्स पूर्व भारतीय संस्कृतीचा अभ्यास

रॉबर्ट क्लाइव्ह (Robert Clive) आणि वॉरन हेस्टींग (Warren Hastings) यांच्या आधीही अठराव्या शतकामध्ये अनेक इंग्रज प्रवासी, धर्मप्रसारक आणि ईस्ट इंडिया कंपनीचे कर्मचारी भारतात येत होते. आपल्या ठरलेल्या कार्यक्षेत्रापलीकडे भारतीय समाजव्यवस्था, धर्मसंकल्पना, भाषा, ते अगदी वेष, व्यापार आणि उद्योगधंद्यांचे ते कसोशीने निरीक्षण करायचे. यातल्या अनेकांनी आपली निरीक्षणे ग्रंथबद्धही करून ठेवली आहेत. अर्थातच इंग्रज अधिकाऱ्यांना आपली धोरणे ठरवण्याकरता या सगळ्याचा फायदा होत असे.

इंग्रजांचा धर्म, भाषा आणि संस्कृती ही आपल्यापेक्षा संपूर्णतः भिन्न होती. आपल्यापेक्षा श्रेष्ठ संस्कृती किंवा भाषा जगात असू शकते यावर त्यांचा विश्वास नव्हता. भारतात आल्यावर मात्र भारतीय संस्कृतीची विविधता आणि विकास बघून ते थक्क व्हायचे. याचवेळी युरोपमध्ये विज्ञान क्रांती आणि औद्योगिक क्रांती होत होती. यंत्रयुगाला नुकतीच

सुरुवात झाली होती. भारतातील कच्चा माल इंग्लंडमध्ये नेऊन, तयार माल भारतामध्ये विकण्याच्या व्यापारातून, कंपनी प्रमाणेच त्यांचे अधिकारी आणि व्यापारीही प्रचंड नफा कमवत होते. अर्थातच यामुळे परंपरागत तंत्रज्ञानावर आधारित भारतीय व्यवसाय मात्र देशोधडीला लागले.

इंग्रजांप्रमाणेच डॅनिश, डच आणि फ्रेंच व्यापारीही भारतात व्यापाराकरिता येत होते. अर्थातच १७५७ च्या प्लासीच्या लढाईमध्ये फ्रेंचांचा पराभव झाला आणि इंग्रजांचा प्रभाव वाढायला लागला. याच वेळी मोंगल सत्तेकडून इंग्रजांना जमिनीचा सारा वसुली आणि दिवाणी न्यायाचे हक्कही मिळाले.

भारतीय प्रचलित धर्म आणि सामाजिक व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप न करता राज्यकारभार चालवण्याचे ब्रिटिशांचे धोरण होते. या पार्श्वभूमीवरच भारतीय समाजव्यवस्था काय आहे आणि तिची प्रचलित भाषा काय आहे, या दोघांचाही अभ्यास इंग्रज करायला लागले. निदान कंपनीच्या सुरुवातीच्या अधिकाऱ्यांचा तरी असा कटाक्ष होता की, कुठलीही पाश्चात्त्य व्यवस्था भारतीय राज्यकारभारात आणायची नाही.

राज्यकारभारामध्ये धोरणांच्या अंमलबजावणीकरिता भाषा सर्वात मोठी भूमिका बजावते.

यातूनच इंग्रजांनी प्रांतीय भाषांचा अभ्यास सुरू केला. तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की, या सर्व भाषा संस्कृतोद्भव असून धर्मशास्त्रापासून राज्यव्यवहारापर्यंतचे सगळे शास्त्रीय ग्रंथ हे संस्कृतमध्येच आहेत. भाषेप्रमाणेच, भारतातील सर्व 'सामाजिक' आणि 'सांस्कृतिक' व्यवस्थांच्या रचनेमध्येही धर्म आणि तत्त्वज्ञानाची बैठक असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. खऱ्या अडचणीला इथेच सुरुवात झाली. भारतीय 'धर्म' संकल्पनेचे आकलन होताना त्यांची दमछाक होऊ लागली. अनेक देव आणि त्यांची मूर्तिपूजा; तरीही चराचरामध्ये एकच तत्त्व भरले आहे ही भारतीयांची संकल्पना यांची सांगड कशी घालायची यात इंग्रजांचा गोंधळ होऊ लागला.

पंथ (Religion) संकल्पनेमध्ये एक 'प्रेषित' असतो, एक 'पंथग्रंथ' असतो, आणि त्या पंथांच्या सभासदांना या दोघांच्या परिघातच सर्व व्यवहार करायला लागतात. जसे की, ख्रिस्ती धर्माचा प्रेषक 'येशूख्रिस्त', तर त्यांचे पुस्तक 'बायबल';

इस्लामचा प्रेषक 'मोहम्मद', तर पंथग्रंथ 'कुराण'; इराणी पंथाचा पंथग्रंथ 'अवेस्ता', तर प्रेषित 'झरतृष्ट'.

'धर्म' ही संकल्पना यापेक्षा कितीतरी व्यापक आहे. यात एकच प्रेषित आणि एकच धर्मग्रंथ अशी संकल्पना नाहीच. हिंदूंचा एकच 'देव' किंवा 'प्रेषित' नाही. वेदप्रामाण्य मानणारे पंथ जसे यात आहेत, तसेच वेदप्रामाण्य न मानणारेही पंथ त्यामध्ये आहेत. म्हणूनच धर्म या शब्दाचे भाषांतर होऊ शकत नाही. Religion म्हणजे 'पंथ'. शिवाय भारतीय तत्त्वज्ञान म्हणजे त्यांचे 'दर्शन'ग्रंथ, यांचा देव म्हणजे God (Anthropomorphic, मानवगुणसदृश्य) या संकल्पनेशी फारसा संबंध नाही. पंथांमध्ये 'प्रेषित' आणि 'पूजापद्धती' या एकमेकांना पूरकच असतात. हिंदूंमध्येही देव संकल्पना आणि पूजापद्धती पूरक असल्या तरी त्या मान्य नसलेली व्यक्ती ही धर्मबाह्य होत नाही.

बहुतेक इंग्रज व्यापारी किंवा प्रवासी हे ख्रिस्तपंथी असत. हिंदूधर्माची ही व्यापकता त्यांच्या आकलनाच्या बाहेर होती. नुसता एखादा धर्मग्रंथ वाचून, हिंदूधर्म किंवा भारतीय संस्कृतीचे व्यवहार कळणं कठीण होतं. शिवाय हिंदू पंथीयांमधील मतभिन्नता आणि परस्पर विरोधी चालीरीती, यामुळे तर या गोंधळामध्ये आणखीनच भर पडत होती. या गोंधळाचे प्रतिबिंब सुरुवातीच्या धर्मप्रसारक, व्यापारी, प्रवासी आणि ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी यांनी लिहिलेल्या साहित्यामध्ये दिसून येते. रॉबर्ट क्लाइव्ह आणि वॉरन हेस्टींग यांचे समकालीन असलेल्या काही ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी हिंदू संस्कृती आणि भाषांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला होता.

जॉन हॉलवेल (John Holwell, १७११ –१७९८), अलेक्झांडर डॉव (Alexander Dow, १७३५–१७७९) आणि नॅथानियल हालहेड (Nathaniel Halhed, १७५१–१८३०) या विल्यम जोन्स पूर्व संशोधकांची भूमिका आणि लिखाणाचा परामर्श घेणे म्हणूनच उपयुक्त ठरेल.

### जॉन हॉलवेल

जॉन हॉलवेल यांचा जन्म डब्लिन (Dublin) मधला. यांचे बहुतेक आयुष्य त्यांनी लंडनमध्ये घालवले. यांचे खानदान व्यापारी असले तरी ते डॉक्टर झाले. १७३२ साली त्यांना भारतात कलकत्त्याला पाठवण्यात आले. कलकत्त्याच्या

न्यायसंस्थेमध्ये काम करत असतानाच, त्यांना बंगाली आणि हिंदूस्थानी भाषा शिकायला लागल्या. कामचलाऊ अरेबिक यांना येत असले, तरी ते संस्कृत नक्कीच शिकलेले नव्हते. ईस्ट इंडिया कंपनीच्या कलकत्त्यामधील फोर्ट विल्यम (Fort William) येथील कार्यालयामध्ये कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून त्यांची नियुक्ती झाली. रॉबर्ट क्लाईव्ह यांच्या निवृत्तीनंतर काही काळ १७६० मध्ये बंगालचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी काम पाहिले. कलकत्त्याच्या २४ परगणा जिल्ह्याचे जमीनदार म्हणून १७५१ मध्ये त्यांची नेमणूक झाली होती.

त्यावेळी कलकत्त्याची एक महत्त्वाची दुर्दैवी घटना म्हणजे, फोर्ट विल्यममधील काळकोठडीमध्ये झालेले इंग्रजांचे मृत्युकांड (Black Hole). या काळकोठडीत जॉन हॉलवेल यांनाही ठेवले होते. पण ते जिवंत बाहेर पडले. या त्यांच्या अनुभवावर लिहिलेले त्यांचे पुस्तक - Genuine Narrative of the Deplorable Deaths of the English Gentlemen, and Others, who Were Suffocated in the Black-Hole. (London 1758) बरेच गाजले.

त्यांनी भारतीय संस्कृती, आचार-विचार आणि चालीरीतींच्या त्यांच्या निरीक्षणावर आधारित तीन खंडात्मक ग्रंथ त्यांनी लिहिले. १७६५ ते १७७१ पर्यंत ते प्रकाशित होत होते. या ग्रंथाचे शीर्षकही बरेच लांबलचक होते. Interesting Historical Events, Relative to the Provinces of Bengal, and the Empire of Indostan... as also the mythology and cosmogony, fasts and festivals of the Gentoo's, followers of the Shastah. and a dissertation on the metempsychosis, commonly, though erroneously, called the Pythagorean Doctrine.

जॉन हॉलवेल यांची ही निरीक्षणशक्ती आणि त्यांच्या नोंदी ठेवण्याची सवय यामुळे त्यांनी असेच आणखीन एक महत्त्वाचे पुस्तक लिहिले. बंगालमध्ये त्यावेळी देवीच्या साथी येत असत. त्यावेळी त्यांनी बंगाल मध्ये देवी होऊ नयेत म्हणून लसीकरणाचा एक प्रकार बघितला. त्यावरही त्यांनी एक पुस्तक लिहून ठेवलं. त्याचे शीर्षक होते - an account of the Manner of Inoculating for the Small Pox in the East Indies: With Some Observations on the Practice and Mode of Treating that Disease in Those Parts. (London 1767). अर्थात देवीच्या लसीचा शोध एडवर्ड जेन्नर (Edward Jenner) यांनी १७९६ साली लावला. १७६० मध्ये ते इंग्लंडला परत आले. पुढे त्यांच्याकडून फारसे महत्त्वाचे लिखाण झाले नाही. १७६७ साली लंडनच्या रॉयल सोसायटीने त्यांना सन्माननीय सभासदत्व बहाल केले होते. १७९८ मध्ये त्यांचे देहावसान झाले.

### अलेक्झांडर डॉव

अलेक्झांडर डॉव यांनीही भारताच्या इतिहासावर लिखाण करून ठेवले आहे. १७६० साली ईस्ट इंडिया कंपनीच्या सैनिकदलामध्ये त्यांची भरती झाली. पर्शियन भाषेवर त्यांचे चांगले प्रभुत्व होते. १७६८च्या सुमाराला भारताच्या इतिहासावर History of Hindostan हे दोन खंडात्मक ग्रंथ त्यांनी लिहिले. फरीश्ता (Firishta) या इतिहासकाराच्या भारताच्या इतिहासाच्या ग्रंथांचे ते भाषांतर आहे, असे अभ्यासकांचे मत आहे. १७७२ साली त्यांनी तिसरा खंडही लिहून पुरा केला. तेही संस्कृत शिकले नव्हते. १७६९ साली त्यांच्या ग्रंथांचे फ्रेंचमध्येही भाषांतर झाले. १७७९ साली भारतामध्येच भागलपूरला त्यांचे देहावसान झाले.

### नॅथानियल हालहेड

नॅथानियल हालहेड हे तत्कालीन इंग्लंडमधल्या उच्चभ्रू कुटुंबातून आले होते. १७७१ मध्ये ते भारतात आले. वॉरन हेस्टींग यांचे ते चांगले मित्र होते. त्यांचे संस्कृत भाषेचं ज्ञानही जेमतेमच होतं. पण बंगाली भाषेवर त्यांचे चांगले प्रभुत्व होते असे दिसते. वॉरन हेस्टींग यांच्या आग्रहामुळे त्यांनी बंगाली भाषेचे पहिले व्याकरण लिहिले. बंगाली भाषेच्या व्याकरणाच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये बंगाली भाषा संस्कृतोद्भव असल्याचे मत त्यांनी नोंदवले आहे. एवढेच नाही तर ग्रीक, लॅटिन आणि संस्कृत भाषांमधील साधर्म्यही १७७९ साली, विल्यम जोन्स (William Jones) यांच्या आधी त्यांनी दाखवून दिले होते,

> Every part of speech, and every distinction which is to be found in either Greek or in Latin, and that in some particulars it is more copious than either. I do not attempt to ascertain as a fact, that either Greek or Latin are derived from this language; but I give a few reasons wherein such a conjecture might be founded; and I am sure that it has a better claim to the honour of a parent than, Phoenician or Hebrew.

भारताचा राज्यकारभार भारतीय परंपरेनुसार चालवायचा या वॉरन हेस्टींग यांच्या आग्रहामुळे न्यायदानाकरिता अकरा पंडितांकडून 'विवादार्णवसेतू' ही न्यायिक संहिता त्यांनी लिहून घेतली. त्याचे पर्शिअनमध्ये भाषांतर झाले. आणि पर्शियनमधून हालहेड यांनी त्याचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले. त्याचे शीर्षक होते, A Code of Gentoo Laws or Ordinations of the Pundits. ईस्ट इंडिया कंपनीने १७७६ साली ते लंडनहून प्रकाशित केले. लगेच त्याची दुसरी आवृत्ती १७८१ मध्ये

प्रकाशित झाली. १७७८ साली त्याच्या फ्रेंच आणि जर्मन आवृत्त्या प्रकाशित झाल्या.

१७८५ साली वॉरन हेस्टींग बरोबर ते लंडनला परत आले. १७९० ते १७९५ दरम्यान ते लंडनच्या पार्लमेंटचे सभासद झाले. टोपण नावाने त्यांनी इतरही बरेच लिखाण केले. हालहेड यांनी बरीच संस्कृत हस्तलिखितेही जमा केली होती. पुढे ब्रिटिश म्युझियमने तो सगळा संग्रह विकत घेतला. महाभारताचेही भाषांतर करायला त्यांनी घेतले होते. ते पूर्ण झाले नाही. त्याची प्रत बंगालच्या एशियाटीक सोसायटीच्या लायब्ररीमध्ये उपलब्ध आहे. अशा या हरहुन्नरी अभ्यासकाचे निधन १८३० ला लंडनमध्ये झाले.

संस्कृत किंवा भारतीय संस्कृतीच्या अभ्यासाकरता या तिघांचेही लिखाण फार महत्त्वाचे आहे. त्यांच्या ग्रंथांची फ्रेंच आणि जर्मन भाषांमध्येही भाषांतरे झाली. युरोपमधील तत्कालीन अनेक संशोधनपर मासिकांमधून त्यांच्या लिखाणावर लेख लिहून आले. त्यांच्या हिंदू धर्मासंबंधीच्या निरीक्षणामध्ये अनेक त्रुटी किंवा चुका आहेत. संशोधकांनी त्या दाखवून दिल्या आहेत.

विल्यम जोन्सच्या आधीचा हा सगळा इतिहास आहे.

हिंदू धर्माबद्दल कुतूहल आणि अधिक माहिती मिळविण्याची ईर्षा त्यांच्या लिखाणामुळेच युरोपमध्ये निर्माण झाली. वॉल्टेअर (Voltaire) यांनी हिंदू धर्माच्या अभ्यासामध्ये खूपच रस घेतला होता. त्यांनीही हालवेल आणि डॉव यांचे लिखाण वाचले होते. वॉल्टेअर यांच्या लिखाणावर त्यांचा परिणाम दिसून येतो, असे संशोधकांचे म्हणणे आहे.

हिंदूधर्माच्या अभ्यासाकरता या तिघांनीही लिहिलेल्या ग्रंथांचे वाचन करणे म्हणूनच आवश्यकच नाही, तर अपरिहार्यही आहे.

**– मे २०२०**

❖❖❖



**नाव : विजय वासुदेव बेडेकर**

जन्म : मुंबई, ९ ऑक्टोबर १९४७

वैद्यक व्यवसाय : स्त्रीरोग तज्ज्ञ. ठाणे येथे गेली ४५ वर्षे व्यवसाय. MBBS (१९७२) DGO (१९७७)

व्यवसायाव्यतिरिक्त : प्राच्यविद्या, इतिहास, भारतीय संस्कृती, समाजशास्त्र इ. च्या अभ्यासाची आवड, वाचन व प्रवासाचा छंद

**अनेक स्वयंसेवी शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी निगडित. प्रामुख्याने :**

१. संस्थापक अध्यक्ष, प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे

२. विश्वस्त व कार्याध्यक्ष – विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

३. संस्थापक अध्यक्ष, द म्युझिअम ट्रस्ट ऑफ वेस्ट कोस्ट ऑफ इंडिया, ठाणे

४. संस्थापक व माजी अध्यक्ष, ठाणे भारत सहकारी बँक, ठाणे

५. संस्थापक अध्यक्ष, सत्यशोध संस्था, ठाणे

६. सभासद, रेग्युलेटइंग कौन्सिल – भांडारकर प्राच्यविद्या अभ्यास संस्था, पुणे

७. आजीव सदस्य – भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

८. आजीव सभासद – एशियाटीक सोसायटी, मुंबई

९. आजीव सभासद – न्युमीझ्मेटीक एंड एपिग्रफीक सोसायटी ऑफ इंडिया

१०. सदस्य : इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ संस्कृत स्टडीज

११. आजीव सभासद : ब्रिटिश लायब्ररी, लंडन, यूके

१२. सभासद : ब्रिटिश म्युझियम, लंडन, यूके

१३. सभासद : V & A संग्रहालय, लंडन, यूके

१४. सभासद : बोडलेयन लायब्ररी, ऑक्सफर्ड, यूके

१५. फेलो : रॉयल एशियाटिक सोसायटी, लंडन यूके

१६. सभासद : ॲशमोलियन म्युझियम, ऑक्सफर्ड, यूके

१७. फेलो : द लिनिअन सोसायटी ऑफ लंडन

१८. सदस्य : द मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्ट, न्यू यॉर्क, यूएसए

१९. सदस्य : गुगेनहेम संग्रहालय, न्यू यॉर्क, यूएसए

- ऑल इंडिया रेडिओवर ओरिएंटल स्टडीज, प्राचीन–औषधी विज्ञान, आयुर्वेद इ. विषयांवर भाषणे
- वैद्यक, संस्कृत, इतिहास इत्यादींवरील राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदा आणि चर्चासत्रांमध्ये सहभाग. त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत –
    - ❖ सॅन फ्रान्सिस्को, अमेरिका, १९८२ : स्त्रीरोगविषयक आंतरराष्ट्रीय परिषद
    - ❖ फिलाडेल्फिया, अमेरिका, १९८४ : ६वी जागतिक संस्कृत परिषद
    - ❖ सिंगापूर, १९८६ : प्रजनन आणि वंध्यत्वावरील जागतिक परिषद
    - ❖ सिंगापूर, १९८६ : आशियाई इतिहास काँग्रेस
    - ❖ चीन प्रजासत्ताक, १९८६ : पहिला गैर–राजकीय आणि गैर–सरकारी अभ्यास दौरा
    - ❖ लाहोर, पाकिस्तान, १९८७ : पेरिनेटोलॉजीवर जागतिक परिषद
    - ❖ हॉलंड, १९८७ : लीडेन येथे ७वी जागतिक संस्कृत परिषद
    - ❖ व्हिएन्ना, ऑस्ट्रिया, १९९० : ८वी जागतिक संस्कृत परिषद
    - ❖ पूर्व युरोप, १९९० : साम्यवादाच्या पराभवानंतर रुमानिया, हंगेरी, युगोस्लाव्हिया, पूर्व जर्मनी, चेकोस्लोव्हाकिया आणि इतर पूर्व युरोपीय देशांचा अभ्यास दौरा
    - ❖ मेलबर्न, ऑस्ट्रेलिया, १९९४ : ९वी जागतिक संस्कृत परिषद
    - ❖ दिल्ली, भारत, १९९४ : तिसरी जागतिक पुरातत्त्व काँग्रेस
    - ❖ टोरिनो, इटली, २००० : ११वी जागतिक संस्कृत परिषद

- हेलसिंकी, फिनलंड, २००३ : १२वी जागतिक संस्कृत परिषद
- एडिनबर्ग, यूके, २००६ : १३वी जागतिक संस्कृत परिषद
- अथेन्स, ग्रीस, २००९ : IAIE वार्षिक परिषद
- बुडापेस्ट, हंगेरी, २००९ : विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या इतिहासाची २३वी आंतरराष्ट्रीय काँग्रेस.
- क्योटो, जपान. २००९ : १४वी जागतिक संस्कृत परिषद
- नवी दिल्ली, २०१० : डिजिटल लायब्ररीवर आंतरराष्ट्रीय परिषद
- बुखारेस्ट, रोमानिया सप्टेंबर २०११ : ५वी आंतरराष्ट्रीय वैदिक परिषद
- कोलकाता, २०११ : डिजिटल लायब्ररी आणि व्यवस्थापनावर आंतरराष्ट्रीय परिषद
- नवी दिल्ली २०१२ : १५वी जागतिक संस्कृत परिषद
- ममैया २०१२ : ५वा आंतरराष्ट्रीय परिसंवाद ''द बुक, रोमानिया, युरोप''
- नवी दिल्ली २०१३ : ICT फॉर डेव्हलपमेंट कॉन्फरन्स २०१३
- नवी दिल्ली २०१३ : इंडिया टेलिकॉम २०१३ (FICCI द्वारे आयोजित)
- केरळ जानेवारी २०१४ : ६वी आंतरराष्ट्रीय वैदिक कार्यशाळा २०१४
- बँकॉक २०१५ : १६वी जागतिक संस्कृत परिषद
- व्हँकुव्हर, कॅनडा २०१८ : १७वी जागतिक संस्कृत परिषद

**इंटरनॅशनल सायन्स काँग्रेस आणि स्टडी टूरमध्ये सहभाग :**

शालेय विद्यार्थ्यांच्या चमूचे गेल्या अकरा वर्षांपासून 'चीन विज्ञान काँग्रेस'मध्ये नेतृत्व उदा. चीन किशोरवयीन विज्ञान आणि तंत्रज्ञान इनोव्हेशन स्पर्धा (CASTIC) आणि ऑक्टोबर २०१३, २०१५, २०१७ मध्ये ब्राझील येथे आयोजित MOSTRATEC - आंतरराष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मेळा, तसेच डेन्मार्क येथे २०१६, २०१७ मध्ये आयोजित डॅनिश यंग सायंटिस्ट फेअर आणि लक्झेंबर्ग येथे २०१८ आणि २०१९ मध्ये आंतरराष्ट्रीय एक्स्पो सायन्सेस मध्ये सहभाग.

विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. व्ही.एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (डॉ. व्ही. एन. ब्रिम्स) च्या विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय औद्योगिक अभ्यास दौऱ्या

दरम्यान नेतृत्व केले उदा. २०१७, २०१८, २०१९ आणि २०२० मध्ये पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट (PGDM) च्या विद्यार्थ्यांचा सिंगापूर दौरा आणि २०१८, २०१९ आणि २०२० मध्ये Executive MBA (EpMBA) विद्यार्थ्यांचा दुबईचा दौरा.

२००४ ते २०१९ या कालावधीत विद्या प्रसारक मंडळाच्या ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन (U.K.) येथील शैक्षणिक दौऱ्यामध्ये भारतीय विद्यार्थी आणि शिक्षकांच्या संघाचे नेतृत्व केले.

- ‘इतिहास पत्रिका’ या संशोधनपत्रिकेचे १९८२-१९८५ पर्यंत संपादन.
- विद्या प्रसारक मंडळाच्या ‘‘दिशा’’ मासिक प्रकाशनाचे संपादक.
- सद्धर्म प्रकाशन, ठाणे द्वारा प्रकाशित ‘‘सद्धर्म’’ मासिकाचे संपादक.
- शिक्षण, जातिव्यवस्था, अंधश्रद्धा आणि सामाजिक महत्त्व अशा विविध विषयांवरील पुस्तके प्रकाशित.